पुण्यश्लोक

# छत्रपति शिवाजी

भाग

दुसरा

५८

९४२

REFBK-0010316

विषय चारित्र

सं. क्र. ९१२

लेखक

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास

पुण्यश्लोक

# छत्रपति शिवाजी

## भाग दुसरा

पुणें येथें चैत्र शके १८८१ मध्यें बाळशास्त्री हरदास
यांचीं छत्रपति शिवाजी महाराजांवरील
दुसऱ्या व्याख्यानसत्रांत झालेलीं
व्याख्यानें

REFBK-0010316

लेखक —

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०३९६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलमत
अनुक्रम २४५८३ वि: चरित्र
क्रमांक ८९२ नों: दि: २०१३/८

मूल्य ८ रुपये

शिवजयंती, शक १८८१

मुद्रक व प्रकाशक

**शंकर रामचंद्र दाते,**
यशवंत छापखाना
१८३५ सदाशिव, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २६५६३..... वि: .....
क्रमांक ..... नों: दि: २०।३।६०

# प्रकाशकाचें निवेदन

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांचीं पुण्यास पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी महाराज यांच्या चरित्रावर शके १८८० (सन १९५८) मध्यें पहिली व्याख्यानमाला झाली. ती पुस्तकरूपानें 'पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी (पूर्वार्ध)' या नांवानें प्रसिद्ध झालीं आहेत. त्या वेळीं हा विषय दोन व्याख्यानमालांत संपवितां येईल असा अंदाज होता. परंतु प्रत्यक्ष अनुभवानें तो तीन व्याख्यानमालांत विस्तारणें आवश्यक वाटूं लागल्यानें या दुसऱ्या व्याख्यानमालेंत शाहिस्तेखानाच्या पाडावापर्यंतचा विषय समाविष्ट करण्यांत आला व म्हणून या ग्रंथास 'पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी --भाग दुसरा' असें म्हटलें आहे.

तिसरी व्याख्यानमाला शके १८८२ मध्यें होईल व तिचा ग्रंथहि यथाकाल प्रसिद्ध होईल.

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांनीं हिंदुराष्ट्राच्या पुनरुत्थानार्थ चालविलेलें हें कार्य जनतेच्या आदरास सर्वत्र पात्र झालें आहे व उत्तरोत्तर त्यांत वाढ होत आहे ही परमेश्वराची कृपाच होय.

प्रकाशक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८५८३ वि: चरित्र
क्रमांक ६७२ नों. दि. २८।३।६०

# पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी

भाग दुसरा

## या ग्रंथांत आलेले विषय


| विषय | पृष्ठें |
|---|---|
| प्रकरण पहिलें – भोसले कुल व शिवजन्मतिथि | १–२३ |
| पूर्वार्धाचा धागा – प्रास्ताविक, राष्ट्रीय पुनरुत्थानाचे प्रयत्न, महापुरुषांचीं लक्षणें, भोसले कुलाचें रजपूतपण, शिसोदिया वंशाची शाखा दक्षिणेंत १३२० च्या सुमारास आली, घोरपडे व भोसले मूळचे एकच, दोन नांवांची व्युत्पत्ति, बारा पिढ्यांची वंशावळ, शिवजन्मतिथीचा वाद, अपुऱ्या व चुकीच्या माहितीचा आधार, नंतरचें नवीन संशोधन, अस्सल पुरावे सांपडले, खरी जन्मकुंडली मिळाली, इतर संशयातीत पुरावे. .. | |
| प्रकरण दुसरें – बालपण व शिक्षण | २४–४६ |
| शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म, हा किल्ला शहाजी राजांच्या ताब्यांत १९३३ सालीं आला, तो येण्यापूर्वीं शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर कोणत्या परिस्थितींत झाला, शहाजी राजांचें प्रथम पुत्रमुखावलोकन, शिवाजीचें बालपण शहाजीराजांबरोबर कर्नाटकांत गेलें, शिवाजीच्या शिक्षणासंबंधींचे वाद व कुतर्क, सातव्या वर्षींच लिपिग्रहण, शिवाजीच्या शिक्षणाबद्दलचे विविध पुरावे, सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था, शिवाजीच्या अंगचे लोकोत्तर गुण पाहून बाराव्या वर्षींच पुण्यास रवानगी, शहाजी राजांनीं करून दिलेली शिवाजीची खास सिद्धता. ...... | |

विषय पृष्ठें

प्रकरण तिसरें – छत्रपतींच्या जीवनमंदिराचे शिल्पकार ४७–६५

बालपणींच्या संस्कारांचें महत्त्व, जिजामाता व दादोजी कोंडदेव यांनीं शिवाजी महाराजांवर घडविलेले संस्कार, दादोजींचा दुहेरी अधिकार – विजापूरकरांचे कोंडाण्याचे सुभेदार व शहाजीराजांच्या जहागिरीचे कारभारी, दादोजींची महत्त्वाची कारभारविषयक कामगिरी, हिंदवी स्वराज्यस्थापनेचा शिवाजी महाराजांचा हेतु, रायरेश्वराच्या मंदिरांतील अपूर्व शपथविधि, स्वराज्यसाधनेचा श्रीगणेशा. ......

प्रकरण चौथें – शिवाजीचीं शत्रुराष्ट्रें ६६–८३

शत्रुराष्ट्रांनीं केलेलें शिवछत्रपतींचें वर्णन – चोर, दरोडेखोर, वधक, पिशाच्च, पिशाच्चपुत्र, इत्यादि; छत्रपतींची भूमिका – "हिंदवी स्वराज्य स्थापून श्री मनोरथ पुरविणार आहे, हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे," शिवाजी महाराजांचे शत्रू – आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, नि मोंगल व त्यांचे सरदार जहागिरदार, पाळेदार इत्यादि, आणि फिरंगी, इंग्रज व सिद्दी, शिवछत्रपतींची राजनीति व रणनीति. ......

प्रकरण पांचवें – सामान्य नीति व राजनीति ८४–१०४

नीति म्हणजे काय, शाश्वत नीतीचें स्वरूप, परिवर्तनशील नीतीचें स्वरूप, राजनीतीचें महत्त्व व तिचें स्वरूप, मनुस्मृति, महाभारत, कामन्दकीय नीतिशास्त्र, व कौटिल्य यांनीं या संबंधांत केलेलें विवेचन, कूट नीतिशास्त्र व कूट युद्धपद्धति

प्रकरण सहावें – शिवाजी महाराजांची नीतिमत्ता १०४–१२२

शिवाजी महाराजांपुढील एकंदर परिस्थिति, तत्कालीन मुसलमानी राज्यकर्त्यांची नीति व राजनीति, शिवाजी

विषय पृष्ठें

महाराजांनीं स्वीकारलेल्या मर्यादा, स्त्रिया, धर्मग्रंथ व धर्म मंदिरें यांच्याबाबत शिवाजी महाराजांचें धोरण, या संबंधांतील कांहीं पुरावे, तैमूरलंग, नादिरशहा, महमूद, चेंगीझखान इत्यादींशीं तुलना करणेंच अयोग्य, हे लोभी तर महाराज धर्मराज्यसंस्थापक. ......

प्रकरण सातवें – राज्यमंदिराचे सात आधारस्तंभ १२३–१४२

राज्यमंदिराचे सात आधारस्तंभ – राजा, अमात्य, मित्रराष्ट्रें, समृद्ध कोश, जनतेचा पाठिंबा, किल्ले व सैन्य या सात अंगांचें तपशीलवार विवेचन. ......

प्रकरण आठवें – शिवछत्रपतींचें विभूतिमत्त्व १४३–१६०

राजा या नात्यानें शिवछत्रपतींचा प्रभाव व विभूतिमत्त्व, राज्याचा आत्मा धर्म, महाराजांचें धार्मिक व्यक्तिजीवन, डोळस धर्मनिष्ठा, बाटलेल्यांचें शुद्धीकरण, उदात्त धार्मिक धोरण, धार्मिक आक्रमणाचा प्रतिकार, जिझिया कराबाबत औरंगजेबाला महाराजांचें आव्हानपर पत्र. ......

प्रकरण नववें – अलौकिक विभूतिमत्त्व १६१–१७९

शिवाजी महाराजांचें छाप पाडणारें व्यक्तिमत्त्व, त्यांचें स्वरूप, रुबाबदारपणा, मुखावरील हास्य, भेदक पाणीदार डोळे, विविध गुणांचा समुच्चय, शिवाजीमहाराजांचें युद्धकौशल्य, भारतीय व पाश्चात्य समकालीनांचे अभिप्राय, मोंगली सैन्य व शिवाजीमहाराचें सैन्य यांची तुलना, जिवावरचे पांच प्रसंग – (१) अफझलखानाची स्वारी, (२) सिद्दी जोहरनें पन्हाळ्याला घातलेला वेढा, (३) शाहिस्तेखानाचें आक्रमण, (४) जयसिंहाची स्वारी, व (५) आग्रा येथील प्रसंग, जीवनांतील पांच कालखंड ......

विषय पृष्ठें

प्रकरण दहावें—स्वराज्याच्या सिद्धतेचा काळ १८०—२०४

स्वराज्याच्या सिद्धतेचा काळ १६४५ ते १६५५, स्वराज्याचा वदोबस्त, कोंडाणा व शिरवळचा सुभानमंगळचा भुईकोट किल्ला महाराजांनीं हस्तगत केला, मुसलमानांचें कर्नाटकांतील राजकारण व शहाजीराजांचें धोरण, त्यांना कपटानें अटक, अफझलखानानें राजाची विजापुरांत बेड्या घालून धिंड काढली, शहाजीच्या सुटकेसाठीं औरंगजेबाचा शह देण्याचा शिवाजी महाराजांचा प्रयत्न, शहाजीनें सिंहगड देऊन विजापूरकरांशीं केलेली तडजोड व शहाजी राजांची सुटका, सिंहगड दिल्याबद्दल महाराजांचा राग, सोनोपंत डबीरांचा हितोपदेश. ......

प्रकरण अकरावें—क्रान्तिकालांतील घटना २०४—२३२

क्रांतियुद्धाचा काल १६५६ ते १६५८, पुरंदर गड कसा घेतला, जावळीचें प्रकरण, चंद्रराव दौलतराव मोरे वारले, यशवंतराव मोरे यांना चद्ररावांच्या गादीवर बसविण्यामागील शिवाजीमहाराजांचें राजकारण, जावळीवरील विजापूरचा अधिकार, वाईचा सुभेदार अफझलखान याच्या अधिकारक्षेत्रांत जावळी मोडते, अफझलखानाचा शिवाजीवर राग, चन्द्रराव यशवन्तराव मोरे यांची शिवाजी महाराजांशीं बेइमानी, शिवाजी महाराजांना मोरे यांचें आव्हान—"तुम्हामध्यें पुरुषार्थ असला तर उदईक याल ते आजच या दारुगोली मौजूद आहे" चन्द्ररावाचा वध, जावळीच्या विजयाचें फलित-समुद्रापर्यंत महाराजांची सत्ता पोचली, आदिलशहाचा मृत्यु व विजापूरचा गोंधळ, संधीचा फायदा घेऊन महाराजांनीं आदिलशाही राज्याचे लचके तोडले, गोवळकोंडें व विजापूर येथील सत्ता बुडविण्याचें औरंगजेबाचें कारस्थान, शिवाजी औरंगजेब पत्रव्यवहार, शिवाजीला हातीं धरण्याचा औरंग-

विषय पृष्ठें

जेबाचा प्रयत्न, विजापूरकरांनीं शिवाजीची मदत मागितली, शिवाजीचे मोंगली सत्तेवर प्रहार, औरंगजेबाचा संताप, इतक्यांत शहाजहानचा मृत्यु व औरंगजेबाचें उत्तरेकडे प्रयाण, आदिलशाही व मोंगली मुलूख काबीज करून केलेला स्वराज्य विस्तार ......

प्रकरण बारावें – अफझलखानाची स्वारी २३३–२५३

अफझलखानाचें व्यक्तिमत्त्व, जबरदस्त सामर्थ्य, कुशल सेनापति, कडवा हिंदुद्वेष्टा, विलक्षण क्रूर, गर्विष्ठ व मदांध, भोसले व अफझलखान याचें हाडवैर, खानानें पैजेचा विडा उचलला – 'शिवाजीला जिवंत चढे घोड्यानिशीं पकडून आणतों,' जनानखान्याचा मनमुराद उपभोग व त्रेसष्ट बायकांचा खून, शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा पाडण्याबद्दल अफझलखानाला आदिलशहाची सूचना, धर्मावरील घणाघात, तुळजापूरची भवानी फोडली व जात्यांत भरडली! शिवाजीला घेरण्याचा प्रयत्न, जावळी प्रथम निर्वेध करण्यासाठीं जावळीच्या चंद्ररावाच्या गादीवर प्रतापराव मोरे यास बसविण्याची तयारी, त्यासाठीं खानाचें वाईस प्रयाण, शिवाजी महाराजांचा खानाशीं टक्कर देण्याचा निर्णय, देवीचा साक्षात्कार व आशीर्वाद ......

प्रकरण तेरावें – अफझलखानाचा वध २५४–२८४

युद्धशास्त्रांतील दोन महत्त्वाचे शब्द—स्ट्रॅटेजी व टॅक्टिक्स व त्यांचे वेगवेगळे अर्थ, शिवाजी महाराज दोन्हींत प्रवीण व दोन्ही बाबतींत त्यांनीं खानावर मात केली, खानाला जावळींत खेचण्याचे महाराजांचें धोरण, शिवाजी एरवी पकडींत सांपडत नाहीं असें पाहून त्याला अखेर भेटीस बोलावून कपट करण्याचें खानाचें राजकारण, खानानें कृष्णाजी भास्कर वकिलाला शिवाजीकडे पाठवलें, तोंडी निरोपांत सलगी व पत्रांत धमकी,

विषय पृष्ठें

महाराजांनीं खानाचा हेतु ताडला, भेटीस महाराज सिद्ध झाले, पण भेट जावळींत व्हावी ही मागणी, महाराजांचे वकील पंताजी गोपीनाथ बोकील, त्यांची थोर कामगिरी, दूत कसा असावा, राजनीतिशास्त्रज्ञांचे अभिप्राय, पंताजींनीं खानास जावळीस येण्यास तयार केलें, 'तुम्ही महापराक्रमी, राजे बहुत भितात तरी जावळीस भेटीस चलावें', गर्विष्ठ खानाचा अहंकार पंताजींनीं फुलविला, खानास स्वसामर्थ्याची भयंकर अहंता, शिवाजीस कस्पटासमान मानून चालला, शिवाजीस हातोहात फसवून जिवंत पकडून नेण्याचा डाव, खान जावळीस जाण्यास तयार झाला, वाटेंत सैन्याचे झालेले भयंकर हाल, शिवाजी महाराजांनीं अफझलखानाच्या सैन्याबरोबर आलेल्या सर्व जवाहिऱ्यांना प्रतापगडावर बोलावलें, व त्यांच्याजवळचें सर्व जवाहीर विकत घेतलें, शिवाजी–अफझलखान काळभेट, अफझलखानानें केलेली शिवाजीची निर्भर्त्सना व अंगभेटीची सूचना, खानानें भेटीसाठी हात पसरले, महाराजांनीं खानास आलिंगन दिलें, तेवढ्यांत खानानें महाराजांची मुंडी मुरगळून कट्यार चालविली, पण चिलखतामुळें महाराज वांचले, महाराजांनीं खानाचा कोथळा बाहेर काढला व शिर धडावेगळें केलें, खानाच्या अंगरक्षकाचा वध, अफझलखानाचें डोकें घेऊन महाराजांचें प्रतापगडावर प्रयाण, महाराजांच्या सैन्याला इशारत, व अफझलखानाच्या बेसावध सैन्यावर महाराजांच्या सैन्याचा चौफेर हल्ला, घनघोर रणकंदन, मुसलमानी सरदारांची दाणादाण व पळापळ, अफझलखानाचें मुंडकें मातुःश्री जिजाबाईच्याकडे राजगडावर पाठवलें. ......

प्रकरण चौदावें–आदिलशाही साम्राज्यावर चौफेर हल्ले २८५–३१७

अफझलखानाच्या पाडावांत महाराजांना झालेला आर्थिक लाभ, आदिलशाहीला धाक उत्पन्न झाला, यापुढें मंदिरें नष्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६५८३ (११) वि: ...
क्रमांक ... विषय नों दि २५/३/६०

पृष्ठें

करण्याचें धोरण थांबलें, समर्थांना अफझलखान वधानें झालेला आनंदीआनंद, समर्थांचें शिवरायास पहिलें पत्र, अफझलखानास कोणी मारलें, कसें मारलें, महाराजांच्या हातीं वाघनखें होतीं काय? विविध ग्रंथांतील विविध उल्लेख, आधारभूत पुरावे, अफझलखान-वध प्रकरणीं नीति-अनीतीचा आधुनिक वाद व त्याची मीमांसा, अफझलखान-वधानंतर शिवाजी महाराजांचे आदिलशाही साम्राज्यावर चौफेर हल्ले, स्वतः शिवाजी महाराज, नेताजी पालकर व दोरोजी यांनीं केलेले पराक्रम, आदिलशाहीपुढें शिवाजीचें प्रश्नचिन्ह, औरंगजेबाला साह्यार्थ विनंति, सिद्दी जोहर पुढें आला, त्याचा अंतःस्थ हेतु, त्यानें शिवाजीवर स्वारी करण्याचें दिलेलें आश्वासन. ... ...

प्रकरण पंधरावें – आदिलशाहीवर मात ३१८–३५०

सिद्दी जोहरची शिवाजी महाराजांवर स्वारी, पन्हाळ्याच्या वेढ्यांत महाराज चार महिने अडकून पडले, याच वेळीं शाहिस्तेखानाचें 'स्वराज्या' वर आक्रमण, खानानें पुण्यास तळ ठोकला, काळोख्या रात्रीं महाराजांचें पन्हाळगडावरून विशाळगडाकडे आडवाटेनें प्रयाण, वाटेंत हेरांनीं पाहिलें, सिद्दी जोहराला बातमी मिळतांच महाराजांचा पाठलाग, गजापूरच्या घोडखिंडींत मसूदखानाच्या सैन्यास बाजी प्रभूनें अडविलें, पराक्रमाची शर्थ, महाराज विशाळगडला पोचले, मसूदखानाचा पराभव, सिद्दी जोहरानें फितुरी केली असा आदिलशहाचा समज, त्यानें सिद्दी जोहराला विष घालून मारलें, शाहिस्तेखानाशीं चाकणचा संग्राम, फिरंगोजीला वश करण्याचा शाहिस्तेखानाचा प्रयत्न, फिरंगोजीची इमानदारी, कारतलबखानाची कोंकणावर स्वारी, व महाराजांनीं त्याचा केलेला पराभव, अगणित द्रव्य हातीं आलें. ... ...

विषय पृष्ठें

प्रकरण सोळावें – शाहिस्तेखानाचा पाडाव ३५१–३८८

शिवाजी महाराजांची कोंकणची मोहीम, सूर्यरावाचें प्रकरण; राजापूरच्या इंग्रज वखारीवर महाराजांची स्वारी, सर्व खजिना लुटला, पुरून ठेवलेलें द्रव्यही उकरून काढलें, राजापुरांत महाराजांना काय काय मिळालें, सिद्दी जोहराला इंग्रजांनीं महाराजांविरुद्ध मदत केल्याबद्दल सूड, सूर्यरावाचें उच्चाटन, फितुऱ्यांना उग्र शासन, मोंगली सैन्याचें वाढतें आक्रमण, नेताजीचें मोगली सैन्याशीं गनिमी काव्याचें युद्ध, त्यामुळें मोंगली सैन्यांत गोंधळ, पुण्यांत शिवाजीमहाराजांच्या लालमहालांत शाहिस्तेखानाचा मुक्काम, महाराजांनीं साहस करण्याचें ठरविलें, कोंडाण्याचा मोंगली किल्लेदार वश करून घेतला, थोड्या लोकांनिशीं महाराजांचा पुण्यांत गुप्त प्रवेश, रमजानचे रोजाचे दिवस, औरंगजेबाच्या राज्यारोहणाच्या वाढदिवसाचा समारंभ चालू असतांनाच्या दिवसाची निवड, रात्रीं मोंगली सैन्य नाचरंग मैफलींत दंग, वाद्यांचा गजर, महाराज उत्तर रात्रीं वाड्यांत शिरले, काळोखांत झालेलें रणकंदन, शाहिस्तेखानाचीं बोटें तुटलीं, शाहिस्तेखान मारला गेला अशी समजूत, गलका वाढतांच महाराज लगोलग निघून गेले, शाहिस्तेखानाच्या शिबिरांत गोंधळच गोंधळ, पुण्याहून शाहिस्तेखानाचें प्रयाण, औरंगजेबाची शाहिस्तेखानावर खप्पा मर्जी. ... ...

प्रकरण सतरावें – उपसंहार ३८९–३९७

छत्रपति शिवाजी महाराजांचें अलौकिकत्व, जगांतील सर्वश्रेष्ठ सेनानींपेक्षांही महाराजांचें विशेषत्व, विविध गुणांची कसोटी लागणारे जीवघेणे प्रसंग, महाराजांना किल्ल्यांचें विशेष महत्त्व होतें, महाराजांचे सेनापति, त्यांची सेना व सेना उभारणीची पद्धत, त्यांचा राज्यकारभार, धनार्जनाचे त्यांचे मार्ग, जमीन सुधारणा, न्यायदान इ. विविध राज्यकारभारविषयांचें विवेचन पुढील भागांत.

### पुण्यश्लोक

# छत्रपति शिवाजी

ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०३१६
(स्थळ प्र

### भाग दुसरा

### प्रकरण पहिलें

## भोसले कुल व शिवजन्मतिथि

[अनुग्रहाय देवानां दैत्यानां निग्रहाय च ।
प्रभुः स जगतां प्रादुरभूत् भूशबलान्वये ॥]
—(शिवभारत, अ. ६, ३८)

बंगालचे विख्यात इतिहाससंशोधक कै. सर जदुनाथ सरकार यांनीं आपल्या 'शिवाजी व शिवकाल' या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, "राष्ट्र निर्माण करणें, राज्य स्थापणें, शत्रूंचा पराजय करणें व स्वतःचें रक्षण करणें, या सर्व गोष्टी करण्यास हिंदु जाति समर्थ आहे, इतकेंच नव्हे तर हिंदूंच्या राज्यांत वाङमय आणि कला, व उद्यम आणि व्यापार यांचेंहि संरक्षण व भरभराट होऊं शकते. लढाऊ गलबतें व व्यापारी जहाजें हिंदूंना बांधतां येतात, आणि पाश्चात्यांशीं त्यांच्याच बरोबरीनें जलयुद्धहि करण्यांत ते कुशल आहेत, व कालानुसार त्यांना आपली उन्नति करून घेतां येते हें शिवाजीनें अर्वाचीन हिंदूंना उत्तम प्रकारें सिद्ध करून दिलें आहे.

"शिवाजीच्या उदाहरणावरून हें सिद्ध झालें आहे कीं, हिंदूंमध्यें नुसते जमादार किंवा कारकूनच उत्पन्न होतात असें नसून छत्रपतींसारखा राजांचा राजाहि उत्पन्न होत असतो. जहांगीर बादशहानें प्रयाग येथील अक्षय्य वट कापून त्याच्या बुध्यावर तापलेली कढई ठोकून बसविली व अक्षय्य म्हणविणाऱ्या वटवृक्षाचा आपण क्षय केला

असें अभिमानपूर्वक बोलून दाखविलें. पण काय? एका वर्षाच्या आंतच त्या बुंध्यांतून पुन: वटवृक्ष फोफावला व त्यानें त्या अजस्र कढईस उलथून बाजूस फेंकून दिलें ! !

" गुलामगिरीच्या शृंखला, राज्यकारभारांतून हकालपट्टी, आणि कायदेशीर दडपशाही, यांच्या वजनाखालीं शेंकडों वर्षे हिंदुत्वरूपी वृक्षाला जरी दडपून टाकिलें तरी तो वृक्ष न मरतां पुन: उद्भवून त्याला नवीन पानें व फांद्या फुटतात व थेट आकाशापर्यंत जाऊन तो भिडतो हें शिवाजीनें आपल्या उदयानें सिद्ध करून दिलें. "

— (शिवाजी व शिवकाल, पृ. २९८ व २९९.)

हिंदु राष्ट्राच्या जीवनेतिहासांतील अशा या देदीप्यमान पर्वाचे अधिनायक पुण्यश्लोक श्री शिवछत्रपति यांच्या उदयापूर्वीची पार्श्वभूमि प्रस्तुत ग्रंथाच्या प्रथम भागांत सविस्तर विवेचिली आहे. त्यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्राचें जें सर्वांगीण पुनरुत्थान झालें त्याची बीजें त्यांच्या मनोवृत्तींत कशीं रुजलीं व त्यांनीं आवाहन करतांच साऱ्या राष्ट्राची जीवनाकांक्षा कां उफाळून वर आली याची मीमांसा त्या विवेचनांत प्रामुख्यानें केलेली आहे.

इतिहासांत अशा अनेक घटना आहेत कीं ज्यांचें वर्णन 'राष्ट्राच्या पुनरुत्थानाचा प्रयत्न ' या शब्दांनीं करतां येईल. महाराणा प्रतापच्या नेतृत्वाखाली राजस्थानच्या परिसरांत व गुरु गोविंदसिंहाच्या नेतृत्वाखाली पंजाबच्या परिसरांत 'राष्ट्रपुनरुत्थाना'चा असा प्रयत्न झाला. शतावधि वर्षांच्या यावनी साम्राज्याच्या काळांत असे आणखीहि कांहीं प्रयत्न झाले आहेत. पण त्यांपैकीं एकहि प्रयत्न यशस्वी झालेला नाहीं. या प्रत्येक प्रयत्नांतून राष्ट्राच्या इतिहासग्रंथाला हौतात्म्याचा एक एक परिच्छेद मिळाला. पण एखाद्या राष्ट्राला केवळ हुतात्म्यांचाच लाभ होणें ही सुदैवाची गोष्ट नसून ती दुर्दैवाची आहे. शिवछत्रपति हे असे हुतात्मा नसून विजयी वीर होते, व म्हणूनच श्रीराम व श्रीकृष्ण यांच्याप्रमाणें ते भारतीय राष्ट्रजीवनाचा सदाचा स्फूर्तिप्रद आदर्श ठरले आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक प. पू. माधवरावजी

गोळवलकर यांनीं आपल्या एका सुप्रसिद्ध भाषणांत शिवचरित्राचें विश्लेषण करतांना काढलेले पुढील उद्गार या दृष्टीनें मननीय आहेत. ते म्हणतात —

"कोणत्या महापुरुषांना आपल्या परंपरेंत पूज्य मानलें गेलें आहे? जे जीवनसंघर्षामध्यें पराभूत झाले, असफल राहिले, त्यांना कधीं भारतीय परंपरेंत आदर्श मानलें आहे काय? कधींच नाहीं. ज्यांनीं स्वतःच्या जीवनकार्यांत संपूर्ण सफलता मिळविली, त्यांचीच पूजा करण्याला, त्यांचाच आदर करण्याला आपल्याला आपल्या परंपरेनें शिकविलें आहे. सर्वसाधारण मनुष्य परिस्थितीचा गुलाम म्हणूनच जगत असतो. अशा प्रकारें परिस्थितीचा गुलाम बनलेली व्यक्ति आमचें पूजास्थान होऊं शकत नाहीं. जो स्वतःच्या प्रभावानें परिस्थिति बदलून टाकतो आणि आपल्या जीवनध्येयाच्या संबधांत पूर्णपणें यशस्वी होतो, तोच पुरुष आपला आदर्श होऊं शकतो. आपली भारतीय संस्कृति सोडली तर बाकी सर्वांनीच 'हौतात्म्याची पूजा केलेली आहे. आपल्या संस्कृतीला हें मान्य नाहीं. कारण 'हुतात्मे' जीवनांत अयशस्वी ठरलेले असतात व अयशस्वी जीवनाचा आदर्श आपण समाजापुढें मुळींच ठेवूं इच्छीत नाहीं. शिवछत्रपति हुतात्मा नव्हते, तर परिस्थितीवर विजय मिळविण्याच्या दृढ इच्छेनें पुढें येऊन स्वतःची बुद्धि आणि चातुर्य यांच्या जोरावर सफलता मिळविणारे महान् आदर्श पुरुष होते. शिवाजी महाराज हे प्रदीर्घ संघर्षांतील विजयाचे प्रतीक आहेत."

विषम परिस्थितींत राष्ट्रपुनरुत्थानाचा शिवछत्रपतींचा प्रयत्न यशस्वी होण्याचें कारण त्यांच्या असामान्य विभूतिमत्त्वांत दडलेलें आहे. त्या असामान्य विभूतिमत्त्वाच्या अथवा जयशाली नेतृत्वाच्या एकाहून एक अधिक तेजस्वी पैलूंचें दर्शन घेणें हें या ग्रंथाचें उद्दिष्ट आहे.

## पवित्र तें कुळ पावन तो वंश

छत्रपति शिवाजी महाराज हे भोसले वंशांतील होते हें कांहीं कोणास सांगावयास नको. त्यांच्या भोसले या नांवाची उपपत्ति

'भोसे गांवचे पाटील' अशी जी देतात ती कशी चुकीची आहे व ते वंशपरंपरागत राजे वा स्वतंत्र जहागीरदार कसे होते याचें वर्णन या ग्रंथाच्या पहिल्या भागांत केलेलेंच आहे. तसेंच तेथेंच शिवछत्रपतींचे पितामह मालोजीराजे भोसले व वडील शहाजी महाराज यांच्याहि पराक्रमाचें व कर्तृत्वाचें सविस्तर वर्णन केलेलें आहे. त्यामुळें तें येथें पुन्हां करण्याचें कारण नाहीं. एका गोष्टीचा येथें निर्देश करणें आवश्यक आहे व ती म्हणजे शिवछत्रपतींच्या वंशाचें राजपुतत्व ही होय. कारण तिचा निर्देश मागच्या भागांत केलेला नाहीं.

शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या वेळीं त्यांच्या क्षत्रियत्वासंबंधीं वाद उत्पन्न झाला होता. 'कलावाद्यन्तयो: स्थिति:' या वचनाचा घोळ घालून त्या वेळीं कांहीं लोकांनीं या अभिषेकसमारंभाला, शिवाजी महाराज क्षत्रिय नाहींत या सबबीवर विरोध केला होता. पण 'कलियुगांत शूद्र व ब्राह्मण हे दोनच वर्ण आहेत' याचा बाऊ करण्याइतकें तें महत्त्वाचें शास्त्रवचन नव्हे. या केवळ सुभाषितवजा वचनाचा अर्थ 'संस्कारलोप झालेला आहे' येवढाच आहे. आजहि सूर्य चंद्र वंशाचे क्षत्रिय आहेत व परंपरेनें ब्राह्मणांइतकेच ते वंशदृष्ट्या शुद्ध आहेत असें राजपुतान्यांतील राजवंशांच्या वंशावळी पाहिल्या तर ध्यानांत येईल. व म्हणूनच गागाभट्टासारख्या 'थोर पंडित, चार वेद, साहा शास्त्रें, योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलियुगींचा ब्रह्मदेव' अशा व्यक्तीनें 'राजे यांच्या वंशाचा शोध करतां राजे शुद्ध क्षत्रिय, शिसोदे, उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें तेंच राजियांचें घराणें असें शोधिलें.' शिवकालीन असे अनेक उल्लेख आहेत कीं ज्यावरून त्यांच्या राजपूत वंशाविषयीं व क्षत्रियत्वाविषयीं शंका राहात नाहीं. पुढील कांहीं उल्लेखच पहा.

(१) शिवभारतांत (अ. १) म्हटलें आहे —

दक्षिणस्यां दिशि श्रीमान् मालवर्मा नरेश्वरः ।
बभूव वंशे सूर्यस्य स्वयं सूर्य इवौजसा ।।४२

"स्वतः सूर्याप्रमाणें तेजस्वी असा मालोजी राजा दक्षिणेंत **सूर्यवंशांत** होऊन गेला."

(२) शिवाजीच्या समकालीन कवि जयराम पिण्डये हे आपल्या 'पर्णाल-पर्वताख्यान' या शिवछत्रपतींवरील काव्यांत शिवाजीचें 'शिसोदिया' हें मूळ राजपूत घराणें असल्याबद्दल उल्लेख करतात.

(३) सभासदाच्या बखरींतील उल्लेख वर गागाभट्टाच्या वर्णनांत दिलेलाच आहे.

(४) भूपण कवीच्या शिवराजभूषण या अलंकार शास्त्रावरील शिवसमकालीन ग्रंथांत राजवंशवर्णन करतांना असें म्हटलें आहे —

राजत है दिनराजको बंस अवनि अवतंस ।
जामै पुनि पुनि अवतरे कंसमथन प्रभुअंस ।। ४
महाबीर ता बंसमैं भयो एक अवनीस ।
लियो बिरद 'सिसोदिया' दियो ईसको सीस ।। ५
ता कुल मैं नृपवृन्द सब उपजे बखत बुलंद ।
भूमिपाल तिन मैं भयो बडो 'मालमकरंद' ।। ६
भूषन भनि ताके भयो भुव-भूषण नृप साहि ।
रातौ दिन संकित रहैं साहि सबै जव माहि ।। ९
दशरथ जूके राम भे बसुदेवके गोपाल ।
सोई प्रगटे साहिके श्रीसिवराजभुपाल ।। १०

— (शिवराजभूषण)

"सर्व पृथ्वीला भूषणभूत अशा सूर्यवंशाचें हें वैशिष्टय आहे कीं, या वंशांत वारंवार कंसमर्दन परमेश्वर अंशावतार घेतो. या वंशामध्यें एक अतिशय पराक्रमी राजा होऊन गेला. त्यानें देवांवरील श्रद्धेला आपलें सर्वस्व अर्पण केलें होतें. तो 'सिसोदे' गांवचा रहिवासी असल्यावरून त्याच्या वंशाचें 'सिसोदिया' हें नांव पडलें. हें कुल सर्व क्षत्रियांत श्रेष्ठ समजतात. या वंशांत अनेक श्रेष्ठ पुरुष झाले. त्यांत 'मालोजी' नांवाचा राजा आपल्या कर्तृत्वानें थोर पदवीला चढला. भूषण म्हणतो त्या मालोजीचा पुत्र शहाजी

अत्यंत प्रभावशाली असून सर्व राजांना त्याच्या नांवाचा धाक असे. ज्याप्रमाणें राजा दशरथाचे रामचंद्र अथवा वसुदेवाचे श्रीकृष्ण, त्याचप्रमाणें शहाजीचे पुत्र शिवाजी हे अवतारी पुरुष होते."

(५) कर्नाटकांतून शहाजी राजांनीं विजापूर दरबारला लिहिलेल्या पत्रांत स्वतःसंबंधीं उल्लेख करतांना 'आपण रजपूत लोक' असें म्हटलें आहे. ही जाणीव हेंच दर्शविते.

या व अशा समकालीन पुराव्यांवरून व संकेतांवरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं शिवछत्रपति हे सिसोदियांच्या वंशांतील शुद्ध क्षत्रिय होते. अलीकडे तर डॉ. बाळकृष्ण यांनीं मुधोळच्या घोरपडे घराण्याचे जुने कागदपत्र व सनदा तपासून, घोरपडे व भोंसले यांचा वंश एकच असून दोघेंहि सिसोदे घराण्यांतील राजपूत होत हें निर्विवादपणें सिद्ध केलें आहे. ते लिहितात —

The lineage of Maharaj Shahaji Bhosle, the founder of greater Maharashtra, has been traced from the Solar Dynasty of Sisod. The rulers of Chittor and Udaipur in Rajputana and those of Kolhapur and Mudhol in the Deccan possessed and even now retain lineal consanguinity. The Persian sanads obtained from the Bahamani and Adilshahi Kings by the Mudhol chiefs have indubitably proved the Rajput origin of the Bhosles. They were known as Ranas for seven generations This title was changed to Raja in the case of Bhimsing in 1471 Since that year the Mudhol rulers adopted the surname of Raja Ghorpade Bahadur, while the younger branch in charge of the Devagiri estates continued to be known as Bhosles.

The very word Bhosle indicates their descent from the Bhaswat Kula or Solar Dynasty They performed heroic deeds in the south and hence too they were named Bhrishbala or Bhosles.

— (Shivaji the great Vol. I, Part II, Page 1 )

"बृहत्तर महाराष्ट्राचे संस्थापक शहाजी महाराज भोसले यांच्या कुळाचा संबंध सिसोदच्या सूर्यवंशाशी आहे ही गोष्ट आतां संशोधनानें सिद्ध झालेली आहे. राजपुतान्यांतील चितोड व उदेपूर येथील राजे आणि दक्षिणेंतील कोल्हापूर व मुधोळचे राजे यांची वंशवेल एकच होती व आहे. मुधोळच्या राजांना बहामनी व आदिलशाही दरबारांतून वेळोवेळीं ज्या पर्शियन भाषेंतून सनदा मिळालेल्या आहेत त्या भोसले घराण्याचें राजपूतपण निर्विवादपणें सिद्ध करतात. सात पिढ्यांपर्यंत घोरपड्यांच्या वंशांतील लोक 'राणा' या उपपदानेंच प्रसिद्ध होते. इ स. १४७१ मध्यें भीमसिंगाच्या वेळी 'राणा' च्या जागीं 'राजा' ही पदवी आली. यावेळेपासून मुधोळच्या राजांनीं 'राजा घोरपडे बहादूर' हें उपपद स्वीकारलें. याच घराण्याची, देवगिरीची जहागीर संभाळून असणारी जी **धाकटी पाती**, ती भोसले या मूळच्या नांवानेंच प्रसिद्ध होती.

भोसले हें नांवच या घराण्याचा भास्वत् कुलाशीं अथवा सूर्यवंशाशी संबंध आहे हें सिद्ध करतें. या वंशानें दक्षिणेंमध्यें जो पराक्रम केला त्यामुळें **भृशबल** हेंहि त्यांचें नांव पडलें."

डॉ. बाळकृष्ण यांनीं मुधोळच्या दप्तरांतील फारशी सनदांच्या वादातीत पुराव्यानें निश्चित केलेली शिवछत्रपतींची वंशावळ पुढीलप्रमाणें आहे.

राजपुतान्यांतील बहुतेक राजवंश पौराणिक वाङ्मयांतील सूर्य व चंद्र कुळाशी आपला संबंध दर्शवितात. बाराव्या शतकांत सूर्यवंशाची एक शाखा राजपुतान्यांतील चितोड व सिसोदें येथें राज्य करीत होती. त्या वेळचा चितोडचा अधिपति कर्णसिंह रावळ हा होता. त्याला तीन मुलें होतीं. त्याच्या देहावसानानंतर वडील मुलगा क्षेमसिंह हा चितोडच्या गादीवर बसला व मधला मुलगा महम हा सिसोदच्या गादीवर बसला. पुढें महमचें अकाली निधन झाल्यावर त्याचा धाकटा भाऊ रहप हा सिसोदच्या गादीवर आला. सिसोदच्या गादीवरील पुरुषांच्या मागें 'राणा' हें उपपद

लावीत. रहपच्या या वंशांतच छत्रपति शिवाजी महाराजांचा जन्म झालेला आहे. रहप पासूनचा जो त्या वंशांतील दहावा पुरुष त्याचें नांव लक्ष्मणसिंह असें होतें. लक्ष्मणसिंहाला अरिसिंह व अजयसिंह हे पुत्र होते. विख्यात महाराणा हमीर हा अरिसिंहाचा मुलगा होय. लक्ष्मणसिंहाचा दुसरा मुलगा अजयसिंह याला सज्जनसिंह व क्षेमसिंह हे दोन पुत्र होते. हे दोघेच राजपुतान्यांतून प्रथम दक्षिणेंत आले. सज्जनसिंह हा सन १३२० च्या सुमारास आपल्या भाग्याची परीक्षा पाहण्यास्तव दक्षिणेंत आला व बहामनी राज्याचा संस्थापक हसनगंगू बहामनी याच्याशीं त्याचे संबंध जुळले असें मुधोळच्या घोरपडे राजघराण्याच्या कागदपत्रांवरून सिद्ध होतें. सन १३४७ मध्यें बहामनी राज्याची स्थापना झाल्यावर हसनगंगू बहामनीनें, त्याच्या राज्यस्थापनेस सज्जनसिंहाचें जें साह्य झालें त्याबद्दल देवगिरी प्रांतांत त्याला जहागीर दिली. पूर्वजांच्या खड्गानें बहामनी राज्य अस्तित्वांत आणलें तर याच वंशांतील शिवछत्रपतींच्या खड्गानें तें संपविलें!

असो. सज्जनसिंहाचा मुलगा राणा दिलीपसिंह हा मोठा पराक्रमी असून विजयनगरशी झालेल्या युद्धांत त्यानें दाखविलेल्या पराक्रमाबद्दल सन १३५२ मध्यें बहामनी राजांनीं त्याला जहागीर दिली. हें बादशाही फर्मान आजहि मुधोळच्या घराण्यांत असून त्यांत राणा दिलीपसिंगाचा उल्लेख 'राणा' व 'सरदार-ई-खासखेल' या उपपदांनीं केलेला आहे. हा सज्जनसिंहाचा पुत्र व सिसोदच्या अजयसिंहाचा नातू असें त्या फर्मानांतच म्हटलेलें आहे. भोंसल्यांचें क्षत्रियत्व सिद्ध करावयाला या प्रत्यक्ष सनदाच आज 'प्रमाण' म्हणून उपलब्ध आहेत; दंतकथांची व तर्कांची आवश्यकताच नाहीं.

राणा दिलीपसिंगाचा मुलगा राणा सिधोजी हा सन १३८८ मध्यें युद्धांत मारला गेला. त्याचा मुलगा भैरोजी अथवा भैरवजी हाहि बापाप्रमाणेंच पराक्रमी होता. फेरोजशहा बहामनीला गादी-वर आणण्यांत राणा भैरवजीनें साह्य केल्यामुळें सन १३९८ मध्यें शहानें त्याला मुधोळ व त्याच्या परिसरांतील ८४ खेड्यांची

जहागिरी दिली. हेंहि शाही फर्मान मुधोळच्या घराण्यांत अद्यापि असून त्यांतील महत्वाचा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे.

"सामंतांच्या अदूरदृष्टीमुळें राज्यांत बंडाळी माजून राज्य संकटांत सांपडलें असतां शांतता प्रस्थापित करण्यांत व आम्हांला पूर्वजांचें राज्य मिळवून देण्यांत गादीचा इमानी सेवक भैरवसिंग (भैरोजी) व त्याचा पिता सिद्धजी यांचें अतोनात साह्य झालें. हे पितापुत्र खांद्याला खांदा भिडवून लढले आणि त्यांनीं जें धैर्य व जी पात्रता सिद्ध केली त्यामुळें ते शाही कृपेस सर्वथा पात्र झाले आहेत. भैरवसिंगाच्या पित्याचा आत्मयज्ञ व त्याची स्वतःची सेवा यांमुळें प्रसन्न होऊन त्याला मुधोळ व रायबाग येथील जहागीर आसमंतांतील ८४ गांवांसह देण्यांत येत आहे. भैरवसिंगजींनीं या जहागिरीचा वंशपरंपरेनें उपभोग घेऊन शाही कृपेला सर्वदा पात्र असावें." —(१३ जानेवारी १५९८)

या फर्मानाप्रमाणें हा भैरवसिंग अथवा भैरवजी मुधोळचा पहिला राणा असून भोसाजी अथवा भोसला असेंहि त्याला म्हणत. याच्यापासूनच भोसला अथवा भोंसले हें कुलनाम प्रचारांत आलें. या राण्यानें आपल्या पराक्रमानें स्वतःच्या जहागिरींत शांतता प्रस्थापित केली. या राण्याला कृष्णसिंह व देवराज अशीं दोन मुलें होतीं. त्यांपैकीं कृष्णसिंह हा पित्यासमोरच एका युद्धांत धारातीर्थीं पडला व बापाच्या मागून दुसरा मुलगा देवराज हा गादीवर बसला. देवराजाच्या मुलाचें नांव उग्रसेन असें होतें.

राणा उग्रसेनानें सन १४२४ मध्यें विजयनगरच्या राजाच्या तावडींत सांपडलेल्या अल्लाउद्दीन अहमदशहा बहामनीचे प्राण आपल्या पराक्रमानें वांचविले. त्याच्या या कामगिरीचा उल्लेख करणारें शाही फर्मान आजहि मुधोळच्या राजघराण्याच्या दप्तरांत पहावयास मिळतें. या राण्याला प्रतापसिंग नांवाचा एक धाकटा भाऊ होता. दोन्ही बंधूंच्या पराक्रमाबद्दल शाही फर्मानांत गौरवास्पद उल्लेख असून त्यांत वाई परगण्यांतील जहागीर देण्यांत आली

आहे. याप्रमाणें या सिसोदिया भोसले घराण्याला मुधोळ, रायबाग, वाई व देवगिरी या विभागांत जहागिरी होत्या.

उग्रसेनाला करणसिंग व शुभकृष्ण हीं दोन मुलें होतीं. ते दोघेहि पराक्रमी होते. या दोघांच्यांत पुढें मनोमालिन्य उत्पन्न होऊन मोठा करणसिंग हा मुधोळच्या गादीवर राहिला व धाकटा शुभकृष्ण हा आपला चुलता प्रतापसिंह याच्यासह सन १४६० मध्यें स्वतंत्रपणें देवगिरीची जहागीर संभाळूं लागला. येथूनच दोन घराणीं अस्तित्वांत आलीं. वडील पाती मुधोळला स्थिरावली व धाकटी पाती देवगिरी विभागांत स्थिरावली. कांहीं काळ त्यांचें भोंसले हें एकच नांव होतें. पण लवकरच मुधोळचें घराणें स्वतःला घोरपडे म्हणवून घेऊं लागले व धाकट्या पातीचें भोंसले हेंच नांव चालू राहिलें. या धाकटया पातीच्या घराण्यांतच पुण्यश्लोक शिवछत्रपतींचा जन्म झाला.

## घोरपडे व भोंसले

करणसिंगाच्या मुलाचें नांव भीमसिंग किंवा भीमसेन असें होतें. तो भीमपराक्रमी होता. त्यानें घोरपडीच्या साहाय्यानें खेळणा किल्ला (पुढें शिवछत्रपतींनीं याचें नांव विशाळगड ठेवलें.) जिंकला व त्यामुळें मुधोळच्या भोंसल्यांच्या मोठ्या पातीला राणा या उपपदाच्या जागीं 'राजाबहादूर' हें उपपद व घोरपडे हें नांव मिळालें. या घराण्याच्या इतिहासांत ही एक परिवर्तन घडविणारी घटना होती. स्वतः बहामनी बादशहाचें फर्मान हाच त्याचा पुरावा होय. हें शाही फर्मान महम्मदशहा बहामनीचें असून तें मुधोळच्या राजांच्या दप्तरीं आहे. पुढें हें घराणें विजापूरचा संस्थापक यूसफ अदिलखान याच्या संपर्कांत कोंकण प्रांतावरील स्वाऱ्यांच्या निमित्तानें आलें व शेवटपर्यंत तें विजापूरचें अंकित राहिलें. वरील शाही फर्मानांत म्हटलें आहे कीं ––

"सांप्रत आमचें साम्राज्य वाढत असून ईश्वराच्या कृपेनें आमच्या सर्व इच्छा पूर्ण होत आहेत. अशा वेळीं आमचा दिवाण मलिक-उल्-

अनुक्रमांक ... दिनांक ... २०।३।६०
क्रमांक ...९८२... नों० दि० ...


तुजर महम्मद गवान अथवा ख्वाजा जहान व दरबारच्या उमरावांतील अग्रगण्य अमीर मय्यद अझिम हुमायून यांनीं शाही नजरेला असें आणून दिलें कीं करणसिंगाचा पुत्र व राणा उग्रसेनाचा नातू राणा भीमसिंग धैर्य व शौर्य यांच्या वनांतील प्रत्यक्ष व्याघ्रच आहे. तो पराक्रमाची गरुडभरारी मारणारा असून त्यानें आपलें बळ, कर्तृत्वांतील कौशल्य, युद्धांतील नेतृत्व, किल्ले जिंकण्यांतील धाडस व शत्रूवर जय मिळविण्याचें सामर्थ्य प्रकट केलें आहे. तो गादीशीं एकनिष्ठ असून शाही कृपेला सर्वस्वी पात्र आहे. तीन हजार सैन्याचें आधिपत्य असणाऱ्या या राण्यानें कोंकणांतील किल्ले जिंकण्याच्या कामांत आपल्या असामान्य शौर्याचा व धाडसाचा पूर्ण परिचय दिला आहे. घोरपडींना दोर बांधून त्यांच्या साहाय्यानें उंच डोंगरी किल्ल्यांवर चढून ते जिंकून शाही सत्तेला जोडण्यांत या राण्यानें व त्याच्या पित्यानें अपूर्व शौर्य प्रकट केलें आहे. या अपूर्व साहसांत राणा भीमसिंगाच्या पित्याला तर आत्मार्पण करावें लागलें.

" भीमसिंगाच्या कर्तृत्वावर प्रसन्न होऊन पूर्वीं दिलेल्या मुधोळ व सभोंवारच्या ८४ गांवांच्या जहागिरीबरोबरच आम्ही रायबाग व वाई या दोन परगण्यांतील दोन किल्ल्यांची किल्लेदारी त्याला देतो. व त्याच्या राणा या पदवीच्या जागीं ' राजा घोरपडे बहादूर ' ही पदवी आम्हीं त्याला देत आहोंत. तसेंच घोरपडीचें चिन्ह असलेला ध्वज आम्ही त्याला देत आहोंत. त्यानें यापुढें आपलें खास वैशिष्ट्य म्हणून तो ध्वज वापरावा. त्यानें वंशपरंपरा गादीशीं एकनिष्ठ असावें. "

हें शाही फर्मान दि. ७ ऑक्टोबर १४७१ चें आहे. याप्रमाणें भोसल्यांच्या वडील पातीचें नांव घोरपडे असें रूढ झालें व राणा याऐवजीं ' राजे ' हें उपपद प्रचारांत आलें. करणसिंगाचा भाऊ शुभकृष्ण वेगळा निघून देवगिरी येथें राहूं लागला याचा उल्लेख मागें केलाच आहे. या शुभकृष्णाच्या वंशांत शिवछत्रपतींचा जन्म झाला. करणसिंग व शुभकृष्ण यांच्यापासून जीं दोन वेगळीं घराणीं झालीं त्यांचे शिवछत्रपतीपर्यंतचे दोन वंशवृक्ष पुढीलप्रमाणें आहेत.

उग्रसेन

| (घोरपडे) | (भोंसले) |
|---|---|
| करणसिंग | शुभकृष्ण |
| भीमसिंग | रूपसिंग |
| खेलोजी | भूमेन्द्रजी |
| खेलोजी | धोपाजी |
| मालोजी | व्हरटजी |
| अभयसिंग | खेलोजी |
| करणसिंग | परसोजी |
| चोलराज | बाबाजी |
| पिलाजी | मालोजी |
| प्रतापसिंग | शहाजी |
| बाजी राजे | शिवाजी |
| मालोजी | |

याप्रमाणें सनदा व अस्सल कागदपत्रांचे पुरावे यांवरूनच शिव-छत्रपति हे श्रीरामचंद्रांच्या सूर्यवंशांतील सुप्रसिद्ध श्रेष्ठ शिसोदे राजपुतांच्या क्षत्रिय वंशांतील ठरतात. आपल्या तेजस्वितेनें त्यांनीं या घराण्याचें तेज मंदावलें नाहीं हें सिद्धच केलें आहे. या वंशांतील महान् पराक्रमी पुरुष भैरवजी अथवा भोसाजी याच्यापासून भोंसले

हें नांव विशेष प्रचारांत आलें असल्याचा उल्लेख मागें केलाच आहे. शिवछत्रपतींचा समकालीन लेखक कवीन्द्र परमानंद हा आपल्या शिवभारतांत 'भृशबल' या नांवानें या घराण्याचा उल्लेख करतो. भृशबल=भृशल=भोंसले अशी ही उपपत्ति आहे.

डॉ. बाळकृष्ण हे 'भास्वत्कुल' या शब्दापासून भोंसले हा शब्द झाला असें मानतात. ते म्हणतात --

'Even the very name 'Bhosala' is indicative of the origin of the dynasity, as it is an abbreviation of Bhaswat kula on the authority of the 'Shahendra Vilasam' and 'Sangita Saramritam'. In an other couplet he is described as a descendant of Rama and his successors. The Sahitya Manjusha tells us that Shivaji belonged to the Kaushika Gotra. Maloji is called an ornament of the Solar race in the Sangita Makarand. (*Shivaji Nibandhavali I P.* 33) Bhosla can be a derivation of 'Bhaswatkula' on the analogy of Deva-kula = Devula, the 't' being dropped as in Pratipada = Padwa. Then Bhasa-ula= Bhasola—Bhosala."

"भोसले हें नांवच सूर्यवंशाचें निदर्शक आहे. 'शाहेन्द्रविलासम्' व 'संगीतसारामृतम्' या ग्रंथांत दर्शविल्याप्रमाणें भास्वत् कुल या शब्दाचें भोंसले हें संक्षिप्त अथवा अपभ्रष्ट रूप आहे. 'रामाचा वंशज' असेंहि शिवाजीचें वर्णन येतें. 'साहित्यमंजूषेंत' असा उल्लेख आहे कीं शिवाजीचें 'कौशिक गोत्र' होतें. 'संगीत मकरद' नांवाच्या ग्रंथांत 'सूर्यवंशाचा अलंकार' म्हणून मालोजीचें वर्णन आहे. (शिवाजी निबंधावलि, भाग १ ला, पृ. ३३) जसें देवकुल=देवुल असेंच भास्वत् कुल=भोसले हें आहे. 'त' चा लोप होऊन अपभ्रष्ट रूपें झाल्याची उदाहरणें आहेत. जसें प्रतिपदा =पाडवा. भास्वत् कुल=भास-उल् भासोल-भोसला अशी ही उपपत्ति आहे.

भोंसले या नांवाची उपपत्ति कोणतीहि असो. पण मेवाडशीं संबद्ध असलेल्या व स्वतःस सूर्यवंशी समजणाऱ्या श्रेष्ठ क्षत्रिय वंशाच्या शिसोदे राजपूत कुळाचे ते होते हें निर्विवाद आहे.

## ( जन्मतिथि निर्णय )

पुण्यश्लोक छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांचा जन्म शके १५५१ शुक्लनाम संवत्सरी, उत्तरायण, शिशिर ऋतु, फाल्गुन वद्य तृतीया शुक्रवारीं रात्रीं झाला. ही गोष्ट आतां इतक्या निर्णायक प्रमाणांनीं सिद्ध झालेली आहे कीं वस्तुतः त्यासंबंधीं कोणताहि वाद असू नये. पण तरीहि हा वाद अजून चालूच असून जुन्या चालत आलेल्या, पण आतां सबळ पुराव्यानें त्याज्य ठरलेल्या, वैशाख शुद्ध द्वितीया या तिथीलाच त्यांचा जन्मोत्सव करावयाचा आग्रह कांही लोकांनी तसाच चालू ठेविलेला आहे. अलीकडे या चुकीच्याच तिथीला सरकारी सुटी देण्यांत येत असल्यामुळें या निष्प्राण होत चाललेल्या आग्रहीपणाला पुन्हां नवीन जीवन मिळालें आहे. शिवजन्मकालासंबंधीं इतिहासलेखकांत पुढीलप्रमाणें मतभेद आढळतात—

(१) ग्रँट डफच्या मतें ३ मे १६२७ हा शिवछत्रपतींचा जन्मदिवस होय.

(२) किंकेड व पारसनीस यांच्या मतें १० एप्रिल १६२७ हा शिवछत्रपतींचा जन्मदिवस होय.

(३) विख्यात इतिहाससंशोधक सर जदुनाथ सरकार यांच्या मतें १० एप्रिल १६२७ हाच शिवछत्रपतीचा जन्मदिवस होय.

किंकेड, पारसनीस व सर जदुनाथ सरकार या तिघांचाहि खरा आधार जुन्या बखरी होत.


## बखरींचा गोंधळ

या बखरींची निर्मिति शिवछत्रपतीच्या नंतर पुष्कळ दिवसांनीं झाली असल्यामुळें त्यांच्यांत महिना, व तिथीच्या संबंधांत गोंधळ

उडालेला आहे, अनेक शिवकालीन घटनांचीहि या बखरकारांना माहिती नाहीं. विख्यात इतिहाससंशोधक श्री. दत्तोपंत आपटे लिहितात—

"शिवजन्मकालीन परिस्थितीसंबंधानें बखरकारांना अगदींच थोडी माहिती असल्यामुळें त्यांनीं जाधवरावांच्या पाठलागाची हकीकत सांगून शिवजन्माचें वर्ष शके १५४८ अगर १५४९ असें सांगितलें आहे. शके १५४८ मध्यें शहाजी विजापूरकराकडे गेला तो पुनः निजामशाहींत परत आला नाहीं अशी बखरकारांची समजूत असल्यामुळें शिवनेरीस शिवाजी जन्म शके १५४८ अगर १५४९ मध्यें झाला असला पाहिजे असें मानणें त्यांना भाग पडलें. त्याचप्रमाणें शिवाजी महाराजांची म्हणून जी कुंडली त्यांच्यापुढें होती तिच्यांत रवि मेष राशीस व चंद्र वृषभ राशीस असल्यामुळें वैशाख शु. २ पासून ५ पर्यंत कोणती तरी शिवजन्मतिथि मानणें त्यांना अपरिहार्य भासलें.

चुकीची कुंडली




हीं कुंडली शिवाजी महाराजांची म्हणून मानण्यांत येत असे, परंतु गणितदृष्ट्या तिचा मेळ कोठेंच बसत नाहीं.

" बखरकार वैशाख महिना एकमतानें देत असले तरी वर्ष व तिथि यांच्या बाबतींत त्यांचें लिहिणें बिनमेळाचें आहे. त्यावरुन त्यांना महाराजांचें जन्मटिपण पहाण्यास मिळालें नव्हतें हें उघड आहे. जन्मटिपणांत वर्ष व तिथि हा तपशील दिलेला असतो. तो पहाण्यास मिळाला असता तर या बाबतींत बखरकारांच्या लिहिण्यांत मेळ राहिला असता. पण त्यांच्या लिहिण्यांत असा मेळ नाहीं. त्यावरून त्यांनीं या गोष्टी तर्कानें लिहिल्या असाव्यात असें म्हणणें भाग आहे. पैकीं वर्षासंबंधीच्या विसंगतीची उपपत्ति 'शके १५४८ मध्यें शहाजी विजापुराकडे गेला' या वाक्यानें लागण्याजोगी आहे. शहाजी १५४८ त विजापुराकडे गेला याचा अर्थ १५४८ शकाच्या चैत्रांत गेला किंवा फाल्गुनांत गेला असा होऊं शकतो. व म्हणून त्यानंतरच्या १५४८ किंवा १५४९ च्या वैशाखांत शिवजन्म धरणें भाग पडतें. आणि त्याप्रमाणें कित्येक बखरकारांनीं शिवजन्माचें वर्ष शके १५४८ दिलें आहे तर कित्येकांनी तें १५४९ दिलें आहे. एकंदरींत एक कुंडली व कांहीं ऐकीव माहिती एवढेच बखरकारांपुढें होतें, पण जन्मटिपण त्यांच्यापुढें नव्हतें. त्यामुळें त्यांना वर्ष व तिथि देतांना तर्काचा आश्रय करावा लागला. आणि याचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्या लिहिण्यांत एकमेकांशीं तर मेळ नाहींच, पण तिथिवारांची संगतिही राहिली नाहीं. "

— (शिवभारत, प्रस्तावना, पृ. ८७–८८)

अस्सल शिवकालीन पुरावे उपलब्ध असतांना, या बखरींवर विश्वासून तदनुसार शिवजन्मतिथि देणाऱ्या इतिहासकारांचें प्रतिपादन मान्य करणें चुकीचेंच ठरतें मग ते पारसनीस असोत, किंकेड असोत, ग्रँट डफ असोत, अथवा कै. जदुनाथ सरकार असोत. वस्तुत: जदुनाथ सरकारांचें बखर वाङ्मयाच्या अविश्वसनीयतेविषयीं कै. आपटे यांच्यासारखेंच मत असून समकालीन अस्सल पुरावे पहाण्याची संधिहि त्यांना उपलब्ध होती. तरीहि या विशिष्ट बाबतींत त्यांनी बखरीनाच हट्टानें उचलून धरलें हें आश्चर्य होय.

## कै. सर जदुनाथ सरकार

बखर साहित्याचा निर्देश कै. जदुनाथ सरकार यांनीं आपल्या 'शिवाजी व शिवकाल' या ग्रंथांत 'त्याज्य साहित्य' या सदरांत केला आहे. ते म्हणतात, "बखरीहि कांहीं फारशा विश्वसनीय नाहींत. अस्सल कागदपत्रांच्या आधारानें आपण बखरी लिहीत आहोंत असा अभिमान बखरनवीसहि बाळगीत नाहींत. ऐकीव गोष्टी, दंतकथा व बाजारगप्पा यांचाच भरणा त्यांत विशेष असतो. बहुतेक बखरी कोणी व केव्हां लिहिल्या हेंहि समजत नाहीं. कोणी बुद्धिमान् पुरुषानें त्या लिहिल्या असाव्यात असेंहि दिसत नाहीं." तरीहि जेधे शकावलीसारख्या विश्वसनीय शकावली-कडे दुर्लक्ष करून व शिवभारतासारख्या शिवछपत्रतींच्या समकालीन व त्यांच्या आज्ञेनें लिहिलेल्या ग्रंथाकडे पाठ फिरवून ते सांगतात कीं "शिवाजीच्या जन्मतिथीबद्दल मल्हार रामराव किंवा दत्ताजीपंत वाकेनिवीस यांच्यासारख्या शिवाजीच्या वंशपरंपरा नोकरांच्या लिहिण्यावर अधिक विश्वास ठेवणें योग्य होय. शिवाजीचा वाढदिवस साजरा होत असून त्याची नोंद सरकारी कागदोपत्रीं ठेवीत असावेत व त्यावरून ही तिथि बखरींत आली असली पाहिजे."

चिटणिशी बखरहि त्यांना पूर्णपणें मान्य आहे असें नाहींच. एका ठिकाणीं तिला ते Deliberately false असें म्हणतात तर दुसऱ्या ठिकाणीं "The hereditary secretary and record keeper of Shivaji's descendants is right." असेंहि त्या बख-रीच्या लेखकाला प्रशस्तिपत्रक बहाल करतात. आपल्या 'शिवाजी व शिवकाल' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात, "समकालीन अस्सल साधनांवरच मी मुख्य भिस्त ठेविली असल्यामुळें खाफी-खान, मल्हार रामराव चिटणीस वगैरेंनीं रचलेलें अलीकडचें भारूड मी साफ सोडून दिलें आहे. पण हें त्यांचें म्हणणें प्रत्यक्ष ग्रंथ लिहितांना त्यांच्या ध्यानांत राहिल्याचें दिसत नाहीं. कारण शिव-जन्मतिथीच्या संबंधांत त्यांनीं नेमकें याच्या उलट केलें आहे!

म्हणजे अस्सल व समकालीन कागदपत्रांना त्यांनीं दूर सारलें आहे, व ज्याला ते भारूड म्हणतात त्यालाच त्यांनीं महत्त्व दिलें आहे. याचें कारण असें कीं अस्सल कागदपत्रांचा त्यांचा ठरलेला विशिष्ट अर्थ आहे; व तो म्हणजे समकालीन पाश्चात्य लेखकांचे आधार व फारशी भाषेंतील यावनी सत्तांच्या पदरीं असलेल्या लेखकांचें लेखन. त्यामुळें श्री. दत्तोपंत आपटे यांनीं त्यांच्यासंबंधीं काढलेले पुढील उद्गार कडू असले तरी ते अगदीं यथार्थ आहेत. श्री. आपटे लिहितात —

"फारशी व इंग्रजी साधनांवर विश्वसून शिवचरित्र लिहिल्यामुळें प्रो सरकार यांना खाफीखान व ग्रॅन्ट डफ यांचा आधुनिक अवतार म्हणणें न्यायाचें आहे."

मराठी भाषेचें सूक्ष्मज्ञान नसल्यामुळें त्यांना मराठी साहित्याचा व साधनांचा उपयोग करतां आला नाहीं. जेधे शकावलीसारख्या प्रमाणभूत साधनांचा वापर, शकावलींत तिथि व शकरूपानें नोंद असल्यामुळें व प्रो. सरकारांना इंग्रजी दिनांकच सोयीचे असल्यामुळें, शकावलीचा उपयोग करण्याचें त्यांनीं टाळलें, व शिवभारतासारखा अस्सल समकालीन पुरावा 'काव्य' म्हणून बाजूस ठेवला. वस्तुत: या ग्रंथांत जें काव्य असेल त्यासंबंधीं मौन पाळणें वेगळें व तें केवळ छंदोबद्ध रचनेंत आहे एवढ्याचसाठीं हा अस्सल ऐतिहासिक उल्लेख दूर सारणें वेगळें. कोणताहि कवि केवढाहि कल्पनेच्या भराऱ्या मारणारा असला तरी कोणाहि महापुरुषाच्या जिवंतपणीं, त्याच्याच आज्ञेवरून त्याचें चरित्र वर्णन करीत असतां, त्याची जन्मतिथि, बुद्धया चुकीची कशी लिहील ? पण हा साधा विवेकहि त्यांनीं केला नाहीं. शिवभारत हा ग्रंथ शिवछत्रपतींच्या समोर, त्यांच्याच आज्ञेवरून परमानंद कवीन्द्रानें लिहिलेला आहे. त्यामुळें शिवछत्रपतींना अथवा राजमातेला प्रत्यक्ष विचारणें अथवा छत्रपतींचें जन्मटिपण प्रत्यक्ष पाहणें त्यालाच शक्य होतें व तें त्यानें केलेंच असलें पाहिजे हें निर्विवाद होय. कोणताहि कवि रामाच्या पराक्रमाच्या वर्णनांत

कल्पनेच्या कितीहि भराऱ्या मारील हें खरें असलें, तरी रामाचा जन्म चैत्र शुद्ध नवमी ऐवजीं अमावास्येला झाला असें म्हणू शकत नाही हें जदुनाथ सरकार यांनी ओळखावयास हवें होतें.

## समकालीन पुरावे व खरी शिवजन्मतिथि

शिवछत्रपतींच्या जन्मतिथीसंबंधीं समकालीन विश्वसनीय असे तीन चार पुरावे आतां उपलब्ध झालेले असून त्यांवरून या प्रश्नाचा पूर्ण निर्णय झालेला आहे. हे पुरावे पुढीलप्रमाणें —

(१) शिवशकावलीत म्हटलें आहे, "शके १५५१ शुक्ल नाम संवत्सरे फाल्गुन वद्य ३ शुक्रवार हस्त घटी १८ प. ३२ गंड ५।७ ते दिवसीं राजश्री सिवाजीराजे शिवनेरीस उपजले." या उल्लेखांत तिथि व वार यांचेहि उल्लेख असून नक्षत्र व योग यांच्या घटकां-पळांचाहि स्पष्ट निर्देश आहे.

(२) कवीन्द्र परमानंदाच्या, श्रीशिवसमकालीन व त्यांच्याच आज्ञेवरून लिहिलेल्या 'शिवभारत' या ग्रंथांत छत्रपतीच्या जन्म-कालासंबंधानें पुढीलप्रमाणें उल्लेख आहे —

भूबाणप्राणचन्द्राब्दै सम्मिते शालिवाहने ।
शके संवत्सरे शुक्ले प्रवृत्ते चोत्तरायणे ॥ २६
शिशिरर्तौ वर्तमाने प्रशस्ते मासि फाल्गुने ।
कृष्णपक्षे तृतीयायां निशि लग्ने सुशोभने ॥२७
अनुकूलतरैस्तुंगसंश्रयैः पञ्चभिर्ग्रहैः ।
व्यंजिताशेषजगतीस्थिरसाम्राज्यवैभवम् ॥ २८
अपारलावण्यमयं स्वर्णवर्णमनामयम् ।
कमनीयतमग्रीवमुन्नतस्कन्धमण्डलम् ॥ २९
अलिकान्तमिलत्कान्तकुन्तलाग्रविराजितम् ।
सरोजसुंदरदृशं नवकिंशुकनासिकम् ॥३०
सहजस्मेरवदनं घनगंभीरनिःस्वनम् ।
महोरस्कं महाबाहुं सुषुवे साद्भुतं सुतम् ॥ ३१

—(शिवभारत अध्याय ६)


"शालिवाहन शके १५५१ शुक्ल नाम संवत्सरीं उत्तरायणांत शिशिरऋतूमध्यें फाल्गुन वद्य तृतीयेला रात्रीं शुभ लग्नावर, अखिल पृथ्वीचें साम्राज्यवैभव व्यक्त करणारे पांच ग्रह अनुकूल व उच्चीचे असतांना तिनें अलौकिक पुत्ररत्नास जन्म दिला. त्याचें लावण्य अपार, वर्ण सुवर्णासारखा, शरीर निरोगी, मान अत्यंत सुंदर व खांदे उंच होते; त्याच्या कपाळावर सुंदर कुंतलाग्रें पडल्यामुळें तें मोहक दिसत होतें. त्याचे नेत्र कमळाप्रमाणें सुंदर, नासिका ताज्या पळसाच्या पुष्पासारखी, मुख स्वभावतःच हसरें, स्वर मेघासारखा गंभीर, छाती विशाल आणि बाहु मोठे होते.

प्रस्तुत वर्णनांत शिवशकावलीप्रमाणेंच इतर सारे उल्लेख असून त्यांच्या जन्माची वेळ रात्रींची दिलेली आहे. ही माहिती अधिकची म्हणतां येईल. शिवशकावलीचें लेखन शिवराज्याभिषेकानंतर लवकरच झालेलें आहे. व शिवभारत आणि शिवशकावली या दोन्ही समकालीन उल्लेखांत पूर्णपणें साम्य आहे.

(३) आतांपर्यंत शिवछत्रपतींची जन्मवेळ ठरविण्याचें महत्त्वाचें साधन जी त्यांची जन्मकुंडली ती उपलब्ध झालेली नव्हती. पण ती हल्लीं उपलब्ध झालेली आहे. बिआवर संस्थानांतील पं. मीठालाल व्यास यांच्या संग्रहीं त्यांच्या घराण्यांत चालत आलेल्या अनेक जुन्या कुंडल्या आहेत. याच बाडांत शिवछत्रपतींची जन्मकुंडली असून तिचा लेखक शिवराम ज्योतिषी हा छत्रपती शिवाजी महाराजांचा समकालीन होता असें वादातीत प्रमाणांनीं रायबहादुर पं. गौरीशंकर ओझा ह्यांनीं सिद्ध केलेलें आहे. प. गौरीशंकर ओझा हे अजमेर येथें संशोधन खात्याचे मुख्याधिकारी होते. शिवराम ज्योतिष्याचें हें टिपण महाराजांच्या वेळचेंच असल्यामुळें तें पूर्णपणें विश्वसनीय आहे. या टिपणाचा शिवशकावलीशीं व शिवभारताशीं आश्चर्यकारक मेळ बसतो. तें टिपण पुढीलप्रमाणें आहे.

## शिवाजी महाराजांची जन्मकुण्डली

संवत १६८६ फाल्गुन वदि ३ शुक्रे उ. घटी ३० । ९
राजा शिवाजी जन्मः । र. १० । २३ ल ४ । २९.




या कुंडलीवरून शिवछत्रपतींचा जन्म सूर्यास्तानंतर झाला असें सिद्ध होतें, व तृतीयायां निशि या शिवभारतकारांच्या म्हणण्याशीं पूर्णपणें जुळतें. हा शिवराम ज्योतिषी शके १५५९ मध्यें जन्मला असून शके १६४२ मध्यें मृत्यु पावलेला आहे. तो शिवाजी महाराजांचा समकालीन असल्यामुळें त्याची कुंडली पूर्णपणें समकालीन व म्हणूनच पूर्णपणें विश्वसनीय ठरते.

या तिन्ही शिवकालीन लेखकांच्या लेखांतील आश्चर्यजनक साम्य पाहिल्यावर शिवछत्रपतींची उपलब्ध जन्मपत्रिका त्यांना माहीत असल्यामुळेंच हें साम्य निर्माण झालेलें आहे हें उघड ठरतें. जन्मकुंडलीवरून जन्मकालनिर्णय करणाऱ्या लेखकांच्या लेखांत विसंगति असण्याचें कांहींच कारण नाहीं, व अशी जन्मकुंडली पाहण्याची सोय शिवसमकालीन लेखकांनाच होती. त्यामुळें अशी सोय नसलेल्या बखरींच्या लेखनांत विसंगति निर्माण झाली, तर समकालीन लेखकांत तशी विसंगति नाहीं.

## अवांतर पुरावे

(१) इ. स. १८०३ मध्यें तंजावर येथील भोसले घराण्यानें तंजावरला आपल्या वंशाचा एक शिलालेख कोरलेला आहे. त्यात फाल्गुन व. ३ शके १५५१ हीच शिवजन्मतिथि दिलेली आहे. शिवभारताची पहिली प्रत तंजावरच्याच ग्रंथालयांत सांपडलेली असल्यामुळें शिवछत्रपतींच्या या सापत्न घराण्यांत विश्वस्त उल्लेखांची नोंद असणें स्वाभाविक ठरतें

(२) जोधपूर संस्थानांत चंडू या नांवाचें ज्योतिष्यांचें एक प्रसिद्ध घराणें आहे. या घराण्यांत प्राचीन काळापासून अनेक हिंदु व मुसलमान राजांच्या कुंडल्यांचा संग्रह करण्याची पद्धति असे. त्यांत शिवछत्रपतींचीहि कुंडली असून त्या कुंडलींतहि हीच मिति सांगितलेली आहे.

(३) प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. आवळसकर यांनी अलीकडे चित्रे घराण्याचे कागदपत्र तपासले. हें घराणें पोलादपूरचें असून हे चित्रे बाळाजी आवजी चिटणीस यांचे वंशज होत. त्यांच्या दप्तरांत आवळसकर यांना एक टिपण सांपडलें आहे. तें टिपण शिवचरित्र-साहित्याच्या दहाव्या खंडांत प्रसिद्ध झालेलें असून त्यांत शिव-छत्रपतींच्या राज्याभिषेकाचा काळ देतांना ते पंचेचाळीस वर्षांचे होतें असें म्हटलें आहे. त्यावरून छत्रपतींचा जन्म इ. स. १६३० मध्यें झाला असेंच ठरतें. महाराजांचा राज्याभिषेक ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शके १५९६ मध्यें झालेला आहे. त्या वेळीं ते ४५ वर्षांचे होते याचाच अर्थ त्यांचा जन्म शके १५५१ मध्यें झाला असा होतो.

(४) शिवसमकालीन मुत्सद्दी रामचंद्रपंत अमात्य यांनीं आपल्या राजनीतीमध्यें शिवछत्रपतींनी वयाच्या पंधराव्या वर्षी हिंदवी स्वराज्याच्या उपक्रमाचा प्रारंभ केला असें लिहिलें आहे. हा स्वराज्यस्थापनेचा प्रारंभ इ स. १६४५ मध्यें झालेला आहे. हें रोहिड खोऱ्याच्या दादाजी नरसी प्रभू देशमुखांना शिवछत्रपतींनीं स्वतः पाठविलेल्या पत्रावरूनच सिद्ध होतें. १६४५ सालीं

शिवछत्रपति हे जर पंधरा वर्षांचे होते तर त्यांचा जन्म इ. स. १६३० अथवा शके १५५१ मध्यें झाला हें उघडपणेंच सिद्ध होतें.

तात्पर्य, पुण्यश्लोक श्री छत्रपति शिवाजीमहाराज यांचा जन्म शके १५५१ शुक्ल संवत्सर उत्तरायण शिशिर ऋतु फाल्गुन वद्य तृतीया शुक्रवारीं रात्रीं झाला हें निर्विवाद आहे. इंग्रजी दिनांकाप्रमाणें १९ फेब्रुवारी सन १६३० हा त्यांचा जन्मदिनांक ठरतो.

शिवछत्रपतींचा जन्म शिवनेरीस झालेला आहे. या जन्माच्या वेळची म्हणून एक दंतकथा अशी प्रचलित आहे कीं, शहाजी महाराज त्या वेळीं निझामशाही वांचविण्याच्या खटपटींत होते व त्यांचे सासरे नि जिजाबाईचे वडील जाधवराव हे मोंगलाकडून निझामशाही बुडविण्याच्या प्रयत्नांत होते. अशा स्थितींत जाधवराव हे आपल्या जावयाच्या पाठीस लागले असतां पत्नी जिजाबाई ही गरोदर असल्यामुळें शहाजी राजांनीं तिला आपल्या मालकीच्या शिवनेरी किल्ल्यावर ठेवलें व ते पुढें निघून गेले. गरोदर मुलीला जाधवरावांनीं आपल्या बरोबर चलण्याचा पुष्कळ आग्रह केला; पण त्या मानी स्त्रीनें पतीविरुद्ध असलेल्या आपल्या पित्याचें संरक्षण व साह्य पूर्णपणें नाकारलें. शिवजन्माच्या वेळी शहाजी महाराज शिवनेरीला नव्हते.

या दंतकथेंतील शहाजी महाराज शिवनेरीला नव्हते एवढें सोडून बाकी सगळें वर्णन चुकीचें आहे. तसेंच या वेळीं शिवनेरी ही शहाजी महाराजांच्या स्वाधीन नव्हती. शिवनेरी शहाजी राजांच्या स्वाधीन होती या चुकीच्या समजुतीचा परिणाम सर जदुनाथ सरकार यांच्याहि लेखनावर झालेला आहे. व त्यांनीं या ठिकाणीं आपल्या प्रतिभेनें एक विडंबनकाव्यच निर्माण केलें आहे. त्या विडंबनकाव्याचें स्वरूप व तत्कालीन प्रत्यक्ष ऐतिहासिक वस्तुस्थिति यांच्याकडे पुढील प्रकरणांत वळू.

✦ ✦ ✦

प्रकरण दुसरें

# बालपण व शिक्षण

तस्य सहजमेधाशालिनं सुस्वभावं
नृपमृगपतिशावं वागगम्यानुभावम् ।
गुरुरुपचितचित्तः शिक्षितानां समूहे
द्रुतधृतलिपिविद्यं वीक्ष्य वैलक्ष्यमूहे ॥
—(शिवभारत, अ. ९-७४)

पुणें जिल्ह्यांतील जुन्नरजवळचा शिवनेरी किल्ला हें छत्रपति शिवरायांचें जन्मस्थान होय. त्यांच्या जन्माच्या वेळीं राजे शहाजी हे युद्धाच्या धुमश्चक्रींत असून जन्मानंतर सहा महिन्यांनीं पित्याला पुत्राचें मुखदर्शन घडलें शिवजन्माच्या घटनेमागेंहि रोमांचकारी कल्पित कथांचीं जाळीं पसरलेलीं आहेत. त्यांपैकीं राजे शहाजी यांचे श्वशुर लखूजी जाधवराव हे त्यांचा पाठलाग करीत असल्याची कल्पित कथा मागच्या प्रकरणाच्या शेवटीं उद्धृत केलेलीच आहे. या एकंदर कथेचें स्वरूप पुढील प्रमाणें आहे.

"शहाजी बाल निजामशहाला आपल्या मांडीवर घेऊन शाही सिंहासनावर बसू लागला. मोठमोठ्या सरदारांना व उमरावांना शहाला अथवा शाही सिंहासनाला मुजरा करण्यासाठीं राजसभेंत यावें लागे. हा मुजरा वस्तुतः बाल निजामशहाला असला तरी तो प्रत्यक्ष शहाजीलाच घडत असे. दरबारच्या मानी मराठ्यांना व अन्य सरदारांना हा प्रकार अत्यंत अपमानास्पद वाटून त्यांचा जळफळाट होई. या मानधन हिंदूंना परधर्मीय सिंहासनासमोर मस्तक वांकवितांना राजनिष्ठेच्या भावनांचे उमाळे येत. पण परधर्मीयांसमोर सदैव वांकण्याची संवय असलेलें त्यांचें मस्तक स्वकीयांसमोर कसें वाकावें? ती तर सर्वांत लज्जास्पद गोष्ट!! अशा या मानधन हिंदू सामंतांत शहाजीराजांचे श्वशुर लखूजी जाधवराव हेहि होते. एकतर शहाजी राजे हे त्यांचे जांवई असल्यामुळें

मानानें जाधवराव हें त्यांच्यापेक्षां मोठे होते, व तोलदारीच्या दृष्टीनेंहि जाधवराव शहाजीपेक्षां अधिक श्रेष्ठ होते. त्यामुळें हा अपमान सहन न होऊन त्यांनी निजामशाही सोडली व ते मोंगलांना जाऊन मिळाले. इतकेंच नव्हे तर त्यांनी मोंगलांकरवीं निजामशाहीवर स्वारी करविली. शहाजीराजे त्या वेळीं माहुलीला होते. तेथून ते पुढें व जाधवराव मागें अशा स्थितींत पळत असतां आसन्नप्रसवा असणाऱ्या जिजाबाईला त्यांनीं आपल्या शिवनेरी किल्ल्यावर ठेवलें व तेथेंच शिवरायांचा जन्म झाला."

## कल्पित कादंबरी

ही सारीच कथा कल्पित असण्याचें कारण शिवरायांच्या समकालीन असणाऱ्या साहित्यांत तिचा उल्लेख सुद्धां नाहीं. शिवराजभूषण, शिवभारत, सभासदाची बखर, चित्रगुप्ताची बखर अथवा जेधे शकावलि या प्रमाणभूत साहित्यांतही या घटनेचा उल्लेख नाहीं. वस्तुत: ही गोष्ट खरी असती तर इतकी रोमांचकारी घटना भूषण अथवा परमानंद कवीन्द्र यांच्यासारखे समकालीन कवि तिचा आपल्या काव्यांत समावेश केल्याशिवाय कदापि रहाते ना.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, इसवी सन १६३२ पर्यंत निजामशाहीच्या गादीवर बुऱ्हाण अथवा मूर्तिजा निजामशहा हा होता. त्यामुळें सन १६३२ पर्यंत तरी शहाजीनें कोण्या मुलाला मांडीवर घेऊन निजामशहाच्या गादीवर स्वत: बसण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. या कथेवर विश्वास असणाऱ्या लोकांच्या मतें शिवजन्माचा दिनांक १० एप्रिल १६२७ हा आहे. मूर्तिजा निजामशहा त्या वेळीं जिवंत असल्यामुळें, शहाजीच्या राज्यासनावर बसण्यामुळें जाधवरावांनीं रुसून मोंगलांकडे जाणें व त्यांचें सैन्य घेऊन आपल्या जावयाचा पाठलाग करणें संभवतच नाही. सन १६२७ मध्यें शहाजी विजापूरच्या आदिलशाहीकडे नोकरीला होते व त्यांचे सासरे जाधवराव हे मोंगलांच्या पदरी होते. त्यामुळें शहाजी माहुलीला घर करून राहणें व जाधवरावांनीं त्यांना तेथून हुसकून लावून

त्यांचा पाठलाग करणें या साऱ्याच कल्पित कथा ठरतात. इ. स. १६३२ मध्यें मलिकंबरचा मुलगा फत्तेखान यानें मूर्तजा निजामशहाची हत्या केली. नंतर त्यानें दौलताबाद जिंकून मूर्तजाच्या वारसाला सन १६३३ मध्यें ग्वालेरला बंदिगृहांत टाकलें. बाल निजामशहाला उभें करून निजामशाहीच्या गादीचें संरक्षण करण्याचा भार शहाजींनीं १६३३ मध्यें आपल्या अंगावर घेतला. त्या वेळीं ते माहुलीला होते विजापूर नि मोंगल सैन्यानें मिळून सन १६३६ च्या डिसेंबरमध्यें शहाजीराजांना माहुलीहून हुसकून दिलेलें आहे.

इ. स. १६२५ ते १६२८ पर्यंत ते विजापूर राज्याच्या सेवेंत होते. १६२८ मध्यें निजामशाहीच्या मुख्य सचिवानें त्यांना निमंत्रिल्यामुळें ते दौलताबादला गेले. शिवनेरीचा किल्ला त्या वेळीं निजामशहाच्या स्वामित्वाखालीं होता. अशा वेळीं (१६२६।२७ मध्यें) शहाजीसारख्या बंडखोराला शिवनेरीचा दुर्गरक्षक आश्रय देणें शक्यच नाहीं. तसेंच आपली बायकामुलें शिवनेरीला म्हणजेच शत्रूच्या गोटांत ठेवून स्वतःला संकटांत टाकण्याइतके राजे शहाजी हे भोळसर निश्चित नव्हते. त्यामुळें राणी जिजाबाई इ. स. १६२७ मध्यें शिवनेरीला असण्याचाच जर संभव नाहीं तर त्या वर्षी शिवछत्रपतींचा जन्म तेथें होणें सर्वथा अशक्य ठरतें.

१६२७ मध्यें शिवनेरी शहाजी राजांच्या स्वामित्वाखालीं तर नव्हताच. पण सन १६२७ च्या प्रारंभीं बादशहा जहांगीरच्या विरोधी उठावणी करण्याच्या प्रयत्नांत असलेल्या शहाजहाननें निजामशाहीचा पाहुणा म्हणून या किल्ल्याचा आश्रय घेतला होता. दोन सहस्र घोडदळासह महाबतखान येथेंच शहाजहानला येऊन मिळाला. २८ ऑक्टोबर १६२७ मध्यें जहांगीरचें निधन झालें व ती वार्ता वीस दिवसांनी शहाजहानला या ठिकाणीं कळविण्यांत आली. शहाजी त्या वेळीं निजामशाही सोडून विजापूरकरांकडे आलेला असल्यामुळें तो निजामशाहीच्या दृष्टीनें बंडखोरच होता. अशा

स्थितींत तो आपली गरोदर पत्नी शत्रूच्या गोटांत असलेल्या व तेंहि शहाजहानासारखा पाहुणा राहात असलेल्या किल्ल्यांत ठेवील ही गोष्ट संभवनीय तरी आहे काय? या वेळीं शिवनेरीवर निजामाच्या वतीनें विश्वासराव अथवा विजयराज नांवाचा अधिकारी दुर्गसंरक्षक होता. सन १६३३ मध्यें शहाजीराजांनीं हा किल्ला घेतलेला आहे. शहाजीचे श्वशुर लखूजी जाधवराव हे सन १६२७ मध्यें मोंगलांच्या पदरीं म्हणजे जहांगीर बादशहाच्या पदरीं होते; पण बंडखोर शहाजहानच्या अधीन शिवनेरी असल्यामुळें त्यांना सुद्धां आपल्या मुलीला, जिजाबाईला तेथें पाठवितां येण्याची शक्यता नाहीं.

शिवाय सन १६२७ मध्यें निजाम व मोंगल यांच्यांत युद्धच उपस्थित झालेलें नसल्यामुळें मोंगलांनीं शहाजीच्या मागें लागण्याचें कारणच नाहीं. सन १६३० मध्यें राजे शहाजी निजामशाहीच्या विरुद्ध उठले. पण त्याचें कारण निजामाच्या राजसभेंत त्यांचे श्वशुर जाधवराव यांची झालेली हत्या हें होतें. म्हणजे या युद्धांत जाधवराव व शहाजी असें द्वंद्व सिद्धच होऊं शकत नाहीं.

समकालीन शिवभारत ग्रंथ व तंजावरचा शिलालेख यांवरून राजे शहाजी हे दर्याखानाचें बंड मोडण्याच्या कार्यात युद्धांत गुंतले असतां शिवाजी महाराजांचा जन्म झालेला आहे. दर्याखानाचें प्रकरण सन १६३० मध्येंच उद्भवलेलें असल्यामुळें शिवजन्माचें वर्ष सन १६३० हेंच मानावें लागतें.

याप्रमाणें सन १६२७ मध्यें शहाजीचा संबंध शिवनेरीशीं जोडतां येत नाहीं हें खरें असलें तरी सन १६३० मध्यें तरी जिजाबाईचें शिवनेरीला रहाणें व शिवछत्रपतींचा तेथें जन्म होणें संभवनीय होतें काय असा प्रश्न उत्पन्न होतो. कारण सन १६३० मध्यें शिवनेरी शहाजीच्या अधीन नव्हतीच. शहाजीचें शिवनेरीवरील स्वामित्व सन १६३३ मध्यें प्रस्थापित झालेलें आहे. पण या प्रश्नाचें उत्तर परमानंद कवीन्द्रानें शिवभारतांत दिलेलें आहे, व तें इतकें समर्पक आहे कीं त्यानंतर या संबंधांत कोणतेहि विवाद उरूं शकत नाहींत.

## शिवनेरी व जिजाबाई

कवीन्द्र परमानंद म्हणतो —

मनीषिण ऊचु: ।

शिवनेरीगिरौ जात: शिवराज इति त्वया ।
परमानंद संप्रोक्तमस्ति नस्तत्र संशय: ॥ १
स हि शैलो निजामस्य प्रियकारी महायशा: ।
प्रतापी प्रथितो लोके धारागिरिरिवापर: ॥ २
अभूदागमनं तत्र यथा शाहमहीपते: ।
तथा कथय न: सर्वं भट्टगोविन्दनन्दन ॥ ३

कवीन्द्र उवाच ।

सुधामिवातिमाधुर्यवतीं पुण्यवतीमिमाम् ।
कथां शाहनरेन्द्रस्य शृणुत द्विजसत्तमा: ॥४
अस्तं गतेऽम्बरमणिप्रतापे बर्बरेऽम्बरे ।
निर्मन्त्रिणि निजामे च स्थितिसंजातसंशये ॥ ५
दिवंगते दैवयोगादिभरामेऽनुभाविनि ।
तत्सुते महमूदे च दृप्ते तत्पदवर्तिनि ॥ ६
सैन्ये साहिजहानस्य दिल्लीन्द्रत्वमुपेयुष: ।
दक्षिणां दिशमादातुमवलेपादुपागते ॥ ७
प्रतनेनानुबंधेन निजामोपचिकीर्षया ।
शाहराजो महाबाहुर्विजयाह्वपुरं जहौ ॥ ८
अथ यादवराजोऽपि हित्वा ताम्रानुयायिताम् ।
पक्षपाती निजामस्य धारागिरिमुपागमत् ॥ ९
अत्रान्तरे निजामस्य भृशं विश्रम्भभाजनम् ।
वंश्यो विश्वासराजस्य शिवभक्तो महाव्रत: ॥ १०
तनय: सिद्धपालस्य सुप्रसिद्धोऽतिवैभव: ।
शिवनेरिगिरिस्थायी नृपतिर्विजयाह्वय: ॥ ११
वराय शम्भुराजाय शाहराजसुताय वै ।
जयन्तीमात्मतनयामनुरूपाममन्यत ॥ १२

शाहराजोऽपि संबंधं तं सुश्लाघ्यतमं भुवि ।
संविचिन्त्य स्नुषात्वेन जयन्तीं तमयाचत ॥ १३
ततो विजयराजस्य शाहराजस्य चोभयोः ।
अभूद्यथोक्तसंबंधसुप्रयुक्तो महोत्सवः ॥ १४
विश्वासराजवंश्यानां भूपानां भूरितेजसाम् ।
तथा भृशबलानां च समवायो महानभूत् ॥ १५
स तयोः श्लाघ्यगुणयोः जयंतीशम्भुराजयोः ।
शिवनेरिगिरावासीत्पाणिग्रहमहो महान् ॥ १६
अथो कतिपयाहोभिस्त समाप्य महोत्सवम् ।
तस्यैव च गिरेर्मूर्ध्नि स्वजनेन समन्विताम् ॥ १७
संबंध्यनुमतः पत्नीमन्तर्वत्नी निधाय ताम् ।
प्रतस्थे शाहनृपतिर्दर्याखानजिगीषया ॥ १८ –(शि. भा. अ. ८)

"पंडित म्हणाले— 'अहो परमानंद, शिवाजीराजा शिवनेरी किल्ल्यावर जन्मला असें आपण सांगितलेंत, पण त्याविषयीं आम्हांस शंका आहे. कारण तो किल्ला निजामशहाचा आवडता, यशस्वी आणि बळकट असून जणूं काय दुसरा देवगिरी (दौलताबाद) म्हणून लोकांत विख्यात होता.

"कवीन्द्र म्हणाला— 'हे द्विजश्रेष्ठांनो, ही अमृताप्रमाणें अत्यंत मधुर आणि पवित्र अशी शहाजी राजाची कथा आपण ऐका. सूर्याप्रमाणें प्रतापी असा मलिकंबर बर्बर हा अस्तंगत झाला आणि निजामशहाला दुसरा चांगला प्रधान न मिळाल्यानें त्याचें राज्य कसें टिकतें याची शंका उपस्थित झाली. तसेंच दैववशात् चतुर इब्राहिम आदिलशहा दिवंगत होऊन त्याचा उन्मत्त मुलगा महंमदशहा त्याच्या गादीवर आला. इकडे शहाजहान हा दिल्लीचा बादशहा झाला आणि त्याचें सैन्य दक्षिण जिंकण्यासाठीं मोठ्या घमेंडीनें आलें. अशा वेळीं आपला पुरातन संबंध ओळखून निजामशहाचें कल्याण करण्याच्या इच्छेनें बलाढ्य शहाजीराजा विजापूर सोडून त्याच्याकडे आला. पुढें जाधवराव सुद्धां मोंगलांचें अनुयायित्व टाकून दौलताबादेस निजामशहाच्या पक्षास येऊन मिळाला.

याच समयीं विश्वासराजाच्या कुळांतील सिद्धपालाचा मुलगा शंकरभक्त, कर्तृत्ववान् सुप्रसिद्ध व अत्यंत वैभवशाली विजयराज हा निजामशहाचा अत्यंत विश्वासू असून तो शिवनेरी किल्ल्यावर राहात असे. आपल्या जयंती नांवाच्या मुलीला शहाजीचा थोरला पुत्र संभाजी ह्याच अनुरूप वर आहे असें त्याला आढळून आलें. राजे शहाजी यांनाहि हा संबंध योग्य वाटून त्यांनी त्या मुलीला मागणी घातली. दोन थोर घराण्यांच्या या संबंधाची सिद्धता मोठ्या वैभवशालीपणानें करण्यांत आली यानिमित्त उभय संबंधी-यांचें मोठें वऱ्हाड शिवनेरीला एकत्रित आलें लग्नसमारंभ शिवनेरी किल्ल्यावर मोठ्या थाटानें पार पडला. या समारंभाच्या निमित्तानें शहाजीराजे कांहीं दिवस तेथें असतांना दर्याखानाचें मोठें बंड उद्भवलें व तें मोडण्यासाठी शहाजी राजांना तत्काळ दर्याखाना-वर चालून जावें लागलें. त्या वेळीं राणी जिजाबाई गरोदर असून आसन्नप्रसवा होत्या. त्यामुळें नवीन व्याह्यांच्या संमतीनें जिजाबाईना कांहीं मंडळींसह शिवनेरीलाच ठेवून शहाजीराजे दर्याखानावर चालून गेले."

शहाजीराजांच्या स्वाधीन नसलेल्या शिवनेरीवर शिवछत्रपतीचा जन्म होण्याचें व जन्माच्या वेळीं शहाजीराजे जवळ नसल्याचें हें असें सरळ व योग्य कारण असतां कल्पित उपपत्तींच्या आडरानांत शिरण्याचें कारण नाहीं.

या भारताचें भवितव्य घडविणाऱ्या महापुरुषाचें शिवाजी हें नांव ठेवण्याचें कारणच शिवनेरी किल्ल्यावर झालेला जन्म हेंच होय. शिवभारतांत म्हटलें आहे —

> यतः शिवगिरेर्मूर्ध्नि जातः स पुरुषोत्तमः ।
> ततः प्रसिद्धा लोकेऽस्य शिव इत्यभिधाऽभवत् ॥ ६३
>
> —(शिवभारत अ. ६)

" शिवनेरी किल्ल्यावर या पुरुषश्रेष्ठाचा जन्म झाला म्हणून त्याचें 'शिव' असें नांव पडलें."

## जदुनाथांचे कुतर्क

समकालीन लेखकांचें संस्कृत व मराठी साहित्य न पाहतां केवळ इंग्रजी व पर्शियन लेखकांच्या उल्लेखांवरच भरवसा ठेवल्यामुळें शिवछत्रपतींच्या बाल्यावस्थेविषयींहि चमत्कारिक दंतकथा व अपसमज यांना जदुनाथ सरकार यांच्यासारखे खंदे इतिहास-संशोधकहि बळी पडलेले आहेत. ते लिहितात—

"शिवजन्मानंतर शहाजी व जिजाबाई याच्या संबंधींच्या कथा व शिवाजीचें वय वीस वर्षांचें होईपर्यंतचें वृत्त, जें पुढें लिहिण्यांत आलेल्या बखरींतून वर्णन केलेलें आहे त्यांचा उपलब्ध असलेल्या विश्वसनीय इतिहासाशीं मेळ बसत नाहीं. किंबहुना अनेक स्थळीं विरोधच दृष्टीस पडतो. समकालीन मुसलमानी इतिहासावरून आपणांस असें दिसतें को, सन १६३० पासून सन १६३६ पर्यंत शहाजीचा काळ इकडून तिकडे व तिकडून इकडे निव्वळ भटकण्यांत गेला. या काळांत त्याच्या अनेक जणांशी चकमकी झडल्या नि त्याला वारंवार स्थलांतर करावें लागलें. अशा परिस्थितींत त्यानें जिजाबाईस चिमुकल्या शिवबासह शिवनेरीसारख्या बळकट दुर्गावर नीट व्यवस्थेनें ठेवणें अगदीं स्वाभाविक आहे. तथापि ह्या मायलेकांकडे त्याचें दुर्लक्षच झालें होतें असें म्हणणें भाग पडतें. कारण, याच कालावधींत शहाजीनें तुकाबाईशीं लग्न केलें. जिजाबाईच्या मानानें तुकाबाई किती तरी तरुण असल्यानें शहाजीचा ओढा तुकाबाईकडे असणें निसर्गसिद्धच होय. तुकाबाईपासून शहाजीला व्यंकोजी नांवाचा पुत्र झाला. शहाजीनें आपलें पुढील सर्व आयुष्य तुकाबाई व व्यंकोजी यांच्याच सहवासांत घालविलें.

"इ. स. १६३६ च्या मार्च महिन्यांत जिजाबाई व शिवाजी शिवनेरीस रहात होते असें बादशाहनामा या समकालीन इतिहासांत स्पष्टच लिहिलें आहे. सन १६३६ च्या आक्टोबरमध्यें झालेल्या संधींत शहाजीनें जे सात किल्ले मोंगलांना दिले त्यांत शिवनेरी हा

एक असल्यानें सन १६३६ नंतर जिजाबाई त्या किल्ल्यांत अधिक दिवस राहणें शक्य दिसत नाहीं. या तहानतर शहाजी लगेच विजापूरकरांकडे आला व त्यांनीं त्याला तत्काळ दक्षिणेंत स्वारीवर पाठविलें. यावरून सन १६३७ च्या प्रारंभीं शिवाजी पुण्यास येऊन राहिला असें दिसतें. वरील विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, शिवाजी शिवनेरीवर असतांना शहाजी भटकतच राहिला. त्यामुळें कधींकाळीं क्वचित् प्रसंगीं तो शिवनेरीवर गेला असेल तेवढीच या पितापुत्रांची भेट; त्याशिवाय उभयतांचें एकमेकांस दर्शनसुद्धां नव्हतें. आणि शिवाजी पुण्यास आल्यावर तर या बापलेकांची भेट दुर्लभच झाली. सभासदानें म्हटलें आहे कीं 'तो (दादोजी कोंडदेव) बेंगरुळास महाराजांचे (शहाजीचे) भेटीस गेला. त्याबरोबर राजे श्री शिवाजी राजे व जिजाबाई आऊ ऐशी गेली. ते समयीं राजियांस (शिवबास) वर्षे १२ होतीं.' याप्रमाणें नवऱ्यानें टाकलेली जिजाबाई कथापुराण-श्रवणांत आपला काळ घालवून मनाचें कसें तरी सांत्वन करीत असे. तिची ही धार्मिक प्रवृत्ति लहानग्या शिवबांतहि तंतोतंत उतरली. शिवनेरीसारख्या एकांत स्थळीं ना भाऊ ना बंद अशा असहाय स्थितींत शिवबाचें बालपण गेलें. मायलेकांचें प्रेम सर्वत्रच असतें. परंतु जिजाबाई नि शिवबा यांना एकमेकांविना जवळचा असा आप्त शिवनेरीवर व पुण्यासहि दीर्घकालपर्यंत एकहि नसल्यानें या मायलेकांचें प्रेम अनन्यसाधारण होतें. इतकें कीं, शिवबास जिजाबाई ही एक देवताच आहे असें होऊन गेलें शिवबाची ही मातृभक्ति शेवटपर्यंत तशीच होती."

## चुकीचे आधार

जदुनाथांनीं मुसलमान व इंग्लिश इतिहासकारांवर जो विलक्षण भर दिलेला आहे तो मुळांतच चुकीचा आहे. मोंगली अथवा विजापुरी इतिहासांत शहाजी नि शिवाजी यांचे उल्लेख येतात हें खरे आहे, पण येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, शिवछत्रपति डोळ्यांत भरण्यासारखे सामर्थ्यसंपन्न झाल्यावरच ते या यावनी

अनुक्रम २५५६३ दि. ........
क्रमांक ९७२ नों. दि. २६/३/६०


इतिहासलेखकांच्या डोळ्यांत भरले. त्यापूर्वी किरकोळ पुंड यापलीकडे त्यांच्या दृष्टींत यांची गणना नव्हती. त्यामुळें शिवछत्रपतींच्या बालजीवनाच्या दृष्टीनें हे यावनी लेखक कुचकामाचे ठरतात. इंग्लिश, पोर्तुगीज, डच आदि प्रवाशांचे उल्लेख तर त्यांच्याशीं शिवछत्रपतींचा प्रत्यक्ष संबंध आल्यानंतरच त्या त्या प्रसंगापुरते प्रमाण मानतां येतील. त्यामुळें या यावनी व फिरंगी लेखकांनीं शिवछत्रपतींच्या बालजीवनाविषयीं जें लिहिलें तें समकालीन मराठी व छत्रपतींचें जीवन प्रत्यक्ष त्यांच्या सहवासांत समजावून घेतलेल्या संस्कृत लेखकांच्या तुलनेनें केवळ भाकड-कथेसारखें ठरतें. म्हणून श्री. दत्तोपंत आपटे यांनीं "सरकारांचें अफझल प्रसंगापर्यंतचें शिवचरित्र बखरवजा आहे" असें जें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

## छत्रपतींच्या बालजीवनाचें खरें स्वरूप

छत्रपतींच्या बालजीवनाचें वर्णन करतांना ते शिवनेरीवरच होते हा जो सरकारांनी आग्रह धरलेला आहे तो चुकीचा एवढ्या-साठीं ठरतो कीं, शिवनेरीचा किल्ला सन १६३३ मध्यें शहाजीच्या अधीन झालेला आहे. त्यामुळें १६३० ते १६३३ या काळांत शिवछत्रपति व जिजाबाई शिवनेरीवर राहण्याची शक्यता नाहीं. शहाजीनें पुत्रमुखदर्शन जें घेतलें तें शिवछत्रपतींच्या अन्नप्राशन-संस्कारानंतर घेतलेलें आहे. शिवभारतांत म्हटलें आहे-

> उपवेशनमप्यन्नप्राशनं च यथाविधि ।
> अस्य राजकुमारस्य क्रमेण समजायत ।। ९२
> दर्याखानं शरैर्भित्वा नीत्वा निरवलेपताम् ।
> विजयी शहराजोऽपि शिवं गिरिमथाव्रजत् ।। ९३

—(शिवभारत अ. ६)

'त्या राजकुमाराचें उपवेशन आणि अन्नप्राशन हे संस्कार यथाविधि आणि यथाक्रम करण्यांत आले. नंतर दर्याखानास आपल्या बाणांनीं विद्ध करून आणि त्याचा गर्व हरण करून विजयी होत्माता शहाजी राजासुद्धां शिवनेरीस आला."

धार्मिक पद्धतीप्रमाणें अन्नप्राशनसंस्कार सामान्यत: दहा महिन्यांनंतर होतो. म्हणजे राजे शहाजी यांनीं दर्याखानाचा पराभव केल्यानंतर दहा महिन्यांच्या शिवबांना पाहिलें. यानंतर शहाजी राजे आपल्या स्वाधीन नसलेल्या शिवनेरी किल्ल्यांत, व्याह्यांच्या घरीं आपल्या राणीला व पुत्राला ठेवतील हें त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीकडे पाहतां अगदींच असंभवनीय आहे. अर्थातच त्यांनीं आपली राणी व पुत्र यांना त्यांचें तत्कालीन निवासस्थान जें शाहगड तेथें आणलें असलें पाहिजे. त्यानंतर इ. स. १६३३ मध्यें शहाजी राजांनीं निजामाचे जे दुर्ग जिंकून घेतले त्यांत मुत्सद्दीपणानें जुन्नर नि शिवनेरी दुर्गहि घेतला. त्यानंतर सन १६३६ पर्यंत जुन्नर-शिवनेरी होच शहाजी राजांची राजधानी होती. निजामशाहीच्या, त्यांनींच निर्माण केलेल्या धन्यासह जिजाबाई व शिवाजी यांच्या समवेत राजांचा हा काळ शिवनेरीस गेला. सन १६३६ मध्यें शिवनेरी राजांच्या हातांतून गेली. अर्थातच त्या वेळीं जिजाबाई व शिवबा यांना तेथें ठेवण्याची कोणतीच शक्यता नव्हती. त्यानंतर दंडा राजपुरी व पुढें माहुली या ठिकाणीं त्यांचा निवास होता. तीन वर्षांच्या त्यांच्या शिवनेरीवरील वास्तव्याचाच उल्लेख वस्तुत: पातशाहनाम्यांत आहे. सरकार यांनीं केला तसा त्या उल्लेखाचा अर्थ होत नाहीं. दंडा राजपुरी व माहुलीच्या परिसरांत शहाजी राजे असतांना राणी जिजाबाई व शिवबा त्यांच्या जवळच होते. सन १६३७ पासून राजे प्रथम विजापूरला होते. नंतर ते कर्नाटकच्या स्वारीवर गेले. त्या वेळीं हे मातापुत्र त्यांच्या बरोबरच होते. कर्नाटकामध्यें पांच वर्षें हे मातापुत्र शहाजी राजांच्या समवेत होते. म्हणजे शिवरायांच्या जीवनाचीं पहिलीं बारा वर्षें पित्याच्या सान्निध्यांत व सहवासांतच गेलीं आहेत. १६३६ नंतर शिवनेरी जर मोगलांच्या अधीन होता तर शहाजीची पत्नी व पुत्र तेथें असण्याची शक्यता तरी आहे काय? शिवरायांची वयाच्या बाराव्या वर्षी पुण्याला जी पाठवणी झालेली आहे ती कर्नाटकांतून बंगलोरच्या शहाजी राजांच्या प्रासादांतून झालेली आहे. परस्पर शिवनेरीहून

दादोजी कोंडदेवांनीं त्यांना नेलेलें नाहीं. कारण शिवनेरीचा नि शहाजी राजांचा संबंध सन १६३६ मध्येंच संपलेला आहे.

## शहाजी व जिजाबाई

रायरी वखरीच्या खोट्या कल्पनाजालावर विश्वास ठेवून जदुनाथांनीं शहाजी व जिजाबाईच्या संबंधविच्छेदाची नसती कल्पना केली व जिजाबाईंना अकारण परित्यक्ता ठरवून त्याचें कारण ते त्यांच्या गेलेल्या तारुण्यांत शोधण्याचा आचरट प्रयत्न करीत बसले. स्वाभिमानशून्य व अनियंत्रित मानवी बुद्धि एकदां भरकटू लागली म्हणजे ती आचरटपणाचा कसा उच्चांक गांठते याचें हें निदर्शनच होय. जर जिजाबाईचा शहाजीनें परित्याग केला असता तर एकटे शिवाजी राजेच आईबरोबर पुण्याला आले असते काय? जिजाबाईचा वडील मुलगा व शिवछत्रपतींचा वडील बंधु संभाजी हा त्या वेळीं चांगलाच कर्तृत्ववान् व पराक्रमी होता. आपल्या आईचा हा अपमान त्यानें कधींहि सहन केला नसता. तो आपल्या आईबरोबर पुण्यालाच आला नसता काय? पण तो तर शेवटपर्यंत शहाजीराजांच्या बरोबर कर्नाटकांतच होता. शहाजीराजांच्या दुसऱ्या लाडक्या राणीला लहानगे निरुपद्रवी शिवराय डोळ्यांसमोर नको होते, पण उपद्रवाचें सामर्थ्य असलेला वडील सावत्र मुलगा संभाजी चालत होता काय? तात्पर्य, या सगळ्या आधारहीन कल्पना चुकीच्या आहेत.

शहाजीराजांनीं तुकाबाईशीं लग्न करण्यानें त्यांचें जिजाबाईवरील प्रेम कमी होतें अथवा जिजाबाई परित्यक्ता होत्या हें सिद्ध होऊं शकत नाहीं. त्या काळीं बहुपत्नीकत्वाची सर्वत्र रूढि होती. तें एक वैभवाचें व सन्मानाचें प्रतीक समजलें जात असे. शिवछत्रपतींचा पहिला विवाह झाल्यावर तो केवळ आपण पाहिला नाहीं येवढ्यासाठीं शहाजीराजांनीं त्यांचा दुसरा विवाह घडवून आणला होता. या घटनेचा, शिवछत्रपतींची पहिली पत्नी परित्यक्ता होती अथवा तिच्यावर त्यांचें कमी प्रेम होतें असा अर्थ कोणीहि शहाणा मनुष्य करणार नाहीं, व कोणी केला तर तो वेडगळपणाचाच ठरेल.

शिवभारतांत जें वर्णन आहे व शिवछत्रपतींच्या जन्मापासून शहाजी राजांचा जो एकसारखा उत्कर्ष होत गेला आहे त्याचा विचार केला तर शहाजीराजांचें या आपल्या धाकट्या मुलावर अतोनात प्रेम असणेंच स्वाभाविक आहे; व असा आपला भाग्योदय घडवून आणणाऱ्या मुलाची माता म्हणून शहाजी राजांच्या हृदयांत जिजाबाई-विषयीं प्रेमादराचें स्थान निर्माण होणें हेंच स्वाभाविक आहे, असें आढळून येईल. शिवजन्मापूर्वीचा शहाजी राजांचा काळ अत्यंत धामधुमीचा व संघर्षाचा गेलेला आहे. शिवजन्मानंतरच त्यांना जीवनांत स्थिरता लाभली, व एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणें वैभवाचे दिवस घालविण्याची अवस्था प्राप्त झाली. स्वाभाविकपणेंच अतिशय चांगल्या पायगुणाचा मुलगा म्हणून शिवछत्रपतीवर त्यांचें विलक्षण प्रेम बसलें. शिवभारतांत परमानंद कवींद्रानें या गोष्टीचें यथावत् वर्णन केलें आहे. तो म्हणतो --

जननी शंभुशिवयोस्तत्र यादवनंदिनी ।
जग्राह हृदयं पत्युः शुद्धान्ते सुमहत्यपि ।।६०
हलिना हरिणा चापि वसुदेवो यथान्वहम् ।
व्यराजत तथा शाहः शंभुना च शिवेन च ।।६१
स तु शंभोः कनीयांसं गरीयांसं गुणश्रिया ।
वहु मेने महाराजः शिवशर्माणमात्मजम् ।। ६२
यदाप्रभृति संजातः स एव तनयः शिवः ।
तदाप्रभृति शाहस्य समृद्धाः सर्वसंपदः ।। ६३
अतिष्ठन् द्वारि बहुशो मंदराचलसुंदराः ।
विजितांभोरुहरुचो मदवारिमुचो गजाः ।।६४
आसन् सहस्रशश्चापि मंदुरायां मनोहराः ।
वातो इवाशुगतयः सैंधवाः समरोद्धुराः ।।६५
ववृधे चाधिकं कोपस्तोषेण सह नित्यशः ।
प्रतापः प्रप्रथेऽत्यर्थं प्रभावश्च दिने दिने ।।६६
दुर्ग्रहाण्यपि दुर्गाणि सुग्रहत्वं प्रपेदिरे ।
विजयस्सर्वदैवासीत् स्वप्नेऽपि न पराभवः ।।६७

पुष्पाणां च फलानां च सस्यानां चाभिवृद्धय: ।
साधनेन विना सिद्धिमीयुस्सर्वाश्च सिद्धय: ।।६८
एवं समृद्धतां नीत: पुराणपुरुषात्मना ।
सुतेन तेन सुतरां मुमुदे मालनंदन: ।। ६९ –(शिवभारत, अ. ९)

" शहाजीच्या स्त्रिया पुष्कळ असूनहि, शंभु आणि शिवाजी यांची आई जी जाधवरावांची मुलगी (जिजाबाई) तिनें आपल्या पतीचें हृदय काबीज केलें होतें. बलराम आणि कृष्ण यांच्यायोगें जसा वसुदेव नेहमीं शोभत असे त्याप्रमाणें शंभुजी व शिवाजी यांच्यायोगें शहाजी हा शोभत असे. शंभुजीपेक्षां वयानें धाकटा पण गुणांनीं मोठा असा आपला पुत्र शिवाजी यावर शहाजीराजाचें फार प्रेम होतें. जेव्हां हा पुत्र शिवाजी जन्मला तेव्हांपासून शहाजीचें सर्व ऐश्वर्य वृद्धिंगतच होत गेलें. मंदर पर्वताप्रमाणें सुंदर, कमळांच्या कांतीला ज्यांनीं मागें सारलें आहे, ज्यांच्या गंडस्थळांतून मदजळ गळत आहे असे पुष्कळ हत्ती त्याच्या द्वारीं उभे असत. वायूप्रमाणें वेगवान् आणि युद्धामध्यें खंबीर असे हजारो सुंदर घोडे त्याच्या पागेमध्यें होते. त्याच्या संतोषाबरोबर त्याचा कोपहि नित्य अधिक वाढूं लागला. त्याचा प्रताप आणि दरारा हे दिवसेंदिवस अतिशय वाढत चालले. दुर्जय असे दुर्गसुद्धां त्याला सुलभ झाले, त्याचा सदोदित विजयच होत असे; आणि स्वप्नांतसुद्धां त्याचा पराभव होत नसे. फुलें, फळें आणि धान्यें यांची अभिवृद्धि झाली, आणि साधनावांचूनच त्याचे सर्व मनोरथ सिद्धीस जाऊं लागले. याप्रमाणें विष्णुरूपी त्या पुत्राच्या योगें भरभराट पावलेला मालोजीचा पुत्र (शहाजी) हा त्या मुलास पाहून अत्यंत आनंदित होत असे."

## शिवरायांचें शिक्षण

ग्रँट डफ प्रभृति पाश्चात्य व जदुनाथ सरकार प्रभृति भारतीय लेखकांनीं शिवछत्रपति निरक्षर होते अशा रीतीचा जो समज पसरविलेला आहे तो किती चुकीचा आहे याचें दिग्दर्शन मी पहिल्या भागांत केलेलें आहे. तरी पण छत्रपतींच्या जीवनाच्या प्रत्यक्ष समालोचनाला या ग्रंथांत प्रारंभ केलेला असल्यामुळें त्यांच्या

विद्यासंपन्नतेविषयींचे पुरावे येथें एकत्रित देणें उचित ठरेल. हे पुरावे म्हणजे शिवछत्रपतींच्या समकालीन लेखकांनीं यासंबंधांत केलेलें वर्णन व त्याला अनुलक्षून नंतरच्या लेखकांनीं केलेलें वर्णन होय. समकालीन लेखकांपैकीं शिवभारताचा लेखक हा सर्वात अधिक विश्वसनीय आहे. शिवभारत काव्य असलें तरी तें ऐतिहासिक सत्याच्या कसोटीवर उतरतें कीं नाहीं हा महत्वाचा प्रश्न आहे. व तसें तें उतरत असल्यास काव्य आहे येवढ्या एकाच कारणासाठीं जदुनाथ सरकारांनी त्याला जें डावललेलें आहे तें चुकीचें ठरतें. काश्मीरच्या राजांचा इतिहास राजतरंगिणी नांवाच्या काव्यांत सांगितलेला आहे. पण काव्य म्हणून राजतरंगिणीचें इतिहासाच्या दृष्टीनें असलेलें महत्त्व यत्किंचित्सुद्धां कमी ठरत नाहीं. ऐतिहासिक कसोटीचा अर्थ, शिवभारतांत वर्णन केलेले प्रसंग इतिहासाच्या अन्य पुराव्यानें सिद्ध होतात कीं नाही हा आहे; व या कसोटीला हा ग्रंथ पूर्णपणें उतरतो. उदाहरणार्थ, तळकोंकणवर शिवाजी महाराजांनीं केलेल्या स्वारीविषयींचे अस्सल कागदपत्र आतां उपलब्ध झाले आहेत. या स्वारीचें विस्तृत वर्णन इतर कोठेंहि नसून शिवभारतांत मात्र तें आढळतें. तळकोंकणच्या स्वारीचा शिवभारतानें दिलेला काळ हल्लीं उपलब्ध झालेल्या अस्सल कागदपत्रांच्या पुराव्याशीं पूर्णपणें जुळता असून महाराजांनीं त्या प्रांतावर आपली सत्ता प्रस्थापित केल्याचा उल्लेख ज्या स्वरूपांत शिवभारतांत आलेला आहे त्याच स्वरूपांत तो अस्सल कागदपत्रांत आढळतो. शिवभारताचें प्रामाण्य सिद्ध करावयास येवढी गोष्टही पुरेशी आहे. प्रत्यक्ष महाराजांच्या आज्ञेनें लिहिलेल्या या चरित्रात्मक ग्रंथांतील तपशील सर्वाहून अधिक प्रमाण मानला पाहिजे. त्यावरून छत्रपतींच्या शिक्षणकालाचे दोन भाग पडतात असें दिसतें. पहिला भाग वडील शहाजी राजे यांच्या सहवासांतील पहिल्या बारा वर्षांचा व दुसरा भाग छत्रपतींची पुण्यास पाठवणी झाल्यावर जिजामाता व दादोजी कोंडदेव यांच्या दृष्टीखालीं गेलेला होय. राजे शहाजी हे स्वतः विचक्षण पंडित असून त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. अशा या

सुजाणबुद्धीच्या व विद्येचें महत्व ओळखणाऱ्या पुरुषानें आपल्या अत्यधिक प्रेमास्पद मुलाला विद्येपासून वंचित ठेवणें सर्वथा असंभवनीय होय. शिवभारतकार पित्याच्या सहवासांतील महाराजांच्या प्रारंभिक शिक्षणासंबंधानें पुढीलप्रमाणें वर्णन करतात.

ततस्तं तनयं वीक्ष्य सगुणं सप्तहायनम् ।
लिपिग्रहणयोग्योऽयमिति भूपो व्यचिन्तयत् ॥७०

स तं पुत्रं मंत्रिपुत्रैः सवयोभिः समन्वितम् ।
न्यवेशयत गुर्वंके मेधाविनमलोहलम् ॥ ७१

आख्याति लिखितुं यावदाचार्यो वर्णमादिमम् ।
तावद् द्वितीयमप्येष विलिख्य तमदर्शयत् ॥७२

सर्वासामपि विद्यानां द्वारभावमुपागताम् ।
लिपिं यथावदखिलां ग्राहयामास तं गुरुः ॥७३

तमथ सहजमेधाशालिनं सुस्वभावं
नृपमृगपतिशावं वागगम्यानुभावम् ।
गुरुरुपचितचित्तः शिक्षितानां समूहे
द्रुतधृतलिपिविद्यं वीक्ष्य वैलक्ष्यमूहे ॥७४

—(शिवभारत अ. ९)

"मग तो गुणवान् मुलगा सात वर्षांचा झालेला पाहून तो मुळाक्षरें शिकण्यास योग्य झाला आहे असें राजास वाटलें. प्रधानांच्या समवयस्क पुत्रांसह बुद्धिमान् आणि स्पष्टोच्चार करणाऱ्या त्या पुत्राला गुरूच्या मांडीवर बसविलें. गुरुजी पहिलें अक्षर लिहिण्यास जों सांगतात, तोंच हा दुसरें अक्षरसुद्धां लिहून दाखवीत असे. सकल विद्यांचें द्वारच अशीं जीं मुळाक्षरें तीं सर्व गुरुजींनीं त्याला उत्तम रीतीनें शिकविलीं. तेव्हां स्वभावतःच बुद्धिमान्, सुस्वभावी आणि अवर्णनीय प्रभावाच्या त्या राजबिंड्याला सर्व विद्यार्थ्यांमध्यें इतक्या लवकर मुळाक्षरें शिकलेला पाहून गुरूला मोठा अभिमान वाटला आणि हा कांहीं विलक्षण मुलगा आहे अशी त्यानें खूणगांठ बांधली."

पुण्याला गेल्यावर जिजामाता व दादोजी कोंडदेव यांच्या नेतृत्वा-खालीं कर्नाटकांत प्रारंभ झालेलें हें शिक्षण महाराजांनीं पूर्ण केलें. त्याचा निर्देश शिवभारतांत पुढीलप्रमाणें आहे.

"श्रयन्तः प्रश्रयोपेतं गुरवस्तं गुणैस्सह ।
अनन्यनिष्ठमनसः समगच्छन् कृतार्थताम् ॥३३
श्रुतिस्मृतिपुराणेषु भारते दण्डनीतिषु ।
समस्तेष्वपि शास्त्रेषु काव्ये रामायणे तथा ॥३४
व्यायामे वास्तुविद्यायां होरासु गणितेष्वपि ।
धनुर्वेदचिकित्सायां मते सामुद्रिके पुनः ॥३५
तासु तासु च भाषासु छन्दस्सु च सुभाषिते ।
चर्यास्विभरथाश्वानां तथा तल्लक्षणेष्वपि ॥३६
आरोहणे प्रतरणे चंक्रमे च विलंघने ।
कृपाणचापचक्रेषु प्रासपट्टिशशक्तिषु ॥३७
युद्धे नियुद्धे दुर्गाणां दुर्गमीकरणेषु च ।
दुर्लक्ष्यलक्ष्यवेधेषु दुर्गमाभिगमेष्वपि ॥३८
इंगितेषु च मायासु विषनिर्हरणादिषु ।
ततद्रत्नपरीक्षायामवधाने लिपिष्वपि ॥३९
प्रवीणः स स्वयं तांस्तान् गुरून् गुरुयशोभरैः ।
अयोजयत् भृशं तत्तत् प्रत्यभिज्ञानवान् विभुः ॥४०

–(शिवभारत अ. १०)

"त्या विनयशील व गुणवान् शिवाजीच्या पदरीं असलेले गुरु कृतार्थ झाले. (म्हणजे त्यांनीं शिकविलेल्या सर्व विद्या व कला यांमध्यें तो निपुण झाला.) श्रुति, स्मृति, पुराणें, भारत, राजनीति, सर्व शास्त्रें, रामायण, काव्य, व्यायाम, वास्तुविद्या, फलज्योतिष, मांग धनुर्वेद, तसेंच सामुद्रिक, निरनिराळ्या भाषा, पद्य, सुभाषित, हत्ती, घोडे व रथ यांवर बसणें, तसेंच त्यांचीं लक्षणें, चढणें व उतरणें, दौड मारणें, उडी मारणें, तरवार, धनुष्य व चक्र, भाला, पट्टा व शक्ति, युद्ध व बाहुयुद्ध, दुर्ग अभेद्य (दुर्गम) करणें, दुर्लक्ष्य निशाण वेधणें, दुर्गम ठिकाणांतून निसटून जाणें, इंगित जाणणें,

जादुगिरी, विष उतरणें, नाना प्रकारची रत्नपरीक्षा, अवधानें ह्या सर्व विद्या, शास्त्रें व कला यांमध्यें स्वतः प्रवीण होऊन सर्व गुरूंस नोठें यश दिलें."

शिवभारताप्रमाणेंच शिवदिग्विजय नांवाच्या ग्रंथांतहि छत्रपति शिवरायांच्या पुण्याच्या परिसरांतील जीवनांत त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचें पुढीलप्रमाणें वर्णन आढळतें. "शिवाजी महाराजांनीं पुण्यास गेल्यापासून विद्याभ्यास, शास्त्र, कलाकौशल्य, तर्कसंग्रहादि अधीत झाले. निमित्यमात्र गुरुमुख करून घ्यावे. त्या विद्यादि कलाकौशल्य कोणकोणत्या येविशी स्फुटीकरण करावें म्हणोन ववते यांचें बोलणें पडल्यावरून व पुढें बालावबोध व्हावा, त्यांचा संदेह न राहावा म्हणोन तपशीलवार लिहितों.

**चतुर्दशविद्या**

ब्रह्मज्ञानरसायनं च कविता वेदस्तथा ज्योतिषम् ।
व्याकरणं धनुर्धरस्तथा (?) जलतर संगीतकं वैद्यकम् ।।
अश्वारोहणकोकशास्त्रनिपुणं नाटयस्तथा चातुरी (?) ।
विद्या नाम चतुर्दश प्रतिदिनं (?) शेषाः कला उच्यते ।।

"ब्रह्मज्ञान, रसायन, कविता, वेद, ज्योतिष, व्याकरण, धनुर्विद्या, जलावरोहण, गीत (वाद्ययुक्त), वैद्यक, अश्वावर बसणें, कामशास्त्र, नृत्य, हावभाव करणें.

## आनुमानिक पुरावे

या प्रत्यक्ष समकालीन उल्लेखांबरोबरच शिवछत्रपतींच्या जीवनांतील व जीवनाशीं संबद्ध अशा घटनांचा विचार केला तर त्यांना अशिक्षित म्हणणें म्हणजे कसें सूर्यावर थुंकणें आहे हें ध्यानांत येतें. उदाहरणार्थ, पुढील कांहीं घटनांकडे पहा —

(१) शिवछत्रपतींचे वडील राजे शहाजी व ज्येष्ठ बंधु संभाजी हे संस्कृत व आणखीहि कांहीं प्राकृत भाषांचे चांगले ज्ञाते होते. त्यांचा पुत्र संभाजी तर बुधभूषणासारखे राजनीतिपर ग्रंथ लिहिण्याइतका संस्कृत भाषेचा पंडित होता. अशा सर्व परिसरांत या

सर्वांहून अत्यधिक प्रतिभासंपन्न असलेले शिवछत्रपति हेच केवळ अशिक्षित होते असें म्हणणें साहसाचेंच नाहीं काय?

(२) शिवछत्रपतींना संस्कृत भाषेचें ज्ञान व विलक्षण आवडहि होती. याचा मोठा पुरावा म्हणजे त्यांची राजमुद्रा होय. शिवाजी महाराजांना छत्रपति ही संज्ञा त्यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षापासून लावावयास सुरवात झाली होती व तेव्हांपासूनच त्यांची पुढील सुप्रसिद्ध राजमुद्राहि वापरावयास प्रारंभ झाला होता. ही राजमुद्रा पुढीलप्रमाणें आहे --

प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

ही राजमुद्रा व पत्रांच्या शेवटीं 'मर्यादेयं विराजते' हे येणारे शब्द, शिवछत्रपतींची संस्कृतविषयक आवड फार लहानपणापासून असली पाहिजे हें सिद्ध करावयास पुरेसे आहेत.

(३) शिवछत्रपतींनीं स्वतः नवे बांधलेले व जिंकलेले जे दुर्ग त्यांचीं नांवें संस्कृत भाषेमध्यें ठेवलेलीं आहेत. त्यांतील कित्येकांचीं तर मूळचीं नांवें बदलून त्या जागीं संस्कृत नांवें प्रचारांत आणलेलीं आहेत. विशालगड, राजगड, सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, सिंहगड, सुवर्णदुर्ग, भीमगड, पांडवगड, प्रचंडगड इत्यादि उदाहरणें हें सिद्ध करावयास पुरेशीं आहेत. ही कल्पना केवळ त्यांचीच असून ती त्यांचें संस्कृत भाषेवरील प्रेम व्यक्त करावयास पुरेशी आहे.

(४) स्वराज्यांत स्वभाषेचा उद्धार आवश्यक आहे हें ओळखणारा पहिला द्रष्टा म्हणून छत्रपति शिवरायांचा निर्देश करावा लागेल. सिंहासनाधीश्वर होतांच त्यांनींच प्रथम राजकीय व्यवहारांतील यावनी भाषेचें प्रस्थ मोडून स्वभाषेंत घुसलेले परकीय यावनी शब्द राज्यव्यवहारांतून सीमापार केले व त्या जागीं स्वकीय संस्कृत शब्दांची प्रतिष्ठापना केली. यासाठीं त्यांनीं अष्टप्रधान मंडळांतील आपले एक अमात्य रघुनाथ पंडित अथवा रघुनाथपंत हणमते यांची नियुक्ति करून त्यांच्याकरवी राजव्यवहारकोश

निर्माण करविला. राजव्यवहारकोशाचे राजवर्ग, कार्यस्थानवर्ग, भोग्यवर्ग, शस्त्रवर्ग, चतुरंगवर्ग, सामंतवर्ग, दुर्गवर्ग, लेखनवर्ग, जनपदवर्ग, पण्यवर्ग असे दहा विभाग असून राजवर्गांत राजा, त्याचें प्रधानमंडळ व परिवार यांचा विचार केला आहे. कार्यस्थान वर्गांत कोश, त्यावरील अधिकारी व नाणीं यांचे प्रतिशब्द आहेत. भोग्यवर्गांत उपभोगाच्या वस्तु, शस्त्रवर्गांत शस्त्रास्त्रांचीं नांवें, चतुरंगवर्गांत हत्ती-घोडे यांची सामग्री व सेवेकरी यांचें विवरण, सामंतवर्गांत सैन्य व त्यांवरील अधिकारी, दुर्गवर्गांत दुर्गांचे प्रकार व त्यावरील अधिकारी यांचें विवरण, लेखनवर्गांत लेखक, त्यांचें साहित्य व राज्यव्यवहारांतील कागदपत्रांचीं पारिभाषिक नांवें, जनपदवर्गांत देशाचे राजकीय विभाग, पण्यवर्गांत अठरापगड जाती व त्यांचे व्यवसाय यांचे प्रतिशब्द आहेत. हा कोश आकारानें लहान असला तरी आवश्यक ते मूळ शब्द व त्यांचे प्रतिशब्द देणारा असून स्वभाषेच्या शुद्धीकरणाच्या व प्रतिष्ठापनेच्या इतिहासांतील या स्वरूपाचा पहिला पदन्यास करणाऱ्या पुरुषाचें द्रष्टेपण त्यावरून व्यक्त होतें. शिवछत्रपतींच्या या एका कृत्यानेंहि त्यांच्यावरील अशिक्षितपणाचा आरोप किती वेडगळपणाचा आहे हें सिद्ध होतें रघुनाथ पंडित आपल्याला ही प्रेरणा कशी झाली हें सांगतांना म्हणतो —

कृते म्लेच्छोच्छेदे भुवि निरवशेषं रविकुला-
वतंसेनात्यर्थं यवनवचनैर्लुप्तसरणीम् ।
नृपव्याहारार्थं स तु विबुधभाषां वितनितुं
नियुक्तोऽभूद्विद्वान्नृपवरशिवच्छत्रपतिना ।।

सोऽयं शिवच्छत्रपतेरनुज्ञां मूर्धाभिषिक्तस्य निधाय मूर्ध्नि ।
अमात्यवर्गो रघुनाथनामा करोति राजव्यवहारकोशम् ।।

(५) विद्या व शिक्षण यांवर शिवछत्रपतींनीं मुक्त हस्तानें द्रव्य खर्चिलें आहे. स्वतः विद्येच्या क्षेत्रांत चांगली गति असल्यावांचून ही प्रवृत्ति उत्पन्न होत नाहीं. त्यांचे परमानंद भूषणांसारखे राज-कवि हे आजकालच्या कसोटीवरच महाकवि ठरलेले आहेत. त्यांचीं

काव्यें समजण्याची पूर्ण पात्रता असल्यावांचून शिवछत्रपतींनीं त्यांना आश्रय दिलेला नाहीं हें उघड आहे. भूषणाचें काव्य समजण्याइतकें हिंदी व परमानंदाचें काव्य समजण्याइतकें संस्कृत त्यांना निश्चित येत होतें. करणग्रंथ, शिवार्कोदय यांसारखे ज्योतिष व पूर्वमीमांसाशास्त्र यांचें शुद्धीकरण करणारे ग्रथ त्यांच्या प्रेरणेनें व साहाय्यानें लिहिण्यांत आलेले आहेत. करणकौस्तुभ हा ग्रथ कृष्ण-ज्योतिषांनीं लिहिलेला आहे. त्याच्या प्रारंभीं तो म्हणतो —

प्रकुरु तत्करणं ग्रहसिद्धये सुगमदृग्गणितैक्यविधायि यत् ।
इति नृपेन्द्रशिवाभिधनोदित: प्रकुरुते कृतिकृष्णविधिज्ञराट् ।।

"ग्रहसिद्धीसाठी व विद्वान् लोकांचें गणितासंबंधांत मतैक्य व्हावें म्हणून तूं करणग्रंथ कर असें नृपश्रेष्ठ शिवछत्रपतींनीं सांगितल्यावरून मी कृष्णज्योतिषी हा ग्रंथ लिहीत आहे." शिवछत्रपतींचे विख्यात पुरोहित गागाभट्ट यांनीं पूर्वमीमांसेवर जो शिवार्कोदय नांवाचा ग्रंथ लिहिला त्याच्या प्रारंभीं ते लिहितात —

श्रीमद्भोसलवंशभूषणमणिक्षोणीशशाहात्मज -
च्छत्राधीशशिवक्षितीशयशस: स्तंभो निखातोऽपर: ।
गागाभट्टमनीषिणाधिधरणिग्रंथ: शिवार्कोदयो
येनाबद्धयशोध्वजेन सकलैवाश्वेति लोकत्रयी ।।

"प्रस्तुत ग्रंथ म्हणजे भोसले वंशाचें भूषण असलेल्या शिवछत्रपतींच्या कार्याचा दुसरा यशस्तंभच होय. गागाभट्ट यांनीं निर्माण केलेल्या या स्तंभावरील यशोध्वजानें त्रैलोक्य व्यापलें आहे."

अशिक्षित मनुष्य पंडितांना शास्त्रशुद्धीची प्रेरणा देतो काय?

(६) शिवछत्रपतींचे गुरु श्रीसमर्थ रामदास शिवछत्रपतींच्या सभेंत विद्वानांचा भरणा होता असें स्पष्ट उल्लेखितात. ते म्हणतात, "उदंड पंडित पुराणिक। कवीश्वर याज्ञिक वैदिक। धूर्त तार्किक सभानायक। तुमचे ठायी।।" विद्वत्तेची जाणती आवड असल्याविना कोणताहि राजपुरुष असल्या लोकांचें कडें आपल्याभोंवतीं असूं देणार नाहीं.

(७) शिवछत्रपति संस्कृतज्ञ तर होतेच, पण कानडी भाषेंत त्यांची गति असून त्यांना हिंदी उत्कृष्ट येत असलें पाहिजे. फारशी-सारख्या यावनी भाषेचा त्यांना उत्कृष्ट परिचय असला पाहिजे. त्याशिवाय ते आग्र्याला औरंगजेबाच्या बंदिवासांतून निसटल्यावर सभोंवतीं औरंगजेबाचे गुप्तचर त्यांना पकडण्यासाठीं डोळ्यांत तेल घालून शोधीत असतां वैराग्याच्या वेषांत सारा उत्तरभारत वेड्या-वाकड्या मार्गांनीं पालथा घालून महाराष्ट्रांत सुखरूप येऊन पोहोचते ना! धेडगुजरी हिंदी बोलणारा व मराठी भाषेशिवाय अन्य भाषा न जाणणारा वैरागी उत्तर भारतांत केव्हांच ओळखला गेला असता.

## पाश्चात्य पुरावे

यावर सरकारप्रभृतींचें असें म्हणणें आहे कीं, शिवछत्रपति आपल्या चिटणिसांना पत्रें वाचावयास व लिहावयास कां सांगत? शिवछत्रपति राजे होते हें आपण विसरतों. राजव्यवहाराची ती पद्धति असे. आजसुद्धां प्रत्येक महत्त्वाच्या राजकीय अधिकाऱ्याला व नेत्याला विशिष्ट टंकलेखकाची आवश्यकता वाटते व तोहि लघुलिपिकोविद असावा लागतो. म्हणून त्या त्या लोकनेत्यांना लिहितां वाचतां येत नाहीं असें अनुमान काढणें वेडेपणाचेंच ठरणार नाहीं काय? तरीपण 'तुष्यतु दुर्जनः' या न्यायानें शिवछत्रपतीच्या प्रत्यक्ष लेखनासंबंधीं आम्ही येथें समकालीन पाश्चात्यांचे पुरावेच उद्धृत करतो.

शिवछत्रपतींनीं शाहिस्तेखानाला पराभूत केल्यानंतर राजापुर येथील इंग्रजांच्या वखारीचा अधिकारी फिलिफ गायफर्ड (Philip Gyffard) यानें तें वृत्त दि. १२ एप्रिल १६६३ ला सुरत येथील इंग्रजांच्या वखारीच्या अधिकाऱ्यांना कळविलें. त्यांत तो लिहितो कीं, राजापुरचा शिवाजीचा अधिकारी रावजी पंडित याला शिवाजीनें स्वहस्तानें पत्र लिहून हें वृत्त कळविलें आहे. त्याचें वाक्य असें आहे. "Yesterday arrived a letter from the Rajah *written by himself* to Rougy"

इंग्लिश व्यापारी आपल्या संदेशवाहकांना स्वतःचीं पत्रें शिवाजीकडे घेऊन जातांना पुढीलप्रमाणें सूचना करतात.

"'The envoy should be careful to deliver the letter into Shivaji's own hands,' for we fear these brahmans make letters to speak what they please." (संदेशवाहकानें पत्र प्रत्यक्ष शिवाजीच्याच हातांत देण्याची काळजी घ्यावी. कारण त्याच्या पदरचे हे ब्राह्मण आपल्या इच्छेप्रमाणें पत्रांचे अर्थ त्याला सांगतात.") शिवरायांना जर लिहितां वाचतां येत नसतें तर पत्र त्यांच्या हातांत देऊन तरी काय उपयोग होता? तहावर शिवछत्रपतींनीं सह्या केल्याचे तर कितीतरी समकालीन उल्लेख आढळतात. १५ डिसेंबर १६७३ मध्यें पाठविलेल्या एका पत्रांत छत्रपतींनीं तोंडी सगळ्या गोष्टी कबूल केल्या असल्या तरी ते संधिपत्रावर प्रत्यक्ष स्वाक्षरी करावयास सिद्ध नाहींत म्हणून कागाळी केलेली आढळते. इंग्रजांप्रमाणेंच डच व पोर्तुगीज व्यापाऱ्यांचींहि याच स्वरूपाचीं पत्रें उपलब्ध आहेत. पुढेंमागें अशीं महाराजांनीं लिहिलेलीं पत्रें त्यांच्या दप्तरांतून उपलब्ध होण्याचा संभवही आहे.

शिवछत्रपतींच्या अंतःकरणावर संस्कार घडविणारे त्यांचे तीन गुरु अथवा जीवनाचे शिल्पकार आहेत. महाराजांच्या जीवनमंदिराचें जें भव्य स्वरूप दृष्टोत्पत्तीला येतें त्याची घडण मुख्यतः या तीन शिल्पकारांकडून झालेली आहे. त्यांच्यावरील संस्कार, त्यांच्या प्रवृत्ति व त्यांचें शिक्षण यांचा विचार करतांना या तिन्ही शिल्पकारांच्या कार्याचें स्वरूप पाहणें उद्बोधक ठरेल. हे तीन शिल्पकार म्हणजे त्यांचे वडील राजे शहाजी, राजमाता जिजाबाई व दादोजी कोंडदेव हे होत. या शिल्पकारांच्या कामगिरीकडे आपण पुढील प्रकरणांत वळूं.

✦ ✦ ✦

प्रकरण तिसरें

# शिवछत्रपतींच्या जीवनमंदिराचे शिल्पकार

पुण्यश्लोक शिवछत्रपतींच्या जीवनाचे शिल्पकार म्हणून त्यांची माता जिजाबाई व त्यांनीं पुण्यांत पदन्यास केल्यापासून त्यांचे मार्गदर्शक असलेले दादोजी कोंडदेव ह्यांचें महत्व अनन्यसामान्य आहे. शिवरायांना कांहीं गोष्टींची स्फूर्ति त्यांचे वडील शहाजीराजे यांच्याकडून मिळाली होती व त्यांच्या स्वराज्यसाधनेला धर्मराज्याचें व्यापक अधिष्ठान प्राप्त करून देऊन त्यांच्या जीवनमंदिरावर आध्यात्मिक जीवनदृष्टीचा सुवर्णकळस त्यांचे सद्गुरु श्री समर्थ रामदास यांनीं चढविलेला आहे ही गोष्ट खरी असली, तरी जीवनमंदिराचे शिल्पकार म्हणून जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांचाच निर्देश प्रथम केला पाहिजे. पित्याजवळून शिवछत्रपतींना कर्तृत्व, मुत्सद्देगिरी व सेनापतित्व या देणग्या प्राप्त झाल्या असें म्हणतां येईल. पण वयाच्या बाराव्या वर्षापासून त्यांच्या जीवनाची घडण त्यांच्या मातेनें घडविलेली आहे. जिजाबाईच्या अंगीं स्वभावतःच अनेक अलौकिक गुण होते आणि विशिष्ट संकटमय परिस्थितीशीं झगडण्यांत त्यांचें जीवन गेल्यामुळें तें अधिकच धारदार बनलें होतें.

## जिजामाता

जिजाबाई ही यादव राजघराण्यांतील कन्या असून तिचे वडील सिंदखेडचे लखूजी जाधवराव हे निझामशाहींतील भीमपराक्रमी तोलदार सरदार होते. निझामशाही सोडून ते मोंगलांना येऊन मिळतांच बादशहा जहांगीरनें चोवीस सहस्र स्वारांची मनसबदारी त्यांना तत्काळ दिली, यावरूनच योद्धा या नात्यानें त्यांचें असलेलें महत्त्व स्पष्ट होतें. अशा या तोलदार पण सदा संघर्षमय जीवन असलेल्या श्रेष्ठ सरदाराची ही कन्या भाग्यानें शहाजी राजांच्या

जीवनांत प्रविष्ट झाली. तिच्या पतीचें जीवन तिच्या पित्याच्या जीवनापेक्षांहि अधिक संघर्षमय, रोमांचकारी व अस्थिर होतें. कधीं निझामशाही तर कधीं आदिलशाही, कधीं मोंगलांना मिळण्याची हूल तर कधीं दुर्दम्य स्वातंत्र्याकांक्षेनें प्रेरित होऊन तिन्ही बादशाह्यांशीं झुंज याप्रमाणें सदा मरणाच्या सीमारेषेवरचें जीवन शहाजीराजे जगत होते. त्यांच्या जीवनांतील या साऱ्या प्रसंगांची झळ जिजाबाईंना लागलेली होती. कांहीं संग्रामांच्या व पळापळींच्या प्रसंगांचा त्यांना अनुभव आला असलाच पाहिजे. या साऱ्या प्रसंगांतून त्या गेल्या असल्यामुळें त्यांचें अंतःकरण धैर्यशाली व कणखर जसें बनलें होतें, त्याचप्रमाणें शहाजीराजांच्या सहवासांत अनेक प्रकारचीं गुंतागुंतीचीं राजकारणें व तीं सोडविण्याचें राजांचें कसब त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें व अनुभविलें असल्यामुळें सिंहासनांची अदलाबदल, सैन्याची निर्मिति व उभारणी, राजपुरुषांशीं करावयाच्या संधींची पद्धति इत्यादि गोष्टींचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर उमटले होते. इ. स. १६४२ मध्यें एका विशिष्ट आकांक्षेनें प्रेरित होऊन राजे शहाजी यांनीं शिवरायांची पुण्याला पाठवणी करतांना जिजाबाईंना त्यांच्याबरोबर जें पाठविलें तें त्यांची ही योग्यता ओळखूनच पाठविलें होतें. या अलौकिक मातेनें शिवरायांच्या लहानपणीं स्वतः अनेक तंटयांचे निर्णय केलेले आहेत. जिजाबाईनें लहानग्या शिवरायांच्या अंतःकरणावर धर्मनिष्ठा, स्वातंत्र्यलालसा, चारित्र्यनिष्ठा व स्वाभिमान यांचे जे संस्कार घडविले त्यामुळेंच सोसाटयाच्या वाऱ्यांतील हिमाचलाच्या स्थिरतेप्रमाणें सर्व अनुकूल व प्रतिकूल परिस्थितींत त्यांची जीवननिष्ठा अकंपित राहिलेली आहे. दृढ धर्मनिष्ठा, दैवी गूढता, साधुसंतांविषयींची असीम श्रद्धा, सीमातीत साक्षेपणा व विशुद्ध शीलचारित्र्य या देणग्या महाराजांना या अलौकिक मातेकडून मिळालेल्या आहेत. सैन्यांत मादक पदार्थांना बंदी करणें व कोणत्याहि स्त्रीचा अपमान होऊं न देण्याविषयीं कडक धोरण आखणें हे छत्रपतींचे गुणविशेष तत्कालीन इतर कोणत्याहि सेनानीत आढळत नाहींत. शिवरायांच्या ठिकाणीं या गुणविशेषांचा वारसा

त्यांच्या या अलौकिक मातेकडून आलेला आहे. अफझलखानाच्या वधाच्या प्रसंगांत या मातेचें अलौकिक धैर्य दिसून आलें आहे. खानाचा शिरच्छेद केल्यावर महाराजांनीं शत्रूचें तें मस्तक तातडीनें प्रथम या वीरमातेकडे पहावयास पाठवून दिलें. त्या वेळीं जिजाबाई प्रतापगडावर नसून राजगडावर होत्या. सिद्धि जोहराच्या वेढयांत महाराज पन्हाळ्यावर पांच महिने अडकले असतां त्यांना सोडवावयास कोणीहि समर्थ नाहीं असें पाहून या वीरमातेनें स्वतः सैन्य घेऊन बाहेरून सिद्धि जोहरवर आक्रमण करून वेढा फोडण्याची सिद्धता दर्शविली होती. छत्रपति शिवाजी महाराज आग्र्याला औरंगजेबाच्या भेटीला गेले असतां कदाचित् तेथें वेगळाच प्रसंग ओढवेल अशा कल्पनेनें त्यांनीं जी निरवानिरव केली त्या वेळीं सर्व मुत्सद्दी-मंडळानें जिजामातेच्या आज्ञेंत राहून स्वराज्याचें सरक्षण करावें असेंच सुचविलें होतें व महाराजांच्या अनुपस्थितीच्या त्या बिकट प्रसंगांत सैनिकी अनुशासन व राज्यकारभार सुसूत्र चालवावयास लागणारी दृढता व दक्षता या राजमातेनें असामान्य रीतीनें प्रकट केली आहे. आग्र्याहून शिवाजी महाराज सुटल्यानंतर ते हतबुद्ध होऊन अकर्मण्य अवस्थेंत कांहीं काळ घालवीत असतां सिंहगड घेण्याचा आग्रह व्यक्त करून तिनेंच शिवछत्रपति आणि त्यांचे तानाजी मालुसऱ्यांच्या सारखे सेनानायक यांना स्फूर्ति देऊन कार्य-प्रवण केलें. या अलौकिक स्त्रीच्या अंकावर बसून पदरच्या पुराणिकां-कडून अथवा कथाकारांकडून रामायण व महाभारताच्या कथा ऐकत असतां सीतेचें अपहरण व द्रौपदीची विटंबना ऐकतां ऐकतां उद्वेगानें लहानगे शिवराय सहजच विचारीत असतील कीं, आई! पुरातन काळापासून आमच्या भाग्यांत हेच प्रकार लिहिले आहेत काय? त्या वेळीं तर एखादीच सीता वा द्रौपदी असेल, हल्लीं अशा सीता द्रौपदी संख्येनें मोजतांहि येणार नाहींत इतक्या अगणित आहेत. ह्याला कांहीं उपायच नाहीं काय?' त्या बालकापेक्षां या गोष्टीची अधिकच कल्पना असलेली ती माता त्यांना म्हणत असेल, 'बाळ, ऐक तर पुढें काय झालें तें, इतकी घाई कशाला?'

पुढें त्या कथाकारानें सीतेच्या अश्रुबिंदूसाठीं लंकेच्या राक्षस-राष्ट्राचे तिळातिळाएवढे तुकडे उडवून रावणाचा निर्वंश करणाऱ्या कोदंडधारी वीर रामचंद्राचें चित्र रंगविलें असेल. द्रौपदीच्या करुण आक्रंदनाचा सूड म्हणून दुःशासनाचा हात तोडून व कंठनाल चिरून रणभूमीवर सहस्रावधि सैनिकांसमक्ष त्याचें उष्ण रक्त प्राशन करणारा उग्र भीमसेन त्यानें रंगविला असेल. हीं दोन्ही चित्रें ऐकतांच त्या अलौकिक बालकाचे नेत्र स्वाभिमानाच्या अलौकिक दीप्तीनें अधिकच चमकून उठले असतील! आपल्या आईच्या अंगाला अधिकच चिकटून तो विचारीत असेल कीं, 'आई! आतां तर इतक्या द्रौपदी आणि सीता दिसतात, पण राम आणि भीम कुणालाच होतां येणार नाहीं काय?' उग्र निश्चयानें आपल्या त्या मुलाच्या मनांत कर्तृत्वाच्या प्रेरणेचीं बीज प्रसरवीत ती माता त्याला म्हणत असेल कीं, 'बाळ, इतरांच्या तोंडाकडे पाहण्यांत काय अर्थ? तुलाच स्वतःला राम किंवा भीम होतां येणार नाहीं काय?' शिवरायांच्या मनावर मातेकडून होणाऱ्या लहानपणच्या संस्कारांचें स्वरूप हें असें असलें पाहिजे. एरवीं वयाच्या आठव्या व बाराव्या वर्षीं पारतंत्र्याची चीड व यवनांचा तिरस्कार या गोष्टी त्यांच्या उद्गारांतून कशा व्यक्त व्हाव्या!

या अलौकिक स्त्रीसंबंधानें डॉ. बाळकृष्ण यांनीं पुढीलप्रमाणें यथार्थ उद्गार काढले आहेत —

In one word, she had the head of a man over the shoulders of a woman. She remained a guide, philosopher and friend to Shivaji throughout her life. She anxiously watched the rising sun of the glory of her son and was fortunate to witness its climax in the form of his coronation as an independent King and an ornament of the Kshatriya race.

" जिजाबाईंचें एका शब्दांत वर्णन करावयाचें म्हणजे त्यांचें शरीर स्त्रीचें, पण बुद्धि पुरुषाची होती. संपूर्ण आयुष्यभर ही माता शिवछत्रपतींची मार्गदर्शक, त्यांच्या तात्त्विक दृष्टिकोणाची गंगोत्री

व त्यांच्या प्रेमाचें सर्वांत मोठें अधिष्ठान होती. अतिशय उत्कंठेनें तिनें आपल्या पुत्राच्या भाग्यसूर्याचा वाढता उदय पाहिला व ती अतिशय भाग्यशाली असल्यामुळें क्षत्रियकुलावतंस व स्वतंत्र राजा म्हणून या भाग्यसूर्याच्या देदीप्यमान मध्यान्हीचें राज्याभिषेकोच्या रूपानें व्यक्त झालेलें वैभवहि तिनें पाहिलें.

१०३९५

## दादोजी कोंडदेव

छत्रपतींच्या जीवनांत जिजाबाईइतकेंच महत्त्व दादोजी कोंडदेवांचें आहे याचा आम्ही प्रारंभीं उल्लेख केलाच आहे. दादोजी कोंडदेव हे शांडिल्य गोत्राचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. पुण्यापासून पूर्वेला मलठण नांवाच्या गांवीं त्यांचें वतन असे. दादोजी कोंडदेव हिंगणी, बरडी व देवळगांव या परगण्यांचे शहाजीच्या वतीनें प्रथम कुळकर्णी आणि कानगो होते. हे तिन्ही परगणे वंशपरंपरागत अधिकारानें शहाजी राजांच्याकडे होते. तेथें पाटीलकी व देशमुखीचे भोसल्यांचे अधिकार असत. सभासदकृत शिवछत्रपतींच्या चरित्रांत त्यांच्याविषयीं पुढीलप्रमाणें उल्लेख आढळतो.

" शहाजी राजे यांसि दौलतमध्यें पुणे परगणा होता. येथे दादाजी कोंडदेव शहाणा चौकसी ठेविला होता. तो बेंगरुळास महाराजांचे भेटीस गेला. त्याबरोबर राजेश्री शिवाजी राजे व जिजाबाई आउ ऐशीं गेलीं, ते समयीं राजियांस वर्षे बारा होतीं, बराबर शामराव निळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत, नारोपंत दीक्षितांचे चुलतभाऊ मुजुमदार दिले व सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस, ऐसे देऊन दादाजीपंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केले. ते पुण्यास आले."

शहाजी राजांनीं दादोजी कोंडदेवांचें कर्तृत्व व योग्यता पाहून इ. स. १६३७ मध्यें आपला प्रतिनिधि म्हणून त्यांची पुण्याच्या जहागिरीवर नेमणूक केली. दादोजींना ज्या विभागांत आपला पाय घट्ट रोवावयाचा होता तेथें पुंडाई विलक्षण माजली असल्यामुळें पदरीं सैन्य बाळगण्याची आवश्यकता होती. त्यामुळें त्यांच्या

साह्यासाठीं शहाजी राजांनीं सहस्त्र स्वारांनिशीं सिद्दी हिलाल नांवाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली होती. दादोजी कोंडदेव हे दोन प्रकारच्या अधिकारांत महाराष्ट्रांत होते. विजापूरकरांच्या वतीनें ते स्वतंत्रपणें कोंडाण्याचे सुभेदार व कांहीं महालांचे अधिकारी म्हणून काम पहात, तर शहाजी राजांचे प्रतिनिधि म्हणून ते त्यांच्या पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहात. राजांच्या जहागिरीचा वसूल करून त्याचा एक भाग विजापूरला पाठविणें व दुसरा बंगलोरला शहाजी राजांकडे भरती करणें हें दादोजींचें मुख्य काम होतें. शिवछत्रपतींना घेऊन दादोजी कोंडदेव पुण्याला आले त्या वेळीं पुणें ओसाड होऊन राहिलें होतें. मुसलमानी सुलतानांच्या घणाघाती आक्रमणांनीं पुण्याची धूळधाण उडाली होती. पूर्वीच्या पुण्याचीं सारीं मंदिरें भुईसपाट झालीं होतीं. तेथील केदारेश्वराच्या पुजाऱ्याचा वंश बळानें बाटवून मुसलमान करण्यांत आला होता. व या वेळीं या वंशांतीलच एक पुरुष पुण्याचा काजी होता. दादोजींनीं पुणें वसविलें. आपल्या लहानग्या धन्याच्या राहण्यासाठीं त्यांनींच पुण्याला लालमहाल बांधला. लवकरच त्यांनीं पुण्याच्या जहागिरींत शिस्त उत्पन्न केली. सभोवारच्या अरण्यांतील वन्य पशु मारून आणि माजलेल्या पुंड पाळेगारांची रग पोलादी हातानें नाहींशी करून त्यांनीं तेथील भूमि थोडया खंडानें कुळांना देऊन लागवडीखालीं आणविली. नव्या पेठा स्थापून व्यापाराला संरक्षण दिले. पुणें, इंदापूर आणि सुपा या विभागांत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. जहागिरीची समृद्धि व पुण्याचें वैभव वाढू लागलें.

दादोजी कोंडदेवांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे मावळ प्रदेश नीट व्यवस्थित आणून तेथें शांतता व एकसूत्री कारभार उत्पन्न करणें ही होय. ही कामगिरी अतिशय अवघड होती मावळ म्हणजे दोन खवतराजींच्या मधलें खोरें. या एकेका मावळांत पन्नास पन्नास, शंभर शंभर खेडीं नांदत होतीं. अशीं एकंदर चोवीस मावळें होतीं पुण्याखालीं बारा व जुन्नर शिवनेरीखालीं बारा. या मावळांत शांतता प्रस्थापित करणें आणि सुव्यवस्था निर्माण करणें ही

गोष्ट अतिशय कठीण होती. प्रत्येक मावळांत तेथील एक एक देशमुख म्हणजे स्वतंत्र राजाच बनून राहिला होता. या देशमुखांनीं यावनी सत्तेच्या आक्रमणकारी प्रतिनिधींचीहि रग अनेकदां जिरविली होती. एका देशमुखाचें वतन दुसऱ्या देशमुखाच्या वतनाशीं लागून असल्या-मुळें मानापमान व स्पर्धेपायीं हत्त्या, जाळपोळ इत्यादिकांचें भीषण तांडव नित्य चाले. त्यांतील कांहीं प्रकार तर अंगावर कांटा येण्यासारखे भीषण असत. त्यांचीं कांहीं उदाहरणें सांगण्या-सारखीं आहेत. उत्रवळीचे खोपडे देशमुख व कारीचे जेधे-देशमुख यांच्यांत भांडण होतें; खोपडे देशमुखांच्या घरीं लग्नकार्य निघालें असतां जेधे देशमुखांनीं लग्नाच्या वऱ्हाडावर छापा घालून सारें वऱ्हाड कापून काढलें. आपसांतील भाऊबंदकी ही मोठी भयानक असे. गरोदर स्त्रिया व मुलें यांचीहि हत्त्या अशा भाऊ-बंदकींतून होत असे. यवन सत्तेशीं निष्ठा, व्यक्तिवाद व स्वार्थ यांचें दास्य आणि सर्व क्षुद्र मनोविकारांचा उद्रेक हीं तत्कालीन सर्व हिंदू समाजाप्रमाणेंच मावळखोऱ्याचीं वैशिष्टयें झालीं होतीं. या देशमुखांपैकीं दोनच देशमुख काय ते वेगळ्या स्वभावाचे होते. एक कान्होजी जेधे व दुसरे शिवछत्रपतींच्या प्रारंभींच्या जीवनांत त्यांचे सहचर झालेले बाजी पासलकर. यांपैकीं कान्होजी जेधे शहाजी राजांच्या जवळ कर्नाटकांत राहात. शहाजी राजांच्याच सूचने-वरून ते शिवछत्रपतींच्या सेवेंत आले. बाजी पासलकरांचें मावळखोऱ्यांत अतिशय वजन असे. दादोजीपंतांनीं या बाजींच्या साह्यानें एकेक मावळखोरें हळूहळू आपल्या अधिकारांत आणलें. आपसांतील भांडणांचा निर्णय बळाच्या भरंवशावर होण्याऐवजीं पंतांकडे येऊन बालशिवछत्रपतींच्या न्यायासनासमोर हे निर्णय होऊं लागले. पण हीं भांडणें इतकीं विकोपास गेलीं होतीं कीं केवळ नैतिक वजनाऐवजीं कांहीं ठिकाणीं सामर्थ्याचा प्रत्यय आणून देणें आवश्यक होतें. पंतांनीं खेडेबाऱ्यांतील रामाजी चोरघेसारख्या कांहीं पुंडांना देहान्त शासन करून तर कांहींना झोडपून काढून वचक बसविला. त्यांच्या या शासनानें घाबरलेल्या लोकांना

मायाळूपणानें त्यांनीं आपलेसेंहि करून घेतलें. त्यांनाहि कांहीं विलक्षण प्राणी आढळलेच. त्यांतील एक भोर परगण्यांतील कृष्णाजी नाईक बांदल देशमुख होता. त्यानें भोर परगण्यांत एकच धमाल उडवून देऊन आपला धाक उत्पन्न केला होता व जहागीर शहाजीराजांची असतांनाहि स्वतःच तेथील प्रजेजवळून तो बळानें कर घेऊं लागला. वारंवार त्याच्याविरुद्ध कागाळ्या येऊं लागल्या-मुळें पंतांनीं त्याला धरणें पाठविलें पण या चालून आलेल्या लोकांवर रात्रीच छापा घालून त्यानें त्यांच्या घोड्यांच्या शेपट्या कापून काढल्या व त्यांना अपमानित अवस्थेंत परत पाठविलें. पंतांनीं त्याला वेगळ्या रीतीनें समजावून कोंडाणा गडावर आणलें, पुष्कळ समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण तो जेव्हां ऐकेना तेव्हां त्यांनीं त्याचे तत्काळ हातपाय तोडून आपल्या उग्र शासनाची चुणूक दाखविली. जें केवळ प्रेमानें साधूं शकलें नाहीं ते पंतांच्या या कठोरपणानें साधलें. याप्रमाणें पंतांनीं हीं सारीं मावळें एका शिस्तींत आणलीं ही त्यांची फार मोठी कामगिरी होय.

या मावळखोऱ्याच्या पुनरुज्जीवनाचें महत्व शिवछत्रपतींच्या जीवनांत अविस्मरणीय आहे. स्वराज्यमंदिराची पायाभरणी अप्रत्यक्षपणें येथूनच झालेली आहे. येसाजी कंक, तानाजी मालुसरे, सूर्याजी काकडे, बाजी जेधे, दादाजी नरसीप्रभू हीं सोन्याच्या तुकड्यासारखीं माणसें शिवछत्रपतींना मावळखोऱ्यानेंच दिलेलीं आहेत. या लंगोटी लावून खांद्यावर घोंगडी घेणाऱ्या व डोक्याला मुंडासें बांधून खालीं मान घालून राहणाऱ्या लोकांनींच पांच बाद-शाहयांविरुद्ध चाललेल्या लढ्यांत शिवछत्रपतींना निष्ठेनें साह्य दिलें, व हटेल रजपूत, कडवे पठाण व मोगल साम्राज्याचे धुरंधर सेनानी यांच्या लढ्यांत अनेकवार पाठी पाहिल्या. या मावळ-खोऱ्यानेंच शिवछत्रपतींना चिवट सैनिक, निष्ठावंत अनुयायी व जिवाला जीव देणारे विश्वासू मित्र पुरविले. दादोजींची दुसरी महत्वाची कामगिरी म्हणजे मावळखोऱ्यांतील भूमि लागवडीस आणून मलिकंबरनें भूमिकराच्या संबंधांत बसविलेल्या अर्थव्यवस्थेचें

अनुक्रम 26563 दि:
क्रमांक ... नों. दि. 24/3/60

त्यांनीं केलेलें पुनरुज्जीवन होय. मलिकंबर हा निझामशाहींतील प्रतिभासंपन्न मुत्सद्दी होता. त्यानें ज्या अनेक व्यवस्था बसविल्या त्या आजहि प्रशंसनीय आहेत. मलिकंबराच्या वेळीं प्रत्येक बिघ्याचा खंड पंचवीस ते तीस रुपये असे. त्यानें घालून दिलेल्या पद्धतीचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें : (१) भूमीच्या कसानुसार तिचें वर्गीकरण; (२) उत्पन्नाचा निश्चित आराखडा; (३) सरकारला द्यावयाच्या खंडाची निश्चित आंखणी, (४) या खंडाची पैशाच्या अथवा धान्याच्या रूपानें आकारणी, (५) हा खंड वसूल करणाऱ्या मध्यस्थांची पद्धति बंद करणें; (६) सरकारचे वंशपरंपरेचे खंड वसूल करणारे पाटील व अन्य अधिकारी वर्ग यांची निर्मिति; (७) त्यांनाच खंडवसुलीसंबंधांत उत्तरदायी धरणें.

मलिकंबरानें घालून दिलेल्या या रयतवारी पद्धतीशी व सरकारच्या निश्चित करयोजनेशीं लोकांचा वर्षानुवर्षे संबंध आल्यामुळें ती लोकांच्या अंगवळणीं पडली होती. दादोजींनीं याच पद्धतीचें पुनरुज्जीवन केल्यामुळें लोकांचा त्यांच्या व्यवस्थेवरील विश्वास वाढला. प्रथम प्रथम मलिकंबरानें नियुक्त केलेला कर मावळखोऱ्यांतून मिळणें अशक्य ठरलें. कित्येक वर्षांच्या अंदाधुंदीमुळें पुष्कळसा प्रदेश लागवडीखालीं येतच नव्हता. दादोजींनीं मावळखोरें पूर्ण नियंत्रणांत आणल्यावर प्रदेश लागवडीस आणून पहिल्या वर्षी प्रत्येक बिघ्यावर नाममात्र म्हणजे केवळ एक रुपाया खंड आकारला. तो दुसऱ्या वर्षी तीन रुपये, तिसऱ्या वर्षी सहा रुपये, चवथ्या वर्षी नऊ रुपये, पांचव्या वर्षी दहा रुपये व सहाव्या वर्षी वीस रुपये करून क्रमाक्रमानें वाढवीत आठव्या वर्षी पूर्वीच्या मलिकंबराच्या स्थितीवर आणला.

## शिवाजीवरील संस्कार

अशा या कर्त्या पुरुषाच्या हाताखालीं वयाच्या बाराव्या वर्षापासून शिवछत्रपतींना प्रत्यक्ष रहावयास मिळालें. शहाजी राजांचे प्रतिनिधि या नात्यानें महाराजांनाच मुख्यासनावर बसवून दादोजीपंत त्यांच्यासमोर कारभार करीत. ' राजकर्तव्याच्या

जाणिवेचे संस्कार दादोजींच्या सहवासांत श्रीशिवछत्रपतींच्या वर लहानपणापासूनच झाले.

छत्रपति शिवाजी महाराजांसारख्या महापुरुषाच्या जीवनाचे शिल्पकार म्हणून मातोःश्री जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांचा येथें गौरवानें उल्लेख केला असला तरी त्याचा अथ अतिशय मर्यादित आहे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. याचा अर्थ छत्रपतींच्या जीवनांत स्वधर्मराज्याची आकांक्षा या शिल्पकारांच्या प्रेरणेनें उत्पन्न झाली अथवा त्यांच्या जीवनाची घडण या शिल्पकारांनीं घडविली असा करणें चुकीचें आहे. विभूतींचें विभूतिमत्व अथवा महापुरुषांची महत्ता ही उसनवारीनें उत्पन्न होत नसून ती स्वयंभू असते. तिला फुलोरा यावयास विशिष्ट व्यक्ति अधिक जवळचें निमित्त कारण झाल्यास त्यांना शिल्पकार म्हणून गौरविण्यांत येतें एवढाच याचा मर्यादित अर्थ आहे. नाहीं तर शिवछत्रपतींना घडविणारे दादोजी कोंडदेव अन्य कुणाला – स्वतःला सुद्धां– तसें कां घडवू शकले नाहींत? शिवछत्रपतींना घडविणाऱ्या जिजामातेला, लहानपणापासून अंगावर असणाऱ्या संभाजीला कां घडवितां आलें नाहीं? शिवछत्रपतींच्या पिंडांतच उत्कट स्वधर्मप्रेम, स्वातंत्र्यलालसा व राष्ट्राच्या पुनरुत्थानाचा ध्येयवाद या गोष्टी होत्या. जिजामातेच्या सहवासानें हा मूळचा स्फुल्लिंग अधिक रसरशीत झाला व दादोजींच्या मार्गदर्शनानें त्याला प्रत्यक्ष व्यावहारिक वळण मिळालें, येवढाच शिल्पकार या शब्दाचा अर्थ घेतला पाहिजे. छत्रपतींच्या या नैसर्गिक स्थायीभावाचें वर्णन सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत, शिवदिग्विजयांत व अन्य तत्सम जुन्या साहित्यांत जें आलेलें आहे त्यांतील कांहीं तुरळक घटनांची संगति लागत नसली तरी त्यावरून त्यांच्या मनाची ठेवण स्पष्ट झाल्याविना राहात नाहीं. सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत असें म्हटलें आहे––

“आपण वडिलांनीं मेळविलें तें खाऊन राहाणें योग्य नाहीं. आपण हिंदु दक्षिण देश सर्व म्लेच्छांनीं ग्रासिला. देव, ब्राह्मण, क्षेत्रें,

गाई यास बहुत पीडा झाली. धर्म अगदीं बुडाला. तेव्हां धर्मरक्षणार्थ प्राणहि वेचून धर्म रक्षावा, आणि आपले पराक्रमानें नवीन दौलत संपादावी. तें अन्न भक्षून फौज व लोक जमा करावे आणि वडिली मेळविलें तेंहि रक्षून नवें साधन करावें हेंच या कुळांत जन्म झालियाचें सार्थक व श्रेयस्कर. देवावर व दैवावर भार घालून पुरुष प्रयत्न अवलंबन करावें. त्यास दैव जसे जसे साह्य होईल तसे तसे अधिक करीत जावें. मग देव परिणामास नेणार समर्थ आहे."

— (सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र २, परिच्छेद ४६)

शिवदिग्विजयांत म्हटलें आहे, "दुसरियाचा विचार कीं, वडील मायबाप, त्यांचे पोटीं जन्म घेऊन, हा लोक पाहिला. त्यांचे शरीरास आपले कृतीमुळें अविचार यवनांनीं करावा हें नीट नाही. आपणांस मुसलमानांची चाकरी करणें नाही. त्यापेक्षां वडील बावास जवल आणोन स्वस्थ राहा म्हणावें. होईल सेवा तें करून दाखवूं. असें बोलावें, आणि पातशहास साफ लेहून पाठवावें कीं, हा मुलुख सोडून देणें. कारण हिंदूचें राज्य तुम्ही हरण केलें. प्राचीन अधिकार या राज्याचा आमचाच आहे. या रीतीनें प्रौढपणें लिहावें. दुसरियाचा विचार, म्हणणें कदाचित् वडील यांचे लिहिलियावरी आले तरी उत्तम. न आले तरी आपण दगा केला तिकडे पादशहांनीं प्राणाशीं गांठ घातली तरी कसें करावे? याचा विचार बोला. त्यास चवथ्यांनीं उत्तर दिल्हें की, हें पृथ्वीच आमची आहे, आम्हांस घेणें, यवनास भिडून. चाकर म्हणोन दौलत कारण काय सांगतां? वडील बाबांनीं त्यांचें अन्न खादलें. ते त्याजवरी शस्त्र धरणार नाहीत आणि आलें असता अन्न खाऊन बदफैली केली असे चौघांत होते. तेणेकरून कुळास बट्टा लागतो. त्यापेक्षां त्याचा कसाही अर्थ झाला तरी होवो परंतु ज्या मसलतीचा अभिमान धरिला ती मसलत सोडू नये. या प्रकारें बहुतांची बहुत कल्पना वाढली."

— (शिवदिग्विजय, पृष्ठ १३४ – ३५)

अगदी बालपणीं शिवराय वडिलांबरोबर विजापुरास असतां

राज्यकर्त्या यवनांना पाहून त्यांच्या हृदयाची जी कालवाकालव होई तिचें सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांतील पुढील वर्णन पहा –

“आपण हिंदु व हे यवन, परम नीच, यापरते नीच दुसरे कोण आहे? अंत्यजादिकांचा संपर्क करितात. त्यांची सेवा करणें, त्यांचें अन्न भक्षिणें, आर्जव करणें, त्यांस नमस्कार करणें, (यांनीं) माझे प्रकृतीस फार त्रास उत्पन्न होतो. (यवन) गोवधादि करितात. ब्राह्मण-वध व धर्माची निंदा हें पाहणें परम अनुचित दिसते. आपण रस्त्यांनी जाता, गोवध होतो. तें पाहतांच त्याचा शिरच्छेद करावा ऐसें वाटतें व श्रम वाढतात. गाईस पीडा पहावी त्याहून आपले जीवित्व व्यर्थ. वडील काय म्हणतील हेंच (सकट) येऊन पडतें. नाहीं तरी पाहातांच समयी गाईस पीडा करणाऱ्याचा वध करवावा हें मनांत येतें. मुसलमानांचा संसर्ग करणें चांगलें नाहीं. तसेंच पादशाही दरबारास जाणें अथवा हरएक अमीर यांचे घरीं जाणें ठीक नाहीं. (परत) येताच (शिवाजी राजे यांनी) स्नान करावें, दुसरीं वस्त्रें घ्यावीं ऐसें करू लागले. आणि त्याअन्वयें सांगून पाठविलें.

– (सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र प्र. २ परि. ४०)

शिवछत्रपतींचा हा स्थायीभाव लक्षांत घेतला तर त्यांच्या विभूतिमत्त्वाच्या स्वयंभूपणाची परिपूर्ण कल्पना येते. या स्थायी-भावानुरूप पुण्याला मातेच्या व दादोजींच्या सहवासांत अनुकूल वातावरण लाभतांच त्यांनीं आपल्या पौगंडावस्थेंतच स्वतःच्या ध्येयाला साकार करण्याच्या दृष्टीनें हालचाल प्रारंभ केली. स्वातंत्र्यप्रियता ही आजोबांपासूनच त्यांच्यांत भिनलेली होती. मालोजी स्वातंत्र्यप्रिय होते व शहाजींनीं स्वतंत्र राज्य स्थापित करण्याचे प्रयत्न कसे केले याचें वर्णन आम्ही या ग्रंथाच्या पहिल्या भागांत केलेलेंच आहे. मुलाचा पिंड पाहून स्वतंत्रपणें त्यानें आपल्या अंतःस्फूर्तीनें हें कार्य उभारावें म्हणून शहाजी राजांनी त्यांना किती सिद्धतेनिशीं पुण्यास पाठविलें याचेंहि सविस्तर वर्णन प्रथम भागांत शहाजीराजांच्या प्रकरणांत विस्तारानें आलें असल्यामुळें त्याची आम्हीं येथें पुनश्च द्विरुक्ति करीत नाहीं. पुण्यास महाराज स्थिरपद

झाल्यानंतर त्यांनीं आपल्या भोंवतीं अनुयायांचें एक वलय निर्माण करून शंभुमहादेवाच्या साक्षीनें स्वधर्माचें स्वराज्यसिंहासन निर्माण करण्याची शपथ घेतली.

## अपूर्व शपथविधि

भारताच्या इतिहासांत परिस्थितीचा लाभ घेऊन राज्यसिंहासनें निर्माण करणारे महापुरुष अनेक झाले. पण धर्मराज्याचें सिंहासन निर्माण करण्याची दुर्घट शपथ देवाच्या साक्षीनें घेऊन जीवनाची उभारणी करणारा शिवराय हाच मध्ययुगीन इतिहासांतील पहिला राष्ट्रपुरुष होय. पुण्याच्या दक्षिणेला पन्नास मैलांवर भोर तालुक्यांत रायरेश्वराचें प्राचीन शिवमंदिर आहे. तेथें शंभुमहादेव स्वयंभू आहे. या शंभुमहादेवाला आपल्या करंगळीच्या रक्ताचें अर्घ्यप्रदान करून शिवछत्रपतींनीं आपल्या अनुयायांसह ही शपथ घेतली असें म्हणतात. प्रत्यक्ष रक्ताचें अर्घ्य समर्पण झालें असो वा नसो, पण महाराजांनीं ही शपथ घेतली होती हें त्यांच्याच एका पत्रावरून निर्विवादपणें सिद्ध होतें. त्यांच्या उसळत्या आकांक्षेचा प्रभाव असा कीं, केवळ बरोबरीचे मित्रच नव्हे तर दादोजी कोंडदेवासारख्या वयोवृद्ध व आदिलशहाच्या चाकरींत असलेल्या पुरुषानेंहि ही शपथ घेतली. शिवछत्रपतींच्या स्वराज्यसाधनेच्या प्रारंभाला दादोजी कोंडदेवाचा विरोध होता असें अनुमान जें जदुनाथ सरकारांनीं आपल्या ग्रंथांत केलें आहे तें यावरून चुकीचें ठरतें. एका बाजूला बखरींना नांवें ठेवीत दुसऱ्या बाजूला त्यांतील काल्पनिक उताऱ्यांना महत्त्व देण्याच्या त्यांच्या विचित्र विवेचनपद्धतीचाहि त्यावरून बोध होतो. जदुनाथ सरकार लिहितात —

"शिवाजीच्या या स्वातंत्र्यसंपादनाच्या विचारामुळें त्याचा व दादोजी कोंडदेवांचा खटका उडाल्याची आख्यायिका प्रसिद्धच आहे. दादोजी मोठा इमानी नोकर असे, जमीनधाऱ्याच्या कामीं तो फार दक्ष असे, व्यवस्थित रीतीनें वागणारा असे, सदाचरणी व पापभीरु असे, तथापि उच्च ध्येय, दूरदृष्टि आणि साहसी महत्त्वाकांक्षा ही

त्याच्यांत मुळींच नव्हती. शिवाजीची स्वातंत्र्यप्रीति व धाडसी स्वभाव दादोजीला मुळींच हितपरिणामी वाटले नाहींत. त्यानें शिवाजीची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. आदिलशाहीमध्यें आपल्या बापाप्रमाणेंच मानमरातबास चढून सरदारी करावी असा त्यानें कळकळीचा उपदेश केला, परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्यानें शहाजीकडेस ही कागाळी नेली. शेवटीं काळजीनें व वृद्धापकाळामुळें दादोजी आसन्नमरण झाला. तेव्हां शिवबास बोलावून त्यानें पुढील उपदेश केला. "आपण आक्रम घालणें (त्याचा) पाया घातला हें युक्त नव्हे. दैवावर भार ठेवून हें कर्म आरंभिलें, परंतु आपलें स्वामित्व तें किती? पादशहाती चार चहूकडे. दिल्लीचा सुभा साहेबजादाच (औरंगजेब) येऊन औरंगाबादेंत (राहिला) आहे. महाराज (शहाजी) वारंवार लिहितात. केलें कर्म सिद्धीस न गेल्यास फार वांकडें पडेल. आम्ही बहुता दिवसांचे पदरचे सेवक, आमचा शेवट जालाच. परंतु वडिली वाढविलीं माणसें व मुलुख, द्रव्य (आम्ही) जतन केलें. (पुढें) साहेब खावंद (आहेत) सर्व पाहून जतन करावें."

इतिहासाच्या दृष्टीनें बखरी व तत्सम साहित्यापेक्षां अस्सल पत्रव्यवहाराचें मोल अधिक आहे हें कांहीं कोणास सांगावयास नको· स्वतः जदुनाथांनासुद्धां हें मान्य आहे. या निकषावर जदुनाथांचें उपर्युक्त विवेचन चुकीचें ठरतें. स्वतः शिवछत्रपतींच्याच एका महत्त्वाच्या पत्रांत दादोजी कोंडदेवांनींही शपथ घेऊन स्वराज्यसाधनेचें साधक बनल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. रोहिड खोऱ्याचा व वेलखंड खोऱ्याचा कुळकर्णी दादाजी नरसी प्रभू हा शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसाधनेच्या उपक्रमांत समाविष्ट झाल्यामुळें त्यांच्या वडिलांना विजापूरच्या वजिराचें धाक दाखविणारें पत्र आलें. त्या पत्रामुळें दादाजी नरसी प्रभूला त्याच्या वडिलांनीं पेंच घातल्यावरून त्याला व त्याच्या वडिलांना शिवछत्रपतींनीं आश्वासनपर पत्र धातलें. त्या पत्रांवरून महाराजांची ध्येयनिश्चिति, त्यांची शपथक्रिया व दादोजी कोंडदेव

यांची भूमिका या सर्वच गोष्टींवर उत्कृष्ट प्रकाश पडतो. तो संपूर्ण पत्रव्यवहार पुढीलप्रमाणें आहे.

## विजापूरच्या वजिराचें पत्र

"इजत आसार दादाजी नरस प्रभु देशपांडे कुळकर्णी ता।। रोहिड खोरे व वेलखंड खोरे यासी वजारतमाब सिवाजीराजे फरजंद शाहाजी राजे याणें शहासी बेमानगी करून तुझे खोरियांत रोहिरेश्वराचे डोंगराचे असऱ्यानें पुंडावे याने मावळे वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्ल्यावरील ठाणें उठवून आपण किल्ल्यांत शिरला. हाली राजगड किला नांव करून बळकावला. व तोही वेलखंड खोऱ्यालगत. त्यास लोकांचा वगैरे जमाव तू सामील असून फिसात करून रसीद राजे मजकूर निल्हेस देतोस व ठाणे सिरवली आमीनासी रुजू रहात नाहींस व जमाव विनरजुमा करीत नाहीस व तनखाही हरदूत पियाचा दिवाणांत देत नाहींस; मगरूरीचे जबाब ठाणगे व नाईकवाडी यासी देतोस हे जाहीरात आले त्यास हे नामाकूल गोष्ट, तुझे जमेदारीचे इजतीस आहे. तरी ठाणे मजकुरी आमिनासी रुजू राहणें आणि तनखा साह करोन देणे. हे न जालियास खुदावंत शहा तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानू चालणार नाहीं. हे मनी समजणें आणि या उपरी दिवाणांत रुजू राहणें."

## शिवछत्रपतींचें पत्र

शिवाजीराजे दि. १७ एप्रिल १६४५

रा. दादाजी नरस प्रभु देशपांडे कुळ० त।। रोहिड खोरे व वेलखंड खोरे यासी

तुम्हास मेहेरबान वजिराचा विजापुराहून हुकुम आला तो ठाणे सिरवलाहून अमीनानी तुम्हाकडे पाठविला. त्याजवरून तुमचे बाप नरसीबाबा हवालदिल जाले वगैरे कितेक बहुतेक लिहिले.

त्यास सहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही. श्री रोहि-रेश्वर तुमचे खोरियांतील आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारा-वर शेंद्रीलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिले व पुढें तो **सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे.** त्यास बाबास हवाल होऊं नये. खामखा सांगावा आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताब हुजूर येणें. **राजश्री श्री दादापंताचे विद्यमाने बाबाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जाले ते कायम व वज्रप्राय आहे,** त्यांत अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाही. **हे राज्य व्हावे हे श्रीचे मनांत फार आहे.** याप्रमाणें बाबाचे मनाची खातरी करून तुम्ही येणें. बहुत काय लिहिणें."

प्रत्यक्ष शिवछत्रपतींच्या पत्रावरून दादोजी कोंडदेव हे स्वराज्य निर्मितीच्या कार्याचे शपथबद्ध पाइक झाले होते हें यावरून सिद्ध होतें. केवळ तेच नव्हेत तर शहाजींनीं शिवछत्रपतींबरोबर पाठ-विलेले सर्वच मुत्सद्दी त्यांच्या या कार्यात समाविष्ट होते. दादोजी कोंडदेवांच्या मृत्यूपूर्वी शिवछत्रपतींनीं छत्रपति ही पदवी धारण करावयास प्रारंभ केला होता. 'शिवाजीची राजनीति' या आपल्या ग्रंथांत स्वराज्यसाधनेच्या प्रारंभींच्या काळांतच एखाद्या योजनाबद्ध आंखणीप्रमाणें शिवछत्रपतीचीं पावलें कशीं पडत गेलीं याचें विवेचन करतांना श्री. भास्कर वामन भट पुढीलप्रमाणें म्हणतात.

"प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता। शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥" या मजकुराची शिवाजीची मुद्रा म. इ. सा. खंड १५, लेखांक ४३७ वर आहे. त्यानंतर इ. स. १६५३ च्या लेखांकावर (ले. ४३८) ही मुद्रा असून शिवाय शिवाजीचा पहिला प्रधान श्यामराज निळकंठ याची मुद्रा आहे. यावरून शिवाजीनें आपली अष्टप्रधान संस्था स्वराज्याच्या स्थापनेस प्रारंभ केला तेव्हांच स्थापन केली होती असें दिसून येतें. या लेखापूर्वींहि शिवाजीच्या १६ व्या वर्षी त्याला छत्रपति या पदवीनें संबोधण्याचा

प्रघात सुरू झाला होता असें दुसऱ्या एका ऐतिहासिक लेखावरून सिद्ध होत आहे. महाराष्ट्र सरस्वती मंदिर या मासिकांत शिवाजीच्या अधिकाऱ्यांनीं इ. स. १६४६ च्या मार्च-एप्रिल महिन्याचे सुमारास तयार केलेला एक लेख छापला आहे. या लेखांत शिवाजीच्या नांवाचा उल्लेख छत्रपति पदवी लावून केलेला आढळतो. या सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार केला असतां निश्चितपणें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, शिवाजीनें त्याचें वास्तव्य पुण्यास होऊं लागून विजापूरच्या बादशहाशीं विरोध करण्याचा व मावळ प्रांतांतील किल्ले घेण्याचा उपक्रम सुरू करण्यापूर्वी स्वतंत्र राज्याची स्थापना करणें, छत्रपति ही पदवी धारण करणें, राज्यव्यवस्थेच्या सोईच्या दृष्टीनें अष्टप्रधानांची नेमणूक करणें, 'प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता' इत्यादि मजकुराची, नूतन स्थापण्यांत येणाऱ्या स्वराज्याच्या व्यवहारासंबंधीं होणाऱ्या लेखांवर मुद्रा करणें इत्यादि बाबी अंमलांत आणण्याचें निश्चित ठरल्याचें दिसतें. वरील पुराव्याचे आधारें आम्ही जीं अनुमानें काढलीं आहेत त्यांच्या सत्यतेस इ. स. १६५७ च्या मार्च महिन्यांतील शिवचरित्र पत्रसारसंग्रह लेखांक ७९२ वरून चांगली वळकटी येत आहे. या लेखांत खालील उल्लेख आढळतो —

"शिवाजी राजे यांचे दरबारांत श्यामराज नीळकंठ पेशवे, सोनाजी विश्वनाथ डबीर, महादाजी सामराज सुरनीस, माणकोजी दहातोंडे सरनौबत, नूरबेग सरनौबत, पाऊलोक व श्यामराज पद्मनाभी हे अधिकारी होते." या उल्लेखावरून शिवाजीची पुण्याकडे रवानगी करण्यापूर्वीच हे अधिकारी नेमले गेले असले पाहिजेत असें विधान करणेंच युक्त होईल. या लेखांत दिलेल्या अधिकाऱ्यांपैकीं शिवाजीची बंगळुराहून पुण्याच्या जहागिरीकडे रवानगी केली त्या वेळीं त्याचे बरोबर "श्यामराज नीळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत नारोपंत दीक्षिताचे चुलत भाऊ मुजुमदार दिले व सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस ऐसे दिले" असा उल्लेख आढळतो.—(शिवाजीची राजनीति, पृष्ठ ६२ व ६३)

## स्वराज्यसाधनेचा श्रीगणेशा

याप्रमाणें मावळ खोऱ्यांत असणाऱ्या मावळ्यांच्या नायकांना हाताशीं धरून शिवाजी महाराजांनीं जी संघटना निर्माण केली तिच्या द्वारें इ. स. १६४६ मध्येंच आदिलशाहींतील तोरणादुर्ग युक्तीनें घेऊन तेथें स्वराज्याचें तोरण बांधलें. हा कानद खोऱ्यांतील गड एक कोस लांब व पाव कोस रुंद विस्ताराचा आहे. गडावर तोरणजाई देवीचें मंदिर असल्यामुळें त्याचें नांव तोरणा असें होतें. हा गड दुर्लक्षित होता. स्वारशिबंदीची तेथें कोणतीच व्यवस्था नसल्यामुळें रक्ताचा एक थेंबहि न सांडतां त्यांनीं तो सहज मिळवून तेथें आपला ध्वज फडकाविला. या गडावर महाराजांना गुप्त धनाचा मोठा साठा मिळाला. दादोजी जर शिवछत्रपतींच्या उपक्रमाच्या खरेच विरोधी असते, तर या गडावर त्यांना स्वराज्याचा ध्वजहि फडकावितां आला नसता व भूमिगत धनहि उपयोगांत आणतां आलें नसतें. त्यानंतर लवकरच त्यांनीं तेथून अवघ्या पांच मैलांवर असलेल्या मुरुंबदेवच्या गडावरील विजापूरच्या अधिकाऱ्यांना हाकलून देऊन तेथें स्वराज्याचा ध्वज उभारला. हा गड सर्व दृष्टींनीं सोयीचा वाटल्यामुळें तोरण्यावर सांपडलेल्या धनाचा उपयोग करून त्यांनीं सुधारून त्याचें नांव राजगड ठेविलें. रायगडापूर्वी हीच शिवछत्रपतींची राजधानी होती. त्यानतर रोहिरेश्वराच्या डोंगरालगत असलेल्या रोहिडा गडावर महाराजांचें निशाण फडकलें तेथील बादशाही ठाणें उठून त्यांनीं तो गड अधीन करून घेतांच या सर्व अधीन झालेल्या प्रदेशाचें उत्पन्न विजापूरकराकडे पाठविण्याचें वद करून शिवाजी महाराजांनी तो स्वतःच घ्यावयास प्रारंभ केला. रोहिर खोरें व वेलखंड खोऱ्याचा कुळकर्णी दादाजी नरसी प्रभू यानें या उपक्रमांत समाविष्ट होऊन उत्पन्न बादशहाकडे पाठविण्याऐवजीं शिवाजी महाराजांकडेच द्यावयास प्रारंभ केल्यावर या प्रकरणाचा विजापूरच्या वातावरणांत झालेला गाजावाजा व शिवछत्रपतींनीं त्या प्रकरणांत स्वीकारलेलें धोरण याचें उत्कृष्ट प्रतिबिंब वर उद्धृत केलेल्या दोन्ही पत्रांतून

पहावयास मिळतें. वस्तुतः स्वराज्यसाधनेचा हा प्रारंभ एका क्षुद्र पुंडाईच्या स्वरूपांतच विजापूरकर पाहात होते. त्यांना या वेळीं हा उपद्रव पार चिरडून टाकून शिवछत्रपतींचा उदय मुळांत नष्ट करणें सोपें होतें. पण त्यांनीं केवळ धाकाचीं पत्रें पाठविण्यांतच समाधान मानलें. प्रत्यक्ष सैन्य कां पाठविलें नाहीं? असें स्वाभाविकपणें कोणालाहि वाटेल. त्याचें खरें कारण असें होतें कीं, विजापूरचें सारें बादशाही सैन्य व महत्त्वाचे सेनापति कर्नाटकच्या स्वारींत गुंतून राहिले होते व त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट ही कीं, शिवछत्रपति हे शहाजी राजांचे चिरंजीव होते. शहाजी राजांना एकदम हात घालणें सोपें नव्हतें. विजापूरकरांनीं या संबंधांत शहाजीराजांकडे विचारणा केल्यावर त्यांनीं व दादोजी कोंडदेवांनीं अशी संपादणी केली कीं, मावळ खोऱ्यांतील देशमुख व अन्य बंडखोर यांना नीट ताळ्यावर आणण्यासाठीं हे गड हातीं असणें आवश्यक आहे. त्याशिवाय सरकारी खंडाची नीट वसुली होणार नाहीं. म्हणून बादशाही कामासाठींच हे गड घेण्यांत आले आहेत. कशी छान संपादणी आहे! हा थोर मार्गदर्शक ७ मार्च १६४७ ला देवाघरीं गेला. त्यानतर वयाच्या १७ व्या वर्षीं कारभाराचीं सारीं सूत्रें शिवछत्रपतींनीं स्वतःच्या हातीं घेतली. स्वधर्म व स्वराज्यासाठीं श्रीमन्महाराजांनी जो आजीवन रणयज्ञ आरंभ केला त्याचें खरें आध्वर्यव यानतरच प्रारंभ झालेलें आहे. तें आध्वर्यव त्यांनीं संपूर्ण यशस्वी करून दाखविलें व शतावधि वर्षांच्या दास्याच्या घनांधकारांतून हिंदूचें धर्मसिंहासन विमुक्त करून त्याचें तळपतें वैभव जगाच्या निदर्शनास आणून दिलें. शिवाजी महाराजांच्या शत्रुराष्ट्रांची नीट कल्पना आल्याविना त्यांच्या कार्याची दुर्घटता व महत्ता ध्यानात येत नाहीं. हीं शत्रुराष्ट्रें कोणतीं व त्यांच्या सामर्थ्याचें स्वरूप तरी काय?

✦ ✦ ✦

प्रकरण चौथें

# शिवाजीचीं शत्रुराष्ट्रें

दादोजी कोंडदेवाच्या निधनानंतर शिवरायांनीं सारीं सूत्रें हातीं घेऊन दादोजी शहाजीराजांकडे पाठवीत असलेलें उत्पन्न स्वतःच ठेवावयास प्रारंभ केला. दादोजीच्या संरक्षणासाठीं शहाजीनें ठेवलेला सेनाधिकारी सिद्दी हिलाल हा आपल्या स्वराज्यसाधनाच्या कार्यांतील एक अडगळ आहे हें ओळखून त्यांनीं त्याला त्यांच्याकडे पाठवून दिलें व सेनेचें आधिपत्य स्वतःकडेच घेतलें. सैन्य वाढवून त्यांत मावळखोऱ्यांतील विश्वासू लोकांचा भरणा केला. इनामदारांना आपल्या नांवें नवीन इनामें करून देऊन आपल्या स्वामित्वाची जाणीव करून दिली. याप्रमाणें दादोजीच्या वेळीं थोड्याशा वाढविलेल्या आपल्या प्रदेशाची एकसूत्री व्यवस्था केल्यावर महाराजांनीं स्वराज्यसाधनासाठीं स्वतंत्रपणें पदन्यास केला. ज्या कोंडाणा गडाची सुभेदारी दादोजी कोंडदेवाकडे होती, तो भेदनीतीनें मिळविणें हा तो पहिला पदन्यास होय. कोंडाण्यावर स्वामित्वाच्या धारणेनें शिवछत्रपतींनीं केलेला पदाघात हा विजापूरच्या यावनी सत्तेच्या नागिणीच्या शेपटीवर त्यांनीं जाणूनबुजून दिलेला पाय होता. या आघातासरशी सभोंवार साऱ्या सर्पकुलांचाच वेढा पडेल याची त्यांना कल्पना होती. हीं सर्पकुलें निर्विष आणि निर्जीव करण्यासाठीं त्यांनीं ज्या नीतीचा आश्रय केला तिला कूटनीति असें राजनीतिशास्त्राच्या परिभाषेंत म्हणतात. तसेंच यशावर दृष्टि ठेवून त्यांनीं ज्या विशिष्ट युद्धतंत्राचा वापर केला त्याला युद्धशास्त्राच्या परिभाषेंत कूटयुद्ध म्हणतात. शिवछत्रपतींनीं अंगीकारलेल्या या विशिष्ट राजनीतितंत्रामुळें व युद्धतंत्रामुळें ते अनेक तथाकथित नीतिप्रवचनकारांच्या हृद्रोगाचा व डोकेदुखीचा विषय झालेले आहेत. त्यांत कांहीं स्वप्नाळू भारतीय आहेत यांत विशेष आश्चर्य नाहीं; पण ज्यांच्या राष्ट्रजीवनाचे सारे सांदी कोपरे केवळ

कृष्णकृत्यांनींच भरलेले आहेत असें कांहीं पाश्चात्य लेखकहि आहेत हें विशेष आश्चर्य होय.

## शिवछत्रपतींवरील आक्षेप

शिवछत्रपतींविषयीं व विजयी मराठी सैन्याविषयीं यांनले कांहीं आक्षेपक जें लिहितात तें पाहण्यासारखें आहे. शिवाजी महाराजांच्या समकालीन इंग्रज, डच व पोर्तुगीज व्यापाऱ्यांना त्यांच्या ध्येयवादाचें आकलनच होण्यासारखें नसल्यामुळें, वधक, दरवडेखोर, चोर, अशीं शेलकीं विशेषणें लावून 'शत्रु-मित्र न ओळखणारा व देवाधर्माची चाड न ठेवणारा अपहारक' म्हणून त्यांनीं महाराजांचें वर्णन केलेलें आहे. मुसलमान लेखकांनीं तर 'पिशाच्च' अथवा 'पिशाच्च्याचा पुत्र' अशा शब्दांत त्यांचा उल्लेख केला आहे. मुसलमानांच्या अन्यायी अधिराज्याचे शत्रु म्हणून उभे असलेल्या शिवाजी महाराजांविषयीं समकालीन मुसलमान लेखकांनीं असें संतापानें लिहिणें अथवा शिवछत्रपतींच्या हालचालींची प्रत्यक्ष झळ पोहोंचत असलेल्या, पण त्यांच्या ध्येयवादाचें सम्यक् आकलन होत नसलेल्या समकालीन इंग्रज, पोर्तुगीज व डच व्यापाऱ्यांनीं त्यांच्याविषयीं अधिक उणें लिहिणें स्वाभाविकच आहे. पण त्यानंतर अनेक वर्षांनी उत्पन्न झालेल्या, इतिहासलेखनाची संवय असलेल्या व शिवाजी महाराजांच्या ध्येयाची व कार्याची सर्व बाजूंनीं मीमांसा करण्याचीं साधनें सभोंवतीं उपलब्ध असलेल्या लेखकांनी या जुन्या अभिनिविष्ट व अज्ञानी लेखकांच्याच पावलांवर पाऊल टाकावें हें मात्र महदाश्चर्य होय. राजस्थानच्या इतिहासाचा अभिमानी लेखक-कर्नल टॉडसुद्धां, राजस्थानाहूनहि अधिक यशोदीप्तीनें तळपणारा इतिहास निर्माण करणाऱ्या शिवाजीमहाराजांविषयीं व त्यांच्या अनुयायांविषयीं पुढीलप्रमाणें अनुदार उद्गार काढतो.

The Marathas were associations of vampires who drained the very life blood wherever the scent of spoil attracted them.

सरजॉन सीली (Sir John Seely) लिहितो' In the Maratha movement there never was anything elevated or patriotic, but that it continued from the first to be an organisation of plunderers."

ज्यानें आपल्या जीवनाचा महत्त्वाचा भाग हिंदुस्थानांत घालविला तो विख्यात इतिहासलेखक व्हिन्सेन्ट स्मिथ लिहितो : " The Maratha independent rule was the rule of professed robbers. In short, the Marathas were robbers by profession."

भारतीय इतिहासज्ञ सर जदुनाथ सरकार यांनींहि इतका वाईट नाहीं तरी असाच ध्वनि काढलेला आहे.

या आरोपाप्रमाणेंच स्वामिद्रोहाचा व बंडखोरीचाहि आरोप अनेक लेखकांनीं शिवछत्रपतींच्यावर केलेला आहे. पण शिवछत्रपतींच्या भूमिकेचा विचार केला तर हे सारे आरोप सूर्यकिरणांनी हिमनगाचें पाणी व्हावें त्याप्रमाणें वितळून जातात.

## छत्रपतींची भूमिका

शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वीचा असा एकहि क्षण दाखवून देतां येणार नाही कीं ज्या क्षणीं ते विजापूरच्या राज्याचे अथवा अन्य कोणत्याहि सत्तेचे अंकित होते. शहाजीराजांच्या संबंधांत असें कोणी विधान केलें तर तें 'अनुवादहृता बुद्धिः' (परिभाषेच्या गुंतवणींत जिची स्वतंत्र विचारशक्ति नष्ट झालेली आहे अशी बुद्धि) या न्यायानें दुर्लक्षित करतां येईल. पण ज्या यावनी अथवा अन्य सत्तेचे शिवाजी महाराज कधीं अंकितच नव्हते त्या सत्तेविरुद्ध त्यांनीं घोषित केलेल्या युद्धाला कोणत्याहि अर्थानें 'स्वामिद्रोह' म्हणतां येणार नाहीं. तसेंच, त्या युद्धाला बंडहि म्हणतां येत नाहीं. कारण तें युद्ध संपूर्णपणें यशस्वी झालेलें आहे. आजच्या रूढ परिभाषेप्रमाणें अयशस्वी युद्धाला बंड असें म्हणतात. शिवछत्रपतींनीं एका नव्या राज्याची प्राणप्रतिष्ठा करून राज्याभिषेकाच्या द्वारें

आपला यशोदुंदुभि गाजविलेला असल्यामुळें त्या यशाच्या प्रकाशांत त्यांच्या आजीवन संघर्षाला 'स्वातंत्र्ययुद्ध' अथवा 'मुक्तियुद्ध' असेंच म्हणणें भाग आहे. या देशांतील मुसलमानी सत्ता ही परकीय होती, इतकेंच नव्हे, तर ती किती भयंकर अत्याचारी व राक्षसी होती याचें वर्णन आम्ही प्रस्तुत ग्रंथाच्या पूर्वार्धांत केलेलेंच आहे. त्याची पुनरुक्ति येथें करण्याचें कारण नाहीं. अशा सत्तेविरुद्ध खड्ग उपसणें केवळ राष्ट्रभक्तीचेंच नव्हें, तर मानवतेचेंहि कर्तव्यच होतें. आपल्या देशाच्या व धर्माच्या संरक्षणासाठीं परकीय व अत्याचारी सत्तेविरुद्ध रणघोषणा करणाऱ्या महापुरुषाला राष्ट्रपुरुष, स्वातंत्र्यवीर म्हणून इतिहासांत म्हणतात, व शिवछत्रपतींचें यासबधांत या संज्ञांनाहि दीप्ति यावी इतकें प्रचंड कर्तृत्व आहे. येथें चोर व दरवडेखोर जर कोणी असतील तर ते पाशवी शक्तीच्या भरंवशावर स्थिरपद झालेले यवन सत्ताधारीच होते. जितक्या अर्थानें व्हिन्सेंट स्मिथचे बंधु इंग्रज हे या देशांत अपहारक म्हणून नांदले, तितक्याच अर्थानें शिवाजी महाराजांच्या काळांतील यवन सत्ताधारीहि अपहारकच होते. या स्थिरपद झालेल्या दरवडेखोरांना उखडून टाकावयाचें कार्य यशस्वीपणानें पार पाडणाऱ्या महापुरुषाला 'Grand rebel and great disturber' म्हणणें व तेंहि स्मिथ सारख्यांनीं म्हणणें तर केवळ लतकोडगेपणाचेंच आहे. ही भूमिका शिवछत्रपतींनीं, मागच्या प्रकरणांत उद्‌धृत केलेल्या आपल्या पत्रांतील 'शहासी बेमानगिरी आम्ही व तुम्ही करीत नाही.' या वाक्यानें सुस्पष्ट केली आहे. दरवडेखोर, हिंसक, अपहारक; व स्वातंत्र्यवीर, स्वराज्यसंस्थापक व धर्मसंरक्षक यांच्या ध्येयसिद्धीच्या संबंधांत वापरलेल्या साधनांचें व कृत्यांचें बाह्यस्वरूप दिसावयास सारखेंच दिसलें तरी त्यांचीं उद्दिष्टें व हेतु अथवा ध्येयवाद यांत भिन्नता असल्यामुळें इतिहासांतील त्यांच्या स्थानांत व लोकांच्या हृदयांतील त्यांच्या विषयींच्या धारणेंत भेद असतो. एक श्रद्धाकेन्द्राचा विषय ठरतो तर दुसरा तिरस्काराचा व गर्हणेचा विषय ठरतो. मागच्या प्रकरणांत उद्‌धृत केलेले शिवछत्रपतींच्या बालवयांतील मनोवृत्तींवर

प्रकाश टाकणारे प्राचीन बखर साहित्यांतील उतारेच नव्हेत तर त्यांच्या दादाजी नरसी प्रभूला पाठविलेल्या पत्रांतील त्यांचे स्वतःचे "हिंदवी स्वराज्य स्थापून श्री मनोरथ पुरविणार आहे. हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे" हे उद्गार त्यांचा ध्येयवाद स्पष्ट करावयास संपूर्णपणें समर्थ आहेत. अशा स्थितींत शिवाजीमहाराजांना चोर, दरवडेखोर, बंडखोर व रक्तपिपासु म्हणावयाचें तर भगवान् श्रीकृष्ण, जॉर्ज वॉशिंग्टन, मॅझिनी, गॅरिबाल्डी, लेनिन या सर्वांना हींच विशेषणें लाविलीं पाहिजेत.

यावर एक प्रश्न उत्पन्न होतो व तो असा कीं, या महान् ध्येयसिद्धीसाठीं तरी शिवछत्रपतींनीं कूट राजनीतीचा व कूट युद्धनीतीचा अवलंब कां केला? शिवाजी महाराज हे कांहीं प्रयोग करीत बसणारे स्वप्नरंजनपटु नव्हते. भगवान् श्रीकृष्णांप्रमाणेंच ते यशावर दृष्टि स्थिर केलेले व्यवहारज्ञ होते. त्यांचे शत्रु त्यांच्यापेक्षां सर्व दृष्टींनीं प्रबल होते, व त्या प्रबलतम शत्रूंविरुद्ध त्यांना एकाकी, असहाय व साधनहीन अवस्थेंत संघर्ष करून विजयी व्हावयाचें होतें. त्यासाठीं कूट राजनीति व कूट युद्धनीतीच्या अवलंबाविना दुसरा कोणताहि मार्ग नव्हता. शिवछत्रपतींनीं आपल्या शत्रूंचा, परिस्थितीच्या विकटतेचा व आपल्या साधनहीनतेचा विचार करूनच या मार्गाचा अवलंब केला. त्यांना कांहीं त्या गोष्टींची आवड होती म्हणून नव्हे. त्यांचे समकालीन मुत्सद्दी रामचंद्रपंत अमात्य यांनीं आपल्या 'आज्ञापत्र' या ग्रंथांत यासंबंधांत जें वर्णन केलें आहे तें छत्रपति शिवाजी महाराजांच्या सभोंवारच्या परिस्थितीची व तिच्यावर मात करणाऱ्या त्यांच्या प्रतिभेची यथार्थ कल्पना देणारें आहे.

## शिवाजी महाराजांचे शत्रु

रामचंद्रपंत अमात्य लिहितात "दक्षिण प्रांतीं इदिलशाही, कुतुबशाही व निजामशाही ही पराक्रमी महान् सकलार्थें समृद्धिमंत संस्थानें, तसेंच मोंगल एक एक सुभा लक्ष लक्ष स्वारांचा, या विरहित शामल, फिरंगी, इंग्रज, वलंदेज, रामनगरकर, पाळेगार, सौंदे,

बिदनूर, म्हैसूरवाले, त्रिचनापल्ली आदि करून संस्थानिक; तसेंच जागजागीं, पुंड, चंदरराव, शिरके, सावंत, दळवी, वरघांटे, निंबाळकर, घाटगे आदिकरून देशमुख व फाटक सकलही पराक्रमी सज्ज." स्वराज्याचें केन्द्र म्हणजे शहाजी राजांची शिवाजी महाराजांच्या अधीन असलेली जहागीर होती हें ध्यानांत घेतलें म्हणजे ती वाढवावयाची याचाच अर्थ तिच्या लगतच्या प्रदेशांचे लचके तोडावयाचे असा होतो. हे लगतचे प्रदेश बहामनी शाह्यांचे व मोंगलांचे अथवा खरें म्हटलें तर विजापूरकरांचे व मोंगलांचे होते. अर्थातच विजापूरची आदिलशाही व दिल्लीची मोंगल राजसत्ता हे शिवाजी महाराजांचे स्वाभाविक शत्रु होते. यांपैकीं कोणताही एक शत्रु शिवाजी महाराजांना चिरडून टाकावयास पूर्णपणें समर्थ होता. आदिलशहाचा एक सेनापति अफझलखान शिवाजी महाराजांवर चालून आला त्या वेळीं त्या दोघांच्या सैन्यबळांत येवढें अंतर होतें कीं, उघड युद्धांत गांठ पडती तर त्या सैन्यपुरांत महाराजांचें टीचभर स्वराज्य केव्हांच बुडून गेलें असतें. ते आदिलशाहीचा दुसरा सेनानी सिद्दी जौहर याच्या पन्हाळ्याच्या वेढ्यांत अडकले असतां त्यांनीं कूटनीतीचा अवलंब केला नसता तर स्वराज्याचा विनाश केव्हांच झाला असता. शहाजीराजांसारख्या धुरंधर व स्थिरपद सेनापतीला मुसक्या बांधून व हातांपायांत लोहशृंखलांचे अलंकार चढवून भर राजरस्त्यांतून जी सत्ता अपमानित अवस्थेंत मिरवीत आणूं शकली तिचें सामर्थ्य स्वराज्यसाधनेच्या प्रारंभींच्या काळांत शिवाजी महाराजांना अगदीं सहज चिरडून टाकण्याच्या तोलाचें होतें हें सिद्ध करावयास वेगळीं प्रमाणें देण्याची आवश्यकता नाहीं.

मोंगलांचें सामर्थ्य तर अशा विजापूरकरांनाहि सहज धूळ चारण्यासारखें होतें. एकलक्ष सैन्य घेऊन स्वराज्यावर चालून आलेल्या शाहिस्तेखानाशी शिवाजी महाराजांनीं सरळ गांठ घेतली असती तर इतिहासांत त्यांचें नांव लिहिण्याचाहि प्रसंग आला नसता.

मिर्झाराजा जयसिंग व दिलेरखान यांचीं सैन्यदळें चालून आलीं असतां सारे गड अधीन करून मोंगल सत्तेचें अंकितत्व पत्करण्याविना महाराजांसारख्या स्वाभिमानी वीर पुरुषालाहि दुसरें गत्यंतर उरलें नाहीं असें इतिहास सांगतो. तत्कालीन जगांत मोंगल सत्ता व साम्राज्य सर्वश्रेष्ठ होतें. वृद्ध औरंगजेब बादशहा आपल्या वार्धक्यांत ससैन्य स्वराज्यावर चालून आला असतां त्या वेळची त्याची छावणी व सैन्य यांच्या प्रचंडपणाचें जें वर्णन उपलब्ध आहे त्यावरून शिवछत्रपतींच्या स्वराज्यसाधनेच्या कार्यांत हा त्यांचा शत्रु केवढा भयंकर होता याची कल्पना येते. हें वर्णन डॉ. जॉन फ्रान्सिस गेमेली कॅरेरी ह्या फ्रेंच प्रवाशानें केलेलें आहे. हा प्रवासी हिंदुस्थानांत आला त्या वेळीं बादशहा औरंगजेबाचा तळ कृष्णा नदीच्या कांठीं विजापूर जिल्ह्यांत गलगली येथें होता. हे बादशाही शिबिर पहाण्यास कॅरेरी हा गोव्याहून बुद्धया गलगली येथें गेला होता. इ. स. १६९५ च्या मार्च महिन्यांत त्यानें हा प्रवास केला. त्यानें केलेल्या वर्णनाप्रमाणें औरंगजेब व त्याचे पुत्र यांच्या छावणीनें तीन मैलांचा प्रदेश व्यापला होता. या वेळीं औरंगजेबाच्या छावणींत अश्वदल साठ सहस्र, पायदळ एकलक्ष, उंट पांच सहस्र व हत्ती तीन सहस्र होते. शिबिरांत सर्व लोकांची मिळून संख्या पांच लक्षांची होती. एकंदर अडीचशें बाजार या शिबिरांत असून शिबिरानें तीस मैलांचें क्षेत्र व्यापलें होतें. दक्षिणेंतील बहामनी शाह्यांच्या मनांत जीवनमरणाचें प्रश्नचिन्ह उमटविणारी सर्वश्रेष्ठ मोंगलसत्ता शिवछत्रपतींचा सर्वांत मोठा शत्रु म्हटली पाहिजे. एकाहि प्रबल रजपूत राजाच्या मनांत या सत्तेविरुद्ध उठाव करण्याची कल्पना मूळ धरूं शकली नाहीं.

शिवाजी महाराजांच्या समोर या दोन शत्रूंबरोबर स्वकीय हिंदू हितशत्रूंचाहि प्रश्न होता. किंबहुना हा प्रश्न अधिकच बिकट होता. त्यांच्या अंतःकरणांत जी स्वातंत्र्यलालसा व जें धर्मप्रेम होतें तिचा मागमूसहि त्यांच्या या धर्मबांधवांच्या अंतःकरणांत नव्हता. ते ध्येयवादाच्या प्रभावानें वळण्यासारखे नव्हते. शिवाजीमहाराजांना त्यांच्या संपूण जीवनांत त्यांच्या स्थायीभावाचा

केवळ एकच शिष्य मिळाला व तो म्हणजे बुंदेलखंडाचा राजा छत्र-साल होय. तत्कालीन हिंदू सत्ताधाऱ्यांचे दोन वर्ग दिसून येतात. एक मिर्झा राजा जयसिंगासारख्या खाजगी जीवनांत धार्मिक पण राष्ट्रीय अधिष्ठान नसलेल्या जातिवंत दास मनोवृत्तीच्या लोकांचा वर्ग होय. सत्ताधीश यवन आपला स्वामी असल्यामुळें त्याच्याशीं पतिव्रतेच्या निष्ठेनें एकनिष्ठ राहणें हेंच आपले कर्तव्य होय असें हा वर्ग मानी. सप्त प्रकरणात्मक शिवचरित्रांत जयसिंगाचें केलेलें वर्णन या वर्गाच्या मनोवृत्तीवर उत्कृष्ट प्रकाश पाडतें. तें वर्णन असें "हा राजा हिंदू, परम धार्मिक, भला, धर्मस्थापना कर-णार, नीति करून राज्य चालवितो." पण आपल्या गृहजीवनांत अत्यंत धार्मिक असणारा व स्वतःच्या राज्याच्या अंतर्गत धर्मानुसार चालणारा हा राजा औरंगजेबाला स्वतःचा राजा म्हणून दैवत मानी. ज्याच्या खड्गधारेच्या भरंवशावर या राष्ट्रांत धर्माचें संरक्षण झालें त्या शिवाजीमहाराजांच्या अंतःकरणांतील ज्योतीचा एखादा प्रकाशकिरणहि पचविण्याची पात्रता जयसिंगाच्या ठिकाणीं नव्हती. एकादशीशिवाय व एकलिंगजीच्या पूजेशिवाय अन्नग्रहणहि न करणारा धर्मनिष्ठ जयसिंग धर्मरक्षक शिवाजी महा-राजांच्या संबंधांत बादशहा औरंगजेबाला लिहितो "विजापूर, गोवळकोंडा व शिवाजी यांची खबर घेण्यांत मी आतांपर्यंत यत्किं-चितहि कसूर केली नाहीं व पुढेंहि करणार नाही. शिवाजीचा कांटा कायमचा दूर करण्यासाठीं मी एक युक्ति योजिली आहे. ती बादशहास पसंत असल्यास मी ती अंमलांत आणण्याचा प्रयत्न करीन. आम्ही रजपूत लोक मराठ्यांस फारच हलके समजतों व त्यांच्याशीं रोटीव्यवहारसुद्धां करीत नाहीं. मग बेटीव्यवहाराचा प्रश्नच कशास पाहिजे? तथापि शिवाजीची मुलगी मी माझ्या मुलास करतों असें बोलणें लावून त्या निमित्तानें शिवाजीस मी आपल्या गोटांत बोलावून आणून माझ्या माणसांकडून त्याला ठार मारून टाकितों. मात्र हा माझा विचार अत्यंत गुप्त ठेवणें अवश्य आहे. तरी या बाबतींत बादशहाचा हुकूम मला ताबडतोब

पाठवावा. म्हणजे पुढील तजविजी लागतां येईल." या जयसिंगाच्या पत्रावर टीप लिहितांना सर जदुनाथ सरकार लिहितात —

"अफझलखानाच्या भेटींत खानानें शिवाजीस ठार मारिलें नसतें असें कित्येक भोळे लोक म्हणतात; त्यांनी, स्वतःची राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठीं जयसिंग शिवाजीचा खून करण्यास तयार झाला होता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे."

दुसरा हिंदु सरदारांचा व सत्ताधीशांचा वर्ग हा केवळ स्वार्थांध व त्यासाठीं हवें तें करावयास सिद्ध असणारा वर्ग होता. या उभयविध स्वकीय हितशत्रूंत शिवाजी महाराजांचे प्रत्यक्ष नातलग-सुद्धां समाविष्ट होते. अफझलखानाच्या स्वराज्यावरील स्वारीच्या वेळीं शिवाजी महाराजांचा प्रत्यक्ष चुलता खानाच्या सैन्यांत होता. महाराजांनीं स्वतंत्र राज्याची प्रतिष्ठापना केल्यावरसुद्धां त्यांचा सावत्र भाऊ व्यंकोजी हा विजापूरकरांच्या दास्यांतच धन्यता मानीत होता. इतकेंच नव्हे तर विजापूरकरांच्या वतीनें कांहीं प्रसंगीं त्यानें आपल्या बंधूवर शस्त्रहि उपसलें होतें. या स्वकीय हितशत्रूंचें संकट अधिकच भीषण होतें. स्वराज्यसाधनेचा प्रारंभ एखाद्या खानाच्या वधाऐवजीं चंद्रराव मोऱ्यांच्या वधापासून झालेला आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

शिवाजी महाराजांचा चौथा बलिष्ठ शत्रु म्हणजे जंजिरेकर सिद्दी होय. शिवाजी महाराजांनीं रायगड किल्ला घेतल्यापासून त्यांचें व या शिद्द्याचें युद्ध प्रारंभ झालें व तें शेवटपर्यंत टिकलें. मोंगल साम्राज्याचा थरकांप उडविणाऱ्या शिवछत्रपतींना शेवटपर्यंत या शत्रूला नमवितां आलें नाहीं. जंजिऱ्यावर (जंजिरा म्हणजे सिंधुदुर्ग) विजय मिळविण्यासाठीं स्वतंत्र आरमार उभारून शिव-छत्रपतींनीं केलेले सारे प्रयत्न विफल ठरले. शिवछत्रपतींच्या काळीं पोर्तुगीज, इंग्रज, डच व फ्रेंच हीं पाश्चात्य राष्ट्रें भारतांत आपले हातपाय पसरण्याचा प्रयत्न करीत होतीं. यांपैकीं पोर्तु-गीजांची सत्ता वद्धमूल झालेली असून इंग्रज, डच व फ्रेंच हे मात्र

व्यापारी या नात्यानेंच वावरत होते. यांपैकीं डच व फ्रेंच यांचा शिवाजी महाराजांशीं फारसा शत्रुत्वाचा संबंध आला नाहीं. त्यांनीं केलेल्या शत्रुपक्षाच्या प्रदेशाच्या लुटींत काय थोडीफार झळ या लोकांना पोहोंचली असेल तेवढीच. पोर्तुगीजांशीं शिवछत्रपतींचे प्रथम शत्रुत्वाचे संबंध नव्हते. पण दोघांचेहि प्रदेश एकमेकांना लागून असल्यामुळें असे शत्रुत्वाचे संबंध उत्पन्न होणें अपरिहार्य ठरलें. धार्मिक बाबतींत पोर्तुगीज सत्ता आपल्या हिंदु प्रजेवर विलक्षण अत्याचार करूं लागल्यामुळें हिंदु धर्माच्या संरक्षणासाठीं बद्धपरिकर झालेल्या शिवछत्रपतींची त्यांच्यावर स्वाभाविकपणेंच वक्रदृष्टि झाली. या पोर्तुगीजांनाच फिरंगी असें म्हणत. हा शब्द फिडलगी या मूळ पोर्तुगीज भाषेंतील शब्दाचें अपभ्रष्ट रूप होय. पोर्तुगीज भाषेंतील या शब्दाचा अर्थ सभ्य गृहस्थ असा आहे. इ. स. १५३० पासून पोर्तुगीजांनीं भारतांत आपला पाय रोवला. इ. स. १५१० मध्यें गोवा ताब्यांत घेतल्यावर त्यांनीं आपली सत्ता कधीं बळानें तर कधी भारतांतील मुसलमान सत्ताधीशांच्या अनुनयानें वाढविली. पोर्तुगीज हे नुसते व्यापारी अथवा तटस्थ राज्यकर्ते नव्हते तर ख्रिश्चन धर्माचा प्रसार तरवारीच्या बळावर करणें हें ते आपलें कर्तव्य समजत. मुसलमानांनीं हिंदूंवर केला त्याहून कोणत्याहि अर्थानें सौम्य स्वरूपाचा पोर्तुगीजांचा अत्याचार नव्हता. पाद्रयांचें त्यांच्या राज्यांत विलक्षण वर्चस्व असून व्हॉइसरॉयसारखे दायित्वपूर्ण अधिकारीहि या अत्याचारसत्रांत महत्त्वाचें नेतृत्व करीत. शिवछत्रपतींची त्यांच्याकडे वक्रदृष्टि वळावयास त्यांचे हे हिंदूंवरील अत्याचारच कारणीभूत झाले. पोर्तुगीजांच्या प्रदेशांत चाललेल्या अत्याचारांचें स्वरूप सावरकरांच्या गोमंतक या सुप्रसिद्ध काव्यांत उत्कटपणें प्रतिबिंबित झालें आहे. पण आम्ही येथें केवळ काव्याचें प्रमाण देत नसून त्यांचीं कांहीं प्रत्यक्ष राजपत्रकेंच देतों. दि. ३० जून १५४१ मध्यें गोवे सरकारनें काढलेल्या राजपत्रकांत म्हटलें आहे, “आकाशांतील देवानें हिंदूंचीं सारी देवालयें भुईसपाट करण्याची आम्हांस आज्ञा

केली आहे." दि. ८ मार्च १५४६ मध्यें पोर्तुगीज राजाकडून गोव्याच्या व्हॉइसरॉयास आलेल्या आज्ञापत्रकांत असें म्हटलें आहे कीं, "गोव्यांतील मूर्तिपूजेचा नाश करा. हिंदूंचीं देवळें पाडा. हिंदूंना धार्मिक उत्सव करण्यास बंदी करा. ब्राह्मणांना गोवें प्रांताबाहेर हाकलून अधिकाराच्या जागा केवळ ख्रिस्ती होतील त्यांनाच द्या." बाटवाबाटवीचे प्रकार तर भर रस्त्यांतून चालत. साष्टी प्रांतांतील ४०९ व्यापारी व्यापारानिमित्त गोव्यास आले असतां त्यांना पकडून एकदम बाप्तिस्मा देण्यांत आला. इ. स. १५५९ मध्यें असा निर्बंध करण्यांत आला कीं, "मेलेल्या मनुष्याची मत्ता त्याचे वारस ख्रिस्ती होतील तरच त्यांना मिळेल; नाहींतर ती सरकारजमा करण्यांत येईल" इ. स. १५७४ मध्यें असा निर्बंध करण्यांत आला कीं, कोणत्याहि ख्रिस्तेतराला, मग तो केवढ्याहि योग्यतेचा असला तरी, गोव्यांतील रस्त्यावरून घोड्यावरून, पालखींतून अथवा मेण्यांतून जातां येणार नाहीं. गेल्यास १० रु. दंड करण्यांत येत असे. दि. २५ मार्च १५५९ मध्यें काढलेल्या राजाज्ञेंत म्हटलें आहे, "गोवें व त्या जवळचीं बेटें यांतील घरांत अथवा बाहेर देवळें किंवा मूर्ति असलेल्या जाळून उद्ध्वस्त कराव्या. गुप्त अथवा प्रकट रीतीनें हिंदु धर्मोत्सव मुळींच करूं नयेत. एखाद्याच्या घरांत देव, मंदिरें, अथवा मूर्ति असल्याचा संशय आल्यास ती वार्ता तत्काळ अधिकाऱ्यांना कळविण्यांत यावी, म्हणजे त्या घराची सर्व मिळकत सरकारजमा करून अर्धी सरकारला व अर्धी वार्ताहराला वाटून देण्यांत येईल."

इ. स. १५६३ मध्यें निघालेल्या राजाज्ञेंत म्हटलें आहे, "स्वतः भूमि कसणारे शेतकरी, वैद्य, सुतार, लोहार व भंडारी हे सोडून इतर हिंदूंनीं आपलीं घरें व भूमि विकून गोवे बेटांतून एका महिन्याच्या आंत निघून जावें. अन्यथा त्यांना गलबतावर बंदी म्हणून पाठवून त्यांची भूमि सरकारजमा करण्यांत येईल."

केवळ देवळांतील देवच नव्हे तर वड, पिंपळ, औदुंबर या हिंदूंनीं पवित्र मानलेल्या वृक्षांनाहि तोडून टाकण्याची राजाज्ञा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलमान
अनुक्रम २८ शिवाजीची शत्रुराष्ट्रें ९१८२१
क्रमांक ९८७२ नों. दि. २०।३।६०



निघाली. शेंडीवर कर होता; मग यज्ञोपवीताचें तर विचारावयासच नको. शिवछत्रपतींच्या जन्मापूर्वी दहा वर्षे गोवें प्रांतांतील कोणाहि हिंदूनें हिंदु पद्धतीप्रमाणें विवाह केल्यास त्याला एक सहस्र मोहरा दंडाची शिक्षा होती. पार्तुगीजांचा हा धार्मिक अत्याचारच त्यांच्या व शिवछत्रपतींच्या शत्रुत्वाला कारण झाला. 'इंग्लिश रेकॉर्ड्स् ऑन शिवाजी' या ग्रंथांत या वैमनस्याची मीमांसा पुढीलप्रमाणें केलेली आहे.

"Sewajee and Portuguese daily quarrell; the chiefest cause of his hatred to them being for forcing orphans of his cast to turn Roman catholicks. There has also of late happened same distputes among them in ths same account. The captain General of Busseen taking the part of same orphans against the Jesuits and forcing the said Jesuits to restore the said orphans to a considerable estate, which they had been possessed of many years which they highly resented." (English Records vol. II P.74)

"शिवाजीचा आणि पोर्तुगीज लोकांचा सदासर्वकाळ तंटा सुरू असतो. याचें मुख्य कारण शिवाजीच्या ज्ञातीच्या पोरक्या मुलांस पोर्तुगीज बाटवून ख्रिस्ती करतात हें आहे. नुकताच कांहीं दिवसांपूर्वी याच संबंधांत त्याचा पोर्तुगीजांशीं तंटा उपस्थित झाला आहे. पोर्तुगीजांच्या वसईच्या मुख्याधिकाऱ्यानें या पोरक्या मुलांचा पक्ष धरून जेसुईट लोकांच्या स्वाधीन असलेलीं पोरकीं मुलें व त्यांच्या मिळकती परत देण्यास त्यानें भाग पाडलें आहे व या कृत्यामुळें या जेसुईट लोकांस फार संताप आला आहे."

शिवछत्रपतींच्या वेळीं गोवा येथें असलेल्या व्हॉइसरॉयनें हिंदूंना बळानें बाटवून ख्रिश्चन करण्यासंबंधीं घोषणापत्रक काढून शिव-छत्रपतींच्या धर्मप्रेमाला व विशेषत: न्यायप्रेमाला एक प्रकारें आव्हानच दिलें. शिवाजीमहाराजांनीं या अन्यायामुळें चिडून जाऊन

त्यांची जी धूळधाण केली व गाळण उडविली त्याचें चित्र ' इंग्लिश रेकॉर्डस् ऑन् शिवाजी ' मध्यें पुढीलप्रमाणें रेखाटलें आहे.

Sewajee deeply resenting this regiour invaded the precincts of Bardese not farre distant from Goa and there cutt off heads of four padrees that refused to turn Morettoes (Marrathas -Hindu) of his own persuasion, they having councelled the destruction of all that were not opinionated as themselves, which terrifyed the Vice Roy that he was forced to revoke his fierce and severe edict. He (Shivaji) burnt and destroyed all the country and carried away 150 Lack of pagodaes."

—(English Records, vol. I. No.138, P. 119)

" शिवाजीस पोर्तुगीज लोकांनीं चालविलेल्या त्याच्या धर्मबांधवांच्या धार्मिक छळाबद्दल अत्यंत संताप येऊन त्यानें बारदेशच्या जवळच्या व गोव्यापासून फार दूर नसलेल्या प्रांतावर स्वारी करून चार पाद्र्यांची, त्यांनीं बाटविलेल्या मराठा हिंदूंना परत देण्याचें नाकारल्यामुळें व त्यांच्या धर्माप्रमाणें न वागणाऱ्या हिंदूंचा सत्यानाश करण्याचा सल्ला दिल्यामुळें डोकीं कापून काढलीं. पोर्तुगालचे व्हॉइसरॉयची यामुळें इतकी गाळण उडाली कीं, त्यानें हिंदूंचे बाबतींत काढलेलें हें जुलमी व अन्यायी घोषणापत्रक मागें घेतलें. शिवाजीनें तो सर्व प्रदेश जाळून फस्त केला. आणि दीडशें लाख प्यागोड्यांची त्या प्रांतांतून लूट नेली.

## इंग्रज

इंग्रज हे पोर्तुगीजांपेक्षां धार्मिक गोष्टींत अधिक धूर्त व दूरदर्शी होते. त्यांनीं आपल्या प्रजेवर धार्मिक बाबतींत पोर्तुगीजांप्रमाणें अत्याचार केले नाहींत, इतकेंच नव्हे तर इंग्रजांना मुंबई, पोर्तुगीजांकडून आंदण म्हणून मिळाली असतां त्यांनीं जें घोषणापत्रक काढलें त्यांत " या बेटांतील लोकांस पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य देण्यांत

आलें आहे, कोणावरहि धर्मासंबंधांत बळजोरी करण्यांत येणार नाहीं, ज्यानें त्यानें आपल्या धर्मप्रमाणें ईश्वराचें भय बाळगून त्याची उपासना करावी, व सर्वांनीं परस्परांशीं शांततेनें व मित्र-भावानें वागावें" अशीं वाक्यें आहेत. इंग्रजांची सत्ता मुंबई बेट त्यांना मिळाल्यापासून खरी दृढमूल झाली. शिवछत्रपतींचे व त्यांचे संबंध प्रथम शत्रुत्वाचे नव्हते. पण शत्रुप्रदेशावर स्वाऱ्या करतांना महाराजांनीं शत्रुप्रदेशांतील संपत्तिकेंद्र म्हणून इतरांबरोबर इंग्रजांच्याहि वखारी लुटल्यामुळें इंग्रजांना त्यांच्याविषयीं राग होता. उलट, पूर्ण तटस्थ न राहतां इंग्रजांनीं आदिलशहाशीं चाललेल्या महाराजांच्या युद्धांत शत्रुपक्षाला साह्य केल्यामुळें महाराजांनींहि त्यांची खोडकी जिरविण्याचें ठरविलें होतें. इंग्रजांचें व महाराजांचें खरें शत्रुत्व खांदेरी व उंदेरी या मुंबईजवळच्या दोन बेटांवर महाराजांनीं आपलें स्वामित्व प्रस्थापित केल्यानंतर प्रारंभ झालें. मुंबई बेटाजवळील हीं दोन बेटें वस्तुतः ओसाड होतीं. या बेटांवर कोणाचेंच स्वामित्व नव्हतें. हीं बेटें अधीन केल्यास आपल्या शत्रूला प्रच्छन्न साह्य करणाऱ्या मुंबईकर इंग्रजांवर सततची परिणामकारक दृष्टि ठेवतां येईल म्हणून शिवाजी महाराजांनीं तेथें आपलीं माणसें उतरवून दुर्गाच्या पद्धतीनें तटबंदी केली. हा जागता डोळा व तोहि शिवाजीसारख्या बलाढ्य शत्रूचा इंग्रजांना जाचक असल्यामुळें त्यांनीं त्या तटबंदीला अडथळे उत्पन्न करावयाची पराकाष्ठा केली. पण शिवछत्रपतींसमोर त्यांचें कांहींहि चालू शकलें नाहीं.

स्वराज्याच्या प्रारंभकाळींच असलेल्या शिवछत्रपतींच्या या सर्व शत्रूंच्या सामर्थ्याचा विचार केला तर कंसाच्या वधानंतर तीन कोटींचें खडे सैन्य असलेल्या जरासंधाच्या नेतृत्वाखालीं एकवटलेल्या राजसंघाविरुद्ध एकाकी दंड थोपटणाऱ्या वीर श्रीकृष्णाच्या ऐन तारुण्यांत प्रवेश केलेल्या मूर्तीची आठवण झाल्याविना राहात नाहीं. जर शिवछत्रपति, या शत्रूंशीं त्यांचें सामर्थ्य व त्यांची अधःपतित नीतिमत्ता ओळखून, जशास तसें या न्यायानें वागले नसते तर ते

केव्हांच नामशेष होऊन हिंदुधर्म या नांवाचा कोणताहि धर्म या देशांत आज दृष्टीस पडला नसता. शिवछत्रपतींच्या समोर राम व कृष्ण हे दोन्हीहि ऐतिहासिक आदर्श होते. पण शिवछत्रपतींची परिस्थिति श्रीरामचंद्रांची युद्धनीति व राजनीति स्वीकारावी अशी नसून श्रीकृष्णांची राजनीति व युद्धनीति स्वीकारावी अशी होती. शत्रूचा पराभव करून आवश्यक असेल त्या मार्गानें, साधनशुचितेच्या विचारास अग्रस्थान न देतां, व त्यामुळें मूळ ध्येयवादाला संकटांत न टाकतां, ध्येयसिद्धीच्या दृष्टीनें जें जें आवश्यक असेल त्याचा वापर करून अंतिम विजय मिळवावयाचा हेंच श्रीकृष्णांच्या व शिवछत्रपतींच्या राजनीतीचें रहस्य होतें.

## छत्रपतींची राजनीति

जरासंधाच्या नेतृत्वाखालीं एकवटलेला राजसंघ त्याच्यासुद्धां संहारकुंडांत भस्मसात् करणाऱ्या श्रीकृष्णाप्रमाणें शिवछत्रपति आपल्या शत्रूवर मात करून अंतीं विजयी झालेले आहेत. हिंदूंच्या शतावधि वर्षांच्या इतिहासांत स्वतंत्र हिंदूंचें सिंहासन त्यांनीं निर्माण केलें. ज्या राजनीतीच्या द्वारें त्यांनीं हें कार्य सिद्ध केलें तिचें वर्णन करतांना आपल्या राजनीतींत शिवकालीन विख्यात मुत्सद्दी रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, "ते साधान पुरे असतांहि बुद्धि वैभवपराक्रमे कोणाची गणना न करितां, कोणावर चालून जाऊन, तुंबळ युद्ध करून, रणांगी आणिले, कोणावर छापे घातले, कोणास परस्पर कलह लावून दिले, कोणाचे मित्रभेद केले, कोणाचे डेऱ्यांत शिरोन मारामार केली, कोणांशी एकांगी करोन पराभविले, कोणाशी स्नेह केले, कोणाच्या दर्शनास आपण होऊन गेले, कोणास दर्शनास आणिले, कोणास परस्परे दगे करविले, कोणी इतर प्रयत्ने न कळत त्यांच्या देशांत जबरदस्तीने स्थळें बांधून अनुक्रमें आकळिलें, जलदुर्गसहित होते त्यांस नूतनच जलदुर्ग निर्माण करून पराभविले. दुर्घट स्थळें नौकामार्गें प्रवेशिलीं. असे ज्या ज्या उपाये जो जो शत्रु आकळावा त्या त्या उपाये तो तो शत्रु पादाक्रांत करून सालेरी

अहिवंतापासून चंजी कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य, शतावधि किल्ले, तसेच जलदुर्ग, कितीएक विशाल स्थळें, चाळीस हजार पागा, व साठसत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोटयवधि खजीना, तसेंच उत्तम जडजवाहीर सकल वस्तुजात संपादिलें."

शिवछत्रपतींच्या या नागमोडी वळणाच्या अनेकरूपी राजनीतीलाच कूटनीति असें म्हणतात. या कूटनीतीचेंच, त्यांची रणनीति हेंही एक अंग होतें. त्यांना नेहमींच अमोघ यशदायी ठरलेल्या त्यांच्या रणनीतीला अथवा युद्धनीतीला 'गनिमी कावा' असें रूढ नांव आहे. शिवचरित्रावरील जुन्या साहित्यांत शिवाजी महाराजांच्या या प्रभावशाली युद्धपद्धतीचें तपशीलवार वर्णन आढळतें. तें असें.

## छत्रपतींची रणनीति--कूटयुद्ध

"अशीं अनेक प्रकारचीं युद्धें, परंतु धर्मयुद्धाची चाल. त्यामुळें तें व्यूह राहून, मार्गांनीं जातां, जो शूरत्व धरून युद्ध करील, त्याचा पराभव करावा. मग पुढें आपलें धैर्य पोहोंचून लढाई करवेल तेथपर्यंत करून पुन्हां स्वसैन्यांत प्रवेश करीत. हल्लीं कलियुगधर्म, धर्मप्रवृत्तीचा लोप होऊन, तेव्हां प्रथम विचारें शत्रु उच्छेद करणें. त्या प्रसंगांत हत म्हणजे नष्ट झाला तरी, वृकयुद्ध किंवा चित्त्याचें युद्ध, महाराष्ट्रधर्मी युक्त योजना केली." —(शिवदिग्विजय पृ. १८२)

कूट युद्धपद्धतीचें शिवकालीन राजनीतिधुरंधरांना चांगलेंच सूक्ष्म ज्ञान होतें असें दिसतें. शिवदिग्विजयकारांनीं या युद्धपद्धतीचें जें सूक्ष्म विवेचन केलें आहे तें या दृष्टीनें अभ्यसनीय आहे. तें असें.

"कुक्कुटाचें युद्ध पहावें, त्यांत चोचींनीं मारावें, दोही पायांस सुरीची पानें जहरी विषाचें पाणी दिलेलीं बांधावीं, त्या पानांनीं गळे कापावे, पानें न बांधलीं तरी चोचींनीं रक्तें काढावीं, उभयपक्ष फऊत्कार करून ईर्षा धरून वरचेवर मारीत असावे. याप्रमाणें लाहवे, तित्तिर, चिमण्या, पारवे, खबुतरेंसुद्धां, अशा चालीची संपूर्ण पक्ष्यांचीं युद्धें, त्या पक्ष्यांस ईर्षा धरली तरि पक्ष्यांचे चालीनें युद्ध कसें करावें, त्याचा तपशील कशास? व्यूह रचना प्रकार आहे..... संमुख युद्ध द्यावें. बलाबल पडेल तसें यशापयश प्राप्त व्हावें. त्या

अन्वयें मानवी दुतर्फा सैन्य उभें राहून लढाया होतच आहेत. व्याघ्र. वृक, चित्ते यांची लढाई, गजाशीं म्हैषवत्. विपरीत युद्धाचे ठायीं परस्पर जीवरक्षण भावना सर्वाठायीं आहेच. परंतु व्याघ्र सबळ, गज निर्बळ, असें असोन लढाई होती. कोण्हे समयीं प्राणरक्षण होतें, कोण्हे समयीं नाश होतो. त्यांत सर्व जीव जितके त्याहून, ज्ञानवान् मनुष्यदेहीं सर्वोत्कृष्ट जें असेल, तेंच ध्यानांत धरून, युद्ध करीत असावें. अल्प सैन्यांनीं मोठे सैन्याशीं स्पर्धा वाढविली, तरी त्याचे युक्ति कशा लढाई करण्याच्या म्हणून विचारिल्या, त्यावरून पंचोपाख्यानीं ग्रंथी हा विषय लिहिला आहे, तो मनन केला असतां, ध्यानांत येईल; परंतु किंचितार्थ सुचवितो. **म्हानांनीं थोरांशीं स्पर्धा मुळींच** करूं नये. केली असतां जसे कोल्ह्यास गज, वृषभ, मृग, उन्मत्त जनावरें यांचें मांस खाण्याची इच्छा झाली, ती त्यांणीं कोणते साहसें साधिली. दुसरियास तिलप्राय अंश दिल्हा नाहीं; तेव्हां कोल्ह्यास अशी मोठीं जनावरें मारण्याचें सामर्थ्य काय? समजतच आहे. दुसरियाचे हातें मारून, आपण त्या विषयास मालक जाला. मारणारासही विभाग न दिल्हा. ह्या विचारें आधीं मनुष्य अनुकूल करून घ्यावें. त्याचे हातून त्याचे यजमानांत कलह आपसांत लावून कटाक्ष पाडावा. मग आपली प्रौढी उभयतांवर दाखवून आपणच ऐश्वर्य संपादावें. हा प्रकार न झाला तरी युद्ध करावयाचा प्रसग पडू नये. पडल्यास साह देवी मतें युद्ध करावें म्हणजे यश येईल...

"दुसरी कथा वृक युद्ध म्हणजे पांच चार फौजेच्या टोळ्या कराव्या. त्या शत्रूस समजों न देतां, संकेतानीं चालावें. एकानी तोंड लावावें. तों परसैन्य त्या अल्प सैन्यावर 'घे घे मार' करीत उठतें. या लोकांनी पळ काढावा, म्हणजे मोडलें सैन्य जाणून, पाठी लागणारांस, मोठे फौजेचा पळ निघाला, हें सर्वांस वाटून, सामान्य टोळ्यांनीं चहूकडून घालावीं. तेव्हां ते पाठलाग करतां, पळल्याचा प्रकार होतो. अल्प सैन्य मोठें सैन्यास मारते होऊन, मोठें सैन्यास किती फौज आहे, तिची गणती न सांपडतां हतवीर्य होतें. तेणें करून फत्तेह वृकयुद्धी जाणावी. चित्ते याचें युद्ध शिकारीस जावें तरी बाणाचे गोष्टीचे टप्प्यावरील, जनावर पाहून चित्ता सोडावा.

त्याचा स्वभाव जनावरांस कळूं न देतां लपत लपत जावे. लोळत घोळत हरयत्नें जवळ गांठ घालावी, उडी मारतांच, जनावर साध्य होईल असें पाहून उडी मारावी. उडी मारतांच सांपडल्यास मोठा आनंद होऊन, रक्षक मनुष्याशीं लालित्य ठेवावे. ती उडी जातांच जनावर सावध होऊन उडी निर्फळ झाली, तरी अंती लज्जित व्हावें. ते दरवेशी रक्षक, त्याजला शिपाईपणाचीं उमेदवार भापणें, बोलून शूरत्व आणोन, हुशार करताहेत; तशीच नरयुद्धीं शत्रूस, मुक्काम फौजेचा चालत कोठें आहे, ते वर्तमान न समजतां, वीस, पंचवीस, पन्नास, कोसावरून रानवेरात करून, छापा देऊन, दुसरीयाची फौज लुटून, व्याघ्रीं चालनां आघाडी मारावी हीं चित्याचीं युद्धें समजावीं. व्याघ्रीं मनुष्यांनीं युद्ध करणें. चोरून मारणें हा निर्बळ पक्ष. यांत शूरत्व केलें नाहीं. पंचानन सर्वोत्कृष्ट, सर्व जनावरांचा राजा, त्यांजला हाक देऊन, सावध करावे. म्हणजे त्याजवरी जरब मनुष्याची राहती. त्याशी माणूस पाहून, किराण साधलें, तरी आपला नाश होतो, समजोन पूर्वीच हाक द्यावी. तेणेकरून व्याघ्र शूरत्वें चालोन येतो. त्या उडींचे लक्ष ठेऊन, वाघाची उडी पडोन, नजर पोहोंचली नाही तों पुढे सरसावोन, बरची अगर सुरीपट्टा या हत्यारांचा वार साफ हातांनीं करावा. हे विषम युद्ध जाणावें. अल्प मनुष्यांनीं पंचानन व्याघ्राशीं युद्ध करणें हें धैर्यवंताचें लक्षण. शूरत्व विशेष. त्यायोगे जीवित्व आशा दूर करोन, परजीवाची हांव भरणें, अघटित कृत्य आहे. असेंच महत् समुदायाशीं किंचित् समुदाय सैन्यांनीं यश संपादन करणें; हाही प्रकार असाध्य आहे; तो योजावा," —(शिवदिग्विजय पानें, १७८ ते १८०)

एकाकी असहाय स्थितींत प्रबलतम शत्रूंवर मात करून शिवाजीमहाराज ज्या राजनीतीनें व रणनीतीनें यशस्वी झाले तिचें स्वरूप तत्कालीन राजनीतिविशारदांच्या दृष्टिकोनातून हें असें आहे. पण श्रीकृष्ण व शिवाजी या नीतीनें यशस्वी ठरले असले तरी त्यांचे मार्ग पापमयच ठरत नाहींत काय? याचें उत्तर पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✦ ✦

प्रकरण पांचवें

# सामान्यनीति व राजनीति

कालशक्तीच्या विनाशकारी सामर्थ्याचें स्वरूप सांगतांना श्रीमन्महाभारतांत असें म्हटलें आहे कीं ––

न काल: खड्गमादाय शिर: कृन्तति कस्यचित् ।
कालस्य बलमेतावद्विपरीतार्थदर्शनम् ।।

"काळ कांहीं हातांत खड्ग घेऊन कोणाचा शिरच्छेद करीत नसतो. चांगली व हिताची गोष्ट नकोशी वाटणें व वाईट नि अहितकारक गोष्ट हवीशी वाटणें हेंच काळाच्या विनाशकारी सामर्थ्याचें स्वरूप होय." भारताच्या इतिहासाकडे पाहण्याच्या आजच्या कांहीं अहंनन्य नेत्यांच्या दृष्टिकोनाचेंहि असेंच झालें आहे. आपल्या साधनशुद्धीचें स्तोम माजविण्याच्या भरांत या संबंधांत पहिली चूक गांधीजींनीं केली. शिवाजी व प्रताप यांचे मार्ग हिंसात्मक म्हणून त्यांना चुकीचे वाटून त्यांनीं त्यांना प्रचाराच्या भरांत 'वाट चुकलेले देशभक्त' (misguided patriots) हें विशेषण वापरलें. इतकेंच नव्हे, तर आपल्या मुसलमानधार्जिण-पणाच्या आजच्या राजकारणाच्या पुरस्कारासाठीं त्यांनीं शिवाजी-महाराजांच्या समकालीन व त्यांच्या अलौकिक दीप्तिमान् चरित्राचें रहस्य आपल्या प्रतिभेनें यथार्थपणें प्रकट करणारा कविश्रेष्ठ भूषण याच्या शिवसमकालीन काव्याची चिरफाड करण्याचें आन्दोलन प्रारंभ केलें. आपल्या शिवाबावनी नांवाच्या ओजोगुणानें रसरसलेल्या काव्यांत शिवछत्रपतीचें वर्णन करतांना कवि भूषण म्हणतो ––

इन्द्रजिमि जंभपर, वाडवसु अम्भपर,
कान्हजिमि कंसपर तिमि म्लेच्छवंसपर
सेर सिवराज है ।।

यांतील ‘म्लेच्छबंसपर सेर सिवराज है’ हे शब्द मुसलमानांचा अनुनय हें आपल्या राजकारणाचें प्राणभूत तत्त्व समजणाऱ्या गांधीजींना सलूं लागलें. त्यांचें तें आन्दोलन सफल न झालें तरी त्याचा परिणाम घडून आलाच वर्तमानकालीन स्वार्थासाठीं भूतकालीन ऐतिहासिक घटनांचें वाङ्मयीन विकृतीकरण करण्याचा हा प्रयत्न सत्याचा वध करणारा, इतिहासाची हत्त्या करणारा व पूर्णपणें अनीतिकारक होता. गांधीजींसारख्या विश्वविख्यात पुरुषानें मतप्रचाराच्या मोहाला बळी पडून हे अन्याय्य साहस करतांच अनेक प्रांत, नगर व ग्रामगांधींना अवसान येऊन शिवछत्रपतींना नीतिदृष्ट्या दूषण लावण्यांत कांहीं विशेष पुरुषार्थ असल्याच्या जाणिवेनें त्यांनीं एक प्रकारें या स्वरूपाचें एक आन्दोलनच सुरू केलें. कांहीं लोकांना प्रामाणिकपणेंच तसें वाटत होतें व प्रामाणिकपणामुळेंच थोड्याशा चिंतनानंतर आपली चूक कळून येऊन त्यांनी उघडपणें स्वतःच्या मनांत योग्य तें परिवर्तन घडविलें. याचें सर्वांत मोठें उल्लेखनीय उदाहरण भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचें आहे. पंडितजींना अफझुलखानाच्या वधाच्या प्रकरणांत शिवाजीमहाराजांनीं आचरिलेला मार्ग वंचकतेचा वाटला. त्यांनीं आपल्या इतिहासावरील पुस्तकांत त्याचा उल्लेख करून शिवाजीमहाराजांच्यावर आक्षेपहि घेतले. पण अगदीं अलीकडेच या घटनेचा अधिक गंभीरपणें विचार केल्यावर त्यांना त्यांची चूक कळून आली व मोकळेपणानें त्यांनीं ती मान्य केली. पण ज्यांच्याजवळ मनाचा हा प्रामाणिकपणा नसून स्वतःच्या दंभाच्या समर्थनार्थ सूर्यावर थुंकावयाचें आहे त्यांनीं मात्र अजूनहि नव्या जोमानें आपल्या या पुरुषार्थाची उपासना चालूंच ठेविली आहे. याचें प्रसिद्ध उदाहरण म्हणून मध्यवर्ती सरकारचे एक मंत्री मुरारजी देसाई यांचें देतां येईल. असो. आपल्याला शिवछत्रपतींच्या राजनीति व रणनीतीच्या नैतिक अधिष्ठानाचा विचार करतांना प्रथम नीति म्हणजे काय व नीति आणि राजनीति यांची मूल्यें उद्दिष्टाच्या व स्वरूपाच्या दृष्टीनें एकच आहेत कीं वेगवेगळी आहेत व तीं कोणतीं हें पाहणें अवश्य आहे.

## नीति म्हणजे काय ?

पुष्कळ नीतिमीमांसकांची अशी धारणा आहे कीं नीति म्हणजे त्या त्या काळचे केवळ व्यावहारिक व सामाजिक जीवनाचे संकेत होत. त्यामुळें नीतीचें स्वरूप कालानुसार बदलणारें व म्हणून चल आहे असें ते प्रतिपादन करीत असतात. पण तें चुकीचें आहे. निदान भारतीय जीवनदृष्टींतून तरी तें चुकीचें आहे. भारतेतर समाजानें जीवन सुखी करावें याचा जरी विचार केला असला तरी मानवीजीवन हें केवळ मरेपर्यंत सुखानें जगण्यासाठींच आहे कीं त्याला आणखी कांहीं विशेष खोल अर्थ आहे याचा भारतीयांनी विचार केलेला आहे. मानवी जीवन सृष्टिकर्त्याच्या विशिष्ट हेतूच्या पूर्तीसाठी निर्माण झालेलें असून त्या हेतूचें स्वरूप 'नराचा नारायण होणें' या शब्दांनीं आपल्या येथें अगदीं सुलभपणें स्पष्ट करण्यांत येतें. हें नराचा नारायण होणें किंवा उपनिषदांच्या शब्दांत ब्रह्मरूप होणें हें या जीवनलाभाचें भारतीयांनीं ध्येय ठरविल्यामुळें भारतीय राष्ट्रजीवनांत तत्त्वज्ञानापासून शास्त्र व कलांपर्यंतचें प्रत्येक क्षेत्र जीवनसापेक्ष व पुरुषार्थमीमांसेशीं संबद्ध आहे. जीवनाच्या या महान् ध्येयालाच मोक्ष अथवा मुक्ति हें नांव असून पशुभावापासून मानवाची संपूर्णपणें सुटका होऊन त्याचें जीवन देवजीवनांत (Divine life) संपूर्णपणें रूपांतरित होणें हें या मोक्षाचें स्वरूप असल्यामुळेंच त्याला परम पुरुषार्थ असें म्हणतात. हा परम पुरुषार्थ अथवा हें देवजीवन प्राप्त करून घ्यावयास्तव जी विशिष्ट प्रकारची जीवनाचीं नियमनें, पथ्यें अथवा आचाराचे इहलोकांतील नियम त्यांना नीति असें म्हणतात. हे नियम काया, वाणी व मन या तिन्ही क्षेत्रांना व्यापणारे असतात. मानवी जीवनाचा उपरि-निर्दिष्ट परमपुरुषार्थरूपी ध्येयवाद ज्या अर्थी दिक्कालातीत व शाश्वत स्वरूपाचा असून त्यांत देशकालपरत्वें परिवर्तन होऊं शकत नाहीं त्या अर्थी या कायिक, वाचिक व मानसिक नियमनांत तरी कशाचें परिवर्तन होणार ? म्हणून नीतीचें स्वरूप परिवर्तन-शील नसून तें या विशिष्ट संकेतांपुरतें शाश्वत आहे. या शाश्वत

नीतीला भागवतपुराणांत सामान्य धर्म म्हणजे सर्व मानवमात्रांच्या वागणुकीचे शाश्वत नियम असें म्हटलेलें असून धर्मसूत्रकारांनीं त्यास आत्मगुण असें नांव दिलेलें आहे.

## शाश्वत नीतीचें स्वरूप

या आत्मगुणांचें वर्णन करतांना गौतमधर्मसूत्रांत म्हटलें आहे, "दया सर्वभूतेषु क्षांतिरनसूया शौचमनयासो मङ्गलमकार्पण्यमस्पृहेति (८-२१)" (स्वतःच्या इतकेंच दुसऱ्याच्या हितासाठीं व सुखासाठीं जपण्याची प्रवृत्ति, सहनशीलता, गुणवान् लोकांचा द्वेष व मत्सर न करण्याची प्रवृत्ति, पदार्थ-मन-वाणी-शरीर शुद्ध व पवित्र राखणें, स्वतःला व्यर्थ संकटांच्या व क्लेशांच्या खोड्यांत न टाकणें, जें समाजांत सभ्याचाराचें म्हणून समजण्यांत येत असेल तसेंच वागणें व जें अशिष्टपणाचें समजण्यांत येत असेल तें कटाक्षानें टाळणें, आपल्यावर आलेल्या मोठ्या कष्टदायक परिस्थितींतहि कोणाहीसमोर स्वतःच्या दैन्याचें प्रदर्शन होऊं न देणें, जें काय मिळेल तें चार लोकांना देऊनच स्वतः घेण्याची स्वाभाविक प्रवृत्ति असणें, विषयोपभोगासंबंधीं असंतुष्ट प्रवृत्ति राहूं न देणें, दुसऱ्याच्या द्रव्याची अभिलाषा न बाळगणें या आठ गोष्टींना आत्मगुण असें म्हणतात.) अलीकडे ज्याला माणुसकी, मानवता, मनुष्यधर्म इत्यादि नांवांनीं संबोधिण्यांत येतें तेच हे विशेष होत हें स्पष्टच आहे.

या आत्मगुणांना उद्देशून गौतमधर्मसूत्रांत म्हटलें आहे—
" यस्यैते चत्वारिंशत्संस्कारा न च अष्टावात्मगुणाः न स ब्रह्मणस्सायुज्यं सालोक्यं च गच्छति ॥ २२ "

"गर्भाधानापासून सप्तसोमसंस्थापर्यंतचे सर्व संस्कार व धार्मिक विधि करणारा पण या आत्मगुणांची स्वतःच्या जीवनाला जोड न करून घेतलेला जो मनुष्य असेल त्याचें जीवन कधींहि सफल होत नाहीं. उलट धार्मिक विधिविधानें केवळ अंशमात्रच करणारा, पण या आठ आत्मगुणांना मात्र जीवनांत उतरविणारा मनुष्य जीवितसाफल्याचा निश्चित अनुभव घेतो."

वसिष्ठधर्मसूत्रांत म्हटलें आहे — "चिमणीच्या पिलांना पंख आले कीं तीं जसें घरटें सोडून जातात, त्याचप्रमाणें वेदवेदांगेंहि सद्‌गुणशून्य मनुष्याला सोडून जातात." सामान्य मनुष्यालाच नव्हे तर राजालाहि हें नियमन आहेच. महाभारत व शुक्रनीतींत या नीतीलाच धर्म असें म्हटलें असून पुढीलप्रमाणें सिद्धान्त सांगितलेला आहे —

अथ साधारणं नीतिशास्त्रं सर्वेषु चोच्यते ।
सुखार्थास्सर्वभूतानां मतास्सर्वाः प्रवृत्तयः ।
सुखं च न विना धर्मात् तस्माद्धर्मपरो भवेत् ।।
—(शुक्रनीति अ. ३–१,२)

"सामान्यनीतीचे नियम सर्वांसाठींच आहेत. सर्वप्राणिमात्र सुखप्राप्तीसाठींच कर्म करीत असतात. पण नीती (धर्म) वांचून सुखप्राप्ति नसल्यामुळें सर्वांनीं नीतीनेंच वागलें पाहिजे."

पण नीतीचें एक स्वरूप जसें शाश्वत आहे तसेंच दुसरें चल अथवा परिस्थित्यनुसार बदलणारेंहि आहे. तें कोणतें ?

## परिवर्तनशील नीतीचें स्वरूप

मनुष्याला जसें व्यक्तिजीवन असतें तसेंच समाजजीवनहि असतें; जसें बौद्धिक व मानसिक जीवन असतें तसेंच भौतिक व व्यावहारिक जीवनहि असतें. या जीवनाचें खाणें, पिणें, बोलणें, बसणें, नमस्कार, मंगलकार्यांच्या पद्धति व त्यांतील मानपानांचे संकेत, वेषभूषा, शिष्टाचार अथवा सभ्याचार इत्यादि अनेकविध कल्पे असतात. या जीवनांतील अनेकविध शिष्टसंमत संकेतांनाहि नीति असेंच म्हणतात, व ती नीति मात्र परिस्थित्यनुसार, शक्त्यनुसार व देशकालानुसार बदलत असते. नीतीचें अशाश्वत स्वरूप हेंच होय, उदाहरणार्थ भारतांतील वेगवेगळ्या प्रांतांतील एकाच हिंदुधर्मीयांच्या व संस्कृतीच्या लोकांचे हे शिष्टसंमत संकेत पूर्णपणें परस्परभिन्न आहेत. दाक्षिणात्यांमध्यें भस्म लावून मंगलकार्यांत जाणें अत्यन्त शुभ समजण्यांत येतें तर महाराष्ट्रांत तें अशुभ समजून

मंगलकार्यांत भ्रूमध्यांत कुंकवाचा टिळा आवश्यक समजण्यांत येईल. गेल्या शंभर वर्षांचा भारतांतील कोणत्याहि प्रांताचा इतिहास पाहिला तरी सामाजिक व व्यावहारिक संकेतांत असें परिवर्तन घडलेलें व घडत असलेलें आढळून येईल. श्रीमन्महाभारतांत व मनुस्मृतींत या संकेतांच्या परिवर्तनशीलतेला उद्देशूनच पुढील-प्रमाणें उद्‌गार काढलेले आहेत —

अन्ये कृतयुगे धर्माः त्रेतायां द्वापरेऽपरे।
अन्ये कलियुगे नृणां युगह्रासानुरूपतः ॥
न हि सर्वहितः कश्चिदाचारः सम्प्रवर्तते।
तेनैवान्यः प्रभवति सोऽपरं बाधते पुनः ॥

" कृतयुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुग या प्रत्येक युगांतील (म्हणजेच विशिष्ट कालखंडांतील) आचार वेगवेगळे असतात. देशकालपरत्वें मनुष्याच्या सामर्थ्यानुरूप आचारांत हें परिवर्तन नित्य घडत असतें. त्यामुळें अमकेच विशिष्ट आचाररूप संकेत सर्वांच्याच कल्याणाचे ठरतील अथवा आहेत असें मानणें चुकीचें आहे. कारण कांहीं विशिष्ट प्रकारच्या आचारांनीं कांहीं लोकांचा उत्कर्ष झालेला दिसून येईल; तर त्या आचारांनीं व कृत्यांनींच दुसऱ्या कित्येक लोकांचा अधःपातहि झालेला दृष्टोत्पत्तीस येईल."

या चल नीतीचें स्वरूप केवढेंहि परिवर्तनशील असलें तरी त्यामुळें अचल अथवा शाश्वत नीतीचें स्वरूप बदलत नाहीं.

राजनीतीचें स्वरूप उपरिनिर्दिष्ट शाश्वत नीतितत्त्वें व परिवर्तनशील शिष्टसंकेत या दोन्हींहून संपूर्णपणें वेगळें आहे. इतकें कीं, शाश्वत नीतीच्या परिसरांत जी गोष्ट पुण्यशील व प्रशंसनीय, तीच राजनीतीच्या क्षेत्रांत मूर्खपणाची, गर्ह्य व क्वचित् पापमयहि ठरू शकेल. कारण शाश्वत नीतितत्त्वांचें उद्दिष्ट वेगळें व राजनीतिशास्त्राचें उद्दिष्ट वेगळें आहे, व त्यांतहि विशेष महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, राजनीतीच्या आधारावाचून शाश्वत नीतिमूल्यें, धर्म, व मोक्षशास्त्र यांनाहि या वैषम्यपूर्ण जगांत जगण्याची व प्रतिष्ठापद

ठावण्याची शक्यता नसल्यामुळें राजनीतिशास्त्राच्या नियमनांना व त्यांतील डोळसपणाला सर्वांहून अधिक महत्व प्राप्त झालें. आमच्या तथाकथित सर्वोदयवाद्यांना व त्यांच्या द्रष्टयांना या गोष्टीची जाणीव नसल्यामुळें अथवा विशिष्ट अहंभावाच्या पोषणासाठीं हेतुतः त्या जाणिवेकडे दुर्लक्ष करावयाचें असल्यामुळें त्यांनीं हें मर्म ध्यानांत न घेतां व शिवछत्रपतींचीं कृत्यें परीक्षावयाचा निकष नीतिशास्त्राचीं मूल्यें हा नसून राजनीतिशास्त्राचीं मूल्यें हा आहे हा विवेक न बाळगतां त्यांना दूषणें द्यावयाचा कीलोत्पाटी प्रयत्न चालविलेला आहे. पण सूर्यावर थुंकण्याच्या प्रयत्नांचें पर्यवसान कशांत होणार हें सांगावयालाच पाहिजे असें नाहीं.

## राजनीतीचें महत्व व स्वरूप

केवळ स्वप्नरंजनांत दंग झालेल्या लोकांची गोष्ट सोडून दिली तर वास्तववादी लोकांना ही गोष्ट सहजच पटेल कीं जग हें वैषम्य-पूर्ण व पशुभावविशिष्ट आहे. या विषमतापूर्ण व पशुभावविशिष्ट जगांत केवळ नैतिक आदर्शांनीं जीवन जगतां येण्याची कधीच शक्यता नसते. म्हणून महर्षि व्यासांनीं म्हटलें आहे, "शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे, शास्त्रचिंता प्रवर्तते" (शस्त्रबळानें पूर्णपणें सुरक्षित असलेल्या राष्ट्रांतच शास्त्रचिंतन व तत्वचिंतन निर्वेधपणानें चालूं शकतें.) केवळ बाह्य आक्रमणापासूनच नव्हे तर स्थिर व अनुशासनबद्ध समाजरचना चालवावयास व तिच्या द्वारें समाजाचा विकास घडवून आणावयास दण्डशक्तीशिवाय दुसरा मार्ग नाहीं. जगाचा इतिहास पाहिला तर असें दिसून येईल कीं, राजसत्तेच्या रूपानें ही दण्डशक्ति कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत प्रत्येक काल-खंडांत समाजधारणेला आवश्यक ठरली आहे. प्राचीन भारतीयांनी दण्डशक्तीचें अथवा राजसत्तेचें हें महत्व ओळखलें होतें. श्रीमन्महा-भारतांत राजधर्माचें महत्व वर्णन करतांना म्हटलें आहे —

मज्जेत् त्रयी दण्डनीतौ हतायां सर्वे धर्माः प्रक्षयेयुर्विवृद्धाः।
सर्वे धर्माश्चाश्रमाणां हताः स्युः क्षात्रे त्यक्ते राजधर्मे पुराणे॥२८

सर्वे त्यागा राजधर्मेषु दृष्टाः सर्वा दीक्षा राजधर्मेषु युक्ताः।
सर्वा विद्या राजधर्मेषु चोक्ताः सर्वे लोका राजधर्मे प्रविष्टाः॥२९

— (शांतिपर्व अ. ६३)

''ज्या वेळीं क्षात्रराजधर्म चैतन्यहीन होतो त्या वेळीं वेदत्रयीचा प्रभाव नाहींसा होतो, विकसित झालेलीं सांस्कृतिक मूल्यें संपूर्णपणें विनाश पावतात, व आश्रमधर्म व समाजव्यवस्था यांच्या आधारशिलांना भयानक धक्का पोहोंचतो. राजधर्मात सर्व प्रकारचे त्याग समाविष्ट झालेले आहेत, सर्व दीक्षा राजधर्मात समाविष्ट आहेत, सर्व प्रकारच्या ज्ञानाचा राजधर्म हाच आधार आहे व समाजाचें स्थैर्य राजधर्मावरच अधिष्ठित आहे.'' दण्डशक्तीचें हें महत्व ज्यांनीं ओळखलें नाहीं त्यांना समाजाचा विकास तर घडवून आणतां आलाच नाहीं पण स्वतःचा व आपल्या राष्ट्राचाहि नाश मात्र त्यांनीं ओढवून घेतला असें जगाचा इतिहास सांगतो. प्रबल दण्डशक्तीवरच कोणतींहि मूल्यें व कोणतीहि व्यवस्था चिरस्थायी होणें अवलंबून असतें. राजर्षि मनूनें त्रिगुणात्मक जगाच्या व्यवहाराचें व त्यांतील तमोगुणावर अधिष्ठित असणाऱ्या प्रवृत्तींचें अत्यंत सूक्ष्म निरीक्षण करून असा सिद्धान्त सांगितला आहे कीं, ––

सर्वो दण्डजितो लोको दुर्लभो हि शुचिर्नरः।
दण्डस्य हि भयात्सर्वं जगद् भोगाय कल्पते॥ २२
देवदानवगन्धर्वाः रक्षांसि पतगोरगाः।
तेऽपि भोगाय कल्पन्ते दण्डेनैव निपीडिताः॥ २३
यत्र श्यामो लोहिताक्षो दण्डश्चरति पापहा।
प्रजास्तत्र न मुह्यन्ति नेता चेत्साधु पश्यति॥ २५

— (मनुस्मृति अ. ७)

'जगामध्यें कोणत्याहि बलाधिष्ठित अनुशासनाचा धाक नसतांना स्वयंप्रेरणेनें विशुद्धपणें वागणारा मनुष्य अत्यंत दुर्लभ आहे. वस्तुतः सर्व लोक दण्डाच्याच सामर्थ्यानें नियंत्रित असतात. मनुष्यच काय पण देव, दानव, गन्धर्व, राक्षस, पक्षी, सर्प इत्यादि जगांतील यच्च यावत् उच्च व नीच योनिविशेष सुद्धां केवळ दण्डाच्या धाकानेंच

आपआपल्या अनुशासनाच्या सीमारेषेंत असतात. ज्या ठिकाणीं श्यामवर्णाचा, आरक्त नेत्राचा व पापाचा विनाश करणारा दण्ड सतत फिरत असतो त्याच ठिकाणीं प्रजांना कर्तव्याकर्तव्याच्या संबंधांत कधीं मोह उत्पन्न होऊं शकत नाहीं. मात्र दण्डनीतीचा प्रेरक असणारा नेता तिचें रहस्य ओळखून योग्य प्रेरणा देणारा असला तरच ती उपयुक्त ठरते.

कामन्दकीय नीतिशास्त्रांत दण्डाचें स्वरूप व महत्त्व याच पद्धतीनें पुढीलप्रमाणें विशद केलेलें आहे --

आन्वीक्षिकी त्रयी वार्ता सतीर्विद्याः प्रचक्षते ।
सत्योऽपि हि न सत्यस्ता दण्डनीतेस्तु विप्लवे ।।
दण्डनीतिर्यदा सम्यङ्नेतारमधितिष्ठति ।
तदा विद्याविदः शेषा विद्याः सम्यगुपासते ।।

"अध्यात्मविद्या अथवा तर्कविद्या, वेदविद्या व अर्थशास्त्र या तीन प्रकारच्या ज्ञानामध्यें सर्व प्रकारच्या विद्यांचा अंतर्भाव होतो. पण जर दण्डनीति सामर्थ्यहीन व विस्कळीत झाली तर या विद्या वस्तुतः असूनहि नसल्यासारख्याच होत. ज्या वेळीं विचक्षण व योग्य अशा नेतृत्वाच्या अधिष्ठानावर दण्डनीति सुव्यवस्थितपणें आपला व्यवहार करते त्याच वेळीं विद्वान् लोक इतर विद्यांची यथायोग्य उपासना करीत असतात."

या दण्डनीतीचें प्रत्यक्ष प्रतीक म्हणजे राज्यसंस्था होय. अराजक व वाईट राज्यसंस्था यांच्यामध्यें वाईट राज्यसंस्थासुद्धां अराजकापेक्षां श्रेष्ठ आहे असा पाश्चात्य व पौरस्त्य राज्यशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. अराजक म्हणजे निर्नियंत्रित अवस्था. अशी स्थिति समाजांत असली तर तो समाज रसातळास जावयास कितीसा वेळ लागणार ? समाज म्हटला कीं, त्याच्या धारणेसाठीं, संरक्षणासाठीं, पोषणासाठीं व विकसनासाठीं राज्यानुशासनाची अत्यंत आवश्यकता आहे. राजर्षि मनूनें म्हटलें आहे --

अराजकेहि लोकेऽस्मिन् सर्वतो विद्रुते भयात् ।
रक्षार्थमस्य सर्वस्य राजानमसृजत्प्रभुः ।।

तस्यार्थे सर्वभूतानां गोप्तारं धर्ममात्मजम् ।
ब्रह्मतेजोमयं दण्डमसृजत् पूर्वमीश्वरः ॥

सर्व जग अराजकाच्या निर्नियंत्रित परिस्थितींत भयकंपित होऊन पळत असतां सर्वांच्या संरक्षणासाठीं परमेश्वरानें राजाला निर्माण केलें व या राजासाठींच सर्व प्राणिमात्रांचें संरक्षण करणारा ब्रह्मतेजोमय धर्मरूपी दण्ड परमेश्वरानें स्वतःपासूनच निर्माण केला.

राज्यसंस्था ही संरक्षण व न्याय यासाठीं निर्माण झालेली असून तिची आवश्यकता व स्वरूप चाणक्यसूत्रांत पुढीलप्रमाणें सांगितलें आहे ––

"सुखस्य मूलं धर्मः । धर्मस्य मूलमर्थः । अर्थस्य मूलं राज्यम् । दण्डनीतिमधितिष्ठन् प्रजा संरक्षति।"

"सर्वांनीं सुखी होण्याचा खरा मार्ग धर्म म्हणजे आपआपल्या कर्तव्याची योग्य ओळख करून घेऊन तदनुसार वर्तन करणें हा आहे. धर्माचें मूळ अर्थ म्हणजे संपत्ति होय. आर्थिक जीवन सुव्यवस्थित असलें तरच मनुष्य समाजकर्तव्यनिष्ठा जीवनांत उतरवूं शकतो. सर्व समाजाची आर्थिक घडी समर्थ व सुयोग्य राज्यसंस्था स्थिरपद झाल्यावांचून नीट बसू शकत नाहीं. राजा अथवा राज्यसंस्था दण्डनीतीचें योग्य अवलंबन करून समाजसंरक्षणाचें आपलें कार्य करीत असते." दण्डनीति म्हणजेच राजनीति होय. तिचें स्वरूप, उद्दिष्ट व महत्व विशद करतांना विख्यात राज्यशास्त्रज्ञ कौटिल्य आपल्या अर्थशास्त्रांत म्हणतो ––

"आन्वीक्षिकी त्रयी वार्तानां योगक्षेमसाधनो दण्डः । तस्य नीतिर्दण्डनीतिः । अलब्धलाभार्था, लब्धपरिरक्षिणी, रक्षितविवर्धिनी, वृद्धस्य तीर्थेषु प्रतिपादिनी च । तस्यामायत्ता लोकयात्रा । तस्माल्लोकयात्रार्थी नित्यमुद्यतदण्डः स्यात् । न हि एवंविधं वशोपायनमस्ति भूतानां यथा दण्डः इत्याचार्याः । नेति कौटिल्यः । तीक्ष्णदण्डो हि भूतानामुद्वेजनीयः । मृदुदण्डः परिभूयते । यथार्हदण्डः पूज्यः । सुविज्ञातप्रणीतो हि दण्डः । प्रजा धर्मार्थकामैर्योजयति । दुष्प्रणीतः

कामक्रोधाभ्यामज्ञानाद्वानप्रस्थपरिव्राजकानपि कोपयन्ति किं पुनर्गृहस्थान्। अप्रणीतो हि मात्स्यन्यायमुद्भावयति। विनयमूलो दण्डः प्राणभृतां योगक्षेमावहः।”

— (कौटिलीय अर्थशास्त्र, चतुर्थाध्याय)

“आन्वीक्षिकी अथवा अध्यात्मविद्या, वेदत्रयी व वार्ता अथवा अर्थशास्त्र यांचा योगक्षेम चालण्याचें जें साधन त्याला दंड असें म्हणतात आणि त्याचे जे नियम त्यांना दण्डनीति असें म्हणतात. या दण्डनीतीपासून अलब्धाचा लाभ होतो, लब्धाचें रक्षण होतें, रक्षिताची वृद्धि होते आणि संचित द्रव्याचा योग्य स्थानीं व योग्य कार्यांत व्यय होतो. लोकव्यवहारहि दण्डनीतिवर अवलंबून आहे. म्हणून लोककल्याणेच्छूनें नेहमीं उद्यतदण्ड असावें. दण्डासारखें समाजाच्या वशीकरणाचें दुसरें प्रभावी साधन नाहीं असें आचार्य म्हणतात. पण कौटिल्याच्या मतें हें चूक आहे. नेहमीं दण्डाशीं गांठ घातल्यास प्राणिमात्र त्रासून जातात. दण्ड सोडून द्यावा तर आपलाच विनाश होतो. यास्तव यथोचित दण्ड करणारा योग्य होय. कारणप्रसंगीं नीट चौकशी करून दंडाचा उपयोग केल्यास प्रजा धर्म, अर्थ व काम या त्रिविध पुरुषार्थसिद्धीनें संपन्न होते. अविवेकानें, अज्ञानानें, कामक्रोधादि मनोविकारांच्या आहारी जाऊन दंडाचा उपयोग केल्यास सर्वसंगपरित्याग करून मनोजय साधलेले वानप्रस्थी व संन्यासी हे देखील क्षुब्ध होतात, मग गृहस्थाश्रमी लोक क्षुब्ध होतील यांत नवल तें काय? दण्ड मुळींच उपयोगांत न आणल्यास मात्स्यन्याय प्रवृत्त होतो म्हणजे प्रबल लोक लहरी-नुसार दुर्बळांचा फडशा पाडतात. पण दण्डानें संरक्षण केल्यास निर्बलसुद्धां प्रबलाप्रमाणें राहूं शकतात.”

राजनीतीची महत्ता व सामान्यनीतीहून तिचें असलेलें वेगळें स्वरूप याची यावरून पूर्ण कल्पना येऊं शकेल. राजनीतीचें ध्येय राष्ट्रसंरक्षण, धर्मसंरक्षण व न्यायसंरक्षण हें आहे. त्यासाठीं सरळ मार्गाचा अवलंब करून यश व विजय प्राप्त होणें अशक्य ठरल्यास यश व जय प्राप्त करून देणाऱ्या कोणत्याहि वाममार्गाचा अवलंब

करणें हें धर्म्य कर्तव्य ठरतें. उद्दिष्टावरून पाप-पुण्य, धर्म-अधर्म व सुकृत-दुष्कृतांच्या व्याख्या राजनीतीच्या क्षेत्रांत ठरत असतात. विजय, यश व स्वत्वाच्या कक्षेंत येणाऱ्या सर्व गोष्टींचें संरक्षण हें राजनीतीचें ध्येय आहे. राजनीतीनें या ध्येयासाठीं आवश्यक त्या मार्गाचा अवलंब करणें म्हणजेच तिचें स्वधर्मपालन होय. सामान्य धर्माच्या मागें लागून राजनीति हें आपलें धर्मपालन सोडून देईल तर ती साऱ्या राष्ट्राला व सामान्य धर्मांनाहि प्राणसंकटांत टाकील ही वस्तुस्थिति आहे. राजाला राजनीतीच्या या स्वरूपाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. शुक्रनीतींत म्हटलें आहे---

अनीतिरेव सच्छिद्रं राज्ञो नित्यं भयावहम् ।
शत्रुसंवर्धनं प्रोक्तं बलऱ्हासकरं महत् ॥ —(शुक्रनीति अ. १, १५)

" छिद्रें पडलेल्या भांड्याप्रमाणें राजाला नीतिविरहित असणें संकटाचें असून त्यायोगें शत्रूचें सामर्थ्य वाढतें व आपली शक्ति व कार्यक्षमता यांचा ऱ्हास होत असतो."

राजनीतीच्या क्षेत्रांत कोणताहि एक आचार प्रमाण नसतो. देश, काल, परिस्थितीप्रमाणें या आचारांचें स्वरूपच नव्हे तर पापमयता व पुण्यशीलताहि परिवर्तनशील ठरते.

## राजनीति व सामान्यनीति

राजनीति म्हणजे राष्ट्राच्या राज्ययंत्रानें आपल्या प्रजेशीं, अन्य राष्ट्रांशीं, मित्रांशीं व शत्रूशीं वागावयाची पद्धति अथवा नियम होत. त्यांचें स्वरूप देशकालपरिस्थित्यनुसार बदलणारें. शुक्रनीतीत (अ. ५) म्हटलें आहे---

" सर्व पाप धर्मरूपं स्थितमाश्रयभेदत: ॥३५

"परिस्थितींत परिवर्तन झाल्यानें पापकृत्य हें सत्कर्म समजण्यांत येतें."

अस्ति बुद्धिमतां श्रेणिर्न त्वेको बुद्धिमानन ॥६६
देशे काले च पुरुषे नीतिं युक्तिमनेकधा।
कल्पयन्ति च तद्विद्यां दृष्ट्वा रुद्धां तु प्राक्तनाम् ॥६७
— (शुक्रनीति अ. ५)

" बुद्धिशाली पुरुष एकएकटे असूं नयेत; तर राजकारण सफल करण्यासाठीं त्यांचे गट असावेत. कारण कोणीहि राजकीय क्षेत्रांतील नेत्यानें आपल्याला सर्वकाळीं व सर्व परिस्थितींत एकट्यालाच सर्व विषयांत सर्व कांहीं समजतें असा वृथा अहंकार धारण करूं नये. स्थळ, काळ व परिस्थिति यांना अनुसरून एखादें जुनें राजनीतीचें तत्त्व निरुपयोगी व अर्थशून्य आहे असें ठरल्यास नीतिशास्त्रपारंगत पुरुष युक्ति आणि धोरण यांचा आश्रय करून नवीन राजनैतिक सिद्धान्त शोधून काढून तदनुसार वागतात."

म्हणून सामान्य नीतीचे सिद्धान्त राजनीतीला लागू करणें व सामान्य नीतीच्या दृष्टींतून तिला दूषणें लावीत बसणें केवळ मूर्खपणाचेंच नव्हे तर पापमयहि ठरतें.

येथें सामान्य नीति व राजनीति यांच्या स्वरूपांतील भेद स्पष्ट करण्यासाठीं प्रत्यक्ष कांहीं उदाहरणेंच देतों. सामान्य नीतीप्रमाणें शरणागताला अभयप्रदान करणें व दीनांवर दया दाखविणें हा सर्वांत मोठा धर्म आहे. आपस्तंभ गृह्यसूत्रांतील मागें उद्धृत केलेल्या आत्मगुणांच्या यादींत दयेचें नांव पहिलें असून 'दया धर्मका मूल है' असें एका हिंदी कवीनेंही म्हटलें आहे. पण हें तत्त्व राजनीतिशास्त्रांत वापरावें काय? शत्रू शरण आल्यास व त्यानें दीनपणानें दयेची भीक मागितल्यास काय करावें? महाभारतांतील राजनीति प्रकरणांत म्हटलें आहे —

वधमेव प्रशंसन्ति शत्रूणामपकारिणाम् ।
सुविदीर्णं सुविक्रान्तं सुयुद्धं सुपलायितम् ॥१०
आपद्यापदिकाले च कुर्वीत न विचारयेत् ।
नावज्ञेयो रिपुस्तात दुर्बलोऽपि कथंचन ॥११
दया न तस्मिन् कर्तव्या शरणागत इत्युत ।
निरुद्विग्नो हि भवति न हताज्जायते भयम् ॥१४
ततः प्रत्यागते काले भिन्द्याद् घटमिवाश्मनि ।
अमित्रो न विमोक्तव्यः कृपणं बह्वपि ब्रुवन् ॥२०

"शत्रू उन्मत्त असो, खूप पराक्रमी असो, युद्धांत कुशल असो, वेळेचें महत्त्व जाणून व त्याच्या आपत्तींत त्याला हार खायला लावून त्याचा वध करण्याच्या नीतीलाच राजनीतिज्ञ लोक प्रशंसनीय समजतात. शत्रु दुर्बल असला तरी त्याची कधीं अवज्ञा करूं नये. शत्रूच्या प्रत्येक विपत्तीचा लाभ घ्यावा. शत्रु शरण आला तरी त्याच्यावर कधींहि दया दाखवूं नये. त्याला ठार मारलें तरच खरी स्वस्थता लाभते. कारण तो मेल्यावर त्याच्या भयाचा प्रश्नच मिटतो. शत्रूच्या विनाशाच्या दृष्टीनें अनुकूल काळ आला कीं घडा ज्याप्रमाणें दगडावर आपटून फोडून टाकतात त्याप्रमाणें आपल्या शत्रूला नष्ट करावें. शत्रू कितीहि प्रार्थना करीत असला तरी त्याला कधींहि सोडूं नये. त्याच्यावर कधींहि दया दाखवूं नये. त्याला ठारच करावें." —(महाभारत, आदिपर्व अ. १४०)

सामान्य नीतीप्रमाणें बंधु, पिता, सुहृद् इत्यादि सहजमित्र असून त्यांना सर्वतोपरि साह्य केलें पाहिजे. पण राजनीतिशास्त्राचें विवेचन करतांना श्रीमन्महाभारतांत व शुक्रनीतींत म्हटलें आहे—

पुत्रः सखा वा भ्राता वा पिता वा यदि वा गुरुः।
रिपुस्थानेषु वर्तन्तो हन्तव्या भूतिमिच्छता ॥ ५२
—(महाभारत, आदिपर्व, अ. १४०)

सुदुर्वृत्तास्तु दायादा हन्तव्यास्ते प्रयत्नतः।
व्याघ्रादिभिः शत्रुभिर्वा छलै राष्ट्रविवृद्धये ॥२८
—(शुक्रनीति, अ. २)

"शत्रूच्या नात्यांत अन्य नात्यागोत्यांचा विचारच करावयाचा नसतो. पुत्र, मित्र, बंधु, पिता अथवा गुरु कोणीही असो, एकदां तो आपला शत्रु आहे असें ठरविलें कीं, ज्याला स्वतःचें कल्याण व्हावें अशी इच्छा आहे त्यानें त्यांना ठार मारल्याविना कधींहि राहूं नये."

"राजाचे नातलग जर दुष्ट स्वभावाचे असतील, तर व्याघ्रादि हिंस्र पशु अथवा शत्रु यांचेकडून किंवा कपटानें त्यांचा नाश राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं करवावा."

शरणागताला अभयदान करण्याच्या सामान्य नीतितत्त्वाचा अवलंब करून उपर्युक्त राजनीतितत्त्वाचें उल्लंघन करण्याच्या अदूरदर्शीपणामुळें पृथ्वीराजाला महंमद घोरीच्या हातून स्वतःचा विनाश तर अनुभवावा लागलाच, पण पर्यायानें राष्ट्रहत्त्येचें पातक त्याच्या हातून घडलें. सुहृद व नातलगांचा सन्मान राखण्याच्या सामान्य नीतितत्त्वाचा मनावरील पगडा दूर न करतां आल्यामुळेंच युधिष्ठिराचा सर्वनाश झालेला आहे. धृतराष्ट्राच्या निमंत्रणाचा स्वीकार करून कौरवांच्या राजसभेंत गेल्यास द्यूताला बळी पडावें लागेल असें राजनीतिधुरंधर विदुरानें स्पष्ट सांगितलें असतांहि चुलत्याच्या आज्ञेचा भंग न करण्याच्या सामान्य नीतितत्त्वाला युधिष्ठिर बळी पडले व त्यांचा सर्वनाश झाला. ऐन समरांगणांत युधिष्ठिराप्रमाणें अर्जुनाच्या मनांतहि नातलगांविषयींच्या धर्म-कार्पण्याचा उद्‌भव झाला, तेव्हां तो संपूर्ण नष्ट करण्याच्या प्रधान हेतूनेंच भगवान् श्रीकृष्णांनीं श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा उपदेश केला.

सामान्य नीतितत्त्वाप्रमाणें सत्यधर्माचें महत्त्व अपरंपार असून धर्मशास्त्रकारांनीं 'न हि सत्यात् परो धर्मः' (सत्यापरता नाहीं धर्म) अशी त्याची महती गायिली आहे. भारतीय साहित्यांत सत्याचीं अनेक स्तुतिस्तोत्रें असून अश्वमेध यज्ञापेक्षांहि सत्याचरणाचें महत्त्व अधिक ठरविलें आहे. पण राजनीतिशास्त्राच्या दृष्टीनें "जें लोककल्याणकारक तेंच सत्य" असें ठरवून कित्येक महत्त्वाच्या प्रसंगीं असत्य हेंच शिरोधार्य व सत्य हें गर्ह्य ठरविलें आहे. बार्हस्पत्य अर्थशास्त्राच्या पहिल्या अध्यायांतील ८६ व्या सूत्रांत म्हटलें आहे, "धर्मगुप्तिः, गृहयात्रागुप्तिः, कार्यगुप्तिः, वैरगुप्तिः यशोभंगे, सत्यमपि नेति वदेत् ॥" "राजानें धर्माविषयीं, गृहांत राहण्याविषयीं अथवा राजधानी सोडून करावयाच्या स्वतःच्या प्रवासाविषयीं, कोणतेंहि विशिष्ट महत्त्वाचें कार्य पार पाडावयाचें असेल त्यासंबंधीं, व आपल्या शत्रुविषयक धोरणासंबंधांत पूर्णपणें गुप्तता राखावी. सत्य बोलल्यानें आपल्या इभ्रतीला कमीपणा येत असल्यास असत्य भाषण अवश्य करावें.

अनुक्रमांक ... वे. राजनीतिवि: ....पारन..... ११
क्रमांक ....८७..... नों. दि: २८|३|५०

बृहस्पतीच्या राजनीतिशास्त्रांत म्हटले आहे, 'सत्यमपि दुःखानर्थसाधनमपि न वदेत्।' सत्य भाषण करण्यामुळें जर दुःख व दुर्दैव ओढवत असेल तर राजकारणांत सत्य बोलूं नये.

सामान्य नीतीप्रमाणें ढोंगीपणा व पाखंड यांचा आश्रय करून साधण्यांत येणारा स्वार्थ अत्यंत पापमय समजण्यांत येतो. पण राजनीतिशास्त्रांत अशा ढोंगीपणाशिवाय शत्रूला जिंकणें दुरापास्त असल्यामुळें तें एक कर्तव्य मानण्यांत आले आहे. महाभारतांत म्हटलें आहे—

अंधः स्यादंधवेलायां बाधिर्यमपि चाश्रयेत्। १२
कुर्यात्तृणमयं चापं शयीत मृगशायिकाम्।
सांत्वादिभिरुपायैस्तु हन्यात् शत्रुं वशे स्थितम्।। १३
अग्न्याधानेन यज्ञेन काषायेण जटाजिनैः।
लोकान्विश्वासयित्वैव ततो लुम्पेत् यथा वृकः।। १९
वाचा भृशं विनीतः स्यात् हृदयेन यथा क्षुरः।
स्मितपूर्वाभिभाषी स्यात् सृष्टो रौद्रेण कर्मणा।। ६६
अंजलिः शपथः सांत्वं शिरसा पादवंदनम्।
आशाकरणमित्येवं कर्तव्यं भूतिमिच्छता।। ६७
नाच्छित्वा परमर्माणि नाकृत्वा कर्म दारुणम्।
नाहत्वा मत्स्यघातीव प्राप्नोति महतीं श्रियम्।। ६८

—(महाभारत, आदिपर्व, अ. १४०)

"वेळेनुसार कधीं अंध व्हावें तर कधीं बधिर व्हावें. आपल्यासमोर गोष्टी घडत असतांहि त्या आपल्याला मुळींच कळत नाहींत असें दाखवावें. कधीं तृणाचें चाप करावें व व्याध ज्याप्रमाणें मृगांच्या अंतःकरणांत विश्वास उत्पन्न करतो त्याप्रमाणें ढोंगीपणानें लीनता दाखवून सांत्वन, नम्रता इत्यादि उपायांनीं शत्रूला विश्वास उत्पन्न करावा, व संधि पाहून ठार मारावें. याला गवतांत झाकलेलें धनुष्य म्हणतात. कारण वरून दिसायला तें जरी गवत वाटलें तरी आंत असतें प्राणहारक धनुष्य. अग्निपूजेचें व्रत धारण करून, यज्ञयागादि कर्मांचें ढोंग उभारून, काषायवस्त्रें परिधान करून, जटा

व हरिणाजिनांचा अवलंब करून लोकांच्या अंतःकरणांत विश्वास उत्पन्न करावा; नंतर लांडग्याप्रमाणें त्यांचें सर्वस्व लुबाडावें. वाणीनें अत्यंत विनीत असावें; पण हृदय वस्तऱ्याच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण असावें. अंतःकरणांत केवढेंहि क्रूर कृत्य करावयाची इच्छा असली तरीहि बोलतांना मात्र नेहमीं स्मितपूर्वकच बोलावें. हात जोडणें, वचनें देणें, सांत्वना दाखविणें, पायावर डोकें ठेवणें, वाटेल तशीं आश्वासनें देऊन आशा उत्पन्न करणें यांपैकीं कोणत्याहि गोष्टीचा वेळ पडेल त्याप्रमाणें अवश्य उपयोग करावा. ज्याला आपलें कल्याण साधावयाचें आहे त्यानें या सर्व गोष्टींचा अवलंब करावयास हृदय कचरूं देऊं नये. दुसऱ्याच्या मर्मावर आघात केल्यावांचून, अत्यंत दारुण कर्म केल्यावांचून व बगळ्याप्रमाणें ढोंग करून आघात केल्यावांचून जगांत कोणालाहि मोठें ऐश्वर्य प्राप्त झालेलें नाहीं.”

अपत्यप्रेम ही गोष्ट अत्यंत स्वाभाविक असून प्रत्यक्ष वेदांतहि या सामान्य नीतिसूत्राचा आविष्कार करतांना ‘आत्मा वै पुत्रः’ असें म्हटलें आहे. पत्नीला जें जाया म्हणतात त्याचें कारण आपण स्वतः तिच्या ठिकाणीं उत्पन्न होतों हेंच आहे. पण राजनीतिशास्त्रांत या भावनेला फारसें महत्व नसून उलट बार्हस्पत्य अर्थशास्त्रांत असें म्हटलें आहे कीं, ‘नीतिवियुक्तः पुत्रोऽपि शत्रुः।’ राजकीय धोरणाच्या विरुद्ध असलेला स्वतःचा पुत्रहि शत्रूच समजावा.

छत्रपति शिवाजी महाराज यांचीं कृत्यें हीं राजकीय स्वरूपाचीं आहेत व म्हणून सामान्य नीतितत्त्वांच्या निकषावर त्यांचें मूल्यमापन न करतां तें मूल्यमापन राजनीतिशास्त्राच्या सिद्धांताच्या निकषावरच केलें पाहिजे. छत्रपति शिवाजी हे राजे होते व त्यांच्या राष्ट्राचें स्वातंत्र्य त्यांच्या शत्रूंनीं नष्ट केलेलें होतें. शिवाजी महाराजांच्या भोंवतीं सर्व बलवान् शत्रु उभे होते व आपल्या सर्व शत्रूंच्या बलाच्या तुलनेंत ते एकटेच अत्यंत दुर्बल होते. ज्या वेळीं आपण स्वतः अत्यंत बलिष्ठ असतों त्या वेळीं उपर्युक्त राजनीतिशास्त्राच्या प्रमेयांना आचरणांत अग्रस्थान देण्याचें प्रयोजन नसतें.

१०३१६

पण ज्या वेळीं आपणच अत्यंत दुर्बल असतों व शत्रु मात्र अत्यंत प्रबल असतो आणि अधार्मिक, क्रूर व सर्वभक्षकहि असतो त्या वेळीं उपर्युक्त कूटनीतीचा आश्रय आवश्यक ठरतो. रामचंद्र व भीष्म हे स्वतःच इतके अलौकिक सामर्थ्यसंपन्न होते कीं, प्रत्यक्ष संघर्षांतहि त्यांना कूटनीतीच्या आश्रयाची आवश्यकता नव्हती. पण विशिष्ट परिस्थितींत रामचंद्रांनाहि कूटनीतीचा आश्रय करावा लागलेला आहे. याचें उत्तम उदाहरण वालिवधाचें देतां येईल. जेथें सर्व सामर्थ्य अनुकूल असलेल्या श्रीरामचंद्रासारख्या महान् प्रतापी पुरुषालाहि राजनीतीच्या तत्त्वांचें अवलंबन केल्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं तेथें श्रीकृष्ण व शिवाजीमहाराज यांच्यासारख्या संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीशीं संघर्ष उभारणाऱ्या पुरुषांना राजनीतीच्या या विशिष्ट अंगाचा अंगीकार केल्याविना काय गत्यंतर असणार? अंतिम विजयावर लक्ष केंद्रित करून रामचंद्रांना वालीच्या वधाकडे जसें प्रवृत्त व्हावें लागलें तसें शिवाजीमहाराजांनाहि प्रवृत्त व्हावें लागलें आहे. ते कांहीं रक्तपिपासु व स्वभावाचे कपटी नव्हते. त्यांचें वैयक्तिक जीवन सामान्य नीतीच्या निकषावर परीक्षिलें तर तें रामचंद्राप्रमाणेंच उज्ज्वल आहे. पण राजनैतिक जीवन राजनीतीच्या सिद्धांतानुसार त्यांनी घालविलें व म्हणूनच ते विजयी ठरले.

कूट युद्धपद्धति हा राजनीतीचाच एक भाग आहे. विजयाचे दैव, आसुर व लोभ, आणि युद्धाचे धर्म व कूट असे राजनीतिशास्त्रानें भेद केलेले आहेत. दैवविजय म्हणजे केवळ पराक्रमानें सामान्य नीतितत्त्वांचा अवलंब करून व केवळ पराक्रमाच्या प्रख्यापनाशिवाय अन्य कोणताहि हेतु न धरतां शत्रूवर मिळविलेला विजय होय, आसुरविजय म्हणजे विजयावर अंतिम लक्ष ठेवून कूट पद्धतीच्या आश्रयानें मिळविलेला विजय होय; व लोभविजय म्हणजे शत्रूवर विजय मिळविल्यावर शत्रु-राष्ट्राला धनाच्या लोभानें पिळून काढण्याच्या पद्धतीचा अवलंब होय. धर्मयुद्धाचा अर्थ आव्हान देऊन पूर्ण सावध करून शत्रूजवळ असलेल्या शस्त्रास्त्रांचाच वापर करून शत्रुचा पराभव करणें होय.

व कूट युद्ध म्हणजे कपट युद्ध होय. कूट युद्धपद्धतीचा शिवछत्रपतींनी आश्रय केल्याचा मागच्या परिच्छेदांत सप्रमाण निर्देश केलेलाच आहे. धर्मयुद्धपद्धति व कूट युद्धपद्धति यांपैकीं कोणत्या पद्धतीचा आश्रय करावा याचा निर्णय करतांना श्रीमन्महाभारतांत म्हटलें आहे––

स चेन्निकृत्या युध्येत निकृत्यैव पराजयेत् ।
अथ चेद्धर्मतो युध्येत् धर्मेणैव पराजयेत् ॥

शत्रु जर कपटानें युद्ध करीत असेल तर आपणहि कपटयुद्ध-पद्धतीचाच अंगीकार करून त्याचा पराभव करावा. व तो जर कटाक्षानें धर्मयुद्धपद्धतीचाच अवलंब करीत असेल तर आपणहि धर्मयुद्धपद्धतीनेंच त्याच्याशीं लढावें." कवि भारवीनें या मताचा अनुवाद करतांना आपल्या किरातार्जुनीय काव्यांत म्हटलें आहे, "व्रजन्ति ते मूढधियः पराभवं भवन्ति मायाविषु येन मायिनः" "कपटी शत्रूंशीं जशास तसें या न्यायानें जे कपटानें वागत नाहींत ते राजकरणाच्या क्षेत्रांत मूर्ख ठरून त्यांचा पराभव होतो." कूट युद्धपद्धतीचे प्रसिद्ध राजनीतिशास्त्रप्रणेते शुक्राचार्य यांनीं पुढील-प्रमाणें वर्णन केलेलें आहे.

उपायान् षड्गुण मंत्रं शत्रोः स्वस्यापि चिंतयेत् ।
धर्मयुद्धैः कूटयुद्धैर्हन्यादेव रिपुं सदा ॥३५३
न युद्धं कूटसदृशं नाशनं बलवद्रिपोः ॥३६२
प्रफुल्लवदनेनैव तथा कोमलया गिरा ।
अंगीकृतापराधेन सेवादाननतिस्तपैः ॥३६५
जलान्नतृणसंरोधैः शत्रून् संपीड्य यत्नतः ।
पुरस्ताद्विषमे देशे पश्चाद्धन्यात्तु वेगवान् ॥३७०
कूटस्वर्णमहादानैर्भेदयित्वा द्विषद्बलम् ।
नित्यविस्रंभसंसुप्तं प्रजागरकृतश्रमम् ॥३७१
विलोभ्यापि परानीकमप्रमत्तो विनाशयेत् ॥३७२
क्षणं युद्धाय सज्जेत क्षणं चापसरेत् पुनः ।
अकस्मान्निपतेत् दूरात् दस्युवत् परितस्सदा ॥३७४

" सहा गुण, चतुर्विध मंत्र आणि शत्रूचीं व स्वत:चीं गुह्यें यांचे-विषयीं राजानें चिंतन करावें. युद्धांत शत्रूचा पराभव धर्मयुद्धाच्या अथवा कूटयुद्धाच्या पद्धतीनें करावा. मार्गाचा प्रश्न नाहीं. शत्रूचा कोणत्याहि साधनानें विनाश हेंच खरें ईप्सित. शत्रूचा निश्चितपणें नाश करण्यास कूटयुद्धासारखें दुसरें साधन नाहीं. हास्यवदन, मृदु भाषा, स्वत:च्या अपराधांची वारंवार उजळणी, सेवा, देणग्या, नम्रता, स्तुति, आणि शपथा इत्यादि उपायांनीं शत्रूच्या मनांत स्वत:विषयीं विश्वास उत्पन्न करावा. प्रबळ राजानें आपल्या शत्रूंस पाणी, दाणागोटा, घांस, कडबा मिळण्याचें बंद करून, त्याला अड-चणीचे प्रदेशांत घालावें आणि नंतर त्याचा नाश करावा. खोटें सोनें, त्याचप्रमाणें देणग्या शत्रुसैन्यांतील लोकांस देऊन त्यांचा विश्वास संपादून श्रमामुळें शत्रुसैन्यांतील शिपाई निद्रावश झाल्यावर त्यांचा नाश करावा. युद्ध एकाएकीं प्रारंभ करावें. शत्रूवर दरवडे-खोराप्रमाणें एकदम आक्रमण करावें व तत्काल अदृश्य व्हावें."

कूटयुद्ध धर्म्य व अंगीकार्य केव्हां ठरतें व केव्हां नाहीं याचा विख्यात राज्यशास्त्रज्ञ कौटिल्य यानें अत्यंत सूक्ष्म विचार केलेला असून कूटयुद्धासंबंधांतसुद्धां मानवतेची हत्या घडूं नये असा विचार भारतीय राजनीतिशास्त्रज्ञ कसा करीत याची त्यावरून कल्पना येते.

## कौटिल्याचें मत

अर्थशास्त्रांत कौटिल्य म्हणतो — "न त्वेव विद्यमाने पराक्रमे अग्निमवसृजेत् । अप्रतिसंख्यातप्राणिधान्यपशुहिरण्यकुप्यक्षयकर: । चातुर्वर्ण्यरक्षार्थं औपनिषदिकम् अधर्मेषु प्रयुञ्जीत ॥"

" जर अंगीं पुरेसें प्रतिकाराचें सामर्थ्य असेल तर अग्निप्रयोग, विषप्रयोग इत्यादि कूट अथवा अधर्मयुद्धपद्धतीच्या प्रयोगांचा अवलंब करूं नये. कारण त्यामुळें अमर्याद प्राणिनाश व संपत्तिनाश होतो. ज्या वेळीं चातुर्वर्ण्यात्मक रचनेचें हें सारें राष्ट्रच स्वत: अधार्मिक आसुरी पद्धतीनें आक्रमण करणाऱ्या लोकांच्या भक्ष्यस्थानीं पडण्याचा प्रसंग येतो त्याच वेळीं या मार्गाचा अवलंब करावा."

राज्यसुद्धां नव्हें तर एक संपूर्ण संस्कृति व राष्ट्र नष्ट होण्याचा प्रसंग जेव्हां येतो तेव्हांच कूट युद्धपद्धतीचा अंगीकार करावा असें कौटिल्याचें मत आहे. पाश्चात्य नीतिविशारदांना हा विवेकही नसून मॅकिव्हॅलीपासून मार्क्स-लेनिन पर्यंतचे सर्व राजनीतिशास्त्रज्ञ राजकीय स्वार्थासाठीं अनिर्बंध रीतीनें या गोष्टीचा पुरस्कार करतात हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भारतीय आर्य व भारतीयेतर आसुरी संस्कृतींतील हाच महत्वाचा भेद आहे.

कौटिल्य म्हणतो तीच परिस्थिति शिवाजी महाराजांसमोर होती. एका सबंध राष्ट्राच्या व संस्कृतीच्या सर्वांगीण विध्वंसाचा प्रश्न होता. आम्ही त्याचें स्वरूप प्रस्तुत ग्रंथाच्या पूर्वार्धांत स्पष्ट केलें असल्यामुळें येथें त्याचा विस्तार करीत नाहीं. या विध्वंसापासून राष्ट्रजीवन विमुक्त करण्यासाठींच शिवछत्रपतींनीं कूटनीति व कूट युद्धपद्धतीचा अंगीकार केलेला असल्यामुळें त्यांचे मार्ग धर्म्य व पुण्यशील ठरतात. आक्षेपकांनीं या निकषांवर त्यांच्या राजनीतीकडे व युद्धपद्धतीकडे पाहिलें तर त्यांनीं उलट या नीतीला व पद्धतीला कांहीं विशिष्ट दैवी जीवनप्रेरणांचें अधिष्ठान प्राप्त करून दिलें आहे असें आढळून येईल. कसें तें पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✦ ✦

प्रकरण सहावें

# शिवाजी महाराजांची नीतिमत्ता

कूट युद्धपद्धतीचा अथवा वृकयुद्धपद्धतीचा श्रीशिवछत्रपतींनीं जो अंगीकार केला तो प्रतिक्रिया म्हणून केलेला आहे. त्यांना ज्या शत्रूंशी लढावयाचें होतें ते सर्व कूटनीतीचे व कूटयुद्ध पद्धतीचेच पुरस्कर्ते होते. त्या वेळीं भारतांत धर्मयुद्धपद्धतीचा संपूर्णपणें लोप झालेला होता. शिवाजी महाराजांच्या शत्रूंनीं भारत जें पादाक्रांत

केलें तें वंचना व कूट पद्धतीचा पुरस्कार करूनच केलें. महंमद घोरीनें पृथ्वीराजाचा वध करून दिल्लीच्या सिंहासनाचा अपहार करण्याच्या क्षणापासून या विशिष्ट नीतीचें व युद्धपद्धतीचें भारतांत जें थैमान सुरू झालें तें औरंगजेबाच्या वेळीं ऐन भरांत होतें. औरंगजेबानें ज्या पद्धतीनें भावांची हत्या केली व पित्याला बंदींत टाकून दिल्लीचें सिंहासन मिळविलें तिला धर्मयुद्ध व धर्मनीति असें म्हणतां येईल काय? शिवछत्रपति ज्या परिसरांत होते त्या बहामनी सत्तांच्या व्यवहारांतहि याशिवाय दुसऱ्या कोणत्याच पद्धतीचा अवलंब करण्यांत आलेला नव्हता. प्रसिद्ध साक्षेपी इतिहास-संशोधक कै. दत्तोपंत आपटे हे शिवभारताच्या प्रस्तावनेंत लिहितात--

" मोंगली सैन्य निझामशाही राज्यांत जाळपोळ करीत असतां मलिकंबरानें तात्पुरती पड खावी आणि मोंगली सैन्य परतून गेलें म्हणजे मलिकानें आपला मुलूख परत घेऊन व मोंगली मुलुखांत लुटालूट करून आपलें नुकसान सव्याज भरुन घ्यावें असा प्रकार वारंवार होत असे. त्यामुळें निझामशाही राज्यांत लढण्याची एक विशिष्ट पद्धति लोकांच्या अंगवळणीं पडली. शत्रूचा जोर दिसला म्हणजे नमतें घ्यावें, आणि ती लाट निघून गेली म्हणजे पुन्हां डोकें वर काढावें हें त्या युद्धपद्धतीचें मुख्य सूत्र होतें. समुद्राला रोज भरती ओहोटी येते; पण समुद्रकांठच्या लोकांना या परिस्थितीशीं तोंड देऊन आपली पगडी कशी सलामत राखावी याचें शास्त्र पूर्णपणें परिचित असतें. तोच प्रकार निझामशाहींतील मुत्सद्द्यांचा व योद्ध्यांचा होता. मोंगली सैन्य निझामशाही सैन्याच्या मानानें समुद्राप्रमाणें अफाट असे. पण त्या अफाट सैन्यसागराशीं कसें वागलें असतां आपला बचाव होईल व आपली लहान राज्यनौका या सागरावर आरूढ होऊन पैलतीर कसें गांठील हें ओळखणारे प्रत्युत्पन्नमति सरदार निझामशाहींत बरेच होते. त्या काळीं कोणत्याहि राज्यांतला बादशहा मरण पावला म्हणजे सर्व राज्य गडबडून जाई. पण निझामशाहींत बादशहा म्हणजे कर्त्या माणसांच्या

हातांतलें बाहुलें असे, तें कोणीहि हातीं घेऊन सत्ताधारी बनावें असें वळण चांदबिबीनें प्रथम घालून दिलें होतें. तेंच मलिकंबरानें पुढें चालविलें; त्याचा मुलगा फत्तेखान यानेंहि बापाचाच कित्ता उचलला आणि शेवटीं शहाजीनें या सर्वांवर कडी करून दाखविण्याची हिंमत धरली होती. सारांश शत्रूंशीं लढतांना गनिमी काव्याची विशिष्ट पद्धति ज्याप्रमाणें निझामशाहींत उत्क्रान्त झाली त्याचप्रमाणें राजकीय महत्वाकांक्षा बाळगणाऱ्यांनीं बादशाही बाहुलें पुढें करून सर्व सत्ता आक्रमण्याची एक विशिष्ट पद्धति निझामशाहींत अस्तित्वांत आली." —(शिवभारत प्रस्तावना पृ. ६७)

केवळ शत्रूच्या संबंधांतच नव्हे तर राज्यलोभासाठीं स्वतःच्या बांधवांच्या संबंधांतहि पशुत्व, क्रौर्य व कूटनीति यांचा आविष्कार मोंगलाप्रमाणेंच या बहामनी शाह्यांमधूनहि चालू असे. प्रत्यक्ष शिवछत्रपतींच्या काळांतच विजापूरच्या परिसरांत जे प्रकार चालू होते त्यांचीं एक एक उदाहरणें पाहण्यासारखीं आहेत. इब्राहिम आदिलशहानंतर त्याचा धाकटा मुलगा सुलतान महंमदशहा हा विजापूरच्या गादीवर बसला. तो ज्या पद्धतीनें गादीवर बसला तिचें वर्णन बुसातिने सलातिन नांवाच्या विजापूरच्या इतिहासांत पुढीलप्रमाणें केलें आहे —

" इब्राहिमाचें प्राणोत्क्रमण झालें तेव्हां मिरजा महंमद अमीन आणि दौलतखान हे दोघे जवळ होते. त्यांनीं ती बातमी गुप्त ठेवून दरवाजे बंद केले आणि लोकांना येण्याजाण्यास फक्त दिंडीची वाट ठेवली. नंतर एकलासखान, दियान तुल्मुल्क व कांहीं ब्राह्मण मुत्सद्दी यांना एकएकांना बोलावून आणून दिवाणखान्यांत बसविलें; आणि मुख्य मुत्सद्दी मंडळी जमा झाल्यावर खोजानें तेथें येऊन असें जाहीर केलें कीं " इब्राहिम पातशहांनीं असा हुकूम केला आहे कीं आमच्या मागें सुलतान महंमद यास तक्तावर बसवावें." हें ऐकून दियान तुल्मुल्क म्हणाला " थोरला मुलगा दुरवेष हा हयात असतां,

धाकटयास तक्तावर कसें बसवितां येईल? डोकीचें पागोटें गुडघ्यास कसें घालावें? हे शब्द ऐकून दौलतखानानें चार शिव्या हांसडल्या आणि चिडून 'तुला कोणी विचारलें आहे; तूं गप्प बैस' असें म्हणून दियानतास दबकावलें. नंतर मुख्य वजीर एकलासखान याजकडे वळून 'पुढें काय करावें?' असा दौलतखानानें प्रश्न टाकला. तेव्हां तो वजीर उडवाउडवी करून म्हणाला "मला यापुढें वजिराचें काम करावयाचें नाहीं. तेव्हां मला दोघेही शहाजादे सारखेच आहेत. बडे साहेबिणीस विचारून काय तें करणें बरें, असें मला वाटतें." त्याबरोबर दौलतखान रागारागानें बडे साहेबिणीच्या महालांत गेला. तेव्हां ती म्हणाली "पादशहांनीं सांगितलें आहे त्याप्रमाणें तुम्ही करावें." ही पडत्या फळाची आज्ञा मिळतांच मिरजा महंमद व दौलतखान यांनीं सुलतान महमूद यास तक्तावर बसविलें. त्याच वेळीं एकलासखान यास निरोप देऊन इतर मुसलमान व ब्राह्मण मुत्सद्दी यांना दरबारांत बसल्या जागीं कद केलें. नंतर इब्राहिमाचें प्रेत बाहेर काढून जोरापूरच्या रोजांत नेऊन पुरलें. तथापि वडील मुलाच्या नांवानें बंडाळी माजण्याचा संभव आहे असें वाटल्यामुळें महंमद अमीन व दौलतखान यांनीं वडील शाहाजाद्याच्या डोळयांत सळई फिरवून त्याला आंधळें केलें आणि इतर दोन भावांच्या हातांची अंगठी घालण्याचीं बोटें तोडून टाकलीं. अशा प्रकारें बंदोबस्त केल्यानंतर कैद केलेल्या बऱ्याच मुत्सद्द्यांना बंधमुक्त करण्यांत येऊन किताब देण्यांत आले. त्या वेळीं मिरजा महंमद अमीन याला 'मुस्तफाखान' व दौलतखान याला 'खवासखान' असे किताब मिळाले." —(शिवभारत प्रस्तावना. पृ. ७५)

ज्या दौलतखानानें अथवा खवासखानानें सुलतान महमूदला विजापूरची गादी मिळवून दिली त्याचा तरी शेवट काय झाला? तो मोंगलांना मिळाल्याचा खोटा आरोप त्याच्यावर लादून सुलतानानें भर दरबारांत त्याच्यावर मारेकरी घालून त्याचा वध करविला. ज्या सिद्दी रेहाननें खवासखानाची हत्या केली त्याला 'इखलासखान वजीर' या पदवीनें गौरविण्यांत आलें. ज्यानें सारा

जन्म विजापूरच्या सिंहासनाच्या सेवेंत घालविला त्या मुरार जगदेवासारख्या तोलदार सरदाराची, तो खवासखानाच्या पक्षाचा आहे अशा संशयावरून धिंड काढण्यांत येऊन सुलतान महमुदानें त्याला त्याच्या सेवेचें पुढील परितोषिक दिलें––“बादशहानें त्याची जीभ कापविली व शहरभर धिंड काढली आणि नंतर हातपाय तोडून त्याचे हालहाल करून त्याला मारण्यांत आलें.”

केवळ विजापूरकरच नव्हे, तर साऱ्या बहामनी शाह्यांतून हेच भीषण प्रकार चालू होते. जी निजामशाही वांचविण्याची शिव-छत्रपतींचे वडील शहाजी राजे यांनीं प्राणपणानें खटपट केली तेथें भर राजसभेंत लखुजी जाधवरावांसारख्या प्रथम श्रेणीच्या सरदाराची त्याच्या चार पुत्रांसहित मारेकरी घालून स्वत: निझामशहानें हत्या करविली. लखुजी जाधवराव शिवछत्रपतींचें प्रत्यक्ष मातामहच होते. कपटनीतीचें याहूनहि मोठें उदाहरण म्हणजे विजापूरच्या सत्तेकरवीं शहाजी राजांना ज्या पद्धतीनें पकडण्यांत आलें ती पद्धति होय. त्यांना बंदी करणारा विजापूरचा मुख्य सचिव मुस्ताफाखान यानें कुराण हातांत घेऊन ‘दगा’ करणार नाहीं असें त्यांना वचन दिलें व त्याच रात्रीं ते झोपेंत असतांना त्यांच्यावर आक्रमण करून त्यांना बंदी केलें. (हें वृत्त पुढें सविस्तर येणार आहेच.) शिवाजी महाराजांची अशा शत्रूंशीं गांठ होती. त्यांच्या कूटनीतीच्या झळा प्रत्यक्ष शिवछत्रपतींना लागल्या होत्या. त्यामुळें ‘स चेन्निकृत्या युध्येत निकृत्यैव पराजयेत्’ अथवा ‘शठे शाठ्यं समाचरेत्’ या महाभारतांतील संदेशानुरूप कूटनीति व कूट युद्धपद्धतीचा अंगीकार ते न करते तर भारवीच्या शब्दांत ते ‘मूढधी’ ठरले असते.

तात्पर्य, शिवछत्रपतींनीं भारतीय राजनीतीला धरून (१) राष्ट्रचें राष्ट्र व एक संपूर्ण संस्कृति प्राणसंकटांतून वांचविणें हें कर्तव्य वाटलें म्हणून व (२) शत्रु हे संपूर्णपणें वंचक, वाम-मार्गी, कपटी व विश्वासघातकी असल्यामुळें कूटनीति व कूटयुद्ध-पद्धतीचा अवलंब प्रतिक्रिया म्हणून केलेला आहे. पण तोहि संपूर्ण

आसुरी वृत्तीनें त्यांनीं केलेला नाहीं. त्यांनीं केवळ कूटपद्धतीचाच आश्रय न करतां तिच्यांतील क्रूरता व राक्षसीपणा काढून तिच्यांत धर्मयुद्धपद्धतीचीं स्वतंत्र तत्त्वें मिळविलीं व स्वत.च्या राजनीतीचें स्वतंत्र असें प्रभावी तंत्र उभारलें. त्यांत मुख्यतः तीन सूत्रें होतीं. तीं पुढीलप्रमाणें —

(१) शरण आलेल्या लोकांस डोळसपणानें अभयप्रदान करणें. पृथ्वीराजाप्रमाणें अंधळेपणानें शिवाजी महाराजांनीं कोणाहि अपराध्यास क्षमा व शरणागतास अभयप्रदान केलेलें नाहीं. शरण आलेल्यांना त्यांनीं ते पुन्हां उपद्रव देऊं शकणार नाहींत असे निरुपद्रवी करून मगच अभयप्रदान केलेलें आहे. व्याघ्रसिंहांना नखदंतविहीन करून अथवा सापाचा विषारी दांत उपटून टाकल्या-वर त्याला अभयप्रदान करण्यास अडचण कोणती? शिवछत्रपतींच्या या नीतीचें स्पष्ट निदर्शन अफझलखानाच्या वधाच्या प्रसंगीं पहावयास मिळतें. अफझलखानाच्या वधानतर जावळीच्या झाडींत अडकलेल्या त्याच्या सैन्याची शिवछत्रपतींच्या सैन्यानें धुळधाण केली. त्या वेळीं शिवछत्रपतींनीं मनांत आणलें असतें तर शत्रुपक्षाचा एकूण एक माणूस ठार मारणें त्यांना सहज शक्य होतें. त्यांच्या जागीं कोणीहि यवन सेनापति असता तर त्यानें तेंच केलें असतें. पण शिवछत्रपतींनीं काय केलें असेल ? सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत म्हटलें आहे—

"भांडते लोकांनीं तोंडीं तृण धरून शरण आले त्यांसी व बायकामुलें भटब्राह्मण, गोरगरीब अशी अनाथ करून सोडिलें. राजा पुण्यश्लोक, शरणागतास मारीत नाहीं याजकरितां त्याचे लोकांनींही कित्येक अनाथ सोडिले" — (सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र पृष्ठ १९)

याच ग्रंथांत पुढें म्हटलें आहे — "ज्यांणीं हत्यार धरिलें त्यांस मारिलें. हत्यार न धरी त्यास हत्यार व घोडे घेऊन सोडले. गोर-गरीब यांचा बचाव करून लाऊन दिल्हे. तोफखाना व बुनगे तिकडे लोक ठेविले (होते) त्यांस इशारत करऊन दस्त केले. खंडोजी खोपडाही पाडाव झाला. त्याचा शिरच्छेद तेच समयीं करविला. वरकड सरदार मानवर सांपडले ते वस्त्रें देऊन लाऊन दिले.

गोविंदपंत, कृष्णाजीपंत पाडाव आले, त्यांस वस्त्रें दिल्हीं व कृष्णाजी-पंत यांस बहुमानवस्त्रें देऊन लाऊन दिल्हें."

— (सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र पृष्ठ १३५)

(२) शत्रूच्याहि श्रद्धाकेंद्रांना व धर्मभावनांना धक्का न लावणें हें शिवछत्रपतींच्या राजनीतीचें दुसरें प्रधान सूत्र होतें. शिवाजी महाराजांच्या शत्रूंची नीति यासंबंधांत माणुसकीच्या साध्या नियमांचेंहि कसें पालन न करण्याइतकी निर्घृण होती याचें वर्णन आम्हीं पूर्वार्धांत केलें असल्यामुळें त्याचें पुनश्च येथें वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. काफीखानासारखे मुसलमान इतिहासकारहि या संबंधांत शिवछत्रपतीचें जें वर्णन करतात तें पहाण्यासारखें आहे. काफीखान लिहितो —

'He attacked the caravans which came from distant parts, and appropriated to himself the goods and women. But he made it a rule that whenever his followers went plundering, they should do no harm to mosques, the book of God or any one's women. Whenever a copy of the holy Kuran came into his hands, he treated it with respect and gave it to some one of his Mahomedan followers. When the women of any Hindu or Mahomedan were made prisoners by his men, and they had no friend to protect them, he watched over them till their relations came to buy their liberty."

—(Elliot and Dawson VII Page 260)

"दूरदूरच्या प्रदेशांतून येणाऱ्या व्यापारी तांड्यांवर तो (शिवाजी) हल्ले करीत असे व त्यांचा माल व बायका हस्तगत करी. परंतु त्यानें आपल्या सैनिकांकरितां असा सक्त नियम केला होता कीं, सैनिक ज्या ज्या ठिकाणीं लुटालूट करण्यास जातील तेथें तेथें त्यांनीं मशिदीस, कुराणग्रंथास, अथवा कोणत्याहि स्त्रीस त्रास देऊं नये व उपसर्ग पोहोंचवूं नये. जर एखादा कुराणाचा ग्रंथ

त्याच्या हातीं आला तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपल्या मुसलमान नोकराच्या स्वाधीन करीत असे. केव्हांही हिंदू अथवा मुसलमान स्त्रिया त्याच्या हातीं सांपडल्यास व त्यांचें रक्षण करणारा कोणी जवळचा संबंधी त्यांच्याजवळ नसल्यास त्यांचें नातलग त्यांची सुटका करण्यास येईपर्यंत शिवाजी स्वत: त्यांची चांगली काळजी घेत असे."

शिवाजी महाराजांच्या समकालीन पाश्चात्य व्यापाऱ्यांनीं व प्रवाशांनीं त्यांच्या या सहृदय मानवतेचीं उदाहरणें प्रत्यक्ष अनुभविलेलीं आहेत. सुरतेवरील आक्रमणाच्या प्रसंगीं शिवछत्रपतींनीं केलेल्या व्यवहाराविषयीं लिहितांना कासमोडी गार्डा लिहितो —

"But no one was in the peril of life, for it was the strict order of Sevagy that unless resistence was offered no one should be killed, and as none resisted none perished. (Foreign Biographies on Shivaji Page 75)

"पण कोणाच्याहिवर जीव जाण्याचा प्रसंग आला नाही. कारण शिवाजीची अशी स्पष्ट आज्ञा होती कीं, जो कोणी प्रतिकार करणार नाहीं त्याच्या प्राणांना धक्का लावू नये. कोणीच शिवाजीच्या सैन्याचा प्रतिकार न केल्यामुळें कोणावरहि प्राणघाताचें संकट ओढवलें नाहीं."

या संबंधांत स्पष्ट आज्ञा कशा असत हें सभासदांच्या बखरींतील पुढील कांहीं वाक्यांवरून स्पष्ट होतें. " परमुलखांत पोरबायका न धरावी. मर्दाना सांपडला तरी धरावा. गाई न धरावी. बईल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणास उपद्रव न द्यावा, खंडणी केल्या जागा ओळखियासी ब्राह्मण न घ्यावा."

(३) स्त्रीचा वध करूं नये व कोणत्याहि परिस्थितींत स्त्रीत्वाची अमर्यादा करूं नये हा शिवछत्रपतींच्या राजनीतीचा तिसरा दंडक किंवा तिसरें महत्त्वाचें सूत्र होतें. कल्याणवर शिवछत्रपतींनीं स्वारी केली असतां त्यांचा सरदार आबाजी सोनदेव यानें तेथील यवन अधिकाऱ्याची सून त्यांना अर्पण केली. पण महाराजांनीं कडक

शब्दांत त्याची निभर्त्सना करून तिला सन्मानानें परत पाठविली. चिटणिसांच्या शिवचरित्रांत हें वृत्त पुढीलप्रमाणें दिलें आहे––

"महाराज कल्याणप्रांत पहावयास स्वारीस गेले. तेथें गेल्यावर मालमावेशा (द्रव्य) सांपडली ते पाहून मोजदाद करून राजगडास पाठविली. बहुत द्रव्य सांपडलें. महाराजांस संतोष झाला. हें पाहून आबाजीपंती अर्ज केला जे "एक स्त्री बहुत सुंदर लावण्यवान महाराजांचे सेवेशी योग्य जाणोन ठेविली आहे." ऐसें बोलल्यावरी मातबर दरबार करून आबाजीपंतास 'तुम्ही स्त्री चांगली आहे बोललांत ती पहाण्यास घेऊन येणें' म्हणून सांगितल्यावरून तिला वस्त्रें भूषणें देऊन आणिली. महाराजांनीं तिला पाहून परम संतोषी झाले आणि बोलले जे 'इचे लावण्य असेंच आमचे मातुश्रींचें असतें तर आमचेंहि स्वरूप असेंच झालें असतें.' याप्रमाणें दरबारांत बोलल्यियावरी सर्वांस आश्चर्य वाटतें झालें. आबाजीपंतास सांगितलें 'राजांनीं ज्यांस यश पाहिजे त्यांनीं उच्छिष्ट स्त्री अंगीकार करू नये; परस्त्री अभिलाष करून रावणादिक क्षयास गेले. त्यांत राजास प्रजा सर्व अपत्याचे जागीं. स्त्रिया करणें तरी शतावधि शक्ति पाहून कराव्या असा राजधर्म आहे.' तेव्हां महाराज थोर होते असें सर्व मानते झाले. आणि त्या समयीं त्या स्त्रीस वस्त्रें अलंकार देऊन तिचा सासरा विजापुरास गेला होता त्याजकडे पाठविली." –(सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र पृ. ८०)

कल्याणच्या सुभ्याच्या सुनेचें हें वृत्त सत्य आहे कीं काल्पनिक यासंबंधीं इतिहाससंशोधकांत तीव्र स्वरूपाचे मतभेद आहेत. कारण हें वृत्त जसें चिटणिसांच्या बखरींत तसेंच शिवदिग्विजयांतहि आलें असून या दोन ग्रंथांतील वर्णनांत भेद आहे, तो गोष्टीच्या मूळ गाभ्यांत भेद नसून थोड्याशा तपशिलांत आहे. चिटणिसांच्या मतें ती कल्याणच्या सुभेदाराची सून असून युद्धांतील लूट म्हणून आबाजी सोनदेवाला मिळाली आहे. शिवदिग्विजयकारांच्या मतें ती तेथील काजीची मुलगी असून आबाजी सोनदेवानें ती तिच्या बापाला पैसे देऊन घेतलेली आहे. पण बाकीची सर्व गोष्ट सारखीच

आहे. तपशिलासंबंधांत शिवदिग्विजयकारांपेक्षां चिटणीस अधिक विश्वसनीय आहेत. कारण मल्हार रामराव चिटणीस हे शिवछत्रपति यांचे चिटणीस बाळाजी आवजी यांचे वंशज असून त्यांनीं इ. स. १८१० मध्यें साताऱ्याचे तत्कालीन महाराज प्रतापसिंह यांच्या आज्ञेवरून "कारकिर्दी वडिलार्जित होत्या, दिनचर्या व पराक्रम कथाहि होत्या त्यांच्या आश्रयें करून लेहून निवेदन केलें" म्हणजे वंशपरंपरागत विश्वसनीय कागदपत्रांच्या आधारें लिहिलें आहे. याच्या उलट शिवदिग्विजय जरी सुप्रसिद्ध खंडोबल्लाळ चिटणीस यांनीं लिहिला असल्याचें प्रकाशकांचें म्हणणें असलें तरी त्यांना ती प्रत कोठून मिळाली हें त्यांनीं सांगितलेलें नाहीं. शिवाय आबाजी सोनदेवांनीं आणलेली मुलगी जर काजी अथवा सुभेदार यांच्या सारख्या बड्या अधिकाऱ्याची सून अथवा मुलगी असेल तर ती तिच्या बापाला पैसे देऊन विकत मिळणें केवळ अशक्य आहे. दिग्विजयकार तर ती विकत घेतल्याचें लिहितात. स्वराज्याच्या उभारणीच्या स्फूर्तीनें कार्यप्रवण झालेले श्रीमन्महाराजांचे सरदार व सेनानी या असल्या कामासाठीं पैसा उधळणें अशक्य. सुभेदार अथवा काजीसारख्या अधिकारांवर असलेले लोक मुसलमान असले तरी कन्याविक्रय पैशानें करणें अशक्य. तेव्हां ही मुलगी चिटणीस म्हणतात त्याप्रमाणें युद्धाच्या लुटींतच अबाजी सोनदेवांना मिळाली असली पाहिजे. मल्हार रामराव चिटणीस जसें संग्रहीं असलेल्या कागदपत्रांच्या आधारें लिहितो म्हणून सांगतात तसें शिवदिग्विजयकार म्हणत नाहींत. शिवदिग्विजय खंडोबल्लाळ चिटणिसांनींच लिहिला यालाहि कांहीं प्रमाण नाहीं. त्यामुळें जेथें विरोध वाटेल तेथें दिग्विजयापेक्षां चिटणिसांना प्रमाण मानणेंच युक्त होय.

चिटणिसांची बखर सोडून प्रत्यक्ष ऐतिहासिक कागदपत्रांचा या गोष्टीला आधार नाहीं म्हणून कित्येक इतिहाससंशोधक ही गोष्ट विश्वसनीय मानीत नाहींत. पण इतर प्रकारच्या प्रमाणांवरून शिवछत्रपतींच्या शीलचारित्र्याविषयीं संशयातीत अवस्था असल्यावर व घरच्या कागदपत्रांच्या संग्रहासारख्या प्रमाणांवरून चिटणिसांसारखा

लेखक ही गोष्ट उल्लेखीत असल्यावर फुसक्या कारणांसाठीं ती विश्वसनीय न मानण्याचें कोणतेंहि कारण दिसत नाहीं. यासंबंधांत युगप्रवर्तक शिवाजी या ग्रंथाचे लेखक श्री. वासुदेव कृष्ण भावे यांचें विवेचन आम्हांस ग्राह्य वाटतें. श्री. भावे आपल्या 'शिवराज्य व शिवकाल' या ग्रंथांत लिहितात. "त्यानें (शिवाजी महाराजांनीं) कल्याण, भिवंडी हा प्रदेश १६५७ च्या सुमारास जिंकून घेतला. त्या वेळींच कल्याणच्या मुसलमान स्त्रीची कथा घडली असली पाहिजे. आणि चिटणिसांसारख्या साधनसंपन्न बखरकारानें ती दिली असल्यामुळें विश्वसनीय समजण्यासहि हरकत नाहीं."

—(शिवराज्य व शिवकाल पृ. ९२)

पण कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची ही विशिष्ट घटना खरी मानावीच असा आग्रह धरण्याचेंहि आमच्या मूलभूत प्रमेयाच्या सिद्धीसाठीं कांहीं कारण नाहीं. शिवछत्रपतींच्या राजनीतींतील 'स्त्रीत्वाचा सन्मान' या तिसऱ्या सूत्राच्या सिद्धीसाठीं अनेक निर्विवाद पुरावे व समकालीन लेखकांच्या साक्षी देतां येण्यासारख्या आहेत.

## निर्विवाद प्रमाणें

शिवछत्रपतींच्या या विशिष्ट नीतीचा कस लागण्यासारखे जे प्रसंग त्यांच्या जीवनांत निर्माण झाले आहेत त्यांत रायबागीण प्रकरण हें सर्वांत महत्त्वाचें होय. रायबागीण ही औरंगजेबाच्या सैन्यांतील एक नांवाजलेली स्त्री सेनानी होती. रायबागीणचें खरें नांव 'सावित्रीबाई' असून ती विदर्भांतील माहूरचे राजे उदाराम देशमुख यांची बायको. राजे उद्धवराव उपाख्य उदाराम हे आजन्म मोंगलांची निष्ठेनें सेवा करीत. इ. स. १६३२ मध्यें देशद्रोह्यांना ज्या कोणत्या परलोकाची प्राप्ति होते तेथें ते गेले. त्यांचा मुलगा जगजीवनराव हाहि औरंगजेबाच्या सेवेंत बापाप्रमाणेंच शेवटपर्यंत राहून इ. स. १६५८ मध्यें मेला. नवरा व मुलगा दोघेहि यवनांच्या दास्यांत परलोकीं गेल्यावर आपल्या लहानग्या नातवाला घेऊन सावित्रीबाईनें औरंगजेबाच्या सेवेंत आपलें जीवन अर्पिण्याचा निश्चय केला

ही बाई विलक्षण पराक्रमी होती. रणांगण तळपविणारी जणूं विद्युल्लताच. महाराणी लक्ष्मीबाई व सावित्रीबाई! दोघीहि शूर रणरागिणी. एकीचा पराक्रम स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्यार्थ गाजला व ती राष्ट्राची प्रातःस्मरणीय देवता बनली, आणि दुसरी यवनांच्या सेवेंत राष्ट्रद्रोह करीत पराक्रम उधळीत होती. जातिवंत दासतेचा जणूं आविष्कार. अनेक रणांगणें सावित्रीबाईनें गाजविलीं होतीं. औरंगजेबानें तिच्या कर्तृत्वावर व पराक्रमावर प्रसन्न होऊन तिला 'पंडिता' व 'रायबागन' अशा दोन पदव्या दिल्या होत्या. रायबागन म्हणजे राजांमधली वाघीण=राजव्याघ्री. रायबागनचेंच धेड-गुजरी मराठी रूप रायबागीण हें झालें आहे. औरंगजेबानें मराठे व शिवाजी हे स्त्रियांना हात लावीत नाहींत हें ओळखून या बाईला ससैन्य शिवाजी महाराजांवर पाठविलें. उमरखिंडीच्या मार्गानें ती शिवाजी महाराजांवर चालून आली. शिवाजीमहाराज डोळस राजकारणी असल्यामुळें स्वराज्याचा काळ बनलेल्या या स्त्रीला क्षमा करण्यांत तात्पर्य नाहीं हें त्यांनीं ओळखलें. ताटकेच्या वध-प्रसंगीं मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्रानें जी भूमिका घेतली होती तीच शिवाजी महाराजांनीं या प्रसंगीं घेतली. "बापलेक युद्धवध्य आहे. पक्षी स्त्री शस्त्रविरहित न मारावी. शस्त्र धारण केलें असतां निंद्य नाहीं." असा विवेक करून त्यांनीं बोराटीकर रामजी पाटील, देशमुख यशवंतराव, रामाजी, विश्वासराव व दिनकरराव बागराव यांना पांच पांच हजार मावळे लोकांनिशीं तिच्या आक्रमणाचा प्रतिकार करावयास पाठविलें. शिवदिग्विजयांत म्हटलें आहे--

"रायबागीण ही मोठी हिंमतीची, बहुत तऱ्हेच्या युद्धगति जाणती, चतुर, तिनें (शिवाजीच्या सरदारांशीं) लढाई दिली, परंतु या युद्धांत तिचा पराभव होऊन, चहूंकडून वलगार करून घोडे. हत्ती, उंट, तट्टें, डेरेदांडे, वस्त्रें, भांडीं, जिन्नसभाव, रोकड, खजाना. सुद्धां लुटून, रायबागीण पाडाव करून आणिली. **तिचा सन्मान करून** अवरंगाबादेस पुन्हां पावती करून दिली."

—(शिवदिग्विजय, पृ. २१३-१४)

स्त्रीला कोणताहि उपसर्ग द्यावयाचा नाहीं असा कडक निर्बंध महाराजांनीं आपल्या सैन्याला घालून दिलेला होता. फॉरेन् बायॉग्रफीज् ऑन शिवाजी या ग्रंथांत (पृ. ६८) म्हटलें आहे —

"Neotagy offered no insult to the women, for their sex was venerated in Hindustan and they observed that customs better than the Europeans. These soldiers had special reason for this, as it was the order of Sevagy who, while he lived, was both obeyed and loved. And if anybody ever violated any of his orders the punishment was such that there was no second instance (of the offence )

"नेताजीनें बायकांस कोणत्याहि प्रकारचा उपसर्ग दिला नाहीं. कारण हिंदुस्थानांत बायकांना मोठ्या आदरानें वागविण्याचा प्रघात असून तो युरोपियन् लोकांपेक्षां हिंदुस्थानांतील लोक अधिक मानतात. बायकांचे बाबतींत या प्रकारचें वर्तन करण्याचें विशेष कारण पुढील-प्रमाणें होतें. ज्या शिवाजीविषयीं शिपायांचे ठायीं भक्ति होती आणि ज्याचा हुकूम ते शिरसावंद्य मानीत, त्याचाच दंडक असा होता की, जर कोणी बायकांचे बाबतींत केलेल्या या नियमाचें उल्लंघन केलें, तर दुसरा कोणी तसा गुन्हा करण्यास धजावणार नाहीं, इतकें कडक शासन गुन्हा करणाऱ्यास केलें जात असे."

मानवतेच्या महन्मंगलाचें अपरिहार्य साधन म्हणून कूटनीतीचा अंगीकार करतांना तिच्यांत धर्मयुद्धाचीं हीं जीं तत्त्वें श्रीशिव-छत्रपतींनीं गोंवली त्यांच्यामुळें त्यांना पुण्यश्लोक राजर्षींच्या श्रेणींत उच्चस्थान प्राप्त झालें आहे. त्यांच्या ध्येयवादाविषयीं अज्ञानी असणाऱ्या व त्यांच्या केवळ युद्धपद्धतीवरून त्यांना महमूद गझनी, चेंगीझखान, तैमूर, नादिरशहा या लुटारूंच्या पंक्तीला बसवूं पाहणाऱ्या लोकांची, ते इतर दृष्टींनीं केवढेहि थोर असले तरी कींवच केली पाहिजे. गझनीच्या महमुदाच्या संपूर्ण आक्रमणाचा हेतु केवळ आततायी व अमर्याद धनाभिलाषा हाच होता. धनलोभाच्या अग्नीच्या शमनार्थ अकारण दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करून तेथील

शिल्प, सौंदर्य व कला यांचा विध्वंस करणें यांहून त्याच्या जीवनाचा दुसरा कोणताच अर्थ लागू शकत नाहीं. शिवछत्रपतींच्या विक्रमाचा हेतु धनलोभ नसून स्वराष्ट्राचें व स्वधर्मानें जगण्याचें स्वातंत्र्य हा आहे. मिळविलेल्या धनाचा उपभोग घेण्याचें भाग्य मृत्यु हिरावून घेणार म्हणून अंतकाळीं आर्तपणें रडणारा महमूद व मिळविलेली संपत्ति नि राज्य स्वतःचें नसून देवाधर्माचें आहे या निष्ठेनें समाधान-पूर्वक, ध्येयसिद्धीच्या आनंदांत देहाचें जीर्ण वस्त्र सहजपणें टाकणारे शिवछत्रपति यांची तुलना करणें हें स्मशानांतील भडाग्नी व पवित्र-तम यज्ञाग्नि यांची तुलना करण्यासारखेंच मूर्खपणाचें आहे. छत्र-पतींनीं मुधोळचा व जावळीच्या मोऱ्यांचा केलेला संहार पाहून कांहीं लोकांनीं तर त्यांची चेंगीझखानाशीं तुलना करण्याचा खटाटोप केला आहे. पण एखाद्या रक्तपिपासू नरपिशाच्चाशीं दैवी पुरुषाची तुलना करण्यासारखाच हा प्रकार आहे. चेंगीझखान हा साक्षात् मृत्युदेवतेचा आविष्कार म्हणून इतिहासाच्या पृष्ठांवर अंकित झालेला आहे. राष्ट्रेंचीं राष्ट्रें व समृद्ध नगरें धुळीला मिळ-विणारा त्याच्यासारखा आग्यावेताळ इतिहासाला दुसरा ठाऊक नाहीं. चेंगीझखानानें मारलेल्या लोकांची नुसती संख्या घेतली तरी त्याच्या पिशाच्चलीलेची कल्पना येते. एक कोटि ऐंशी लाख लोकांचा त्यानें संहार केला असें इतिहासाचें स्थूलमानानें म्हणणें आहे. त्याच्याशीं तुलना केली तर संहाराच्या दृष्टीनेंहि शिवाजी-महाराज हे दयेची केवळ मूर्ति ठरतील. मनुष्यरक्ताच्या तहाने-साठींच जगाचा विध्वंस करावयास निघालेला राक्षस व अशा राक्षसांच्या तावडींतून आपल्या राष्ट्राची मुक्तता करावयास्तव कटिबद्ध झालेला स्वातंत्र्यवीर यांचीं नांवें एकत्र उच्चारणें देखील उपहासास्पद ठरतें.

जी गोष्ट चेंगीझखानाची तीच तैमूरचीहि आहे. तैमूरच्या दिग्विजयाचा हेतु गुलाम मिळविणें व धनलोभ यांवांचून दुसरा कोणताहि नव्हता. समरकंदहून निघाल्यापासून दिल्लीच्या स्वारीच्या क्षणापर्यंत त्याच्या छावणींत एक लक्ष गुलाम झाले

होते. ते कदाचित् बंड करून उठतील या भयानें दिल्लीवर स्वारी करण्यापूर्वी किडे मारावेत इतक्या सहजतेनें व थंड हृदयानें त्यानें या एक लाख लोकांचा संहार केला. त्याच्या राक्षसी जीवनांतील हा केवळ अतिसामान्य प्रकार होय. त्याच्या दिल्लींतील पांच दिवसांच्या निवासांत अग्नि व खड्ग यांचें दिल्लीला अखंड थैमान चालू होतें. निरपराध लोकांच्या मस्तकांचे उंच मनोरे पहात व त्यांच्या प्रेतांची श्वापदांना मेजवानी देत त्यानें आपला विजयोत्सव साजरा केला. परततांना उभी शेतें जाळून व सहस्रावधि लोकांना गुलाम म्हणून सोबत घेऊन तो समरकंदला गेला. शिवछत्रपतींच्या हातून यांपैकीं कांहींहि घडलेलें नाहीं. शत्रूच्या प्रेतांचीं त्यांच्या-हातून विटंबना तर कधींच झालेली नाहीं; पण उलट त्यांनीं त्यांची स्मृतिचिन्हें सन्मानपूर्वक संरक्षण केलीं आहेत. स्वतःला मूर्तिभंजक म्हणवून घेण्यांत धन्यता मानणाऱ्या व आपल्या कुल-देवतेला जात्यांत भरडणाऱ्या अफझलखानासारख्या शत्रूचा संहार केल्यावर त्यांनीं प्रतापगडावर त्याचें थडगें बांधून दिलें इतकेंच नव्हे तर त्याच्या पूजेअर्चेची व्यवस्था लावून देऊन त्याचा 'पीर' होऊं दिला. महाराजांची इच्छा नसती तर तेथें तें थडगें बांध-ण्याची कोणाची छाती होती? रावणाच्या वधानंतर त्याचें प्रेत-कार्य थाटामाटानें व वैभवानें करण्याची विभीषणाला आज्ञा देतांना मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्र म्हणाले, "मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम्" (आमचें वैर शत्रूच्या मृत्यूपर्यंत. पुढें वैराचें प्रयोजन काय?) प्रतापगडाच्या परिसरांतील अफझल-खानाच्या कबरीचें दृश्य पाहिल्यावर मानवता जागृत असणाऱ्या कोणाहि सहृदय व्यक्तीच्या अंतःकरणांत हेच शब्द उमटतात व असें वाटावयास लागतें की त्रेतायुगींचा रामच धनुष्याऐवजीं भवानी खड्ग घेऊन व किरीटाऐवजीं जिरेटोप घालून या परि-सरांत वावरत होता. शिवछत्रपतींच्या काळीं भारतांत वावरणाऱ्या युरोपीय सत्तासुद्धां गुलामांचा व्यापार करीत असत. पण छत्रपतींनीं कोणालाहि, मुसलमानांनासुद्धां, गुलाम केलें नाहीं. मानवतेचा

महामित्र राजा शिवाजी व मानवतेचा महाशत्रु तैमूर यांचीं नांवें एकत्र घेणेंसुद्धां अदूरदर्शीपणाचें आहे.

तीच गोष्ट नादिरशहा व शिवछत्रपति यांच्या तुलनेसंबंधाचीहि आहे. दोघांच्याहि जीवनांतील समान स्वरूपाच्या घटनांचा विचार केला तरी या तुलनेवर उत्कृष्ट प्रकाश पडतो. नादिरशहानें ज्या वेळीं दिल्लीवर आक्रमण केलें त्या वेळीं त्याच्या कांहीं सैनिकांना नागरिकांनीं ठार मारलें. या अत्यंत स्वाभाविक असणाऱ्या छोटयाशा घटनेचा सूड या सुलतानानें कसा घेतला असेल? त्यानें त्या अपराधासाठीं, फ्रेझरच्या वर्णनाप्रमाणें, दीड लक्ष निरपराध नागरिकांचा बळी घेतला. बलात्कार, वासनापूर्ति, विध्वंस, रक्त व आग यांचें साऱ्या दिल्लीभर, त्याच्या आज्ञेनें ताण्डव चालू होतें. अशीच पण याहूनहि वेगळ्या उत्कट स्वरूपाची घटना शिवछत्रपतींच्या सुरतेच्या स्वारीच्या वेळीं घडलेली आहे. सुरतेच्या भ्याड सुभेदारानें या स्वारीच्या वेळीं शिवाजीमहाराजांची हत्या करण्यासाठीं एक मारेकरी नियुक्त केला. सुभेदाराच्या वतीनें संधीचें बोलणें करण्यासाठीं तो त्यांच्या शिबिरांत आला. आणि वाटाघाटीचें सोंग चालू असतांना त्यानें अकस्मात् सुरी घेऊन महाराजांच्यावर प्राणघातक वार केला. पण महाराजांचा अंगरक्षक अत्यंत दक्ष असल्यामुळें त्यानें सफाईचा वार करून त्या मारेकऱ्याचा सुरी घेतलेला हातच तोडून टाकला. त्यामुळें महाराजांना अगदींच किरकोळ आघात झाला. पण मारेकरी हात तुटल्या स्थितींत अंगावर कोसळल्यामुळें त्याच्या रक्तानें मात्र महाराज न्हाऊन निघाले. हाताखालच्या अधिकाऱ्यांना महाराजांचीच हत्या झाली असें वाटलें, व त्यांनीं संतापाच्या भरांत पकडलेल्या लोकांना कंठस्नान घालण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणें कांहीं मस्तकें छाटलींहि गेलीं. पण थोडयाच वेळांत महाराज सांवरले व त्यांच्या हें ध्यानीं येतांच त्यांनीं तो प्रकार तत्काळ थांबविला. कोणाहि निरपराध्याची हत्या होऊं दिली नाही. नादिरशहाच्या पावलांवर पाऊल टाकून त्यांना त्या वेळीं साऱ्या

सुरतेची राखरांगोळी करणें कठीण होतें? केवळ कांहीं सैनिकांच्या हत्येसाठीं दिल्लीची होळी करणारा नादिरशहा जर शिवछत्रपतींच्या जागीं असता तर सुरतेवर काय प्रसंग ओढवला असता याची कल्पनाहि किती भीषण आहे!

जगांतील तत्कालीन विजेत्यांच्या चारित्र्याचें व चरित्राचें स्वरूप पाहिल्यावर शिवछत्रपतींच्या राजनीतीसंबंधांत वेगळ्या विवेचनाची आवश्यकताच उरत नाहीं. आणि ध्येयवादाच्या दृष्टीनें विचार केला तर स्वतंत्र लोकांना गुलाम करण्याच्या हीन वासनेनें प्रवृत्त झालेल्या या विजेत्यांना शिवछत्रपतींसारख्या स्वातंत्र्याच्या अग्रदूताच्या परिसरांतहि उभें करतां येण्यासारखें नाहीं. या विषयावर लिहितांना विख्यात इतिहाससंशोधक डॉ. बाळकृष्ण यांनीं केलेलें विवेचन अत्यंत उद्बोधक आहे. ते लिहितात––

" On comparing Shivaji with the Asiatic conquerors, it will be seen that the latter fully indulged in plunder rapine,oppression, tyrannies, slavery, forcible conversions. All of these came to put the yoke of foreign rule on this country They were not only slave making and fanatic Ghazies for converting Hindus into Muslims, but were the destroyers of the liberty and autonomy of the Indian people. On the other hand, Shivaji stood forth as the patriotic champion of the freedom and independence of his people. He proved himself their liberator from the centuries of foreign rule. There can be no comparison between a patriotic liberator of his mother-land and a destroyer of the liberties of men, between a slave-driver and a slave-liberator, between a fanatic Ghazi and an ardent and respectful admirer of all religions. Comparisons are said to be odious, but the study of history will be fruitess, if readers are not to have a comparative insight into the deeds of great men.

— (Shivaji the great Vol. 2 Part 2 p. 22)

" Instead of condemning Shivaji we should admire

him that his sharp genius was ever ready to discover new methods to humiliate and embarrass his enemies and to win as much by diplomacy as by war. All great conquerors had recourse to intrigue and treachery according to the necessities of the moment. Napoleon took pride in saying that he knew when to exchange lion-skin for that of the fox. —(Shivaji the great Vol. 2–Part 2 p 30)

"आशियाखंडांतील चेंगीझखान, महमूद गझनवी, तैमूरलंग, नादिरशहा इत्यादि जगज्जेत्यांशीं शिवाजी महाराजांची तुलना केली तर असें आढळून येईल कीं हे सारे विजेते लूट, बलात्कार, आक्रमण, अत्याचार, दुसऱ्यांना दास करणें व बळानें बाटविणें या माणुसकीला काळिमा आणणाऱ्या पिशुनतेंत गळ्यांपर्यंत रुतलेले होते. सर्वांच्या पराक्रमाचें ध्येय दुसऱ्या राष्ट्रांच्या मानेवर आपल्या सत्तेचें जूं बलात्कारानें लादून त्यांच्या स्वातंत्र्याचा अपहार करणें हेंच होतें. हे विजेते म्हणजे केवळ दुसऱ्यांना दासतेंत ढकलणारे व हिंदूंना बळानें बाटवून मुसलमान करणारे धर्मांध 'गाझीच' नव्हते; तर भारताच्या (म्हणजेच दुसऱ्या स्वतंत्र राष्ट्राच्या) स्वातंत्र्याचा व स्वायत्ततेचा उच्छेद करणारे विध्वंसक होते. याच्या उलट श्रीशिवाजी महाराज हे विशुद्ध राष्ट्रभक्तीच्या भावनेनें रसरसलेले असे स्वदेशबांधवांच्या स्वायत्ततेच्या व स्वातंत्र्याच्या संगराचे अग्रदूत होते. परदास्यांतून आपल्या राष्ट्रबंधूंची मुक्तता करणारा स्वातंत्र्यप्रदाता हें आपलें स्वरूप शिवछत्रपतींनीं स्वतःच्या कर्तृत्वानें सिद्ध करून दाखविलें आहे. राष्ट्रभक्तीच्या भावनेनें प्रेरित होऊन आपल्या मातृभूमीची परदास्यांतून मुक्तता करणारा स्वातंत्र्यवीर व मनुष्यमात्राच्या स्वातंत्र्यावर दरवडे घालणारा अपहारक, गुलामांचे तांडे बाळगण्यांत भूषण मानणारा क्रूरकर्मा व दासतेच्या शृंखला तोडण्याचें व्रत घेतलेला महापुरुष, आपल्या संप्रदायाविना दुसऱ्या कोणालाहि जगूं न देण्याचा निर्धार केलेला वेडा 'गाझी' व सर्वधर्ममत-संप्रदायांविषयीं आदर व्यक्त करणारा उदारधी पुरुष यांची खरोखर तुलना तरी होऊं शकते काय? तुलना करणें मोठेसें

चांगलें नसतें असें कित्येक लोक म्हणतात; पण महापुरुषांच्या महत्कृत्यांविषयीं लोकांच्या अंत:करणांत तौलनिक दृष्टिकोन निर्माण करण्यांत इतिहासाचें अध्ययन पर्यवसित झालें पाहिजे. नाहीं तर तें अध्ययन अर्थशून्य ठरेल."

"शिवाजी महाराजांची सूक्ष्मदर्शी व तरल प्रतिभा आपल्या शत्रूंना हास्यास्पद करून त्यांची त्रेधा उडविण्यासंबंधांत नवीन-नवीन मार्ग शोधून काढण्याविषयीं नेहमीं सज्ज व सिद्ध असे व युद्धाप्रमाणेंच मुत्सद्देगिरीनेंहि ती त्यांच्यावर विजयांमागून विजय मिळविण्यांत जयशाली असे. याविषयीं त्यांना दूषणें देण्याऐवजीं आपण त्यांचें मन:पूर्वक गुणगानच केलें पाहिजे. प्रत्येक विजेत्याला त्याच्या सभोंवारच्या विशिष्ट परिस्थितीवर मात करण्यासाठीं कूट नीतीचा अंगीकार करावाच लागलेला आहे. जगज्जेता नेपोलियन नेहमींच अभिमानानें असे उद्‌गार काढी कीं, "सिंहाचें कातडें बाजूला सारून कोल्हयाचें कातडें केव्हां पांघरावें हें मला पूर्णपणें समजतें."

असो. या नीतीच्या आश्रयानें शिवछत्रपतींनीं ज्या हिंदवी स्वराज्याचें मंदिर उभारलें त्याला सात स्तंभांचा अत्यंत दृढ व समर्थ आधार होता. या आधारस्तंभांपैकीं एकहि सामर्थ्याच्या संबंधांत पांगळा असता तरी हें स्वराज्यमंदिर उभेंच राहूं शकलें नसतें. जगाच्या इतिहासांत जेथें जेथें हे सात आधारस्तंभ सारखेच सामर्थ्यसंपन्न होते तेथें तेथेंच स्थिरराज्य निर्माण होऊं शकलेलें आहे. जेथें जेथें या सात आधारस्तंभांपैकीं एक अथवा अनेक सामर्थ्या-संबंधांत तें पांगळें ठरलें तेथें तेथें दृढमूल झालेलीं राज्येंहि कोसळून धुळीस मिळालीं आहेत. राज्याच्या या सात आधारस्तंभांनाच भारतीय राजनीतीच्या परिभाषेंत राज्याचीं सप्तांगें म्हणतात. शिव-छत्रपतींच्या स्वराज्यमंदिराची संस्थापना ज्यांच्या दृढ आधारावर झाली ते सात स्तंभ कोणते? त्यांचें निरीक्षण करणें त्यांचें जीवन समजावून घेण्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. त्याकडे पुढील प्रकरणांत वळूं.

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... प्रकरण समाप्त नों. दि. ...

# राज्यमंदिराचे सात आधारस्तंभ

राज्यमंदिराचे जे सात आधारस्तंभ अथवा राज्यसंस्थेचे जे सात घटकावयय त्यांना सप्तांगें असें म्हणतात. त्यांचा निर्देश शुक्रनीतींत पुढीलप्रमाणें केलेला आहे --

स्वाम्यमात्यसुहृत्कोशराष्ट्रदुर्गबलानि च।
सप्तांगमुच्यते राज्यं तत्र मूर्धा नृपस्स्मृत: ।। ६१

—(शुक्रनीति अ. १)

"राजा, अमात्य, मित्र, कोश, राष्ट्र, दुर्ग आणि सैन्य हीं राज्याचीं म्हणजेच राष्ट्राचीं सात अंगें आहेत. त्यांत राजा हें मस्तक होय."

शिवछत्रपतींच्या प्रत्यक्ष आज्ञेनें त्यांचा निकटवर्ती कवीन्द्र परमानंद यानें त्यांच्या स्वराज्यसंस्थापनेचा जो इतिहास 'शिवभारत' या नांवानें लिहिलेला आहे त्यांत सुवर्णशर्मा अथवा विख्यात मुत्सद्दी सोनोपंत डबीर यांनीं स्वराज्य संस्थापनेच्या प्रारंभींच्या काळांत शिवछत्रपतींना केलेला बहुमोलाचा उपदेश एका स्वतंत्र अध्यायांत ग्रथित केलेला आहे. त्या उपदेशांत राज्यसंस्थेच्या उपर्युक्त सप्तांगांचें महत्त्व व स्वरूप उद्बोधक रीतीनें विशद केलेलें आहे. तें पुढीलप्रमाणें --

उपक्रान्तमिदानीं तु त्वया विजयमंडलम् ।
सुविक्रान्तस्य नृपते: सर्वमेव महीतलम् ।।४५
राजा तावत्ततो मंत्री सुहृदो विपुलं धनम् ।
राष्ट्रं दुर्गाणि सैन्यानि राज्यस्यांगानि सप्त वै ।।४६
एतैरविकलैर्युक्त राज्यं सद्भि: प्रशस्यते ।
एकेनापि विहीन तदितरैरुपहस्यते ।।४७
मौलिन्नृपो मुखं मंत्री धनसैन्ये भुजद्वयम् ।
राष्ट्रमन्यद्वपुस्सर्वं सुहृदस्संधयो दृढा. ।।४८

दुर्गाणि तु दृढान्युच्चैस्तदस्थीनि तदंतरा ।
एवमंगानि राज्यस्य सप्तोक्तानि मनीषिभिः ॥४९
सप्तांगस्यास्य राज्यस्य धर्म आत्माऽभिधीयते ।
मंत्रः प्राणो बलं नीतिरनीतिरसमर्थता ॥५०
दंडो यथोचितः शौर्यमधर्मो रिपुरुद्धतः ।
मदः परस्परं भेदो दीर्घमायुरभेद्यता ॥५१
जनरंजनमुत्कर्षो दर्शनं दीर्घदर्शिता ।
प्रतापः प्रोज्ज्वलं रूपं विमला बुद्धिरायुधम् ॥५२
तथैव बलवद्वैरमंतरायः प्रकीर्तितः ।
प्रमादस्तु भवेन्निद्रा प्रबोधः सावधानता ॥५३

—(शिवभारत अ. १६)

"तुम्ही आतां विजयास प्रारंभ केला आहे, आणि अत्यंत पराक्रमी राजाचीच सर्व पृथ्वी आहे. प्रथम राजा, नंतर मंत्री, मित्र, विपुल धन, राष्ट्र, (प्रजा) गड आणि सैन्यें हीं राज्याचीं सात अंगें होत. ज्या राज्याचीं हीं अंगें अव्यंग आहेत त्या राज्याची चांगले लोक प्रशंसा करतात. तेंच एका जरी अंगानें कमी असलें, तरी इतरांकडून त्याचा उपहास होतो. राजा हें मस्तक, मंत्री हें मुख, धन आणि सैन्य हे भुज; बाकीचे सारें राष्ट्र (प्रजा) हें शरीर मित्र हे सांधे आणि दुर्ग हे त्यांमधील अत्यंत दृढ हाडें होत. या प्रमाणें शहाण्या लोकांनीं राज्याचीं सात अंगें सांगितलीं आहेत. त्या सप्तांगात्मक राज्याचा धर्म हा आत्मा होय; मसलत हा प्राण, नीति हें बल आणि अनीति हें दौर्बल्य होय. यथोचित दंड हें शौर्य, शत्रु मर्यादेबाहेर जाऊं देणें हा अधर्म, परस्परांतील फूट हा मद आणि दृढैक्य हें दीर्घायुष्य, लोकरंजन हा उत्कर्ष, दूरदर्शित्व ही दृष्टि, प्रताप हें उज्ज्वल रूप, आयुध ही विमलबुद्धि, तसेंच बलवानांशीं वैर हें विघ्न होय. असावधपणा ही निद्रा आणि सावधानता हा जागेपणा होय."

शिवभारतकारांनीं प्रबल राज्यसंस्थेच्या उभारणीसाठीं कोणत्या गोष्टींचा सावधपणें अंगीकार आवश्यक आहे व कोणत्या गोष्टींचा

परित्याग आवश्यक आहे याचें येथें अत्यंत मार्मिकपणानें दिग्दर्शन केलें आहे.

राज्ययंत्राच्या या सप्तांगांचें स्वरूप प्रथम पाहून नंतर शिव-छत्रपतींच्या स्वराज्य मंदिराची ओळख करून घेणें उचित ठरेल. या सप्तांगांपैकीं राजा हें सर्वांत महत्त्वाचें अंग आहे.

## राजा

येथें राजा या शब्दाचा खरा अर्थ नेता असा आहे. अभिषिक्त अथवा विशिष्ट जातींत उत्पन्न झालेला अथवा कुलपरंपरेनें सिंहासनावर अधिष्ठित होणारा पुरुष येथें विवक्षित नाहीं. जो कोणी राष्ट्राचा नेता असेल तोच या ठिकाणीं राजा या शब्दानें विवक्षित आहे. शुक्रनीतींत म्हटलें आहे --

> अभिषिक्तोऽनभिषिक्तो नृपत्वं तु यदाप्नुयात् ।
> बुद्धया बलेन शौर्येण ततो नीत्यानुपालयेत् ।
> प्रजाः सर्वाः प्रतिदिनमच्छिद्रो दण्डधृक् सदा ।।२७
>
> —(शुक्रनीति अ. १)

"बुद्धि, बल आणि शौर्य यांच्या योगानें एखाद्यास राज्यपद प्राप्त झालें तर त्याला राज्याभिषेक झालेला असो वा नसो, त्यानें नीतीस अनुसरून राज्यदंड धारण करावा व प्रजेवर नेहमीं निर्दोषपणें राज्य करावें."

राज्ययंत्राचा हा नेता अथवा राजा कसा असावा याचें विवेचन करतांना शुक्राचार्य म्हणतात --

> दान्तः शूरश्च शस्त्रास्त्रकुशलोऽरिनिषूदनः ।
> अस्वतंत्रश्च मेधावी ज्ञानविज्ञानसंयुतः ।।८४
> नीचहीनो दीर्घदर्शी वृद्धसेवी सुनीतियुक् ।
> गुणिजुष्टस्तु यो राजा स ज्ञेयो देवतांशकः ।।८५
> बलवान् बुद्धिमान् शूरो यो हि युक्तपराक्रमी ।
> वित्तपूर्णां महीं भुंक्ते स भूपो भूपतिर्भवेत् ।।१७५

पराक्रमो बलं बुद्धिः शौर्यमेते वरा गुणाः ।
एभिर्हीनोऽन्यगुणयुङ् महीभुक् सधनोऽपि च ।
महीं स्वल्पां नैव भुंक्ते द्राक् स्वराज्याद्विनश्यति ।।१७९
पूज्यस्त्वेभिर्गुणैर्भूपो न भूपः कुलसंभवः ।
न कुलैः पूज्यते यादृग् बलशौर्यपराक्रमैः ।।१८२

—(शुक्रनीति अ. १)

"इंद्रिय दमन करणारा, शूर, शस्त्रास्त्रांत कुशल, शत्रूंचा निःपात करणारा, स्वैर न वागतां नीतीस अनुसरून वागणारा, बुद्धिमान्, शास्त्रें व कला जाणणारा, ज्ञानविज्ञानयुक्त, नीचांची संगति न धरणारा, दूरदृष्टि, वृद्धांना मान देणारा, सुनीतियुक्त, गुणी लोकांना पूज्य वाटणारा असा राजा देवतांचा अंश अथवा दैवी गुणसंपत्तीचा पुरुष आहे असें समजावें. जो मनुष्य बलवान्, बुद्धिमान् व शूर असून योग्य वेळीं पराक्रम गाजवितो, तोच या सर्व द्रव्यांनीं समृद्ध अशा पृथ्वीचा उपभोग घेतो आणि तिचा अधिपति होतो. पराक्रम, शक्ति, बुद्धिमत्ता, आणि शौर्य हे श्रेष्ठ गुण आहेत. या गुणांचा अभाव ज्या राजाच्या ठिकाणीं आहे तो संपत्तिमान् व इतर गुणांनीं युक्त असला तरी एखाद्या लहान प्रदेशावरहि राज्य करूं शकत नाहीं. इतकेंच नव्हें तर लवकरच राज्यभ्रष्ट होतो. राजाला त्याच्या ठिकाणीं असलेल्या गुणांमुळें मान प्राप्त होतो; जन्मानें राजेपणा प्राप्त होत नसतो. राजा स्वतःच्या अंगच्या बलशौर्यादि गुणांमुळें जसा पूज्य होतो तसा राजकुलांत जन्मल्यामुळें पूज्य होत नाहीं."

मनू-याज्ञवल्क्य इत्यादि प्राचीन समाजशास्त्रज्ञांनीं राष्ट्रनेत्याच्या गुणांचें वर्णन असेंच केलें आहे.

या दैवी गुणसंपत्तीच्या पुरुषानें विपत्तींत शत्रूशीं वागतांना कोणतें धोरण ठेवावें याचें शुक्राचार्य पुढीलप्रमाणें दिग्दर्शन करतात.

संश्रयेद् गिरिदुर्गाणि महापदि नृपस्सदा ।।३८३
तदाश्रयाद् दस्युवृत्त्या स्वराज्यं तु समाहरेत् ।।३८४

विवाहदानयज्ञार्थं विनाप्यष्टांशशेषितम् ।
सर्वतस्तु हरेत् दस्युरसतामखिलं धनम् ।।३८५
नैकत्र संवसेन्नित्यं विश्वसेन्नैव कं प्रति ।
सदैव सावधानः स्यात् प्राणनाशं न चिंतयेत् ।।३८६
क्रूरकर्मा सदोद्युक्तो निर्घृणो दस्युकर्मसु ।
विमुखः परदारेषु कुलकन्याप्रदूषणे ।।३८७

—(शुक्रनीति अ. १)

" राजानें डोंगरी किल्ल्यांचा आपत्कालीं व संकटसमयीं सदैव आश्रय करून, तेथून आपलें गेलेलें राज्य छापे घालून व आक्रमणा-मागून आक्रमणें करून परत मिळवावें. शत्रूंनीं लग्न, दान आणि यज्ञ यांच्यासाठीं एकत्रित केलेलें धन असलें तरी तें खुशाल लुटावें. त्यानें एके ठिकाणीं कधीं राहूं नये; आणि कोणावरहि पूर्ण विश्वास ठेवूं नये. स्वत:च्या संरक्षणासंबंधांत अत्यंत सावध असावें पण मृत्यूचें भय मात्र बाळगूं नये. लूट करण्यांत दक्षता, कठोरपणा व कडकपणा धारण करावा, पण परस्त्रिया व कुलीन कन्या यांच्या विषयींची अभिलाषा मात्र चुकून सुद्धां ठेवूं नये."

राष्ट्राचें नेतृपद म्हणजे केवढी तारेवरची कसरत आहे हें यावरून ध्यानांत येईल. उपर्युक्त गुण आपल्या अंगीं बाणण्यासाठीं नेत्यानें प्रथम स्वत:चें जीवन अनुशासनबद्ध व संयमी करणें आवश्यक आहे. शुक्रनीतींत म्हटलें आहे —

"आत्मानं प्रथमं राजा विनयेनोपपादयेत् ।
ततः पुत्रान् ततोऽमात्यान् ततो भृत्यांस्ततः प्रजाः ।।९२
कामः क्रोधस्तथा मोहो लोभो मानो मदस्तथा ।
षड्वर्गमुत्सृजेदेनमस्मिंस्त्यक्ते सुखी नृपः ।।१४३
प्रेर्यमाणोऽप्यसद्वृत्तैर्नाकार्येषु प्रवर्तते ।
श्रुत्या स्मृत्या लोकतश्च मनसा साधु निश्चितम् ।।१४९
जितेन्द्रियस्य नृपतेर्नीतिशास्त्रानुसारिणः ।
भवन्त्युच्चलिता लक्ष्म्यः कीर्तयश्च नभस्पृशः ।।१५१

—(शुक्रनीति अ. १)

"राजानें प्रथम स्वत: कडक अनुशासनपूर्ण आचरण करावें. नंतर त्यानें आपले पुत्र, अमात्य, नोकर व प्रजा यांना क्रमाक्रमानें अनुशासनबद्ध जीवन घालवावयास शिकवावें. काम, क्रोध, लोभ, मोह, अभिमान व मद या सहा दोषांपासून राजानें अलिप्त रहावें; म्हणजे तो सुखी होतो. असा राजा दुष्ट बुद्धीच्या लोकांनीं कितीहि प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला तरीहि वाईट कृत्यें करण्यास प्रवृत्त होत नाहीं. जितेन्द्रिय व शास्त्रानुसार वागणाऱ्या राजाचें वैभव वाढतें व त्याची कीर्तिध्वजा आकाशमंडलाला स्पर्श करण्याइतकी उत्तुंग होते."

## अमात्य

राज्ययंत्राच्या सात अंगांपैकीं मूर्धास्थानी असलेल्या नेतृत्वाचें स्वरूप पाहिल्यावर इतर अंगांकडे वळणें अवश्य आहे. राज्ययंत्राचें दुसरें महत्वाचें अंग म्हणजे अमात्य होत. नेता जर सर्वसमर्थ असेल तर अमात्यांची आवश्यकताच काय? असा स्वाभाविकपणेंच प्रश्न उत्पन्न होईल. त्याचें उत्तर विख्यात समाजशास्त्रज्ञ राजर्षि मनु यांनीं पुढीलप्रमाणें दिलेलें असून त्याचाच अनुवाद शुक्रनीतींत करण्यांत आलेला आहे.

अपि यत्सुकरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ।
विशेपतोऽसहायेन किंनु राज्यं महोदयम् ॥५५

––(मनुस्मृति अ. ७)

"छोटेसें कार्य सुद्धां कोणाच्या साहाय्यावांचून एकाकी माणसाला करणें अशक्य होऊन बसतें. तेथें राज्यासारखें लक्षावधि लोकांच्या कल्याणाचें केंद्र असणारें महत्कार्य केवळ एकट्या व्यक्तीकडून, मग ती केवढीहि थोर असली तरी कसें होणें शक्य आहे?" म्हणून नेता केवढाहि थोर अथवा कर्तृत्ववान् असला तरी त्याला साहाय्यकांची नितान्त आवश्यकता आहे. राजाचे हे साहाय्यक म्हणजेच अमात्य होत. त्यांची संख्या किती असावी व स्वरूप काय असावें याचें स्पष्टीकरण करतांना मनु व शुक्र म्हणतात.

मौलान् शास्त्रविदः शूरान् लब्धलक्ष्यान् कुलोद्गतान् ।
सचिवान् सप्त चाष्टौ वा प्रकुर्वीत परीक्षितान् ।। ५४
— (मनुस्मृति अ. ७)

परीक्षकैर्द्रावयित्वा यथा स्वर्णं परीक्ष्यते ।
कर्मणा सहवासेन गुणैः शीलकुलादिभिः ।। ५४
भृत्यं परीक्षयेन्नित्यं विश्वास्यं विश्वसेत् तदा ।
नैव जातिर्न च कुलं केवलं लक्षयेदपि ।। ५५
कर्मशीलगुणाः पूज्यास्तथा जातिकुलेन हि ।
न जात्या न कुलेनैव श्रेष्ठत्वं प्रतिपद्यते ।। ५६
विवाहे भोजने नित्यं कुलजातिविवेचनम् ।
सत्यवाग्गुणसंपन्नस्तथाभिजनवान् धनी ।। ५७
सुकुलश्च सुशीलश्च सुकर्मा च निरालसः ।
यथा करोत्यात्मकार्यं स्वामिकार्यं ततोऽधिकम् ।। ५८
—(शुक्रनीति अ. २)

"पितृपितामहादिकांच्या परंपरेनें सेवा करणारे दृष्ट व अदृष्टार्थ शास्त्रास जाणणारे, पराक्रमी, आयुध विद्येंत निपुण असलेले, शुद्ध कुलांत उत्पन्न झालेले व ज्यांची सूक्ष्म परीक्षा घेण्यांत आलेली आहे असे सात किंवा आठ मंत्री राजानें नियुक्त करावे. ज्याप्रमाणें सोन्याचें मोल, त्याचा कस, रंग, आवाज, मृदुता इत्यादींवरून व त्याचा रस करून ठरविण्यांत येतें त्याचप्रमाणें अधिकाऱ्यांचें मोल त्यांचें कर्तृत्व, त्यांच्या सहवासांत असणारे लोक, त्यांचे गुण, त्यांचा स्वभाव, त्यांच्या संबंधी, त्यांचे नातलग यांच्यावरून ठरवावें. ते विश्वासास पात्र आहेत असें ठरल्यावरच त्यांच्यावर विश्वास टाकावा, नुसती अधिकाऱ्यांची जात व कूळ येवढेंच लक्षांत ठेवून त्यांची नेमणूक करूं नये. शील, गुणसंपन्नता आणि कर्तृत्व यांना महत्व द्यावें. नुसत्या जातीनें व कुळानें श्रेष्ठत्व येत नाहीं. लग्नाच्या व भोजनाच्या प्रसंगीं जात लक्षांत घेत असतात; राजकारणांत नव्हे. सत्यवचनी व गुणवान्, विख्यात, द्रव्यवान्, चांगल्या कुळांत जन्मास आलेला, चांगल्या संबंधीचा, सत्कर्म करणारा,

आपल्या स्वतःच्या कामापेक्षां आपल्या धन्याचें काम अधिक निरलसपणें व कायावाचामनेंकरून करणारा अशा माणसालाच अधिकारी म्हणून नियुक्त करावें."

या मंत्र्यांनीं नेत्याला वाममार्गापासून आवरावयाचें व ध्येय-मार्गावर आणावयाचें असतें. मंत्र्यांच्या ठिकाणीं यासाठीं मनोधैर्य असावें लागतें. शुक्राचार्यांनीं म्हटलें आहे.

न बिभेति नृपो येभ्यस्तैः स्यात् किं राज्यवर्धनम् ।
यथालङ्कारवस्त्राद्यैः स्त्रियो भूष्यास्तथा हि ते ।।
राज्यं प्रजा बलं कोशः सुनृपत्वं न वर्धितम् ।
यन्मन्त्रतो विनाशस्तैर्मंत्रिभिः किं प्रयोजनम् ।।

"राजाला ज्यांची भीति वाटत नाहीं अशा मंत्रिवर्गाकडून राज्याची अभिवृद्धि होण्याची शक्यता नाहीं. वस्त्रालंकारादिकांनीं भूषविलेल्या स्त्रिया व पदाधिकार भूषित करणारे हे मंत्री सारखेच होत. ज्या मंत्र्यांच्या हातून राज्य, प्रजा, बल, कोश व राजसत्ता वृद्धिगत होत नाहींत आणि ज्यांच्या मार्गदर्शनानें राज्याचा केवळ नाश मात्र होतो अशा मंत्र्यांचें प्रयोजनच काय आहे? ते असून नसून सारखेच आहेत."

शिवकालीन मुत्सद्द्यांना या राज्यविषयक सप्तांगांची उत्कृष्ट कल्पना होती हें आपण शिवभारतांतील उताऱ्यावरून मागें पाहिलेंच आहे. पण ती केवळ स्थूलमानानें कल्पना होती असें नव्हे; तर शिवछत्रपतींची अष्टप्रधानसंस्था याच तत्त्वावर निर्माण झालेली असून राज्ययंत्राच्या या अंगांची भारतीय राजनीत्यनुसार परिपूर्ण कल्पना शिवकालीन मुत्सद्द्यांना होती असें सिद्ध करणारे पुरावे आहेत. शिवकालीन विख्यात मुत्सद्दी रामचंद्रपंत अमात्य आपल्या आज्ञापत्रांत अमात्यांचें वर्णन करतांना म्हणतात —

"राज्यामध्यें हुजुरात, गड, किल्ले, लष्कर, हशम यांचा नियम करणें, प्रजार्ति निवारण करणें, प्रजा संरक्षणें, धर्माधर्म विचारून पाहणें, यथाकालीं दान देणें, सेवक लोकांचीं केलीं वेतनें पावविणें,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि. ........................
क्रमांक नोंद दि.



समयाचे समयीं प्रजेपासून करभार घेणें, संपादिले पदार्थांचा संग्रह करणें, नित्यानित्य राज्याचा आयव्यय पाहणें, स्थूल, सूक्ष्म, अतीत, अनागत कार्य सुचोन त्या त्या कार्यानुरूप अगोदर त्याचा विवेक योजणें, न्यायान्याय पाहून यथाशास्त्र शासनाचा निश्चय करून शासन करणें, परचक्रादि आले अरिष्टाचा परिहार योजणें, देशोदेशीं वार्तिक पेरून वर्तमान आणविणें, समयविशेषे शत्रूशीं संधि, विग्रह, उपेक्षा, जें कर्तव्य त्याचा यथोचित विवेक करून तदनुरूप प्रवर्तन करणें, आहे राज्य याचें संरक्षण करून नूतन संपादणें, अंतःपुरादि नाजूक नियम ते यथोचित संरक्षणें, संभावितांचें मान वाढवून क्षुद्रांप नियमांवर ठेवणें, दैवतें, दैवतैकनिष्ठ सुब्राह्मण यांचे प्रसाद संपादणें व अधर्मप्रवृत्ति मोडून धर्माभिवृद्धि करून शाश्वत लोक अर्जिणें इत्यादि हीं सकल नृपकार्येंच होत. परंतु केवळ नृपानें स्वतांच इतकाहि धंदा करीन म्हणता होतो असें नाहीं. याकरितां हा सकलहि राज्यभार चालवावयाकारणें आपले प्रतिनिधि प्रधान करावे लागतात." —(आज्ञापत्र पान १८)

"प्रधान म्हणजे राज्यरक्षणगृहाचे स्तंभ आहेत. राज्य ते यथोचित संरक्षून नूतन निर्माण करणें याचें मुख्य कारण, प्रधान म्हणजे नृपसत्ताप्रसारक; प्रधान म्हणजे प्रजापालन धर्म-संरक्षणाचे अध्यक्ष, प्रधान म्हणजे राजपदजनित अन्यायसागराची मर्यादा. प्रधान म्हणजे हस्तीचे अंकुश; किंबहुना प्रधान म्हणजे इहलोकी राज्यकृत्य संपादनामुळें नृपाची विश्रांत; धर्मप्रतिपालनामुळें परलोकपंथीची दीपिका; प्रधानापेक्षां राजे लोकास इतर आप्त व अधिकोत्तर किमपि नाहीं. सकलसेवकापेक्षा प्रधानाचा बहुमान विशेष आहे. प्रधान हेच राजेलोकांची बाजू, प्रधानच राजबन्धु, असे राजेलोकी पूर्ण चित्तांत आणून लाक्षणिक प्रधान पाहून करावे. त्यावर संपूर्ण राज्यभार ठेवावा. प्रधान म्हणजे सरकारकून, त्याची भीड सर्वांपेक्षा अधिक ठेवावी. आधी सरकारकुनी देणें ती बहुत विचारून मनुष्यपरीक्षा करून, केल्या कर्मामध्ये फिरून आपणांस संकट न पडे असें बरें शोधून, लक्षणिक मनुष्य वाढवीत वाढवीत नियोजित

कार्यधुरंधर पाहून मग सरकारकुनी सांगावी. सरकारकून पदवी सामान्य नव्हे. नृपपदवी उपरी सरकारकुनाची पदवी. तदनुरूपच यथोक्त नृपगुणतुल्य सरकारकुनाचे गुण असावे. सरकारकून म्हणजे कुलीन, कृतकर्म, कार्याकार्यविचक्षण, शास्त्रज्ञ, राजधर्मविशारद, पापभीरु, स्वामीसेवक भाव जाणून वर्तेत, दैवतैकनिष्ठ, दर्शनीय, सदय, शूर, सधैर्य, समंजस, स्फुट वक्ता, निरालस्य, निराग्रही, निर्व्यसनी, निष्पाप, पुण्यशील, उद्योगशील, अतीत, अनागत कार्य-सूचक, अलालुची, अहिंसक, सामदानभेददण्ड, संधिविग्रह, मित्रभेद, मित्रसंधानादि अनेक उपाये, शत्रुसंधानी चतुर इत्यादि गुणसंपन्न असें पाहून त्यांस सरकारकुनी सांगावी. या गुणाविपरीत अंगहीन, चोरी करणार, खोटे बोलणार अशास इतर मामले न सांगावे. तेथे सरकारकुनी तर महत्पदे, न सांगावी, एतदर्थी संशय काय आहे? कुलीन, सन्मान्य अथवा थोर, परंतु परंपरागत सेवक, ज्याचे वडिलाही सेवा बहुत केल्या आहेत अशास नावाजावे हें उचित आहे. परंतु तो जर दुराग्रही, म्हटली गोष्ट सोडावयाचा नव्हे, अथवा व्यसनी, अथवा एकाचे बहुमाने दुःख पावणारा, ईर्षा करणारा असा असला तर जैसें कंटकपुष्प वृक्षाचीं पुष्पें मात्र घेऊन कंटकाचा परित्याग करिजे तो या न्याये त्याचा परित्याग करावा. त्यास परिच्छिन्न घरी बसवून त्याचे भाऊबंदांत जो लायक असेल त्यास हाती धरावे. सर्वगुणसंपन्न मनुष्य आणि साधारण हुद्दा करीत आहे त्यास गुणविशिष्टतेकरिता एकाएकी सरकारकुनी सांगू नये. गुणविशिष्ट आढळलिया त्यांस क्रमानें वाढवीत वाढवीत मग सरकारकुनी सांगावी."

—(आज्ञापत्र पृष्ठ १८, १९)

प्रत्यक्ष राज्यांगांत नांवानें ज्याचा समावेश नाहीं पण भारतीय राजनीतिशास्त्रज्ञांना ज्याचें महत्त्व वाटे असा पुरुष म्हणजे युवराज होय. युवराज हा राज्यपदाचा उत्तराधिकारी असल्यामुळें त्याचें महत्त्व विशेष आहे. अमात्य या दुसऱ्या राज्यांगांत त्याचा समावेश करावा असा भारतीय राजनीतिशास्त्रज्ञांचा संकेत दिसतो. शुक्राचार्य युवराज कसा असावा याचें वर्णन करतांना म्हणतात.

युवराजोऽमात्यगणो भुजावेतौ महीभुजः ।
तावेव नयने कर्णौ दक्षसव्यौ क्रमात् स्मृतौ ॥
प्राप्यापि युवराजत्वं प्राप्नुयाद्विकृतिं न च ।
स्वसंपत्तिमदान्नैव मातरं पितरं गुरुम् ॥
भ्रातरं भगिनीं वापि ह्यन्यान् वा राजवल्लभान् ।
महाजनांस्तथा राष्ट्रे नावमन्येन्न पीडयेत् ॥
एवं गृहाविरोधेन राजपुत्रो वसन् गृहे ॥
विद्यया कर्मणा शीलैः प्रजाः संरंजयन् मुदा ।
त्यागी च सत्त्वसंपन्नः सर्वान् कुर्याद्वशे स्वके ॥

—(शुक्रनीति अ. २)

" युवराज आणि अमात्यसमूह हे राज्याचे हात समजावे. कोणी त्यांस राजाचे उजवे व डावे नेत्र व कान क्रमानें समजतात. युवराजपद प्राप्त झाल्यावर युवराजानें विकारवश होऊं नये. स्वतःचे आई, बाप, गुरु, भाऊ, बहीण, राजाचे मर्जीतील व राजास प्रिय असलेले लोक, तसेंच राष्ट्रांतील मोठमोठे लोक व सामान्य प्रजाजन यांचा अपमान अगर छळ करूं नये. युवराजानें घरांत राहून कुटुंबांत ऐक्य राखावें; व आपल्या विद्वत्तेनें, वर्तनानें व सद्गुणांनीं प्रजेची प्रीति संपादन करावी. तसेंच त्यानें स्वार्थत्यागी वृत्ति धारण करून व सत्त्वगुण प्रकट करून सर्वांना आपलेसें करून सोडावें."

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या राज्ययंत्राच्या सप्तांगांपैकीं हें अंग सुघटित करण्याचा त्यांनीं शक्य तितका सर्व प्रयत्न केला. स्वराज्याचा युवराज संभाजी याला त्यांनीं योग्य वळण लावण्यासाठीं काय काय केलें याचें सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत पुढील प्रमाणें उद्बोधक वर्णन आहे.

" सर्व अमात्य राजाचा वाम भुज, युवराज राजपुत्र हा सव्य भुज असें आहे; त्याअर्थीं हे सुशिक्षित असावे म्हणून लेखनादि अभ्यास करविला; आणि उत्तम वृद्ध सेवक समीप ठेवले. दण्डनीति राजधर्म हे सांगितले. बहुत नम्रत्वेंकरून सकलगुणसंपन्न असोन सर्व मंत्री व सेवकजन उत्तम यांचा सहवास व युक्ति श्रवण करून

राज्यांतील माहितगारी व राज्य करण्याच्या युक्ति अवगत करून घ्यावया; त्यांची मान्यता रक्षावी; उत्तम जनांची संगति करावी. नीच व दुर्व्यसनी यांची कदापि मैत्री करू नये; यांचा सहवास न करावा असे बोध करविले. राजाचे कुळीं अनीतिमान् पुत्र निर्माण झाला म्हणजे तें राज्य व कुळ शीघ्र क्षयास जातें म्हणोन बहुत नीतीनें रक्षिणें तसें रक्षिलें आणि मातबर सरकारकून प्रौढ याज-पाशी वसावे, दरबारांत बसावे, कारभारांत माहित होत जातें ऐसें सांगून करविते झाले. श्रीरामदासस्वामी यांचें दर्शन सहवास करण्यास पाठविलें होतें."

—(सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र, पृ. २७१–७२)

या शिक्षणामुळें संभाजी राजांच्या अंगीं बुधभूषणासारखा राजनीतिशास्त्रपर ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिण्याची पात्रता उत्पन्न झाली होती. त्यांची शैक्षणिक योग्यता किती होती याची कल्पना बुधभूषण ग्रंथांत त्यांनीं जो स्वतःच आपला परिचय करून दिलेला आहे त्यावरून येते. संभाजी महाराज लिहितात ––

तस्यात्मजः शंभुरिति प्रसिद्धः समस्तसामन्तशिरोवतंसः ।
यः काव्यसाहित्यपुराणगीतकोदण्डविद्यार्णवपारगामी ।।
विविच्य शास्त्राणि पुरातनानामादाय तेभ्यः खलु सोयऽमर्थम् ।
करोति सद्ग्रंथममुं नृपालः स शंभुवर्मा बुधभूषणाख्यम् ।।

"त्या शिवछत्रपतींचा शंभु या नांवानें प्रसिद्ध असलेला मुलगा सर्व मांडलिक राजांच्या मूर्धस्थानीं असून तो काव्यालंकारशास्त्र, पुराणें, संगीतशास्त्र आणि धनुर्वेद यांच्यांत पारंगत आहे. त्या शंभूनें पुरातन राजनीतिशास्त्रज्ञांनीं राजनीतिशास्त्रावर केलेल्या ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांतील सिद्धान्तांचा संग्रह म्हणून हा बुधभूषण नांवाचा ग्रंथ केलेला आहे.

छत्रपति शिवाजी महाराजांच्या राज्याचें हें युवराजरूपी अंग मात्र दुर्दैवानें विकल राहिलें. संभाजीनें बुधभूषण लिहिलें असलें तरी स्वतः त्याला दुर्दैवानें बुध कांहीं होतां आलें नाहीं. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच होऊन त्याला शत्रूच्या अधीन होणें भाग पडलें.

## सुहृद

असो. राज्याचें तिसरें महत्वाचें अंग म्हणजे सुहृद् होय. सुहृद म्हणजेच मित्र. पण राजाला खरोखरी मित्र असतात का हा मोठा विचारार्ह प्रश्न आहे. शुक्राचार्यांनी मित्रांचे व शत्रूंचेचार चार प्रकार सांगितले आहेत. मित्रांचे चार प्रकार पुढीलप्रमाणें --

(१) हित करणारा (२) दुसऱ्याकडून हित करविणारा (३) दुसऱ्यानें हित केल्यास त्यासंबंधीं आनन्द व्यक्त करणारा व (४) दुसरा हित करीत असल्यास त्या कार्यांत त्याला साह्य करणारा.

असेच शत्रूंचेहि पुढील चार प्रकार आहेत --

(१) स्वत: अपाय करणारा (२) दुसऱ्याकडून अपाय करविणारा (३) दुसऱ्यानें अपाय केल्यास आनंद प्रदर्शित करणारा व (४) दुसऱ्याला अपाय करण्याच्या कामीं साह्य करणारा.

वस्तुत: राजा कोणाचाहि खरा मित्र नसतो व राजाचेहि कोणी खरे मित्र नसतात. शुक्रांनीं म्हटलें आहे --

शूरस्योत्थानशीलस्य बलनीतिमतस्सदा ।
सर्वेऽमित्रा गूढवैरा नृपा: कालप्रतीक्षका: ॥ ८
भवन्तीति किमाश्चर्यं राज्यलुब्धा न ते हि किम् ।
न राज्ञो विद्यते मित्रं राजा मित्रं न कस्य वै ॥ ९
प्राय: कृत्रिममित्रे ते भवतश्च परस्परम् ।
केचित्स्वभावतो मित्रा: शत्रव: सन्ति सर्वदा ॥१०

—(शुक्रनीति अ. ४. प्र १)

"सर्व राजे एकमेकांचे गुप्त रीतीनें शत्रु असून शूर, सद्गुणी आणि बलसंपन्न लोकांकडून आपलें कार्य साधून घेण्याच्या मागें असतात यांत काय नवल आहे? राज्याचा लोभ त्यांच्या ठिकाणीं नसतो काय? राजांचा कोणी मित्र नसतो, व ते कोणाचे मित्र होऊं शकत नाहींत. कित्येकदा राजे परस्परांचे कृत्रिम मित्र होऊं शकतात, परंतु सदासर्वदा ते परस्परांचे शत्रु असतात.

अशा स्थितींत त्यांनीं कसें वागावें याचा निर्णय करतांना शुक्र म्हणतात.

आधिकाले भवेच्छत्रु: कार्यार्थी मित्रबंधुता ।
उभयो: कार्यसिद्धिश्च यूय यूयं वयं वयम् ।।

" आपला इष्ट काल आहे तरी शत्रुत्व करावें, समानता आहे तरी मित्रत्व, बंधुत्व वाढवावें, नम्रत्वें वागावें; आपलाच उत्कर्ष झाला तर तुम्ही ते तुम्ही, आम्ही ते आम्ही, ओळखच देऊं नये.

—(शिवदिग्विजय, पृष्ठ १२५)

## धन

चवथें महत्वाचें राज्यांग म्हणजे विपुल धन अथवा कोश होय. राज्याचा कणा कोशावर अथवा विपुल धनावरच अवलंबून आहे. हें धन हव्या त्या मार्गानें मिळवावें असें राजनीतिशास्त्राचें स्पष्ट मत आहे. संपत्तीचा आधार नसला तर राज्यकर्त्यांचीं स्वप्नें हवेंत विरून जातात. उभारलेलीं साहाय्यक सैन्यें बंडाळी करून नेत्यांचीच हत्या करावयास प्रवृत्त होतात; व जवळ केलेले मित्र शत्रु होतात. म्हणून महाभारतकारांनीं असा सिद्धान्त सांगितला आहे कीं, 'राज्ञ: कोशक्षयादेव जायते बलसंक्षय: ।' कोश क्षीण झाला कीं, राजाचें सैनिकसामर्थ्य क्षीण झालेंच म्हणून समजावें. शुक्रनीतींत कोशाचें वर्णन करतांना असें म्हटलें आहे कीं, " सैन्याचें मूळ कोश व कोशाचें मूळ सैन्य होय. महाभारताच्या राजधर्मप्रकरणांत म्हटलें आहे,

राज्ञ: कोशबलं मूलं कोशमूलं पुनर्बलम् ।
तन्मूलं सर्वधर्माणां धर्ममूला: पुन: प्रजा: ।।३५
नान्यानपीडयित्वेह कोश: शक्य: कुतो बलम् ।
तदर्थं पीडयित्वा च दोषं प्राप्तुं न सोऽर्हति ।।
अकार्यमपि यज्ञार्थं क्रियते यज्ञकर्मसु ।
एतस्मात्कारणाद्राजा न दोषं प्राप्तुमर्हति ।।३७

—(महाभारत, शांतिपर्व, अ. १३०)

" कोश आणि सैन्य हेच काय ते राजाचे आधारस्तंभ असून कोश हाच सैन्यास मूलभूत आहे. सैन्य हें सर्वधर्मांच्या प्रवृत्तीस मूळ आधार असून धर्म हाच प्रजांचा मुख्य आधार आहे. सारांश, कोश

हाच प्रजेचा मुख्य आधार असल्यामुळें राजानें त्याची अभिवृद्धि केली पाहिजे. इतरांना पीडा दिल्यावांचून कोशाचें संपादन होणें अशक्य आहे. कोशच नाहीं तेथें सैन्य कोठून मिळणार? यास्तव कोशसंपादनार्थ जरी इतरांना पीडा द्यावी लागली तरी ती दोषास्पद होऊं शकणार नाहीं. यज्ञसिद्धीसाठीं यज्ञकर्मांत हिंसादि अकार्यं करावें लागतें, त्याप्रमाणेंच प्रजापालनाच्या कामीं द्रव्यसंपादनार्थं पीडा द्यावी लागली म्हणून राजाला दोष लागणें शक्य नाहीं." कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत असें प्रतिपादन केलें आहे कीं, "एखाद्या वेळीं सैन्य कमी असलें तर कोशाच्या भरंवशावर नवें सैन्य उभारतां येतें, पण कोशच नसेल तर असलेलें समर्थ सैन्य उलटून आपलाच विनाश केल्याविना राहात नाहीं." पगाराच्या बाकीच्या प्रश्नावरच राघोबादादांना सुमेरसिंग व खरकसिंग गारद्यांना फितविता आलें, व भर राजवाड्यांत नारायणराव पेशव्यांची हत्या सहजासहजीं होऊं शकली. शिंद्यांशीं झालेल्या संघर्षांत कोशबळाच्या भरंवशावरच नाना फडणीस टिकूं शकला. सैनिकांचें वेतन व पारितोषिकें सेनाधिकाऱ्यांचें वेतन, परसैन्यांत पंचमस्तंभी कारस्थानें करणाऱ्या विभागावर होणारा व्यय, सुधारणा व नव्या निर्माणयोजना, सैनिक साहित्याचें संपादन, शत्रूंच्या हालचालींची बित्तंबातमी मिळविण्यासाठीं ओतावा लागणारा पैसा व शत्रुप्रदेशांत उपद्रव करण्यासाठीं करावा लागणारा व्यय या सर्व गोष्टींसाठीं अपार कोशसंग्रह असणें आवश्यक आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत सैन्य विभागावर करावा लागणाऱ्या व्ययाचा तपशील पाहण्यासारखा आहे. रामचंद्र दीक्षितार, यांनीं आपल्या 'वॉर इन् एन्शंट इंडिया' या ग्रंथांत म्हटलें आहे.

"चंद्रगुप्त मौर्याजवळ सहा लक्ष पायदळ, तीस सहस्र घोडदळ व नऊ सहस्र गजदळ एवढें खडें सैन्य असे. हा खर्चच सोळा कोटि रुपये असे. अधिकाऱ्यांचें वेतन, सर सेनापतीचें वेतन, नौदल, शस्त्रास्त्रें व इतर युद्ध साहित्य आणि अनेक सैनिकउपांगें मिळून चंद्रगुप्ताचा या विभागावरील व्यय कित्येक कोटी पौंड होईल."

## राष्ट्र

राज्याचें यानंतरचें महत्त्वाचें अंग म्हणजे राष्ट्र होय. याचा अर्थ नेत्यानें अथवा राजानें आपल्या चारित्र्यबळानें साऱ्या राष्ट्रांत आपल्याविषयीं अशी निष्ठा उत्पन्न केली पाहिजे कीं, त्याचें व्यक्तिमत्त्व हें प्रजांचें महान् श्रद्धाकेंद्र होऊन राहील. त्याची प्रजा श्रद्धेनेंच त्याच्या विरुद्ध पंचमस्तंभी कारस्थानांत कधीं समाविष्ट न झाली पाहिजे व त्याच्या प्रत्येक योजनेंत प्रजेचा त्याला पाठिंबा मिळाला पाहिजे.

## दुर्ग

राज्याचें सहावें महत्त्वाचें अंग म्हणजे दुर्ग होत. दुर्ग म्हणजे गड अथवा किल्ला. या अंगाचें महत्त्व विशद करतांना शुक्रनीतींत म्हटलें आहे.

एक: शतं योधयति दुर्गस्थोऽस्त्रधरो यदि ।
शतं दशसहस्राणि तस्मात् दुर्गं समाश्रयेत ।। १०
—(शुक्रनीति ४–६–१०)

"दुर्गाच्या आश्रयानें एक सशस्त्र मनुष्य शंभरांशीं लढूं शकतो. शंभर माणसें दशसहस्र लोकांशीं लढूं शकतात. यास्तव राजानें गडांचा आश्रय करावा."

स्वराज्यसाधना संबंधांत शिवछत्रपतींना या दुर्गांचा विलक्षण उपयोग झालेला आहे. त्यांच्या समकालीन त्यांचा चरित्रलेखक कवींद्र परमानंद यानें विख्यात मुत्सद्दी सोनोपंत डबीर यांनीं स्वराज्यसाधनाच्या प्रारंभींच्या काळीं शिवछत्रपतींना केलेला या सेनांगाच्या महत्त्वाच्या संबंधींचा जो उपदेश वर्णन केला आहे तो या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे.

पश्य येदिलदिल्लीन्द्रौ विषयानन्तरौ तव ।
यवनौ बलिनौ तुभ्यं द्रुह्यतोऽहर्निशं नृप ।।५७
अमू उभयतो यस्य द्रुपणौ रोपणौ तव ।
तस्य नूनमिहस्थाने स्थिति: स्थाने न संप्रति ।।५८

अतोऽतिदुर्गमं स्थानमास्थाय जगतीपते ।
यतस्व जगतीं जेतुं किमजय्यं शिवस्य ते ।।५९
कंठकालेन कैलासः स मेरुः शंबपाणिना ।
अभ्यन्तरमपां पत्युः शिश्रिये दनुजारिणा ।।६०
न दुर्गं दुर्गमित्येव दुर्गमं मन्यते जनः ।
तस्य दुर्गमता सैव यत्प्रभुस्तस्य दुर्गमः ।।६१
प्रभुणा दुर्गमं दुर्गं प्रभुदुर्गेण दुर्गमः ।
अदुर्गमात्वादुभयो विद्विषन्नेव दुर्गमः ।।६२
सन्ति ये यानि दुर्गाणि तानि सर्वाणि सर्वथा ।
यथा सुदुर्गमाणि स्युस्तथा सद्यो विधीयताम् ।।६३

--(शिवभारत अ. १६)

"महाराज, पहा, तुमच्या देशास लागूनच असलेले आदिलशहा व दिल्लीचा बादशहा हे बलाढ्य मुसलमान तुमचा रात्रंदिवस द्रोह करीत आहेत. हे दोघे शत्रु दोन्हीकडून ज्या तुमच्यावर क्रुद्ध झाले आहेत त्या तुमचें येथें राहणें हें सांप्रत खरोखर योग्य नाहीं. म्हणून महाराज, अत्यंत दुर्गम अशा स्थानीं राहून जग जिंकण्याचा यत्न करा; तुम्हां शिवाजीमहाराजांना काय अजिक्य आहे? शंकरानें कैलासाचा, इंद्रानें मेरूचा आणि विष्णूनें समुद्राचा आश्रय केला आहे. दुर्गाला केवळ दुर्ग म्हणूनच लोक दुर्गम मानीत नाहींत, तर त्याचा स्वामी दुर्गम असणें हीच त्याची दुर्गमता होय. प्रभूमुळें दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळें प्रभु दुर्गम होतो. दोघांच्याहि अभावीं शत्रूच दुर्गम होतो. तुमचे जे दुर्ग आहेत ते सर्व ज्यायोगें सर्वस्वी अत्यंत दुर्गम होतील असें तावडतोब करा."

रामचंद्रपंत अमात्यांनीं शिवरायांच्या स्वराज्यमंदिरासंबंधांत विवेचन करतांना या राज्यांगाचें अतिशय हृदयंगम वर्णन केलें आहे. अमात्य लिहितात--"संपूर्ण राज्याचें सार ते दुर्ग. दुर्ग नसतां मोकला देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उद्वस होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असें कोणास म्हणावें? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांणीं आधी देशामध्यें दुर्ग बांधून

तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलें परचक्रसंकट दुर्गाश्रयीं परिहार केलें. हें राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनीं गडांवरूनच निर्माण केलें. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधिले, तसेंच जलदुर्ग बांधिले; त्यावरून आक्रमण करीत करीत आले तरी अहिवंतापासून कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादिलें. औरंगजेबासारखा महाशत्रु चालून येऊन विजापूर-भागानगरासारखीं महासंस्थानें आक्रमिलीं, संपूर्ण तीस-बत्तीस वर्षेपर्यंत या राज्याशीं अतिश्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होतें? परंतु राज्यांत किल्ले होते म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिलें. पुढें पूर्ववत् करावयास अवकाश नव्हता. या उपरहि ज्यापेक्षां राज्य संरक्षण करणें आहे, त्यापेक्षां अधिकोत्तर साधनीं स्वतः गड किल्ल्यांची उपेक्षा न करतां परमसावधपणें असतील त्या गडकिल्ल्यांची यथोक्त मजबुती करावी. नूतन देश साधणें त्या देशांत जीं स्थळें असतील तीं महत्प्रयत्नें हस्तवश करावीं. ज्या देशांत गडकोट नसतील त्या देशांत आपले राज्याचे सरहद्दीपासून पुढें जबरदस्तीनें नूतन स्थळें बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयीं सेना ठेवून पुढील देश स्वसाधनें वश करावा. असें करीत करीत राज्य वाढवावें. गडकोटाचा आश्रय नसतां फौजेच्यानें परमुलखीं टिकाव धरून राहवत नाहीं. फौजेविरहित परमुलखीं प्रवेश होणेंच नाहीं. इतक्याचें कारण तें गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरितां ज्यांस राज्य पाहिजे त्यांणीं गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचें बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपलीं वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण, असें पूर्ण चित्तांत आणून, कोणाचे भरंवशावर न राहतां आहे त्याचें संरक्षण करणें व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतांच करावा. कोणाचा विश्वास मानूं नये."  —(अमात्यांची राजनीति, पृ. २७, २८)

अमात्यांसारख्या कर्त्या राजकारणी पुरुषाच्या उपयुक्त विवेचनावरून दुर्ग या विशिष्ट राज्यांगाचें तत्कालीन महत्त्व ध्यानांत येईल. आतां लढाऊ विमानांच्यामुळें हें दुर्गाचें महत्त्व उरलेलें नाहीं.

## सेना

यानंतरचें सातवें व शेवटचें महत्त्वाचें असें राज्यसंस्थेचें अंग म्हणजे सेना होय. तिचें महत्त्व सांगतांना शुक्राचार्य म्हणतात—

सैन्याद्विना नैव राज्यं न धनं न पराक्रमः ।
सेना शस्त्रास्त्रसंयुक्तमनुष्यादिगणात्मिका ।। १

— (शुक्रनीति, अ. ४, प्र. ७)

"सैन्यावांचून राज्य, धन, आणि पराक्रम प्राप्त होत नाहींत. शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशीं माणसें आणि त्यांस उपयोगी जनावरें यांचा समूह म्हणजे सैन्य."

हें सैन्य उभारण्याचें सामान्य सूत्र कोणतें असावें याचें शुक्रनीतींत पुढीलप्रमाणें दिग्दर्शन केलें आहे. आजच्याहि सैन्य उभारणींत हें तत्त्व अनुस्यूत आहे असें दिसून येईल. तें तत्त्व असें—

सेनां युद्धे नियुञ्जीत प्रत्यनीकविनाशिनीम् ।
न युञ्ज्याद्रिपुराष्ट्रस्थां मिथः स्वद्वेषिणीं न च ।। ५

— (शुक्रनीति, अ. ५)

"राजानें शत्रुसैन्याचा नाश करणारें सैन्य ठेवावें. आपल्या शत्रूच्या देशांतील लोकांना अथवा जे आपल्यास गुप्तपणें विरोध करणारे किंवा आपसांत द्वेष करणारे आहेत त्यांना राजानें आपल्या सैन्यांत नोकरीस ठेवूं नये."

शिवछत्रपतींच्या काळीं आणखी एका नव्या राज्यांगाचा उदय झालेला होता. ते राज्यांग म्हणजे नौदल होय. या राज्यांगाचें महत्त्व विशद करतांना रामचंद्रपंत अमात्य आपल्या राजनीति या ग्रंथांत म्हणतात, "आरमार म्हणजे एक स्वतंत्र राज्यांगच आहे. जसें ज्यास अश्वबल तशी त्याची वृद्धिप्रथा आहे. तद्वतच ज्याच्या-जवळ आरमार त्याचा समुद्र." — (आज्ञापत्र, पृ. ३६)

आरमाराचा समावेश सेना या राज्यांगांतच करावयास प्रत्यवाय नाहीं. पूर्वीचें गजसैन्य जाऊन त्याऐवजीं नवें नौदल आलें. त्यामुळें सप्तांग ही राज्याची परिभाषा बदलविण्याचें कांहीं कारण नाहीं.

असो. या सात स्तंभावरच कोणतेंहि राज्यमंदिर दृढतेनें उभें राहतें; व त्यांपैकीं कोणतेंहि एक अंग विकल झालें कीं राज्यमंदिर धुळीस मिळावयास वेळ लागत नाहीं. याचा उल्लेख मागें केलाच आहे. शिवछत्रपतींच्या स्वराज्य मंदिराचे हे सातहि आधारस्तंभ कसे होते हें पाहणें उद्‌बोधक ठरेल. त्याकडे पुढील प्रकरणांत वळूं.

✦ ✦ ✦

प्रकरण आठवें

# शिवछत्रपतींचें विभूतिमत्त्व

मागच्या प्रकरणांत वर्णिलेल्या सप्तांग राज्याचें मूर्धास्थान अथवा मस्तक म्हणजे राजा व आत्मा म्हणजे धर्म होय. शिवछत्रपतींच्या स्वराज्याच्या मूर्धास्थानीं अथवा-नेतृपदीं स्वतः शिवछत्रपति हेच होते. त्यामुळें या सप्तांग स्वराज्यमंदिराचें स्वरूप पहावयाचें म्हणजे सर्वप्रथम श्रीशिवछत्रपतींच्या विभूतिमत्त्वाचें दर्शन घेतलें पाहिजे. हें दर्शन घेण्याचा प्रयत्न केला तर काय प्रत्यय येतो ?

## विभूतिमत्त्वाचा प्रभाव

राष्ट्राचें नेतृत्व अथवा राजेपण हें कोणकोणत्या गुणांनीं युक्त असतें याचें वर्णन मागच्या प्रकरणांत सविस्तरपणें केलेंच आहे. त्यांत गुणी लोकांना व श्रेष्ठांनाहि पूज्य वाटणें या एका विशेषाचा निर्देश आहे. शिवछत्रपतींच्या विभूतिमत्त्वाकडे पाहिलें तर त्यांच्या-नंतरचे व त्यांच्या अलौकिक कर्तृत्वावरून त्यांच्या विभूतिमत्त्वाची

कल्पना आलेले लोक हेच केवळ त्यांना श्रेष्ठ समजत असें नव्हे, तर त्यांच्या प्रत्यक्ष सहवासांत असलेले, त्यांचे हर्षामर्ष प्रत्यक्ष अनुभविलेले व त्यांचें कर्तृत्व घडत असतांना त्यांत भाग घेणारे लोकहि त्यांना ईश्वरी अवतार समजत असें दिसून येतें. त्यांचा प्रत्यक्ष मुलगा छत्रपति संभाजी हा त्यांच्या आज्ञेवरून कांहीं दिवस पन्हाळ्यावर बंदींत होता. एकदां तर महाराजांवर रुसून तो प्रत्यक्ष दिल्हेरखानालाहि जाऊन मिळाला. महाराजांच्या हर्षामर्षांचे अनुभव घेतलेला हा पुरुष सहसा अपमान विसरणारा नव्हता. इतकेंच नव्हे, तर क्रोध हा त्याचा स्थायी भाव होता. पण तो श्रीमन्महाराजांसंबंधीं लिहितांना आपल्या बुधभूषण नांवाच्या राजनीतिशास्त्रावरील ग्रंथांत धर्मरक्षणार्थ झालेला महाविष्णूचा अवतार म्हणून त्यांचा निर्देश करतो. संभाजी म्हणतो.

कलिकालभुजंगमावलीढं निखिलं धर्ममवेक्ष्य विक्लवं यः।
जगतः पतिरंशतोवतापो (तीर्णः) स शिवच्छत्रपतिर्जयत्यजेयः॥

येन क्षोणितले कलावविकले बुद्धावतारंगते।
गोपालेऽखिलवर्णधर्मनिचये म्लेच्छैः समासादिते॥
भूयस्तत्परिपालनाय सकलाञ्जित्वा सुरद्वेषिणः।
स्वे स्वे वर्गपथे चिरेण विहिता विप्रादिवर्णाः क्रमात्॥

"कलियुगरूपी अजगरानें संपूर्ण धर्म गिळंकृत केलेला पाहून जगदीश्वरानें धर्मसंरक्षणार्थ शिवछत्रपति नांवाचा जो अजेय अंशावतार घेतला त्याचा जयजयकार असो. ज्या वेळीं भगवान् श्रीकृष्णांच्या नंतर ईश्वरानें बुद्धावतार घेऊन अकर्मण्यता प्रकट केली व त्याचा परिणाम म्हणून म्लेच्छांनीं वर्णाश्रमधर्म नष्ट केला तेव्हां पुनश्च त्या धर्माच्या परिपालनासाठीं हा शिवछत्रपतींचा अवतार धारण केला व त्या अवतारांत सर्व देवद्वेष्ट्यांचा पराभव करून ब्राह्मणादि सर्व वर्णांची आपल्या वर्णमार्गावर स्थापना केली."

शहाजीचा राजसभेंतील कवि जयराम पिंड्ये (विख्यात 'राधा-माधव विलासचंपूचा कर्ता) यानें आपल्या काव्यांत बहलोल-खानाच्याच तोंडीं कल्कीचा अग्रदूत म्हणून शिवछत्रपतींचें वर्णन

घातलें आहे. शिवछत्रपतींच्या पराक्रमाच्या वार्ता ऐकून बहलोलखान म्हणतो ––

श्रूयते किल हिंदूनां शास्त्रे कैश्चिदुदाहृतम् ।
कल्की विष्ण्ववताराणां दशमः संभविष्यति ॥
छेत्स्यते तेन सर्वत्र व्याप्तं यावनमंडलम् ।
तस्यैव कल्किनस्तावदसावग्रे समागतः ।
दूतो वै प्रतिभात्यस्मान्यतोऽस्मन्निधनोद्यतः ॥

" असें ऐकलें आहे कीं, हिंदूंच्या शास्त्राप्रमाणें कल्की या नांवाचा विष्णूचा दहावा अवतार होणार असून तो विश्वांतील यच्चयावत् यवनांचा निःपात करणार आहे. आम्हांला असें वाटतें कीं, शिवाजी आमच्या निधनासाठीं उद्युक्त झालेला त्या कल्कीचा अग्रदूतच आहे.

शिवछत्रपतीचे सापत्न बंधु राजे व्यंकोजी यांचेशीं बोलतांना यात्र कवीनें शिवछत्रपतींचा उल्लेख पुढीलप्रमाणें केलेला आहे.

चरितं देववर्यस्य विष्णोरिव जगत्प्रभोः ।
कल्किनो निष्कलंकस्य तुरुष्कवरमर्दनम् ॥

" जगत्प्रभु विष्णूप्रमाणेंच त्याचा कल्की अवतार हा जो छत्रपति त्याचें वडयावडया यवनसेनापतींना धुळीस मिळविणारें चरित्र अतिशय रोमहर्षक आहे. " जयराम कवि हा निदान शिवछत्रपतीपासून दूर तरी राहात होता. पण शिवछत्रपतींच्या मंत्रिमंडळांत महत्त्वाचें स्थान असलेले व त्यांच्या आज्ञेवरून राजव्यवहारकोशाची निर्मिति करणारे रघुनाथ पंडित यांनीं आपल्या राजव्यवहारकोशाच्या प्रस्तावनेंत हीच कल्पना मांडलेली आहे. शिव, विष्णु यांचा या प्रसंगानें एक काल्पनिक संवाद त्यांनीं वर्णन केला आहे, त्याचें तात्पर्य असें : एकदां यवन दैत्यांच्या तापानें पृथ्वी ब्रह्मदेवाकडे शरण गेली असतां ब्रह्मदेवानें तिला घेऊन वैकुंठलोकीं प्रयाण केलें. ब्रह्मदेवानें भगवान् महाविष्णूंना अशी प्रार्थना केली कीं ––

न यावन दुर्नयजातमेषां सर्वंसहापि क्षमते विसोढुम् ।
तद्भारमस्याः परिहर्तुमाशु म्लेच्छापहाराय हरे यतेथाः ॥

" यवनांचा हा दुर्नय सर्वंसहा असलेल्या पृथ्वीला सुद्धां सहन होऊं शकत नाहीं. म्हणून तिचा भार नाहींसा करण्यासाठीं आपण शक्य तितक्या लवकर अवतार धारण करावा. त्यावर भगवान् महाविष्णूंनीं त्यांना असें सुचविलें कीं, 'कार्ये महत्यत्र नियोजयामः चन्द्रार्धचूडं वयमेव गत्वा' (मी नेहमींच अवतार घेतों. पण या महत्कार्याच्या सिद्धीसाठीं भगवान् महादेवांची नियुक्ति करावी असें मला वाटतें. मी स्वतःच तुमच्याबरोबर त्यांच्याकडे येतो. त्याप्रमाणें भगवान् महाविष्णु पृथ्वी व ब्रह्मदेवाला घेऊन भगवान् महादेवाकडे आले व त्यांनीं त्यांना अवतार घेण्याविषयीं गळ घातली. पण भगवान् महादेवांनीं पुढील युक्तिवाद करून भगवान् महाविष्णूंनाच अवतार घ्यावयास भाग पाडलें. त्यांनीं सांगितलें --

पार्थ प्रति प्राक् तव 'धर्महानौ सृजेयमात्मान'मिति प्रतिज्ञा।
जगत्सुगीतैव तदत्र कार्षीः कार्येऽधुना माधव मा विचारम्॥

" पूर्वी आपणच अर्जुनाशीं बोलतांना आपल्या भगवद्गीता नांवाच्या संवादांत धर्महानीचा प्रसंग उद्भवला तर मी स्वतः अवतार घेईन अशी प्रतिज्ञा केली आहे. आतां त्या प्रतिज्ञेच्या परिपूर्तीचा अनायासें प्रसंग उद्भवलेला असतांना तो साधणें हेंच उचित आहे; तरी आपणच अवतार घ्या. "

शिवाजी महाराजांच्या समकालीन त्यांच्याकडून सन्मान मिळविलेला हिंदीचा महाकवि भूषण यानें म्हटलें आहे --

को दाता को रनचढो को जगपालनहार।
कवि भूषण उत्तर दियो सिव नृप हरि अवतार॥

" या जगांत सर्वश्रेष्ठ दाता कोण? अग्रगण्य शूर कोण? व जगाचें परिपालन करणारा कोण आहे? त्यावर कवि भूषण उत्तर देतो, राजा शिवाजी हाच हें सगळें कांहीं आहे. कारण तो महाविष्णूचा अवतार आहे. "

या कवींना व मुत्सद्द्यांनाच छत्रपति शिवाजी महाराजांसंबंधीं असें वाटत होतें असें नव्हे, तर त्यांच्या समकालीन असणाऱ्या

श्रीतुकाराम महाराजांसारख्या सर्वसंगपरित्याग केलेल्या व वाणी केवळ विठ्ठलचरणीं लीन केलेल्या संतश्रेष्ठाचीहि वाणी शिवछत्रपतींच्या वर्णनांत रंगू शकली. श्रीमन्महाराजांनीं त्यांना पाठविलेले अलंकार परत पाठवितांना लिहिलेल्या पत्रांत श्री तुकाराम महाराज लिहितात ---

सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा। अनाथाच्या काजा साह्य होशी।।
तुका म्हणे राया धन्यधन्य स्थिति। त्रिलोक्यी हें ख्याती कीर्ती तुझी।।

शिवछत्रपतींचे सद्‌गुरु वीतराग श्रीसमर्थ रामदास यांनीं स्वतः शिवछत्रपतींनाच अफझलखानाच्या वधानंतर पाठविलेल्या पत्रांत आपल्या ज्या भावना उत्कटपणें व्यक्त केल्या आहेत, त्या पाहण्यासारख्या आहेत ---

या भूमंडळाच्या ठायीं। धर्मरक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्रधर्म राहिला कांही। तुम्हाकारणे।।
कांही धर्मकृत्यें चालती। आश्रित होवोन कितेक असती।
धन्यधन्य तुमची कीर्ति। विश्वी विस्तारली।।
कितेक दुष्ट संहारिला। कितेकासी धाक सूटला।
कितेकासी आश्रयो झाला। शिवकल्याण राजा।।
निश्चयाचा महामेरु। बहुतजनासी आधारु।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।
परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयासी।
तयाचे गुण महत्वासी। . . . . . . . . . ''

शिवछत्रपतींच्या समकालीन श्रेष्ठांतील श्रेष्ठ लोकांनीं त्यांच्याविषयीं हे जे उदगार काढले आहेत त्यांवरून गुणीजुष्ट अथवा गुणवान् लोकांच्या म्हणजेच श्रेष्ठ लोकांच्या अंतःकरणांत त्यांनीं कोणतें स्थान मिळविलें होतें याची परिपूर्ण कल्पना येते. त्याचप्रमाणें मागच्या परिच्छेदांत वर्णन केलेल्या राज्याच्या सप्तांगांपैकीं राष्ट्र अथवा प्रजा हें अंग शिवछत्रपतींच्या स्वराज्यासंबंधांत किती सुदृढ होतें याचीहि कल्पना येते. शिवछत्रपति हे आपल्या राष्ट्राचें

त्यांच्या जीवनकाळींच महान् श्रद्धाकेंद्र होऊन राहिले होते. ते आग्र्याच्या बंदिवासांत असतांना मिर्झा राजा जयसिंग व दिलेरखान यांना स्वराज्य मोडून काढतां आलें नाहीं व एक नेताजीचा अपवाद सोडला तर त्यांच्या परिसरांतील महत्त्वाच्या अशा कोणत्याहि व्यक्तीला स्वराज्यांतून फोडतां आलें नाहीं. यांतच आपल्या या महान् नेत्यावरील त्यांच्या अनुयायांची दृढ श्रद्धा व्यक्त होते. निराशेच्या घन अंधकारांत महाविष्णूच्या सुदर्शनचक्राप्रमाणें त्यांचीच 'भवानी' काय ती तळपली. मग लोकांना त्यांच्याविषयीं एक महान् श्रद्धाकेन्द्र म्हणून आकर्षण वाटणें किती साहजिक आहे!

## राज्याचा आत्मा – धर्म

सप्तांगक राज्यसंस्थेचा आत्मा धर्म हा आहे याचा उल्लेख सोनोपंत डबीरांनीं शिवछत्रपतींना केलेल्या उपदेशांत आलाच आहे. शिवछत्रपतींच्या स्वराज्याचा आत्मा धर्म हा होता हें राजाराम छत्रपतींच्या काळांतील पत्रव्यवहारावरून सुद्धां उघड होतें. "हे महाराष्ट्र राज्य म्हणजे देवाब्राह्मणांचें आहे" "हें राज्य देवाब्राह्मणाचे आशिर्वादाचें आहे." "धर्मस्थापना विशेषात्कारें चालवणें हें स्वामीस अगत्य आहे." या वाक्यांनीं संपविलेलीं राजारामकालीन पत्रें आम्ही प्रस्तुत ग्रंथाच्या पूर्वार्धांत (पृ. ४१८ व ४१९) उद्धृत केलीं आहेत. शिवछत्रपतींनीं श्रीसमर्थांना चाफळ संस्थानला सनद देतांना जें पत्र लिहिलें आहे तेंहि पूर्वार्धांत समग्र उद्धृत केलें आहे. (पृ. ४१६ व ४१७) त्यावरून स्वराज्याचा आत्मा धर्म हा कसा होता हें स्पष्ट होतें. तो पत्रव्यवहार पुनश्च येथें उद्धृत करण्याचें कारण नाहीं. तथापि त्यांतील एक परिच्छेद येथें उद्धृत करतो.

"श्रीसद्गुरुवर्य, सकलतीर्थरूप, श्रीकैवल्यधाम, श्रीमहाराज स्वामींचे सेवेशीं —

चरणरज शिवाजीराजे यांनी चरणांवर मस्तक ठेवून विज्ञापना जे मजवर कृपा करून सनाथ केलें. आज्ञा केली कीं 'तुमचा मुख्य

धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देवब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळण, रक्षण करावें. हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्ही जे मनीं धराल तें श्री सिद्धीस पावील. त्याजवरून जो जो उद्योग सुरु केला व दुष्ट तुरुख लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करून राज्यपरंपरा अक्षय चाले ऐसी स्थळें दुर्घट करावीं ऐसें जें जें मनीं धरलें तें तें स्वामींनी आशिर्वादाप्रमाणें पूर्ण केलें."

## धार्मिक व्यक्तिजीवन

स्वराज्याचा आत्मा धर्म असण्याचें कारण त्याच्या मूर्धस्थानीं असलेले शिवाजी महाराज प्रवृत्तीनें स्वतःच धर्मप्रवण व नीतिप्रवण होते हें होय. भारतांतील प्राचीन पुण्यश्लोक राजर्षींच्या परंपरेंत शोभून दिसण्यासारखें त्यांचें व्यक्तिमत्त्व होतें. त्यांची दिनचर्या मल्हार रामराव चिटणीसकृत शिवचरित्रांत दिली आहे. ती पाहिली तरी त्यांच्या दैनंदिन जीवनांत धार्मिक गोष्टींना किती महत्त्वाचें स्थान होतें याची कल्पना येते. चिटणीस लिहितात ––

"उषःकालीं उठावें. ते समयीं गायक यांनी स्तुतिपाठ करावे. वीणा, मृदंग इत्यादि मंगलवाद्यें, नगारखाना यांचें श्रवण करून उठावें. कांहीं प्रातःस्मरण करून सर्व कर्ता भगवान हे संकल्प करून शौच विधियुक्त करावा, नंतर गोसेवन दर्शन, मंगलालंभन करून स्नान गंगादि महानदी उदकें (उदक घालून) करावें. जप ध्यान देवतार्चन करावें, ते समयीं सर्व शिष्ट ब्राह्मण सभापण्डित याणी धर्मचर्चा करावी. पुराण श्रवण करून चार घटका दिवसास तिलक वस्त्रें अलंकार, भूषणें घेऊन तिरंदाजी व निशाण एक घटका करून सभेस यावें. तेथें सर्व कार्यकर्ते कारभारी वगैरे याणी आपआपली कार्यें विचारून करावी. जे जे दर्शनास येतील त्याजकडे कृपायुक्त अवलोकन करून त्यांचे मुजरे घ्यावे. कोणाकडे अवलोकन करून किंचित हास्य करावें. कोणाशीं कांहीं भाषण करावें, कोणास कार्यें सांगावी. ऐशीं सर्वांचीं अंतःकरणें वेधून घ्यावीं. सर्वांस भासावें कीं माझे ठायीं कृपा विशेष आहे. ऐसा सर्वत्र आलेल्यांचा गौरव करावा.

दहा घटका दिवस आलियावरी दोन चार घटका विविक्तस्थानीं ज्याचा करणें त्याशीं मन्त्रविचार करावा. नंतर चार घटका दिवसास ब्राह्मणभोजनाचें उदक सोडून, नैवेद्य करून, सर्वपंक्तिभोजन करणार त्यांसहवर्तमान भोजन करावें. आणि तांबूल घेऊन चार घटका पुन: मंत्र, सभेचे ठायीं पत्रें आली व पाठविणें ती अवलोकन करणें व कार्य योजना व मागील दिवशीं आयव्यय झाला, दुसरे दिवशीं किती करणें हें पाहून चार घटका अंत:पुरांत वामकुक्ष करावा. बारा घटका दिवस राहतां पुन: सभेस येऊन सर्व कारखाने, महाल, यांची चौकशी, पाहाणें, आपण जाऊन करावें. सभा करून न्याय मनसुबी जाली केली ती अवलोकन करून दादफिर्याद मनास आणावी.

सहा चार घटका दिवस रहातां बाहेर स्वारी बाग, आराम, देवालयें अथवा कारखाने यांत जावी. घोडी फेरणें, बोथाटच्या वगैरे खेळून सायंकाळ जाला असतां येऊन सभेस बसून सर्वांचे मुजरे घेऊन दोन घटका रात्रीं जपध्यान करून कांही पुराण व दासबोध दोन समास श्रवण करून भोजन करावें. तांबूल घेऊन सभेस दोन घटका बसोन कारभार विचार करून एकांतीं चार घटका बसावें. बातमी, नाजूक कामें, पत्रें आलीं तीं व चोर बातमी हेर ठेऊन आली तीं व द्रव्याचें, धान्याचे निरख हें श्रवण करून अंत:-पुरांत जावें."-(चिटणीसविरचित शिवछत्रपतींचें चरित्र, पृ. १८७-८८)

राज्ययंत्राचा नेता शक्यतोंवर सर्वच व्यसनांपासून मुक्त असावा. विशेषत: मृगया, द्यूत व पान यांच्या तो अहारीं गेला तर राज्याचा विनाश होतो असें शुक्राचार्यांनीं म्हटलें आहे. ते म्हणतात--

> मृगयाक्षास्तथा पानं गर्हितानि महीभुजाम् ।
> दुष्टास्तेभ्यस्तु विपदा: पाण्डुनैषधवृष्णिषु ॥ १४२
>
> --(शुक्रनीति, अ. १)

" मृगया, द्यूत व मद्यपान हीं राजास निंद्य म्हणून म्हटलीं आहेत. कारण त्यांपासून क्रमानें पाण्डु, नल व यादव यांना विपत्ति प्राप्त झाल्याचें दिसतें."

शिवछत्रपति या सर्व व्यसनांपासून अलिप्त होते. सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत म्हटलें आहे --

" तसेंच कोणतेंहि दुर्व्यसन नाहींच नाहीं. शिकार करणें (तो) राजधर्म. ते महिन्या दो महिन्या एखादे समयीं (करावी.) त्याचे कारखानदार चित्तेबाज, पावदामे व पक्षीबाज, लगड, बावरा, जाळी वगैरे (जल) चार, स्थलचर, खेचर म्हणजे आकाश अशी तीन प्रकारची शिकार, त्यांत मनुष्यास पीडा करणार दुष्ट पशु प्रयत्नें व्याघ्र, वृक मारावे. मेध्य मृगादिक कार्यकारण श्राद्धादिकांस वधावे. ऐसें करिते झाले." (पृ. १९१)

महाराजांस मद्य प्राशन करणार व कैफी मनुष्य यांचा बहुत त्रास. सेवेचे लोक व समीप राहणारे यांनीं कैफ सेवन केला तरी तत्काळ त्यास शिक्षा करीत. वहुतच (कैफ) केला, व्यसनी जाला तरी सेवेंतून दूर करावें. कलाल यांची दुकाने सरकार आज्ञेखेरीज असो नयेत. ठेवावी त्याजवरी सरकार पागा व कारखाने यांस (मद्य) परवानगीनें चिठीने देत जावे (अशी सक्ती होती.)"

— (सप्तप्रकरणात्मक चरित्र पृ. २७३-२७४)

शिवछत्रपतींच्या या वैशिष्टयाचा विचार केला तर जगांतील विक्रमशाली महापुरुषांत ते केवळ अद्वितीय ठरतात. सारे मुसलमान सत्ताधारी तर मद्याच्या पिंपांत तळापर्यंत बुडालेले असल्यामुळें महाराजांच्या तुलनेंत ते अतिशयच क्षुद्र भासतात. पण अलेक्झांडर, सीझर व नेपोलियन हे विजेते सुद्धां मद्य व मदिराक्षींचे दास होते ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे पुण्यश्लोक छत्रपतींचें ऋषितुल्य जीवन केवळ अद्वितीय ठरतें.

आपल्या अष्टप्रधान संस्थेंत छत्रपति शिवाजीमहाराजांनीं पंडितराव हें एक स्वतंत्र अमात्यपद उत्पन्न केलें होतें. 'इतिहास आणि ऐतिहासिक' मासिकांत पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकाच्या २३ व्या पानावर एक जाबता राज्याभिषेक शके १ आनंद नाम संवत्सर, या वर्षाचा दिल्लेला आहे. या शिवकालीन अस्सल

कागदांत अष्टप्रधानांच्या कामाचा तपशील दिलेला आहे. त्यांतील पंडितरावांच्या कामाचा तपशील पुढीलप्रमाणें आहे.

"पंडितराव यांणी सर्व धर्माधिकार धर्म अधर्म पाहून विवक्षा करावी, शिष्टेचें सत्कार करावे, आचार, व्यवहार, प्रायश्चित-पत्र होतील त्यांजवर संमत-चिन्ह करावें. दान प्रसंग शांति, अनुष्ठान तत्काळ करावें."

मल्हार रामराव चिटणीसकृत शिवचरित्रांत व अमात्यांच्या राजनीतींतहि हाच तपशील वेगळ्या भाषेंत आहे. धर्माचें एक स्वतंत्र खातें उत्पन्न करून त्याच्या अधिकाऱ्याला अमात्य संस्थेंत स्थान देणारे छत्रपति शिवराय हे पहिलेच नृपति होत.

## डोळस धर्मनिष्ठा

छत्रपति शिवाजी महाराज हे धर्मनिष्ठ होते. याचा अर्थ धर्म म्हणून हव्या त्या राष्ट्रनाशक परंपरेचा ते अंधळेपणानें स्वीकार करीत होते असा नव्हे. राष्ट्रजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत त्यांनीं जो अपूर्व द्रष्टेपणा प्रकट केलेला आहे त्यांत धर्माचें क्षेत्रहि अपवाद नाहीं. मुसलमानांचें व अन्य लोकांचें तत्कालीन आक्रमण हें केवळ राजनैतिक स्वरूपाचें नसून त्यांना या राष्ट्राच्या जीवनशक्तीचा—धर्माचा व संस्कृतीचा— संपूर्णपणें विनाश करावयाचा होता व त्यासाठीं त्यांनीं बळाच्या धर्मांतराचें साधन उपयोगांत आणलें होतें. त्याचा त्यांना विलक्षण उपयोग होत होता. हिंदुधर्माच्या तत्कालीन धुरीणांनीं बळानें बाटविलेल्या आपल्या असंख्य बांधवांना व भगिनींना आपलीं दारें सदाचीं बंद करून टाकल्यामुळें परधर्मीयांनीं केलेल्या आक्रमणावर हिंदूंच्या जवळ प्रतिकार नाहीं हें त्यांना पक्कें माहीत होतें. शिवाय अगतिकतेमुळें परधर्मांत गेलेल्या लोकांना त्यांच्या नव्या धर्मबांधवांना चिकटून राहिल्याविना दुसरें गत्यंतरच नसे. यामुळें आपोआपच या देशांत नवे नवे अराष्ट्रीय पंचमस्तंभ निर्माण होत होते. या गोष्टीचें सविस्तर व सप्रमाण विवेचन

आम्ही पूर्वार्धांत केलेलें असल्यामुळें येथें त्याचा विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं. या स्थितींत याला शतावधि वर्षांत जें प्रत्युत्तर मिळालें नाहीं तें छत्रपति शिवाजी महाराजांनीं देऊन अपूर्व द्रष्टेपणा प्रकट केलेला आहे. बळानें धर्मांतरित केलेल्या स्वबांधवांना श्रीशिवछत्रपतींनीं हिंदुधर्माचीं दारें पुन्हां धैर्यानें मोकळीं केलीं व एका नवीन युगाची ललकारी दिली.

फलटणच्या निंबाळकरांच्या घराण्यांतील तोलदार पुरुष बजाजी निंबाळकर याला विजापूरच्या आदिलशाहीनें बळानें बाटविलें होतें. शिवछत्रपतींनीं त्याला शुद्ध तर करून घेतलेंच; पण त्याच्याशीं आपला सोईरीक संबंध प्रस्थापित करून, शुद्धीकृतांचें समाजांत स्थान काय हा जो प्रश्न नेहमींच उत्पन्न होतो त्याचें अत्यंत चपखल उत्तर स्वतःच्या आचरणानेंच दिलें. दुसरें महत्त्वाचें उदाहरण 'प्रति शिवाजी' म्हणून गाजलेल्या नेताजी पालकराचें होय. नेताजी पालकर हा शिवछत्रपतींचा एक धुरंधर सेनापति होता. जयसिंगाच्या स्वराज्यावरील स्वारीच्या वेळीं प्रथम तो रुसून विजापूरकरांकडे व त्यानंतर मोंगलांच्याकडे गेला. शिवाजी महाराज आग्र्याहून औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन निसटल्यावर 'प्रति शिवाजी' म्हणून गाजलेल्या नेताजीवर त्याचा सूड घ्यावा म्हणून औरंगजेबानें नेताजीला जयसिंगाकडून बंदी करून दिल्लीला आणलें व बळानें बाटविलें. त्यानंतर त्याला त्यानें काबूलच्या रणक्षेत्रावर बरेच दिवस गुंतवून ठेवून त्याचा स्वराज्याशीं असलेला संबंध पार तोडला. पुढें पुष्कळ वर्षांनीं बादशहानें दिलेरखानाचा दुय्यम म्हणून, मुसलमान झालेल्या नेताजीला शिवाजी महाराजांवर पाठविलें. पण नेताजीचें मन हिंदु होतें. महाराजांच्या चरणांशीं तें पूर्ण एकनिष्ठ होतें. एक दिवस त्यानें संधि साधून सेनानिवेशांतून पलायन केलें व सरळ महाराजांना भेटून त्यांच्या पायावर लोळण घेतली. महाराजांनीं त्याला शुद्ध करून आपल्या ज्ञातींत समाविष्ट करून घेतलें; व औरंगजेबाला झणझणीत प्रत्युत्तर दिलें.

शिवछत्रपतींच्या अमात्यांपैकीं पण्डितरावांकडे हें काम होतें; व छत्रपति संभाजी महाराजांच्या राजवटीपर्यंत हें खातें कार्यक्षम असल्याचा पुरावा मिळतो. अष्टप्रधानांपैकीं पण्डितरावांच्या पदावर असलेले मोरेश्वरपंत यांचें चैत्र शु. २ शके १६०८ चें एक आज्ञापत्र या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें आहे. तें पुढीलप्रमाणें —-

## पंडितरावांचें आज्ञापत्र.

गंगाधर रंगनाथ कुळकर्णी कसबे हरसूल हा ब्राह्मण मोंगलांपाशीं सेवेस होता. तो कित्येक दिवस चाकरी करीत असतां मोंगलांनीं त्याजवर बलात्कार करून त्यास बाटविलें. त्यानंतर त्यास तीन महिनेपर्यंत बंदिखान्यांत ठेवण्यांत आलें. त्यामुळें त्याचा तेथें यवनांशीं अन्नोदक संसर्ग घडला. पुढें तो एकंदर पांच वर्षे चाकरींत होता. त्या स्थितींत स्नानसंध्यादिक कर्म व्हावयाचें राहिलें. चाकरींत असतां त्याला भाग्याचें सुख लाभलें होतें, पण त्या सुखाचा वीट येऊन व सर्व दौलत संपत्ति टाकून तो रायगडावर राजश्री छत्रपति स्वामीपाशीं आला. आणि तेथें एक वर्ष राहून सरकारकडून, न्यायाधीश, उपाध्ये, दानाध्यक्ष व भले भले ब्राह्मण यांस 'दरबारी आपणांस प्रायश्चित द्या' असें म्हणून प्रायश्चित्त मागत होता.

"त्या उपरी राजश्री समस्त राज्यधुरंधर, वर्णाश्रम धर्मप्रतिपालक, छंदोगामात्य स्वामी यांस सर्व वर्तमान विदित झाले. त्यांनीं त्या ब्राह्मणाचे कष्ट व अनुताप बहुत देखून राजश्री छत्रपति स्वामीस वृत्तान्त विदित केला. तेव्हां छत्रपतींनी (संभाजी राजे) कृपाळू होऊन प्रायश्चित द्यावयास आज्ञा दिली. त्या उपरी आम्ही छंदोगामात्य (कलुशा) यांचे सभेसी समस्त विद्वद्वैदिक ब्राह्मणांचे संमतीनें मिताक्षरादि निबंध पाहून प्रायश्चित्त निर्वाह करून गंगाधर रंगनाथ याशीं प्रायश्चित्त संकल्प सांगोन श्री यात्रेस पाठविला. तेथें श्रीगिरि प्रदक्षिणा तीनशे साठ व यात्रा दोन्ही इतुके चतुर्विंशत्यब्द प्रायश्चित्त पूर्वोत्तरांगसहित केलें. प्रायश्चित्त यथासांग विधियुक्त केलें. त्यावरून आम्ही त्यास आपले पंक्तीस भोजन

देऊन शुद्धिपत्र दिले. हा ब्राह्मण शुद्ध झाला. संव्यवहार्य जाहाला. त्या उपरी यासी तुम्ही अन्नोदकादि व्यवहार यथापूर्व करीत जाणे. जो कोणी याच्या ब्राह्मण्याविषयीं संदेह मानील तो देवब्राह्मणद्रोही महापातकी जाणिजे." (या पत्राखालीं मोरेश्वर पण्डितराव, कवि कलश वैदिक, व प्रल्हाद निराजी यांच्या सह्या आहेत.)

—(इतिहासमंजरी पृष्ठ ११४)

## उदार धार्मिक धोरण

डोळसपणाबरोबरच सुव्यवस्था व हृदयाचें औदार्य हे शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाचे विशेष होते. स्वराज्यांतील सर्व देव देवस्थानांचा व सत्पुरुषांचा त्यांनीं परामर्श घेऊन सर्वांची नीट व्यवस्था करून दिली होती. त्यांत केवळ हिंदूच नव्हेत; तर परधर्मीय, मुसलमान यांचींहि पूजास्थानें व सत्पुरुष होते हें विशेष होय. सभोवतीचे यवन राजे हिंदू मंदिरांच्या विध्वंसासाठीं स्वतंत्र विभाग उघडून त्यावर अधिकाऱ्यांच्या नेमणुका करीत असल्याच्या दृश्याच्या पार्श्वभूमीवर, या कृत्यांचा सूड उगविण्याची संपूर्ण शक्यता असतांनाच्या परिस्थितींत सुद्धां शिवछत्रपतींनीं अंगीकारलेल्या या धोरणाकडे पाहिलें तर त्यांच्या सत्त्वस्थ संयमी वृत्तीसमोर व उदारमनस्कतेसमोर कोणीही नतमस्तक झाल्याविना राहणार नाहीं. मुसलमान म्हणून ते कुणाचे द्वेष्टे नव्हते. त्यांचें खड्ग पशुता व पाशविकता यांच्या विरुद्ध होतें याचें हें मोठेंच प्रत्यंतर होय. या दृष्टीनें निम्नलिखित उतारे पाहण्यासारखे आहेत. कृष्णाजी अनंत सभासदाच्या बखरींत म्हटलें आहे ––

"मुलखांत देव देवस्थानें जागजागां होतीं त्यांस दिवा, वत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविले. मुसलमानांचें पीर, मसिदी, ह्यांचे दिवावत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविले. वैदिक ब्राह्मण यांसि योगक्षेम ब्राह्मण विद्यावंत वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी, गांवोगावीं सत्पुरुष पाहून त्यांचे कुटुंब पाहून अन्नवस्त्र ज्यांस जे लागेल त्याप्रमाणें धान्य, द्रव्य त्यास

गांवचे गावीं माहली नेमून देऊन, साल दरसाल त्यांस कारकुनांनीं पाववावें. ब्राह्मणांनीं ते अन्न भक्षून, स्नान संध्या करून, राजियासि कल्याण चिंतून सुखरूप असावें असे गडकोट लष्कर हशम मुलुख हुजुरातीची चौकशी करून राज्य करीत चालले." (पृष्ठ २५–२६)

अष्टप्रधान संस्थेचें पुनरुज्जीवन व संस्कृत भाषेचें पुनरुज्जीवन हे दोन विषय आम्ही स्वतंत्रपणें पुढें स्वतंत्र प्रकरणांतून चर्चिणार असल्यामुळें येथें आम्ही त्यांचा स्वतंत्र निर्देश करीत नाहीं.

## धार्मिक आक्रमणाचा प्रतिकार

शिवछत्रपतींच्या धर्मपरायणतेचें केवळ हें विधायक स्वरूप होय. पण त्या काळीं केवळ विधायक कार्यपद्धतीनें भागण्यासारखें नसून सभोंवार चालू असलेल्या विध्वंसनाला तिखट तरवारीनें उत्तर देऊन "हिंदू धर्माचा संरक्षक जागा आहे; मदांध आक्रमका! सावध!" अशी शत्रुहृदयाचा भेद करणारी ललकारी देणें आवश्यक होतें. शिवछत्रपतींनीं हें तत्परतेनें करून दाखविलें म्हणूनच त्यांचें स्वधर्म संरक्षण खऱ्या अर्थानें मोलाचें ठरलें. ज्या ज्या परकीय सत्तांनीं हिंदूंचा धार्मिक छळ प्रारंभ केल्याचें ध्यानांत आलें व जेथें जेथें त्याचा प्रतिकार शक्य होता तेथें तेथें शिवछत्रपतींनीं तो कणखरपणें करून अत्याचार करणाऱ्यास वठणीवर आणलें आहे. गोव्यांत चाललेल्या हिंदूंच्या छळाचें उत्तर म्हणून त्याच्या लगतच्या प्रांतावर स्वारी करून शिवछत्रपतींनीं तेथें पोर्तुगीज पाद्र्यांचीं कशीं डोकीं उडविलीं व त्या प्रदेशाची धूळधाण करून पोर्तुगीज व्हॉइसरॉयला आपला अत्याचारी पवित्रा कसा बदलावयास लाविला याचा उल्लेख आम्ही 'शिवाजीचीं शत्रुराष्ट्रें' या प्रकरणांत केलेलाच आहे. जंजिरेकर शिद्दी हाहि हिंदुधर्माचा असाच कट्टर द्वेष्टा होता. शिवाजी महाराजांनीं तेवढ्यासाठींच त्याच्या निःपाताची प्रतिज्ञा केली होती. ती जरी सफळ झाली नाहीं तरी एका प्रसंगीं त्यांनीं शिद्द्यास वठणीवर आणलेंच. या शिद्द्याच्या प्रदेशाला लागून इंग्रजांचा प्रदेश होता. शिद्द्यानें आपले कांहीं लोक इंग्रजांच्या

प्रदेशांतून पाठवून शिवछत्रपतींच्या प्रदेशांतील कांहीं प्रतिष्ठित लोकांना बंदिवान करून नेलें. चौल येथील शिवाजी महाराजांच्या सुभेदारानें इंग्रजांचा महाराजांशीं स्नेहसंबंध असल्यामुळें इंग्रजांनीं आपल्या प्रदेशांतून हें कृत्य होऊं दिल्याविषयीं कागाळी केली पण तिचा विशेष उपयोग झाला नाहीं. तेव्हां शिवाजीमहाराजांनीं त्या प्रकरणांत लक्ष घालून इंग्रजांना धमकावणी दिली कीं, "आमच्या बंदिवान लोकांची तत्काळ सुटका न झाल्यास जळाऊ लाकडें अथवा दुसरा कोणताहि पदार्थ आपल्या प्रदेशांतून नेण्यास इंग्रजांना पूर्णपणें बंदी करण्यांत येईल, व त्यांच्याशीं असलेले आपले स्नेहसंबंध तोडून त्यांना शत्रुराष्ट्र या नात्यानें वागविण्यांत येईल. या धमकीचा मात्र परिणाम होऊन इंग्रजांनीं शिद्द्याला उलट धमकाविलें व संबंधित माणसांची तत्काळ मुक्तता करविली."

—(इंग्लिश रेकॉर्डस् ऑन शिवाजी भाग २ पृष्ठ १२८)

## औरंगजेबास पत्र

हिंदूंच्यावर अत्याचार करणाऱ्या सर्व सुलतानांत दिल्लीचा बादशहा औरंगजेब अग्रगण्य होता. या बादशहाविरुद्ध शिवछत्रपतींचा शेवटपर्यंत संघर्ष चालू होता. त्यांनीं त्याच्या डोळ्यासमोर स्वतंत्र राज्य उभें करून त्याचा पराभव केला असला तरी त्याला तंबी देऊन त्याच्या आक्रमक प्रवृत्ति बंद पाडणें शिवछत्रपतींच्या सामर्थ्याच्या मर्यादेबाहेरचें काम होतें. पण आग्र्याहून सुटका झाल्यावर औरंगजेबानें इ. स. १६७६ मध्यें जिझिया नांवाचा कर हिंदुमात्रावर बसविला. केवळ मुसलमान नसल्यामुळें द्यावा लागणारा कर विलक्षण अपमानास्पद होता हें उघड आहे. पण औरंगजेबाला या संबंधांत कोण विचारणार? पण शिवछत्रपतींनीं मात्र या संबंधांत त्याला विचारणा करणारें एक खरमरीत पत्र पाठविलें. तें पत्र मनन करण्यासारखें आहे. धुळ्याचे कै. भास्कर वामन भट यांनीं हें पत्र आपल्या 'शिवाजीची राजनीति' या प्रबंधांत उद्धृत केलेलें आहे. तें पत्र पुढीलप्रमाणें आहे.

"नेकीची इच्छा करणार, सत्यवचनी शिवाजी, ईश्वराची कृपा व बादशहाची मेहरबानी, हे सूर्याप्रमाणें प्रसिद्ध आहेत. त्यांचा धन्य-पणा मानून नंतर पत्र लिहितो. अभीष्टचिंतन करणार प्रारब्ध-योगानें हुजुरून निरोपाशिवाय आलो. परंतु यथायोग्य सेवेचे सांप्रदायांत हजर आहे. ती चांगली सेवा व उत्तम प्रयत्न, हिंदुस्थान व इराण व दुराण व रूम व श्याम येथील बादशहा व उमराव, मोगल व राजेलोक व राणे यांस व खेरीज सात मुलखाचे राहणार व खुशकी व तरी येथील मुशाफर यांस जाहीर आहेत. त्यापेक्षा आपलें अंतःकरण समुद्राप्रमाणें आहे. त्यांसहि विदित जाहलेंच असेल. त्यांज-करिता प्रत्येक गोष्टी ज्यांत आबालवृद्धांचें कल्याण राहील अशा लिहिल्या जातात. सांप्रत आम्ही इकडे आल्यावर पादशाही खजिना रिकामा जाहला व सारें द्रव्य खर्च जालें. त्याजकरिता हिंदुलोकांपासून जजियापट्टीचें द्रव्य उत्पन्न करून पादशाहीचा क्रम चालविला आहे ऐसें ऐकण्यांत आलें. त्यास पूर्वी अकबर बादशहा याणी न्यायाने बावन्न वर्षे राज्य केलें. याजमुळें इसवी व दाउदी व महमदी वगैरे यातीखेरीज ब्राह्मण व शेवडे वगैरे हिंदु लोक यांचे धर्म चांगले चालले व त्या धर्मांचें संस्थापनाविषयी ते बादशाही मदत ठेवीत होते. याजकरिता जगद्गुरु अशी त्यांची प्रसिद्धी जाहली. व अशा सद्-वासनेच्या योगानें हरएक स्थळीं त्यांची नजर पडत होती, तेथे यश येत होतें व कित्येक मुलुख सर केले. त्याजवर नुरुद्दीन जहांगिर बादशहा यांनी २२ वर्षे बादशाही ईश्वरी लक्ष ठेऊन केली. नंतर स्वर्गास पोहोचले शहाजहानसाहेब किरान यांनी ३२ वर्षे बादशाहत करून उपरान्त राहिले. आयुष्य चांगलेपणांत घालून निरंतर कीर्ति मिळविली. येविषयी दृष्टान्त, जो पुरुष जिवंत असतांना लौकिक-वान् व मागे ज्याची चांगली कीर्ति असा जो, त्याजला अचल लक्ष्मी प्राप्त जाहली, असें आहे. सदरी लिहिलें पादशहाचा प्रताप व परा-क्रम असा की, त्यागी दस्तुर व वहिवाटी केल्या. त्यांचें रक्षण करण्यास अलमगीर फिकिरबंद जाहले. ते बादशाहही जजियापट्टी घेण्यास समर्थ होते. परंतु सारे लहानमोठे आपलाले धर्मावर आहेत

ते सर्व ईश्वराचे आहेत, असें जाणोन कोणावर जुलुम करावा, हें त्यांनी मनांत आणलें नाही. त्यांचे उपकाराची कीर्ति अद्याप आहे. व हरएक लहानमोठे यांचे मुखीं त्यांची स्तुति व आशीर्वाद आहे. जशी नियेत, तशी त्यांस बरकत. त्या बादशाहांची दृष्टि लोकांचें कल्याणांत होती. हल्ली आपले कारकीर्दीत कित्येक किल्ले व मुलुख गेले व बाकी राहिले तेही जातात. कारण, जे खराबी करण्याविषयी कसतर नाही, जे रयत लोक खराब आहेत. हरएक महालचे उत्पन्न लाखास एक हजार येणें कठिण असें जाहलें. बादशहा व बादशहा-जादे यांचे घरीं दारिद्र्याचा वास जाहला. तेव्हा पदरचे मनसबदार व उमराव यांची अवस्था कळतच आहे. सारांश शिपाई लोग हैराण व सौदागर पुकारा करतात व मुसलमान रडतात, व हिंदू लोग मनांत जळतात. आणि कित्येक लोकांस पोटास मिळत नाही असें आहे, तेव्हा राज्य चालविणें कसें? त्याजवर जजिया पट्टीचा उप-द्रव या प्रकारचा. तो पूर्वपश्चिमेपावेतो जाहीर जाहला आहे की, हिंदुस्थानचे बादशहा फकीर व ब्राह्मण व शेंवडे व जोगी व संन्यासी व बैरागी व अनाथ व गरीब व थकलेले व पडलेले असे एकंदर लोकापासून जजिया घेतात. व यांतच पुरुषार्थ असें समजतात व तैमूर पादशहाचें नांव बुडवितात असें जाहलें आहे. अस्मानी किताब म्हणजे कुराण, तें ईश्वराची वाणी आहे. त्यांत आज्ञा केली, तो ईश्वर जगाचा किंवा मुसलमानांचा आहे? वाईट अथवा चांगलें असो, हे दोन्ही ईश्वराचे निर्मिते आहेत. कोठें मसजीद आहे, तेथे त्याचें स्मरण करून बांग देतात; व कोठें देवालय आहे तेथे घंटा वाजवितात. त्यांस कोणाचे धर्मास विरोध करणें हें आपलें धर्मापासून सुटणें व ईश्वराचें लिहिलें रद्द करून त्यांजवर दोष ठेवणें आहे. येविषयी चांगलें अगर वाईट, जें पाहावें त्यांस रद्द करूं नये. पदार्थाची निंदा करणें, हें पदार्थ करणारावर शब्द ठेवणें आहे, न्यायाचे मार्गानें पाहता, जजिया पट्टीचा कायदा केवळ गैर. पेशजी सुलतान अहमद गुजराथी हा असाच गैरचालीनें वागला तो लवकरच बुडाला. त्यांस या वृद्धापकाळी असें वद्ध होणें हे पराक्रमास अगदी

योग्य नाही येविपयी दृष्टान्त जुलुम त्याजवर जाला त्याणे खेद करून 'हाय हाय' म्हणून मुखाने धूर काढल्यास त्या धुराने जितके लवकर जळेल, तितके जलदीनें जळता अग्नीही समंधास जाळणार नाही. अंत:करण पातकाने मळीन झालें तें स्वच्छ करावें ही चांगली सल्ला आहे. यांजवर हिंदुलोकांस पीडा करण्यांतच धर्म आहे असें मनांमध्ये आलें असल्यास आधी राजा राजसिंग (मेवाडचा राणा) यांजपासून जजिया घ्यावा म्हणजे इकडून कठिण नाही. उपरान्त सेवेशी हाजीर आहे. परंतु गरीब अनाथ ते मुंग्या, चिलटासारखे आहेत त्यांस उपसर्ग करण्यांत कांही मोठेपणा नाही. पदरची मंडळी ही पाहता पाहता अग्नी तृणाने झाकितात, याचेंही आश्चर्य वाटतें अस्तु.

राज्याचा सूर्य हा प्रतापाचे उदयाचळापासून तेजस्वी असो."

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या या पत्रावरून व विशेषत: या पत्रांत कुराणासंबंधीं त्यांनीं औरंगजेबाशीं जो युक्तिवाद घातलेला आहे त्यावरून धर्मासंबंधांत त्यांच्या अंत:करणांत असलेली धारणा पूर्ण-पणें त्यांच्या शब्दांत स्पष्ट होते. हें पत्र पाहून औरंगजेबाच्या अंगाचा केवळ तिळपापड उडाला असेल हें उघडच आहे. विशेषत: गोरगरिबांना त्रास देण्याऐवजीं राजसिंहाकडे व माझ्याकडे वळा हें शिवाजीमहाराजांनीं दिलेलें आव्हान औरंगजेबाच्या हृदयाला चांगलेंच झोंबण्यासारखें होतें. मेवाडचा राणा राजसिंह यानें राज-स्थानच्या एका पर्वतराजींत औरंगजेबाला जवळ जवळ मृत्यूच्या खाईत लोटलें होतें व शेवटीं अपमानास्पद जीवदान घेऊन त्याला परत जावें लागलें. हें तो जन्मांत विसरूं शकणार नव्हता व आपल्या सरदारांच्या शिवाजीच्या खड्गाघातानें रक्ताळलेल्या पाठी आणि त्यावरहि ताण असणारा आग्र्यांतील प्रसंग तर त्याच्या डोळ्यां-समोरच होता. त्यामुळें हें पत्र औरंगशहाच्या वर्मीं लागलें असेल यांत शंकाच नको. असो.

आपण प्रस्तुत परिच्छेदांत शिवछत्रपतींच्या सप्तांगात्मक स्वराज्याचा आत्मा धर्म कसा होता हें पाहिलें व या स्वराज्याच्या

उत्तमांगाच्या ठिकाणीं असलेले जे छत्रपति शिवाजीमहाराज त्यांच्याकडे धर्मसंस्थापक व ईश्वरी विभूति या नात्यानें त्यांच्या जीवनकाळींच सर्वश्रेष्ठ पुरुषांचें लक्ष वेधावेंच असा त्यांचा अलौकिक प्रभाव होता हेंही पाहिलें. पण जें दुर्घट कार्य त्यांनीं संपन्न केलें तें कांहीं केवळ धार्मिक पुरुष होते म्हणून संपन्न झालेलें नाहीं. शिवछत्रपतींपेक्षांहि अधिक काळ धर्माचरणांत घालविणारे पुष्कळ लोक त्या काळीं होते; पण त्यांपैकीं कोणीहि धर्मराज्य निर्माण करूं शकला नाहीं. 'आलिया भोगासी असावे सादर' म्हणून साऱ्यांना आक्रमकाच्या लाटेखालीं स्वस्थ पडून ईश्वराची करुणा भाकण्याविना दुसरें गत्यंतर नव्हतें. म्हणूनच राजनीतिधुरंधर शुक्राचार्यांनीं म्हटलें आहे कीं, बलवान, बुद्धिवान व शूर पुरुषच राज्य संपादन करू शकतों. दुर्बळांच्या धमनिष्ठेला जगांत मूल्य नसतें. श्रीकृष्णांच्या धर्मस्थापनेचें यश त्यांच्या चक्रधारणावर व श्रीरामचंद्रांच्या धर्मस्थापनेचें यश त्यांच्या कोदंडावर अधिष्ठित आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. स्वराज्याच्या मूर्धास्थानीं असलेल्या शिवछत्रपतींच्या विभूतिमत्त्वाच्या या एकेका विशेषाकडे पाहणें अत्यंत उद्बोधक ठरेल. त्याकडे आपण पुढील प्रकरणांत वळूं.

✦ ✦ ✦

प्रकरण नववें

# अलौकिक विभूतिमत्त्व

शिवछत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावीपणाचें वर्णन मागच्या प्रकरणांत केलेंच आहे. या प्रभावीपणाला साजेसेंच आकर्षक स्वरूपाचें लेणें त्यांना मिळालें असलें पाहिजे. प्रभावी पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वांत त्यांच्या बोलण्यानें, पाहण्यानें अथवा केवळ सलगीच्या हस्तस्पर्शानें सदाचीं त्यांचीं झालेलीं माणसें पुष्कळदां आढळून येतात. शिवछत्रपतींचें व्यक्तित्व अथवा स्वरूप अशा प्रकारचें होतें असें त्यांच्या इतिहासावरून दिसून येतें. डॉ. बाळकृष्ण यांनीं आपल्या 'शिवाजी दि ग्रेट' या ग्रंथाच्या चवथ्या भागांत त्यांच्या व्यक्तित्वाचें वर्णन करतांना अतिशय मार्मिक विश्लेषण केलें आहे. डॉ. बाळकृष्ण म्हणतात, "He had a charming personality which compelled admiration and devotion of all those who came into his magnetic circle, so that they were ever ready to sacrifice their lives for him and his secred cause. The magic of his personality is excellently proved by the fact that not a single officer or general betrayed him, His men could not be corrupted by the wily Aurangzeb, while the Maratha hero was constantly corrupting the Mogul generals. Even when Shivaji and his son were prisoners at Agra or when he was absent for more than a year in the Karnatic, there was not a single person who turned traitor to the country." (Page 213)

शिवाजी महाराजांना विलक्षण आकर्षक व्यक्तित्व लाभलें होतें. त्या व्यक्तित्वाच्या वर्तुळाच्या प्रभावांत जे येत ते त्यांच्याविषयींची निष्ठा आणि आकर्षण यांनीं इतके भारले जात असत कीं, महाराजांच्या पवित्र कार्यासाठीं व महाराजांसाठीं ते आपला जीवहि ओवाळून टाकावयास सदैव सिद्ध असत. त्यांच्या कोणत्याहि

सेनाधिकाऱ्यानें अथवा अन्य अधिकाऱ्यानें त्यांचा केव्हांहि विश्वासघात केला नाहीं, ही एकच गोष्ट त्यांच्या व्यक्तित्वाच्या अलौकिक आकर्षकतेचा पुरेसा पुरावा होय. धूर्त व पाताळयंत्री औरंगजेबासारख्या बादशहाला सुद्धां शिवछत्रपतींचीं माणसें लांचलुचपत देऊन फोडतां आलीं नाहींत. उलट, औरंगजेबाच्या मोठमोठ्या सेनानींना शिवछत्रपति मात्र सहज भेदनीतीनें फोडीत असत. शिवछत्रपति आपल्या मुलासह आग्र्याच्या बंदिवासांत असतांना अथवा त्यांच्या दक्षिण दिग्विजयाच्या वेळीं एक वर्षाहूनहि अधिक काळ ते स्वराज्यांत अनुपस्थित असतांना स्वराज्याशीं द्रोह करणारा एकहि मनुष्य त्यांच्या प्रदेशांत निर्माण झाला नाहीं, हें या गोष्टीचें मोठेंच प्रत्यंतर होय."

शिवछत्रपतींविषयीं किंचित् चमत्कारिकपणें लिहिण्याची संवय असलेल्या जदुनाथ सरकारांनींसुद्धां शेवटीं असे उद्गार काढले आहेत कीं, "नेत्यामध्यें असलेला जन्मजात आकर्षकपणा शिवाजीमध्येंहि होता. ज्यांच्याशीं शिवाजीचा परिचय झाला ते शिवाजीचे पूजक बनले आणि देशांतील उत्कृष्ट बुद्धिमत्तेचीं माणसें त्यानें मिळवून आपल्या पदरीं ठेवलीं. त्याच्या अंमलदारांनीं त्याची सेवा एकनिष्ठेनें केली. दुसऱ्यास दिपविणारे त्याचे विजय आणि त्याचा हास्यमुख चेहरा या योगें तो आपल्या सैनिकांचा देवच बनला होता. —(शिवाजी व शिवकाल पृ. २९२–९३)

## शिवाजी महाराजांचें स्वरूप

शिवछत्रपतींच्या समकालीन लेखकांपैकीं कोणी त्यांच्या सहवासांतील व्यक्तींनीं त्यांच्या स्वरूपाचें वर्णन केलेलें आढळत नाहीं. श्रीसमर्थांनीं केलेल्या आपल्या ह्या शिष्याच्या वर्णनांत, "धीर, उदार सुंदर। शूर क्रियेसी तत्पर। सावधपणें नृपवर। तुच्छ केला।।" या ओवींत 'सुंदर' हें एकच स्वरूपवर्णनपर विशेषण आढळतें. राजा जयसिंगानें स्वतःसाठीं त्यांचें एक चित्र करविलें होतें, असें म्हणतात. पण आजच्या जिज्ञासूला स्वाभाविकपणेंच या थोर

विभूतीच्या स्वरूपासंबंधांत रामकृष्णांप्रमाणें केवळ काल्पनिकता असूं नये असें वाटतें. त्या दृष्टीनें तत्कालीन भारतीयांना महत्त्वाच्या न वाटणाऱ्या नोंदीहि करून ठेवण्यांत दक्ष असणाऱ्या पाश्चात्य लेखकांकडे वळणें क्रमप्राप्त ठरतें. या ना त्या निमित्तानें इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्तुगीज इत्यादि अनेक राष्ट्रांच्या वकिलांशीं शिवाजी महाराजांचे संबंध येत गेले. त्यांपैकीं कांहींनीं त्यांचें वर्णन केलेलें आहे. त्यांतील कांहीं महत्त्वाच्या लोकांचें वर्णन महाराजांच्या स्वरूपावर पुष्कळ प्रकाश टाकूं शकेल. रेव्हरंड एस्कालियट (Rev. Escaliot) यानें ऐकीव माहितीच्या भरंवशावर शिवछत्रपतींचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

"of medium stature and of excellent proportion he was active in exercise, possessed quick and piercing eyes, and was whiter than any of his people. He seemed to smile whenever he spoke."

शिवाजी हा मध्यम उंचीचा, ताठ व बांधेसूद आहे. तो चलाख असून सस्मित बोलतो. त्याची दृष्टि तीक्ष्ण व तरल असून त्याचा वर्ण त्याच्या इतर देशबांधवांपेक्षां अधिक गौर आहे."

थेवेनॉट (Thevenot) ह्यानें शिवाजी महाराज हे ठेंगण्या बांध्याचे होते असें म्हटलें असून त्यांच्या भेदक दृष्टीचें वर्णन करतांना तो म्हणतो, "His eyes are very sharp and fiery, showing a great deal of intelligence. He usually takes one meal a day and is quite healthy." "शिवाजीचे डोळे अतिशय तीक्ष्ण व विलक्षण तेजस्वी आहेत. त्याची बुद्धिमत्ता त्यांतून व्यक्त होते. तो दिवसांतून एकच वेळा सामान्यतः भोजन करतो. तरीहि त्याचें आरोग्य उत्कृष्ट आहे."

कास्मोडा गार्डा (Cosmoda Guarda) म्हणतो, "He was not only quick in action but lively in carriage also, for with a clear and fair face, nature had given him the greatest perfections, specially the dark big eyes were so

lively that they seemed to dart rays of fire. To these was added a quick, clear and acute intelligence."

"शिवाजी केवळ काम करण्याची तडफ असलेला पुरुषच नसून त्याचें शरीरहि डौलदार आहे. त्याचा चेहरा आकर्षक आहे आणि निसर्गानें त्याचें व्यक्तित्व अत्यंत परिपूर्ण आहे. विशेषत: त्याचे काळेभोर आणि विशाल नेत्र इतके विलक्षण भेदक आहेत कीं तो जर टक लावून पाहूं लागला तर त्यांतून ठिणग्या बाहेर पडतात कीं काय असें वाटतें. त्याच बरोबर तरल, तीक्ष्ण, स्पष्ट व तंतोतंत निर्णय करणारी त्याची प्रतिभाहि व्यक्त होते."

——(इंग्लिश रेकॉर्डस् ऑन् शिवाजी, व्हॉल्यूम २, पृ. ३३४)

या सर्वांपेक्षां इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झिडेन यानें केलेलें शिवाजी महाराजांच्या स्वरूपाचें वर्णन अधिक परिपूर्ण आहे. महाराजांच्या राज्यारोहणाच्या वेळीं ऑक्झिडेन हा इंग्रजांच्या वतीनें भेट घेऊन गेला होता. त्याला महाराजांनीं स्वत:च्या अगदीं जवळ बोलाविलें होतें. अगदीं जवळून त्यानें शिवाजी महाराजांशीं वाटाघाटी करतांना त्यांच्या चेहऱ्याचें पूर्ण निरीक्षण केलेलें आहे. त्यामुळें त्याचें वर्णन विश्वसनीय मानावयास प्रत्यवाय नाहीं. तो लिहितो, "चेहरा सुंदर व पाणीदार, इतर मराठ्यांच्या मानानें वर्ण गोरा, डोळे तीक्ष्ण. नाक लांब, बांकदार व जरासें खाली आलेलें, दाढी कापून हनुवटीच्या खाली टोकदार केलेली, मिशी बारीक व मुद्रेंत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात. ——(भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक, चैत्र शके १८४०)

## गुणसमुच्चय

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या ठिकाणीं असलेल्या गुणांची एक यादीच सतराव्या शतकांतील एका लेखकानें केलेली असून ती तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयांत टिपणवजा आहे. ती पुढीलप्रमाणें ——

## राजा छत्रपती स्वामीचे ठायी गुण ।।

(१) देवाची ठायी निष्ठा
(२) बळे प्रखर
(३) राजकिळेची (राजकलेची)
अदब तरतिवरा (?) हारवेश उत्तम
(४) दरशनी
(५) रत्नपरीक्षा
(६) अश्वपरीक्षा
(७) शस्त्रपरीक्षा
(८) जितिकी हत्तेरेभी आरास्ता (?)
(९) बोलणें रसिक
(१०) डोळांमध्ये शरम
(११) शाळग्राव परीक्षा
(१२) गजपरीक्षा
(१३) न्याय करणें उत्तम
(१४) शहाणपण
(१५) राजकारणी
(१६) मनुशाची पारखी
(१७) घोडचेचढाईत
(१८) हत्ती चढाईत
(१९) वरदकविता शक्ति
(२०) इमानि
(२१) शूर
(२२) उदार
(२३) वित्पन्न
(२४) सखोल
(२५) धीर

या सर्व सद्गुणांपेक्षांहि स्वराज्याचें मंदिर उभारावयास कारणीभूत झालेला त्यांचा मोठा गुण म्हणजे त्यांचें अतुलनीय शौर्य व पराक्रम होय. श्री समर्थांनीं शिवछत्रपतींचें वर्णन करतांना असें म्हटलें आहे कीं, "कित्येक दुष्ट संहारिला। कित्येकासि धाक सूटला। कितेकासी आश्रयो झाला ।। शिव कल्याण राजा ।।"

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या पराक्रमाचा व जयशालित्वाचा धाक त्यांच्या काळीं सर्वत्र पसरलेला आढळून येतो.

### योद्धा शिवाजी

कवि भूषणानें शिवाजीमहाराजांचें वर्णन करतांना असें अलंकारिक वर्णन केलें आहे कीं, "राम कहाँ द्विजराम कहाँ बलराम कहाँ रनमे अनुरागे। बाज कहाँ मृगराज कहाँ अतिसाहसमें शिवराजके आगे ।।" (शिवछत्रपतींसमोर रणांगणांत रामचंद्र, परशुराम व बलराम यांचीहि कीर्ति लुप्त झालेली असून त्यांच्या

साहसापुढें ससाणा व सिंहहि फिके वाटू लागतात.) हें कवीचें अत्युक्तिपूर्ण वर्णन तत्कालीन पाश्चात्य लेखकांनीं शिवाजीमहाराजांविषयीं जें लिहून ठेवलें आहे त्याचा विचार केला तर खरें वाटू लागतें. शिवाजी महाराजांच्या उत्तरोत्तर पराक्रमानें तत्कालीन भारतीय प्रदेशांतून वावरणारे परकीय राष्ट्रिकसुद्धां इतके प्रभावित होऊन गेले होते कीं, ते अलेक्झांडर दि ग्रेटसारख्या जगज्जेता म्हणून विख्यात असलेल्या पुरुषाबरोबर शिवाजीमहाराजांची तुलना करूं लागले होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या एका अधिकाऱ्यानें इ. स. १६७७ सालीं कंपनीच्या अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रांतील पुढील उतारा या दृष्टीनें मननीय आहे.

"Hee is at present before Banca Pore, two other very strong Ghurrs or rocks which soe soon as he hath taken in (being noe lesse dextrous thereat than Alexander the great was) for by the agility of his winged men (himself terming them birds) he tooke in lesse than 8 months time from the Mogull, which he had delivered up to his than (sic? then) generall Raja Jessing, 23 (inaccessible ones) resolves against Vizapore, the Metropolis of the kingdom of Deccan propinque to them; and being became master thereof, has vowed to his pagoda never to sheathe his sword till he has reached Delhi and shut up Orangsha in it."

—(English Records on Shiwaji Vol II. p. 150)

"त्यानें सध्यां बंकापूर जवळील दोन बळकट किल्ल्यांस वेढा देऊन ते तत्काळ जिंकले आहेत. अलेक्झांडर दि ग्रेट सारखाच शिवाजी या कामीं निष्णात असून पक्ष्यांप्रमाणें चपल असलेल्या त्याच्या सैनिकांच्या साहाय्यानें (तो आपल्या सैन्यांतील लोकांस पक्षी म्हणतो) हे गड त्यानें सर केले. मोंगलाचा सेनाधिपति राजा जयसिंग याच्या स्वाधीन केलेले २३ दुर्भेद्य किल्ले त्यानें आठ

महिन्यांचे आंत परत घेतले आहेत. दक्षिणेची राजधानी विजापूर शहर जिकण्याची व ते अधीन झाल्यावर दिल्लीस जाऊन त्या नगरांत औरंगशहास कोंडून टाकीपावेतों आपली तरवार म्यान्यांत घालावयाची नाहीं अशी शपथ त्यानें आपल्या देवासमोर घेतली आहे.

प्रत्येक विख्यात व पराक्रमी पुरुषासंबंधानें ज्या तऱ्हेच्या विलक्षण कंड्या पिकतात तशाच शिवरायांसंबंधानेंही त्यांच्या काळांत पिकलेल्या होत्या याची झांक उपर्युक्त परिच्छेदांत दिसून येते. सीझर, सरटोरिअस यांचीं नांवें शिवरायांची कल्पना येतांच या पाश्चात्यांच्या मनश्चक्षू समोर येतात. त्यांच्या मनांवर शिवरायांच्या तळपत्या खड्गाची केवढी खोलवर मुद्रा उमटलेली आहे हें पुढील कांहीं उताऱ्यांवरून दिसून येईल.

" So long as the opposite man continues in the possession of so grand a destroyer of commerce as is the Rajah Sevajee; and what we would lament is that we cannot foresee any termination of his government, for he still continues victorious even to a miracle, waging war against the potent kings of Hindostan and Deccan, against which he has hitherto proved very victorious even to a miracle, waging war with them and we are fearful will continue so.

—(English Records on Shivaji Vol. II letter 270.)

Sevaji Raja carried on by an ambitions desire to bee fam'd a mighty conqueror, left Rairi, his strongest hold in the kingdom of Cuncan, at the latter end of the last faire Montzoone, and marched with his Army consisting of 20,000 horse and 40,000 foote into Carnateck, where the Telnigas have two of the strongest holds in those

parts called chindi (Gingy), chindawer (Tanjore), where many merchants are considerable inhabitants, and with a successe as happy as Caesars in Spaine, he came saw and overcame, and reported soe vast a treasure in gold, diamonds, emaralds, rubies and wrought corall that have strengthned his armes with very able sinewes to prosectute his further victorious designes. Hee is at present before Banca pore, two other very strong ghurrs or rocks, which soe soone as he hath taken in (being noe lesse dextrous thereat than Alexander the great was.)

—(English Records on Shivaji Vol. II letter 272)

But,' tis too well known that Sevajee is a second Sertorius and comes not short of Haniball for stratagems. And was the only politician that deverted the Deccanies and Cuttub Shaw from joyning with Delil Ckaun against him."

—(English Records on Shivaji Vol. II letter 279)

"शिवाजीचे स्वाधीन समोरचा प्रदेश आहे तोंपर्यंत त्याच्या-सारख्या व्यापाराचा मोठा विध्वंस करणाऱ्याचें राज्य लयास जाण्याचा कांहीं संभव नसल्यामुळें मनाला खेद होतो. कारण तो क्षणोक्षणीं कल्पनेपलीकडे यशस्वी होत आहे. हिंदुस्थानांतील व दक्षिणेंतील बलिष्ठ राजांबरोबर तो युद्ध करीत असून त्यांत त्याला कल्पनेपलीकडे यश प्राप्त झालें आहे व याप्रमाणेंच यापुढें चालत राहणार असें मला दिसत आहे."

"एक बलिष्ठ जेता ही ख्याति प्राप्त व्हावी या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन शिवाजी राजा त्याच्या किल्ल्यांतील सर्वांत बळकट अशा रायरी किल्ल्यावरून पर्जन्यकाळ संपतांच वीस सहस्र अश्वदळ आणि ४० सहस्र पायदळ समवेत घेऊन कर्नाटकावर स्वारी करण्यास निघाला आहे. त्या प्रांतांत तेलंग्यांचे चंदी आणि

तंजावर असे दोन मोठे बळकट किल्ले आहेत. यांत श्रीमान् व्यापारी बरेच आहेत. सीझरच्या स्पेनवर केलेल्या स्वारींत 'मी गेलों, मी पाहिलें, आणि मी जिंकिलें.' या शब्दांत दर्शविल्याप्रमाणें त्यानें तो देश पादाक्रांत केला त्याचप्रमाणें शिवाजीनें हा प्रदेश जिंकला असून सोनें, हिरे मोतीं, माणकें, पांचू, रत्नें, खोदकाम केलेलीं पोवळीं इत्यादि मत्तेची एवढी मोठी लूट मिळविली आहे कीं, प्रांत जिंकण्याचे जे यशस्वी खेळ व डाव त्याला यापुढें खेळावयाचे आहेत ते साधण्यास त्याला या लुटीमुळें उत्कृष्ट प्रकारचें साहाय्य मिळालें आहे. तो हल्लीं बंकापूर येथें असून त्यानें येथील दोन बळकट किल्ले घेतले आहेत. या कामांतील त्याचें प्रावीण्य अलेक्झांडर धी ग्रेट पेक्षां रेसभरही हीन प्रतीचें नाहीं."

"हें सर्वांस विदितच आहे कीं, शिवाजी हा सरटोरियस्‌ची मूर्तिमंत दुसरी प्रतिमा आहे. आणि हॉनिबॉलपेक्षां डावपेंच योजण्याचे कामीं तो यत्किंचित्‌ही कमी प्रतीचा नाहीं. दक्षिण उद्ध्वस्त करणारा आणि दिलेरखानास कुतुबशहा मिळूं न देणारा असा हा एकटाच राजकारणी पुरुष आहे."

बलवान् व बुद्धिमान् या नात्यानें शिवछत्रपतींनीं आपल्या समकालीन जाणत्या लोकांच्या अंतःकरणांत कसा धाक उत्पन्न केला होता याची यावरून कल्पना येण्यासारखी आहे. शिवछत्रपतींच्या नुसत्या नांवानें अथवा येण्याच्या केवळ कंडीनेंही सुरतेसारखीं नगरें ओस पडत. शत्रूंच्या मनांत त्यांनीं आपल्या नांवाचें केवढें भय उत्पन्न केलें होतें याची कल्पना देणारा पुढील उतारा पहा :— डॉ. डेलॉन म्हणतो :—

"This Sheevaji is a very potent prince, who has managed his affairs with so much prudence as to have established himself, inspite of his potent enemies, in all the territories, situate betwext Suratte and Goa, unless it be some few sea ports belonging to the Portuguese. He has made himself so dreadful to his neighbours, as to

have made the city of Goa itself tremble at his approach, and has several times made those of Suratte feel the direful effects of his fury...... But he tolerates all religions, and is looked upon as one of the most politick princes in those parts.

—(English Records of Shivaji Vol. II letter 537.)

"हा शिवाजी बलाढ्य राजा आहे. सुरत आणि गोवा यांच्या-मधील प्रदेशांत पोर्तुगीज लोकांचीं कांहीं बंदरें सोडून त्याचे शत्रु प्रबल असूनहि त्यानें त्यांच्यावर आपल्या अपूर्व बुद्धिमत्तेनें आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केली आहे. त्यानें त्याच्या आसपासच्या शत्रूंच्या मनांत इतका धाक उत्पन्न केला आहे कीं, गोव्याचे पोर्तु-गीज लोक तो येणार अशी वार्ता कळतांच थरथरां कापूं लागतात! त्यानें सुरतेच्या लोकांस अनेकदां त्याच्या रोषाचे भयंकर परिणाम सोसावयास लावलें आहे. ...... तो सव धर्मांविषयीं सहिष्णुता बाळगतो. या प्रदेशांतील लोक त्यास सर्वोत्कृष्ट राजकारणपटु राजा समजतात."

जगांतील पराक्रमशाली पुरुषांच्या भोंवतीं एक प्रकारचें गूढ वलय आपोआप उत्पन्न होऊन त्यांच्या अद्भुत सामर्थ्याविषयींच्या अनेक दंतकथा हळू हळू प्रकट होऊं लागतात असें त्यांचीं चरित्रें सूक्ष्मपणें पाहिलीं तर आढळून येतें. कोणाला त्यांच्या मुखमंडला-भोंवतीं तेजोवलय दिसूं लागतें, कोणाला त्यांच्या चेहऱ्यांतून प्रकाश-किरण बाहेर पडतांना दिसतात, कोणाला आपल्या एका रूपाचीं ते अनेक रूपें करूं शकत असल्याचा प्रत्यय येतो तर कोणाला ते एकाच वेळीं अनेकांना अनेक प्रकारांनीं दर्शन देतांना अथवा परकायाप्रवेश करतांना आढळतात. याचें अधिकांत अधिक प्रत्यंतर भगवान् श्रीकृष्णांच्या व भगवत्पूज्यपाद श्रीमत् शंकराचार्यांच्या चरित्रांतून पहावयास मिळतें. या सगळ्या गोष्टी त्या त्या महापुरुषांच्या महाप्रयाणानंतर नव्हे, तर त्यांच्या जीवनकाळींच घडत असतात. छत्रपति श्रीशिवाजी महाराजांच्या संबंधानेंहि, ते एकाच वेळीं

अनेक रूपें धारण करतात, त्यांचें शरीर वायुरूप आहे इत्यादि अनेक प्रकारच्या गूढत्वनिदर्शक कंड्या पिकून तत्कालीन पाश्चात्य लेखकांनाहि त्यांचा विचार करावा लागलेला आहे. उदाहरणार्थ, निम्नलिखित उल्लेख पहा —

" Sevagy stationed garrisons where he thought necessary and appointed a governor, whom he invested with a splendid revenue that he might shine in majesty and make people think that he was Sivaji himself (this was his ordinary method, but it was executed with cunning that was unique in the world.)

—(फॉरेन बायॉग्राफीज ऑफ शिवाजी. पृ. ५३)

" शिवाजी आवश्यक वाटेल त्या स्थळीं आपलें सैन्य ठेवीत असे व त्या स्थलाचा कारभार एका अधिकाऱ्याकडे सोंपवीत असे. या अधिकाऱ्यास तो इतकें वेतन देत असे कीं, त्याच्या साहाय्यानें दुसऱ्यावर छाप बसेल अशा भपक्यानें त्यास राहतां यावें; व तो शिवाजीच आहे असा सामान्य लोकांचा समज व्हावा. जगांत क्वचित् आढळण्यांत येईल अशा प्रकारची ही त्याची असामान्य क्लृप्ति होती."

" Sewagy often sent expeditions to different places at the same time and in all of them he was convoked and he was in command. The question is still unsolved whether he substituted others for himsetf or whether he was a majician or devil acted in his place. Such has been said about it in India and there is much divergence of opinion as usual. If I had to give any opinion, I would say that as he sent expeditions to two, three or four places, at the same time and as with every regiment went a captain whom all obeyed and called Sawagy Raja

(Name that he had assumed after his rebellion), this mistake was caused by some people who came every day (that is fresh recruits) and did not know him well as yet. Hence arose the belief that he used to be in different places. (at the same time)"

—(फॉरेन बायॉग्राफीज ऑफ शिवाजी पृ. १० व ११)

"शिवाजी एकाच वेळीं निरनिराळ्या प्रदेशावर स्वाऱ्या करीत असे. व त्या प्रत्येक स्वारीसमवेत तो असे असा सर्वसाधारण समज त्या काळीं अस्तित्वांत होता. स्वतःच्या ऐवजीं तो दुसऱ्यांस त्या स्वाऱ्यांवर पाठवीत असे, अथवा तो कांहीं 'जादू' करीत असे, अथवा कोणी भूत-पिशाच्च त्याच्या ऐवजीं त्या स्थळीं जात असे हें एक मोठें गूढ आहे! हिंदुस्थानांत हा एक चर्चेचा विषय झाला असून अनेकांचीं अनेक मतें आहेत. माझें स्वतःचें असें मत आहे कीं, तो एकाच वेळीं ज्या निरनिराळ्या प्रदेशांवर स्वाऱ्या पाठवीत असे तितक्या स्वाऱ्यांबरोबर तो त्याच्या मुख्य अधिकाऱ्यास शिवाजी असें नांव देऊन, व सर्वांनीं त्याची आज्ञा मान्य करावी. अशी त्यांस चेतावणी देऊन पाठवीत असावा. त्याच्या सैन्यांत जे नवीन लोक समाविष्ट होत, त्यांना खरा शिवाजी कोणता ही कल्पनाच नसल्यामुळें त्या स्वारीच्या नेत्यालाच ते शिवाजी समजत असत. त्यामुळें एकाच वेळीं शिवाजी निरनिराळ्या ठिकाणीं असतो अशी कल्पना सर्वत्र पसरली असावी."

शत्रूंच्या अंतःकरणांत हा धाक उत्पन्न करणारे देदीप्यमान विजय ज्या साधनानीं शिवाजी महाराजांनीं प्राप्त केले तीं साधनें त्यांनीं स्वतःच्याच प्रतिभेंतून निर्माण केलेलीं होतीं. कोणत्याहि सेनेचा परंपरागत अधिकार त्यांच्याकडे चालत आलेला नसून त्यांची सेना, त्यांचें युद्धसाहित्य, त्याचे सेनापति या सर्व गोष्टी, शून्यांतून ब्रह्मांड निर्माण करावें, त्याप्रमाणें त्यांनीं निर्माण केल्या आणि त्या निर्माण करतांना प्रतिपक्ष्याचें मर्मस्थान त्यांनीं पूर्ण ओळखलें. तत्कालीन मोंगलसेनानिवेश व साधा सैनिक सुद्धां

अवजडपणाचें व अवाढव्यपणाचें एक मोठें प्रदर्शनच झाला होता. पाश्चात्य निरीक्षकांनीं या मोंगली वैशिष्टयाचें जें वणन केलें आहे तें पाहण्यासारखें आहे. उदाहरणार्थ निम्नलिखित अभिप्राय पहा—

"The Moorish armies are like big cities, as many people follow them and come to the camp at all hours without being questioned.

—(Foreign Biographies of Shivagi P. 15)

"मुसलमानी सैन्याचीं शिबिरें एखाद्या मोठ्या नगरासारखीं असतात. वाटेल त्या लोकांनीं वाटेल त्या वेळीं त्यांत अनुज्ञाहि न घेतां यावें जावें हें रूढ असल्यासारखें दिसे."

"For the Mogal soldier who does not have with him a loaded camel feels very unhappy so that what is necessary to equip a Mogal soldier is sufficient for an army of the light Daquinis. (F. B. S. P; 99)

"एका उंटावर लादून नेतां येईल इतकें ओझें समवेत असल्या-विना मोंगल सैन्यांतील कोणत्याहि सैनिकास 'मी सुखी आहे' असें वाटत नसे. मोंगल सैनिकांजवळच्या साहित्याचें हें ओझें इतकें मोठें असें कीं, ते चपळ अशा एखाद्या दक्षिणी सैन्यास पुरेसें असे."

अशा अवजड व अवाढव्य सैन्यावर शिवाजी महाराजांच्या साधनहीन व अल्पसंख्य सेनेनें एकामागून एक असे विजय मिळवून दाखवितांच त्यांची साधनहीनता. त्यांचा साधेपणा इतकेंच नव्हे तर त्यांचा तुसडेपणा व भांडखोरपणा हा सुद्धां कौतुकाचा, आदराचा व वर्णनाचा विषय होऊन राहिला. उदाहरणार्थ परकी-यांनीं केलेलें पुढील वर्णन पहा —

"None should be surprised at the celerity of these Daquinis for they are accustomed to carry no more baggage than their arms which consist of lances, bow, arrow, long and broad swords with some bread and gram

for their horses in the saddle bag, for water and straw are abundantly found in the field. In this fashion they always go unencumbered. They sleep on the ground, upon the earth and taking the bridle of the horses and loosening the reins, fasten them with their halters to their own wrists. They cover themselves with a cloth that serves as dress Mattress and wrapper; they live in this manner and are, therefore so quick and skillful that cause admiration, and all these are contrary to (what is found among) the Mogals.

—(Foreign Biographies of Shivaji P. 99)

"दक्षिणी सैन्याचें चापल्य पाहून कोणालाहि आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कारण त्यांच्यापाशीं अवजड साहित्य कोणतेंच नसतें. त्यांच्याजवळ भाला, धनुष्य बाण, लांब आणि रुंद पात्याच्या तरवारी, थोडीशी स्वत:साठीं भाकरी आणि घोडयाच्या पाठीवर टाकलेल्या तोबऱ्यांत घोडयाला लागणारे हरभरे याविना दुसरें कांहीं एक साहित्य नसतें. पाणी आणि घोडयाला लागणारा चारा या सैन्याला मार्गातील शेतांमधून हवा तितका मिळत असे. याप्रमाणें अगदीं थोडयाशा ओझ्यानिशीं या सैन्यांतील सैनिक आपल्या हालचाली करीत. दक्षिणी सैन्यांतील सैनिक घोड्याचे अश्वबंध सैल करून ते आपल्या मनगटास बांधून उघडया भूमीवरच रात्रीची झोंप घेत. आंथरण्यास व पांघरण्यास एकच कपडा त्यांना पुरत असे. त्यांची अशा प्रकारची साधी रहाणी असल्याकारणानें त्यांच्या ठिकाणीं इतकें चापल्य व कौशल्य दृष्टीस पडतें कीं, त्याचे योगानें त्यांचेविषयीं सर्वत्रांस कौतुक वाटतें. मोगल सैन्यांत याच्या अगदीं उलट प्रकार दृष्टीस पडतो."

डॉ. फ्रेअर यानें या दोन सैन्यांतील भेद विशद करीत शिवाजी महाराजांच्या सैन्यावर स्तुतिसुमनें उधळतांना असें म्हटलें आहे की,

"It is clear the Duccanees are a warlike and troublesome nation apt to dislike Government, proud and brave, having an army more splendid than the Moghuls, adorning their elephants, horeses, and lances with silver bells and feathers, gallant and rich in apparel and slumbrous; the people swarthy or olive; of all religions.. .. . . These hilly people are of a rougher temparament, more hardy, and less addicted to the soft vanities, of music clothing, pomp, stateliness, being all naked, starving rascals; Savagi's men thereby being fitter for any martial exploit, having been accustomed to bare hard, journey fast and take little pleasure. Sevagy's men care not much for a pitched battle though they are good at surprising and ransacking." (S. M. H. P. 227)

"दक्षिणी लोक लढवय्ये आणि भांडखोर आहेत. ते शूर आणि अहंकारी असून राज्यसत्तेच्या दास्याचा त्यांना मनापासून तिटकारा आहे. मोंगल बादशहांच्या सैन्यापेक्षां त्यांचें सैन्य सरस आहे. मोंगलांच्या घोड्यांना हत्तींना, त्याचप्रमाणें त्यांच्या भाल्यांना चांदीच्या घंटा व पक्ष्यांचीं पिसें लावून ते सुशोभित करितात. त्यांचे पोशाख भपकेदार असतात. काळसर व पिवळसर वर्णांच्या सर्व धर्मांचे लोक या सैन्यांत असतात. पण शिवाजीच्या सैन्यांतील लोक डोंगरी प्रदेशांतील राहाणारे असून शरीरानें कणखर, अधिक बळकट, व गानलोलुपता, मौल्यवान पोशाख, भपका, ऐट इत्यादीपासून अलिप्त असतात ते बहुतेक नागडे-उघडे असतात व बुभुक्षित दिसतात. कष्टमय जीवित, वेगानें दौड करण्याची संवय, आणि सुखाकडे दुर्लक्ष या कारणांमुळें शिवाजीचे हे लोक सैनिकी करण्यास अधिक योग्य आहेत. शिवाजीचे सैनिक छातीठोकपणें शत्रूच्या तोंडास तोंड देऊन लढाई करण्याची हांव बाळगीत नाहींत.

शत्रूवर एकाएकीं आक्रमण करून त्याला आश्चर्यचकित करावयाचें व त्याला लुबाडून टाकावयाचें या कामांत ते निष्णात आहेत."

शिवछत्रपतींना साधन सामग्रीची व अन्य अनेक गोष्टींची अनुकूलता लाभती तर त्यांचें सैन्य होतें त्याहून अगदीं वेगळ्या स्वरूपाचें –एखाद्या चंद्रगुप्त मौर्यासारखें अथवा एखाद्या दिग्विजयी चक्रवर्ती समुद्रगुप्तासारखें त्यांनीं बाळगिलें असतें ही गोष्ट निर्विवाद आहे. पण सेनापति या दृष्टीनें त्यांच्या श्रेष्ठतेचें खरें गमक हेंच होय कीं तुटपुंज्या साहित्यावर व साधनहीन सेनेच्या भरवंशावर त्यांनीं समुद्रासारख्या विशाल सेनांना व काबूल कंदाहारचें रण गाजविणाऱ्या रणगाझींना पार लोळवून विजयश्री आपल्या चरणांची दासी केली. यश आणि विजय हे नेहमींच प्रशंसेचे आणि कौतुकाचे विषय ठरतात. त्याप्रमाणें त्यांनीं जीं जीं साधनें वापरलीं त्यांतच त्यांच्या विजयाचें रहस्य साऱ्या निरीक्षकांना दिसूं लागलें एवढाच याचा खरा अर्थ आहे. रामचंद्राचे वानर सैनिकहि वाल्मीकि प्रभृति प्रतिभावंतांच्या कौतुकाचा विषय ठरलेच कीं नाहीं? त्यांतलाच हा प्रकार आहे. एरवीं छत्रपति शिवाजी महाराजांच्या जागीं दुसरा कोणीहि असता तर तो या साधनांनीं यशस्वी ठरला असता कीं नाहीं या प्रश्नाचें अस्तिपक्षीं उत्तर देतां येणें कठीण आहे.

शिवछत्रपतींच्या जीवनांत त्यांच्यावर प्राणनाशाचे एकंदर पांच प्रसंग आले आहेत. ते प्रसंग म्हणजे (१) अफझलखानाची स्वारी (२) सिद्धिजौहरनें पन्हाळ्याला घातलेल्या वेढ्यांत सहा महिने अडकून रहाण्याचा दुर्धर प्रसंग (३) एकलक्ष सैन्यानिशीं संपूर्ण स्वराज्य गिळंकृत करावयास आलेल्या शाहिस्तेखानाचें आक्रमण (४) मिर्झाराजा जयसिंगाची स्वारी व (५) आग्र्याला विश्वासघातकी औरंगजेब बादशहाच्या प्रत्यक्ष अंतर्गृहेंतील बंदिवास हे होत. या प्रसंगांतून शिवछत्रपति निभावले इतकेंच नव्हे तर प्रतिपक्षाची फटफजिती व धूळधाण करून आणि भारताचे दिक्कोन आपल्या जयदुंदुभि नादानें प्रतिध्वनित करून यशस्वी झाले. ते काय त्यांच्या जवळच्या तुटपुंज्या साहित्याच्या व तथाकथित

सेनेच्या भरंवशावर असें म्हणतां येईल काय? ज्यांना असें म्हणावयाचें असेल त्यांच्या बुद्धीची व इतिहासाचे अन्वयार्थ लावण्याच्या पात्रतेची कींव करावी तितकी थोडीच आहे. यांपैकीं जयसिंगाच्या आक्रमणाच्या वेळीं तर सर्व आघाड्यांवर पराभूत होऊन शिवछत्रपतींनीं अगतिकपणानें, निःशस्त्र अवस्थेंत जयसिंगाच्या सेनानिवेशांत जाऊन, तो म्हणेल त्या अटीवर त्याच्याशीं संधि केलेला आहे. आग्र्याच्या परिसरांत सेनेचा व साहित्याचा कांहीं उपयोग तरी होता काय? हे दोन विजय शिवरायांच्या केवळ दीप्तिमान् प्रतिभेचे विजय होत हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. उर्वरित प्रसंगांपैकीं (१) अफझलखान व (२) शाहिस्तेखान प्रसंगांत शिवरायांचें अपूर्व साहस धैर्य व व्यक्तिगत शौर्य पूर्णपणें कसास उतरलेलें आहे. तात्पर्य, या पांचहि प्रसंगांतील यशाचें श्रेय श्री शिवरायांच्या बल, साहस, शौर्य, बुद्धिमत्ता व अविकंपित मनःस्थैर्याला द्यावें लागतें.

स्वराज्याच्या मूर्धास्थानीं असलेल्या या राष्ट्रीय नेतृत्वाचे ते ते गुणविशेष अथवा या अलौकिक विभूतिमत्त्वाचे ते ते घटक समजावून घ्यावयास श्रीशिवछत्रपतींचा साराच जीवनपट पाहणें अगत्याचें आहे. या जीवनपटाचें विहंगमावलोकन करावयाचें म्हणजे त्याचें ठळक दृष्टोत्पत्तीस येण्यासारखें वर्गीकरण केलें पाहिजे. हें वर्गीकरण पांच प्रकारचें करतां येईल. श्रीशिवाजी महाराजांचा जन्म इ. स. १६३० या वर्षीं झाला. व इ. स. १६८० मध्यें हें दीप्तिमान् जीवन समाप्त झालें. या अवघ्या पन्नास वर्षांच्या जीवनामधून पहिलीं पंधरा वर्षे वगळलीं पाहिजेत. कारण वयाच्या पंधराव्या वर्षापासून त्यांच्या कार्याला प्रारंभ झालेला आहे. म्हणजे त्यांचें कार्यकर्तृत्वाचें खरें जीवन ३५ वर्षांचें आहे. पांच प्रकारचें जें वर्गीकरण करावयाचें आहे तें या पसतीस वर्षांच्या जीवनपटाचेंच होय. तें पुढीलप्रमाणें करतां येईल.

(१) इ. स. १६४५ ते १६५५ या पहिल्या कालखंडांत पुण्याच्या परिसरांत स्वातंत्र्याची कल्पना उद्‌भूत होऊन ती साकार करण्याच्या

दृष्टीनें त्यांनीं स्वतःची सिद्धता करावयास प्रारंभ केला. या काळांत अनपेक्षितपणें आलेल्या संकटाचा त्यांना अशा युक्तीनें परिहार करावा लागला कीं ज्यामुळें त्यांच्या मनांतील वास्तविक आकांक्षेची कोठेंही परिस्फुटता होऊं नये. भावी क्रांतीच्या सिद्धतेंत हा कालखंड व्यतीत झालेला असल्यामुळें या कालखंडाला अलीकडच्या परिभाषेप्रमाणें क्रांतीच्या सिद्धतेचा कालखंड Silent Revolution असें म्हणतां येईल.

(२) इ. स. १६५६ ते १६५८ या कालखंडांत आपली सिद्धता झालेली आहे असें पाहून व यशापयशाचा भार भगवंतावर सोंपवून शिवरायांनीं यावनी सत्तेविरुद्ध उघड खड्ग उपसलें आहे. चंद्रराव मोऱ्यांचा निःपात करून आपली सत्ता प्रतिष्ठापित करण्याच्या कृत्यापासून त्यांनीं उघड क्रांतियुद्धाला प्रारंभ केला. मुळांतल्या पुण्याच्या स्वायत्त प्रदेशाचा त्यांनीं या कालखंडांत पुरंदर, महाबळेश्वर, सुपें, चाकण, कल्याण, चौल व वाडीपर्यंत विस्तार करून विजापूरच्या सत्तेला उघड आव्हानच दिलें. आजच्या परिभाषेप्रमाणें या कालखंडाला उघड क्रांतियुद्धाचा प्रारंभकाल (open revolution) असें म्हणतां येईल.

(३) १६५९ ते १६६८ हा यानंतरचा तिसरा कालखंड होय. या कालखंडाचा प्रारंभ अफझलखानाच्या स्वारीपासून होऊन आग्ऱ्याहून सुटका व शेवटीं पोर्तुगीजांवरील विजयांत तो संपतो. या कालखंडाला आक्रमक व संरक्षक युद्धाचा कालखंड असें म्हणतां येईल.

(४) १६६९ ते १६७४ हा चौथा कालखंड होय. या कालखंडाचा प्रारंभ सिंहगडाच्या रोमांचकारी विजयापासून होतो व त्याचा शेवट ६ जून १६७४ ला शिवछत्रपतींना झालेल्या राज्यभिषेकांत हा कालखंड सपून अमर होतो. या कालखंडांत शिवछत्रपतींना संरक्षक युद्धें सामान्यतः करावींच लागलेलीं नाहींत जयसिंगाच्या स्वारीच्या वेळीं द्यावे लागलेले सर्व किल्ले त्यांनीं या कालखंडांत

परत घेतले. विजापूर व मोंगल साम्राज्यांवर वार करीत विजयामागून विजय मिळविण्याचा दीप्तिमान् इतिहास या कालखंडाशीं संबद्ध असून हिंदुराष्ट्राच्या वास्तुदेवतेनें या कालखंडांत राज्याभिषेकाच्या सोहळ्याच्या निमित्तानें शतकांशतकांचें पारणें फेडलेलें आहे. म्हणून अनभिषिक्त भूपतीच्या विजयाचा कालखंड असें या कालखंडाला नांव देतां येईल.

(५) इ. स. १६७५ ते १६८० पर्यंतचा कालखंड हा पांचवा व अंतिम कालखंड होय. या कालखंडांत शिवछत्रपतींनीं स्वराज्यांत सुव्यवस्था, एकसूत्रता व सुधारणा निर्माण करून दक्षिण दिग्विजयानें स्वराज्याचा विस्तार नाशिक ते रामेश्वरपर्यंत भिडवल्याचें दृश्य उत्पन्न केलें. या कालखंडाला अभिषिक्त भूपतीच्या सुराज्य निर्मितीचा व दिग्विजयाचा कालखंड असें म्हणतां येईल.

या पांच कालखंडांचे सूक्ष्म व विवेचक परीक्षण म्हणजेच शिवछत्रपतींच्या नेतृत्वाचा साक्षात्कार घेणें होय. यांपैकीं पहिल्या तीन कालखंडांच्या निरीक्षणांत योद्धा व सेनापति या नात्यानें श्रीशिवछत्रपतींच्या नेतृत्वाच्या अलौकिकतेचा साक्षात्कार घडतो. त्याकडे आपण पुढील प्रकरणांत वळूं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २६५५३ वि: ...
क्रमांक ...९८२... नों: दि: २०।३।६०

प्रकरण दहावें

# स्वराज्याच्या सिद्धतेचा काळ

श्रीशिवाजी महाराजांच्या पुणें येथील वास्तव्याचा रोहिडे-श्वराच्या श्रीशंभुमहादेवासमोर त्यांनीं घेतलेल्या प्रतिज्ञेचा व दादोजी कोंडदेवांच्या मृत्यूपर्यंतचा क्रांतियुद्धाच्या वाटचालीचा इतिहास यापूर्वी सांगितलेलाच आहे. त्यांच्या योद्धा व सेनापति या दोन भूमिकांच्या निरीक्षणासाठीं, आपण मागच्या प्रकरणांत केलेल्या वर्गीकरणानुसार, त्यांच्या राजकीय जीवनपटाच्या पहिल्या तीन कालखंडांचें समालोचन करणें आवश्यक आहे. त्यांपैकीं पहिल्या कालखंडाचें समालोचन येथें करूं

इ. स. १६४५ मध्यें दादोजी कोंडदेव यांचा मृत्यु झाला व श्री शिवाजी महाराजांनीं सूत्रें स्वतःच्या हातीं घेतलीं. येथपासून इ. स. १६५५ पर्यंतचा म्हणजे पुढील १० वर्षांचा कालखंड हा क्रांतीच्या सिद्धतेचा कालखंड होय. या कालखंडाच्या प्रारंभीं श्रीशिवाजी महाराजांनीं दादोजींच्या मरणोत्तर माजणारी अव्यवस्था प्रथम नष्ट करून आपल्या नांवें ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांना नव्या नव्या सनदा व पत्रें करून दिलीं. तोरणा, राजगड व रोहिडगड त्यांच्या अधीन दादोजी असतांनाच झालेले होते. दादोजीपंत कोंडाण्याचे विजापूरकरांनीं नियुक्त केलेले सुभेदार असल्यामुळें हें महत्त्वाचें नाकें अधीन ठेवून त्यांना पुणें प्रांतांत शांतता राखणें शक्य होतें. पण त्यांच्या वेळींच शिरवळच्या ठाणेदाराकडून शिवाजी महाराजांच्या पुंडाव्याच्या कागाळ्या विजापूरकरांकडे गेलेल्या असल्यामुळें, दादोजींच्या मृत्यूनंतर सिंहगडावर नवा सुभेदार नियुक्त होणें व त्याच्याकडून आपल्या नव्या स्वरूपाच्या हालचालींवर नियंत्रण येणें ही गोष्ट स्वाभाविक आहे हें दिसूं लागतांच महा-राजांना कोंडाणा अथवा सिंहगड स्वतःच्या अधीन ठेवणें हिताचें वाटून त्यांनीं रक्ताचा एक थेंबहि न सांडतां भेद नीतीनें गड घेतला.

जेधे करीन्यांत म्हटलें आहे "कसबे खेडेबारे येथेही वाडे बांधले. तेथून बापूजी मुद्गल नऱ्हेकर देशपांडे त ॥ खेडेबारें यांच्या हातें राजकारण करून दग्याने किल्ला कोंडाणा घेतला."

सिंहगडावर महाराजांनीं आपला ध्वज उभारणें याचा अर्थच विजापूरच्या सत्तेविरुद्ध उघड क्रांतीचें रणशिंग फुंकणें असा होता. पण एकसूत्रीकरण केलेल्या मावळच्या दृष्टीनें सिंहगड हें इतकें महत्त्वाचें स्थान होतें कीं तें दुसऱ्याच्या हातांत राहूं देणें म्हणजे स्वराज्याचें मर्मस्थानच शत्रूच्या हातीं सोंपविण्यासारखें होतें. त्यामुळें हा साहसाचा मार्ग शिवाजी महाराजांनीं स्वीकारला. शिरवळचा मुसलमान ठाणेदारच सिंहगडावर यावयाचा होता. पण महाराजांनीं सिंहगडाच्या मागोमाग शिरवळचें ठाणें व तेथील सुभानमंगळचा भुईकोट किल्ला गरुड झेपेनें घेतला. पण या अवधींत विजापूरकरांनीं अनपेक्षितपणें असा एक पेंच निर्माण केला कीं, त्यामुळें येवढ्या सायासानें घेतलेला सिंहगड शिवाजी महाराजांना विजापूरकरांना मुकाट्यानें परत द्यावा लागला. सिंहगड 'दग्यानें' घेतल्याच्या वार्ता विजापूरकडे आल्यावर शिवाजीकडे लक्ष देणें आवश्यक वाटून विजापूरकरांनीं आपलें सैन्य शिवाजीवर पाठविलें. पण याच वेळीं शहाजीकडे लक्ष देणें विजापूरकरांना अधिक आवश्यक वाटलें. शहाजीच्या बंदीचा अन्वयार्थ शिवाजी महाराजांच्या उत्थानाशीं पुष्कळ लोक लावतात तो मात्र खरा नाहीं. शहाजीच्या बंदीचीं कारणें स्वतंत्र व वेगळीं आहेत. या घटकेपर्यंत ज्याच्यासाठीं विशेष लक्ष घातलें पाहिजे व शहाजीला पकडलें पाहिजे इतकें शिवाजी हें महत्त्वाचें प्रकरण आहे असें विजापूरच्या सत्तेला मुळींच वाटत नव्हतें. मावळ खोऱ्यांत नेहमींच असे पुंडावे चालत व कोणी मोठा सरदार पाठविला कीं त्यांचा उपशमहि होई. यापलीकडे शिवाजीच्या प्रकरणाला विशेष महत्त्व विजापूरकरांच्या दृष्टीनें तरी नव्हतें. मग शहाजीवरील या विपत्तीचें कारण काय असेल?

## शहाजीवरील संक्रान्त

शहाजीचें कर्नाटकांत वाढत चाललेलें प्रस्थ, तेथील हिंदू राजांना

मुसलमान सेनानींच्या विध्वंसक नीतीला आळा घालून शहाजीनें दिलेलें जीवदान व त्याचें दक्षिणेंत डोईजड हिंदू सत्ता निर्माण होण्यांत पर्यवसान होण्याचा दिसणारा संभव या सर्व गोष्टींचा विचार करून विजापूरच्या सुलतानानें सेनापति मुस्तफाखानाकरवी शहाजीला, उघडपणें शक्य नव्हतें म्हणून, कपटानें बंदी करण्याचा निर्णय घेतला असें शिवभारतांत (अ. १४) कवीन्द्र परमानन्दानें ध्वनित केलें आहे. कवीन्द्र म्हणतो :—

षाड्गुण्यस्य प्रयोगेण तत्तन्मन्त्रबलेन च ।
वशीचकार सकलं शाहः कर्णाटमण्डलम् ॥३
प्रसूनमिव सम्प्राप्य प्रणयी प्रणतिस्पृशा ।
शिरसा प्रतिजग्राह जगद्देवोऽस्य शासनम् ॥४
दुर्धर्षोऽपि विधेयोऽस्य बभूव मधुराधिपः ।
प्रतिपेदे महाशूरपतिरप्यस्य वश्यताम् ॥५
रणदूलहखानेन खलेनोपहृतं बलात् ।
भद्रासनं स्वमध्यास्त वीरभद्रोऽस्य संश्रयात् ॥६
तं तं मंत्रं तत्र तत्र प्रयुंजानस्य धीमतः ।
बहवोऽस्यानुभावेन जहुर्यवनजं भयम् ॥७
शाहराजस्य मंत्रेण भवन्नन्यसुदुस्सहः ।
सर्वाणि स्वामिकार्याणि चकार रणदूलहः ॥८
अथ कालगतिं प्राप्ते सेनान्यां रणदूलहे ।
कार्णाटकान्नरपतीन् स्ववशीकर्तुमंजसा ॥९
यं यं सेनापतिं तत्र प्राहिणोत् किल येदिलः ।
स स तत्कांक्षिताकांक्षी शाहमेवान्ववर्तत ॥१०
ततो भृशबलं भूपं नियन्तुमनयं स्पृशन् ।
इभरामसुतो दर्पात् मुस्तुफाखानमादिशत् ॥११

" संधि, विग्रह, यान, आसन, संश्रय आणि द्वैध या सहा गुणांचा प्रयोग करून, त्याचप्रमाणें नाना प्रकारच्या युक्ति लढवून शहाजीनें सर्व कर्णाटक प्रांतावर स्वामित्व मिळविलें. कावेरी पत्तनाच्या जगद्देवानें शरण येऊन, प्रणाम करून, त्याची सत्ता पुष्पाप्रमाणें

मस्तकावर धारण केली. मदुरेचा अजिंक्य राजासुद्धां ह्याच्या आज्ञेंत वागूं लागला. म्हैसूरच्या राजानेंही ह्याचें आधिपत्य मान्य केलें. दुष्ट रणदुल्लाखानानें बलात्कारानें घेतलेल्या आपल्या सिंहासनावर वीरभद्र हा शहाजीच्या आश्रयानें पुन्हां बसला. निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या युक्त्या योजणाऱ्या चतुर शहाजीच्या प्रभावानें पुष्कळांनीं यवनांची भीति टाकली. दुसऱ्यास अतिशय दुस्सह असणारा रणदुल्लाखान सर्वस्वामिकार्य शहाजी राजांच्या मार्गदर्शनाप्रमाणें करूं लागला. पुढें सेनापति रणदुल्लाखान कालवश झाल्यावर कर्नाटकांतील राजांना तत्काळ आपल्या अधीन करण्यासाठीं ज्या ज्या सेनापतीस आदिलशहानें तिकडे पाठविलें तो तो सेनापति त्याचें इष्टकार्य सिद्धीस नेण्यासाठीं शहाजीच्या तंत्रानें वागूं लागला. तेव्हां अनीतीचा आश्रय करणाऱ्या त्या इब्राहिम आदिलशहाच्या पुत्रानें (महमदशहानें) घमेंडीनें भोसले राजास बंदिवान् करण्याची मुस्तफाखानास आज्ञा केली."

पण शहाजीच्या बंदीचें हें दूरान्वयाचें कारण झालें. शहाजी व मुस्तफाखान यांच्यांत वैमनस्य येण्याचें अथवा शहाजीराजांनीं आपल्या वागण्याची एक विशिष्ट दिशा ठरविण्याचें व विजापूरच्या सत्तेला ती न आवडण्याचें कांहीं वेगळें असें कारण असलें पाहिजे. तें काय असेल याची मीमांसा श्री. दत्तोपंत आपटे यांनीं शिव-भारताच्या प्रस्तावनेंत अतिशय चांगली केलेली आहे. श्री. आपटे लिहितात --

" शहाजीच्या कैदेची हकीकत समजून घेण्यास बरींच महत्वाचीं साधनें उपलब्ध आहेत. शिवभारत, जेधे शकावलि, जेधे करीना, बुसातिने सलातिन, महमूदनामा, व शिवचरित्र साहित्यांतील (पृ. ५४ मधील)पत्रें यांत यासंबंधीची हकीकत आली आहे. पैकीं मुसलमानी ग्रंथांतून शहाजीला कसें पकडलें याची माहिती दिलेली आहे. परंतु त्याच्या सुटकेची हकीकत त्यांत मुळींच सांगितलेली नाहीं. जेधे शकावलींत शहाजीला कैदेंत घातल्याची व कैदेंतून सोडल्याची

अशा दोनही वेळच्या मित्या सांगितल्या असून जेध्यांच्या संबंधीं माहिती बऱ्याच विस्तारानें दिलेली आहे. शिवभारतांत मात्र या प्रसंगाप्रीत्यर्थ (११–१५)पांच अध्याय खर्ची घातले आहेत. आणि इत्थंभूत माहिती दिली आहे. तथापि त्यांत देखील शहाजी व शिवाजी यांची माहिती देण्यावरच परमानंदानें लक्ष ठेवलें आहे, व मुस्तफाच्या कर्नाटकांतील कामगिरीचा उल्लेख त्यांत अगदी ओझरता आला आहे. जेधे करीना व जेधे शकावली यांतील एतद्विषयक वृत्तान्तांत कांहींसा फरक असल्यामुळें या दोहोंची सापेक्ष ग्राह्याग्राह्यता प्रथम ठरवून ठेवणें आवश्यक आहे. त्यासंबंधीं विशेष चिकित्सा करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु येथें येवढें नमूद केलें पाहिजे कीं शिवचरित्राच्या दृष्टीनें जेधे करीन्यापेक्षां जेधे शकावलीमधली हकीकत जास्त व्यवस्थित स्वरूपाची आहे. करीना राजारामाच्या कारकीर्दींत लिहिला असल्यामुळें त्यांत चाळीस वर्षांपूर्वींचे प्रसंग वर्णन करतांना तपशिलाचा कांहीं ठिकाणीं गोंधळ व पौर्वापर्याचा विपर्यास झालेला आहे. परंतु जेधे शकावलींत हे दोष नाहींत. त्यांतहि हस्तलिखित प्रत बारकाईनें तपासून पाहिली असतां तिच्यांत चार निरनिराळीं वळणें आढळतात. तीं अशीं (१) श. १५४०–९०, (२) श. १५९१–१६०५; (३) श. १६०५–१० आणि (४) श. १६१०–१९. पैकीं पहिल्या भागाचें वळण जुनें व लिहिणें व्यवस्थित आहे. त्या मानानें दुसऱ्या भागाचा लेखक पुष्कळ काने, मात्रा व अक्षरें गाळणारा आणि उत्तरकालीन आहे. तात्पर्य, प्रस्तुत ज्या प्रसंगाचा ऊहापोह आपणांस करावयाचा आहे तो प्रसंग जेधे शकावलींतल्या व्यवस्थित व जुन्या भागांपैकीं आहे. त्यामुळें त्यांतील विधानांना जेधे करीन्यापेक्षां जास्त प्रामाण्य दिलें पाहिजे.

"महमूद आदिलशहाच्या हुकुमावरून तयार झालेल्या महमूदनाम्याची गणना अर्थातच अव्वल दर्जाच्या साधनांत केली पाहिजे. यद्यपि त्यांत पक्षपातानें वृत्तान्त कथन केलें असलें, व मुस्तफाचें करणें न्यायाचें आणि शहाजीची वागणूक उद्दामपणाची होती असें म्हटलें असलें तरी इतिहासाचें साधन या दृष्टीनें या समकालीन

ग्रंथाचें महत्व कमी होत नाहीं. शिवभारतांतून शहाजीची बाजू व महमदनाम्यांतून मुस्तफाची बाजू आपणांस समजते आणि त्या वेळीं घडलेला वृत्तान्त निश्चित होतो. सध्यां आपणांस शिवचरित्रांतील माहितीचा तपशील जितका सांपडेल तितका पाहिजे आहे. मग तो हिंदू लेखकाच्या इतिहासांत सांपडो किंवा मुसलमानी इतिहासांत सांपडो, आणि हा तपशील समकालीन लेखांतूनच जास्तींत जास्त सांपडण्याजोगा असल्यामुळें ग्रंथकाराच्या पक्षपातीपणानें बिचकून न जातां आपण माहितीचा संग्रह केला पाहिजे. माहिती भरपूर जमली म्हणजे नंतर कोणता पक्ष न्यायाचा होता व कोणता अन्यायाचा होता याची चिकित्सा करतां येईल. आणि यासाठींच महमदनामा मराठी वाचकांना सविस्तर रीतीनें भाषांतरासह मिळणें आवश्यक आहे.

"या महमदनाम्यांत शहाजीच्या कैदेचा प्रसंग असा सांगितला आहे. 'जिंजीचा वेढा बरेंच दिवस रेंगाळत चालला असतां व युद्धाचें काम चालू असतां त्या कपटी शहाजीनें नबाब मुस्तफाखान यांजकडे निरोप पाठवून "माझ्या सैन्यास विश्रांतीची जरुरी असल्यामुळें मला सैन्यासह जहागिरीकडे जाण्याची परवानगी मिळावी" अशी विनंती केली. त्यावर नबाबानें उत्तर पाठविलें कीं "या वेळीं तुम्ही निघून जाल तर वेढ्याच्या कामास व्यत्यय येईल, करितां तुम्ही जाऊं नये." शहाजीनें पुन्हां दुसऱ्यांदा निरोप पाठविला कीं "लष्करांत धान्याची अतिशय महागाई झाली आहे; त्यामुळें शिपायांना यापुढें उपासमार सहन होणार नाहीं व त्यांच्याकडून कामहि होणार नाहीं त्या अर्थीं तुमच्या परवानगीची वाट न पाहतां मी आमच्या प्रांताकडे निघून जातों." यावरून शहाजी उद्दाम बनला आहे व त्याच्या मनांतून आपल्याशीं कुरापत काढण्याची इच्छा आहे अशी नबाबाची खात्री झाली आणि त्यानें त्याला इतक्या हुशारीनें व व्यवस्थितपणें कैद करविलें कीं त्याच्या मालाची यत्किंचित् लुटालूट न होतां सुतळीच्या तोड्यासुद्धां सर्व माल सरकारांत जप्त झाला.

(सरकारकृत शिवचरित्र पृ. ३८)

"बुसातीने सलातीन नांवाचा विजापूरचा इतिहास अव्वल इंग्रजींत लिहिला गेला. तथापि त्याच्या लेखकाला कांहीं अस्सल कागद पहाण्यास मिळाले होते. त्यामुळें त्याची हकीकत बऱ्याच ठिकाणीं विश्वसनीय स्वरूपाची आहे असें मानण्यांत येतें. त्या ग्रंथांत शहाजीची कैद अशी वर्णन केली आहे. " चंदीकडे मुस्तफाखान गेल्यावर सिदी रयहान व मुस्तफाखान यांचें लष्कर एके जागीं झालें. तेव्हां मुस्तफा व शहाजी यांचा वेबनाव होऊन शहाजी मुस्तफाची गोष्ट ऐकेनासा झाला. तेव्हां शहाजीला पकडण्याकरितां हिजरी १०५८ रजब १५ रोजीं सकाळीं बाजी घोरपडे व यशवंतराव आसदखानी यांना मुस्तफानें पाठविलें. शहाजीनें गेली रात्र नाचरंगांत घालविली असल्यामुळें तो पहाटेच्या वेळीं निजला होता. घोरपडे वगैरे सरदारांची फौज आपल्यावर चालून आली असें समजतांच तो बेभान होऊन घोड्यावर बसून एकटाच निघाला. इतक्यांत बाजी घोरपडे यानें त्याचा पाठलाग करून त्याला पकडलें. आणि नबाबापाशीं आणलें. शहाजीचे तीन हजार स्वार होते ते सर्व पळून गेले व शहाजीचें सर्व लष्कर लुटलें गेलें. शहाजी कैद झाल्याची बातमी एकून आदिलशहानें दरबारांतून अफझलखानाची रवानगी केली व शहाजीला बंदोबस्तानें आणण्याचें काम त्याजकडे सोंपविलें. (१५७० कार्तिक, मार्गशीर्ष.)

"वर दिलेल्या मुसलमानी ग्रंथकारांनीं शहाजी मुस्तफाखानाचें ऐकेनासा झाला असें मोघम सांगितलें आहे. पण मुस्तफाखानाचें या वेळचें धोरण काय होतें व शहाजीशीं त्याचा कोणत्या मुद्द्यावर मतभेद झाला याचें विवेचन त्यांनीं मुळींच केलेलें नाहीं. हें विवेचन करण्यास उपयुक्त अशी माहिती शके १५८१ (इ. स. १६५९) मध्यें प्रोएन्झा नांवाच्या मिशनऱ्यानें त्रिचनापल्ली येथून लिहिलेल्या एका पत्रांत आली आहे. हें पत्र Nayaks of Madura नांवाच्या पुस्तकांत पुरवणी रूपानें छापलेलें असून त्यांत त्या वेळच्या दक्षिण हिंदुस्थानांतील घडामोडींचें समालोचन चांगल्या प्रकारें आलेलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं विजयनगरच्या राजवंशांतील

श्रीरंगराज हा महत्त्वाकांक्षी राजा होता. व त्याच्या मनांतून राक्षसतंगडीच्या युद्धानंतर आपल्या घराण्याचें नष्ट होत चाललेलें अधिराज्य पुन: प्रस्थापित करावें असें होतें. याकरितां त्यानें जिंजी, तंजावर व मदुरा येथील संस्थानिकांवर स्वारी करून त्यांना वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला. परंतु यांपैकीं जिंजी, व मदुरा येथील संस्थानिकांना श्रीरंगाचें आधिपत्य मान्य करण्याची इच्छा नसल्यामुळें मदुरेच्या त्रिमलनायकानें गोवळकोंडें येथील कुतुबशहाची मदत मागितली. त्याप्रमाणें कुतुबशाही सैन्यानें श्रीरंग राजाच्या ताब्यांतील पेनुकोंडा वगैरे प्रदेश हस्तगत केला; तेव्हां श्रीरंग फजीत पावून आपल्या मांडलिकाकडे आश्रयार्थ गेला. कुतुबशहाच्या सैन्यानें (पेनुकोंडा घेतल्यानंतर) श्रीरंगाच्या मांडलिकांवर चालून जाण्याच्या विचारानें प्रथम जिंजी किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां मदुरेचा त्रिमलनायक पंचाइतींत पडला. कारण श्रीरंगाचें राज्य बुडविण्यासाठीं त्यानें गोवळकोंड्याचें सैन्य बोलावलें खरें. परंतु तें आतां जिंजी हस्तगत केल्यानंतर आपल्या राज्यावर म्हणजे मदुरेवर चाल करून येणार हें स्पष्ट दिसूं लागलें. त्यांतून तंजावरच्या व्यंकटनायकानें घाबरून गोवळकोंडेकरांशीं तह केला. त्यामुळें त्रिमलनायकाचें काम फारच कठीण झालें, व त्यानें विजापूर दरबाराकडे धाव घेतली. त्याप्रमाणें मुस्तफाखान गोवळकोंडेकरांविरुद्ध लढून जिंजीचा वेढा उठविण्यासाठीं म्हणून आला. पण तेथें आल्यानंतर गोवळकोंडेकरांशीं लढण्याचें सोडून उलट त्यांचेशीं त्यानें तह केला. आणि गोवळकोंडेकरांनीं श्रीरंगाच्या राज्यांतील उत्तरेकडचा मुलुख पादाक्रान्त करावा व विजापूरकरांनीं जिंजीपासून दक्षिणेकडील संस्थानें गिळंकृत करावीं असा आपसांत करार ठरविला. या वेळीं गोवळकोंड्याचीं सूत्रें मीरजुमल्याच्या हातीं असून तो स्वतंत्र होऊं पाहात होता. त्यामुळें त्यानें स्वार्थावर दृष्टि देऊन विजापूरकरांशीं तह केला. विजापूरकरांच्या कर्नाटकांतील सुभेदारानें देखील असाच स्वतंत्र नबाब बनण्याचा विचार केला असल्यामुळें त्यानेंहि मीरजुमल्याचा स्नेह संपादन केला.

मिळून या घडामोडींतून शेवटीं असें निष्पन्न झालें कीं, मदुरेच्या त्रिमलनायकानें आपल्यावरचें संकट टाळण्यासाठीं म्हणून प्रथम गोवळकोंडेकरांना व नंतर विजापूरकरांना बोलावून दक्षिणेंत आणलें आणि अखेरीस हीं दोनहि मुसलमानी सैन्यें आपसांत न भांडतां हिंदूंचीं सर्व लहानमोठीं राज्यें मात्र धुळीस मिळविण्याचा उद्योग संगनमतानें करूं लागलीं. मीरजुमला व विजापूरकरांचा सुभेदार हे आपापल्या बादशहांची सत्ता झुगारून देऊन स्वतंत्र होण्यासाठीं या गोष्टी करीत होते हें खरें; पण त्यांच्या बंडखोरीचा फायदा हिंदू संस्थानिकांना मिळण्याऐवजीं हिंदू संस्थानिकांचा सत्यानाश होण्यांतच या बंडखोरांचें अंतःस्थ संगनमत कारणीभूत होत होतें. मिळून मुसलमानांमधील दुहीचा फायदा हिंदू राजांना मिळूं शकला नाहीं. दिल्लीकर व विजापूरकर यांच्यामधील बेबनाव आपल्या पथ्यावर पडेल असा अंदाज पूर्वी शहाजीनें केला होता. तो सपशेल फसून पेमगिरीच्या प्रसंगीं त्याला हार खावी लागली व तो विजापूरकरांचा नोकर बनला. तोच अनुभव आतां मदुरेच्या त्रिमलनायकाला आला. श्रीरंगाच्या अधिराज्यांतून सुटण्यासाठीं त्रिमलानें गोवळकोंडेकरांना निमंत्रण दिलें. आणि गोवळकोंडेकर शिरजोर झाले म्हणून त्यानें विजापूरकरांना बोलावलें. आणि शेवटीं विजापूरकर व गोवळकोंडेकर एक होऊन त्यांनीं श्रीरंग व त्याचे सर्व मांडलिक धुळीस मिळविले. ही सर्व उलथापालथ चालली असतां शहाजीनें काय केलें व मुस्तफाखानाशीं त्याचा विरोध कोणत्या मुद्द्यावर आला हें समजण्यास आपणाजवळ साधन नाहीं. तथापि भारतकार असें स्पष्ट सांगतो कीं, 'दुर्धर्षोऽपि विधेयोऽस्य बभूव मदुराधिपः ।' म्हणजे मदुरेचा त्रिमलनायक मोठा लढवय्या म्हणून नांवाजलेला होता तरी तो शहाजीच्या तंत्रानें वागूं लागला.

" सारांश, गोवळकोंडेकरांविरुद्ध म्हणजे मीरजुमल्याविरुद्ध लढण्यासाठीं विजापूरकरांचें सैन्य आणविलें असून त्यानें एकदम पगडी फिरवून मीरजुमल्याशीं स्नेह केला हें पाहून त्रिमलनायकाच्या तळव्याची आग ज्याप्रमाणें मस्तकास पोहोंचली असेल, त्याचप्रमाणें

त्रिमलाविषयीं आपलेपणाची भावना वागविणाऱ्या शहाजीलाहि मुस्तफानें केलेलें विश्वासघातकीपणाचें वर्तन पटणें शक्य नव्हतें. त्यानें जिंजीच्या वेढ्यांत सामील होण्याचें साफ नाकारलें. तो अनेक सबबी पुढें करून निघून जाणार असें दिसूं लागलें. इतकेंच नव्हे तर तो विरुद्ध पक्षांत सामील होईल कीं काय अशीहि शंका मुस्तफास येणें स्वाभाविक होतें. कावेरीपट्टणचा जगद्देव, मदुरेचा त्रिमलनायक, म्हैसूरचा चामराज वोडियार आणि बेदनूरचा वीरभद्र वगैरेंनीं 'जहुर्यवनजं भयं' म्हणजे मुसलमानांचें भय टाकलें आणि 'वशीचकार सकलं शाहः कर्नाटमंडलं' शहाजीनें कर्नाटक हस्तगत केल्यासारखेंच झालें होतें. तेव्हां हिंदूंची ही जूट फोडण्यासाठीं शहाजीला कैद करणें मुस्तफास अत्यवश्यक दिसलें असेल यांत शंका नाहीं.

"वरील हकीकतीवरून हें स्पष्ट आहे कीं, शहाजीवर कैदेचा प्रसंग आला तो कर्नाटकांतील गुंतागुंतीच्या परिस्थितीमुळें आला. त्यांत शिवाजीनें केलेल्या भानगडीचा फारसा संबंध नव्हता. शिवाजीनें घेतलेला सिंहगड परत हिसकून घेण्यासाठीं त्याजवर स्वतंत्र रीतीनें सैन्य रवाना झालें होतें. त्याचप्रमाणें शहाजीच्या बेगुमानपणाबद्दल त्याला कैद करण्याविषयीं महमूदशहाची संमति मुस्तफानें घेऊन ठेवली होती. शिवाजीनें दांडगाईचें वर्तन आरंभिलें म्हणून शहाजीवर कैदेचा प्रसंग आला असें समकालीन मुसलमानी इतिहासकार अथवा शिवभारतकार यांपैकीं कोणीहि सांगत नाहीं. कर्नाटकांत शहाजीचें प्रस्थ बेसुमार वाढलेलें पाहून त्याला कैद करण्यासाठींच मुस्तफाची सैन्यासह कर्नाटकांत रवानगी करण्यांत आली असावी असा भारतकारांच्या लिहिण्याचा आशय दिसतो. शहाजी व मुस्तफाखान एकमेकांस ओळखून होते. तथापि प्रथम कांहीं दिवसपर्यंत दोघांनीहि सामोपचारानें वागून मित्रत्वाचा डौल घातला होता. वस्त्रें, अलंकार देऊन भेट प्रतिभेट यांचा देखावा निर्माण करून व वारंवार सल्लामसलत विचारण्याचा घाट घालून मुस्तफानें शहाजीला हळू हळू गाफील बनविलें, आणि नंतर एके

दिवशीं रात्रीं आपल्या सेनानायकांना बोलावून शहाजीस कैद करा असा माझ्याकडे महमूदशहाचा निरोप आला आहे, करितां आज पहाटें सैन्यासह जाऊन शहाजीस पकडण्याचें काम पार पाडा असें मुस्तफानें सांगितलें. त्याप्रमाणें पहाटे मुस्तफाखान आपल्या सैन्यासह शहाजीच्या तळाभोंवतीं वेढा देण्यासाठीं निघाला. मुस्तफा बरोबरच्या या सैन्यांतील बारा मुसलमान, तीन ब्राह्मण आणि तीन मराठे सरदार मिळून अठरा सरदारांचीं नांवें कवीनें प्रारंभीं दिलीं आहेत. त्यानंतर शहाजीच्या बेसावध सैन्याभोंवतीं गराडा दिल्या-वर त्यांतून बाजी घोरपडे, खास शहाजीच्या शिबिरावर चालून जाण्यासाठीं निघाला. तेव्हां त्याच्याबरोबर जे सरदार गेले त्यांत बाजीसुद्धां सात सरदारांचीं नांवें आहेत. तीं सर्व मराठ्यांचीं आहेत. त्यांत शहाजीचा चुलतभाऊ मंबाजी भोसले याचें नांव आहे आणि जसवंतराव (आसदखानी) असें जें मोघम नांव बुसातिने सलातीनमध्यें आहे त्याचें आडनांव वाडवे असें भारतांत दिलें आहे. (खंडोजी, अंबाजी, मानाजी, बाजीराजे घोरपडे, यशवंतराव वाडवे, मालोजीराजे पवार व तुळोजीराजे भोसले हे ते सरदार होत.) हें सैन्य आलें तेव्हां शहाजीकडील मंडळी अर्धवट झोपेंत होतीं. त्यामुळें त्यांना युद्धाची तयारी करण्यास सवड मिळाली नाहीं तथापि खंडोजी पाटील मात्र ताबडतोब युद्धाची तयारी करून बाजी घोरपड्याच्या अंगावर एकटाच चालून गेला. त्यानें प्रथम बाजी घोरपड्यावर प्रहार केला. परंतु इतर सरदारांनीं गराडा घालून पाटलास ठार केलें. नंतर शहाजी घोड्यावर बसून लढण्या-साठीं निघाला. त्या वेळीं त्याच्याबरोबर निघालेल्या सहा सरदारांचीं नांवें परमानंदानें दिलीं आहेत, त्यांत शहाजीचा चुलतभाऊ त्र्यंबकराज याचें नांव आहे. (दसोजीराजे, योगाजी भाणकर, संताजी गुजावटकर, मेघाजी ठाकूर, त्र्यंबकजीराजे भोसले व दत्तराजे हे ते सहा सरदार होत.) हे सहा सरदार चालून गेले तेव्हां त्यांची बाजीच्या सरदारांशीं कांहीं वेळ चकमक घडली. तिच्यांत बाजीच्या बाजूचे लोक विजयी झाले. शेवटीं शहाजीहि लढून दमला

आणि जखमी होऊन पडला. तेव्हां बाजी घोरपड्यानें त्याला स्वतः कैद केलें. त्यावरोबर शहाजीचें सैन्य पळून गेलें व सर्व सामान शत्रूच्या हातीं लागलें. अशा रीतीनें कपटाचा आश्रय करून मुस्तफानें शहाजीला कैद करण्याच्या कामीं यश मिळविलें."

– (शिवभारत प्रस्तावना, पृष्ठ १३१ ते १३८)

शहाजीला कर्नाटकांतून विजापूरला आणण्याची कामगिरी पुढें आपल्या मरणानें अधिक विख्यात झालेल्या अफझलखानावर सोपविण्यांत आली होती. अफझलखानाच्या मनांत राजे शहाजी यांच्याविषयीं पहिल्यापासूनच विलक्षण द्वेष होता. रणदुल्लाखानाच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या कर्नाटकाच्या मोहिमेंत शहाजीसमोर आपलें प्रस्थ वाढण्याची शक्यता नाहीं या मत्सरी कल्पनेच्या पोटीं हा द्वेष उत्पन्न झाला असावा. त्यानंतर मुस्तफाखानाच्या सेनापतित्वाखालीं बाजी घोरपड्याप्रमाणेंच अफझलखानानेंहि आपला सूड घेण्याची संधि साधली. जिंजी जिंकून मिळालेली अपार लूट ८६ हत्तींवर लादून व एका हत्तीवर अपमानास्पद रीतीनें शृङ्खलाबद्ध स्थितींत शहाजीराजांना बसवून दि. १० मार्च १६४९ रोजीं अफझलखानानें दिमाखानें विजापूरच्या राजधानींत प्रवेश केला. रस्त्यावर उसळलेल्या गर्दीनें राजे शहाजी यांनीं आपलें भवितव्य आपल्या मनाशीं तेव्हांच ठरविलें असेल !

मुरार जगदेवाचा ज्या पद्धतीनें वध झाला त्याच पद्धतीनें शहाजीचाहि निर्णय व्हावयाचा ही गोष्ट ठरल्यासारखीच होती. शहाजीला बंदी केलें त्या वेळीं त्याचा ज्येष्ठ पुत्र संभाजी बंगलोरला होता व शिवाजी महाराज आपल्या स्वराज्यांत होते. मुस्तफाखानानें शहाजीची सारीच मत्ता अधीन करून घेण्याच्या इच्छेनें फर्रादखान नांवाच्या एका सेनानीला बंगलोरवर पाठविलें. पण संभाजीनें फर्रादखानास असा विलक्षण चोप दिला कीं, तो आपल्या तानाजी डुरे, विठ्ठल गोपाळ आदि सरदारांसह पुन्हां तिकडे वळलाच नाहीं. याच वेळीं महमूदशहानें शिवाजीराजांना चिरडून टाकण्यासाठीं फत्तेखानाच्या सेनापतित्वाखालीं मिनादशेख, रतनशेख,

अशरफशहा, मताजी घाडगे, बाळाजी हैबतराव हे सरदार पाठविले. या मंडळींत बजाजी नाईक निंबाळकर हे शिवाजी महाराजांचे प्रत्यक्ष मेहुणे स्वराज्याच्या नरडीवर नख द्यावयास उठले होते हें विशेष होय! महाराजांच्या थोरल्या राणी सईबाईसाहेब यांचे हे बंधु. जवळ जवळ पांच सहस्रांच्या या सेनेशीं संधीऐवजीं झुंज घेण्याचा निर्णय शिवछत्रपतींनीं घेतला. कारण या वेळीं संधि करणें याचा अर्थ स्वराज्य स्वप्नांतच विरवून टाकणें असा होता. त्यांची त्या वेळची राजधानी राजगड येथून दहा कोसांवर पुरंदर नांवाचा बळकट किल्ला होता. त्या वेळीं तेथें महादाजी नीळकंठराव सरनाईक म्हणून गडकरी होता. तो विजापूरकरांचा अंकित असला तरी शहाजीराजांचा जिवाभावाचा मित्र होता. शिवाजी महाराजांनीं या पुरंदर गडावरून फत्तेखानाशीं टक्कर द्यावयाचें ठरविलें. व या सरनाईकांनीही त्यांना पुरंदरावर आश्रय दिला. महाराज पुरंदरावर स्थिरावले न स्थिरावले तोंच फत्तेखानाच्या टोळींतील एक सरदार बाळाजी हैबतराव यानें शिरवळपर्यंत धडक मारून तें ठाणें व त्या लगतचा सुभानमंगळचा किल्ला जिंकला. त्याबरोबर शिवाजी महाराजांनीं कावजीच्या नेतृत्वाखालीं गोदाजी जगताप, भीमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर व भैरव हे खंदे गडी देऊन सैन्याची तुकडी पाठविली. सुभानमंगळच्या भुईकोट किल्ल्याला बुरुज व खंदक नाहींत याची कावजीला जाणीव होती. त्यानें सरळ तटावर मारा करून आंत प्रवेश केला. या धुमश्चक्रींत बाळाजी हैबतराव आपल्या १०९ सैनिकांसह ठार झाला व जयश्रीनें शिवरायाच्या बाजूनें कौल दिला. या वेळीं फत्तेखान स्वत: बेलसरपर्यंत चालून आला होता. बेलसरला त्यानें महाराजांच्या सैन्याचा पराभव केला. कसें बसें बाजी नाईक जेधे ध्वजाची इभ्रत वांचवून आले. महाराजांनीं या कार्याविषयीं त्यांचा सन्मान करून त्यांना गौरविलें व हा छोटासा पराभव पचवून टाकिला. बेलसरच्या क्षणिक विजयामुळें फत्तेखान आपल्या दाढीस कुरवाळतो न कुरवाळतो तोंच शिरवळच्या

ठाण्यावरील बाळाजी हैबतरावाच्या ससैन्य संहाराच्या वार्तेची चपराक त्याच्या श्रीमुखांत बसून तो संतापानें वेडा झाला व आपल्या मुसेखान प्रभृति शेलक्या सरदारांसह त्यानें पुरंदरावर आक्रमण केलें. अर्ध्या वाटेपर्यंत त्याला येऊं देऊन महाराजांनीं त्याच्यावर चोहोंकडून निकराचा मारा केला. या हातघाईच्या युद्धांत मुसेखान जागच्या जागीं ठार झाला, व मुसलमानी सैन्याची इतकी लांडगेतोड झाली कीं, तें वाट फुटेल तिकडे पळून गेलें. फत्तेखानाची 'फत्ते' शिवरायाकडे आली व खान काळवंडलेलें रडवें तोंड घेऊन विजापूरला गेला. याप्रमाणें शहाजीराजांच्या दोघाही मुलांनीं आपल्या तिखट तरवारीचें पाणी विजापूरला दाखविलें. महाराजांनीं विजापूरच्या सत्तेविरुद्ध प्रकटपणें केलेलें पहिलें यशस्वी युद्ध या दृष्टीनें या घटनेचें महत्व विशेष आहे. मात्र स्वराज्याच्या मंदिराच्या पायाभरणींत आपल्या जिवलगांचे प्राण जात असलेले पाहण्याचा महाराजांच्या जीवनांतील जो नित्याचा दारुण प्रसंग त्याचाहि प्रारंभ या घटनेपासूनच झालेला आहे. पळत्या मुसलमान फौजेचा पाठलाग करीत असतां महाराजांना या युद्धांत बाजी पासलकरांना गमवावें लागलें. पण स्वातंत्र्याच्या रणयज्ञांत चितेचें सिंहासन हेंच स्वदेशभक्तांचें स्वामित्वाचें आसन असतें !

## शहाजीराजांची सुटका

या पराभवानें चिडून जाऊन विजापूरच्या सुलतानानें शहाजीचा प्राण घेणेंच स्वाभाविक होतें. पण तसें कांहीं न होतां अकल्पितपणें दि. १६ मे १६४९ ज्येष्ठ पौर्णिमेला महमूदशहानें शहाजीची सिंहगड, बंगलोर शहर व कडापीचा गड परत देण्याच्या अटीवर सुटका केली. हें कसें घडून आलें असेल? असें सांगतात कीं, आदिलशाहीपेक्षां अधिक प्रबळ अशा सत्तेचें तिच्यावर दडपण आणल्याविना आपल्या पित्याच्या सुटकेचा दुसरा कोणताहि उपाय नाहीं हें ओळखून शिवाजी महाराजांनीं आदिलशाहीपेक्षां प्रबळ असलेल्या मोंगल सत्तेशीं संधान जुळविलें. त्या वेळीं बादशहा शहाजहान

राज्यपदावर असून शाहजादा मुरादबक्ष हा दक्षिणेंत मोंगलांचा सुभेदार होता. मागील अपराध क्षमा करून नोकरींत घेत असल्यास शहाजीराजे आपल्या पुत्रासह मोंगलसत्तेच्या सेवेंत यावयास सिद्ध आहेत असें महाराजांनीं त्याला कळविलें. मुरादनें ते मान्य करून शहाजीच्या नांवें बहुमानाचा पोशाखहि पाठविला. ही कुणकूण विजापूरच्या सुलतानाला लागतांच भलती विपत्ति नको म्हणून त्यानें शहाजीराजांची सुटका केली. पण या वृत्तान्तांत ऐतिहासिक तथ्य असेल असें वाटत नाहीं. कारण या परिस्थितींत सिंहगड व बंगलोर परत देण्याची अट सुलतान महमूदशहानें शहाजी राजांना घालणें जड गेलें असतें व शहाजीराजांनींहि आपण व शिवाजी या दोघांनाहि स्वातंत्र्याच्या दृष्टीनें पेचांत घालणाऱ्या या अटींना अशा परिस्थितींत मान्यता दिली नसती. पण ही सुटका या अटींवरच झालेली आहे. त्यामुळें असें म्हणणें भाग आहे कीं शहाजीच्या सुटकेचा मोंगल सत्तच्या हस्तक्षेपाशीं कांही संबंध नसावा. त्या वेळचा विजापूरचा सुलतान महमूदशहा हा स्वत: योद्धाहि नव्हता व निश्चयी मनाचा पुरुषहि नव्हता. त्याचें धोरण त्याच्या त्या त्या वेळच्या त्याचे कान फुंकणाऱ्यांच्या मतानुसार पालटत असे. मुस्तफाखान हा त्याला राज्यपदावर आणण्यास कारणीभूत असल्यामुळें त्याचें सुलतानावर वजन होतें. तो शहाजीच्या विरुद्ध असल्यामुळें शहाजीविरुद्ध त्यानें कान फुंकतांच सुलतान शहाजीविरुद्ध गेला. या वेळीं मुस्तफाखान मेलेला असून त्याच्या विरुद्ध पक्षाचें पारडें जड झालेलें होतें. त्यांतील सर्जाखानाच्या मध्यस्थीमुळें व रणदौलाखान शहाजीराजांना ओलीस रहावयास सिद्ध झाल्यामुळें शहाजीराजे यांची सुटका झाली शहाजीराजे सिंहगड व बंगलोरचे किल्ले विजापूरकरांना देण्यांत आपण व शिवाजी कोणत्या अडचणींत येणार आहोंत हें ओळखत होते. पण त्याविना दुसरें गत्यंतरच नव्हतें. महमदनाम्यांत असें म्हटलें आहे कीं, " शहाजी या वेळीं मुल्ला अहंमदच्या बंदींत होता. या मुल्लानें त्याचें मन वळवून सुलतानाच्या इच्छेप्रमाणें

किल्ले देवविले." सुटकेनंतर चार वर्षांनीं परत शहाजी राजांची सुलतानाकडून दक्षिणेच्या कामगिरीवर पाठवणी झाली. सिंहगड परत द्यायला लावण्यांत शिवाजीवर आपण कोणता पेंच टाकीत आहोंत याची राजे शहाजी यांना कल्पना होती. श्री. दत्तोपंत आपटे लिहितात, "सिंहगड व बंगलूर परत मिळाल्यानंतर शिवाजीस पुणें प्रांताकडे व शहाजीस बंगलूर प्रांताकडे पूर्ववत् राहूं देण्यास महमूदशहाची हरकत नव्हती. मुख्य किल्ले सरकारी ताब्यांत असल्यानंतर त्याच्या सभोंवारचा प्रदेश शहाजीकडे जहागीर अगर मोकासा म्हणून चालविण्यांत आपणांवर कांहीं संकट ओढवेल असें महमूदशहास वाटलें नाहीं. कारण किल्ल्यावरील सैन्याच्या जोरावर शिवाजी व शहाजी यांना केव्हांही चिरडून टाकतां येईल असें त्याला म्हणतां येत होतें. अशा तऱ्हेनें मनांत दंश धरून केव्हां तरी शिवाजीचा सूड महमूदशहा घेतल्यावांचून रहाणार नाहीं अशी शंका शहाजीला वाटल्यामुळें त्यानें आपल्या विश्वासांतला कान्होजी जेधे यास शिवाजीकडे रहाण्यासाठीं पाठविलें, शिवाजीवर आणीबाणीचा प्रसंग आल्यास जिवाची तमा न धरतां तो अडचणीच्या ठिकाणीं आधीं उडी घेईल अशी त्याच्याबद्दल शहाजीला खात्री होती. कान्होजीला निरोप देतांना शहाजी म्हणाला "तुम्ही आम्हांमुळें बंदखानी श्रमी जालेस या उपरी आम्ही पादशहासी तह केला कीं बारा गांवांतून (४८ कोसांवरून) मजुरा करून हुकूम प्रमाणें कर्नाटक प्रांतें मसलत करावी. त्यावरून बेंगरूळ प्रांत पांचा लक्ष होनांचा जहागीर दिल्हा आहे, याकरितां आपणांस कर्नाटकाची मसलत करावी लागली. तुमचें वतन मावळांत आहे. चिरंजीव राजेश्री सिउबा खेडेबारियांत व पुणा आहेत. त्याजजवळ तुम्ही जमावानसी राहणें. तुमची जबरदस्ती त्या प्रांतें आहे. अवघे मावळचे देशमुख देखील त्यासी रुजू होऊन त्याचे आज्ञेंत वर्तेत ऐसा विचार करून जबरदस्तीनें राहावें. येखादी मोगलाकडील इदलशाहीकडील फौज आली तरी आपण इमान राखावे. त्यांसी लढाई करावी. यैसो

शपथ इमान पुरस्कर बेलरोटीवर हात ठेऊन घेतली. तैसीच त्याणींहि कान्होजी नाइकास शेपथ दिल्ही आणि कान्होजी नाईक यास व दादाजी कृष्ण यास वस्त्रें देऊन, बरोबर हुजऱ्या व पत्रें देऊन, राजश्री शिवाजी राजे याजकडे पाठविलें." (शिवचरित्र प्रस्तावना पृ. १७) दादोजी कोंडदेवानें बारा मावळांची व्यवस्था लावण्याच्या कामीं कान्होजी जेध्याचा उपयोग करून घेतला होता. त्याचप्रमाणें आतां दादोजी नंतर त्यावेळचे देशमुख शिवाजीवर उलटूं नयेत या हेतूनें शहाजीनें कान्होजीस आपलें वजन खर्ची घालण्यास सांगितलें. मिळून बापाला सोडविण्यासाठीं मुलानें तरवार उचलली आणि मुलाच्या सुरक्षितपणाची व्यवस्था करण्यासाठीं शहाजीनें आपल्याजवळील अत्यंत विश्वासूक माणसांची योजना केली." (शिवभारत, प्र. पृ. १४३ व १४४)

## शिवरायांचा संताप

शहाजी राजांच्या या अटकेच्या प्रकरणांतील जयशाली युद्धांत आपल्या सिद्धतेचा कस शिवाजी महाराजांना लावून पाहतां आला, व उघड क्रांतियुद्धाचें रणशिंग फुंकण्याइतकी स्वतःची सिद्धता झाली असल्याची, या पहिल्याच जयश्रीनें, त्यांची कल्पना झाली. या मनाच्या अवस्थेंत कोंडाणा अथवा सिंहगड परत देण्याच्या अटीवर शहाजीराजांनीं आपली सुटका करून घेतली व वडिलांच्या या वचनानुसार आपल्याला एवढ्या सायासानें मिळविलेलें सिंहगडाचें नाकें परत द्यावें लागणार या गोष्टीचा महाराजांना अतिशय राग आला. त्यांनीं तो राग शहाजीराजांनींच त्यांच्या साहाय्यार्थ दिलेले एक थोर मुत्सद्दी सोनोपंत डबीर यांच्याजवळ व्यक्तहि केला. शिवछत्रपतींच्या या रागांत जयश्रीच्या अहंकाराचें भरपूर मिश्रण होतें. तसेंच सिंहगड जाणें म्हणजे स्वराज्याचें हृदयच शत्रूच्या हातीं देणें असल्यामुळें एक प्रकारचा हताशपणाहि त्यांतून व्यक्त झाला आहे. परमानंदानें शिव छत्रपतींचे जे उद्गार दिले आहेत त्यावरून त्यांच्या मनःस्थितीची कल्पना येते. महाराज म्हणाले.

जानतामतिमूर्धन्यं यं धन्यं जानते जनाः ।
स मां नूनं न जानीते महाराजो महामनाः ॥ ३
अजानानो न जानातु सुखेनैव सतो गुणान् ।
जानानो यन्न जानीते तद् दुनोति हि सन्मनः ॥ ४
सोऽज्ञास्यद्यर्हि मां तर्हि नादास्यत्सिह्यपर्वतम् ।
कोऽन्यथा तरसा जेष्यत्तमिमं मत्करस्थितम् ॥ ५
अप्रमत्तोऽपि यो मत्तो द्विषते सिह्यपर्वतम् ।
आदापयच्चेदिलाय किं वक्ष्ये तं महाव्रतम् ॥ ६
स्वयं नियंता विश्वस्य विश्वस्य बत वैरिषु ।
सुखं सुप्तो निजगृहे ततो निजगृहेऽरिभिः ॥ ७
नावज्ञेयः खलु ज्ञेन वराका अपि विद्विषः ।
प्रशाम्यते पतंगेन प्रज्वलन्नपि दीपकः ॥ ८
दीपं विनाशयन्नेव पतंगश्चेद्विनश्यति ।
तुल्यतां कस्तयोस्तर्हि जात्यंध इव पश्यति ॥ ९
नूनं पिपीलिकोऽप्येकः प्रविश्य करिणः करम् ।
भवत्यंतकरस्तस्मादल्पं मन्येत नो परम् ॥ १०
अहो महाबाहुरसौ जानानोऽपि महानयम् ।
गणयत्येव न परानस्य दोषो महानयम् ॥ ११
अरातिनिगृहीतेन शाहेन गुरुणा मम ।
यः प्राप्तश्चिररात्राय कारागारपरिश्रमः ॥ १२
तस्य निर्यातनं कर्तुं संप्रवृत्तोऽस्मि सर्वथा ।
यवनान्तात् प्रवृत्ताद्यप्रभृत्यत्रास्तु मत्प्रथा ॥ १३
यः परस्माद्बिभेत्युच्चैः परस्तस्माद्बिभेति च ।
न बिभेति परस्माद्यः परस्तस्माद्बिभेति हि ॥ १४
नूनं मया निहंतव्यास्ते ते यवननायकाः ।
शरधिद्वितयस्थैते तेजिताः सन्ति सायकाः ॥ १५
विजयाह्वपुरग्रोहोत्सुकं संप्रति मन्मनः ।
अतोऽद्य नोद्यसे सद्यो नियुज्यन्तां तुरंगिणः ॥ १६

—(शिवभारत अ. १६)

" ज्या धन्य पुरुषाला लोक शहाण्या पुरुषांमध्यें अत्यंत श्रेष्ठ समजतात तो थोर मनाचा महाराजा शहाजी मला खरोखर ओळखत नाहीं. अडाण्यानें सज्जनाच्या अंगचे गुण जाणले नाहींत तर तो न जाणो बापडा, पण जाणत्यानेंही जर ते जाणले नाहींत तर ती गोष्ट मात्र सज्जनांच्या मनास दुःख देते. जर तो मला ओळखत असता, तर त्यानें सिंहगड दिलाच नसता; नाहीं तर, माझ्या हातचा हा गड बलानें कोण जिंकू शकला असता बरें! शहाणा सुरता असून सुद्धां ज्या वेड्यानें शत्रु आदिलशहास सिंहगड माझ्याकडून देवविला त्या करारी पुरुषास मी काय म्हणूं? खरोखर स्वतः विश्वाचा नियंता असून, शत्रूंवर विश्वसून आपल्या घरीं सुखानें निजला म्हणून तो शत्रूंकडून पकडला गेला! शत्रु क्षुद्र असले तरी शहाण्यानें त्यांची उपेक्षा करूं नये, कारण जळणारा दिवासुद्धां पतंगाकडून विझवला जातो. दिव्याचा नाश करतांक्षणींच जरी पतंग नाश पावतो; तरी एखाद्या जन्मांधाप्रमाणें कोण डोळस मनुष्य दोघांनाहि सारखें मानील? वस्तुतः एखादी मुंगीसुद्धां हत्तीच्या सोंडेंत शिरून त्याचा अंत करते. म्हणून शत्रूस केव्हांहि क्षुद्र मानूं नये. अहो, हा महाबाहु, मोठा राजनीतिज्ञ असूनहि शत्रूंची मुळीं पर्वा करीतच नाहीं, हा ह्याचा मोठा दोष होय. शत्रूंनीं बंदींत टाकून माझ्या पित्याचें कारागृहामध्यें जे पुष्कळ दिवस हाल केले त्यांचा सूड घेण्यास मी अगदीं सिद्ध झालों आहे; आणि आजपासून यवनांच्या नाशामुळेंच या लोकीं माझी कीर्ति होवो. जो शत्रूस अतिशय भितो त्यासही शत्रू भीत असतो मग जो मुळींच भीत नाहीं त्याला शत्रू भितो हें सांगावयास नकोच. खरोखर मी त्या सर्व यवननायकांचा फडशा उडविणारच (आणि त्याकरतां) भात्याच्या जोडीमधले हे बाण पाजळलेले आहेत. विजापूर नगर घेण्याविषयीं सांप्रत माझें मन उत्सुक झालें आहे. म्हणून आज तुम्हांस माझें सांगणें आहे कीं, लगेच घोडेस्वारांस सिद्ध करा."

अवघ्या १९ वर्षांच्या शिवाजीराजांचें हें भाषण ऐकतांच सोनोपंत डबीर आश्चर्यानें स्तंभितच झाले. छोट्याशा विजयाच्या

अहंकारानें स्वतःविषयीं भलतीच कल्पना करून घेऊन आपल्याहून कितीतरी प्रबळ असलेल्या आदिलशाहीशीं, तिला अपसमजानें क्षुद्र लेखून, राजा टक्कर घेईल तर त्यांत राजाचाच सर्वनाश होईल हें मुरब्बी सोनोपंतांनीं ओळखलें व राजाहून राजकारणाचे कितीतरी अधिक रंग खेळलेल्या शहाजी राजांसारख्या, स्वराज्याच्या रोपट्याची कुशलतेनें जपणूक करणाऱ्या वडिलांच्या अहंकारी अधिक्षेपाची जर राजाला संवय लागली तर त्याच्या जीवनांत सारासारविवेकाऐवजीं लहरींनाच अधिक प्राधान्य मिळून स्वराज्य-मंदिराच्या शिरोभागाचा पूर्ण बुद्धिनाश होण्याचा संभव आहे हें ओळखून ते विचार करूं लागले. बुद्धिनाश म्हणजेच तर सर्वनाश; व राजाच्या रागालोभाची तमा न बाळगतां याच वेळीं त्याच्या अहंकारावर कठोर प्रहार करून त्याला सावध केलें पाहिजे असें ठरवून त्यांनीं राजाची कानउघाडणी केली व त्याला लाख मोलाचें मार्गदर्शन केलें. शिवाजीमहाराजांचे चार मुद्दे होते. (१) वडिलांना माझें मोल अद्याप समजलें नाहीं; त्यामुळें त्यांनीं सिंहगड द्यावयास लावून आपली सुटका करून घेतली. पण मी पराक्रमाच्या जोरावर महमूदशहास वडिलांची सुटका करण्यास भाग पाडलें असतें. सोनोपंतांच्या विचारी बुद्धीला हा मुद्दा पटण्यासारखा नव्हता. विजापूरचा एक सरदार अफझलखान चालून आल्यावरच महाराजांवर केवढा प्रसंग आला होता ही भावी घटना ध्यानांत घेतली तर या विधेयकांतील फोलपणा लक्षांत येतो. या वेळीं तर शहाजीचेंहि डोकें उडालें असतें व शिवाजी राजावर विजापुरी सामर्थ्याचा सर्व ओघ वळून सारें स्वप्न सदाचें धुळीला मिळालें असतें. (२) मुस्तफा आपला वैरी आहे हें माहीत असून गाफीलपणानें आपणांस कैद करून घेतलें यावरून वडिलांचा असावधपणा दिसून येतो. शहाजीच्या अटकेसंबंधांत शहाजीचा असावधपणा हें तर कारण होतेंच, पण त्याबरोबरच मुस्तफाचें बळ शहाजीपेक्षां अधिक होतें हेंहि कारण होतें. हें राजाच्या ध्यानांत आणून देणें सोनोपंतांना आवश्यक होतें. कारण विजापूरकरांविरुद्ध एकदम युद्ध घोषित करण्यांत राजांचीहि

तीच चूक होणार होती. महाराजांचें तिसरें म्हणणें होतें की (३) वडिलांना बंदिवासांत पुष्कळ त्रास झाला; त्याचा सूड घेण्यासाठीं मी विजापूरकरांशीं युद्ध करणार आहें. सोनोपंतांना राजांस हें पटवावयाचें होतें कीं राजकारणांत सूड युक्तीनें उगवावयाचा असतो. ज्यांत आपलाच सर्वनाश होईल अशा भावनेच्या आहारीं जाण्यांत अर्थ काय? नेत्याला त्याचा तोल जाऊं नये म्हणून तोंडावर खडसावणारे मुरब्बी लोक लागतात. 'होयबांचा' उपयोग नसतो. म्हणून चतुर नारदानें युधिष्ठिराला प्रश्न विचारतांना 'शतं विहाय मूर्खाणामेकं क्रीणासि पंडितम्' (शंभर 'होयबांचा' परित्याग करून एका शहाण्या व दूरदर्शी पुरुषाची जोड करून घेण्याचा तुझा प्रघात आहे ना?) असें खोंचकपणें विचारलें आहे.

## सोनोपंतांचा हितोपदेश

सोनोपंतांनीं शिवाजीराजांना जो उपदेश केला तदनुसारच त्यांचे पुढचें राजकारण रंगलेलें असल्यामुळें त्या उपदेशाचें शिवचरित्राच्या समालोचनांत महत्त्व आहे. सोनोपंत म्हणाले :—

दुरंतं बलवद्वैरं दुरंतः पापसंचयः।
दुरंताभ्यर्हिता गर्हा दुरंता गुरुगर्हणा॥ १७
विधाय बलवद्वैरं तव तातः कृताग्रहः।
नाभूदवहितो यर्हि तदर्हस्तर्हि निग्रहः॥ १८
स प्रभावी महाराजो मंत्रिणस्तस्य सुव्रताः।
तेन यद्बलवद्वैरं कृतं सोऽपनयः कृतः॥ १९
तनुते यद्बलं वैरमबलीयान् बलीयसा।
नहि तस्य पराभावे सर्वथा प्रभुरेव सः॥ २०
दानमभ्यधिके शत्रौ समे साम विधीयते।
ऊने दण्डविधिः प्रोक्तो भेदः साधारणः स्मृतः॥ २१
दिने दिने भवन्नूनः समः साम्यं विमुञ्चति।
आधिक्यं चाधिको येन को भेदं न प्रशंसति॥ २२
नरेन्द्र नूनमूनोपि द्वेषणो भेदमर्हति।
ऊनस्याप्यूनतात्यर्थं हितायव भवेद्युधि॥ २३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ... दिनांक ...
नीतिशास्त्रेषु विरसं निजकार्यभरालसम्।
मानुषं विजहाति श्रीर्व्यसनापन्नमानसम् ॥ ३२
गिरयो नैव गुरवो गुरुरेव गुरुर्मतः।
भवतात्र प्रभवता दत्तः सिम्हाचलस्ततः॥ ४२
प्रदत्ते द्विषतेऽमुष्मिन् विमुक्तश्चेत् स पार्थिवः।
तर्हि दत्तोऽपि भवता न दत्तः सिम्हपर्वतः॥ ४३
यः सिन्हपर्वतं मेने समं शाहसुमेरुणा।
विंगरूरं च नगरं किंकृतं तेन वैरिणा ॥ ४४
उपक्रान्तमिदानीं तु त्वया विजयमंडलम्।
सुविक्रान्तस्य नृपतेः सर्वमेव महीतलम् ॥ ४५
समं च विषमं चेति वैरं द्विविधमुच्यते।
प्रथमं तु समेनार्हद्वितीयमधिकेन चेत्॥ ५४
समे समत्वादुभयोर्न भवेद्विजयः खलु।
अधिकस्याधिकत्वेन विषमे विजयो ध्रुवम्॥ ५५
फतेखानप्रभंगेन मुसेखानवधेन च।
अर्हदिवं प्रभो तुभ्यं महमूदोऽभ्यसूयति॥ ५६
पश्य येदिलदिल्लीन्द्रौ विषयानंतरौ तव।
यवनौ बलिनौ तुभ्यं द्रुह्यतोऽहर्निशं नृप ॥ ५७
अमू उभयतो यस्य द्वेषणौ रोषणौ तव।
तस्य नूनमिहस्थाने स्थितिः स्थाने न संप्रति॥ ५८
अतोऽतिदुर्गमंस्थानमास्थाय जगतीपते।
यतस्व जगतीं जेतुं किमजय्यं शिवस्य ते॥ ५९
न दुर्गं दुर्गमित्येव दुर्गमं मन्यते जनः।
तस्य दुर्गमता सैव यत्प्रभुस्तस्य दुर्गमः॥ ६१
प्रभुणा दुर्गमं दुर्गं प्रभुर्दुर्गेण दुर्गमः।
अदुर्गमत्वादुभयोर्विद्विषन्नेव दुर्गमः॥ ६२
सन्ति ते यानि दुर्गाणि तानि सर्वाणि सर्वथा।
यथा सुदुर्गमाणि स्युस्तथा सद्यो विधीयताम्॥ ६३

—(शिवभारत अ. १६)

"बलवंताशीं वैर, पापाचा संचय, पूज्यांची व वडिलांची निंदा यांचा परिणाम वाईट होतो. बलवंताशीं वैर करून तुझा पिता भलता आग्रह धरून सावध राहिला नाहीं, त्यामुळें पकडला गेला हें स्वाभाविकच होय. महाराज शहाजी पराक्रमी आहेत, त्यांचे मंत्रीहि कर्तृत्ववान् आहेत; तथापि त्यानें जें बलिष्ठाशीं वैर केलें तें राजनीतीच्या दृष्टीनें चुकीचें होतें. जर दुर्बल माणसानें प्रबल माणसाशीं वैर केलें तर त्याचा पराभव करण्यास सबल सर्वथा समर्थ असतो. आपल्यापेक्षां अधिक सामर्थ्यवान् शत्रूस खंडणी द्यावी; बरोबरीच्या शत्रूशीं सलोखा करावा; कमी सामर्थ्यवान् शत्रूचें दंडन करावें; आणि भेद (फूट पाडणें) हा मात्र सर्वसामान्य उपाय होय. ज्या भेदाच्या योगानें बरोबरीचा शत्रु दिवसानुदिवस कमी सामर्थ्यवान् होऊन बरोबरी सोडून देतो आणि अधिक सामर्थ्यवान् शत्रु आपलें आधिक्य टाकतो त्या भेदाची कोण बरें प्रशंसा करणार नाहीं? हे राजा, कमी सामर्थ्यवान् शत्रुच्या ठिकाणींसुद्धां भेद योजणें योग्य आहे. कारण, कमी सामर्थ्यवान् शत्रूसुद्धां अधिक दुर्बल होणें हें युद्धाच्या दृष्टीनें लाभाचेंच होईल. राजनीतिशास्त्राविषयी तिटकारा असणारा, आपल्या कामामध्यें आळशी, व व्यसनामध्यें मग्न अशा माणसास लक्ष्मी सोडून जाते. गडांची कांहीं मोठीशी प्रतिष्ठा नाहीं, खरोखरी थोरवी आपल्या पित्याचीच आहे. तुम्ही पराक्रमी असलांत तरी प्रस्तुत प्रसंगीं सिंहगड दिला हेंच चांगलें झालें. सिंहगड देऊन जर शहाजी राजांची सुटका झाली आहे तर वस्तुत: तो आपण देऊनहि न दिल्यासारखाच आहे. ज्यानें सिंहगड आणि बंगलोर शहर ही शहाजीरूपी मेरुपर्वताच्या तोडीचीं मानलीं त्या शत्रूनें विशेष तें काय केलें? तुम्ही आतां जययात्रेला प्रारंभ केलेला आहे. राजनीतिशास्त्रानुसार पराक्रम केला तर तो करणारा साऱ्या भूमंडळाला जिंकू शकतो. सम आणि विषम असें दोन प्रकारचें वैर असतें. बरोबरीच्या शत्रूशीं असलेलें वैर हें पहिल्या प्रकारचें होय; अधिक सामर्थ्यवानाशीं असणारें दुसऱ्या प्रकारचें होय. समवैरामध्यें दोघेही बराबरीचे असल्यामुळें कोणालाही

खरोखर विजय मिळणार नाहीं. विषम वैरामध्यें अधिक सामर्थ्यवानाचें सामर्थ्य अधिक असल्यामुळें त्यास विजय खात्रीनें मिळावयाचा. फत्तेखानाच्या पराभवामुळें व मुसेखानाच्या वधामुळें महमूदशहा रात्रंदिवस तुमचा द्वेष करीत आहे. तुमच्या देशास लागूनच असलेले आदिलशहा व दिल्लीचा बादशहा हे बलाढ्य मुसलमान तुमचा रात्रंदिवस द्रोह करीत आहेत. हे दोघे शत्रु दोन्हीकडून तुमच्यावर क्रुद्ध झालेले असल्यामुळें तुमचें येथें राहणेंच अत्यंत अनुचित आहे. म्हणून अत्यंत दुर्गम अशा स्थानीं राहून जग जिंकण्याचा प्रयत्न करा. योग्य रीतीनें पावलें टाकलीं तर तुम्हांला अजिंक्य असें काय आहे ? दुर्गाला केवळ दुर्ग म्हणूनच लोक दुर्गम मानीत नाहींत; तर त्याचा स्वामी दुर्गम असणें हीच त्याची खरी दुर्गमता होय. प्रभूमुळें दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळें प्रभु दुर्गम होतो. दोघांच्याहि अभावीं शत्रूच दुर्गम होतो. तुमचे जे दुर्ग आहेत ते सर्व ज्या योगें सर्वस्वी अत्यंत दुर्गम होतील असें तत्काळ करा."

हे 'सुवर्णशर्मा' अथवा सोनोपंत डबीर म्हणजे शहाजींनीं शिवाजी महाराजांची प्रथम पुण्याकडे रवानगी करतांना त्यांच्याबरोबर दिलेले मुत्सद्दी सोनाजी विश्वनाथ डबीर हे होत.

मुटकेनंतर राजे शहाजी चार वर्षें स्वतंत्रपणें वावरूं शकत नव्हते. त्यानंतर सुलतानानें त्यांची कर्नाटकांत पुन्हां रवानगी केली. तोंवर शिवाजी महाराजांनीं मनुष्यसंग्रह व गडांची व्यवस्था या सिद्धतेंत शांतपणें काळ घालविला. शहाजी राजांची कर्नाटकांत रवानगी होतांच पुणें प्रदेशाची पूर्ण व्यवस्था महाराजांच्या हातीं आली. तिची ते वाटच पहात होते. स्वराज्यावरील या पंचप्रसंगाच्या निवारणार्थ त्यांनीं दैवी अनुष्ठानहि प्रारंभ केलें होतें असें दिसतें. चाकणचे ब्रह्मे यांना वर्षासन करून देतांना "स्वामींच्या अनुष्ठानबळें आपण राज्यास अधिकारी जालो व सकल मनोरथ चिंतिले पावलो." असे शब्द महाराजांनीं वापरले आहेत ते शहाजीवरील संकटाची संपूर्ण छाया जाऊन

आपल्याकडे पुण्याच्या प्रदेशाची संपूर्ण व्यवस्था आली या गोष्टीला उद्देशूनच होय. यानंतर सोनोपंतांच्या मार्गदर्शनाप्रमाणें त्यांनीं पहिला पदन्यास केला तो पुरंदरावर आणि त्यानंतर दृष्टि रोखली ती जावळीच्या दुर्गम अरण्याकडे. शिवसिंहानें अफझलखानादि मत्त गजेन्द्रांचा या निबिड अरण्यांतच गंडस्थलभेद केलेला असल्यामुळें जावळीचें महत्त्व अतोनात आहे. येथें त्यांचा क्रांतीच्या सिद्धतेचा पहिला कालखंड संपून क्रांतीच्या प्रत्यक्ष उत्थानाचा कालखंड प्रारंभ होतो. त्याकडे पुढील प्रकरणांत वळूं.

प्रकरण अकरावें

# क्रान्तिकालांतील घटना

श्रीशिवाजी महाराजांच्या जीवनपटांतील क्रांतियुद्धरूपी दुसऱ्या कालखंडाला जावळीवरच्या गरुड झेपेपासून खरा प्रारंभ होतो. त्या आधीं त्यांनीं पुरंदर गड घेतला. पण तो भेदनीतीनें व रक्ताचा एक थेंबहि न सांडता घेतला.

## पुरंदर गड

पुरंदर गड पुण्यापासून अठरा मैलांवर असून फत्तेखानाच्या स्वारीच्या वेळीं महाराजांना या गडाचा उपयोग झालेला असल्यामुळें त्याची उपयुक्तता त्यांना मनोमन पटली होती. या गडावरील गडकरी महादाजी निळकंठराव सरनाईक शहाजीराजे यांना आपले बंधु मानीत. शिवछत्रपतींवरील फत्तेखानाच्या संकटांत त्यांनीं जें साहाय्य केलें त्यामुळें महाराजांना ते पित्यासारखेच पूज्य होते. ते वारले त्या वेळीं महाराजांना अतिशय दुःख झालें. त्यांना तीन पुत्र होते. महाराजांनीं त्यांना दुखवट्याचें पत्रहि पाठविलें. पुढें हे

तीन बंधु गडाच्या स्वामित्वासाठीं आपापसांत कलह करूं लागले. तो विकोपाला गेला. त्यांनीं त्यांत शिवाजी महाराजांचेंहि साह्य घेण्याचा प्रयत्न केला. हे सारेच बंधु गड संभाळण्याच्या दृष्टीनें अयोग्य आहेत असें पाहून व यांचीं भांडणें विजापूरपर्यंत गेल्यास यांच्या जागीं एखादा मुसलमान गडकरी येऊन आपल्याला सदाचा उपद्रव देण्याचा संभव आहे हें ओळखून महाराजांनीं आपलें पाऊल उचललें. त्यांनीं दिवाळसणाच्या निमित्तानें गडावर जाऊन मध्यरात्रीं चौघाहि भावांना अटक केली व गड घेतला. पुढें त्यांनीं चौघांनाहि मुक्त करून पालखीचा मान व सरंजाम देऊन त्यांची समजूत काढली. शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड ३ मधील पुढील पत्र पुरंदर प्रकरणावर उत्कृष्ट प्रकाश टाकतें.

"शिवाजी राजे यांणी निजामशाही किल्ले पुरंधर येथील नाईकवाडी निलो नीलकंठराव (हे निलकंठराऊ किला बळकाऊन, भोंवतालचा मुलूख मारून, खंडणी व हाक दस्तुरी होती ती घेऊन इनाम गांवी राहत होते.) त्यांस पत्र पाठविलें कीं, "आम्हांजवळ वडिली दादो कोंडोदेव ठेऊन दिले होते ते मृत्यु पावले. आता आम्ही निराश्रित जालो. तुमचा व आमच्या वडिलांचा बहुत घरोबा, स्नेह यास्तव किल्ल्याचे आश्रयानें माचीजवळ येऊन राहू व तुम्ही सांगाल तैसी वर्तणूक करीत जाऊं" ह्या पत्रास त्यांणीं उत्तर पाठविलें कीं 'उत्तम आहे; घर, आम्ही, किल्ला, तुमचा आहे. दुसरा विच्यार नाही आपण यावें." उत्तर येतांच स्त्रीस, जिजाईस सांगून, २५ ह. मावले, पागा घेऊन गडाखाली येऊन राहिले. पावसाळा-तेथें छावणी केली. निलो, पिलाजी व संकराजी असे तिघे बंधु. पैकीं वडील निलोजी किल्ल्याचा कारभार करीत होते. शंकराजी सर्वांत धाकटे ह्यांस शिवाजी राजे याजपाशी ठेविले. शिवाजीचा व त्याचा लोभ जडला. संकराजीनें येकांती आपलें मनोगत शिवाजीस सांगितलें कीं, किल्याची वतनी चाकरी माझा वाटा मला माझे बंधु देत नाहीत व कांहीं कामकाज सांगत नाहीत तरी तो वाटा मिळवून द्यावा. शिवाजीनें तें मान्य केलें. व तुमचा बंदोबस्त करून देऊ असें

म्हटलें. इतकियामध्यें दिपवालीचा सण आला म्हणून शंकराजीस निलोजीनें सांगून पाठविलें कीं, उदईक सणास किल्ल्यावर निरोप घेऊन यावें. शंकराजीनें ह्यांवर कळविलें कीं, आम्हास येकट्यास येता येत नाही. राजयाचा प्यार मजवर बहुत, नित्य भोजन एके ठिकाणी करतो, शिवाय शहाजी राजे यांचा व आपला बहुत घरोबा होता त्याचे पुत्रास व स्त्रीस टाकून कैसें जावे मग निलोजीलाहि हें वरोबरच आहे असें वाटून त्यांनी जिजाऊ व शिवाजी राजे यांस दहावीस मानकऱ्यांसह आमंत्रणें सांगून घेऊन यावें असा शंकराजीस निरोप पाठविला. त्याप्रमाणें शंकराजीनें शिवाजीस निमंत्रण दिलें. पण शिवाजी म्हणाला 'आम्हांस लोकांस टाकून येतां नये. येथें आम्ही सण करूं. तुमचेंच आहे. शिवाजीचें म्हणणें शंकरजीनें किल्ल्यावर पुनः कळविलें. ते समयीं तिघानी विचार केला जे शहाजीराज्याचा आपला स्नेह घरोबा, त्यास टाकून आपण सण करावा हें उचित नाही. यास्तव कुल लोकासुधा यावें म्हणून शंकराजीस गडाखाली पाठविलें. मग हे गडावर कुल गेले. जागोजाग लोक उतरविले. तीन दिवस नाहाणें व भोजनें केलीं. लोकसुधा जेवणें घातली. समारंभ केला. आग्रह करून भाऊबीजेसाठीं राहविले. रात्रीस निलोजी नीलकंठराव स्त्री सुधां निद्रा केली. पिलाजी व शंकराजी एकत्र होऊन राज्यास वर्तमान सांगोन निलोजीस कैद करावें आणि आपणाकडे किल्ला द्यावा. येकानें किल्लेदारी करावी, येकानें राज्याजवळ असावे. पूर्वीही शंकराजींनी खास बंदोबस्तासाठीं विनंति केलीच होती. त्यावरून राज्यानी खासे बारगीर पंचवीस देऊन वेडी निलोजीच्या पायात घालावयास सांगितली. मागे याणी विचार केला. नतर या उभयताचेहि पायांत बेड्या घालून आपन किला घ्यावा. झोपेमध्यें दगा करून पायांत बेड्या घालून कैद करून राज्यास वर्तमान सांगितले. राजे ऐकोन बोलले, किल्ल्याचा बंदोबस्त आम्हासच करावा लागतो. तुम्ही त्यांचेच पंक्तीस बसावे बोलोन बेड्या ठोकून दरवाज्यावर आपले लोक बसवून बंदोवस्ती केली. त्यांचे लोक व बायका गडाखालीं लाऊन दिल्या. सर्व मालमत्ता

जप्त केली. खजिना पुष्कळ सांपडला. तीन दिवस तिघे भाऊ कैदेंत होते. चवथे दिवसी बंद खुलास करून गांव इनाम वस्त्रें देऊन समाधान केलें. (शिवकालीन लेख सारसंग्रह ३ ले.३९९,श. १५९६ कार्तिक शुद्ध १०, इ. १६७४ ऑगस्ट २९)"

## जावळी

पुरंदर तर छत्रपतींच्या भेदनीतीनें स्वराज्यांत समाविष्ट झाला. पण जावळीसाठीं शिवाजी महाराजांना रक्तपात करावा लागला. वस्तुतः जावळीचें प्रकरण त्यांच्याकडे आपण होऊन चालत आलें. पण उपाय थकल्यावर कठोर हातानेंच त्यांना तें निस्तरावें लागलें आहे. प्रकार असा :– जावळीचें खोरें महाबळेश्वराच्या पायथ्याशीं वसलेलें असून तें सभोंवतालीं मोठ्या उंच डोंगरांनीं वेढिलेलें आहे. आजहि तेथील दाट अरण्य त्या स्थळाचें महत्त्व व्यक्त करतें. शिवछत्रपतींच्या काळीं तर तेथें घनदाट अरण्य माजलेलें असून त्यांत व्याघ्रादि हिंस्र पशूंची भयप्रद वसती असे. या दाट अरण्यांत पाऊसहि खूप पडत असे. सह्याद्रीचा अरुंद सुळका समुद्र सपाटीपासून चार सहस्र फूट उंच गेलेला असल्यामुळें जावळीच्या पश्चिमेस त्याची एक बनलेली नैसर्गिक भिंत आजहि उभी आहेच. सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं विजापूरच्या सुलतानानें या खोऱ्यांत मोरे नांवाच्या क्षत्रिय घराण्याची स्थापना केली. सुखाला चटावलेल्या मुसलमान सरदारांना व सेनेला या खोऱ्यांत येणें व राहणें शक्य कोटींतलें नसल्यामुळें एकदां स्थानापन्न झालेला मोरे, नाममात्र विजापूरच्या सुलतानाचे अंकित, पण वस्तुतः स्वतंत्रच झाले. त्यांनीं हळूहळू आपलें बस्तान बसवीत महाड ते महाबळेश्वर पर्यंतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला. कोंकणच्या या प्रदेशांतील सर्व वाटा व डोंगराच्या पायथ्याचा प्रदेश मोऱ्यांच्याच अधीन होता. आठ पिढ्यांपर्यंत मोऱ्यांच्या स्वामित्वाखालीं हा प्रदेश नांदला. त्यांच्याजवळ बारा सहस्र लढवय्या मावळ्यांची सेना सदैव सुसज्ज असे. या दीर्घकालीन आधिपत्याच्या काळांत

मोऱ्यांच्याजवळ संपत्तीचा साठाहि भरपूर झाला होता. मूळ पुरुषाच्या शौर्यामुळें या घराण्याला विजापूरच्या सत्तेकडून 'चंद्रराव' ही पदवी मिळालेली होती. जावळीचें आधिपत्य याचा अर्थ वाई परगण्याचें संपूर्ण आधिपत्य, इतकेंच नव्हें तर सह्याद्रीच्या सर्वांत दुर्गम भागाचें आणि त्याच्यालगतच्या समुद्रकिनाऱ्याचेंहि आधिपत्य असा वस्तुत: होता. एका बाजूला विजापूरकर व दुसऱ्या बाजूला मोगल यांच्याशीं टक्कर द्यावयाला निघालेल्या शिवरायांसारख्या स्वातंत्र्यवीराला शत्रूशीं सुरक्षितपणें झुंज घेण्याच्या दृष्टीनें या प्रदेशाचें स्वामित्व आवश्यकच होतें. त्यांच्या मनांत हा विचार चमकून गेला नसेल असें नाहीं. पण त्यासाठीं प्रथम त्यांनीं अगदीं सात्त्विक साधनाचाच अवलंब केला.

## जावळीचे मोरे व छत्रपति शिवाजी

जावळीचे चंद्रराव मोरे निपुत्रिक वारल्यावर त्यांच्या जागीं कोणास नेमावें हा प्रश्न इ. स. १६४९ मध्यें उत्पन्न झाला. कालवश झालेल्या मोऱ्यांचें नांव 'चंद्रराव' दौलतराव मोरे असें होतें. चंद्रराव दौलतरावांच्या विधवा बायकोनें आलेल्या सर्व नातलगांना बाजूस सारून यशवंतराव मोरे या नांवाच्या एका प्रौढ गृहस्थास दत्तक घेतलें व शिवाजी महाराजांच्या साहाय्यानें त्याला मोऱ्यांच्या गादीवर बसविलें. महाराज लेवढ्यासाठीं स्वत: जावळीला गेले होते. त्यांना जर जावळी गिळंकृतच करावयाची असती तर ससैन्य जावळींत उतरल्यावर जावळीचा ताबा ते सहज घेऊं शकत होते. पण त्यांना जावळीचें अपहरण नको होतें; तर जावळीच्या गादीवर येणाऱ्या पुरुषाचें स्वराज्याच्या उपक्रमांत साहाय्य हवें होतें. त्यामुळेंच कोणी यवन सुभेदार जावळींत पाय ठेवण्याच्या आधींच स्वत: यशवंतराव मोऱ्यांना 'चंद्रराव' या गादीवर स्थापन केलें. शिवछत्रपति या वेळीं केवळ सतरा वर्षांचे होते, व यशवंतराव मोरे चाळीस वर्षांच्या जवळपास होते. विजापूरच्या बादशहाला या वार्तेनें अतिशय क्रोध आला. कारण मोरे हे जावळीचे अधिकारी असले

नरी ते विजापूरच्या सुलतानाकडून नियुक्त झालेले अधिकारी होते त्यामुळें दुसरा अधिकारी नियुक्त करण्याचा अधिकार दौलतराव मोऱ्यांच्या विधवेलाहि नव्हता व अन्य कोणालाच नव्हता. अर्थातच यवनांना या देशांत अशा नेमणुका करण्याचाच कांहीं अधिकार नाहीं या मूलभूत प्रमेयाला हात घालणाऱ्या शिवाजी महाराजांची गोष्ट वेगळी होती. विजापूरच्या सुलतानानें वाईचा सुभेदार अफझलखान (हाच तो सुप्रसिद्ध अफझलखान होय.) याला मोऱ्यांची गादी घेण्यास पाठविलें. अफझलखान हा "चंद्रराव मयत झाल्यावर जावळीची दौलत गैरलोकी पैस करून बळकाविली आहे" अशी घोषणा करीत तिच्यावरून नांगर फिरवावयास आला. पण जावळीच्या अरण्यांत शिरणें त्याला कष्टदायक वाटल्यामुळें त्यानें तें काम आपल्या हस्तकांवर सोपवावयाचें ठरविलें. अफझलखान हा वाईचा सुभेदार असल्यामुळें जावळी तर त्याच्या अधिकारांत होतीच, पण इतर देशमुखांवरहि त्याची सत्ता चालत होती. त्यामुळें त्यानें कान्होजी जेध्यांनाच जावळी घेण्याची आज्ञा दिली. कान्होजी जेधे यांना अफझलखानानें पाठविलेलें पत्र पुढीलप्रमाणें आहे.

"तलब फा. सी.

अफझलखान महमदशाही — कानोजी जेधा चंद्रराऊ कदीम मयत जालियावरि गैरी लोकी पैस करून बलकाविले आहे. याबद्दल त्यावरी नामजादी केली आहे. यैसियास तुम्ही दौलतखाह. तुम्ही हशम लोक मेलउनु आपले तर्फेने सुरू करणें. मुलाहिजा न करणें. याच कामावरून तुमची सरफराजी आहे. कागद पावनाच सुरू करून खबर लिहिणें."

कान्होजी जेधे मोठ्या अडचणींत सांपडले. एका बाजूला त्यांनीं उघडपणें विजापूरकरांचें आधिपत्य झुगारून दिलेलें नसल्यामुळें खानाविरुद्ध उघड जाण्याची शक्यता नव्हती. दुसऱ्या बाजूला शहाजी महाराजांच्या जवळ शिवाजीराजांना सर्वतोपरीं साह्य देण्याची शपथ घेऊन ते महाराष्ट्रांत आले असल्यामुळें त्यांना

राजांच्या विरुद्ध जातां येण्याचीहि शक्यता नव्हती. दोन धन्यांपैकीं मनानें वरलेला दुसरा धनीच त्यांना अधिक मोलाचा वाटला. त्यांनीं खानाशीं टोलवाटोलवी केली. तो अफझलखानानें त्यांना प्रत्यक्षच उपस्थित रहाण्याविषयीं आज्ञा केली. मग मात्र कान्होजी गडबडले व त्यांनीं शिवाजी महाराजांनाच काय करावें म्हणून विचारलें. त्या प्रश्नाचें उत्तर शिवाजी महाराजांनीं जें पाठविलें त्यावरून भेटीला बोलावून हत्या करण्यांत अफझलखान पहिल्यापासूनच प्रसिद्ध असल्याचा पुरावा मिळतो. महाराजांनीं कान्होजींना स्वत: शक्यतोंवर न जाण्याचा व मुलाला पाठविण्याचा कानमंत्र दिला. आणि शेवटीं त्यांच्या स्वत:च्या शहाणपणावर भिस्त ठेवावयास सांगितलें. महाराजांचें तें पत्र पुढीलप्रमाणें आहे.

" 'प्रतिपच्चंद्र' मुद्रा व सिक्का

राजश्री सिवाजी राजे—कान्होजी जेधे ता। भोर किले रोहिडा

तुम्ही पत्रिका लिहिली कीं, खान अलीशाने खान अजम येही लिहिले आहे कीं, जावली वरी सुरू केलें आहे. तुम्ही आपले जमेतीसी सिताब येणें. तरी तुमचा व त्यांचा पहिलेपासून घरोबा आहे, गेले तरी पाहिजे. आमा खासा अगर पुत्र पाठवावयाचे जाले तरी त्याचा बोलभाक बरवे रीती घेऊन मग जाणें. दगा होये ऐसे न करणें. एक भले माणूस दरम्यान देउनू मग जाणें तुमचे नजरेसी पडत असिले कीं, खासाच जावे जरी तुमचे मन बार देत नसिलें तरी कौल बौल घेऊन पुत्राबराबरी लोक देऊन पाठविजे. हरएक बहाणा करून तुम्ही राहणें. दोन्ही गोस्टी तुम्हास लिहिल्या आहेती. यात तुम्ही स्याहाणे असा, बहुत लिहिणे नलगे."

कान्होजीनें या पत्रांतील सूचनेप्रमाणें पुढें कांहींच केलें नाही असें दिसतें. पुन्हां खानानें त्यांना जावळी घेतल्यास तुम्हाला दोनशे स्वारांचा सरंजाम व जव्हारची देशमुखी देऊं असें आश्वासन दिलें. पण कान्होजींनीं खानाशीं केवळ पत्रव्यवहार चालू

ठेवला. तेवढ्यांत हें संकट आपोआपच टळलें. तें असें कीं, कर्नाटकांतील उठावांचा उपशम करण्यासाठीं तेथें आवश्यकता निर्माण झाल्यामुळें विजापूरच्या सुलतानानें खानाला एकदम कर्नाटकांत जाण्याची आज्ञा केली व खान तिकडे निघून गेल्यामुळें हा प्रश्न तेथेंच मिटला. शिवाजी महाराजांनीं चंद्ररावाला गादीवर बसविल्याचा पुरावा शिवभारतांतहि मिळतो. कवींद्र परमानंदानें शिवाजी महाराजांच्या तोंडीं पुढील श्लोक घातला आहे

गृहीता महिता लोके जयवल्ली मया पुरा।
स्थापितश्चंद्रराजश्च तस्यां तदभिलाषुकः॥ ४३

—(शिवभारत, अ. १३)

"लोकांमध्यें प्रसिद्ध असलेली जावळी मीं पूर्वी घेतली आणि तिचा अभिलाष करणाऱ्या चंद्ररावाची तेथें स्थापना केली."

### चंद्ररावाची कृतघ्नता

याप्रमाणें जावळीचें हें मोठें राजकारण स्वराज्याच्या उभारणीच्या कामांत मोऱ्यांचें साह्य होईल ह्या आशेनें शिवाजी महाराजांनीं केलें होतें. परंतु मोरे कृतघ्न निघाले. त्यांनीं गादी मिळतांच शिवाजी महाराजांना व त्यांच्या कार्याला विसरून विजापूरच्या सुलतानाशीं अधिकाधिक घनिष्ठता ठेवावयास व शिवाजी महाराजांच्या हांकेकडे दुर्लक्ष करावयास प्रारंभ केला तेवढ्यानेंहि बिघडलें नसतें. पण हळूहळू शिवाजीराजांच्याच प्रदेशावर आक्रमण करणें इत्यादि उन्मत्तपणाचे प्रकार त्यांनीं प्रारंभ केले गुंजण मावळांत मोऱ्यांचा संबंध नसतां त्यावर ते आपला अधिकार सांगू लागले व तेथील देशमुख हैबतराव शिळमकर याचा अधिकार त्यांनीं उडवून दिला. महाराजांनीं हैबतराव शिळमकराला आश्रय दिला. कांहीं उपद्व्यापी लोकांनीं हैबतरावाच्या मनांत असें भरवावयास प्रारंभ केला कीं, मोऱ्यांच्या व तुझ्या वादांत असलेली देशमुखी शिवाजी राजेच दडपून घेतील. हेंहि एक मोऱ्यांचेंच कारस्थान होतें. हैबतराव शिळमकराचें महाराजांना फत्तेखानाच्या

स्वारींत साह्य झालें होतें. शेवटीं हैवतरावाच्या मनांतील शंका काढावयास त्यांना पुढील पत्र पाठवावें लागलें.

कौलनामा म. मु.

" अजर० रा सिवाजी राजे– हैवतराऊ देशमूख ता गुंजण मावळ.

तुमचे बाबे हुजूर खबर मालूम जाली जे, कित्येक वडिया लोकांनी तुमचे पाठी शक घातला आहे, की तुमची देशमुखी आम्ही घेऊ, तुम्हास वाईट करू, ऐसा शक घातला आहे व दळवी याचें कर्ज आहे त्यास तुम्ही जमान आहा जमानती झाडे लावून आम्हासी कष्टी करू ऐसा शक तुमचे पोटी बैसविला आहे व कितेक तुमचिया घरोवियामध्ये एक प्रकार वर्तणूक जाली आहे असे कितेक लोक बोलताती. तरी येही गोष्टीच्या निमित्या येऊन कष्टी करितील, ऐसा शक धमविला आहे. या तिही गोष्टीकरिता व कितेक गोष्टीकरिता तुम्ही शकजादे आहा. डावा डौल होता तरी तुम्हास साहेब घरिच्या लेकरासारिखे जाणिती आणि तुमचे फार हेहि गोष्टीचे वाईट करावे ऐसे मनावर कधी धरणार नाहीत; हें तुम्हास बित्तिम कळले असावें. कोणेहि गोष्टीचा शक न धरणें. तुमचे हजार गुन्हे माफ आहेती. तुम्हासी आम्ही वाईट वर्तणूक करू तरी आम्हास महादेवाची आण असे व आईसाहेबाची आण असे. कोणेहि गोष्टीची चिंता न करणें. अवांतरहि लोक भेडसविले असतील ते भेटविणें. आमच्या इमानदारीवर मान ठेउनू आम्हापासी येणें. कोणें गोष्टी चिंता न करणें."

मोऱ्यांकडून शिवाजी महाराजांचा याहीपेक्षां मोठा अपराध झाला. शिवाजी महाराज स्त्रियांची इभ्रत घेणाऱ्या आपल्या अधिकाऱ्यांचेहि हातपाय तोडीत हें प्रसिद्ध आहे. त्यांच्या या नारीगौरवाच्या पवित्र भावनेविषयींच्या साक्षी परकीयांनीं सुद्धां दिलेल्या आहेत. असें असतां त्यांचाच एक नोकर मुसेखोऱ्यांतील कुलकर्णी रंगो त्रिमल यानें एका ब्राह्मण विधवेवर बलात्कार केला.

महाराजांनीं त्याला पकडून आणावयास माणसें पाठविलीं तों तो मोऱ्यांच्या सीमेंत पळून गेला. मैत्रीच्या प्रकरणांत एकानें दुसऱ्याच्या अपराध्याच्या संबंधांत जें वर्तन करावयास नको तें मोऱ्यांनीं केलें. त्यांनीं त्याला आश्रय दिला. पुढें तो तेथेंच मरण पावला. पण शिवाजीराजांच्या मनांत हें शल्य राहिलेंच. शामराज नीलकंठ करंजकर याला मुसेखोऱ्याची कुळकर्णाची जागा देतांना लिहिलेल्या खुर्दखतांत महाराज लिहितात, "मुसेखोऱ्यांतील सहा गांवांचें गावकुळकर्ण रंगो त्रिमल वाकडा चालवीत होता. त्यावरि हावाई ब्राह्मणी रांडकी इच्यासी त्यानें सिदळकीचा अंमल केला. ते खबर दिवाणांत जालियावरि रंगोवा पळून जावलीस चंदररायाच्या आश्रयानें राहिला. यावरी देवकरणीने तेथेच मयत जाला."

—(शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ ला, पृष्ठ १३५)

चंद्ररावाच्या आगळिकी यानंतर वाढतच चालल्या. रामोजी वाडणेकर, चिखलीचा पाटील याला चंद्ररावानें तो शिवाजी महाराजांच्या प्रदेशांत असतां ठार मारलें.

तात्पर्य, इ. स. १६४९ ते १६५५ पर्यंत चंद्ररावाच्या या आगळिकी वाढतच चालल्या होत्या. या सर्व गोष्टींमुळें जावळी हें स्वराज्यांतील सदाचें दुखणें होऊन बसेल ही गोष्ट महाराजांनीं ओळखली आणि मग मात्र जावळी जिंकावयाचा त्यांनीं निर्धार केला. अनुकूल संधीची ते वाट पहात होते. तशी अनुकूल संधि त्यांना इ. स. १६५५ च्या आसपास मिळाली. मोऱ्यांच्यावर स्वारी करणें हे विजापूरकरांविरुद्ध उघड हत्यार चालविणें होईल हें महाराज ओळखत होते. पण या वेळीं विजापूरचा सुलतान महमद आदिलशहा हा आसन्नमरण अवस्थेंत होता. त्यामुळें विजापुरांतील सारे मुत्सद्दीमंडळ पुढचा गादीचा स्वामी कोण या महत्त्वाच्या प्रश्नांत गुंतले होते. त्यामुळें ते जावळीकडे लक्ष देणें शक्य नाहीं हें महाराजांनीं केव्हांच ओळखलें. त्या काळीं एक बादशहा मरून दुसरा गादीवर यावयाचा म्हणजे मोठाच प्रसंग असे. अनेकांना पहिल्या बादशहाबरोबरच परलोकीं जाण्याची पाळी येई, व मोठीच

उलथापालथ होत असे. अशा स्थितींत जो तो आपल्या व्यवस्थेंत गुंतला असतां जावळीकडे कोण लक्ष देणार? त्या विभागाचा सुभेदार अफझलखान हा सुदूर कर्नाटकांत असल्यामुळें तोहि जावळीच्या साह्यास येण्याची शक्यता नव्हती. शिवाय त्या वेळीं दक्षिणेचा सुभेदार असलेला मोंगल बादशहाचा शहाजादा औरंगजेब याच्याशीं शिवाजी महाराजांनीं पत्रव्यवहार करून गुप्तपणें विजापुरी प्रदेशाचे लचके तोडावयाच्या संबंधांत संगनमतहि केलें होतें. त्यामुळें शिवाजी महाराजांनीं मोऱ्यांच्यावर झडप घालावयास ही संधि साधली. त्यांनीं मोऱ्यांना पत्र पाठविलें.

"तुम्ही मुस्तफद राजे म्हणवितां. राजे आम्ही. आम्हास श्री शंभूनें राज्य दिधलें. तरी तुम्ही राजे न म्हणवावे. आमचे नौकर होऊन आपला मुलुख खाऊन हमरहा चाकरी करावी. नाही तर बदफैल करून फंद कराल तर जावळी मारून तुम्हास कैद करून ठेऊं."

—(मोरे यांची छोटी बखर)

मोऱ्यांना हें पत्र मिळतांच त्यांची तळव्याची आग मस्तकास गेली. झडप घालावयाची म्हणूनच महाराजांनीं हें पत्र लिहिलें होतें. कृतघ्न मोऱ्यांनीं त्यावर अपेक्षित उत्तर पाठविलें, "तुम्ही काल राजे जाहला. तुम्हांस राज्य कोणी दीधलें? मुस्तफद राजा आपले घरी म्हटलियावर कोण मानितो? तुम्हीं लिहिलें कीं, जावळींत येऊं. येता जावळी, जाता गोवळी. तुम्हांमध्यें पुरुषार्थ असला तर उदइक येणार ते आजच या. आम्ही कोकणचे राजे असून आमचा राजा श्रीमहाबळेश्वर त्याचे कृपेने राज्य करितो. आम्हास श्रीचे कृपेने पादशहाने राजे किताब, मोर्चेल, सिंहासन मेहरबान होऊन दिधलें. आम्ही दाईमदारी दर पिढी राज्य जावळीचें करितों. तुम्ही आम्हासी खटपट कराल तर पस्ट समजून करणें. येथे उपाय कराल तो अपाय होईल, यश न येता अपयशास पात्र होऊन जाल."

——(मोरे यांची छोटी बखर)

या उत्तरावर महाराजांनीं शेवटचें निकराचें उत्तर पाठविलें.

"जावळी खाली करोन, हात रुमालें बांधोन, भेटीस येवोन हुजूरची चाकरी करणें. इतकियावरी बदफैली केलिया मारले जाल."

त्यावर चंद्ररावानेंहि करडें उत्तर पाठविलें. "जावळीस येणारच तरी यावें. दारूगोली मौजूद आहे." या निरोपासरशीं महाराजांनीं आपल्या विश्वासू सैन्यासह जावळीवर झडप घातली. चंद्ररावाचा कारभारी हणमंतराव हा जोरखोऱ्यांत होता. त्याच्यावर महाराजांनीं रघुनाथ बल्लाळ यांस ससैन्य पाठविलें. त्यानें हणमंतरावास युद्धांत ठार मारून जोरखोरें घेतलें. स्वतः महाराजांनीं शके १५७७ पौष शुद्ध चतुर्दशीला जावळीवर स्वारी केली. युद्धांत चंद्ररावाचा पूर्ण पराजय होऊन 'दारूगोली मौजूद' आहे म्हणणारा हा वाघ पळून रायरीला गेला. जावळीची व्यवस्था लावून शिवाजी महाराजांनीं रायरीला वेढा दिला. तीन महिने वेढा चालू होता. शेवटीं शिळमकरांच्या मध्यस्थीनें चंद्ररावाला महाराजांनीं प्राणदान दिलें. पण स्वतः चंद्रराव व त्याचे बाजीराव व कृष्णराव या नांवाचे दोन पुत्र महाराजांनीं आपल्या दृष्टीसमोरच ठेवले. शिवभारतांत म्हटलें आहेः—

> स चंद्रराजं निर्जित्य पुत्रामात्यसमन्वितम् ।
> जयवल्लीं च नगरीमग्रहीन्निरवग्रहः ॥१६
>
> —(शिवभारत, अ. १७)

"पुत्र व अमात्य यांसह चंद्रराव मोरे यास जिंकून त्यानें अप्रतिबंधपणें जावळी घेतली." पुढें चंद्रराव मोरे व त्याचे पुत्र यांनीं भोसल्यांचे हाडवैरी मुधोळचे बाजीराजे घोरपडे यांच्याशीं व त्यांच्या द्वारे विजापूरच्या सुलतानाशीं गुप्त पत्रव्यवहार प्रारंभ केला. तो शिवछत्रपतींच्या गुप्त चरांनीं पकडला. आपलें प्रकरण उघडकीला आलेलें पाहून मोरे अटकेंतून पळून गेले. पण कुठें जाणार? त्यांना पकडून महाराजांसमोर उपस्थित करण्यांत आलें. प्रथम उपकार व नंतर बलप्रयोग या दोहोंनींहि ताळ्यावर न येतां चंद्रराव मोरे स्वराज्याचे शत्रूच राहणार हें या प्रकरणानें

स्पष्ट झाल्यावर महाराजांनीं ते व त्यांचे दोघेही पुत्र यांना ठार केले. शिवभारतकार म्हणतातः—

निगृह्य बाजराजं तं कृष्णराजं च दुर्मदम् ।
जनकं च तयोश्चंद्रराजमाजौ महौजसम् ॥ ४
अव्यक्तवर्तनीयुक्तां सह्यपर्यन्तवर्तिनीम् ।
अटवीप्रायविषयां महादुर्गसमाश्रयाम् ॥ ५
उन्निद्रसैनिकोदग्रामद्रिप्राकारमध्यगाम् ।
जयवल्लीं नाम पुरीं अग्रहीद् दुर्ग्रहां शिवः ॥ ६
ये येऽत्र चंद्रराजस्य सहायाश्च सनाभयः ।
तांस्तानशातयद्वीरः शिवः शक्तिमतां वरः ॥ ७
तदा प्रतापवर्मा यश्चंद्रराजस्य बांधवः ।
पलायितः शिवभयाद्येदिलं प्रत्यपद्यत ॥ ८

—(शिवभारत अ. १८)

"बाजीराव, उन्मत्त कृष्णराव व त्यांचा पिता महाबलवान् चंद्रराव मोरे यांना मारून, गुप्तवाट असलेली, सह्याद्रीच्या लगत्यास वसलेली, दाट झाडी असलेली, गडाचा आश्रय असलेली, जागरूक सैनिकांच्या दक्षतेमुळें अधिकच भयंकर असलेली, गिरितटांच्या मध्यें असलेली अशी जावळी नांवाची दुर्जय नगरी शिवरायांनीं घेतली. चंद्रराव मोऱ्यांचे जे जे साह्यकर्ते व नातलग होते त्या सर्वांना बलवंतामध्यें बलिष्ठ असलेल्या शिवरायांनीं कापून काढलें. तेव्हां चंद्ररावांचा एक नातलग प्रतापराव मोरे हा शिवछत्रपतींच्या भीतीनें आदिलशहाकडे पळून गेला." पण तेथें महाराजांच्या अटकळीप्रमाणेंच झालें. विजापूरचा सुलतान महमूद आदिलशाहा आसन्नमरण असल्यामुळें त्या परिस्थितीचा लाभ घेण्याच्या व त्यापासून होणाऱ्या हानींतून स्वतःला वांचविण्याच्या धांदलींत जो तो मुत्सद्दी असतांना आणि महत्त्वाचे सेनानी कर्नाटकांत गुंतले असतांना मोऱ्यांची दाद घेतो कोण? पुढें तीन वर्षें तरी मोऱ्यांची दाद तेथें लागली नाहीं; व तेवढ्या

अवधींत शिवरायांनीं जावळी जुनी ठरावी इतकीं नवीं प्रश्नचिन्हें उत्पन्न करून ठेवलेलीं होतीं.

## जावळीच्या विजयाचें फलित

या जावळीच्या विजयानें शिवाजी महाराजांच्या स्वराज्य-मंदिराच्या कार्याच्या उभारणीच्या दृष्टीनें कल्पनातीत लाभ झालेला आहे.

(१.) शिवाजी राजांच्या स्वराज्याच्या प्रदेशांत या विजयाने एकदम दुपटीची वाढ झाली. त्यांत कोंकणचा आणि आजच्या सातारा जिल्ह्यांतील बहुतेक डोंगराळ प्रदेश होता. या विजयामुळें स्वराज्यांत अत्यंत महत्त्वाचा ठरलेला रायरीचा गड अधीन होऊन शिवाय चंद्रगड, मकरंद गड, सोनगड इत्यादि महत्त्वाचे गड स्वराज्यांत समाविष्ट झाले. कोंकणच्या साऱ्या वाटा जावळी प्रदेशांतूनच असल्यामुळें तेथून होणाऱ्या व्यापारावर व प्रवासावर शिवछत्रपतींचें नियंत्रण उत्पन्न होऊन समुद्रापर्यंतच्या तेथील प्रदेशावर अप्रत्यक्षपणें त्यांची सत्ता उत्पन्न झाली.

(२) प्रथमच समुद्रकिनाऱ्यापर्यंत सत्ता वाढल्यामुळें महाड-सारखें नगर त्यांना नौदल उत्पन्न करावयाच्या दृष्टीनें सोईचें स्थान झालें. दोन महिने शिवछत्रपति व्यवस्थेसाठीं स्वत: जावळीच्या विभागांत होते. त्यांच्या सैन्यांत येथून शूर मावळ्यांची उल्लेखनीय भरती झाली. जावळीचे जुने वतनदार इत्यादिकांचीं वतनें त्यांनीं तशींच पुढें चालू ठेवलीं. कृष्णाजी बाबाजी यांस तेथील सुभेदार व विरोराम यांस मुजुमदार नेमलें. कांहीं दिवस जावळी ही शिवछत्रपतींची डोंगरी राजधानी होती. शाहिस्तेखानाच्या स्वारीच्या वेळीं शिवछत्रपतींच्या अनुज्ञेनें सर्जेराव जेधे यांनीं आपलीं बायकामुलें सुरक्षेसाठीं जावळींत ठेवलीं होतीं असा उल्लेख आढळतो. जावळीच्या जवळच पारघाटाच्या तोंडावर भोरप्या डोंगर या नांवाचा उंच कडा होता. शिवाजी महाराजांनीं त्याची तटबंदी करून जावळीच्या संपूर्ण संरक्षणासाठीं नवा दुर्ग उभारला

व त्याचें नांव प्रतापगड असें ठेवलें. पुढें शिवछत्रपतींचे पंतप्रधान झालेले मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखालींच हा दुर्ग बांधण्यांत आला होता. या गडावर आपलें कुलदैवत व स्फूर्तिदात्री श्रीरामवरदायिनी माता तुळजा भवानी हिचें भव्य मंदिर बांधलें. हिच्यासाठीं शालिग्राम शिला त्यांनीं मोठ्या प्रयत्नांतीं मिळविली असें म्हणतात.

(३) जावळीच्या या विजयांत सर्वांत मोठी देणगी रायरीची होती. रायरीच्या दुर्गालाच शिवछत्रपतींनीं रायगड हें नांव देऊन पुढें ती स्वराज्याची मुख्य राजधानी केली. केवळ २० शिबंदी पुरेसा अन्नपुरवठा असल्यास लक्ष सैन्याशीं हा गड झुंजवूं शकतील अशी त्याची ख्याति होती.

(४) या सर्व लाभावर किरीटासारखा असलेला लाभ म्हणजे मुरारबाजी देशपांडे या योद्ध्याचा शिवछत्रपतींना झालेला लाभ होय. दिलेरखानानें केलेल्या पुरंदरवरील आक्रमणाच्या वेळीं शिरच्छेद झालेल्या ज्याच्या कबंधानें तीनशे शत्रु ठार मारले असा हा योद्धा चंद्रराव मोऱ्यांचा जावळी प्रकरणांत साह्यकारी होता. महाराजांनीं त्याला आपल्या महत्कार्यांत ओढलें.

## मामावर संक्रान्त

जावळीच्या मागोमाग महाराजांनीं सुपें ठाणें आणि परगणा जिंकला. सुपें परगणा वस्तुतः शहाजी राजांच्या जहागिरींत होता. त्यामुळें शिवाजी महाराजच त्याचे खरे धनी होते. शहाजी राजांनीं तेथें व्यवस्थेसाठीं आपल्या धाकट्या राणीचा भाऊ म्हणजेच शिवछत्रपतींचा सावत्र मामा नियुक्त केला होता. पण हे मामासाहेब शिवछत्रपतींच्या स्वराज्याच्या कार्यांत साह्यकारी होण्याऐवजीं उलटें उपद्रव देऊं लागले. त्यांच्याविरुद्ध अनेक कागाळ्या छत्रपतींच्या कानीं येऊं लागल्या. छत्रपतींनीं एकसूत्री व्यवस्थेच्या दृष्टीनें सुपें परगणा आपल्या हातीं घ्यावयाचें ठरविलें. मामांचे व त्यांतूनहि सावत्र मामांच्या नात्याचें प्रकरण मोठेंच नाजूक होतें.

पण शिवाजी महाराजांनीं ध्येयसिद्धीच्या कार्यांत या नाजूकपणावर मात करावयाचें ठरविलें. शहाजी राजांचा कांहींहि अपसमज होणार नाहीं अशी त्यांची निश्चिति होती. त्यांनीं शिमग्याच्या सणाचें पोस्त मागावयाचें निमित्त करून मामांनाच अटक केली व सुपें घेतलें. सभासद म्हणतो, "मग सुपे महाल येथें कोणे एके जागा संभाजी मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ मामा होता. तो महाराजांनीं महालावरी ठेविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त मागावयास म्हणोन गेले. मामास कैद करून ठेविलें. त्याचे तीनशे घोडे पागेचे होते व द्रव्यहि बहुत होते. वस्तभाव कापड करून सुपे देश साधिला" संभाजी मोहित्यांना त्यांनीं स्वराज्याच्या उपक्रमांत ओढण्याचा प्रयत्न केला. पण ते वळत नाहींत असें पाहून कुटुंबासुद्धां मामांची रवानगी त्यांनीं कर्नाटकांत शहाजी राजांचेकडे केली. सुपें, बारामती, इंदापूर हे महाल हस्तगत झाल्यामुळें शिवाजी राजांची पुणें परगण्याच्या आग्नेय दिशेकडील बाजू बळकट झाली. आणि पुरंदर, राजगड, तोरणा व कोंडाणा या दुर्गांच्या योगानें स्वराज्याचा दक्षिणेकडील प्रदेश निर्भय झाला.

### बाजीप्रभूचा लाभ

हिरडस मावळचे देशमुख बांदल यांनीं या सुमारास विरोधी उठाव केल्यामुळें रोहिड्यावर छत्रपतींना स्वारी करावी लागली. देशमुखांच्या पदरीं बाजीप्रभू देशपांडे म्हणून मोठा योद्धा होता. बांदल देशमुख व देशपांडे यांनीं मोठी झुंज दिली; पण शेवटीं त्यांचा पराजय झाला. युद्धांत देशमुखांचा अंत झाला. या युद्धांतून बांदल देशमुखांचे पुत्र व बाजीप्रभू देशपांडे यांचा छत्रपतींना अत्यंत महत्त्वाचा लाभ झाला. छत्रपतींनीं देशमुखी बांदलांच्याच वंशांत राहूं दिली. पुढें अफझलखान प्रकरणांत पार घाटाचें संरक्षण करण्याची कामगिरी बांदलांनीं उत्कृष्ट केली. जेध्यांचा असलेला खड्गाच्या मानाचा पहिला अधिकार बाजीप्रभू प्रकरणानंतर बांदलांना मिळाला. पावनखिंड गाजविणारा महाराष्ट्राचा लिओनिडास बाजीप्रभू देशपांडे शिवाजी महाराजांना लाभला तो असा. (जेधे शकावली)

## महमूद आदिलशहाचा मृत्यु

महमूद आदिलशहा आसन्नमरण व विजापूरचे मुत्सद्दीमंडळ आपापल्या स्वार्थी धांदलींत असतांना जावळी, सुपें, पुरंदर ही प्रकरणें शिवाजी महाराजांना पचवितां आलीं. पण यानंतर त्यांना अतिशय सावधपणानें पावलें टाकणें क्रमप्राप्त झालें. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या उत्तरेला मोंगलांचा प्रदेश होता. या वेळीं त्यांचा दक्षिणेचा सुभेदार शाहजादा औरंगजेब होता. योद्धा, मुत्सद्दी, पाताळयंत्री, समर्थ, कपटपटु असा हा दक्षिणेचा सुभेदार म्हणजे दक्षिणेंतील स्वातंत्र्यावरील फार मोठें संकट होतें. शके १५७८ पासून औरंगजेब दक्षिणेच्या सुभेदारीवर असून गोवळकोंडें व विजापूर या दोन्ही सत्तांशीं कुरापत काढून त्या नष्ट करण्याचें त्यांचें धोरण होतें. शेवटीं त्यानें शके १५७८ मध्यें गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीशीं युद्ध करून तिला मोंगल साम्राज्याचें मांडलिक बनविलेंच. शके १५७८ म्हणजे सन १६५६ च्या पहिल्या तीन महिन्यांत औरंगजेब गोवळकोंडेकरांशीं लढण्यांत गुंतला आहे असें पाहून जावळीच्या मागोमाग शिवछत्रपतींनीं रत्नागिरीच्या उत्तरेकडील कोंकणप्रांत हस्तगत केला. रघुनाथ बल्लाळ अत्रे यांच्याकरवीं दाभोळ बंदर व तेथील विजापूरकरांचीं सर्व ठाणीं हस्तगत केलीं. औरंगजेबाचें आपल्याकडे लक्ष वेधूं नये असा प्रयत्न करणें शिवाजीमहाराजांना अत्यावश्यक होतें. गोवळकोंड्याचा विख्यात मुत्सद्दी मीरजुमला या वेळी औरंगजेबानें फोडलेला असल्यामुळें व शहाजीचें आणि मीरजुमल्याचें वांकडें असल्यामुळें त्याच्या नादानें औरंगजेबाची अवकृपा आपल्यावर होऊं नये म्हणून महाराजांनीं मोंगलांशीं सलोख्याचे संबंध ठेवले. इतक्यांत श. १५७८ कार्तिक वद्य त्रयोदशी (४ नोव्हेंबर १६५६) या दिवशीं महमूद आदिलशहा मरण पावला. महमूदच्या मृत्यूमुळें विजापूरच्या राज्यव्यवस्थेंत एकच हाहाकार उडाला. त्याच्या मागून त्याचा अठरा वर्षांचा मुलगा अलीआदिलशहा गादीवर बसला व राज्याचा सारा व्यवहार महमूदची वायको ‘बडे साहेबीण’

हिनें हातांत घेतला. 'अबला यत्र प्रबला बालो राजा' अशा स्थितींत विजापूरच्या राज्यांत एकच गोंधळ होऊं लागला, व त्यांतून विजापूरचे मुत्सद्दी सांवरण्याच्या आंत सुभेदार औरंगजेबानें आपले कालपाश विजापुरावर टाकावयास प्रारंभ केला. त्यानें शहाजहान बादशहाकडे विजापूरवर चढाई करण्याची आज्ञा मागितली. या स्वारीसाठीं पुढील दोन फुसकी कारणें पुढें केलीं. (१) "अल्ली हा महमूदशहाचा खरा मुलगाच नसल्यामुळें विजापूरच्या गादीवर बसण्याचा त्याला अधिकार नाहीं; आणि (२) गादीवर बसण्यापूर्वी त्यानें दिल्लीच्या सम्राटाची अनुज्ञा घेणें आवश्यक होतें ती घेतली नाहीं." अल्लीचा प्रश्न हा विजापूरच्या स्वतंत्र शासनाचा प्रश्न असल्यामुळें औरंगजेबाला त्यांत ढवळाढवळ करण्याचा कांहींच नैतिक अधिकार नव्हता. पण तलवारीच्या व्यवहाराला नैतिक बंधनाचा काय अडथळा येणार? औरंगजेबानें तर बादशहा शहाजहानची अनुज्ञा येण्याच्या आधींच सैन्य सिद्ध करून भेदनीतीचा प्रारंभहि केला. त्यानें आमिषें दाखवून व पैशाच्या पिशवीचें तोंड मोकळें सोडून विजापूरचे कित्येक सरदार फोडले, व वजीर खानमहंमद याला विरोध करणारा एक बळकट पक्ष विजापुरांत उत्पन्न केला. अहमदनगरचा मोगली अधिकारी मुलतफतखान यानें औरंगजेबाच्या आज्ञेनें, विजापूरची नोकरी सोडून मोंगलाकडे येणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याच्या मुठी भरण्याचें काम प्रारंभ केलें. एका बाजूनें बळाचा धाक व दुसऱ्या बाजूनें द्रव्याचें आमिष पुढें करून औरंगजेबानें विजापूरच्या परिसरांत एकच धमाल उडवून दिली. शेवटीं शहाजहानची औरंगजेबाला विजापूर बुडविण्याची आज्ञा आली. त्यानें कळविलें कीं, "(शक १५७८ मार्गशीर्ष) तुम्ही विजापूरकरांच्या राज्यावर चालून जाऊन शक्य असल्यास त्यांचें सर्व राज्य नष्ट करावें, पण तें होण्यासारखें नसल्यास शके १५५८ मध्यें (इ. स. १६३६) ठरलेल्या तहांत जो निजामशाही मुलूख विजापूरकरांना देण्यांत आला होता तो तरी जिंकून मोंगली साम्राज्यास जोडा, आणि दीड कोटी रुपये खंडणी देऊन

विजापूरचा सुलतान मांडलिक म्हणविण्यास सिद्ध झाला तर त्याच्याशीं संधि करा; आणि नंतर गोवळकोंड्याची कुतुबशाही संपूर्ण नष्ट करण्यासाठीं तिकडे सैन्य घेऊन जा."

शके १५५८ च्या तहान्वयें निजामशाही बुडवितांना भीमेच्या उत्तरेचा प्रदेश मोंगलांना, तळकोंकण विजापूरकरांना आणि भीमा व नीरा यांमधील प्रदेश (पुणें व सुपें) शहाजी राजांना मिळालेला होता. शहाजहानच्या आज्ञेप्रमाणें या प्रदेशावर म्हणजेच स्वराज्यावर मोंगलांची धाड येणार हें स्पष्ट होतें. त्यामुळें विजापूर व मोंगल यांच्या वादांत मोंगलांकडून आपल्याला झळ पोचूं नये अशी व्यवस्था करणें शिवाजी महाराजांना भाग होतें. त्यांनीं औरंगजेब विजापूरच्या कल्याणी व बिदर या किल्ल्यांना वेढा देऊन बसला असतां आपले वकील म्हणून सोनाजी विश्वनाथ अथवा सोनोपंत डबीर यांना औरंगजेबाकडे पाठविलें. सोनोपंतांनीं औरंगजेबाकडे असें बोलणें लाविलें कीं शिवाजीनें दाभोळ बदर इत्यादि विजापूरकरांचा घेतलेला प्रदेश औरंगजेबानें शिवाजीकडेच राहूं दिल्यास व शिवाजीच्या प्रदेशावर आक्रमण न करण्याची मोंगलांनीं हमी दिल्यास शिवाजी मोंगलांची निष्ठेनें सेवा करावयास सिद्ध आहे. औरंगजेबाला या विजापूरकरांवरील मोहिमेच्या वेळीं शिवाजीसारखा योद्धा आपल्या बाजूला असणें अतिशयच आवश्यक वाटलें. विजापूरकरांनीं या वेळीं खानमहमद, अफझलखान, सिद्दीरेहान इत्यादींच्या नेतृत्वाखालीं २०,००० सैन्य औरंगजेबावर पाठविलें होतें. बिदरजवळ या सैन्याशीं झालेल्या युद्धांत जय मोंगलांना मिळाला तरी त्यांची प्राणहानि पुष्कळच झाली होती. तेथून औरंगजेब कल्याणीच्या वेढ्यासाठीं जात असतां शके १५७९ वैशाख शु. ६ ला त्यानें शिवाजी महाराजांना पुढील पत्र पाठविलें.

" औरंगजेब शिवाजी भोसले.

(फारशीचें भाषांतर)

तुमची अर्जदास्त इकडील पंज्याचे निशाणाचे फर्मान पोचल्यानंतर चिट्टी पावली. हरएक विषयीं जें सांगणें तें तुम्हाकडील

वकील सोनाजी यांजपाशीं सांगितले. त्याणीं तुम्हासी बोलोन खातरजमा केलीच असेल. सांप्रत जे किल्ले व मुलूख विजापूर-करांकडील तुमचे हातीं होते ते पेशजीप्रमाणें होऊन तुमचे मनोगता अन्व बंदर दाभोळ व त्याजखालील मुलुख तुम्हांस दिला असे ऐशियास इकडील दौलतीची किफायत मदत जी करणें असेल तिचा समय हाच आहे. जाणोन करण्यांत आणावें, आणि हुजूर भेटीस यावे. याखेरीज जे मतलब तुमचे मनांत असतील ते घडोन येतील हाली तुमचे वकील यास परत जाण्याची जलदी होती. सबब निरोप दिल्हा आहे. त्यांचे जबानी इकडील लक्ष दिसोनदिवस तुमचा उत्कर्षाचा करण्याचा वगैरे सर्व ध्यानांत येईल. याकरिता इक-डील दौलतीचे लहान मोठ्या कामकाजाची तर्तूज आपले ऊर्जिताचे कारण समजून करीत जावी. व वारंवार इकडील कृपेचें इच्छित असावें. सांप्रत ईश्वरकृपा व आमचे दैवशालित्व व फौजेचें शेर-पणा यांनीं इकडील वाईट इच्छिणार नाहींसे झाले. दिवसानुदिवस इकडे जय येत चालला. तो असा कीं, किल्ला बेदर हा मोठा मजबूत, आजपावेतों त्यास कोणीच सर केला नव्हता व कोणाच्या मनांत कल्पनादेखील सर करायची येत नव्हती. तो एकंदर दक्षण व कर्नाटक देशचा दरवाजा तो एक दिवसांत हस्तगत जाला इतरासी वर्षाची वर्षेही वश जाला नाहीं. ईश्वराचें सर्व कृत्य इकडील प्रतापशूरांचे शौर्यामुळें तुम्ही ये विषयींचा संतोष मानून, वरचेवर जसे आमचे जय होतील तसे त्या संतोषाचे वर्तमानावर कान ठेवीत जाणें, आणि आमचा लोभ पूर्ण आहे असें मानीत जाणें."

हें औरंगजेबाचें पत्र आलें तरी शिवाजी महाराजांनीं या वेळीं विजापूरचा पक्ष उचलून धरण्याचें ठरविलें होतें. कारण मोंगल हे धूर्त असून विजापूरचा नाश झाल्यावर ते दक्षिणेंतील सर्वां-वरूनच वरवंटा फिरवितील हें त्यांना दिसत होतें. विजापूर-करांकडूनहि त्यांना मिळविण्याचे कसोशीचे प्रयत्न चाललेच होते शेवटीं जिंकलेला प्रदेश स्वतःकडेच राहूं देण्याच्या अटींवर त्यांनीं विजापूरकरांना साह्य करण्याचें ठरविलें व औरंगजेब कल्याणीच्या

वेढयांत गुंतला असतांना त्यांनीं एकदम मोंगली प्रदेशावर स्वारी केली. मीनाजी भोसले व काशी या सरदारांनीं तीन सहस्र घोडेस्वारांसह एकदम भीमा उतरून चांभारगोंदें व राशीन हे मोंगली प्रांत लुटले व अहमदनगरपर्यंतचा प्रदेश उद्ध्वस्त केला. या अचानक स्वारीमुळें नगरचा मोंगली गडकरी मुलतफतखान हा इतका गर्भगळीत झाला कीं त्यानें नगरांतील सारी संपत्ति व वस्ती किल्ल्यावर आणली. स्वतः शिवाजी महाराजांनीं दि. ३० एप्रिल १६५७ ला अंधाऱ्या रात्रीं जुन्नरच्या तटाला माळा लावून आंत प्रवेश केला व शहर लुटलें. सभासदानें या स्वारीचें मोठें हृदयंगम वर्णन केलें आहे. तो म्हणतो :— जुन्नर शहर मारिले. घोडे दोनशे पाडाव केले. तीन लक्ष होनाची मत्ता, खेरीज कापड जिन्नस, जडजवाहीर, हस्तगत करून पुण्यास आले मग अहमदनगर शहर मारिलें, मोंगलाशीं मोठें युद्ध केलें. सातशे घोडे पाडाव केले. हत्तीहि पाडाव केले. द्रव्य बहुत सांपडले. ते समयीं पागा बाराशे व शिलेदार दोन हजार पाडाव जाहाले. अशी तीन हजार स्वारांची बेरीज जाली." (पृ. ५)

## औरंगजेबाचा क्रोध

या वार्ता औरंगजेबाच्या कानीं येतांच संतापानें त्याचें भान हरपलें. आपल्या पाताळयंत्रीपणावर नुकतीच तारुण्याची पहाट झालेल्या एका हिंदू पोरानें मात केलेली पाहून त्याच्या अंगाची लाही लाही झाली. त्यानें आपल्या अहमदनगरकडील अधिकाऱ्याची मर्मभेदक शब्दांनीं निर्भर्त्सना करून त्यास लिहिलें :—

"तुम्ही आतां शिवाजीची अहमदनगरापासून हकालपट्टी तर तत्काळ केली पाहिजे. पण येवढ्यानें काम भागणार नाहीं. शिवाजीच्या प्रदेशांत शिरून तुम्ही तो बेचिराख करा. लोकांचे बळी घतांना व त्यांना लुटून नागवतांना यत्किंचितही दया माया दाखवूं नका. पुणें व चाकण प्रांत याची राखरांगोळी झाली पाहिजे. तेथील लोक हातांत सांपडतील त्यांना गुलाम बनवा. आणि मोंगली

मुलखांतील जे पाटील किंवा प्रजाजन शिवाजीला गुप्तपणें साह्य करीत असतील त्यांचा नायनाट करा." औरंगजेबाच्या या संतापाच्या पत्रानें मोंगलसेनानींची निद्रा उडाली. रावकर्ण, नासिरीखान, शाहिस्तेखान, कारतलवखान शिवाजी महाराजांचा विध्वंस करण्यासाठीं धांवले. पण त्या वेळीं ज्येष्ठ महिना असल्यामुळें पावसाळा सुरू होऊन वाटा बंद झाल्या. पावसाळ्यांत होड्यांतून हालचाली करण्याची धमक या सेनानींत नव्हती. त्यामुळें 'पावसाळा संपल्यावर शिवाजीला धुळीस मिळवितां येईल असा पोक्त विचार करून हे सेनापति माशा मारीत स्वस्थ बसले. याच वेळीं औरंगजेबाचाहि पाणउतारा होऊन विजापूर जिंकण्याचा उद्योग थांबविण्याची त्याच्यावर पाळी आली. औरंगजेबानें बिदरचा किल्ला घेतल्यावर कल्याणीला वेढा देऊन जेरीस आणलें. त्यानंतर थेट विजापूरवर चालून जाऊन तेथील सत्ता धुळीस मिळवण्याचा त्याचा कृतनिश्चय होता. पण विजापूरच्या मुत्सद्द्यांनीं थेट दिल्लीपर्यंत धांव घेतली. तेथील सारीं सूत्रें औरंगजेबाचा वडील बंधू दारा याच्या हातीं होतीं. दारा व औरंगजेब यांच्यांत चांगलीच तेढ असल्यामुळें औरंगजेबाचा पाणउतारा करण्यासाठीं दारानें शहाजहान बादशहाकडून 'देखत हुकूम विजापूरकरांशीं चाललेलें युद्ध बंद करा' अशी आज्ञा औरंगजेबाला पाठविली व त्याच्या सर्व सरदारांना माळव्यांत तत्काळ येण्याचीं आज्ञापत्रें पाठविलीं. त्यामुळें औरंगजेबाची स्थिति केविलवाणी झाली. त्यानें कांहीं दिवस सैन्य थोपवून धरून कल्याणीचा किल्ला जिंकला; तरी पण शेवटीं विजापूरकरांशीं "दीड कोट रुपये खंडणी भरावी; बेदर, कल्याणी, परांडा हे किल्ले, निजामशाहीचे कोंकणांतील किल्ले, व शिवाजीच्या ताब्यांतील पुणें व सुपे हे प्रांत मोंगलांनीं घ्यावे" या अटींवर संधि करावा लागला. त्याचे सेनानी यानंतर शहाजहानच्या आज्ञेप्रमाणें उत्तरेंत निघून गेल्यामुळें तहांत ठरलेले प्रदेश व दुर्ग घेण्याचें कार्य मात्र त्या वेळीं सफल झालें नाहीं. शिवाजीराजांची त्यानें चांगलीच धास्ती घेतली होती. सप्टेंबरमध्यें विजापूरकरांशीं औरंगजेबाचा तह झाला व ऑक्टोबरमध्यें नासिरीखान उत्तरेकडे

जाण्याच्या सिद्धतेंत असल्याचें पाहून औरंगजेबानें अहमदनगरच्या सुभेदारास लिहिलें " नासिरीखान परत जातांच तू युद्धासाठीं पूर्ण सिद्धतेनें असावें. नाहींतर शिवाजी पुन्हां तुझ्या प्रांतांत शिरून धुमाकूळ उडवून देईल."

विजापूर जिंकण्याच्या संबंधांत पूर्ण निराशा पदरांत घेऊन औरंगजेब बेदर येथें राहिला. या वेळीं शिवाजी महाराजांची स्थिति अतिशय नाजूक झाली. मोंगल साम्राज्यशाहीला पायबंद असावा म्हणून त्यांनीं विजापूरकरांचा पक्ष आयत्या वेळीं उचलला होता ; पण विजापूरकरांनीं त्यांना न कळवितां परस्पर मोंगलांशीं संधि करून टाकला. इतकेंच नव्हें तर शहाजीच्या जहागिरीचा, शिवछत्रपतींच्या स्वराज्याचें अधिष्ठान असलेला पुणें-सुपा हा प्रांतहि त्यांनीं मोंगलांना देऊन टाकला. औरंगजेब पावसाळ्यानंतर या प्रांतावर चढाई करून आपला पूर्ण सूड घेईल व संधीनें बांधल्यामुळें विजापूरच्या सत्तेला आपल्या संबंधांत कांहींच करतां येणें शक्य नाहीं, अशा स्थितींत काय करावें असा मोठा चिंतेचा प्रश्न महाराजांसमोर उभा राहिला. सरळ मोंगली साम्राज्याशीं युद्धाची टक्कर देण्याची त्या वेळीं सामर्थ्याच्या दृष्टीनें शक्यताच नव्हती. त्यामुळें केवळ प्रयत्न करून पहावा म्हणून त्यांनीं सोनोपंत डबीरांना पुनश्च वाटाघाटीसाठीं व मागील अपराधांची क्षमा करून आपल्याला साह्यकारी समजावें अशी औरंगजेबाला याचना करण्यासाठीं त्याच्याकडे पाठविलें. या वाटाघाटींत यश येण्याचा संभव आहे असें वाटत नव्हतें. पण त्यांनीं गळ टाकला, व त्यांच्या देवकार्याला दैव पूर्णपणें अनुकूल असल्यामुळें त्या वेळीं अशी एक घटना घडली कीं ज्यामुळें औरंगजेबाला दक्षिणेंतील या भानगडींत काडीचेंहि महत्त्व न उरून त्यानें इकडील पसारा आवरतां घेण्याच्या दृष्टीनें शिवाजी महाराजांना साऱ्या अपराधांची क्षमा करून पुन्हां आपलें साह्यकारी राहण्याविषयीं पत्र पाठविलें. औरंगजेबाचें दक्षिणेंतील भानगडींतून लक्ष उडण्याचें कारण बादशहा शहाजहानचा आजार हें होय. या घटनेनें सारेंच पारडें क्षणांत पालटलें. दक्षिणेच्या

भानगडीपेक्षां पित्याचें दिल्लीचें साम्राज्यसिंहासन हस्तगत करणें व त्यासाठीं दैवाची परीक्षा पाहणें अधिक महत्त्वाचें ठरून औरंगजेब उत्तरेकडे निघाला, व दक्षिणेचा व्यवहार आटोपता घेण्याच्या दृष्टीनें त्यानें शिवाजीराजांना, त्यांच्या मूळच्या व जिंकलेल्या प्रदेशाचें स्वामित्व त्यांच्याकडेच राहून, ते मोंगलांशीं एकनिष्ठ राहिल्यास तळ कोंकणचाहि भाग त्यांनाच देण्यांत येईल असें कळविलें. औरंगजेबाचें हें पत्र पुढीलप्रमाणें आहे.

"तुमची अर्जदास्त कृष्णाजी भास्कर पंडित यांचे पत्रासुद्धां रघुनाथपंत वकील यांबरोबर पाठवून (दिलेली पाहून) मजकूर ध्यानास आला. यद्यपि तुमच्या पेशजीच्या गोष्टी विसरावयाजोग्या नाहीत तथापि तुम्ही आपले कृतकृत्याचा पश्चात्ताप केला आणि हा दरबार उपेक्षेचा नाही जाणोन, वडिलांचे लक्ष निश्चांत इकडे आहे असें समजोन, तुमचे कृत्य मनांत आणीत नाही, ये विषयींचा संतोष मानून, इकडील दौलतीविषयीं कोशीस करीत जावी. आपले वतनी माहाल किल्ले व कोकणदेशसुद्धां नगरवालेखेरीज, विजापूरकर आदिलखानाचे इलाख्यांत जे आहेत ते त्यांजकडून हस्तगत जाल्यानंतर बंदोबस्त होण्याविषयीं वचन असावें. म्हणजे सोनोपंत यांस हुजूर पाठवितो आणि इकडील लक्षांत वागून सरकारी मुलुखाची सरहद्द रक्षण करून कामदाराशी षरीक होतो; कीं ज्या योगें बंड वगैरे बखेडे न होवोत; म्हणोन लिहिलें. त्यास तुम्ही लिहिल्या अन्वयें वर्तून हा फर्मान पाहतांच आपले मजकुराची अर्जी लेहून पंताबरोबर पाठवून देणें म्हणजे त्याप्रमाणें केलें जाईल जाणोन लक्षांत वागोन आमचे लोभाची पूर्णता समजावी.

"**ताजा कलम** — महाराज जसवंतसिंग व कासमखान हे उभयता इकडील फौज आलीशी समजोन उज्जनीहून सहा कोस पुढें लढाईचे इराद्यानें आले आहेत. परंतु ईश्वरकृपेनें इकडील शूर असल लौकिकी सहा-सात हजार त्यांजकडील कामास येऊन शेवटीं पळूं लागले. त्यांजकडील खजिना व तोफखाना व हत्ती वगैरे बहुत कारखाने लुटले गेले. ईश्वरें अशा तऱ्हेने आमची फत्ते करविली.

पुढें आणखी नानाप्रकारचें जें सर्वांस संतोषदायक व शत्रूस पादाक्रांति देणार असें सत्वरच होईल. तुम्ही या विषयींचा संतोष मानून इकडील लक्षांत राहून कल्याणाचे उमेदवार असावें.”

(दि. १४ फेब्रुवारी १६५८ श. १५७९ फा. शु. २)
––(शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ ला. पृ. १६३)

पण याप्रमाणें एका बाजूला शिवाजी राजांना गोंजारणारा औरंगजेब त्यांना मात्र विसरला नव्हता. त्याला साम्राज्य सिंहासनाचेच वेध लागले असल्यामुळें त्यानें शिवाजी राजांना गोंजारलें आहे. कारण त्याच वेळीं तो विजापूरच्या सुलतानाला लिहितो ––

“मीरजुमल्याच्या दुष्टाव्याच्या सल्ल्यावरून मी विजापूर व गोवळकोंडा या राज्यांवर हल्ला केला. पण आतां तुम्ही आपल्या प्रजेचें संरक्षण करा व सुखांत नांदा. राजनिष्ठेनें वागून आपलें वचन पाळा. (१) परिंड्याचा किल्ला, कोंकण, वांगी महाल हे प्रांत खालसा केले होते ते व कर्नाटकांतील मुलुख, तुमच्याकडे पूर्वीप्रमाणें रहावे; (२) आणि कोटि रुपये खंडणी तुम्ही कबूल केली आहे त्यांपैकीं ३० लाख सूट द्यावी, ह्या दोन अटी मी मान्य करतों. तुम्ही मात्र मुलुखाचे चांगलें संरक्षण करा; व त्याची व्यवस्था सुधारा. त्या प्रांतांतील कांहीं किल्ले शिवाजीनें बळकावले आहेत तेथून त्याला घालवून द्या. त्याला नोकरींत ठेवण्याची इच्छा असेल तर त्याला कर्नाटकांत जहागीर द्या. म्हणजे त्याचा उपसर्ग मोगली मुलुखास पोंचणार नाहीं . . . . मी हिंदुस्थानाकडे जात आहे: तुम्हांस राजनिष्ठा व स्नेह दाखविण्यास ही संधि आहे. माजी आदिलशाहानें प्रसंग पडल्यास सैन्य पुरविण्याचें वचन दिलें होतें. तुम्ही निदान दहा हजार सैन्य पाठवा. मी तुम्हांला बाणगंगेपर्यंत मुलूख देईन. शहाजी किंवा बहलोलखानाचे मुलगे अगर तुमचे इतर अधिकारी यांना माझ्या नोकरींत घेणार नाहीं. तुम्ही माझ्याशीं निष्ठेनें वागाल तोंपर्यंत तुमच्या मुलुखास आमच्या अधिकाऱ्यांकडून उपसर्ग पोंचणार नाही व तुमच्यावर हिंदुस्थानाकडून स्वारी आल्यास आम्ही तुमच्या मुलुखाचें संरक्षण करूं.”

––(पत्रसारसंग्रह खंड १ ला, पृष्ठ १६५)

शिवाजीविषयींच्या औरंगजेबाच्या भावना किती कडवट होत्या हें ध्यानांत यावयास मीरजुमल्याला त्यानें लिहिलेलें पत्र पहाण्यासारखें आहे. तो लिहितो, "नासिरीखान नगरकडून निघून गेल्यामुळें तो प्रांत उघडा पडला आहे. म्हणून तिकडे चांगलें लक्ष द्या. कारण शिवाजी ही कुत्र्याची अवलाद आहे. तो अशा संधीची वाट पहात टपून बसला आहे." (पत्रसारसंग्रह खंड १ ला, पृष्ठ १६४)

असो. याप्रमाणें औरंगजेबानें शिवाजी महाराजांशीं संधिहि केला नाहीं व उघड संघर्षहि राहूं दिला नाहीं. कोणतीहि व्यवस्था नीट न करतां तो घाईघाईनें उत्तरेकडे निघून गेला व तिकडेच राज्यपदाच्या भांडणांत तो पूर्ण दोन वर्षें गुंतून राहिल्यामुळें त्याची दक्षिणेंत कोणतीहि भीति उरली नाहीं.

या एकंदर प्रकरणावर कै. सर जदुनाथ सरकार आपला अभिप्राय प्रकट करतांना म्हणतात, "शिवाजीच्या एकाच स्वारींतील धाडसाच्या चुणुकीनें औरंगजेबासारखा पराक्रमी शहाजादाहि किती भेदरून गेला होता याचें प्रतिबिंब वरील पत्रव्यवहारांत स्पष्टपणें दिसतें. शिवाजीचें प्रस्थ जर वाढूं दिलें तर मोंगलांच्या पादशाहीला खात्रीनें धक्का बसेल असें धूर्त औरंगजेबाच्या तेव्हांच लक्षांत आलें होतें व शेवटीं तेंच खरें झालें."

## विजापुरांतील गोंधळ

मोंगलांचें संकट निघून जातांच, राज्याची बळकटी करण्याऐवजीं विजापुरांत एकमेकांच्या छातीवर नाचण्याची तेथील सरदारांत स्पर्धा लागून राहिली. वजीर खानमहंमदाविरुद्ध, तो मोंगलांना आंतून मिळाला असल्याची कागाळी अफझलखानानें केल्यामुळें त्याची हत्त्या करण्यांत आली. जेधे शकावलींत पुढीलप्रमाणें उल्लेख आढळतात. "खान महंमद बडे साहेबिणीनें मारला" "फत्तेखानास विजापुरी विष देऊन मारिले" "श्रावणमासी (श. १५८०) बहलोलखान मारिला." या वेळीं मुल्ला अहमद हा विजापूरचा सूत्रचालक बनला व अफझलखान त्याच्याच पक्षाचा असल्यामुळें त्यालाहि अतोनात महत्त्व प्राप्त झालें.

## स्वराज्याचा विस्तार

शिवाजी महाराजांना ही वेळ स्वराज्य विस्ताराच्या दृष्टीनें अत्यंत अनुकूल होती. औरंगजेबाचें भय उरलें नव्हतें. मोंगल निष्प्रभ झाले होते व विजापुरांत लाथाळी चालू होती. त्यांनीं एकदम गरुड झेप घेऊन विजापूरकरांनीं मोंगलांना संधिपत्रांत दिलेला प्रदेश घेतला. मोंगलांच्या वतीनेंच आपण हें करीत आहोंत असें म्हणावयास औरंगजेबाचें पत्र त्यांच्याजवळ होतेंच. विजापूरकरांचे उत्तरेकडील साम्राज्यवादांत सर्वस्व जाण्याची वेळ आली असतां आपण त्यांना साह्य केलें; पण त्यांनीं मात्र परस्पर मोंगलांशीं संधि करून आपला विश्वासघात केला व आपल्याला तोंडघशीं पाडलें हा राग महाराजांच्या मनांत होताच. त्यांनीं आपलें सैन्य कोंकण प्रांतांत उतरवून कल्याण भिवंडीपर्यंतचा प्रदेश जिंकला. कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद विजापूरच्या राजकारणांत गुंतला असल्यामुळें शिवाजी महाराजांचे सरदार आबाजी सोनदेव यांना कल्याण सहज जिंकतां आलें. तेथें दादाजी कृष्ण लोहोकरे व सखो कृष्ण लोहोकरे यांची नेमणूक करण्यांत आली. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचें प्रकरण घडलें असल्यास तें याच वेळीं घडलें असलें पाहिजे. या ठिकाणीं शिवछत्रपतींना पुष्कळ संपत्ति मिळाली. त्या मागोमाग माहुलीचा दुर्ग दि. ८ जानेवारी १६५८ ला जिंकला. हे एका काळचे शहाजी राजांचें निवासस्थान असल्यामुळें शिवछत्रपतींच्या दृष्टीनें त्याला आगळें महत्व होतें. उत्तर कोंकण जिंकल्यावर दक्षिण कोंकणच्या मुसलमानी अत्याचारांना तेथील हिंदू कंटाळलेच होते. त्यांच्या हांकेला 'ओ' देऊन महाराजांनीं तो प्रदेशहि जिंकला. कल्याणच्या प्रदेशांतून शिवाजी महाराजांच्या, पोर्तुगीजांच्या प्रदेशावर वारंवार स्वाऱ्या होऊं लागल्यामुळें तेथील गव्हनरानें त्यांना वार्षिक खंडणी देण्याचें मान्य करून आपला प्रदेश वांचविला. पूर्वीं द्यावा लागलेला सिंहगडहि त्यांनीं पुनश्च स्वराज्यांत समाविष्ट करून घेतला. याप्रमाणें उत्तरेला डोंगर उल्लंघून देशापर्यंत व दक्षिणेस सातारा विभाग आणि कोंकणांत माहुलीपासून

महाडपर्यंत स्वराज्याचा विस्तार झाला. जुने व नवे मिळून इ. स. १६५९ मध्यें एकंदर चाळीस दुर्ग या वेळीं स्वराज्यांत मोडत होते.

## राज्यव्यवस्था

या मिळविलेल्या स्वराज्याची व्यवस्था व एकसूत्रीकरण महाराजांनीं फारच उत्कृष्ट केलें. सभासद म्हणतो, "मोरो त्रिंबक (पिंगळे) ब्राह्मण यांनीं बहुत मेहेनत केली, त्याजवरून शामराज नीळकंठ यांची पेशवाई दूर करून मोरोपंतास दिली व निळो सोनदेव याणीहि मेहेनत केली म्हणोन त्यास सुरनिशी सांगितली. गंगाजी मगाजी म्हणोन होते त्यास वाकनिशी सांगितली. लष्करचा सरनौबत (सेनापति) नेताजी पालकर केला. नेताजी सरनौबदी करीत असतां सात हजार पागा व तीन हजार शिलेदार अशी दहा हजार फौज जाली. मावळे लोकांची संचणी दहा हजार पावेतों जाली. यासी सरनौबत येसाजी कंक म्हणून केला. ऐसें राज्य चौकशी बंदोबस्त करून राहिलें."

या काळांत छत्रपति शिवाजी महाराजांच्या थोरल्या राणी सईबाईसाहेब प्रसूत होऊन स्वराज्याला युवराज लाभला. दि. १४ मे १६५७ ला संभाजी महाराजांचा जन्म झालेला आहे.

## काळे ढग येऊं लागले

याप्रमाणें विजापुरी राज्याचे लचक्यांमागून लचके तोडून हिंदु नृसिंह छत्रपति शिवराय चाळीस दुर्गांचे दुर्गम धनी झाल्यावर विजापुरी सत्तेची कुंभकर्णी झोंप उडाली. मुख्य प्रधान खवासखान व बडी साहेबीण यांच्या काळजाचा ठाव सुटल्यासारखा झाला. सभासद म्हणतो, "विजापूर (येथें) अली इदलशहा पादशाही करूं लागले, व बडी साहेबीण, सुलतान महमूदची बायको ही कारभार कुल करीत असतां त्यांस हें (शिवाजीच्या धामधुमीचें) वर्तमान कळून बहुत कष्टी जाहली. पातशाही किल्ले घेतले, देशहि काबीज केला, एकदोन राज्यें बुडविली. हा पुंड जाहला.

त्यास मारून गर्दीस मेळविण्याचें कसें करावें, म्हणून विचार करून राजश्री शहाजी राजे बेंगरूळाकडे होते, त्यांस पत्रें लिहिली, महाल-दार रवाना केले कीं 'तुम्ही पातशाही चाकर, आणि शिवाजी लेक पुण्याकडे पाठवून त्यांणीं पादशहासीं बदलून हरामखोरी केली. चार किल्ले पादशाही घेतले. देश मुलुख कावीज केला व मारिला. एकदोन राज्यें बुडविली व एकदोन राजे पादशहासी रुजुवात होते ते मारिले. आतां लेकास कदवार ठेवणें, नाहीं तरी पादशाही हवाला घेतील. मग महाराजांनीं उत्तर दिलें कीं शिवाजी आपला पुत्र, परंतु आपणांजवळून पळोन गेला. तो आपल्या हुकुमांत नाही. आपण तो पादशहासी रुजुवात एकनिष्ठेनें आहों. शिवाजी आपला पुत्र याजवरी हल्ला करावी मन मानेल तें करावें, आपण दरमियान येत नाहीं."

सभासद म्हणतो याप्रमाणें शहाजी राजांना वेठीस धरण्याचा प्रयत्न झाला असो वा नसो, पण चाळीस किल्ले व महाड ते कुडाळ पर्यंतचा प्रदेश जिंकून वर येत असलेली ही हिंदु सत्ता या वेळींच पूर्ण धुळीस मिळविली नाहीं तर विजापूरचें सिंहासन धुळीस मिळालेलें पहावें लागेल हें विजापूरच्या सूत्रधारांच्या दृष्टीला दिसूं लागलें. पण शिवाजी राजाशीं द्वंद्व ही आतां तरी सामान्य गोष्ट उरली नव्हती. म्हणून तशाच असामान्य सेनानीची त्या जागीं योजना झाली. त्याचें नांव 'अफझलखान.' येथें उघड क्रांतियुद्धाचा काल-खंड संपून शिवरायांच्या जीवनपटांतील तिसऱ्या कालखंडाचा प्रारंभ होतो. त्याकडे पुढील प्रकरणांत वळूं.

✦ ✦ ✦

प्रकरण बारावें

# अफझलखानाची स्वारी

अफझलखानाचें प्रकरण हें शिवछत्रपतींच्या व ते प्रस्थापित करीत असलेल्या स्वराज्याच्या जीवनावरील पहिल्या क्रमांकाचें प्राणसंकट होय. शिवछत्रपतींच्या सेनापतित्वाचे अनेक अलौकिक गुणविशेष या प्रकरणांत प्रकट झालेले असून प्रतिभा व साहस या त्यांच्या गुणविशेषांचा या प्रकरणांत उत्कट आविष्कार झालेला प्रत्ययास येतो.

### अफझलखान

शिवछत्रपतींच्या वाढत्या प्रभावामुळें आदिलशाही सत्तपुढं लवकरच जीवनमरणाचा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे हें ओळखूनच विजापूरच्या सत्तेनें त्यांना पूर्णपणें नष्ट करण्याच्या हेतूनें अफझलखानाची ही योजना केलेली आहे. शिवभारतांत अफझल-खानाशीं झालेल्या संवादांत अलीआदिलशहाच्या तोंडीं परमानंद कवींद्रानें जीं वाक्यें घातलीं आहेत त्यावरून शिवाजी महाराजांचा विजापूरी वातावरणांत केवढा वचक उत्पन्न झाला होता याची कल्पना येते. तीं वाक्यें पुढीलप्रमाणें :—

क्रमेणाक्रम्य विकटां कण्ठीरव इवाटवीम्।
एष आत्मवशो नैव मन्यते मम शासनम्॥ १३
महमूदेन पित्रा मे यदि न स्यात् स वारितः।
तर्हि स्यान्मज्जितोऽभोधौ तेन राजपुरीश्वरः॥ १५
दत्तोऽवरंगशाहाय मया यः सन्धिकाम्यया।
नीवृन्निजामशाहस्य सपर्वतवनाकरः॥१७
स तेनात्मवशेनास्मानवमत्य प्रतापिना।
परानप्यविनीतेन प्रसह्य स्ववशीकृतः॥ १८
अतर्कितागमोऽभ्येत्य दस्युवृत्तिपरायणः।
मत्पत्तनपुरग्रामानुद्वृत्तोऽयं विलुण्ठति॥ १९

अहोरात्रेण पक्षेण गम्यं पक्षद्वयेन च।
अत्येति स किलाध्वानं क्षणेनैवाकुतोभयः॥ २०
आक्रम्य ताम्रवक्त्राणां नगराण्युरुविक्रमः।
नगरप्रभृतीन्येष चण्डचण्डमदण्डयत्॥ २२
स्थैर्यं निजामराष्ट्रस्य गृहीतस्यापि यत्नतः।
अपि दिल्लीपतिर्नैव मनुतेस्माद्विशंकितः॥ २३
पितामहेन मे पूर्वं पिता तस्य विवर्धितः।
शाहराजो दुर्विनीतं तं न शिक्षयितुं क्षमः॥ २४
दिने दिने वर्धमानः प्रतापेन सह श्रिया।
अयमाश्रियते भूपैराकांक्षितसमृद्धिभिः॥ २७
शनैः शनैरेव बली पदं कुर्वन् पुरःपुरः।
अस्मद्राज्यं समाच्छिद्य करिष्यति किमात्मसात्॥ २८
तज्जयाय पुरा वीरान् यान्यान्प्रास्थापयं मुहुः।
न प्राप्ताः पुनरावृत्ति ते तं प्राप्य प्रतापिनम्॥ २९
निर्वाणमरिवीराणां कुर्वाणमकुतोभयम्।
त्वां विना तस्य जेतारं नान्यं पश्यामि कंचन॥ ३०
तस्मात्त्वमेव गत्वा तं कृतदुर्गपरिग्रहम्।
सविग्रहं ग्रहमिव निगृह्यानय दुर्ग्रहम्॥ ३१

—(शिवभारत, अ. १७)

"भयंकर अरण्य सिंहाप्रमाणें क्रमाक्रमानें आक्रमण करून हा स्वतंत्र (वीर) माझा अंमल मुळींच मानीत नाहीं. माझा पिता महमूदशहा यानें जर ह्याचें निवारण केलें नसतें, तर ह्यानें दंडाराजपुरीच्या राजास समुद्रांत बुडविलें असतें. संधि करण्याच्या इच्छेनें मी अवरंगजेबास गड, अरण्यें व खाणी यांसह जो प्रदेश दिला होता तो त्या प्रतापी, स्वतंत्र व उन्मत्त अशा (शिवाजीनें) मला व त्या मोंगलांना न जुमानतां बलात्कारानें जिंकला. हा लुटारूपणा करणारा व बंडखोर शिवाजी अचानक छापा घालून माझीं नगरें, गांवें व खेडीं लुटतो. एका अहोरात्रांत, एका पंधरवड्यांत किंवा एका महिन्यांत करावयाचें मार्गक्रमण हा निर्भय शिवाजी एका क्षणांतच करतो. ह्या अत्यंत पराक्रमी शिवाजीनें मोंगलांचीं नगरें

जिंकून अहमदनगरादि स्थळांना भयंकर शासन केलें. मोठ्या प्रयासानें घेतलेल्या निजामशहाच्या प्रदेशाचीहि शाश्वती दिल्लीच्या बादशहालासुद्धां ह्याच्या भीतीमुळें मुळींच वाटत नाहीं. पूर्वी माझ्या आजोबानें वाढविलेला त्याचा पिता शहाजी हाहि ह्या उद्धट पोराला शिक्षा करावयास समर्थ नाहीं. प्रतिदिनीं प्रताप आणि संपत्ति यांच्यायोगें हा उत्कर्ष पावत असल्यामुळें वैभवाची इच्छा करणारे राजे ह्याचा आश्रय करूं लागले आहेत. हा बलवान् शिवाजी हळू हळू पाऊल पुढें पुढें टाकीत आमचें राज्य हिसकावून घेऊन गिळंकृत करणार कीं काय असें वाटूं लागलें आहे. त्याला जिंकण्यासाठीं पूर्वी ज्या ज्या वीरांना वारंवार पाठविलें त्यांची याच्याशीं गांठ पडल्यावर ते पुनः परत आले नाहींत. शत्रूंचा विनाश करणाऱ्या, निर्भय अशा तुझ्याशिवाय त्याला जिंकणारा दुसरा कोणी मला दिसत नाहीं. म्हणून तूंच जाऊन गडाच्या आश्रयानें राहणाऱ्या त्या दुर्जय शिवाजीला मूर्तिमंत ग्रहाप्रमाणें पकडून आण."

अफझलखानानेंच ही कामगिरी स्वतः पत्करली असें सभासदानें लिहिलें आहे; पण त्याच्याही वर्णनांतून शिवछत्रपतींचा केवढा वचक निर्माण झाला होता याची कल्पना आल्याविना रहात नाहीं. सभासद म्हणतो, 'तेव्हां बडी साहेबीण हिणें कुलवजीर उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजी राजियावरी रवाना करावे म्हणोन पुसतां कोणी कबूल केले नाहीं. अफझलखान वजीर यांणीं कबूल केले कीं "शिवाजी काय? चढे घोडियानिशीं जिवंत कद्र करून घेऊन येतो." अफझलखानाला पाठविलें तें शक्य तोंवर शिवाजी महाराजांना जिवंत धरून आणून यावनी क्रूरतेची भूक शमविण्याकरितांच पाठविलें होतें. तें नच जुळलें तर जुळेल त्या मार्गानें ठार करण्याच्या स्पष्ट सूचना खानाला होत्या. अज्ञानदास शाहिराच्या पोवाड्यांत म्हटलें आहे--

" देश दुनिया काबिज केली । बारा मावळें घेतली ॥
चंद्रराव कैद केला । त्याची गड जाउली घेतली ॥

चेत पाउली काबिज केली । ठाणीं राजाची बैसली ॥
घेतली जाउलि न् माहुली । कल्याण भिवंडी काबिज केली ॥
सोडविलें तळ कोंकण । चेउली ठाणीं बैसविली ॥
कुबल, बांकी घरें । शिवराजाच्या हातीं आली ॥
मुलाना हा माद । फिर्याद बाच्छायाप गेली ॥
बाच्छायजादी क्रोधा आली । जैसी अग्नपर जळली ॥
जित धरावा राजाला । कुलवजिरांला खबर दिली " ॥

शाहीर अज्ञानदासानें जिजामातेच्या आज्ञेवरून हा पोवाडा रचून तो शिवरायांच्या राजसभेंत गायिला असल्यामुळें त्याचें ऐतिहासिक प्रामाण्य वादातीत आहे.

## अफझलखानाचें सामर्थ्य

विजापूरच्या सुलतानानें या कामगिरीवर अफझलखानाची नियुक्ति करण्याचीं कारणें खानाची सेनानी या दृष्टीनें असलेली असामान्य योग्यता, त्याच्या रोमरोमीं भिनलेला हिंदुद्वेष व शत्रूला धुळीस मिळवण्याचा त्याचा स्थायी भाव हीं होतीं. अफझलखान हा मूळचा ' अबदुल्ला भटारी ' नांवाचा अगदीं सामान्य मनुष्य होता. त्याची आई भटारीण म्हणजे स्वयंपाकपणाचा व्यवसाय करणारी बाई असल्यामुळें त्याला भटारी म्हणत. तो केवळ आपल्या पराक्रमाच्या व कर्तृत्वाच्या भरंवशावर भाग्यास चढला. बहलोलखान व रणदुल्लाखान या कसलेल्या सेनानींच्या नेतृत्वाखालीं त्यानें रणपांडित्याचे धडे घेतले. महमद आदिलशहाच्या वेळींच सुलतानावर प्रभाव पडण्याइतका तो प्रसिद्धीस आला होता. विजापूरच्या इतिहासांत असें वर्णन आहे कीं बादशहा शहाजहान व महमूद आदिलशहा यांच्यांत मानापमानाचे प्रसंग उद्भवून तंटा उपस्थित झाला असतां अफझलखानाच्याच म्हणण्यावरून नमतें घेऊन आदिलशहानें युद्धाचा प्रसंग टाळला. यावरून सुलतानावर असलेल्या खानाच्या प्रभावाची कल्पना येते. खानानें कर्नाटकांतील युद्धांत विलक्षण पराक्रम गाजविला होता. शिवभारतांत त्याच्या पराक्रमाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे.

प्रस्थितेन त्वया पूर्वं पृतनाव्यूहवर्तिना ।
रामराजान्वयभुवो राजानो युधि निर्जिताः ॥ ३
कृतप्रतीपसंतापे प्रतापे तव जाग्रति ।
बत श्रीरंगराजोऽपि रणरंगाद्विरज्यते ॥ ४
त्वया विक्रम्य वीरेण क्षणात् कर्णपुराधिपः ।
सर्पो जांगुळिकेनेव स्फुरद्दर्पो वशीकृतः ॥ ५
त्वया मन्दरसारेण मथिता मधुरा पुरी ।
निगृह्य नगरीं काञ्चीं आहृतं चापि कांचनम् ॥ ६
पदे पदे शुभवता भवता किंकरीकृतः ।
व्यस्मरद्वीरभद्रोऽपि छत्रचामरसंपदः ॥ ७
बतेन्द्रप्रस्थनाथोऽपि निशम्य तव पौरुषम् ।
रोषावेशवशीभूतो न निद्राति दिवानिशम् ॥ १०

—(शिवभारत अ. १७)

"तूं पूर्वी मोठें सैन्य घेऊन स्वारीवर निघून रामराजाच्या वंशांतील राजांना युद्धामध्यें जिंकलें. शत्रूंना पीडा देणारा तुझा प्रताप जागृत असतां श्रीरंगपट्टणचा राजासुद्धां समरांगणापासून विरक्त झाला आहे. ज्याप्रमाणें गारुड्यानें अतिशय चिडलेल्या सापास वश करावें त्याप्रमाणें त्वां वीरानें पराक्रम करून एका क्षणांत कर्णपूरचा राजा जिंकला. मंदराचलाप्रमाणें सामर्थ्य असणाऱ्या तूं मदुरा नगरी उद्ध्वस्त केली; व कांची हस्तगत करून सुवर्णहि लुटून आणलें. पदोपदीं यशस्वी होणाऱ्या तूं दास बनविलेला वीरभद्र सुद्धां छत्रचामरयुक्त ऐश्वर्य विसरून गेलेला आहे. तुझा पराक्रम ऐकून क्रोधाविष्ट झाल्यामुळें दिल्लीच्या बादशहासमुद्धां रात्रंदिवस निद्रा येत नाहीं."

शिवभारतकारांच्या या दिल्लीपतिविषयक निर्देशाचा संबंध औरंगजेबाच्या जीवनांतील विशिष्ट घटनेशीं आहे. ती घटना अशी.

सन १६५७ मध्यें बिदर व कल्याणीचा किल्ला जिंकून शाहजादा औरंगजेब विजापूरकरांच्या प्रदेशांत धुमाकूळ घालीत असतां खानमहंमदाच्या नेतृत्वाखालीं त्याच्यावर जें विजापुरी सैन्य चालून गेलें

त्यांत अफझलखान एक महत्वाचा सेनापति होता. विजापूरच्या या सैन्यानें औरंगजेबाला एका अडचणीच्या प्रदेशांत असें कोंडलें कीं, एक तर मृत्यु किंवा पकडलें जाणें यांवांचून त्याला दुसरा मार्गच उरला नाहीं. त्यानें अगतिकतेनें मुख्य सेनापति खानमहंमद याची विनवणी केली, व खानमहंमदानें अभयदान देऊन औरंगजेबाला वाट दिली. अफझलखानाला हें कळतांच त्यानें संतापानें 'बडे साहेबिणी'चे कान फुंकले व मारेकरी घालून खान महंमदाचे तुकडे तुकडे करण्यांत आले. अफझलखानाच्या पराक्रमाची दिल्लीच्या साम्राज्यसत्तेला जी ओळख झाली ती या घटनेनें होय.

अफझलखानाच्या शौर्याचा धाक सर्वत्र होता. रणदुल्लाखानाच्या हाताखालीं तो कर्नाटकांतील स्वारींत असतानांची एक गोष्ट प्रसिद्ध आहे. रणदुल्लाखानाची मुख्य सेनापति म्हणून या स्वारीवर नेमणूक झाल्यानंतर विजापूरच्या सुलतानानें रणदुल्लाखानाच्या आज्ञेंत वागावें व त्याच्या सेनानिवेशांत सर्वांनीं समाविष्ट व्हावें अशी सर्व सरदारांना आज्ञापत्रें पाठविलीं. त्यांत सिद्दी अंबर या नांवाचा एक सरदार होता. त्याचें व रणदुल्लाखानाचें वांकडें असल्यामुळें तो या राजाज्ञेप्रमाणें खानाच्या शिबिरांत आलाच नाहीं. त्या सरशीं त्याला पकडून आणावें म्हणून रणदुल्लाखानानें अफझलखानाला त्याच्यावर पाठविलें. सिद्दी अंबर स्वतः चांगला पराक्रमी असून या वेळीं त्याच्याजवळ दोन सहस्र सेना होती. तरीहि अफझलखानाचें नुसतें नांव ऐकतांच त्याची इतकी गाळण उडाली कीं सिद्दी अंबरनें स्वतःच आपल्या हातापायांत बेड्यांचे अलंकार चढवून तो स्वतःच अफझलखानाच्या स्वाधीन झाला.

शौर्याबरोबर विश्वासघातकीपणा व क्रौर्य यांचाहि तो मूर्तिमंत पुतळा होता. कर्नाटकच्या युद्धांत सन १६३९ मध्यें शृंगारपूरचा राजा कस्तूरीरंग हा विजापूरच्या सुलतानाला शरण जाण्याच्या हेतूनें अफझलखानाच्या गोटांत आला असतां खानानें विश्वासघात करून त्याची भेटींत हत्या केली. त्यानें आपल्या जहागिरींतील लिंगशेटी नांवाच्या एका गृहस्थाला पाठविलेलें एक पत्र शिवचरित्र

साहित्यखंड ११ मध्यें मुद्रित झालेलें आहे. तें पाहिलें म्हणजे त्याचें क्रौर्य व सूडबुद्धि कशी विलक्षण होती याची कल्पना येते. तो लिहितो,

" जेथें अससील व जेथें जाशील तेथुनू खोदुनू काढुनू जो आसिरा देउनू ठेउनू घेईल त्यास जनोबा समेत काटुनू घाणियांत घालुनू पिलोनू! हे तुम्ही येकीन व तहकीक जाणणें."

या क्रौर्याबरोबरच त्याच्या ठिकाणीं सीमातीत अहंकारहि होता. आपल्या शिक्क्यावर त्यानें कोरविलें होते :—

गर अर्ज कुनद सिपहर अअला ।
फजल फुजला व फजल अफजल ।।
अझहर मुल्की वजाए तसबीह ।
आवाझ आयद अफजल अफजल ।।

" जर श्रेष्ठ स्वर्गाला इच्छा झाली कीं उत्तम माणसांची उत्तमता आणि अफजलखानाची उत्तमता यांची तुलना करून दाखवावी, तर प्रत्येक ठिकाणाहून जपमाळेंतील (अल्ला अल्ला या) ध्वनीच्या जागी अफझल हाच सर्वांत उत्तम पुरुष आहे असा ध्वनि उमटूं लागेल.

खान हा जन्मजात हिंदुद्वेष्टा होता. विजापुरांतील अफझलपुऱ्यांत कोरलेल्या शिलालेखांत तो स्वत:संबंधीं म्हणतो,

"कातिले मुतमर्रिदान व काफिरान । शिकंदए बुनियादे बुतान ।।"

(काफीर व बंडखोर यांचा संहार करणारा व मूर्तीचा पाया उखडून टाकणारा मी आहे.) स्वत:ला 'कुफ्रशिकन' अथवा काफिरांना तोडून टाकणारा म्हणविण्यांत त्याला गौरव वाटत असे.

## भोंसले–खान यांचें हाडवैर

सभासद म्हणतो, त्याप्रमाणें राजसभेंतील सारे उमराव गप्प बसले असतांना "शिवाजीला जीवंत चढे घोड्यानिशी पकडून आणतो" अशी गर्जना करीत खानानें जो पैजेचा विडा उचलला तो भोंसल्यांच्या वैराचा सूड उगविण्याची संधि प्राप्त झाली म्हणूनच

होय. अफझलखानाचें कर्नाटकांतील लढायांपासूनच शहाजी राजाशीं वैमनस्य उत्पन्न होऊन त्याचें पर्यवसान भोसले व खान यांच्या हाडवैरांत झालें होतें. राजे शहाजी व अफझलखान रणदुल्लाखानाच्या नेतृत्वाखालीं सहा वर्षे कर्नाटकांत एकत्र होते. त्या अवधींत शहाजीराजांचा कर्नाटकांतील पराक्रम, मुख्य सेनापतीचें त्यांच्यावर असलेलें प्रेम व हिंदू राजांना त्यांच्यामुळें मिळणारें पुष्कळसें संरक्षण यांमुळें अफझलखानाच्या मनांत त्यांच्याविषयीं अढी व विद्वेष निर्माण झाला असला पाहिजे. त्यानेंच शहाजी राजांच्या विषयीं विजापूरच्या सुलतानाच्या कानांत विष ओतल्यामुळें त्यांच्यावर अटकेचा प्रसंग आला असें म्हणतात. मुस्ताफाखान व बाजी राजे घोरपडे यांनीं शहाजींना वंचना करून पकडल्यावर अपमानास्पद स्थितींत त्यांना हातापायांत लोहशृंखलांचे साज चढवून धिंड काढून विजापूरच्या राजरस्त्यांतून अफजलखानानेंच मिरविलें होतें. शहाजीसारख्या मानी पुरुषाच्या हृदयाला तें शल्य केवढें सलत असेल व त्याहीपेक्षां पित्याच्या अपमानाची सतत टोंचणी शिवाजी महाराजांच्या हृदयालाहि कशी असेल हें वर्णन न करतांहि कळण्यासारखे आहे. शिवाजी महाराजांचे जेष्ठ बंधु संभाजी राजे कर्नाटकांत कनकगिरीच्या वेढ्यांत असतांना तेथें त्यांच्या साहाय्यासाठीं असलेल्या अफझलखानानें विश्वासघात केल्यामुळें गोळा लागून त्यांचा देहान्त झाला. यामुळें तर या वैराच्या आगींत तेल ओतल्यासारखेंच झालें. शिवाजी महाराजांनीं यापूर्वीं अफझलखानाच्या शेपटींवर पाय देऊन ती चांगलीच रगडून काढल्यामुळें तो रागाचे फूत्कार काढीत होताच. अफझलखानाच्या विजापुरांत, कर्नाटक प्रकरणामुळें वाढत असलेल्या प्रभावाला अपशकुन म्हणून त्यांनीं शके १५८० मध्यें कर्नाटकावर स्वारी केली होती, आणि ज्या जावळीचा विध्वंस करून त्यांनीं मोऱ्यांचा पूर्ण निःपात केला होता ती खानाच्या प्रत्यक्ष अधिकारक्षेत्रांत होती. खान वाईचा सुभेदार होता. त्याच्या अधिकारक्षेत्रांत असलेल्या जावळीला प्रथम मोऱ्यांची स्थापना करण्याची आगळीक शिवाजी

महाराजांनीं केली होती व त्यानंतर सुलतानाशीं राजनिष्ठ असणाऱ्या त्या घराण्याचा पूर्ण नि:पात करून जावळी आपल्या अधीन करून घेण्यांत तर खानाला त्यांनीं झुगारूनच दिलें होतें. त्यामुळें त्यानें शिवाजीच्या नि:पाताचा विडा उचलणें स्वाभाविक होतें.

अफझलखानानें हा विडा उचलतांच विजापुरी राज्यावरील हें संकट टळलेंच अशा थाटानें सुलतानानें त्याचा सत्कार केला व आपली कट्यार त्याला देऊन त्याचा विशेष बहुमान केला. अफझलखानाची प्रतिज्ञा व त्याचा सत्कार यांचें वर्णन करतांना शिवभारतांत म्हटलें आहे—

अहमद्धा भृशं बध्वा स्पर्धाकरमहर्निशम् ।
तमन्तकमिवोद्वृत्तमानयिष्ये तवान्तिकम् ॥ ३७
इत्युक्तवन्तमत्यर्थं समर्थबलदर्पितम् ।
कर्तुं प्रतिश्रुतं कर्म सद्य एव समुद्यतम् ॥ ३९
येदिलोऽफजलं तत्र प्रस्थापयितुमादृत: ।
तदा संभावयामास बहुभि: पारितोषिकै: ॥ ४०
वज्रधारामिव शितां रत्नकोशनिवेशिताम् ।
निजां पाणिस्थितां प्रादात्प्रभुस्तस्मै कृपाणिकाम् ॥ ४६
—(शिवभारत अ. १७)

"अहर्निश स्पर्धा करणाऱ्या व काळाप्रमाणें दुष्ट अशा त्या शिवाजीस पक्का बांधून प्रत्यक्ष आपणांसमीप आणीन. ह्याप्रमाणें बोलणाऱ्या, आपल्या प्रचंड शक्तीचा अतिशय गर्व वाहणाऱ्या आणि अंगीकृत कार्य करावयास तत्काळ सिद्ध झालेल्या अफझलखानास शिवाजीवर पाठविण्यास अत्यंत उत्सुक अशा आदिलशहानें त्या वेळीं पुष्कळ पारितोषिकें देऊन त्याचा गौरव केला. वज्राच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण, रत्नजडित म्यानांत ठेवलेली, हातांत असलेली आपली स्वत:ची कट्यार अल्लीशहानें त्याला दिली."

प्रस्थानापूर्वी बडे साहेबिणीनें विश्वासघात करून शिवाजी राजांचा नाश करावयाचाहि कानमंत्र त्याला दिला होता. दि. १०

डिसेंबर १६५९ ला हेन्री रेव्हिंग्टननें कंपनीला, अफझलखानाच्या वधाच्या घटनेनंतर लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे —

"Sevagy....against whome the queene this yeare sent Abdle ckaune with an army of 10,000 horse and foote, and because shee knew with that strength he was not able to resist Sevagy, shee councelled him to pretend freind-shipp with his enemy, which hee did."

"शिवाजीवर या सालीं राणीनें १०,००० घोडदळ व पायदळ देऊन 'अबदुल्लाखानाला' पाठविलें. एवढ्या सैन्यानें शिवाजीशीं टक्कर देणें अशक्य जाणून तिनें **शत्रूशीं मित्रत्वाचा बहाणा** करण्यास सांगितलें. त्याप्रमाणेंच तो वागला."

—(शिवकालीन पत्रसार संग्रह पृ. १७६)

अफझलखानाबरोबर बारा सहस्र अश्वदल, दहा सहस्र पायदळ, बाराशें उंट, पासष्ट हत्ती, असंख्य तोफा व रणसाहित्य होतें. सुलतानानें त्याला या स्वारीसाठीं अपार द्रव्य दिलें व त्याच्या समवेत आपले धुरंधर सेनानी दिले. शिवभारतकार खानाबरोबर असलेल्या सेनानींची पुढीलप्रमाणें नांवें देतात.

अम्बरः शम्बरसमः प्रतापी याकुतः पुनः ।
महामानी मुसेखानः पठानो हसनोऽपि च ॥ ५१
रणदूलहसूनुश्च रणदुलहसंज्ञकः ।
तथैवांकुशखानोऽपि निरंकुशगजक्रमः ॥ ५२
बर्बरः खेलकर्णस्य प्राप्तो यः क्रीतपुत्रताम् ।
स हिलालो महाबाहुः प्रत्यर्थिद्रुमकुंजरः ॥ ५३
इत्येतेऽन्ये च यवनाः ससैन्याः ससुहृद्गणाः ।
सद्यः स्वामिसमादिष्टाः तं सेनापतिमन्वयुः ॥ ५४
जितानेकप्रतिभटाः प्रसभं समरोद्भटाः ।
घोरकर्मकृतो घोरफटा अपि तमन्वयुः ॥ ५५
पांडरो नायकश्चैव खराटोऽपि च नायकः ।
कल्याणयादवाश्चापि नैकसैनिकनायकः ॥ ५६

समुद्यद्युद्धसंरंभो मंबो भृशबलस्तथा ।
विश्वविश्रुतकर्माणो घांटिकाः कांटिका अपि ॥ ५७
इत्येतेऽन्ये च राजानः सामंताश्च सहस्रशः ।
चतुरंगचमूयुक्ताः तं सेनापतिमन्वयुः ॥ ५८

—(शिवभारत अ. १७);

"शंबर दैत्यासारखा पराक्रमी अंबर, आणि प्रतापवान् याकूत, महामानी मुसेखान आणि हसनखान पठाण, रणदुल्लाखानाचा रणदुल्ला नांवाचा पुत्र, आणि निरंकुश हत्तीप्रमाणें स्वैरगति अंकुश-खान, खेलकर्णाचा विकत घेतलेला पुत्र (दास) वर्बर आणि तो शत्रुरूपी वृक्षांना हत्तीप्रमाणें असलेला महाबाहू हिलाल हे आणि सैन्यानें व मित्रसमुदायानें युक्त असे दुसरे यवन तत्काळ स्वामीच्या आज्ञेनें त्या सेनापतीच्या मागून गेले. ज्यांनीं बलानें अनेक शत्रु-वीर जिकले आहेत असे युद्धनिपुण घोरकर्मे घोरपडे, पांढरे नाईक, खराटे नाईक, कल्याणजी जाधव नाईक, मंबाजी भोसले, घाटगे, काटे आणि अनेक राजे सरदार अफझलखानाच्या सैन्यांत होते." यांतील मंबाजी भोसले हा राजे शहाजी यांचा सख्खा चुलता होता. पण त्यानें स्वार्थासाठीं आपल्या धर्मरक्षक पुतण्यावरच खड्ग उपसलें होतें.

## अपशकुन व दुष्कर्म

अफझलखान एवढ्या प्रचंड सिद्धतेनिशीं व एवढ्या विशाल सैन्यसागरानिशीं निघाला तों त्यानें विजापुरापासून दोन कोसांवर प्रस्थान ठेवलें. निघतांनाच त्याला नाना प्रकारचे अपशकुन झाले. त्याचा फत्ते लष्कर नांवाचा हत्ती ऐन प्रयाणाच्या वेळींच मेला. त्या घटनेचा त्याच्या मनावर विपरीत परिणाम होऊं नये म्हणून सुलतानानें आपला बिनीचा हत्ती त्याला भेट म्हणून पाठविला. अज्ञानदास शाहीर आपल्या पोवाड्यांत म्हणतो —

खान कटबंद केला । कोटाबाहेर डेरा दिला ॥
मोठा अपशकुन जाहला । फत्या लसकरा हत्ती मेला ॥

खबर गेली बाच्छायाला । बिनीचा हत्ती पाठविला ॥
बारा हजार घोडा । अबदुलखानालागी दिला ॥

खान अपशकुन मानण्याइतका कातरहृदयाचा नसला तरी गांठ कोणाशीं आहे हें ओळखून त्यानें कच खाल्ली होतीच. मृत्यु समोर दिसतो असें म्हणतात तशीच त्याची अवस्था झाली. निघतांना, आपल्याला मृत्यु आला तर, मुसलमानी प्रथेप्रमाणें आपल्या बायकांनीं दुसरे विवाह करू नयेत म्हणून खानानें आपल्या त्रेसष्ट बायकांचा शिरच्छेद केला असें म्हणतात. ॲबे कॅरे नांवाचा फ्रेंच प्रवासी सन १६७३ मध्यें खानाचें अफझलपूरचें निवासस्थान पहावयास गेला होता. तो आपल्या प्रवासवृत्तांत लिहितो —

When Abdul khan was about to depart and when he had to quit his women, his jealousy flamed up with such violence that he could not master it any more, and it inspired him with the darkest design of which a man is capable He shut himself up for eight days in his seraglio, passing all the time in festivity and pleasure. The end was tragic, because on the last day, to save all the disquiet which love offers, he caused to be stabbed before him the 200 unfortunate women, who did not expect in the least to receive such a treatment.

"ज्या वेळीं अफझलखानाची निघण्याची सारी सिद्धता झाली, आणि आपल्या स्त्रियांचा निरोप घेण्याची वेळ आली तेव्हां मत्सराग्नीनें त्याच्या मनांत इतका विलक्षण पेट घेतला कीं, तो त्याला आवरतां येईना. त्या वेडाच्या उन्मादांत त्याला असें कृष्णकृत्य करण्याची प्रेरणा झाली कीं, जें केवळ मत्सरी मनुष्य करूं शकतो. त्यानें आठ दिवस स्वतःला अंतःपुरांत कोंडून घेतलें आणि हा सारा वेळ त्यानें चैन व उपभोग यांत घालविला. पण त्याचा शेवट मात्र अत्यंत कारुण्यपूर्ण व भयानक होता. शेवटच्या दिवशीं त्यानें

आपल्या डोळ्यांसमोर, त्याच्या सुखाचें साधन असलेल्या या दोनशे दुर्दैवी स्त्रियांना ठार मारविलें. त्या बिचाऱ्यांना आपल्यावर हा प्रसंग येईल अशी स्वप्नांतहि कल्पना नसेल." यावर भाष्य करतांना सर जदुनाथ सरकार लिहितात, "अफझलखानाविषयीं अनेक दंतकथा प्रचलित आहेत. अर्थातच त्या त्याच्या मृत्यूनंतर निघालेल्या असाव्यात. खुद्द त्याच्या अफझलपूर गांवींसुद्धां पुढील विलक्षण दंतकथा प्रसिद्ध आहे. तो जेव्हां स्वारीवर निघाला तेव्हांच त्याला आपलें भविष्य दिसूं लागलें कीं या स्वारींतून आपण सुखरूप परत येणार नाहीं; म्हणून त्यानें निघण्यापूर्वी आपल्या जनानखान्यांतील त्रेसष्ट बिब्यांना ठार मारून टाकिलें व सारख्या आकारांचीं त्यांचीं थडगीं बांधिलीं. हीं थडगीं अद्यापि अफझलपूर या गांवीं दिसतात. या कथेंत कितपत तथ्य असेल हें सांगणें दुष्कर आहे. तथापि थडगीं तेथें आहेत येवढें मात्र खरें आहे. हल्लीं ही जागा अगदीं ओसाड पडली आहे. जेथें त्याचा राजवाडा पूर्वीं होता तेथें आतां दाट जंगल उगवलेलें असून माणसांनीं गजबजलेली ती जागा आतां अगदीं निर्मनुष्य अशी झालेली आहे. इमारतीचे अवशेष मात्र तेथें आजहि दिसतात. स्वारींत अपयश येऊन आपण प्राणास मुकलों तर या स्त्रियांनीं परपुरुषांशीं रत होऊं नये या विचारानें अफझलखानानें त्यांचा शिरच्छेद आपल्या समक्ष करविला होता असें हा फ्रेंच प्रवासी लिहितो. मानवी असूया काय न करील हें सांगणें कठीण आहे."
—(शिवाजी व शिवकाल पृष्ठ ५२)

तात्पर्य, राक्षसी शरीरासारखें राक्षसी अंतःकरणहि अफझलखानाला लाभलें होतें येवढें खरें !

शिवाजी महाराजांचा पूर्ण निःपात व्हावा म्हणूनच ही स्वारी असल्यामुळें खानाच्या मागोमाग त्याला येऊन मिळण्यासाठीं झाडून साऱ्या देशमुख देशपांड्यांना विजापुराहून दमदाटीच्या उग्र राजाज्ञा पाठविण्यांत आल्या. कोणत्याहि कारणास्तव शिवाजी राजांशीं संधि न करतां त्यांचा पूर्ण निःपात करणें हाच विजापुरी सत्तेचा कसा

हेतु होता याची या राजाज्ञेवरून कल्पना येण्यासारखी असल्यामुळें आम्ही एक राजपत्रकच येथें देतों. कान्होजी जेधे देशमुख यांना आदिलशहाची आलेली पुढील राजाज्ञा पहा —

" शिवाजीनें अविचारानें व अज्ञानानें निजामशाही कोंकणांतील मुसलमानांना त्रास देऊन, लूट करून पातशाही मुलुखांतील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. यास्तव त्याचे पराभवार्थ अफझलखान महमदशाही यांस तिकडील सुभेदारी देऊन नेमून पाठविले आहेत. तरी खान याचे रजामंदीत व ताबेदारींत राहून . . . . **शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा करावा.** शिवाजीचे निसबतीचे लोकांस आश्रय न देतां ठार मारून या दौलतीचे कल्याण इच्छिणें. खानाच्या सांगण्यावरून . . . . . तुमची योग्यता वाढविली जाईल. त्याचे सांगण्याप्रमाणें करावें. तसें न केल्यास परिणाम चांगला होणार नाहीं. हें जाणोन या सरकारी आज्ञेप्रमाणें चालावें. हुजूरची परवानगी झाली असे."

—(शिवकालीन पत्रसार संग्रह खंड १ पृष्ठ १७१)

या दमदाटीच्या राजपत्रकामुळें व खानाविषयींच्या अचाट कल्पनांमुळें पुष्कळ देशमुखांचा धीर सुटला व कांहीं वतनाच्या स्वार्थासाठीं खानाच्या सेनानिवेशांत उपस्थितहि झाले. खंडोजी खोपडे, केदारजी खोपडे, सुलतानजी जगदाळे वगैरे कित्येक देशमुख शिवाजी महाराजांचा पक्ष सोडून खानाला जाऊन मिळाले. सभासद म्हणतो, "पातशहा यांचे फरमान मावळच्या देशमुखांस आलें कीं, अफझलखानास सामील होणें. त्यास केदारजी खोपडे अफजलखानाजवळ होते. खंडोजी बिन धर्मोजी खोपडे देशमुख हे अफजलखानाकडे गेले. खंडोजी खोपड्याची अफझलखानानें आपल्या बिनीवर नेमणूक केली.

खंडोजी खोपडे यांच्यासारखे स्वार्थी स्वराज्यद्रोही मात्र थोडे निघाले. कान्होजी जेध्यांनीं बादशाही आज्ञेच्या भंगाचे परिणाम सोसावयाचें ठरवून वतनावर पाणी सोडलें व महाराजांशीं एकनिष्ठ राहिले. इतकेंच नव्हें तर कान्होजी जेधे यांनीं आपल्या वजनानें

मावळखोऱ्यांतील देशमुखांची एकजूट करून शिवछत्रपतींच्या मागें बळकट पार्श्वभूमि उत्पन्न करण्याचें अत्यंत महत्त्वाचें कार्य या बिकट प्रसंगीं केलें. खान विजापुराहून निघाला त्या वेळीं शिवछत्रपति पुण्यास होते असें शिवभारतांत म्हटलें आहे. अन्य उल्लेखांप्रमाणें ते या वेळीं राजगडापलीकडे शिवापुरास होते.

## धर्मावरील घणाघात

वाढत्या सैन्यसागरासह अफजलखान वेगानें शिवाजीमहाराजांना गांठण्यासाठीं पुण्याकडे निघाला. येतांना डोंगरांतून शिवाजीला मोकळ्या जागेंत आणलें तर त्याचा निःपात करणें सुलभ होईल असें वाटून त्या दिशेनें त्याच्या रणनीतीचीं पावलें पडूं लागलीं. शिवाजीला चीड आणणारीं, त्याच्या धर्मावर व श्रद्धाकेंद्रावर आघात करण्यासारखीं कृत्यें केलीं तर तो चिडून मोकळ्या जागेंत चालून येईल व त्याचा सहज निःपात करतां येईल अशा कल्पनेनें खानानें येतां येतां वाटेंत तुळजापुरावर आक्रमण केलें. सभासद म्हणतो, "तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन औरस चौरस लष्कर उतरलें आणि पुढें तुळजापुरास आले. तेथें येऊन मुक्काम केला. श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून जातियात घालून, भरडून पीठ केलें. पुढें लष्कर कूच करून श्रीपंढरीस आले. भीमातीरीं आलें." तुळजापूरच्या मंदिरांत त्यानें गाय मारून इतर मंदिरांचाहि विध्वंस केला. शाहीर अज्ञानदास म्हणतो --

तेथुनि कुच केले कटकाला। अबदुल फौजेने चालिला॥
मजलीवर मजल। अबदुल तुळजापुरा आला॥
फोडिली तुळजा। वरती मसुदच बांधिली॥
मसुद बांधुनी। पुडे गाय जब केली॥

अबदुलखान फोडी देवीला। 'कांहीं एक अजमत दाव मला।'

पंढरपूरलाहि त्यानें असेच अत्याचार केले. "पंढरपूर, तुळापूर, कोल्हापूर, रवलनाथ येथील मूर्ति कांडिली. विजापुरांत आलिपातशाय असतां अफझलखान वजिरानें हें केलें."

—(शिवकालीन पत्रसारसंग्रह पृ. १७८)

शिवछत्रपतींच्या कानांवर या अत्याचारांच्या वार्ता येत होत्या. पण घाईच्या प्रतिशोधाची ही वेळ नव्हे हें ओळखून ते स्वस्थपणें आपली सिद्धता करीत होते. हा डाव सिद्धीस गेला नाहीं म्हणून खानानें महाराजांच्या मर्मावर आणखी एक प्रहार केला. पंढरपुराहून खान मलवडीस गेला. तेथून बजाजी नाईक निंबाळकरांचें फलटण जवळच होतें. वस्तुत: बजाजी निंबाळकर हे विजापूरच्या सत्तेचे एकनिष्ठ सेवक होते. फत्तेखानाच्या स्वारीच्या वेळीं ते विजापूरकरांकडून शिवाजी महाराजांवर चालूनहि आलेले होते. पण नात्यानें ते शिवाजी महाराजांचे मेव्हणे होते. त्यामुळें त्यांना पकडून हालहाल करून ठार मारल्यास चिडून शिवाजी आपल्यावर चाल करून येईल अशी अचाट कल्पना त्याच्या राक्षसी मनांत आली. त्यानें तत्काळ बजाजी निंबाळकरांना पकडून आणलें व त्यांच्या गळ्यांत साखळदंड अडकावून त्यांना हत्तीच्या पायाशीं बांधून ठार करावयाची आज्ञा केली. शिवाजी महाराजांनीं खानाच्याच सैन्यांतील नाइकजी राजे पांढरे यांना खानावर आपलें वजन आणून बजाजीला सोडविण्याचा प्रयत्न करण्याविषयीं गुप्तपणें विनंती केली. नाइकजी राजे पांढरे यांनीं अफझलखानाच्या घशांत बजाजीकडून ६०,००० होनांचा घांस ओतून कशीबशी बजाजीची सुटका करविली. बिचाऱ्या बजाजीला फलटणची मत्ता गहाण टाकून आपली सुटका करवावी लागली. "अफझलखान यानें शिवाजीचे मसलतीवर येतांना बजाजी नायकास दस्त केलें व हत्तीच्या पायाखालीं मारणार तों नाइकजी राजे पांढरे यांच्या मध्यस्थीनें ६०००० होन घेऊन मोकळें केलें."

—(शिवकालीन पत्रसारसंग्रह, खं. १, पृ. १७८)

याप्रमाणें शिवाजी राजांना समरांगणावर खेंचण्याच्या या अघोरी उपायांचा उपयोग होत नाहीं असें पाहून खानानें सरळ वाईकडे प्रयाण केलें. शिवछत्रपति पुण्याच्या परिसरांत असतां अफझलखान सरळ तेथें वळण्याऐवजीं वाईकडे कां गेला असेल? शिवभारतकार म्हणतात.

"मनीषिण ऊचुः --

उपेक्ष्य स खलः कस्मात् शिवं पुण्यपुरस्थितम्।
वैराटमेव विषयं ययौ सेनासमन्वितः।। १

कवीन्द्र उवाच --

साहंकारः शिव जेतुं सकालयवनद्युतिः।
यवनोऽफजलस्तूर्णं प्रस्थितः स्वामिशासनात्।। २
वैराटमेव विषयं प्राविशद्येन हेतुना।
तमहं संप्रवक्ष्यामि शृणुध्वं भो मनीषिणः।। ३
तदा प्रतापवर्मा यश्चंद्रराजस्य बांधवः।
पलायितः शिवभयाद्येदिलं प्रत्यपद्यत।। ८
चंद्रराजपदाकांक्षी मंत्रविन्मंत्रिभिर्युतम्।
येदिलं प्रीणयामास चिरं स परिचर्यया।। ९
तं देशं चंद्रराजस्य महावनसमाश्रयम्।
तस्मादाच्छिद्य नृपतेर्दास्यामि भवते ध्रुवम्।। १०
येदिलस्येति वचसा तदा सोऽपहृतव्यथः।
चकाराफजलस्याभिक्रमकर्मसहायताम्।। ११
ततोऽभिमानिना तेन चंद्रराजसनाभिना।
भेदं निवेद्याफजलो वैराटं समनीयत।। १२
जयवल्ली वशा यस्य वैराटं तस्य सर्वथा।
तथा सह्याद्रिरखिलः सांतरीपश्च सागरः।। १३
इति मत्वा स यवनस्तामेवादातुमादितः।
समुद्यतो महाबाहुर्द्रुतं वैराटमाययौ।। १४

"पंडित म्हणाले, पुणें शहरीं राहणाऱ्या शिवाजीवर चाल करण्याचें सोडून तो दुष्ट आपल्या सैन्यासह वाई प्रांतींच कां गेला? कवीन्द्र म्हणाले, तो गर्विष्ठ व कालयवनाप्रमाणें प्रखर अफझलखान शिवाजीला जिकण्याकरितां स्वामीच्या आज्ञेवरून सत्वर निघून वाई प्रांतींच कोणत्या हेतूनें शिरला तें मी सांगतों. चंद्रराव मोऱ्याचा एक नातलग प्रतापराव मोरे शिवाजीच्या भीतीनें आदिलशहाकडे पळून गेला. (याचा उल्लेख मागें केलाच आहे) चंद्रराव

मोऱ्यांची गादी स्वतःला मिळावी अशी इच्छा करणाऱ्या त्या कारस्थानी प्रतापरावानें मंत्र्यांनीं परिवेष्टित अशा आदिलशहाची पुष्कळ काळ सेवा करून त्याला संतुष्ट केलें. अरण्यमय 'प्रदेशांत असलेलें ते चंद्ररावाचें राज्य शिवाजीपासून हिसकावून घेऊन तुला निश्चित देईन' असें आदिलशहानें म्हटल्यावर त्याची काळजी नाहींशी होऊन त्यानें अफझलखानास स्वारी करण्याच्या कामीं साहाय्य केलें. मग चंद्ररावाच्या त्या अभिमानी बंधूनें भेद सांगून अफझलखानास वाईस आणलें. ज्याच्या अधीन जावळी आहे त्याच्या अधीन वाई प्रांत पूर्णपणें आहे, त्याचप्रमाणें सह्याद्रि व समुद्रकिनाराहि आहे, असा विचार करून तो महाबाहू यवन प्रथम तोच घेण्याच्या सिद्धतेनें शीघ्र वाईस आला."

तात्पर्य, जावळी हें स्वराज्याचें मर्मस्थान आहे हें ओळखून तें घेण्यासाठीं खान वाईकडे वळला. अफझलखानाच्या क्रौर्याच्या व पराक्रमाच्या वार्तांनीं सभोंवारचें सारें वातावरण तप्त झालें होतें अशा स्थितींत तो वाई प्रांतांत येऊन धडकल्यावर पुढचें धोरण तत्काळ ठरविणें शिवाजी महाराजांना आवश्यक वाटलें. त्यांनीं राजगडावर जमलेल्या आपल्या सर्व मुत्सद्द्यांना काय करावें म्हणून विचारलें. त्या वेळीं महाराजांना त्यांच्या सर्व, अफझलखानाच्या सामर्थ्याची धास्ती घेतलेल्या, हितचिंतकांनीं सांगितलें कीं, "झुंज देऊं नये, सल्ला करावी." पण अफझलखान संधीसाठीं अथवा केवळ कांहीं किल्ल्यांसाठीं आलेला नसून आपला व आपल्या स्वराज्याचा पूर्ण निःपात करावयासाठीं आलेला आहे हें शिवछत्रपति ओळखून होते. त्यांशीं आपला निर्णय सर्वांना सांगितला. खानानें संभाजी राजियास जसें मारिलें तसें तो आम्हास मारील! म्हणोन सला करणें नाहीं. युद्ध करोन मारितां मारितां जें होईल तें करूं." (सभासद) त्यांवर हितचिंतकांनीं म्हटलें कीं, "हें कठीण कर्म! सिद्धीस गेलें म्हणजे बरें. नाहींतर कसें होईल." (सभासद) त्यावर महाराज म्हणाले, "खानाशीं सला केलियानें प्राणनाश होईल. युद्ध केलियानें जय जाहलियास उत्तम, प्राण गेलियानें कीर्ति आहे! त्याकरितां

खानाशीं युद्धच करावें." पण युद्ध करावयाचें तें सरळ खानावर चालून जाऊन करणें शक्य नव्हतें. तसें शिवाजी राजांनीं करावें म्हणून तर खान एकामागून एक धर्मविध्वंसाचीं कृत्यें करीत येत होता. वृकयुद्धाच्या पद्धतीविना दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीचा अवलंब करून या वेळीं निभण्यासारखें नव्हतें. "याशीं कोणते प्रकारें लढाई द्यावी, विचार कसा करावा, कावेसींत कसें आणावें, मोंगली फौज, प्रथमच समरांगणी गांठ घालून लढाई दिली तरी माणूस फार खराब होईल. यास्तव आपले लोक कायम राहून त्याचा नाश होय ऐसा हुनर जाला पाहिजे. आम्ही राज्य सोडविलें, शहरें मारिलीं, स्वारी-शिकारी करितो तें निराळें. हे पठाण जात हट्टी. उभे राहून, आडून माणूस खराब करितील. यास्तव हुनरच करून जेर करावा हा विचार चांगला." —(स. प्र. शि. पृ. १२३)

अफझलखानाचा वाईला येण्याचा हेतु जावळी जिंकून आपल्याला पेचांत धरण्याचा आहे हें महाराजांनीं तत्काळ ओळखलें व स्वतः जावळीला प्रतापगडावर जावें असा निर्णय करून तेथेंच सर्व सैन्यानें सिद्ध होऊन एकत्र यावें अशी आज्ञा दिली. "राजानें आपली कुल फौज लष्कर मुस्तेद (तयार) करावें आणि जावळीस युद्ध करावें, आपण प्रतापगडावर जावें हा विचार केला."—(सभासद)

शिवछत्रपतींचा हा निर्णय किती दूरदर्शीपणाचा होता याचें विशदीकरण करतांना सर जदुनाथ सरकार लिहितात, "स्वराज्य-स्थापनेच्या उपक्रमांत हा प्रसंग मोठा आणीबाणीचा असून जगावें कीं मरावें असा वैकल्पिक प्रश्न शिवाजीपुढें होता. या वेळीं अफझलखानाच्या आहारीं जाऊन त्याला शरण गेल्यास आजपर्यंत माजविलेल्या बंडाळीबद्दल विजापूरच्या बादशहाकडून कदाचित् माफी मिळेल. परंतु त्याबरोबरच भावी स्वातंत्र्याचे मनोरथ व थोरपणाच्या आशा, यांवर कायमचें पाणी सोडून बाकीचें सर्व आयुष्य विजापूरकरांच्या पदरचा एक सरदार या नात्यानें काढावें लागणार हें निश्चित होतें. बरें, या वेळीं खानाशीं समरांगणावर

दोन हात करणें म्हणजे विजापूरची सत्ता आपण उघडपणें झुगारून दिली असेंच कृतीनें जगास दाखविणें होतें; व अशा रीतीनें विजापूरकरांशीं कायमचें वैर संपादिल्यावर त्यांची व शिवाजीची गोडी राहणें शक्यच नव्हतें. याप्रमाणें उघडपणें विजापूरकरांशीं शत्रुत्व संपादिल्यावर मोंगल, विजापूरकर व इतरहि अशाच अनेक शत्रूंशीं जन्मभर झगडून स्वराज्य व स्वातंत्र्य यांचें संरक्षण करण्यासाठीं स्वतः सिद्ध असणें हें क्रमप्राप्तच होतें. शिवाय या कामांत शिवाजीला कोणाची मदतहि मिळणें शक्य नव्हतें. त्यानें एकट्याच्या हिंमतीवर या सगळ्या संकटांना तोंड देण्याची तयारी करणें अवश्य होतें. शिवाजीच्या मंत्रिमंडळानें या सगळ्या संकटांचा विचार करून अफझलखानाशीं तह करण्याची सल्ला दिली. स्वतः शिवाजीलासुद्धां या संकटाची भीषणता मोठी भीतिप्रद भासली तथापि तो स्वतः लोकोत्तर पुरुष असल्यामुळें अफझलखानाला शरण जाण्याची कल्पना त्याला अगदींच नामर्दपणाची वाटली."

—(शिवाजी व शिवकाल पृ. ४४)

शिवाजी महाराजांना संकटप्रसंगीं देवीचा साक्षात्कार होऊन तिच्या आज्ञेनुसार ते वागत हें शिवचरित्रात्मक प्राचीन साहित्यांत वर्णन आढळतें. या प्रसंगींहि असाच साक्षात्कार झाला, व त्यामुळें अफझलखानाच्या भयानें किंचित् कंपित झालेले शिवछत्रपतींचे मंत्री व सेनाधिकारी या दैवी पाठबळानें अधिकच उत्साहित बनले असें वर्णन आढळतें. सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत म्हटलें आहे,

"देवीने म्हटले, 'अरे मुला, तूं चिंता कां करतोस? तुजला वर माझा आहे. हें अरिष्ट दूर करीन. तुजला ही शिकारच साधून देतें. चिंता न करणें.' याप्रमाणें महाराज सावध होऊन देवीचें सांगणें ऐकून फारच हर्ष पावून बोलते जाले, जे अफजलाचें काम आपण करितो, चिंता नाहीं. श्रीनींहि आश्वासन दिल्हे; तेव्हां फत्ते होती. आमचे मनाचा उल्हास व शुभचिन्ह यश देण्याविषयीं दिसतात. व तुम्ही सर्व कारभारी व शूर (सरदार) यांचा उत्साह दिसतो. असें प्रकारें बोलल्यावरि सर्वांची सल्ला हेंच पडली, जें

महाराजांचे मनांत करणें तें आम्हांसहि अवघड वाटत नाहीं. अफजलाचा मजकूर काय आहे? महाराज समरांगणीं युद्ध करा म्हणतील तरी करूं. कावेसींत आणून, घेरून तोडणी लावून जेर करा म्हटलें तरी करूं." —(स. प्र. शि. च. पृ. १२३)

याप्रमाणें युद्धाचा निश्चय ठरल्यावर मातोश्री जिजाबाईसाहेब व त्या वेळीं आजारी असलेल्या आपल्या पत्नी सईबाई यांना राजगडावरच ठेवून स्वतः प्रतापगडीं जाऊन राहण्याचा व जावळी ही युद्धाची भूमि करण्याचा त्यांनीं निश्चय केला. या युद्धांत क्वचित् प्राणनाशाचा प्रसंग ओढवेल हें त्यांनीं गृहीतच धरलेलें होतें. तसें झाल्यास काय करावें याच्या स्पष्ट सूचना त्यांनीं आपल्या मुत्सद्द्यांना दिल्या. सभासद म्हणतो, "जर अफजलखान मारून जय जाहला तर माझा मीच आहे. एकादें समयीं युद्धीं प्राणनाश जहाला तर संभाजी राजे आहेत. त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेंत तुम्हीं राहणें," मातेचा आशीर्वाद घेऊन महाराजांनीं प्रथम जावळी व नंतर प्रतापगडावर प्रयाण केलें व युद्धाची कडेकोट सिद्धता चालविली. मुख्य सेनापति नेताजी पालकर याला ससैन्य घाटमाथ्यावर येऊन 'मार्ग धरणें' म्हणून आज्ञा केली. त्याच्या साहाय्यार्थ रघुनाथ बल्लाळ सबनीस यांना दिलें. चुलत भाऊ बाबाजीराजे भोंसले, शामराजपंत रांझेकर, त्र्यंबक भास्कर, मोरोपंत पिंगळे या अधिकाऱ्यांना ससैन्य प्रतापगडावर येण्याच्या आज्ञा केल्या.

शिवाजी महाराज जावळींत येऊन प्रतापगडावर स्थिरावल्यावर सहज जावळी घेण्याचा विचार सोडून खानाला वाईला अडकून पडावें लागलें. पावसाळा सुरू झाल्यामुळें त्याला एकदम स्वारी करणें शक्य नव्हतें व येथूनच शिवछत्रपति व अफझलखान यांच्यांतील मंत्रयुद्धाचा प्रारंभ झाला. या मंत्रयुद्धाकडे आपण पुढील प्रकरणांत वळूं.

✦ ✦ ✦

प्रकरण तेरावें

# अफझलखानाचा वध

ब्रिटिश पायदळाच्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकांत स्ट्रॅटेजी व टॅक्टिक्स या शब्दांची व्याख्या पुढीलप्रमाणें केलेली आहे.

" Strategy is the art of bringing the enemy to battle, while tactics are the methods by which a commander endeavours to overreach the enemy when the battle is joined." (शत्रूला प्रत्यक्ष युद्धासाठीं रणक्षेत्रावर खेचून आणण्याची जी कला तिचें नांव स्ट्रॅटेजी ; व प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यावर शत्रूवर मात करण्यासाठीं सेनापति जे डावपेच टाकतो त्याला टॅक्टिक्स असें म्हणतात.) अफझलखानानें शिवाजी महाराजांना अपेक्षित रणक्षेत्रावर खेचण्याचे सर्व प्रयत्न केले, पण ते फसले. शेवटीं वाईला स्थिरावल्यावर त्याचा धीर सुटल्यासारखा झाला. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें जावळीच्या खोऱ्यांत पाऊल ठेवणें आत्मघाताचें आहे हें त्याला स्पष्ट दिसत होतें. पावसाळा संपल्यावरहि त्या अरण्यांत पाऊल ठेवणें सोपें नव्हतें. त्यानें कल्याणजी जाधव, सिद्दी हिलाल, सिद्दी सैफखान या आपल्या सरदारांना सुपें, शिरवळचें ठाणें अशा कांहीं जागांवर पाठविलें. पण प्रदेश जिंकणें हें त्याचें उद्दिष्ट नसून शिवाजीला पकडून अथवा ठार मारून स्वराज्याचा निःपात करणें हें त्याचें उद्दिष्ट होतें. व त्यासाठीं शिवाजीराजांना मोकळ्या रणक्षेत्रावर आणण्याचा खटपटींत तो होता.

अशा स्थितींत भाद्रपद वद्य चतुर्थीला महाराजांच्या गृहजीवनावर मोठा आघात झाला. त्यांच्या राजगडावर आजारी असलेल्या थोरल्या राणी सईबाईसाहेब कालवश झाल्या. (दि. ५ सप्टेंबर १६५९). पण तो आघात गिळून समोरच्या राष्ट्रसंकटाला तोंड देणें त्यांना भागच होतें.

कोणत्याहि उपायानें शिवाजीला सरळ रणक्षेत्रावर आणण्याची शक्यता नाहीं असें पाहून खानानें त्यांच्यावर संधीच्या वाटाघाटीचें मोहनास्त्र टाकावयाचें ठरविलें. त्याचा संयम सुटला. एकहि महत्त्वाचें युद्ध किंवा जय अथवा पराजय झाला नसतांना शिवरायाचा निःपात करावयास निघालेल्या खानानें संधीसाठीं त्यांच्याकडे आपला वकील पाठवावयाचा निर्णय घेतला. त्याच्यासाठीं आतां दोनच मार्ग होते. एक तर जावळीवर स्वारी करणें किंवा महाराजांना भेटीला बोलावून सांपळ्यांत पकडणें. त्याला शिवाजीराजांचा पराभव अथवा प्रदेश नको होता. जिवंत शिवाजी पकडणें अथवा त्याला ठार मारणें हाच त्याचा हेतु होता. म्हणून "राजियाकडे हेजीबास पाठवून, सल्ला करून, पातेजून जिवंत हातीं धरावा" या निश्चयानें त्यानें कृष्णाजी भास्कर कुळकर्णी या आपल्या वकिलाला महाराजांकडे पाठविलें.

## कृष्णाजी भास्कर

कृष्णाजी भास्करांबरोबर भेटीला येण्याचा तोंडी निरोप व स्वतःचें पत्र अफझलखानानें दिलें. तोंडी निरोपांत औदार्याचा आव होता; तर पत्रांत धाक उत्पन्न व्हावा असें लिहिलें होतें. कृष्णाजी भास्कराच्या येण्याची वार्ता महाराजांना त्यांच्या हेरांकरवीं आधींच समजली होती. शिवछत्रपतींचें हेरखातें किती उत्कृष्ट होतें यासंबंधीं समकालीन पाश्चात्य लेखकांचे अभिप्राय पाहण्यासारखे आहेत. पुढील दोन अभिप्राय पहा.

This chief also paid his spies liberally, who have given him considerable facilities for his conquests by the sure information they have supplied him.

—(Foreign Biographies of Shivaji, P. 316)

"हा राजा (शिवाजी) आपल्या हेरांना भरपूर वेतन देत असे, व त्यामुळें हे हेर शिवाजीस नक्की बातमी देत असत व त्याचे योगानें शिवाजीस यश प्राप्त होण्यास सुलभ जात असे."

Sevaji knew how to make new friends with money, and like his wealth his friends were innumerable, and they sent him information every hour.

—(Foreign Biographies of Shivaji, P. 95)

"द्रव्य देऊन मित्र कसे मिळवावे हें शिवाजी उत्तम प्रकारें जाणत होता. त्याचेपाशीं जसा द्रव्याचा मोठा सांठा होता त्याप्रमाणें त्याचे मित्रहि अनेक होते, आणि हे त्याचे मित्र त्याला प्रत्येक तासातासास वार्ता पुरवीत असत."

शिवदिग्विजयांतील वर्णनाप्रमाणें अफझलखान वाईला येऊन स्थिरावल्यापासूनच त्याच्या शिबिराभोंवतीं शिवाजी महाराजांच्या हेरांचें कडें पडलेलें होतें. त्यांचा पांच सहस्र मावळ्यांच्या सेनेवरील एक अधिकारी विश्वासराव नानाजी प्रभू मुसेखोरेकर याला त्यांनीं ही हेराची कामगिरी दिलेली होती. तो प्रतिदिनीं रात्रीं फकिराचा वेश घेऊन खानाच्या शिबिरांत भिक्षा मागावयास जाई व अफझलखानाच्या गोटांतील वार्ता महाराजांना कळवी. त्याच्या द्वारेंच कृष्णाजी भास्कराच्या आगमनाची वार्ता महाराजांना कळली. त्याचें स्वागत करून त्यांनीं त्याला प्रसन्न केलें. त्यानें महाराजांना खानाचा तोंडी निरोप सांगितला व पत्रहि दिलें. तोंडी संदेश असा होता कीं, "तुमचे बाप महाराज त्यांचा व आमचा भाईचारांत पुरातन स्नेह चालला आहे. त्याजमुळें तुम्ही कांहीं आपणांस इतर नाहीं. तुम्ही येऊन आपल्यास भेटणें. आपण पातशहाजवळून तुम्हांस तळ कोंकणचे राज्य व जहागिरी देववितो. गडकोट किल्ले घेतले ते करार करवितो. वरकडहि नांवाजितो, जितके तुमचे मनांत असेल तेणेप्रमाणें सरंजाम देववितो. पातशहासी भेट घेणें तरी घ्या. नाही तरी मुल्हाजमत माफ करवितो." अफझलखानाचें पत्र ठेवून घेऊन महाराजांनीं, "जसे तीर्थरूप महाराजसाहेब, तसेच खानसाहेबहि आम्हांस वडीलच आहेत. त्यांची भेट अलबत्ता घेऊं" असें सांगून वकिलाला ठेवून घेतलें व

अफझलखानाच्या पत्राचा आपल्या विचक्षण हितचिंतकांसमवेत ते विचार करूं लागले. शिवभारतकारांनीं या पत्रांतील आशय पुढील-प्रमाणें सांगितलेला आहे.

विदधाति यदौद्धत्यं भवानद्य पदे पदे ।
तद्येदिलस्य हृदये भजते शल्यरूपताम् ॥ ४७
गते निजामे विलयं गमितः स्वीयतां स्वयम् ।
येदिलेन वितीर्णोयस्ताम्रेभ्यः संधिकाम्यया ॥ ४८
स एव विषयस्तेषां गिरिदुर्गसमाश्रयः ।
गृहीतस्संगृहीतश्च शाहराजात्मज त्वया ॥ ४९
भवता सततं लाभवता तत्र पदे पदे ।
गृहीतविषयः क्रुद्धो रुद्धो राजपुरीश्वरः ॥ ५०
त्वयेदं चंद्रराजस्य गाढमन्यदुरासदम् ।
अभिक्रम्य च विक्रम्य प्राज्यं राज्यं हृतं हठात् ॥ ५१
त्वया गृहीत्वा कल्याणं तथा भीमपुरीमपि ।
यवनानां महासिद्धिनिलयाः किल पातिताः ॥ ५२
तुभ्यं कुप्यन्ति तेऽद्यापि यवनाः पवनाशनाः ।
अपहृत्यापि सर्वस्वं कृता येषां विडंबना ॥५३
निगृह्य यवनाचार्यानविचार्यात्मनो बलम् ।
प्रतिवध्नास्यविद्धानामध्वानमकुतोभयः ॥ ५४
यच्चक्रवर्तिचिह्नानि धत्से स्वयमभीतवत् ।
अध्यारोहसि च स्वर्णसिंहासनमनीतिमान् ॥ ५५
स्वयमेवानुगृह्णासि निगृह्णासि च मानवान् ।
अहो आत्मवशो नम्यान्न नमस्यभिमानवान् ॥५६
दुर्निवारगतिर्यस्माद्यस्मात् कस्मात् बिभेषि न ।
तस्मादहं प्रेषितोस्मि येदिलेन प्रतापिना ॥ ५७
येदिलस्य नियोगाद्यन्मया सह समागतम् ।
उद्योजयति सद्यो मां तदिदं षड्विधं बलम् ॥५८

मुसेखानादयो ह्येते त्वया सह युयुत्सवः ।
प्रोत्साहयन्ति मामत्र जयवल्लीं जिघृक्षवः ।। ५९
तदद्य मन्त्रियोगेन संधिमेव महीपते ।
विधेहि देहि सकलानचलानचलामपि ।। ६०
सिंहं लोहं महान्तं च प्रबलं च शिलोच्चयम् ।
पुरंदरं गिरिं तद्वत् पुरीं चक्रावतीमपि ।। ६१
विषयं च तथा नीराभीमरथ्यंतराश्रयम् ।
प्रणिपत्य प्रयच्छाशु दिल्लींद्रायामितौजसे ।। ६२
या चंद्रराजादाच्छिद्य गृहीता निग्रहात्त्वया ।
जयवल्लीमिमामल्लीशाहस्त्वां तां हि याचते ।। ६३

--(शिवभारत, अ. १८)

"आपण आजकाल पावलोंपावलीं जो उद्धटपणा करीत आहां तो आदिलशहांच्या अंतःकरणांत शल्यासारखा बोचत आहे. निजामाचें राज्य नष्ट झाल्यावर स्वतः हस्तगत केलेला त्याचा जो प्रदेश आदिलशहानें तह करण्याच्या इच्छेनें मोंगलांना दिला, तो त्यांचा डोंगरी किल्ल्यांचा प्रदेश तुम्ही बळानें जिंकून त्यावर आपला अधिकार चालवीत आहां. वारंवार प्रदेश हस्तगत करीत तुम्ही बदींत टाकल्यामुळें दंडाराजपुरीचा राजा जळफळत आहे. शत्रूंना अजिंक्य अशा चंद्रराजाच्या विस्तीर्ण राज्यावर स्वारी करून व पराक्रम करून तुम्ही तें बळानें हरण केलें. कल्याण व भिवंडीहि घेऊन तेथील मुसलमानांच्या मशिदी तुम्ही पाडून धुळीस मिळविल्या. ज्यांचें सर्वस्वच हरण करून आपण त्यांची विटंबना केली ते यवनरूपी सर्प अद्याप तुमच्यावर खवळले आहेत. तुम्ही आपल्या बळाबळाचा विचार न करतां काजी व मुल्लांना अटक करून निर्भयपणें अविंधांचा मार्ग अडविला आहे. ज्या अर्थी तुम्ही निर्भयपणें स्वतःच चक्रवर्ती राजांचीं चिन्हें धारण करीत आहांत आणि अन्यायानें सुवर्णसिंहासनावर बसतां, स्वतःच प्रजेचा अनधिकारानें निग्रहानुग्रह करण्याचा राजाचा अधिकार चालवितां, स्वतंत्र होऊन वंदनीयांना वंदन करीत नाहीं, अजिंक्य होऊन लुंग्यासुंग्यांना भीत

नाहीं, या तुमच्या उन्मत्त अरेरावीला पायबंद घालण्यासाठींच अली आदिलशहा बादशहानें मला तुमच्यावर पाठविलें आहे. आदिलशहाच्या आज्ञेवरून जें हें सहा प्रकारचें सैन्य माझ्याबरोबर आलें आहे, तें मला तत्काळ युद्धास उद्युक्त करीत आहे. हे मुसेखानादि तुमच्याबरोबर युद्ध करूं इच्छिणारे वीर व जावळी जिंकूं इच्छिणारे सेनानी मला युद्ध करण्यास्तव सारखा आग्रह करीत आहेत. तुमच्या कल्याणाच्या दृष्टीनें हा प्रसंगच न आणतां माझ्या अनुशासनाप्रमाणें तुम्हीं बळकाविलेला प्रदेश व घेतलेले गड माझ्या स्वाधीन करून संधि करणें चांगलें. सिंहगड, लोहगड, पुरंदरगड, चाकण हे किल्ले व नीरा आणि भीमा या नद्यांच्या मधील प्रदेश महाबलाढ्य दिल्लीच्या बादशहाच्या स्वाधीन करून तुम्ही त्याला शरण जा. जो जावळीचा प्रदेश तुम्ही बळानें व अन्यायानें चंद्रराव मोऱ्यांकडून घेतला आहे तोहि अली आदिलशहा बादशहाला पाहिजे आहे."

युद्धघोषणा करीत निघालेल्या शत्रूचें हें तहाचें बोलणें हा एक कपटी डाव आहे हें महाराजांच्या सहजच ध्यानांत येण्यासारखें होतें. अफझलखानाला प्रदेश हवा असला तर तो भेटीविषयीं उत्सुक असणार नाहीं व त्याला महाराजांचे प्राण हवे असले तर भेटीसाठीं तो काय हवें तें करील हें स्पष्टच होतें. शिवाजी महाराजांनीं गळ टाकून पाहण्याचें ठरविलें. त्यांनीं एकांतांत आपल्या मंत्र्यांशीं विचारविनिमय केला, व कपटनीतींत पटु असलेल्या अफझलखानाचें खरें अंतरंग समजावून घेण्याच्या दृष्टीनें पंताजी गोपीनाथ बोकील यांना खानाकडे भेटीच्या व संधीच्या वाटाघाटींच्या निमित्तानें म्हणून पाठविण्याचा निर्णय घेतला. खानाच्या वकिलाला निरोप देऊन त्यांनीं आपला राजदूत त्याच्यासमवेतच पाठविला. अफझलखानाच्या पत्रांतून अहंकार फुलत होता. तो अधिक फुलवून त्यालाच जावळींत खेचावें व त्यानें भेटींत आपला स्वभाव व्यक्त केला तर त्याला त्याच्याच पद्धतीनें ससैन्य विश्रांति द्यावी असा महाराजांचा हेतु होता. त्यांनीं पाठविलेला निरोप व त्यासाठीं केलेली दूताची योजना तशीच होती.

## पंताजी गोपीनाथ वोकील

राजदूत म्हणूनच पंताजी गोपीनाथांना निवडण्यांत आलें होतें व त्यांनीं आपलें कार्य इतकें उत्कृष्ट पार पाडलें कीं, अफझलखानाच्या संकटांतून स्वराज्य वांचविण्याचें अर्धे श्रेय त्यांना आहे. राजदूताची योग्यता राज्यशास्त्राप्रमाणें मंत्र्याएवढी आहे. दूत हा निरोप्या नसतो. शुक्राचार्य दूताचें वर्णन करतांना म्हणतात—

इंगिताकारचेष्टज्ञः स्मृतिमान् देशकालवित् ।
षाड्गुण्यमंत्रवित् वाग्मी वीतभीर्दूत इष्यते ॥ ८७

—(शुक्रनीति अ. २)

"माणसाच्या अंतःकरणाचा ठाव घेणारा, त्याची चर्या व हालचाल यांची योग्य पारख करणारा, स्मृति, शक्ति, तेजस्वी असलेला, देश व काल यांनीं निर्माण झालेली परिस्थिति व संधिविग्रहादि षड्गुण जाणणारा, निर्भय, बोलण्यांत चतुर असा राजदूत असावा." विख्यात राज्यशास्त्रज्ञ कौटिल्य यानें आपल्या अर्थशास्त्रांतील १६ व्या अध्यायांत दूताच्या उपरिनिर्दिष्ट लक्षणांशिवाय शत्रूच्या सत्कारानें फुगून न जाणारा, शत्रूच्या सामर्थ्यानें भेदरून न जाणारा व न आवडणारें बोलणें सहन करण्याची शक्ति असलेला, असे तीन विशेष गुण सांगितलेले असून त्याच्या कार्याचें विवरण पुढीलप्रमाणें केलें आहे : (१) शत्रुपक्षांतील प्रमुख अधिकाऱ्यांशीं मैत्री जोडणें, (२) युद्धाचा प्रसंग उद्भवल्यास शत्रूच्या सैन्याच्या उपनिवेशांची जागा, त्याचप्रमाणें युद्ध करण्यास योग्य भूमि व आश्रयाचीं स्थानें यांची सूक्ष्म माहिती मिळविणें; व या सर्व गोष्टींचा स्वपक्षाला व शत्रुपक्षाला कितपत उपयोग अथवा दुरुपयोग होईल याचें यथार्थ अनुमान करणें, (३) शत्रुदेशांतील दुर्ग, मूल्यवान् पदार्थ सुरक्षित ठेवण्याचीं स्थानें व शत्रूचीं मर्मस्थानें यांची माहिती मिळविणें, (४) शत्रूवर त्याच्या प्रजेचें प्रेम किती आहे, प्रजेच्या ठिकाणीं कोणकोणते दोष आहेत यांचा शोध करणें व त्यासाठीं जागजागीं गुप्तचर पेरणें, शत्रुपक्षीय हेरांना लांच

देऊन वश करून घेणें व त्यांच्याकडून अंतःस्थ माहिती काढणें, (५) आपल्या राज्याच्या बलाबलाविषयीं शत्रुराज्यांत माहिती मिळूं शकणार नाहीं याविषयीं दक्षता बाळगणें, (६) शत्रूच्या प्रजेंत फितुरी माजविणें.

पंताजी गोपीनाथांच्या ठिकाणीं ही योग्यता होती व " खानाची भेट घेऊन बोलीचाली करणें, खानास क्रिया शपथ मागणें, खान तुमच्यापाशीं शपथ मागेल तरी देणें, अनुमान न करणें, हर प्रकारें खानास जावळीस घेऊन येणें, याखेरीज खानाच्या सैन्यामध्यें युक्ति-प्रयुक्तीनें ज्या रीतीनें शोध मनास आणावयाचा त्या रीतीनें आणणें. खानाचें चित्त आमच्या बरियावरी किंवा वाइटावरी आहे याचा शोध करणें " हें सांगून महाराजांनीं खानाचें सैन्य व सामर्थ्य यांचें परिज्ञान करून घेण्याचें कार्यहि त्यांच्यावर सोंपविलें होतें. वृद्ध व मुरलेले मुत्सद्दी पंताजी गोपीनाथ खानाकडे वाईस गेले. कृष्णाजी भास्करानें त्यांना अफझलखानासमोर उपस्थित केलें. पंतांनीं महाराजांचें पत्र खानाला दिलें. त्या पत्रांत महाराजांनीं काय लिहिलें असेल ? शिवभारतांत म्हटलें आहे —

समस्ताः समरे येन ध्वस्ताः कर्णाटभूमिपाः ।
तस्य तेऽद्य मयि श्रेयानियानपि महोदयः ।। ३

अतुलं ते बाहुबलं बलं च तुलितानलम् ।
अलंकृतं क्षितितलं त्वया त्वयि न हिच्छलम् ।। ४

दिदृक्षुरसि यद्येतान् विभवान्वनसंभवान् ।
तद्विलोकयतामेत्य जयवल्लीमिमां भवान् ।। ५

तवागमनमेवेत. सांप्रतं वेद्मि सांप्रतम् ।
अभयं मम तेनैव भवितापि च वैभवम् ।। ६

तृणाय मन्ये ताम्राणामनम्राणामनीकिनीम् ।
येदिलस्य च तां तद्वत् त्वां विना तीव्रविक्रमम् ।। ७

दक्षः पथा त्वमागच्छ प्रयच्छामि शिलोच्चयान् ।
भवते याचमानाय जयवल्लीमिमामपि ।। ८

प्रेक्ष्य दु:प्रेक्षणीयं त्वामिह विश्रब्धमानसः ।
इमां पुरः करिष्यामि निजपाणिकृपाणिकाम् ॥ ९
वनीमिमां ते पृतना प्रतनीमतनीयसीम् ।
पश्यन्ती सुतलच्छाया सुखान्यनुभविष्यति ॥ १०

—(शिवभारत अ. १९)

" ज्यानें कर्नाटकांतील समस्त राजे युद्धामध्यें धुळीस मिळविले अशा आपण आज माझ्यावर एवढी तरी दया दाखविली हें फार चांगलें झालें. आपलें बाहुबल अतुलनीय आहे. आपला पराक्रम अग्नितुल्य आहे. आपण पृथ्वीतळाला अलंकृत केलें असून आपल्या ठिकाणीं कपट तर मुळींच नाहीं. जर येथील हें वनवैभव पाहण्याची आपली इच्छा असेल तर आपण जावळीला येऊन तें पहावें. आपणच येथें येणें हेंच सांप्रत योग्य आहे असें मला वाटतें. आणि त्यामुळेंच मला खरी निर्भयता प्राप्त होऊन माझें वैभवहि वाढेल. भयंकर पराक्रमी अशा आपणांवांचून उन्मत्त मोंगलांचें सैन्य त्याच प्रमाणें आदिलशहाचें सैन्य कस्पटासमान आहे असें मला वाटतें. आपण मार्गानें दक्षपणें यावें. आपण मागत आहां ते किल्ले आणि ही जावळीदेखील मी आपल्याला देतों. ज्यांच्याकडे दृष्टि फेंकणें देखील कठीण अशा आपणांस येथें नि:शंक मनानें पाहून ही माझ्या हातांतली कट्यार मी आपणांपुढें ठेवीन. हें जुनाट व अफाट अरण्य पहात असतां आपलें सैन्य पाताळाच्या छायेचें सुख अनुभवील."

तात्पर्य, पत्रांतून शिवछत्रपतींनीं स्वत: अत्यंत घाबरल्याचा अभिनय करून व खानाचें सर्व मागणें मान्य करून त्याला केवळ जावळीला येण्याचा आग्रह केला होता. अहंकारी खानाचा अहंकार त्यानें फुलला. पण जावळीला जाण्याची कल्पना त्याला अवघड वाटली. त्यानें गोपीनाथपंतांना एकदम निरोप दिला नाहीं. पंतांनीं तेथील वास्तव्यांत एका बाजूला खानाला शिवाजीच्या भयग्रस्ततेचीं वर्णनें ऐकवून त्याचा अहंकार वाढवीत वाढवीत त्याला जावळीच्या निबिड अरण्यांत ओढण्यासाठीं त्याचें मन तयार करण्याचें काम जसें चालविलें होतें, तसेंच दुसऱ्या बाजूला आपल्या पैशाच्या पिशवीचें

तोंड मोकळें सोडून खानाच्या मनांतील हेतूंचा शोध घ्यावयासहि प्रारंभ केला होता. शेवटीं त्यांना खानाचें कपट त्याच्या गोटांतूनच कळलें. " शिवाजी हरामजादा आहे! याशीं युद्ध करितां सांपडणार नाहीं. याजकरितां राजकारण लावून भेटी घ्यावी आणि भेटीचे समयीं धरावा. खानाची ऐसी तजवीज आहे. " खानाची अफाट सेना व युद्धाची प्रचंड सिद्धता पाहून उघड्यावर लढाईंत यशाची निश्चिति नाहीं हें पंतांनीं ओळखलें व प्रत्यक्ष भेट वाईला होवो अथवा प्रतापगडच्या पायथ्याशीं जावळीच्या परिसरांत होवो, खान कूटनीतीचा वापर करून महाराजांचा घात करणार हेंहि त्यांनीं ओळखलें. त्यांतल्या त्यांत खानाला जावळीला ओढण्यांतच सुरक्षितता होती. खानाच्या मनाची तशी सिद्धता करणें शक्य आहे असें त्यांना दिसून आलें. खानानें निरोप देतांच ते प्रतापगडावर आले, व एकान्तांत महाराजांची भेट घेऊन त्यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, " खानाच्या मनांत दुष्ट बुद्धि आहे. सल्ला करून, तुम्हांस भेटीस आणून, दगा करून, कैद करून, विजापुरास धरून न्यावें ऐसें आहे. जर तुम्हांस हिंमत असली तरी खानास नाना प्रकारें भेद करून जावळीस घेऊन येतों. तुम्ही हिंमत धरून एकांतीं एकांगी करून मारणें आणि सर्व लष्कर लुटणें. " (सभासद)

आतां वैयक्तिक साहसाचा खरा प्रश्न होता. दोनच मार्ग होते. एकतर साहसीपणानें खानाची भेट घेऊन त्याला संपविणें, किंवा या गडावरून त्या गडावर संचार करीत त्याला दमविणें. महाराजांचा धैर्य व साहस हा स्थायी भाव त्या वेळीं प्रकट झाला. त्यांनीं पंताजींना ' एकांती एकांगी ' करण्याचें साहस करूं म्हणून सांगितलें व अफझलखानाला जावळींत उतरवण्याची कामगिरी पार पाडण्यासाठीं पुन्हां वाईला खानाच्या शिबिरांत पाठविलें. प्रतापगडावर येवढ्या समारंभानें स्थापिलेल्या ' श्रीरामवरदायिनी भवानीला ' बत्तीस दातांच्या बोकडाचा बळी हवाच होता. त्याला तिच्या निवासस्थानाकडे प्रतापगडच्या पायथ्याशीं आणल्यावांचून हें बलिदान विधिपूर्वक पार पडावें तरी कसें ? शिवाजीमहाराजांनीं

भयाची बतावणी करून खानाचें मन वळविण्याचा डाव पुन्हां एकदां टाकला. पंतांना स्पष्ट आज्ञा होती " खानास सांगणें कीं, राजा बहुत भितो. बाईस तुमच्या भेटीस यावयास धीर पुरत नाहीं. खानसाहेब वडील आहेत. जावळीस येऊन भेट देतात तरी भेटीस येतो. आपण याम हातीं धरून धीर भरंवसा देऊन, बादशहाचे मुलाजमतीस नेऊन ऊर्जित करतील तरी थोरपण आहे, ऐसे कितेक मजकूर सांगून खानास जावळीस घेऊन येणें." पंताजी गोपीनाथांनीं पुन्हां खानाची भेट घेऊन शिवाजीराजांच्या घाबरटपणाचें नाटक वठवावयास प्रारंभ केला. त्यांनीं खानाच्या मनावर हें पूर्ण बिंबविलें कीं " आमचा राजा कचदिल आहे ! येथें वाईंत भेटीस येतां शंका धरितो. आपणच जावळीस चलणें. तेथें भेटी येतील. दिलासा करून बरोबर राजास घेऊन जाणें." (सभासद.)

## अफझलखान

अफझलखानाला आपल्या सामर्थ्याची विलक्षण घमेंड असून शिवछत्रपतींच्या सामर्थ्याची कल्पना नव्हती. तो एक क्षुद्र शत्रु आपल्याला वंचनेनें पकडतां येईल अशी त्याची कल्पना होती. खानाच्या या मनोरचनेचा गोपीनाथपंतांनीं पूर्ण लाभ घेतला व त्याचें मन वळविलें. त्याच्या सभोंवतींच्या चाणाक्ष मुत्सद्द्यांनीं मात्र अजून खड्ग कोशांतून बाहेर पडण्याआधींच शिवाजीच्या भित्रेपणाचीं वर्णनें ऐकून खानाला या भीषण संकटांतून वांचण्याविषयीं विनविलें. शिवभारतकार म्हणतात—

> अथ तं मंत्रिणः सर्वे पुरः प्रस्थातुमुद्यतम्।
> इति नीतिमुपाश्रित्य विनयेन व्यजिज्ञपन्॥ २४
>
> स्वामिन् विधीयतामेव भवतात्मचिकीर्षितम्।
> प्रत्याख्यातास्तु कस्तत्र यत्र दैवमवस्थितम्॥ २५
>
> प्रशस्तेन स्वचित्तेन विश्वस्तः स यदि त्वयि।
> तर्हि भद्यः समायातु जयवल्लीवनाद् बहिः॥ २६

उपाहरतु सर्वस्वमात्मीयं भवतो मुदे।
निजां नामयतु ग्रीवां नमन्निह पदे पदे ॥ २७
बाल्यात्प्रभृति लोकेऽस्मिन् अनल्पबलशालिनः।
कर्माण्यमानुपस्येव प्रायो यस्येह शृश्रुम ॥ २९
विगायति च यो लोके यवनानां विलोकनम्।
निजधर्मधुरीणोऽद्धा शृणोति च न तद्वचः ॥ ३०
स आह्वयति तत्रैव भवन्तमभयो यदि।
तर्हि मन्यामहे तस्य विद्यते साहसं हृदि ॥ ३१
आत्मा त्वमल्लीशाहस्य शल्यं दिल्लीन्द्रवक्षसः।
स्वामीसेनामतल्लीनां विश मा विषमाटवीम् ॥ ३४
तेन विद्विषतानेकसैन्ययुक्तेन पालिताम्।
कथं त्वं तामरण्यानीमभिमानी गमिष्यसि ॥ ३९

—(शिवभारत अ. १९)

"नंतर जावळीस ससैन्य जावयास सिद्ध झालेल्या त्या अफझलखानास सर्व मंत्र्यांनीं राजनीतीस अनुसरून असें विनविलें कीं, खाविंद, आपण जें करूं इच्छितां त्याच्या आड कोण येणार ? जेथें दैवच प्रतिकूल झालें असेल तेथें त्याचे परिणाम कोण टाळूं शकणार? त्यानें जर तुमच्यावर मनापासून विश्वास ठेवला असेल तर तुम्हांला जावळीच्या निबिड अरण्यांत बोलावण्याऐवजीं त्यानेंच तेथून बाहेर पडून वाईला कां येऊं नये ? तो खरोखरच भ्याला असेल तर तुम्हांला संतुष्ट करण्यासाठीं त्यानें आपलें सर्वस्व अर्पण करावें. तुम्हांला पावलोंपावलीं प्रणाम करून त्यानें येथें येऊन आपली मान तुमच्यासमोर वाकवावी. पण त्याच्या लहानपणापासूनच्या इतिहासाचा विचार केला तर शिवाजी भित्रा आहे या सांगण्यावर कोण विश्वास ठेवील ? शिवाय त्यानें भ्यावें असें अजून घडलें तरी काय आहे ? ज्या महापराक्रमी पुरुषाचीं अमानुष कृत्यें त्याच्या बाळपणापासून आम्ही प्रायः ऐकत आलों, जो यवनांचें मुखावलोकन करणें सुद्धां अत्यंत निंद्य समजतो आणि जो स्वधर्मधुरीण त्यांचें

बोलणें मुळींच ऐकत नाहीं, तो ज्या अर्थी निर्भयपणें आपणांस तिकडेच बोलवीत आहे त्या अर्थी त्याच्या मनांत कांहीं तरी अचाट साहस करावयाचें आहे असें आम्हांला उघड दिसतें. तुम्ही व्यर्थ आपली पारध करून घेऊं नये. आपण विजापूरच्या बादशहाचे प्राण आहांत. आपण दिल्लीच्या बादशहाच्या हृदयांतील सदाचें शल्य आहांत. आपल्याजवळ सध्यां उत्कृष्ट सैन्य आहे. व्यर्थ शिवाजीच्या कावयाला फसून आपण जावळीच्या खड्ड्यांत पडूं नये असें आम्हांला वाटतें. आपल्या अगणित सैन्यानें शिवाजीनें व्यापलेल्या जावळींत केवळ अभिमानाला बळी पडून पाऊल टाकणें धोक्याचें आहे."

पण गोपीनाथपंतांनीं शिवाजीच्या भित्रेपणाचा बार त्या अहंकारी खानाच्या मनांत इतका ठासून भरला होता कीं या सल्ल्याला त्यानें ठोकरून लावून तो उपहासानें म्हणाला--

इत्याकर्ण्य वचस्तेषां स विद्वेषांधमानसः।
प्रोवाचताननादृत्य दृप्तः शोणविलोचनः॥ ४०
जन्मप्रभृति दृप्तात्मा योऽस्मभ्यमपराध्यति।
स परः स्वयमस्माकमभ्यर्णं कथमेष्यति॥ ४१
यदमानुषकर्मेति तं प्रशंसथ मानुषम्।
अवैमि तदविज्ञाय मदीयमपि पौरुषम्॥ ४२
धावद्वाहखुरांचलैर्विदलितं कार्णाटकानां बलम्।
तत्तत्स्थानभिदा च संप्रति पराभूतं सुराणां कुलम्॥
तं सर्वोन्नतमंतकोऽपि सहसा कोपानलव्याकुलम्।
मां दृष्ट्वा समया मया सह भयाद्धताद्य संधास्यति॥ ४३

—(शिवभारत अ. १९)

" त्यांचें तें भाषण ऐकून द्वेषानें अंध बनलेला व रागानें डोळे लाल झालेला तो उन्मत्त त्यांचा धिक्कार करून म्हणाला, " स्वभावतः गर्विष्ठ असा जो शत्रू प्रथमपासून आमचे अपराधच करीत आला आहे तो आपणहून आमच्याकडे येईल तरी कसा? 'अमानुष

कृत्यें करणारा' अशी जी त्या मनुष्याची तुम्ही प्रशंसा करतां ती माझा पराक्रम न ओळखल्यामुळेंच करतां असें मी समजतों. ज्याच्या धांवणाऱ्या घोड्यांच्या टापांनीं कर्नाटकांतील राजांच्या सैन्याचें निर्दाळण केलें, ज्यानें सर्व मंदिरें फोडून सांप्रत सर्व देवांना भ्रष्ट केलें, त्या सर्वश्रेष्ठ व क्रोधाग्नीनें संतप्त अशा मला जवळ आलेला पाहून प्रत्यक्ष यमसुद्धां भीतीनें माझ्याशीं आज संधि करील. मग शिवाजीची कथाच काय?" येवढें बोलूनच तो राहिला नाहीं तर पुन्हां कोणी त्याला सूचना-प्रतिसूचना करूं नयेत अशी व्यवस्था त्यानें केली. इ. स. १६६० च्या एप्रिलमध्यें वेंगुर्ला येथील डच वाकनिसानें आपल्या गव्हर्नर जनरलला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे, "त्यानें (शिवाजीनें) आपल्या सैन्यांत अशी अफवा पसरली कीं, अफझलखानानें शत्रूंविरुद्ध कितीतरी वेळां मोठमोठे विजय मिळविले आहेत; तेव्हां त्याच्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं; आणि मी तर अगदीं भिऊन गेलों आहे. ही बातमी पसरत पसरत अबदुलखानाच्या कानावर गेली, व मुसलमानी पद्धतीप्रमाणें तो फुशारकी मारूं लागला. शिवाजीनें .... पत्र पाठवून (खानास) कळविलें कीं, 'माझ्या मनाचें पूर्ण समाधान झालें. आतां माझी विनंति अशी कीं आपण जावळीस यावें; म्हणजे चार लोकांनिशीं मी भेटीस येऊन नम्रपणें किल्ल्या अर्पण करीन' याप्रमाणें सर्व गोष्टी पदरांत पाडून घेण्यासाठीं अबदुल-खानानें तेथें जाण्याचें ठरविलें. इतक्या सरळपणानें बंडखोर व लबाड अशा शिवाजीच्या भेटीस खानानें जाऊं नये, अशा अर्थाचा सल्ला तिघांनीं दिला. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. हे उभे सुळके, खडे डोंगर आणि दुर्गम वाटा यांमधून निबिड अरण्यांत तो बोलावतो त्या अर्थी त्यांत कांहींतरी दगाबाजी असली पाहिजे, असें या सल्लागारांनीं सुचविलें; पण खानानें त्यांना कडक रीतीनें शिक्षा केल्या. एकाचें नाक कापलें, दुसऱ्याला जिवंत पुरलें आणि तिसऱ्याला असें उत्तर दिलें कीं 'मी रुस्तुमजमाप्रमाणें मोठ्या कुळांत जन्म पावलों नसलों तरी मी शूरांच्या पद्धतीनें चालणारा आहे.' "

—(शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १ ला पृ. १८६, १८७)

'उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये' या सुभाषिताच्या खरेपणाचा आणखी कोणता पुरावा हवा? खानानें ससैन्य जावळींत उतरण्याचा निश्चय करून प्रयाणाची सिद्धता केली. तो जावळींत येत असल्याचें महाराजांना कळविण्यांत आलें. पंताजी गोपीनाथांनीं शेवटपर्यंत त्याची पाठ सोडली नाहीं. वाईहून दुर्गम मार्गानें येतांना खानाच्या सैन्याचे कोण हाल झाले? शिवभारतांत म्हटलें आहे---

विसंकटदृपद्धृष्टजानुभ्रश्यद् दृढत्वचः।
अध्यारोहन् करटिनः कथंचिदथ तं गिरिम्॥ ३२
निषादिनुन्नाः करिणो द्रुमाणां वर्त्मवर्तिनाम्।
बुध्नानधुरवाग्भावभिया शुण्डाग्रमंडलैः॥ ३३
उत्तारितमहाभारलघवोप्युन्नतेऽध्वनि।
शरीराण्येव करभाः स्वानि भाराय मेनिरे॥ ३४
सप्तयो वल्लभधरैर्नीयमानाः शनैः शनैः।
अवरूढहयारोहा अप्यायन्त कथंचन॥ ३५
प्रपातपातकातर्याद् धृतेषु बत पाणिभिः।
क्षुपेषु मुक्तमूळेषु केचित् पेतुरवाङ्मुखाः॥ ३६
आरोहन्मत्तमातंगपदाभिहतिनिःसृतैः।
पतद्भिरुपलैः स्थूलैः विध्वस्तोऽधः स्थितो जनः॥ ३७
लताप्रतानसंमिश्रत्वक्सारान्तरचारिणी।
वीतध्वजपटा वीतच्छत्रा साभूदनीकिनी॥ ३८
प्रमत्ततरमातंगकरसंपर्कभीरवः।
तत्र तत्यजुरात्मानं भृगुपातेन केचन॥ ३९
प्रोच्चप्रपातपर्यंतस्रस्तहस्तपदैस्तदा।
कैश्चित्पतद्भिरन्येऽपि बहवः स्वसखीकृताः॥ ४०
एवमारुह्य तं शैलं सर्वा यवनवाहिनी।
परिम्लानापि सा धैर्यादवरोहे मतिं दधे॥ ४१

आरुह्य भूधरममुं यथा त्रिदशभूतलम्।
तथावरुह्य तैर्लोकैः बतालोकि तलातलम्॥ ४३
अथ पर्वतमध्यस्थां गंभीरां कंदरामिव।
सिंहव्याघ्रवराहर्क्षतरक्षुकुलसेविताम्॥ ४४
वज्रपाणिमणिश्याम-वनां वज्रमयीमिव।
तमोऽबुनिधिसंभूतां ततां विषलतामिव॥ ४५
तलातलस्येव महीमहीनगुणशालिना।
त्रिजगज्जयिना नित्यं शिवेन परिपालिताम्॥ ४६
दिवाकरकरास्पृष्टतलां प्रच्छाय संकुलाम्।
अभ्यागच्छन्नफजलो जयवल्लीं व्यलोकत॥ ४७
उपेत्य जयवल्लीं तामसावफजलो बली।
इयं मया गृहीतेति निजे चेतस्यचिंतयत्॥ ४८
ततः कुमुद्वतीकूले कीचकव्रजसंकुले।
निहत्सवा इव भयादवात्सुर्मिलिताः परे॥ ५०
भयमीयुः प्रतिभये यत्र ते तस्य सैनिकाः।
स एकोऽफजलस्तत्र साभिमानो बिभाय न॥ ५१

—(शिवभारत अ. २०)

" भयंकर दगडांवर घासल्यामुळें ज्यांच्या गुडघ्यांची घट्ट कातडी सोलून निघाली आहे असे हत्ती त्या पर्वतावर मोठ्या मेटाकुटीनें चढले. महातांनीं हांकलेल्या त्या हत्तींनीं खालीं घसरण्याच्या भीतीनें रस्त्यांवरील झाडांचे बुंधे सोंडेच्या शेंड्यानें वेटोळें घालून धरले. पाठीवरील ओझ्याचा भार उतरल्यामुळें हलके झालेल्या हत्तींच्या छाव्यांना चढणीच्या रस्त्यावर आपलीं शरीरेंच भारभूत वाटलीं. मोतदारांनीं हळूहळू नेले जाणारे घोडे पाठीवरील स्वार उतरले असतांहि कष्टानें चढले. चढणीवरून पडण्याच्या भीतीनें हातांनीं धरलेलीं झुडपें उपटून पडलीं असतां कांहींजण खालीं तोंड-घशीं पडले. वर चढणाऱ्या मस्त हत्तींच्या पायांच्या तडाख्यांनीं निसटून पडणाऱ्या मोठमोठ्या धोंड्यांच्या योगानें खालचे लोक

नाश पावले. वेलींच्या जाळ्यांनीं गुरफटलेल्या बांबूच्या बेटांमधून जाणाऱ्या त्या सेनेचे ध्वज व छत्र्या फाटून गेल्या. अत्यंत मस्त हत्तीच्या सोंडेच्या स्पर्शाच्या भीतीनें तेथें कांहीं जणांनीं कड्यावरून पडून प्राण सोडला. उंच कड्याच्या कांठावरून हातपाय घसरून पडणाऱ्या कांहीं जणांनीं दुसऱ्याहि पुष्कळ जणांना आपलें जोडीदार केलें. (त्यांच्या धक्क्यानें तेहि खालीं पडले.) याप्रमाणें त्या पर्वतावर चढून ती यवनांची सर्व सेना अतिशय थकली असतांहि तिनें धैर्य धरून पलीकडची उतरण उतरण्याची इच्छा केली. ज्याप्रमाणें तो पर्वत चढून त्यांनीं स्वर्ग पाहिला त्याप्रमाणें तो उतरून त्या लोकांनीं जणूं काय पाताळ पाहिलें. नंतर पर्वताच्या मध्यभागीं असलेली, गुहेप्रमाणें खोल, सिंह, वाघ, डुक्कर, अस्वलें, तरस यांनीं भरलेली, इंद्रनील मण्याप्रमाणें काळीकुट्ट झाडी असलेली, जणूं काय वज्राचीच केलेली, अंधकाररूपी सागरांत उत्पन्न झालेली, जणूं काय लांबलचक विषलता, जणूं काय पातालभूमि, तिन्ही लोक जिंकणाऱ्या उत्कृष्ट गुणशाली शिवाजीनें नित्य रक्षिलेली, सूर्याच्या किरणांचा तळीं स्पर्श न झालेली, गर्द छायेनें व्यापलेली, अशी ती जावळी जवळ येऊन अफझलखानानें पाहिली. तो बलाढ्य अफझलखान त्या जावळीजवळ आल्यावर 'ही माझ्या हातीं आलीच' असें आपल्या मनांत मांडे खाऊं लागला. नंतर भीतीनें जणूं काय निरुत्साही होऊन वेळूच्या बेटांनीं व्याप्त अशा कुमुद्वतीच्या तीरावर शत्रूनें तळ दिला. ज्या भयंकर स्थळीं त्याचे ते सैनिक घाबरून गेले, तेथें तो एकटा अफझलखान मात्र भ्याला नाहीं."

जावळींत उतरतांच खानानें प्रतापगडाच्या पायथ्याशीं एक मैलावर पार येथें मुक्काम ठोकला, व "प्रतापगडाखालीं डेरे देऊन राहिले. आसपास चौगर्दा बारा हजार लष्कर व बंदुकी, आराबियाच्या गाड्या, हत्ती, सुतरनालाच्या गाड्या, जागजागां पाणी पाहून उतरले. पंताजी पंतास राजियाकडे गडावरी पाठविलें कीं 'भेटीस येणें.'

गोपीनाथ पंतांनीं खान आल्याची वार्ता सांगतांच त्याच्या सैन्याच्या खाण्यापिण्याची सारी व्यवस्था करण्यांत आली. खान भेटीला आपल्या तळावर बोलावीत होता, व त्याच्या सेनानिवेशांत चालत जाणें धोक्याचेंच होतें. महाराजांनीं पंताजी गोपीनाथांच्या करवीं खानानेंच दहा निवडक लोकांनिशीं गडाच्या पायथ्याशीं यावें असा निरोप पाठवावयाचें ठरविलें. ही भेटीची जागा प्रतापगड थोडासा चढून गेल्यावर डाव्या बाजूला पसरलेल्या डोंगराच्या एका सोंडेच्या मध्यावरची जागा झाडी तोडून बुद्ध्या व्यवस्थित केली होती. तेथें उत्कृष्ट मंडप उभारलेला होता. सभासद म्हणतो, "गडाजवळच किल्ल्याच्या बुरुजाखालीं सदरेस जागा तयार केली." ही जागा अशा ठिकाणीं होती कीं, गडावरून तेथें चाललेला प्रकार सर्वांस सहज दिसावा. डेरे, आस्मानगिरी, गिर्द्या, गाद्या, किनखापी तकिये इत्यादींनीं जागा सुशोभित केली होती. मंडपाला चंदराई व कळस सोन्याचे लाविले होते. व मोत्यांच्या झालरी व घोंस सोडलेले होते. सर्व ठिकाणीं उंची व मूल्यवान् मखमली पडदे सोडलेले होते. या मंडपांत एक चौत्रा करून त्यांवर खाशांस बसण्यास सोय केली होती. हा चौत्रा पूर्व पश्चिम ३३ फूट रुंद व दक्षिणोत्तर ४० फूट लांब होता." प्रत्यक्ष भेटींत खानानें कपट करण्याचें मनांत आणलें तरी त्याच्या व त्याच्या सैन्याचा कोणताहि संबंध राहूं नये यासाठींच दक्षतेनें ही जागा निवडण्यांत आलेली होती. पंताजीपंतांना भयाचें नाटक आणखी करून खानाला या जागीं आणण्याविषयीं वळविण्यास सांगतांना उभयतांनीं पाळावयाच्या ज्या अटी ठरविण्यांत आल्या त्या पुढीलप्रमाणें होत्या—

विन्यस्यानीकमात्मीयं यथावस्थितमात्मना ।
एकेनाफजलेनैव प्रस्थेयं शस्त्रपाणिना ॥ ३

याप्ययानाधिरूढेन यातव्यं च पुरः पुनः ।
सन्तु तत्परिचर्यार्थं द्वित्रा एवानुजीविनः ॥ ४

तथैव स्वयमभ्येत्य प्रतापाद्रेरुपत्यकाम् ।
शिवं प्रतीक्षमाणेन स्थेयं तत्रैव संसदि ॥ ५

शिवेन च समभ्येत्य शस्त्रहस्तेन गौरवात् ।।
आतिथ्यमतिथेस्तस्य विधातव्यं यथाविधि ।। ६
तिष्ठन्तु दंशिताः शूराः पृष्ठे दश दश स्थिराः ।
शरस्यांतरमासाद्य रक्षणाय द्वयोरपि ।। ७
मिलिताभ्यामुभाभ्यां च कर्तव्यं तत्र तद्रहः ।
सर्वस्यापि हि लोकस्य भवेद्येन महान्महः ।। ८

—(शिवभारत अ. २१)

आपलें सैन्य जेथें आहे तेथेंच ठेवून एकट्या अफझलखानानें स्वतः सशस्त्र निघावें आणि पालखींत बसून पुढें यावें, त्याच्या सेवेसाठीं दोनतीनच सेवक असावेत. तसेंच त्यानें प्रतापगडाच्या पायथ्याजवळ स्वतः येऊन तेथेंच सभामंडपांत वाट पहात रहावें. आणि शिवाजीनें सशस्त्र येऊन त्या पाहुण्याचा आदरसत्कार गौरवानें यथाविधि करावा. दोघांच्याहि रक्षणासाठीं सज्ज, स्वामिनिष्ठ, शूर अशा दहा सैनिकांनीं बाणांच्या टप्प्यावर येऊन मागें उभें रहावें; आणि दोघांनींहि भेटल्यावर सर्वत्र लोकांना आनंददायक असें गुप्त बोलणें तेथें करावें."

आणखीहि एक महत्त्वाचें कार्य पंताजींवर सोंपविण्यांत आलें. अफझलखानाबरोबर विजापूरचे पुष्कळ जवाहिरे आपापलीं रत्नें घेऊन निघाले, असल्याची वार्ता महाराजांना होती. भेटींत अफझलखानाला स्वराज्य समर्पण केल्यावर त्याच्या सैन्यांतील मोठमोठ्या यवन व हिंदू सामंतांना मूल्यवान् भेटीचे अहेर समर्पण करणें आवश्यक होतें. त्यांच्या योग्यतेचीं रत्नें तर महाराजांच्या भांडागारांत नव्हतीं. कोठून असणार? त्यासाठीं त्यांनीं या सर्व जवाहिऱ्यांनाच त्यांच्या मालासह गडावर बोलाविलें होतें. त्यांना अफझलखानाची अनुज्ञा मिळवून देऊन तेथें पाठविणें हें तें महत्त्वाचें कार्य होय.

पंताजी गोपीनाथांना निरोप दिल्यावर महाराजांनीं पुढच्या व्यवस्था आरंभिल्या. त्यांचा मुख्य सेनापति नेताजी पालकर हा महाबळेश्वरचा घाट रोखून होता. इतर सारे सेनानी प्रतापगडावरच

एकत्रित झाले होते. त्यांना महाराजांनीं महत्त्वाच्या जागा रोखून, अफझलखानाच्या सैनिकांना संशय न येईल अशा बेतानें दाट झाडींत सुसज्ज होऊन रहावयास सांगितलें. जर भेटींत खानानें कपट केलें तर आपण तेथेंच याचें काम पुरें करूं व गडावरून खुणेच्या तोफांचे आवाज व दुंदुभिध्वनि झाले कीं सर्वांनीं खानाच्या सैन्यावर एकदम तुटून पडून सर्वांना कापून काढावें अशी त्यांना आज्ञा देण्यांत आली. जेधे शकावलींत म्हटलें आहे : "अन्तस्थें विचार कान्होजी जेधे व सरकारकून बैसोन राजश्री स्वामींनी केला कीं, मुसलमान बेमान आहे. बादलचा जमाव जाउळीस व पारच्या रानांत राहणें. कदाचित् भेटीचे समयीं त्याणें बेइमानी केली तरी त्यांचें लष्कर पारांत आहे तें डोंगरास चढूं न देणें आणि निवडक माणूस घेऊन आपली मदत करणें. कदाचित् श्रीअंबेच्या वरदें अफझलखान मृत्यु पावला तरी इशारतीचे आवाज गडावरी होतील. तेव्हां पारावरी चालून घेऊन अगदीं लष्कर बुडविणें. हैबतराऊ व बाळाजी नाईक सिलीबकर जमावानिशीं बोचेघोलीचे घाटी ठेविले आहेत. ते घाट लष्करास चढूं देणार नाहींत. यैसा अंतस्थे विचार जाला आणि बंदोबस्ती केली." (जेधे शकावली)

## पंताजींची कामगिरी

पंताजी गोपीनाथांनीं आपल्यावर सोंपविलेल्या कामगिरीप्रमाणें खानाची संमति घेऊन सारे जवाहिरे प्रतापगडावर पाठवून दिले. भेटीनंतरच त्यांना त्यांच्या वस्तूंचा विनिमय करावयाचा असल्या-मुळें त्यांचें सारें धन आयतेंच स्वराज्याच्या उपयोगी पडलें. शिव-भारतकार म्हणतात —

'आहुतेभ्यः स तस्मादफजलकटकात्तत्र तेभ्यो धनिभ्यः ।
सर्वाण्यादत्त रत्नान्यथ निजसविधे तान् समस्तान् न्यधत्त ॥
लुब्धात्मानस्तदानीं विधिविहतधियो भूरिभारानुरोधा-।
दज्ञा नाज्ञासिषुस्ते बत गिरिशिखरे सर्वतः स्वं निरोधम् ॥६३
—(शिवभारत, अ. २०)

"त्या अफझलखानाच्या सैन्यांतून तेथें बोलावलेल्या व्यापाऱ्यांपासून त्यानें सर्व रत्नें घेतलीं आणि त्या सर्वांना आपल्याजवळ ठेविलें. तेव्हां त्या लोभी व दैवानें बुद्धि नष्ट केलेल्या मूर्ख व्यापाऱ्यांनीं पुष्कळ लोभाच्या आशेनें आपण पर्वतशिखरावर सर्व बाजूंनीं कोंडले गेलों आहों हें ओळखलें नाहीं."

महाराजांच्या भयाचें नाटक पूर्णपणें वठवून अफझलखानाच्या गळीं पंताजी गोपीनाथांनीं सर्व अटी उतरविल्या व भेटीसाठीं उतावीळ झालेल्या खानानें त्या मान्य केल्या.

## काळभेट

ही हिंदुराष्ट्राच्या केवळ जीवनमरणाचा प्रश्न होऊन राहिलेली अफझलखान व शिवाजी महाराज यांची भेट मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी गुरुवारीं (दि. १० नोव्हेंबर १६५९) माध्यान्हीं झालेली आहे. भेटीच्या संबंधांत सर्व प्रकारचे नियम मान्य करूनहि अफझलखानानें एक सहस्र सिद्ध सैनिक आपल्या समवेत नेण्याची सिद्धता केलीच. सभासद म्हणतो "गोटांतून भेटीस यावयास खानहि सिद्ध होऊन चालिले. बराबरी लष्कर हजार दीड हजार बंदुकी मुस्तेद (तयार) होऊन चालिले. मोठेमोठे धारकरी लोक समागमें निघाले. इतक्यांत पंताजीपंत पुढें होऊन अर्ज केला कीं "इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धासत खाईल. माघारा गडावरी जाईल. भेटी होणार नाहीं. शिवाजी म्हणजे काय? त्यास इतका सामान काय करावा? राजा दोघां माणसांनिशीं तिकडोन येईल. तुम्हीं इकडोन दोघांनिशीं चलावें. दोघे बैसोन बोलावे. तेथें तदवीज करणें ती करा. असें सांगितल्यावरी अवघा जमाव दूर (करून) बाणाचे टपियावरी (ठेविला) खासा खान एक पालखी, दोघे हुद्देकरी व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढें चालिले. सैदबंडा म्हणून पटाईत एक लष्करी समागमें घेतला. पंताजीपंतहि बराबरी आहेत असे सदरेंत गेले." अफझलखानाबरोबर कृष्णाजी भास्कर, सय्यद बंडा, अब्दुल सय्यद, खानाचा पुतण्या रहीमखान, पहिलवानखान, पिलाजी मोहिते, शंकराजी

मोहिते व आणखी चार मुसलमान योद्धे होते. कराराप्रमाणें दहाजण बाहेर बाणाच्या टप्प्यावर उभे राहिले, व कृष्णाजी भास्करासहित खानानें त्या बुद्धचा उभारिलेल्या भेटीच्या मंडपांत प्रवेश केला. सभासद म्हणतो "सदर देखोन खान मनांत जळाला कीं 'शिवाजी म्हणजे काय? शहाजीचा लेक! वजीर यास असा जरी बिछाना नाहीं! अशी मोतीलग सदर म्हणजे काय? पादशहास असा सामान नाहीं, येणें जातीचा त्यानें सामान मिळविला.' असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे 'पादशाई माल पादशहाचे घरीं जाईल. त्याची इतकी तजवीज काय?' असें बोलून सदरेस बैसले. राजियास सिताब आणवणें म्हणून जासूद दरकारें रवाना केले." (सभासद.)

आपल्या समवेत येणाऱ्या मंडळींच्या संबंधांत अगतिकतेनें खानानें अटी पाळल्या असल्या तरी भेटीच्या प्रसंगींच्या आलिंगनांत शिवाजी महाराजांवर मर्मघातक वार करण्यासाठीं त्यानें धारदार कटयार गुप्तपणें जवळ बाळगलीच होती. शिरेपट्टणचा राजा कस्तूरीरंग याच्यावर त्यानें अशाच भेटीच्या प्रसंगींहि जो प्रयोग केला होता तोच त्याला या प्रसंगींहि करावयाचा होता. शिव-भारतकार म्हणतात --

> विश्रब्धो मयि वर्तते शिवमहीपालः स तस्मादहम् ।
> तस्योपान्तमुपेत्य सांप्रतममुं सामोपधिं संश्रयन् ॥
> गुप्तामात्मकटारिकां तदुदरे गाढं निखाय स्वयं ।
> देवानामपि मंदिरेऽद्य सुतरां सद्यो विधास्ये भयम् ॥६४
>
> —(शिवभारत, अ. २०)

"शिवाजी राजानें माझ्यावर विश्वास ठेविला आहे म्हणून मी त्याच्याजवळ जाऊन सांप्रत सख्य करण्याचें कपट करून आपली गुप्त कटचार स्वतः त्याच्या पोटांत खोल खुपसून आज तत्काळ देवांच्या मंदिरामध्यें सुद्धां अतिशय भय उत्पन्न करीन."

इकडे महाराजांनीहि आपली सर्व सिद्धता केली. कवीन्द्र परमानंदानें त्या दिवशींच्या त्यांच्या दिनचर्येचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

विविधाभिर्विधाभिर्वै यथादिष्टं पुरोधसा ।
तथा नित्यवदभ्यर्च्य देवदेवं वृषध्वजम् ।। ११
नित्यदानविधिं कृत्वा भुक्त्वा स्वल्पमनल्पधीः ।
सम्यगाचम्य च मुहुर्मुहुरंबु शुचि स्वयम् ।। १२
चिंतयित्वा च तां देवीं तुलजां क्षणमात्मनि ।
विधाय चात्मनो वेषं तदात्वोचितमात्मना ।। १३
निजमप्रतिमं लोके विलोक्य मुकुरे मुखम् ।
उत्थाय चासनात्सद्यः प्रणिपत्य पुरोहितम् ।।१४
द्विजानन्यांश्च तैः सर्वैराशंसितशुभोदयः ।
दधिदूर्वाक्षतान् स्पृष्टवा दृष्ट्वा मार्तंडमंडलम् ।।१५
स्थितामभ्येत्य च पुरः सवत्सां स्वर्णसंयुताम् ।
वितीर्य सुरभिं सद्यः सगुणायाग्रजन्मने ।। १६
उद्यताननुयानार्थमात्मीयाननुयायिनः ।
प्रतापिनः प्रतापाद्रेर्गुप्तये विनियुज्य च ।।१७
तमन्तस्सच्छलं म्लेंच्छमभ्येत्य स्थितमन्तिके ।
अभ्यगच्छदसौ हार्दादभ्यागतमिवात्मनः ।।१८
उष्णीषेणैव शुचिना व्यभादुत्तंसधारिणा ।
कश्मीरजपृषद्वर्षरंजितेनांगिकेन च ।। १९
शिववर्मा भृशबलः संवृतः शिववर्मणा ।
तस्य वज्रशरीरस्य किं कार्यं तेन वर्मणा ।।२०
कृपाणं पाणिनैकेन बिभ्राणोऽन्येन पट्टिशम् ।
स नंदकगदाहस्तः साक्षाद्धरिरुदैक्ष्यत ।।२१

--(शिवभारत अ. २१)

"उपाध्यायानें सांगितल्याप्रमाणें विविध प्रकारांनीं देवाधिदेव शंकराची नित्याप्रमाणें पूजा करून, नित्याचा दानविधि उरकला. थोडेसें जेवले. स्वतः शुद्ध परिमित जल वारंवार आचमनाप्रमाणें पिऊन त्या तुळजादेवीचें क्षणभर मनांत चिंतन केलें, तत्कालोचित

असा आपला वेष केला, जगांत अप्रतिम असें आपलें मुख आरशांत पाहिलें, तसेंच आसनावरून उठून आणि पुरोहितास व दुसऱ्या ब्राह्मणांस नमस्कार करून त्या सर्वांचा शुभ आशीर्वाद घेतला. दही, दूर्वा आणि अक्षता यांस स्पर्श केला, सूर्यबिंब पाहिलें, पुढें उभ्या असलेल्या सवत्स गाईजवळ येऊन लगेच ती सुवर्णासह गुणवान् ब्राह्मणास दिली. आपल्या मागोमाग येण्यासाठीं सज्ज असलेल्या पराक्रमी अनुयायांस प्रतापगडाच्या रक्षणार्थ नेमलें आणि मनांत कपट ठेवून समीप येऊन राहिलेल्या त्या यवनाकडे, तो महाबुद्धिवान् शिवाजी आपल्या पाहुण्याला जसें सामोरें जावें त्या प्रमाणें, स्नेहभावानें गेला. उत्तम कवच घातलेला शिवाजी राजा भोंसला, तुरा खोंवलेल्या शुभ्र पगडीनें व केशराचा शिडकाव मारलेल्या अंगरख्यानें फारच शोभत होता. त्या वज्रकायास त्या कवचाची काय आवश्यकता? एका हातांत तरवार आणि दुसऱ्या हातांत पट्टा धारण करणारा तो शिवाजीराजा, नंदक खड्ग व कौमोदकी गदा धारण करणाऱ्या प्रत्यक्ष विष्णूप्रमाणें दिसत होता."

अफझलखानाची ही भेट म्हणजे मृत्यूच्या वासलेल्या जबड्यांत उडीच होती. महाराज आपल्या पायांनीं चालले खरें; पण असेच परत येतील काय अशी शंका प्रत्येकाच्या मनांत डोकावत होती. सर्वांचे डोळे भरून आले होते. सर्वांचे कंठ दाटून आले होते. जातांना महाराजांच्याहि मनांत आपण परत येऊंच असें निश्चयानें वाटत नव्हतें. माता भवानी आपलें संरक्षण करीलच, पण दैवाचा फांसा उलटा पडला तर! त्यांनीं शेवटची निरवानिरव केली. "जर अफझलखान मारून जय जहाला तरी पुढें चालवावयास माझा मी आहेच; परंतु एखादे समयीं युद्धीं माझा प्राणनाश जहाला तरी चिरंजीव संभाजीराजे आहेत. गड तुमच्यावर सोंपवितो. स्वराज्य नेताजी पालकरावर सोंपवितो. तीर्थरूप शहाजी महाराजांना येथूनच आमचा प्रणिपात कळवा." (अज्ञानदासाचा पोवाडा) त्यांच्या या निरवानिरवीनें तर वातावरण अधिकच गंभीर झालें.

महाराजांच्या समवेत संभाजी कावजी कोंढाळकर, जिवा महाल, सिद्दी इब्राहिम, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सूरजी कांटके, विसाजी मुरंबक, संभाजी करवर हे दहा अंगरक्षक होते. हळू हळू ते गडाच्या अर्ध्या वाटेवर आले, तेथून मंडपांत आलेला खान दिसत होता. महाराज तेथेंच थबकले, व मंडपांत खानासमवेत आणखी कोण आहे याचा शोध घेतला. खानाबरोबर सय्यदबंडा नांवाचा युद्धकुशल पटाईत सशस्त्र योद्धा आहे असें कळतांच ते तेथेंच थबकले व पंताजी गोपीनाथांना त्यांनीं बोलावून घेतलें. खानाला येऊन वेळ झालेला होता. अजूनहि शिवाजी येत नाहीं म्हणजे काय? तो चांगलाच संतापला. तेवढ्यांत पंताजी महाराजांजवळ आले. महाराज त्यांना म्हणाले, "जैसे आम्हांस महाराज तीर्थरूप, तैसेच खान! मी तर खानाचा भतीजा. खान वडील! सैय्यदवंडा खानाजवळ आहे, त्याकरिता शंका वाटते. या सय्यदबंडास यांतून दूर पाठवणें" पंताजी पंतानें 'राजे घाबरतात' या मात्रेचा पुन्हां वळसा देतांच अफझलखानानें हंसून अहंकारानें सय्यद बंड्याला मंडपाबाहेर उभें राहण्यास सांगितलें, आणि नंतर महाराजांनीं त्या मंडपांत प्रवेश केला.

## दैत्य मारिला

त्या दोघांची एकमेकांवर दृष्टि पडतांच किती विलक्षण विचार दोघांच्याहि मनांत उसळले असतील! कै. जदुनाथ सरकार म्हणतात, "खान चांगल्या प्रकारें वागला तर आपणहि भलेपणानेंच वागावें हा विचार शिवाजीच्या मनांत घोळत होता, तर कसेंहि करून शिवाजीला निदान कैद करून विजापुरास न्यावें हा खानाचा निश्चय झाला होता; स्वराज्यस्थापनेच्या सत्कृत्यांत आपणांस परमेश्वरी साहाय्य आहे असा शिवाजीचा विश्वास होता तर शिवाजीशीं कराव्या लागणाऱ्या कपटाला विजापूरच्या राजमातेचें पूर्ण साहाय्य आहे असा खानास भरंवसा होता; खान शक्तीच्या घमेंडीत होता तर शिवाजी मातुःश्रींच्या चरणीं लीन झालेला होता.

खानानें नुसताच झगा घातलेला होता तर शिवाजीनें स्वसंरक्षणाची पूर्ण काळजी घेतलेली होती. खान उंच व धिप्पाड होता तर शिवाजी ठेंगणा व चपळ होता. अशी या उभयतांची अंतर्बाह्य रचना होती." -- (शिवाजी व शिवकाल, पृ. ४९)

महाराजांनीं स्वसंरक्षणासाठीं घेतलेल्या दक्षतेचें वर्णन करतांना सभासद म्हणतो, "खासा राजियांनीं जरीची (लोखंडी कड्यांची) कुडती (चिलखत) घातली. डोईस मंदील बांधिला. पायांत चोळणा घालून कास कसली व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें."

असो. शिवाजी भ्याला व घाबरट आहे या गोष्टीची पकड अफझलखानाच्या मनावर इतकी विलक्षण बसलेली होती कीं त्यानें सौहार्दाचा नाटकी आविर्भाव म्हणून महाराज येतांच आपलें खड्ग कृष्णाजी भास्करांजवळ देऊन आपण पूर्ण निःशस्त्र आहोंत असें भासविलें, व आपली बलाढ्यता व शिवाजीची क्षुद्रता त्याच्या मनावर ठसविण्यासाठीं त्यानें शिवाजीची निर्भर्त्सना करावयास प्रारंभ केला. शिवभारतांत तिचें उत्कृष्ट चित्र रेखाटलें आहे. तें पुढीलप्रमाणें--

अये मृषामृधोत्साहधारिन् स्वैरतरस्थिते ।
किं नीतिपथमुत्सृज्य भजस्यपथपान्थताम् ।। २८
येदिलं कुतुबं वापि दिल्लीन्द्रं च महौजसम् ।
न सेवसे न मनुषे तनुषे गर्वमात्मनि ।। २९
तदद्य दुर्विनीतं त्वां विनेतुमहमागतः ।
प्रयच्छ पवतानेतान् गृध्नुतां त्यज मां भज ।। ३०
धृत्वाहं त्वां स्वहस्तेन नीत्वा विजयपत्तनम् ।
अल्लीशाहस्य पुरो नामयित्वा शिरस्तव ।। ३१
प्रणिपत्य च विज्ञाप्य तं प्रतापिनमीश्वरम् ।
दास्यामि वैभवं तुभ्यं भूयो भूयस्तरं नृप ।। ३२
शाहराजात्मज शिशो विहाय स्वां विहस्तताम् ।
स्पृश हस्तेन मे हस्तमेहि देहघंकपालिकाम् ।। ३३

—(शिवभारत, अ. २१)

"अरे, व्यर्थ युद्धोत्साह दाखविणाऱ्या व स्वैर वर्तन करणाऱ्या! नीतिमार्ग सोडून कुमार्ग कां धरतोस? आदिलशहाची, कुतुबशहाची किंवा महाबलवान् दिल्लीपतीची सेवा करावयाचें सोडून अहंकारानें कोणाचेंच न मानण्याइतका तूं उद्धट झाला आहेस! मी आज तुझ्या उन्मत्तपणामुळें तुला शिक्षा करण्यासाठींच येथें आलों आहे. हे गड मला अर्पण कर. दुर्बळाला न शोभणारा लोभ सोड, व मला शरण ये. मी तुला आपल्या हातीं धरून विजापुरास नेऊन अल्लीशहापुढें तुझें हें उन्मत्त आणि ताठ मस्तक नमवावयास लावीन आणि त्या प्रतापी प्रभूला प्रणिपात करून तुझ्यासाठीं प्रयत्न करीन. माझ्या कृपेनें आजच्यापेक्षांहि मोठें वैभव तुला प्राप्त होईल. विजापूरचे अंकित सरदार राजे शहाजी यांचा उद्धट मुलगा या पलीकडे तुला काय महत्त्व आहे? आपली फुकट शहाणपणाची घमेंड सोड. आपला हात माझ्या हातांत दे. ये, मला आलिंगन दे."

त्याच्या शब्दांशब्दांनीं महाराजांच्या स्वाभिमानाचा महारुद्र क्रुद्ध होत होता. त्याच्या शब्दांमागोमाग कृति काय आहे हें त्यांना पारखावयाचें होतें. त्यानें आलिंगनासाठीं बाहू पसरतांच महाराजांनींहि त्याला प्रत्यालिंगन दिलें. वंचक व कपटी खानानें त्या आलिंगनांत महाराजांच्या भोंवतीं ते गुदमरतील इतका आपल्या डाव्या हाताचा पोलादी विळखा आवळला व उजव्या हातानें आपली गुप्त कट्यार निष्कोषित करून संतापानें ती महाराजांच्या कुशींत खुपसली. अंगरखा फाटला, पण अंगांत कवच असल्यामुळें ती केवळ त्यावर खरखरली. वार झाला होता, प्रतिवार काय तो उरला होता. महाराजांनीं आपली कट्यार खानाच्या पोटांत खुपसून स्वतःला सोडवून घेतलें, व राजे शहाजी यांचा अपमान, संभाजीची हत्या, कुलदेवतेचा विध्वंस या सर्वांचा सूड म्हणून खदिरांगारासारखे लाल नेत्र करून आपली 'भवानी' निष्कोषित करून त्याच्या पोटांत सरळ खुपसून ओढली, त्याबरोबर त्याची आंतडीं बाहेर येऊन रक्ताचा धबधबा सुरू झाला. 'धांवा धांवा, यानें मला मारलें' म्हणून खान ओरडूं लागला. पण आतां वडी

साहेबीण होती विजापूरच्या अंतःपुरांत व सैन्य होतें दूर. आपण होऊन गजेन्द्रानें गुहेंत जाऊन सिंहावर पदाघात केला, त्याचें गंड-स्थल विदीर्ण झाल्यावांचून कसें राहील? बाहेर आलेलीं आंतडीं पुन्हां पोटांत ढकलून झिंगलेल्या माणसाप्रमाणें झोकांडया खात अफझलखान 'मारा मारा' म्हणून विव्हळत असतां खानाची तरवार घेऊन कृष्णाजी भास्कर महाराजांवर चालून आला. महा-राजांनीं त्याला सांगितलें कीं, मी ब्राह्मणांवर हात उचलीत नाहीं; तुम्ही यांत पडूं नका.' पण त्यानें त्यांच्यावर वार केलाच. तेवढ्यांत खान मंडपाच्या बाहेर पडत होता. कृष्णाजी भास्कराचा वार आपल्या खड्गानें अडवीत महाराजांनीं मंडपाबाहेर जाणाऱ्या खानाच्या मस्तकावर डाव्या हातांतील पट्टयाचा वार करून तें धडावेगळें केलें. तोंच सय्यदबंडा अंगावर चालून आला त्यासरशीं जिवा महाल्यानें त्याचे दोन तुकडे केले. महाराज खानाचें मस्तक घेऊन रक्तानें न्हालेल्या अवस्थेंत झपाझप प्रतापगडावर निघून गेले. मंडपाबाहेर खानाच्या उर्वरित अंगरक्षकांना ठार करून महाराजांचे रणपंडित अंगरक्षकहि त्यांच्या मागोमाग गेले. शिव-भारतकार म्हणतात —

शिवस्तत्पातितं खड्गं खड्गेनादत्त वै तदा।
शिरस्तदधिपस्यापि पट्टिशेन व्यधाद् द्विधा ॥ ५०
पट्टिशेन विनिर्भिन्नमुछ्रितस्य रिपोः शिरः।
स्वरुणा विहतं सद्यो गिरेः शृंगमिवापतत् ॥ ५१
क्वचित्कबंधः प्रसृतः स्रस्तान्यान्त्राणि च क्वचित्।
न्यपतच्च क्वचिन्मूर्धा शिरोवेष्टोऽपि च क्वचित् ॥ ५३
विप्रकीर्णं क्वचिच्छत्रं प्रकीर्णकमपि क्वचित्।
तत्तन्मुक्तामणिमयो रत्नोत्तंसः स च क्वचित् ॥ ५४
क्वचिद्वस्त्रं क्वचिच्छस्त्रं समासाद्य दशामिमाम्।
सोऽलुठन्मेदिनीपृष्ठे दुष्टः स्वेनैव कर्मणा ॥ ५५
निमिष्य नोन्मिषन्त्येव यावत्ते तस्य सैनिकाः।
तावत् शिवनृपेणोच्चैर्यवनः स निपातितः ॥ ५६

एकाशीत्यधिकैः पंच दशभिः संमितैः शतैः।
शालिवाहे शके संवत्सरे चैव विकारिणि ॥ ८३
मासि मार्गे सिते पक्षे सप्तम्यां गुरुवासरे।
मध्याह्ने दैवतद्वेषी शिवेनाफजलो हतः॥ ८४

--(शिवभारत अ. २१)

"त्यानें (कृष्णाजी भास्करानें) मारलेली ती तरवार आपल्या तरवारीनें अडवून शिवाजीनें पट्ट्याच्या वारानें त्याच्या धन्याचें (अफझलखानाचें) मस्तक धडावेगळें केलें. त्या धिप्पाड शत्रूचें पट्ट्यानें कापलेलें डोकें, वज्रानें फोडलेल्या पर्वतशिखराप्रमाणें लगेच खालीं पडलें. एकीकडे धड पसरलें, एकीकडे आंतडीं गळालीं, एकीकडे मस्तक पडलें, एकीकडे पटका पडला, छत्र एकीकडे उडालें, चवरीहि एकीकडे गेली, मोत्यांचा तो रत्नजडित शिरपेंचहि एकीकडे पडला, वस्त्र एकीकडे तर छत्र एकीकडे अशी दशा प्राप्त होऊन तो दुष्ट आपल्याच कर्मानुसार धुळीला मिळाला. त्याच्या त्या सैनिकांच्या डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तोंच या शिवाजीराजानें त्या यवनास धाडकन् खालीं पाडलें. शके १५८१ विकारी नाम संवत्सरीं मार्गशीर्ष मासीं, शुक्लपक्षीं, सप्तमी तिथीस, गुरुवारीं, मध्यान्हीं देवद्वेष्टा अफझलखान शिवाजी महाराजांनीं ठार केला." (१० नोव्हेंबर १६५९)

महाराज गडावर जातांच खुणेच्या तोफांचे गंभीर ध्वनि व कर्ण्यांचे निनाद उमटले. त्याबरोबर जावळीच्या झाडींत दडलेली त्यांची सेना अफझलखानाच्या सैन्यावर तुटून पडली. त्याचे सारे सैनिक असावध होते. खानाच्या भेटींत शिवाजी निश्चित बंदी होणार असें त्यांना वाटत होतें. परत विजापूरला विजय घेऊन जाण्याच्या मनःस्थितींत ते होते. धुंद होते. तोफांचे होणारे नाद हे खानाच्या यशस्वितेचेच असावेत अशा धुंदींत ते होते. तेवढ्यांत त्यांच्यावर प्रलयकारी गर्जना करीत स्वराज्यसेना तुटून पडतांच मृत्यूला कवटाळण्याविना त्यांना दुसरा मार्ग उरला नाहीं. कमळोजी सोळंखे, येसाजी कंक, तानाजी मालुसरे, कोंडाजी वरखल, रामजी

पांगारकर, यांनीं शत्रूची अक्षरशः लांडगेतोडच चालविली. या निर्णायक सैन्याचें आधिपत्य कांहीं वेळ मुसेखानानें केलें, पण लवकरच त्यानें पळ काढला. त्याच्या मागोमाग अफझलखानाचा मोठा मुलगा फाजलखान, हसन, याकूब व अंकुशखान यांनींहि पळ काढला. त्या दाट झाडींतून जातांना काट्यांनीं त्यांच्या सर्वांगाचें कातडें सोलून निघालें. मार्ग सांपडेना. इतक्यांत त्यांनीं आपल्या पुढें लपत छपत पळणाऱ्या प्रतापराव मोऱ्याला पाहिलें. यानेंच खानाला वाईला आणून जावळीच्या विपत्तींत टाकलें म्हणून रागावून फाजलखान त्याचे तुकडे करणार होता. तो अभययाचना करूं लागला, धोरणी मुसेखानानें त्याला वांचविलें. कारण प्रतापराव मोऱ्यावांचून या निबिड अरण्यांतून मार्ग सांपडण्याची शक्यता नाहीं हें त्यानें ओळखलें. त्यानेंच त्यांना वाईला पोहोंचविलें.

चाललेल्या संहारकांडांत शत्रुपक्षाकडे असलेले महाराजांचे चुलते मंबाजी भोसले ठार झाले. अनेक सेनानींना कंठस्नान मिळालें. झुंझारराव घाटगे, अंबरखान, रणदुल्लाखान व अफजलखानाचे दोन पुत्र यांना अटक करण्यांत आली. पळणाऱ्या सैन्याच्या वाटा रोंखून महाराजांचे सेनापति नेताजी पालकर यांनीं तें अरण्य रक्तानें माखून काढलें. सभासद म्हणतो, "मोठें घोरांदर दोन प्रहर युद्ध जाहलें. खानाकडील महदीन व उजदीन पठाण, रोहिले आणि अरब यांस मारून भुईस रगडून टाकिले. मोठमोठे वजीर व लष्करी यांना जमनिदान करून भांडण दिधलें. मोठें क्षेत्र जाहलें. राजियाचे लष्करी लोकांनीं व मावळे लोकांनीं पायउतारा होऊन मारामारी केली. हत्ती तोडिले, कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं. कित्येक हत्तींचे दात पाडिले, कित्येक हत्तींचे पाय तोडिले, तसेंच घोडे एकाच वारानें जिवें मारिले, तसेंच उंटें मारिलीं. मारीत असतां रण अपार पडलें. रक्ताच्या नद्या चालिल्या. रणकंदन ऐसें जालें." या धुमश्चक्रींत तीन सहस्र यवन सेनेचा संहार झाला. महाराजांच्याकडचे शामराज पद्मनाभी व त्रिंबक भास्कर प्रधान हे दोन सेनानी ठार झाले. महत्त्वाचे बंदी प्रतापगडाच्या पायथ्याशीं

आणण्यांत आले. आपलीं शंभर वर्षें भरलीं हें त्यांना उघड दिसत होतें. मृत्यूच्या काळ्या सांवल्या त्यांच्या डोळ्यांना भिववीत होत्या. त्या सर्वांचा सरसहा संहार केला तरी त्यासंबंधीं महाराजांना कोणी दोष देऊं शकणार नव्हता. कारण ते शत्रू होते. ते विजयी ठरते तर त्यांनीं तेंच किंबहुना त्याहूनहि अधिक केलें असतें. पण महाराजांनीं त्या सर्वांना पोटाशीं धरून अभय दिलें. सभासद म्हणतो, "राजा खासा प्रतापगडाखालीं उतरोन कुल आपले लोक व अफझलखानाचे लोक त्यांचे पुत्र भांडते माणूस होते तितकियास भेटून पोटाशीं धरून दिलासा करून, भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लेंकास चालविलें." "भांडते लोकांनीं तोंडी तृण धरून शरण आले त्यांसी व बायका, मुलें, भट-ब्राह्मण, गोरगरीब अशी अनाथ करून सोडिलें. राजा पुण्यश्लोक, शरणागतास मारीत नाहीं याजकरितां त्याचे लोकांनींही कित्येक अनाथ सोडिलें. (स. प्र. शि. च. पृ. १९). "ज्यांणीं हत्यार धरिलें त्यांस मारिलें. हत्यार न धरी त्यास हत्यार व घोडे घेऊन सोडलें. गोरगरीब यांचा बचाव करून लाऊन दिल्हें. तोफखाना व बुनगे तिकडे लोक ठेविले (होते) त्यास इशारत करवून दस्त केलें. (स. प्र. शि. च. पृ. १३५)

अफझलखानाचें कापून आणलेलें मस्तक राजगडावर पुण्यश्लोक मातुःश्री जिजाबाईसाहेब यांना पाहण्यासाठीं पाठवून देण्यांत आलें. देव, धर्म, राष्ट्र, पिता व बंधु यांच्या अपमानाचा सूड घेऊन आपल्या पराक्रमानें तळपणाऱ्या त्या विजयी वीरपुत्रानें अर्पण केलेलें तें शत्रूचें रक्तलांछित मस्तक पाहून त्या वीरमातेच्या मनांत भावी भविष्याचीं किती सुवर्णस्वप्नें तळपून उठलीं असतील !

✦ ✦ ✦

प्रकरण चौदावें

# आदिलशाही साम्राज्यावर चौफेर हल्ले

शिवछत्रपतींच्या जीवनेतिहासांत अफझलखानाच्या वधाचें प्रकरण अत्यंत महत्त्वाचें आहे. या प्रकरणापासूनच शिवछत्रपति हे शत्रूंच्या धाकाचा, व धर्मनिष्ठांच्या आशास्थानाचा विषय बनले. या प्रकरणामुळें महाराजांच्या पराक्रमावर एखादा पोवाडा असावा अशी इच्छा जिजामातु:श्रींना झाली व अज्ञानदास शाहिरानें त्यांच्या आज्ञेवरून पोवाडा रचून तो छत्रपतींच्या उपस्थितींत त्यांच्या राजसभेंत गायिला. गुणग्राहक छत्रपतींनीं त्याच्या हातांत एक शेर सोन्याचा तोडा घातला व जातिवंत घोडा पारितोषिक म्हणून दिला. ज्या ज्या रणपटूंनीं स्वराज्यावरील या जीवनमरणाच्या संकटप्रसंगीं आपल्या छातीची ढाल महाराजांपुढें केली त्यांच्या, त्यांच्यावर पारितोषिकें व देणग्या यांचा वर्षाव करून छत्रपतींनीं त्यांचा गौरव केला. ज्यांच्या राजदौत्यामुळें त्यांनीं येवढा मोठा 'दैत्य मारिला' त्या पंताजी गोपीनाथांना शेला पांघरून महाराजांनीं सात सहस्र होन दिले. सभासद म्हणतो "जखमी जाहलेल्यांस दोनशे होन व शंभर होन, पंचेवीस होन, पन्नास होन दर आसामीस जखम पाहून दिधले. पुत्र नाही त्यांच्या बायकांस निमें वेतन करून चालवावें असें केलें. हस्तकडी, कंठमाला, तुरे, पदकें, चौकडे, मोत्यांचे तुरे, कित्त्येकांस बक्षिस दिले. कित्त्येकांस गांव मोकासे बक्षिस दिधले."

महाराजांना या प्रकरणांत सीमातीत लाभ झाला. तोफा, गाडे, दारुगोळा, तंबू, सामान वाहून नेणारीं तट्टें अगणित मिळालीं. ६५ हत्ती, चार सहस्र घोडे, १२०० उंट, कापडाचे दोन सहस्र गठ्ठे, व नाणीं आणि रत्नें मिळून दहा लक्ष रुपयांच्या संपत्तीचा स्वराज्याला लाभ झाला. 'स्वातंत्र्यस्थापनेच्या उषेचा उदय' असें या प्रकरणाचें कै. जदुनाथ सरकार यांनीं वर्णन केलें आहे.

इंग्रज व्यापारी रेव्हिंग्टन् म्हणतो त्याप्रमाणें विजापूरकरांचे तीन सहस्र सैन्य या युद्धांत कामास आलें. अफझलखान हा विजापूरचा अग्रगण्य सेनानी असल्यामुळें त्याच्या वधानें महाराजांचा सदाचा वचक निर्माण होऊन विजापूरच्या उरांत धडकी बसली. या प्रकरणाच्या परिणामाचें मूल्यमापन करतांना क. दत्तोपंत आपटे लिहितात—

" भारतकारांच्या लिहिण्यावरून तरी खानाच्या मनांत प्रतापगडावर जाऊन तेथील देऊळ उद्ध्वस्त करावें असें होतें. आणि पंढरपूर येथें त्यानें प्रत्यक्ष या जातीची कृति केली असल्यामुळें खानाचें नांव ऐकतांच तो प्रतापगडावर देखील असेंच करील असें हिंदु लोकांना वाटलें हें खरें आहे. आणि याचमुळें प्रतापगडाच्या भेटींत खान ठार झाला हें ऐकतांच आसपासच्या हिंदू लोकांना धर्मावरचें मोठें संकट नाहींसें झालें व त्याचें श्रेय शिवाजी महाराजांना आहे हा विचार प्रामुख्यानें मनापुढें आला. यानंतर विजापूरकरांकडून शिवाजी महाराजांविरुद्ध अनेक सरदार आले; त्यांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें महाराजांशीं सामनेहि दिले. परंतु त्यांपैकीं एकानेंहि हिंदूंच्या धर्मभावना दुखविण्याचा केव्हांहि प्रयत्न केला नाहीं. सारांश, हिंदू देवळें भ्रष्ट करूं पाहणाऱ्या खानास देहान्त प्रायश्चित्त मिळालेलें पाहून विजापूर दरबारांतील मुसलमानी सरदारांवर जो एकदां वचक बसला तो कायमचा बसला. तेव्हांपासून विजापूरचें राज्य बुडेपर्यंत त्या राज्यांतील कोणाहि सरदारानें मराठ्यांवर स्वारी करतांना देवळें भ्रष्ट करण्याचा खटाटोप केल्याचा दाखला सांपडत नाहीं. यापुढें विजापूरकरांशीं चाललेल्या मराठ्यांच्या झगड्याचें स्वरूप धार्मिक नव्हतें; राजकीय होतें. यामुळें अनेक मुसलमान सरदार अंतःस्थपणें शिवाजी महाराजांना मदत करण्यासहि तयार असत."

अफझलखान हा जसा दुष्ट, विश्वासघातकी, हिंदुधर्माचा द्वेष्टा व मूर्तिभंजक म्हणून तिरस्काराचा, तसाच त्याच्या प्रचंड सामर्थ्यामुळें भीतीचाहि विषय होता. त्यामुळें त्याच्या वधानें एका

नव्या मंगलपर्वाचा उदय झाला अशीच हिंदू मनाची निश्चिति झाली. छत्रपति शिवाजी हे अवतारी पुरुष आहेत अशी त्यांच्या या विजयामुळें प्रथमच कवि व शाहीर ग्वाही देऊं लागले. सारा भारत पालथा घालून धर्माला त्राता नाहीं म्हणून निराश झालेल्या समर्थ रामदासांनीं श्रीरामचंद्राच्या प्रेरणेवरून महाराष्ट्रांत कृष्णेच्या कांठीं आपल्या जनजागृतीच्या महत्कार्यास प्रारंभ केला होता. शिवछत्रपतींच्या पराक्रमाकडे ते कौतुकानें पाहात होते. अफझलखानाच्या या वधांत शिवरायांच्या विलक्षण साहसानें समर्थांच्याहि डोळ्यांचें पारणें फिटलें. धर्माचा रक्षणकर्ता 'त्रिभुवन धुंडाळूनहि' त्यांना जो सांपडला नव्हता तो एकाएकीं नेत्रगोचर झाल्यानें त्यांना विलक्षण आनंद झाला. या पुरुषाशीं आपला संबंध असावा व आपली सारी तपस्या याच्याच पदरांत टाकावी असें त्या विराग पुरुषाला वाटलें व त्यांनीं शिवाजी महाराजांना आपण होऊन पहिलें पत्र पाठविलें. या पत्रांतून समर्थांनीं जे भाव व्यक्त केले आहेत त्यांवरून हिंदू राष्ट्राच्या केवढ्या आकांक्षा शिवछत्रपतींनीं आपल्या या कृत्यानें पल्लवित केल्या होत्या याची यथार्थ कल्पना येते. समर्थांचें महाराजांना पाठविलेलें तें पहिलें-वहिलें पत्र पुढीलप्रमाणें आहे.

### समर्थांचें पहिलें पत्र

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसि आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी ।। १

परोपकारोंचिया राशी। उदंड घडती जयासी।
तयाचे गुणा-महत्वासी। तुळणा कैंची ।। २

नरपती हयपती गजपती। गडपती भूपती जळपती।
पुरंदर आणि शक्ती। पृष्ठभागीं ।। ३

यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत।
पुण्यवंत नीतिवंत। जाणता राजा ।। ४

आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ।
सर्वज्ञपणें सुशीळ । सर्वांठायीं ।। ५
धीर उदार सुंदर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केला ।। ६
तीर्थक्षेत्रें तीं मोडली । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झाली ।
सकळपृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।। ७
देव-धर्म-गो-ब्राह्मण । करावयासी रक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ।। ८
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर वैदिक याज्ञिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमचे ठायीं ।। ९
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र-धर्म राहिला कांहीं । तुम्हां कारणें ।। १०
कांहीं धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊन कितेक असती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारलीं ।। ११
कितेक दुष्ट संहारिला । कितेकासी धाक सुटला ।
कितेकासी आश्रयो झाला । शिव कल्याण राजा ।। १२
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाही घेतले ।
ऋणानुबंधें विस्मरणा जालें । काय नेणों ।। १३
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ।। १४
उदंड राजकारण तटलें । तेथें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ।। १५

समर्थांनें हें पत्र म्हणजे शिव-समर्थांच्या रूपानें स्वराज्यांत जो ब्रह्म-क्षात्रतेजांचा अपूर्व संगम दृष्टिगोचर झाला त्याची गंगोत्रीच होय.

असो. अफझलखानाच्या या वधाच्या प्रकरणांत ज्या रूढ गोष्टी आहेत त्यापेक्षां वेगळ्या अशा कांहीं गोष्टी आम्ही येथें उल्लेखिल्या आहेत. त्यासंबंधांत थोडें स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे.

तसेंच शिवछत्रपतींचें हें कृत्य नैतिक दृष्टीनें योग्य होतें की नव्हतें हा वादहि अजून चालू आहे. त्या संबंधांतहि थोड्याशा विवेचनाची आवश्यकता आहे.

## महाराजांचीं शस्त्रें

शिवाजी महाराजांनीं अफझलखानाच्या पोटांत वाघनखें खुपसून तें विदीर्ण केल्याचें प्रसिद्ध आहे. पण आम्ही येथें वाघनखांचें नांवहि घेतलेलें नाहीं. हें कसें असा प्रश्न स्वाभाविकपणेंच कोणीहि विचारण्याचा संभव आहे. यासंबंधांत वेगवेगळ्या ग्रंथकारांचें काय म्हणणें आहे तें प्रथम पाहू.

सभासद म्हणतो, "हातांत एक विचवा व वाघनख चढविलें" "राजियांनी डावें हाताचें वाघनख होते तो हात पोटांत चालविला"

खाफीखानानें वाघनखांचा उल्लेखहि न करतां केवळ बिचवा या आयुधाचाच उल्लेख केला आहे.

**जेधे करीन्यांत** पुढीलप्रमाणें उल्लेख आला आहे. "भेटीचे समयीं अफझलखानानें राजश्री स्वामींची मान बगलेस धरिली तेव्हां राजश्रींनी पंजास **पोलादी नखें** घातलीं होतीं. त्याचा मारा करून आंतडी बाहेर काढिली. तेव्हां मान असंडून पटा राजश्रींनीं हातीं घेतला."

**जेधे शकावलींत** म्हटलें आहे "प्रतापगडचे माचीस अफझलखानाबरोबर पालखी व हेजीब (वकील) घेऊन हुदेकरासमवेत भेटीस आले. राजश्री स्वामी किलियावरून उतरून भेटीस आले. भेटीसमई एकांगी करून अफझलखान जिवें मारिला." यांत कट्यार, वाघनख अथवा खानानें प्रथम कट्यार चालविणें इत्यादि कोणत्याच गोष्टीचा उल्लेख नाहीं.

परमानंद कवीन्द्र कृत शिवभारतांत शस्त्रांचा निर्देश पुढीलप्रमाणें केला आहे.

> कृपाणं पाणिनैकेन बिभ्राणोऽन्येन पट्टिशम् ।
> स नंदकगदाहस्तः साक्षाद्धरिरुदैक्षत ॥ २१–२१

"एका हातांत कृपाण आणि दुसऱ्या हातांत पट्टा धारण करणारा तो शिवाजी राजा नंदक खड्ग व कौमोदकी गदा धारण करणाऱ्या प्रत्यक्ष विष्णूप्रमाणें दिसत होता."

एवमुक्त्वा स तद्ग्रीवां धृत्वा वामेन पाणिना ।
इतरेण च तत्कुक्षौ निचखान कटारिकाम् ।।३४
तन्निर्यातयितुं वैरं प्रवृत्तोऽसौ महाव्रतः ।
शिवः कृपाणिकाग्रेण कुक्षावेव तमस्पृशत् ।।३९
आपृष्ठं विद्विषत्कुक्षिं तूर्णं तेन प्रवेशिता ।
आकृष्यान्त्राणि सर्वाणि सा कृपाणी विनिर्गता ।।४०
कुप्यतः कार्तिकेयस्य शक्तिः क्रौंचाचलं यथा ।
व्यभादफजलं भित्वा शिवखड्गलता तथा ।।४१

––(शिवभारत अ. २१)

"असें बोलून अफझलखानानें शिवाजीची मान डाव्या हातानें धरून दुसऱ्या उजव्या हातानें त्याच्या कुशींत कटचार खुपसली. महाव्रत शिवाजीनें त्यानंतर त्या वैराचा शेवट करण्याच्या हेतूनें प्रवृत्त होऊन आपल्या कृपाणिकेचें टोंक त्याच्या पोटांतच खुपसलें. नंतर त्यानें शत्रूच्या पोटांत पाठीपर्यंत खोल खुपसलेली आपली कृपाणिका ओढून बाहेर काढली. त्या वेळीं त्याचीं सर्व आंतडीं बाहेर आलीं. क्रुद्ध कार्तिकेयाची शक्ति क्रौंच पर्वतास विदीर्ण करून जशी शोभली, तशी शिवाजीची खड्गलता अफजलखानास भेदून शोभूं लागली."

**शिवदिग्विजयामध्यें** वाघनख व तरवार या दोन आयुधांचा उल्लेख आहे.

**चिटणिसांच्या बखरींत** वाघनख व तरवार या दोन आयुधांचा उल्लेख आहे.

**कलमी बखरी** मध्यें वाघनखांचा उल्लेखच नसून कटचार व तरवार या दोन आयुधांचा निर्देश आहे.

**तारीख ई शिवाजी** मध्यें वाघनख, तरवार, कटचार व पट्टा या चार आयुधांचा निर्देश आहे.

रायरी बखर व मनूची कटचारीचा निर्देश करितात; वाघनखांचा नाहीं.

रेव्हिग्टन आपल्या पत्रांत पुढीलप्रमाणें लिहितो— "Sevagy with a daggar from out of bosom stabbed the other to the heart." "शिवाजीनें अफझलखानाच्या छातींत कटचार खुपसली."

या उल्लेखांची तपासणी केली तर या जुन्या लेखकांचें या प्रसंगीं महाराजांजवळ असणाऱ्या शस्त्रांच्या संबंधांत एकमत नाहीं असें दिसून येईल. यांपैकीं सभासद, जेधे करीना, शिवदिग्विजय, चिटणीस, तारीख ई शिवाजी हे वाघनखांचा निर्देश करतात. पण यांपैकीं जेधेकरीनाच अधिक प्राचीन असून बाकी सगळें साहित्य त्या मानानें पुष्कळच अर्वाचीन आहे. करीनाहि अफझलखानाच्या वधानंतर ३० वर्षांनीं लिहिलेला असून त्यांत कांहीं चमत्कारिक चुका आहेत. उदाहरणार्थ, अफझलखानाचा वध वस्तुतः मार्गशीर्ष महिन्यांतील शुद्ध सप्तमीला झालेला असून करीन्यांत तो कार्तिक महिन्यांत झाला असल्याचें म्हटलें आहे. त्यामुळें वाघनखांचा उल्लेख करणारें हें साहित्य महाराजांच्या नंतरचें व पारंपरिक ऐकीव गोष्टींवर आधारलेलें आहे हें उघड दिसतें. एरवीं त्यांतील उल्लेख प्रमाण म्हणून घेतले तरी प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या समकालीन असलेलें साहित्य या मागाहूनच्या साहित्यापेक्षां अधिक प्रमाणभूत मानलें पाहिजे हें स्पष्टच आहे.

जेधे करीन्यापेक्षां जेधे शकावली अधिक प्राचीन आहे व सर्व संशोधकांना तिचें प्रामाण्य मान्य आहे. पण शकावलींत अफझलखानाच्या वधप्रसंगीं महाराजांच्या हातांत असणाऱ्या शस्त्रांचा उल्लेखच नाहीं हें आपण पाहिलेंच आहे. यामुळें शिवसमकालीन अशीं दोनच साधनें या संबंधांत आपल्याला मार्गदर्शन करूं शकतात. एक म्हणजे शिवछत्रपतींच्या आज्ञेवरून त्यांच्या जीवनकाळीं कवीन्द्र परमानंदानें लिहिलेलें शिवभारत व दुसरें म्हणजे रेव्हिग्टन या इंग्रज गृहस्थानें ईस्ट इंडिया कंपनीला लिहिलेलें पत्र. १० नोव्हेंबर

१६५९ ला अफझलखानाचा वध झाला व त्यानंतर १० डिसेंबर १६५९ ला म्हणजे बरोबर एक महिन्यानें रेव्हिंग्टननें कंपनीला पत्र लिहिलें. या दोन समकालीन अशा साहित्यांपैकीं शिवभारतांत तरवार व पट्टा या दोन आयुधांचा निर्देश आहे व रेव्हिंग्टनच्या पत्रांत कट्यारीचा निर्देश आहे. म्हणून आम्ही या तीनच आयुधांचा निर्देश केला. वाघनखांचा केला नाहीं.

नाहीं म्हणावयाला मातोश्री जिजाबाईच्या आज्ञेवरून लिहिलेला अज्ञानदास शाहिराचा पोवाडा हा शिवसमकालीन साहित्यांत असून त्यांत मात्र वाघनखांचा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे ---

इतकिया उपरी । अबदुल मनीं खवळिला पुरा ।
कव मारिली अबदुल्ल्यानें । सरजा गवसून धरला सारा ।
चालविली कट्यार । सीलवर मारा न चाले जरा ।
सराईत शिवाजी । त्याने बिचव्याचा मारा केला ।
उजवे हातीं बिचवा त्याला । वाघनख सरज्याच्या पंजाला ।
उदरच फाडुनी । खानाची चरबी आणिली द्वारा ॥

कदाचित् शिवोत्तरकालीन लेखकांच्या वाघनखांच्या उल्लेखाचा आधार हा पोवाडाहि असू शकेल. पण आम्ही पोवाड्यापेक्षां शिवभारताला या संबंधांत अधिक प्रामाण्य देण्याचीं दोन कारणें आहेत. एक तर पोवाडा प्रसिद्ध शाहिरांच्या म्हणण्यांतला व रुळलेला असल्यामुळें त्यांत मागाहून एखादी कल्पना खेळविली जाण्याचा संभव आहे; तसें शिवभारतासंबंधांत नाहीं. कारण, तो अगदीं अलीकडेच व मोठ्या खटपटीनें तंजावरच्या ग्रंथसंग्रहालयांत उपलब्ध झालेला ग्रंथ आहे. दुसरें असें कीं, शिवभारतकार तपशील देण्यासंबंधांत अत्यंत सूक्ष्म दृष्टि जागजागीं दाखवितात. त्याच्या या लेखनपद्धतीनें शिवछत्रपतींच्या चरित्रांतील आजवर अज्ञात असणाऱ्या किती तरी गोष्टींवर सत्याचा नवा प्रकाश पडतो. याचें उत्कृष्ट विवेचन विख्यात साक्षेपी इतिहाससंशोधक कै. दत्तोपंत आपटे यांनीं शिवभारताच्या प्रस्तावनेंत केलेलें आहे. तें जिज्ञासूंनीं मुळांतून पाहावें. आम्हांला येथें इतकेंच उल्लेखावयाचें

आहे कीं इतका साक्षेपी, तपशिलाच्या संबंधांत इतका बारकावा ठेवणारा व प्रत्यक्ष छत्रपतींच्याच आज्ञेनें ग्रंथ लिहिणारा ग्रंथकार ज्यांनीं अफझलखानाचें उदर विदीर्ण झालें त्या वाघनखांचा उल्लेख कसा करणार नाहीं ? अफझलखानाच्या भेटीस निघालेल्या महाराजांच्या स्वल्प भोजनाचें, आचमनाप्रमाणें वारंवार पाणी पिण्याचें व त्यांच्या पोशाखावर केलेल्या केशराच्या शिडकाव्याचेंहि वर्णन करणारा ग्रंथकार वाघनखासारख्या महत्त्वाच्या आयुधाचें वर्णन केल्याविना कधींहि राहणार नाहीं. त्यामुळें महाराजांच्या हातांत वाघनख नसलें पाहिजे. म्हणून आम्ही त्या आयुधाचा निर्देश केलेला नाहीं. अज्ञानदासाच्या पोवाड्यावर विश्वसून कोणी वाघनखें होतीं असें म्हटलें तर तें वावगें होईल असें नाहीं. आमच्या दृष्टिकोनाचें स्वरूप आम्ही येथें स्पष्ट केलें आहे इतकेंच.

## खानाचा शिरच्छेद कोणी केला ?

आम्ही येथें आणखी रूढ समजुतीच्या विरुद्ध दुसरें विधान केलेलें आहे व तें म्हणजे अफझलखानाचा शिरच्छेद स्वतः श्रीशिवाजी महाराजांनींच आपल्या हातांतील पट्ट्यानें केला हें होय. रूढ समजूत उदर विदीर्ण झाल्यावर आंतडीं पोटांत ढकलून खान मंडपांतून विव्हळत बाहेर आल्यावर त्याच्या भोयांनीं त्याला पालखींतून चालविलें; व तें पाहून महाराजांच्या अंगरक्षकांपैकीं एक संभाजी कावजी यानें भोयांच्या पायावर वार करून पालखी खालीं पाडली व खानाचें मस्तक कापलें अशी आहे. मग आम्ही महाराजांनींच खानाचा शिरच्छेद केला असें कां म्हटलें असें कोणासहि वाटण्याचा संभव आहे. या गोष्टीवर प्रकाश टाकण्यासाठीं या संबंधांतील शिवचरित्रसाहित्याचें समालोचन करणें योग्य ठरेल.

कै. जदुनाथ सरकार जिला प्रमाण म्हणून उपयोगांत आणतात त्या सभासदाच्या बखरींत यासंबंधांत पुढीलप्रमाणें वर्णन आढळतें, "खाननें गलबला केला कीं, "मारिलें ! मारिलें ! दगा दिधला ! बेगी धावा !' ऐसें बोलतांच भोयांनीं पालखी आणिली. आणि पालखींत घालून, उचलून चालविला. इतकियांत संभाजी कावजी

महालदार यानें भोयांचे पाय मारिले. आणि पालखीखालें भोयांस पाडिलें. **खानाचें डोचकें कापिलें.** हातीं घेऊन राजियाजवळ आला. इतक्यात सैदबंडा पटाईत धावला. त्यानें राजे जवळ केलें. पटयाचे वार राजियावरी चालविले. तों राजियानें जिऊ महालियाजवळ आपला हुदियाचा पट्टा (होता तो) घेऊन, पट्टा व विचवा असे कातर करून सैदबंडा याचे चार वार ओढिले. पांचवे हातानें राजियानें खांद्यावरी सैदबंडा मारावा तों इतकियांत जिऊ महाला याणें फिरंगेनें खांद्यावरी सैदबंडियासि वार केला. तो पटियाचा हात हत्यारासमेत तोडिला आणि खानाचें शिर घेऊन राजे सिताबगडावरी जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले."

**शिवदिग्विजयांत** संभाजी कावजीचा उल्लेख नसून त्याऐवजीं येसाजी कंकानें मस्तक तोडलें असें म्हटलें आहे.

**चिटणिसाच्या बखरींत** येसाजी कंक व तानाजी मालूसरे यांनीं मस्तक तोडलें असा उल्लेख आहे.

**कलमी बखरीमध्यें** स्वतः शिवाजीमहाराजांनींच मस्तक तोडलें असा उल्लेख आहे.

**तारीख-ई-शिवाजी** मध्यें शिवाजी महाराजांनींच तरवारीनें मस्तक तोडलें असा उल्लेख आहे.

परमानंद कवीन्द्रकृत **शिवभारतांत** पुढीलप्रमाणें उल्लेख आहे.

शिवस्तत्पातितं खड्गं खड्गेनादत्त वै तदा ।
शिरस्तदधिपस्यापि पट्टिशेन व्यधाद् द्विधा ।। ५०
पट्टिशेन विनिर्भिन्नमुच्छ्रितस्य रिपोः शिरः ।
स्वरुणा विहतं सद्यो गिरेः शृंगमिवापतत् ।। ५१

--(शिवभारत, अ. २१)

"कृष्णाजी भास्करानें केलेला तरवारीचा वार शिवाजी महाराजांनीं आपल्या तरवारीनें अडविला. आणि पट्ट्यानें त्याच्या धन्याच्या, अफझलखानाच्या डोक्याचेहि तुकडे केले. धिप्पाड शत्रूचें तें पट्ट्यानें कापलेलें डोकें, वज्रानें फोडलेल्या पर्वतशिखराप्रमाणें लगेच खालीं पडलें."

यांपैकीं सभासदाची बखर, शिवदिग्विजय व चिटणिसांची बखर हे तीनहि ग्रंथ शिवोत्तरकालीन आहेत. शिवसमकालीन व महाराजांनीं स्वत: आज्ञा केल्यामुळें लिहिण्यांत आलेला ग्रंथ केवळ शिवभारतच आहे. त्यामुळें तोच प्रमाण मानणें उचित आहे. त्याचाच अनुवाद कलमी बखर व तारीख ई शिवाजी यांनीं केलेला आहे. शिवाय अन्य कोणी मस्तक तोडलें असतें तर ती घटना इतकी महत्त्वाची आहे कीं मस्तक तोडणाऱ्याच्या नांवासंबंधांत इतके मतभेद राहिले नसते. या बखरींत संभाजी कावजी, येसाजी कंक कीं तानाजी मालुसरे यांच्यासंबंधांत मतभेद आहेत. त्यामुळें बखरकारांची माहिती केवळ ऐकीव दिसते. या सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार केला तर स्वत: शिवाजी महाराजांनीं, व तेंहि शिवभारतकार म्हणतात त्याप्रमाणेंच अफझलखानाचा शिरच्छेद केला हाच निष्कर्ष निघतो.

## कपटी कोण ?

छत्रपति शिवाजी महाराजांच्या या अफझलखानाच्या वधाच्या कृत्यासंबंधीं बरीच चर्चा आजवर झाली व अजूनहि होत असून नैतिक पातळीच्या दृष्टीनें या कृत्याबद्दल महाराजांना दोष देण्यांत येतो. त्याच्या मुळाशीं मुसलमान इतिहासकारांनीं या घटनेचें केलेलें विपर्यस्त वर्णन हें आहे. भेटीच्या वेळीं अफझलखानानेंच प्रथम वार केला या संबंधांत शिवसमकालीन व शिवोत्तरकालीन हिंदू इतिहासलेखकांत पूर्णपणें एकमत आहे. अर्थातच त्यांच्या मतें शिवाजी महाराजांनीं केलेला प्रतिकार हा स्वसंरक्षणासाठीं केलेला, आघाताचा प्रत्याघात ठरतो. त्यामुळें तो पूर्ण समर्थनीय व नैतिक दृष्ट्या अत्यंत योग्यच होय. मुसलमान लेखकांनीं मात्र वस्तुस्थितीचा बुद्ध्या विपर्यास करून अफझलखान हा महात्मा व हुतात्मा होता व शिवाजी मात्र विश्वासघातकीपणाचा केवळ पुतळा होता असें दाखविलें आहे, व त्यावर विश्वसून पुष्कळ पाश्चात्य लेखकांनींहि या प्रकरणाला विश्वासघातकी हत्येच्या सदरांत घातलें आहे

आम्हांला या साऱ्याच प्रकरणाविषयीं जें वाटतें तें सांगण्यापूर्वी शिवसमकालीन व शिवोत्तरकालीन हिंदू व मुसलमान लेखकांनीं या घटनेचें जें वर्णन केलें आहे तें येथें उद्धृत करणें अवश्य आहे. व त्यावरून गाजलेल्या इतिहासलेखकांनीं यासंबंधांत जे निष्कर्ष काढले आहेत त्यांचाहि परामर्श घेणें उचित आहे.

**सभासद** या प्रकरणाचें पुढीलप्रमाणें वर्णन करतो, "खानानें राजियाची मुंडी कवटाळून खाकेखालीं धरिली. आणि हातीची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली. तों अंगांत जरोची कुडती होती त्यावर खरखरली. राजियांनीं डावे हाताचें वाघनख होतें तो हात पोटांत चालविला."

**जेधे करीन्यांत** म्हटलें आहे कीं "भेटीचे समयीं अफझलखानानें राजश्री स्वामींची मान बगलेस धरिली. तेव्हां राजश्रींनी पंज्यास पोलादी नखें घातली होती त्याचा मारा करून आंतडी बाहेर काढिली."

**जेधे शकावलींत** यांपैकीं कशाचाच उल्लेख नसून "भेट समयीं एकांगी करून अफझलखान जिवें मारिला" येवढाच निर्देश केला आहे.

शिवभारतांत पहिली आगळीक खानाचीच असून आघाताचा प्रत्याघात म्हणूनच शिवाजी महाराजांनीं त्याला ठार केलें असें सांगितलें आहे. भारतकार म्हणतात:—

एवमुक्त्वा स तद्ग्रीवां धृत्वा वामेन पाणिना।
इतरेण च तत्कुक्षौ निचखान कटारिकाम् ॥ ३४

नियुद्धविच्छिवस्सद्यस्तद्धस्तोन्मुक्तकंधरः।
ध्वनिना धीरधीरेण प्रतिध्वानितकंदरः॥ ३५

प्रविशन्तीमात्मकुक्षिभागमभ्रान्तमानसः।
किञ्चिदाकुंचितांगस्तां शिवः स्वयमवंचयत् ॥ ३६
तन्निर्यातयितुं वैरं प्रवृत्तोऽसौ महाव्रतः॥ ३९

—(शिवभारत, अ. २१)

"असें बोलून अफझलखानानें शिवाजीची मान डाव्या हातानें धरून उजव्या हातानें त्याच्या कुशींत कट्यार खुपसली. बाहु-युद्धनिपुण शिवाजीनें लगेच त्याच्या हातांतून मान सोडवून घेऊन अत्यंत गंभीर ध्वनीनें दरी दुमदुमवून टाकली आणि गोंधळून न जातां आपलें अंग किंचित् आकुंचित करून आपल्या पोटांत घुस-णारी ती कट्यार चुकविली. नंतर त्या वैराचा प्रतिकार करावयास महाराज प्रवृत्त झाले."

मुसलमान लेखकांपैकीं खाफीखानानें अन्य तपशील सभासदाच्या बखरीप्रमाणेंच दिलेला असून प्रत्यक्ष वधाच्या घटनेसंबंधांत मात्र तो लिहितो कीं "भेटीच्या अटींत दोघांनींहि निःशस्त्र यावें, खानास शिवाजीनें खंडणी व नजराणा द्यावा आणि खानाबरोबर शिवा-जीनें जमल्यास विजापुरास जावें, असें ठरलें होतें. त्याप्रमाणें खान निःशस्त्र आला; पण शिवाजी घाबरल्याचा आव आणून खानाच्या पायां पडला; तेव्हां खान शिवाजीच्या पाठीवर हात ठेवून त्यास उठण्यास सांगणार होता. इतक्यांत शिवाजीनें त्याच्या पोटांत आपल्या हत्याराचा इतक्या जोरांत वार केला कीं खान तत्काळ मरण पावला."

बुसातीने सलातीन या विजापूरच्या इतिहासांत तर याहूनहि अधिक विपर्यास केला आहे. त्या ग्रंथांतील वृत्त पुढीलप्रमाणें आहे.

"अफझलखान दहा सहस्र सैन्यासह आला व त्यानें शिवाजीचा कांहीं प्रदेश हस्तगत केला. तेव्हां शिवाजीनें लीनतादर्शक पत्र पाठ-वून माफी मागितली. तेव्हां खानानें त्याच्याशीं सख्य केलें. नंतर शिवाजीनें खानास मेजवानीनिमित्त प्रतापगडावर बोलावलें; त्या-प्रमाणें खान फक्त बारा लोकांसह किल्ल्यांत येत असतां शिवाजीच्या हत्यारबंद लोकांनीं त्याच्यावर गर्दी करून त्याला ठार मारलें. तेव्हां आपल्यास कोणी आवरता नाहीं असें समजून खानाचें सैन्य सुसाट पळून गेलें."

शाहीर अज्ञानदास हा आपल्या पोवाड्यांत वर्णन करतांना पुढीलप्रमाणें म्हणतो.

इतकिया उपरी । अबदुल मनीं खवळिला पुरा ॥
कव मारिली अबदुल्यानें । सरजा गवसुन धरला सारा ॥
चालविली कट्यार । सीलवर मारा न चाले जरा ।
सराईत शिवाजी । त्यानें बिचव्याचा मारा केला ॥

## इतिहासपंडितांचे निष्कर्ष

या सर्व शिवसमकालीन व शिवोत्तरकालीन इतिहासलेखकांचें म्हणणें ध्यानांत घेऊन कै. सर जदुनाथ सरकार पुढीलप्रमाणें निष्कर्ष काढतात : "अफझलखानाला शिवाजीनें ठार मारलें याविषयीं दुमत नाहीं. पण कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं, शिवाजीनें हा खून केला. यांत शौर्य असें मुळींच नाहीं. या आरोपाचाहि विचार आपणांस येथेंच केला पाहिजे. अगदीं त्रयस्थ, निःपक्षपाती व समकालीन इंग्रज लेखकानें या प्रकारानंतर एकाच महिन्यानें म्हणजे ता. १० डिसेंबर १६५९ रोजीं लिहिलेल्या व राजापूर फॅक्टरींत विद्यमान असलेल्या पत्रांत 'शिवाजीशीं मैत्रीचें सोंग करून त्याला कबजांत' घेण्याबद्दल बडे साहेबिणीनें अफझलखानास हडसून खडसून सांगितल्याचें नमूद केलें आहे. सभासद आणि दत्ताजीपंत वाकेनिवीस या शिवकालीन लेखकांनींहि अफझलखान कपट करण्यास आला होता परंतु शिवाजीच्या विश्वासराव नानाजीसारख्या हेरांनीं त्याच्या गोटांत जाऊन ही अत्यंत गुप्त बातमी मिळवून आणली व अफझलखानाचा वकील कृष्णाजी भास्कर यानेंहि जवळजवळ असेंच सांगितलें असें आपापल्या बखरींतून लिहून ठेविलेलें आहे. या बखरलेखकांना शिवाजीबद्दल कितीहि प्रेम असलें तरी शिवाजीचे दोष त्यांनीं झांकून ठेविलेले नाहींत. अफझलखानाचा खूनच खरोखरी शिवाजीनें केला असता अथवा पहिला वार शिवाजीनेंच केला असता तरीहि हे बखरकार तसेंच लिहून ठेवण्यास कधींहि कमी न करते. अफझलखानाच्या मनांत कपट होतें व त्यानेंच प्रथम आगळीक करून जमदाड चालविली अशी त्यांची खात्री झाली असल्यानें त्यांनीं तसें लिहून ठेविलें आहे व तेंच खरें आहे. विसाव्या शतकांतील

विद्वान् लोक राष्ट्रीय पुरुषाच्या दोषांचेहि वाटेल तसें समर्थन करितात तसा प्रकार बखर लेखकांना ठाऊक नव्हता. जें सरळ दिसलें व बुद्धीला पटलें तेंच त्यांनीं लिहून ठेविलेलें आहे.

"जर शिवाजीच्या मनांतून अफझलखानास मारण्याचें नव्हतें तर त्यानें सैन्याची इतकी जुळवाजुळव कां केली असा प्रश्न कित्येक विचारतात. त्याला उत्तर असें कीं, प्रत्येक कार्यकर्ता असाच सावधगिरीनें वागतो. वाघाच्या शिकारीची तयारी ठेवूनच सशाच्या शिकारीला जातो आणि त्यांतच त्याच्या भावी विजयाचें बीज व आत्मप्रत्ययाची जाणीव असते. अशी तयारी शिवाजीनें केली नसती तर त्यांत त्याचा वेडेपणा दिसला असता. शिवाय खून, गुप्त कट हे प्रकार पडत्या बादशाहींत होतात. उगवत्या साम्राज्यांत कधींहि होत नाहींत हें कोणताहि इतिहास सांगू शकेल. विजापूरची बादशाही डबघाईला आली होती व मराठ्यांचें साम्राज्य उदयाचलावर येत होतें. अशा स्थितींत अफझलखानाचा झालेला मृत्यु हा खून नसून वधाच्याच सदरांत जातो. या बाबतींत शिवाजीला दोष देण्यासाठीं म्हणून विजापूरच्या इतिहासकारानें अफझलवधाची घडलेली यथातथ्य गोष्ट लपवून 'शिवाजीनें खानास भोजनास बोलावून विषप्रयोग केला व त्यामुळें त्याला मृत्यु आला' इत्यादि अगदींच बनावट हकीकत लिहून ठेविलेली आहे. त्यावरूनच स्पष्ट दिसतें कीं, विजापूरकराला सुद्धां सरळ मार्गानें शिवाजीला या प्रकरणीं दोष देतां आला नाहीं. विश्वासघातास प्रवृत्त झालेल्या अफझलखानाशीं शिवाजी अगदीं सरळपणें वागला असता, तर इतिहासकारांनीं त्यालाच दोष दिला असता."

'अफझलखानाच्या मनांतून जर विश्वासघातच करावयाचा होता तर त्यानें त्या बेतानें आपलें सैन्य तयार कां ठेविलें नाहीं?' असा एक प्रश्न प्रो. रहमान यांनीं विचारलेला आहे. त्यावर असें उत्तर आहे कीं, 'अफझलखानाचा स्वतःच्या बळावर फाजील विश्वास व शिवाजीच्या शक्तीचा चुकीचा अंदाज अशीं याला दोन कारणें आहेत. या दोनहि बाबतींत खान गाफील राहिला. पहिल्याच

भेटींत शिवाजीला आपण चिरडून टाकूं व पुढारी मारला गेल्यावर फौज कसली लढते या घमेंडींतच खान राहिला. शिवाय नेताजी पालकर आणि मोरोपंत हे आपापल्या फौजांनिशीं मोठमोठ्या मजली मारून आपल्याजवळ येऊन ठेपले आहेत याची खानाला दादही नव्हती. या एकंदर गैरसावधगिरीमुळें व फाजील आत्मविश्वासामुळें खानाचा नाश झाला. सारांश (१) खानानेंच प्रथम कपट करण्याचें योजिलें होतें. (२) खान फाजील आत्मविश्वासानें पछाडला गेला होता. (३) शिवाजीच्या बळाची व तयारीची त्याला कल्पना नव्हती. तरीहि (४) खानानेंच प्रथम आगळीक करून हत्यार चालविलें. (५) त्यामुळें हिऱ्यानें हिरा कापावा तसें शिवाजीनें खानास ठार केलें." --(शिवाजी व शिवकाल पृ. ५३, ५४ ५५,)

शिवाजी महाराजांना गुप्तपणें विषप्रयोग करण्याच्या आज्ञेविषयीं औरंगजेबाची अभ्यर्थना करणारें मिर्झा राजा जयसिंगाचें पत्र उद्धृत करून कै. सरकार विचारतात "अफझलखानाच्या भेटींत खानानें शिवाजीला ठार मारिलें नसतें असें कित्येक भोळे लोक म्हणतात, त्यांनीं स्वतःची राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठीं जयसिंग शिवाजीचा खून करण्यास तयार झाला होता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे." —(शिवाजी व शिवकाल पृ. १२०)

## डॉ. बाळकृष्णांचें तेजस्वी प्रतिपादन

'शिवाजी धि ग्रेट' या बृहत् ग्रंथाचे लेखक, विख्यात इतिहासज्ञ व कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे माजी प्रिन्सिपाल कै. डॉ. बाळकृष्ण यांनीं आपल्या शिवचरित्राच्या चवथ्या खंडांत या प्रकरणावर पुढीलप्रमाणें मत प्रतिपादन केलें आहे.

" Starting with the supposition that Shivaji did use treachery in killing Afzalkhan, we see no reason to condemn him This war was a life and death struggle

for both Shivaji and Khan. The former had to face a formidable army sent by Bijapur to destory his infant Swaraj and to murder him. It was his duty to save himself and his kingdom by all means, as everything is fair in love and war. Secondly, the Khan had been the cause of the murder of Shivaji's elder brother; He had led Shahaji in fetters to Bijapur. He was guilty of desecrating the Hindu temples and of the inhuman murder of his numerous wives, he was the enemy of Maratha Swaraj and was pledged to restore Javli to the surviving scion of the More family; and lastly, he had taken a solemn vow to carry Shivaji alive or dead to Bijapur. Shivaji should not be condemned for his success in entrapping such a foe in his clutches and finally assassinating him. Thirdly, he believed himself to be a divine agent for establishing a Hindu Kingdom in Maharashtra. His success meant the existence and growth of this new Raj. His death entailed its total destruction Shivaji was trying to bring in a revolution. Every revolution is fostered by subterranian propaganda, secret massacres, and satanic atrocities. Secrecy and treachery are the very soul of a revolution. Shivaji was justified in following all these methods to bring the revolution to a successful issue. The hands of Lenin, Stalin, Mussolini and Hitler are dyed red with the blood of thousands of innocent people. Shivaji was mercy itself in comparison to the horrors perpetrated by the Bolsheviks in establishing their supremacy in Russia.

Afzal Khan had been guilty of treacherously murder-

ing the Nayak of Sirapatan whom he had invited to a conference. (Shivaji P. 111)

Ali Adilshah was guilty of murdering Bahalol Khan treacherously (Shivaji Vol. I P. 95). He and the queen-mother murdered several ministers by some treacherous means upto 1658.

.... In such vicious atmosphere of national morality, it is hard to believe that Afzal Khan intended no harm to Shivaji; that he had come there like an innocent lamb to be murdered by the Maratha wolf.

We are told thrice by Sabhasad that Shivaji was to be captured alive and that he was informed of the secret plans of the queen and the General by friendly nobles of Bijapur.

The firman to Kanhoji Jedhe mentions that Shivaji and his followers are to be exterminated.

Both these facts are fully borne out by an impartial Dutch document. This evidence is so explicit and unequivocal that all later accounts have to be ignored before it.

" He commanded thither the noble Lord Abdulkhan his General, with an awful army with an express order that he should destroy the above-mentioned Shivaji by the strength of his arms or he should rob him of his life as possible with sweet words and great promises and affirmations of unmingled friendship. This resolution has been plainly communicated to him by a most pro-mient councellor of the Vijapur court, warning the above named Sivajie not to trust in the noble Lord Abdulkhan who was sent for no other purpose but to ruin him. (lit. to fetch his head.)

In this war of diplomacy Shivaji outwitted the Khan and successfully despatched him to the other world. This is described as treacherous murder, but it was really a preventive murder or a murder in self-defence. It is permitted by ancient and modern laws and the Hindu books on polity.

If Shivaji merely wanted to murder Afzal khan even at the place of meeting, he could have easily done it through his hidden men. The chitragupta says that he kept forty heroes hidden in a subterranean cell in the Mandap. He could have given them a sign to fall upon Afzal and cut him to pieces just before his appearance on the scene. Why should he at all have endangered his own life in an interview wherein the issue was doubtful and the odds were against him? It is therefore evident that he came fully prepared for the worst; but not for treacherously murdering the Khan.

In short, Shivaji murdered the Khan in self-defence but the Muslims represented this as a treacherous murder. They were the rulers of the day. The Maratha leader was known as an arch rebel, a disturber of the peace of the Muslim Kingdoms. Hence their version was accepted by the contemporaries. The belief of the people was confirmed by the secret surprise of Shaistakhan and the sudden invasion of Surat The contemporary European writers describing the incident of Afzal Khan, merely followed the popular version of the ruling classes. Their hear-say opinion is not a biblical truth, and need not be taken seriously by us"

– (Shivaji the great Vol. 2, Part 2, P. 31, 32, 33, 35, 38,39)

"अफझलखानाला शिवाजीनें कपटानेंच मारलें असें गृहीत धरून जरी या प्रकरणाचा विचार करावयाचा प्रारंभ केला तरी त्यांत शिवाजीला दोष देण्याचें कांहीं कारण आहे असें आम्हांला वाटत नाहीं. हा संघर्ष अफझलखान व शिवाजी या दोघांच्याहि दृष्टीनें जीवनमरणाचाच होता. आपल्या चिमुकल्या स्वराज्याला चिरडून टाकण्यासाठींच चालून आलेल्या विजापूरच्या प्रचंड सैन्याशीं धडक देण्याचा प्रश्न शिवाजीसमोर होता. स्वराज्याला धुळीला मिळविणें व शिवाजीला ठार मारणें हीं या सैन्याचीं दोन उद्दिष्टें होतीं व तीं शिवाजी जाणून होता. हवीं तीं साधनें वापरून आपलें व आपल्या 'स्वराज्याचें' संरक्षण करणें हेंच शिवाजीचें त्या वेळीं खरें कर्तव्य होतें. साधनें व मार्ग यांच्या स्वरूपाचा विचार अगदींच नगण्य होता. कारण प्रेम व युद्ध यांत सर्वच साधनें शेवटीं योग्य ठरतात. दुसरी गोष्ट म्हणजे अफझलखान काय होता हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे. अफझलखानामुळेंच (कनकगिरीच्या वेढ्यांत) शिवाजीचा वडील भाऊ संभाजी याची हत्या झालेली होती. त्यानेंच शिवाजीचे वडील शहाजीराजे यांना अपमानास्पद स्थितींत बेड्या घालून विजापूरला बंदी म्हणून नेलें होतें. हिंदू धर्ममंदिरांचा विध्वंसक व आपल्या स्त्रियांना अकारण निर्दयपणें ठार मारणारा नृशंस स्त्रीहत्यारी म्हणून अफझलखानाला जग ओळखीत होतें. तो हिंदवी स्वराज्याचा शत्रु होता, व जावळीवर मोरे घराण्याची प्रतिष्ठापना करण्यासाठीं वचनबद्ध झालेला होता. त्यानें शिवाजी जिवंत अथवा मेलेल्या स्थितींत घेऊन येण्याची प्रतिज्ञा विजापूरच्या राज्यसभेंत केलेली होती असा भयानक शत्रूला आपल्या जाळ्यांत पकडण्यांत व शेवटीं त्याला ठार मारण्यांत शिवाजी यशस्वी झाला म्हणून त्याला दोष देत बसणें क्वचित योग्य ठरत नाहीं. महाराष्ट्रांत हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यासाठीं देवानेंच आपल्याला निर्माण केलें आहे अशी शिवाजीची दृढ श्रद्धा होती, नवोदित स्वराज्याचें अस्तित्व व विकसन केवळ त्याच्या यशावरच अवलंबून होतें. शिवाजीच्या विनाशांत या गोष्टींचा सर्वनाश निश्चितच होता. शिवाजी एका महान

क्रांतीचा अग्रदूत होता; व ती क्रांति यशस्वी करण्याचें दायित्व त्याचेंच होतें. प्रत्येक क्रांति ही प्रचारतंत्र, गुप्तसंहार व भयंकर घातपातादि प्रकारांनीं भरलेलीच असते. गुप्तपणा व कपट हें क्रांतीच्या यशस्वितेंत प्राणभूतच असतें. एक महान् क्रांति यशस्वी करण्याच्या उद्देशानें प्रेरित होऊन शिवाजीनें केलेला या सर्व मार्गांचा अवलंब पूर्णपणें समर्थनीय आहे. उलट, लेनिन, स्टॅलिन, मुसोलिनी व हिटलर या सर्व आधुनिक क्रांतिनेत्यांचे हात तर सहस्रावधि निरपराध लोकांच्या रक्तानें ओलेंचिंब झालेले आहेत. रशियामध्यें स्वत:चें वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठीं बोल्शेव्हिकांनीं जी भयानक कृत्यें केलीं त्यांच्याशीं तुलना केली तर शिवाजीला मूर्तिमंत दयाच म्हणावें लागेल.

"शिरापट्टणचा राजा (कस्तूरीरंग) याला भेटीला बोलावून विश्वासघातानें अफझलखानानें ठार मारल्याचा त्याचा इतिहास आहे. विजापूरचा सुलतान अली आदिलशहा यानें विश्वासघातानें बहलोलखानाला ठार मारलें. हा सुलतान व त्याची आई बडी साहेबीण यांनीं सन १६५८ मध्यें कित्येक मंत्र्यांना व मुत्सद्द्यांना विश्वासघातानें ठार मारलें. अफझलखान व त्याचे धनी यांची राजनैतिक अध:पतनाची ही काळीकुट्ट पार्श्वभूमि ध्यानांत घेतली तर अफझलखानाच्या मनांत शिवाजीविषयीं कांहींही काळेंबेरें नव्हतें व या मराठा लांडग्याच्या भक्ष्यस्थानीं पडावयास एकाद्या बापड्या व निरुपद्रवी कोंकराप्रमाणें तो आला होता या म्हणण्यावर विश्वास ठेवणें अत्यंत जड जाईल.

"बडी साहेबीण व सेनापति अफझलखान यांची शिवाजीला जिवंत पकडून नेण्याची योजना होती या गोष्टीचा सभासदानें तीन वेळां उल्लेख केला आहे. इतकेंच नव्हे तर विजापूरच्या राजसभेंत असलेल्या शिवाजीच्या हितचिंतकांनीं शिवाजीला ही गोष्ट कळविलेली होती असेंहि सभासद म्हणतो.

"शिवाजी व त्याचे साहाय्यक यांचा पूर्ण नि:पात करण्यासाठींच अफझलखानाला त्याच्यावर ससैन्य पाठविण्यांत येत आहे याचा

उल्लेख अली आदिलशहानें कान्होजी जेधे यांना पाठविलेल्या आज्ञापत्रकांत तर स्पष्टच आहे.

"तत्कालीन डचांच्या निःपक्षपाती पत्रव्यवहारांतून या दोन्ही गोष्टींना भरपूर दुजोरा मिळतो. हा डचांच्या पत्रव्यवहारांतील उल्लेख इतका स्पष्ट व संशयातीत आहे कीं या शिवसमकालीन प्रमाणासमोर मागाहूनच्या लेखनांतून आढळणारें प्रतिपादन पूर्णपणें दुर्लक्ष करण्याच्या योग्यतेचेंच ठरतें. (डचांच्या पत्रव्यवहारांतील हें पत्र वेंगुर्ला येथील त्यांच्या कचेरींतून दि. ५ मे १६६० ला म्हणजे अफझलखानाच्या वधानंतर सहा महिन्यांनीं त्यांच्या गव्हर्नर जनरलला पाठविण्यांत आलेलें आहे. त्यांतील पुढील महत्त्वाचा परिच्छेद पहा. 'विजापूरचा सेनापति अफझलखान याच्याबरोबर प्रचंड सैन्य देण्यांत आलें होतें, व या सेनापतीला सुलतानाची अशी स्पष्ट आज्ञा होती कीं, त्यानें एकतर आपल्या सैनिक सामर्थ्यानें पूर्वोक्त शिवाजीला पूर्णपणें चिरडून टाकावें किंवा तें जमण्यासारखें नसेल तर मित्रत्वाचा भपका दाखवून व त्याला हवीं तीं आमिषें दाखवून आणि गोडगोड थापा देऊन विश्वासघातानें ठार मारावें. विजापूरच्या राजसभेंतील एका अत्यंत महत्त्वाच्या मुत्सद्द्यानेंच ही वार्ता शिवाजीला अगोदरच कळविली व केवळ त्याच्या संपूर्ण निःपातासाठींच येत असलेल्या अफझलखानावर मुळींच विश्वास ठेवूं नये अशी सावधानतेची सूचना दिली. (शिवाजीचें मस्तक कापून आणण्याचीच आज्ञा होती.)'

"अशा या कपटनीतीच्या युद्धांत शिवाजीनें अफझलखानावर पूर्णपणें मात केली व त्याला परलोकांत पाठवून दिलें. याला पुष्कळ लोक (अज्ञानानें) कपटानें केलेली हत्या असें म्हणतात. वस्तुतः हा संरक्षक वध अथवा स्वसंरक्षणार्थ केलेला वध होय. राज्यशास्त्रावरील हिंदुग्रंथांत आणि प्राचीन व अर्वाचीन निर्बंधशास्त्रांत Laws) अशा हत्त्येला पूर्णपणें संमति देण्यांत आलेली आहे.

"जर भेटीच्या वेळीं केवळ अफझलखानाची हत्याच शिवाजीला अभिप्रेत असती तर आपल्या भेटीच्या जागीं लपविलेल्या गुप्त

सैनिकांकडून शिवाजीला ती सहज करविता आली असती. चित्रगुप्तानें असें म्हटलें आहे कीं, 'मंडपाच्या परिसरांतच शिवाजीनें आपलीं चाळीस निवडक शूर माणसें लपवून ठेविलीं होतीं.' प्रत्यक्ष मंडपांत पदन्यास करण्यापूर्वी शिवाजीला आपल्या लोकांना खूण करून, तेथें आधींच असलेल्या अफझलखानाचे तुकडे तुकडे करतां आले असते, मग त्यानें जेथें संशयास्पदता होती व सर्व प्रकारचीं संकटें होतीं अशा प्रत्यक्ष भेटीचा प्रसंग ओढवून आपलें जीवित संकटांत कशास्तव टाकलें असेल? याचाच अर्थ असा होतो कीं, येणाऱ्या सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देण्याची पूर्ण सिद्धता करूनच शिवाजी भेटीच्या स्थळीं गेला असला तरी खानाची कपटानें हत्या करणें हा कांहीं त्याच्या त्या भेटींतील पूर्वनियोजित हेतु नव्हता.

"थोडक्यांत म्हणजे, शिवाजीनें अफझलखानाची हत्या स्वसंरक्षणासाठीं केली; पण मुसलमान लेखकांनीं तिला कपटानें केलेली हत्या म्हणून कपटानें रंगविलें. ते त्या वेळचे राजे होते. शिवाजी हा त्यांच्या परिभाषेप्रमाणें महान् बंडखोर व मुसलमानांच्या राज्यांतील शांततेला धक्का पोहोंचविणारा उपद्रवकारी होता. स्वाभाविकपणेंच तत्कालीन लोकांनीं राज्यकर्त्यांचा हा दृष्टिकोन मान्य केला. शाहिस्तेखानावरील अकस्मात् आक्रमण व सुरतेवरील अचानक स्वारी यांनीं हा समज अधिकच दृढमूल झाला. समकालीन पाश्चात्य लेखकांनीं अफझलखानाच्या वधाच्या प्रकरणाविषयी लिहितांना राज्यकर्त्यांच्या या दृष्टिकोनाची, स्वाभाविकपणेंच री ओढली पण ऐकीव माहितीवर आधारलेलीं हीं विधानें म्हणजे खरें सत्य नव्हे; त्यामुळें आपल्याला त्याचा गांभीर्यानें विचार करण्याचीहि फारशी आवश्यकता नाहीं."

## आमचें मत

आमच्या मतें हा सारा वादच व्यर्थ आहे. महंमद बिन कासीमपासून हिंदुराष्ट्राच्या हृदयावर एकसारखे यावनी वारच होत होते केवळ प्रतिवारच काय तो झाला नव्हता. तो छत्रपति शिवाजी

महाराजांनीं केला. त्यामुळें पहिला वार कोणी केला हा या घटनेंत मुळींच महत्वाचा प्रश्न नाहीं. दुसरें असें कीं, प्रत्यक्ष आपल्या पांच-भौतिक शरीरावर वार झाला तरच मी शत्रूवर वार करीन, एरवीं त्यानें माझ्या श्रद्धा-स्थानांची धुळधाण केली, माझ्या देव-देवतांचीं मंदिरें व मूर्ति विध्वंसिल्या, माझ्या कुलस्त्रियांची हवी तशी विटंबना केली, माझें राष्ट्र धुळीला मिळविलें तरी मी हात म्हणून उचलणार नाहीं असें म्हणण्याइतके छत्रपति शिवाजी महाराज कांहीं देहात्मवादी नव्हते. एरवीं हिंदवी स्वराज्याच्या प्रस्थापनेच्या भानगडींत ते पडलेच नसते. मग अनाहूतपणें शाहिस्तेखानाच्या निवेशांत शिरून त्यांनीं त्याच्यावर जीवघेऊ वार करण्याचें तरी काय प्रयोजन असूं शकतें? राजकीय बुद्धिमत्ता असलेला पुरुष प्रतिपक्षानें प्रत्यक्ष वार करीपर्यंत कधींच थांबत नसतो. कारण पहिलाच वार जर जीवघेऊ असला व मर्मावर बसला तर सारा ग्रंथच आटोपण्याचा संभव असतो. कोणता बुद्धिमान् मनुष्य ही भलती सर्वनाशक विपत्ति स्वत:वर आपण होऊन ओढवून घेईल? अफझलखानाच्या कट्यारीचा जो पहिला वार होता तोच जर मर्मीं बसला असता तर! पहिला वार स्वत:वर घेण्यांतली विपत्ति न ओळखण्याइतका अदूरदर्शीपणा शिवछत्रपतींच्या पदरीं बांध-ण्याचा अट्टहास करणाऱ्या या लेखकांना काय म्हणावें? श्रीशिवाजी महाराजांच्या जन्मसिद्ध सावधानतेचा विचार केला तर जेधे शकावलींतील "भेटीसमई एकांगी करून अफजलखान जिवें मारिला." या सूचक व बोलक्या वाक्यावरच विराम घेणें योग्य होईल. खान कपटी आहे व त्याच्या मनांत आपला प्राण घेण्याची प्रबळ इच्छा आहे ही गोष्ट स्पष्टपणें ध्यानांत आल्यावर महाराज त्याला वार करण्याची संधि देऊन आपला प्राण व्यर्थ संकटांत घालतील असें वाटत नाहीं.

## महाराजांची घोडदौड

अफझलखानाच्या वधानें विजापूरच्या सत्तेचें कंबरडेंच मोडल्या-सारखें झालें. अफझलखान ज्या आवेशानें निघाला होता त्यामुळें

या स्वारींत शिवाजी व त्याचें स्वराज्य रसातळाला जाणार अशी केवळ विजापूरकरांचीच नव्हे तर दिल्लीच्या बादशहापासून तर पोर्तुगीज, इंग्रज इत्यादि परकीय राष्ट्रिकांचीहि निश्चित धारणा झाली होती. त्यामुळें या कल्पनेनें सगळ्यांनाच हादरा बसून ते आश्चर्यमूढ बनले. प्रतापराव मोऱ्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें अफझल-खानाचा वडील मुलगा फाजलखान व त्याच्या सोबत्याचे मुसेखान प्रभृति सेनानी कसेबसे जावळीचें निबिड अरण्य पार करून वाईंत परतले व तेथील जनानखाना व नेववेल तेवढी संपत्ति बरोबर घेऊन त्यांनीं त्या रात्रींच विजापुराकडे घोडदौड प्रारंभिली. त्यांच्या आगमनासरशीं सारें विजापूर शोकांत बुडालें व सर्वांचेच मनो-रथाच्या पत्त्यांचे प्रासाद पार भुईसपाट झाले. फाजलखानाचें भाग्य म्हणूनच त्या रात्रीं प्रयाणाची बुद्धि सुचल्यामुळें तो वांचला. कारण तो गेल्यावर कांहीं घटकांनीं शिवछत्रपतींचे सेनापति नेताजी पालकर ससैन्य वाईंत उतरले. अफझलखानाच्या वाड्याला नेताजीनें एकदम सैन्याचा वेढा दिला. पण त्याला फाजलखान विजापूरकडे पळून गेल्याचें कळलें. नेताजीनें त्याचा तत्काळ पाठ-लाग सुरू केला, पण फाजलखान पाठलागाच्या मर्यादेपलीकडे गेलेला असल्यामुळें नेताजीला परत तसेंच वाईला यावें लागलें.

अफझलखानाच्या वधामुळें विजापूरच्या राज्यांत माजणाऱ्या अव्यवस्थेची व गोंधळाची महाराजांना पूर्णपणें कल्पना होती. त्या संधीचा लाभ घ्यावयाचें महाराजांनीं निश्चित करून त्याच रात्रीं पांच सहस्र मावळ्यांच्या सेनेसह ते प्रतापगडाहून वाईला आले. येतांच त्यांनीं नेताजीला सैन्यासह विजापूरच्या रोखानें चाल करावयास आज्ञा केली. दोरोजी नांवाच्या आपल्या दुसऱ्या सेना-नीला त्यांनीं कोंकणांत स्वारी करावयास सांगितलें. व आपली पांच सहस्र मावळी सेना घेऊन स्वतः पन्हाळा दुर्गाच्या रोखानें त्यांनी चाल केली. चंदन वदन हे दोन किल्ले, खटाव, मायणी, रामापूर कलेढोण, वाळवे, हलजयंतिका, अष्टी, अष्टें, वडगांव, बेलापूर, औदुंबर, मसूर, सुपें, तांबे, पाली, नेरलें, कामेरी, विसापूर, सावे,

उरण, कोळें व कोल्हापूर हा सर्व प्रदेश अवघ्या पंधरा दिवसांत जिंकून व तेथें नीट व्यवस्था लावून शिवछत्रपतींनीं पन्हाळ्याला वेढा दिला व २८ नोव्हेंबर १६५९ ला पन्हाळ्यावर स्वराज्याचा ध्वज उभारला. - त्या रात्रींच त्यांनीं गडाची पाहणी पूर्ण करून आवश्यक तेथें तटबंदी करण्याच्या कामाला प्रारंभ केला. नेताजीहि विजापूरकरांचा प्रदेश उद्ध्वस्त करून व रायबाग लुटून महाराजांना पन्हाळ्याला येऊन मिळाला.

## विजापूरकरांचा दुसरा पराभव

अफझलखानाच्या वधाच्या धक्क्यांतून विजापूरचें राज्य सांवरतें न सांवरतें तोंच पन्हाळा गेल्याची वातमी येऊन धडकली त्याबरोबर रुस्तुमेजमान व फाझलखान यांच्या नेतृत्वाखालीं नवी दहा सहस्र सेना खंद्या सेनानींसह शिवाजी महाराजांवर पाठविण्यांत आली. बापाच्या वधाचा सूड घेण्यासाठीं फाजलखान तळमळत होता, व इंग्रजांच्या पत्रव्यवहारांतील उल्लेखाप्रमाणें रुस्तुमेजमान आंतून शिवाजी महाराजांचा मित्र असला तरी महाराजांनीं या स्वारींत त्याच्या जहागिरीच्या प्रदेशाचेच लचके तोडलेले असल्या-मुळें त्याच्याहि अंगाचा तिळपापड उडाला होता. या सैन्यांत फाजलखान, मलिक इतबार, सादतखान, फत्तेखान, मुल्लाहय, संताजी घोरपडे, सर्जेराव घाटगे हे सेनानी रुस्तुमेजमानच्या हाता-खालीं होते. सैन्य पन्हाळ्यावर चालून येतांच शिवछत्रपतींच्याच आधिपत्याखालीं स्वराज्याचे सैनिक त्यांच्यावर तुटून पडले. या युद्धांत महाराजांच्या बाजूला सेनापति नेताजी पालकर, जाधवराव, खराटे पितापुत्र, नाईकजी पांढरे, सिद्दीहिलाल, हिराजी इंगळे, भिमाजी वाघ, सिधोजी पवार गोपाजी जगताप, महाडीक हे योद्धे होते. युद्धाला तोंड लागलें न लागलें तोंच नेताजीचा आघात असह्य होऊन फाजलखानानें पहिल्यांदा पळ काढला. रुस्तुमे-जमाननें पुष्कळ वेळपर्यंत टिकाव धरला. पण शेवटीं शिवछत्रपतींच्या आघातांनीं जर्जर होऊन त्यानेंहि फाजलखानाचेंच अनुकरण केलें.

मुख्य सेनापतीच पळूं लागल्यावर कोण टिकाव धरणार? स्वराज्याच्या सैनिकांनीं या पळणाऱ्या सैन्याची चालविलेली लांडगेतोड महाराजांनींच थांबविली. त्यांनीं दयाबुद्धि दाखविली नसती तर रुस्तुमेजमानला जिवंत जाण्याची शक्यताच नव्हती. या युद्धांत शिवछत्रपतींना उत्कृष्ट हत्ती मिळाले. या लाभाचें काव्यपूर्ण वर्णन करतांना कवीन्द्र परमानंद म्हणतो--

येऽस्मानप्यपहाय हन्त समरे सद्योपयाताः स्वयम् ।
भूयोऽप्याश्रयितुं त्रपाविरहितान् लज्जामहे तान् वयम् ।।
मन्वानाः सुतरामितीव हृदये ते येदिलानीकिनी- ।
मत्तेभाः सबलं शिवं भृशबलं भेजुः शरण्यं प्रभुम् ।। ७५

--(शिवभारत, अ. २४)

"जे आम्हांस युद्धांत सोडून स्वतः लगेच पळून गेले त्या निर्लज्जांचा पुन्हां आश्रय करण्याची आम्हांस लाज वाटते" असाच जणूं काय निर्धार करून त्या आदिलशहाच्या सेनेंतील मस्त हत्तींनीं शरणांगतांचें रक्षण करणाऱ्या बलाढ्य भोसले राजाचा आश्रय केला."

## दोरोजीची कामगिरी

शिवछत्रपतींनीं स्वतः वाईहून पन्हाळ्याकडे चाल करून जाण्यापूर्वी आपला एक सेनानी दोरोजी याला कोंकणांत पाठविल्याचा उल्लेख यापूर्वी केलेलाच आहे. अफझलखान ज्या वेळीं वाईंत आला त्या वेळीं त्याचीं माल भरलेलीं तीन गलबतें दाभोळच्या बंदरांत होतीं. त्या वेळच्या दाभोळच्या सुभेदाराचें नांव महमूद शरीफ होतें. अफझलखानाच्या वधानंतर विजेता म्हणून त्याच्या संपत्तीवर महाराजांचा अधिकार होता. त्याच्या मालांनीं लदबदलेल्या गलबतांकडे महाराजांनीं आपली दृष्टि वळविली. दोरोजीनें त्यांचा संकेत ओळखून दाभोळवर चाल केली. त्याबरोबर तेथील सुभेदार महमूद शरीफ यानें तिन्ही गलबतें राजापूरला पाठवून दिलीं व स्वतःहि तेथेंच रहावयास गेला. दाभोळ जिंकून दोरोजीनें

राजापूरकडे दृष्टि वळविली. त्यासरशीं तो सुभेदार घाबरला व त्यानें राजापूरच्या इंग्रज वखारीचा मुख्याधिकारी हेन्री रेव्हिग्टन याला तीं गलबतें स्वत:चींच आहेत अशी बतावणी करून संभाळण्याविषयीं विनविलें. हेन्री रेव्हिग्टननें त्यांपैकीं एक गलबत ठेवून घेतलें. सुभेदार मात्र उरलेलीं दोन तेथेंच टाकून वेंगुर्ल्याला पळून गेला. दोरोजीनें तेथें येतांच अफझलखानाच्या गलबतांचा शोध चालविला. शेवटीं त्याला इंग्रजांचा संशय येतांच त्यानें त्यांना त्या गलबतांची मागणी केली. इंग्रजांनीं आपल्या स्वभावानुसार त्रयस्थ व्यापाऱ्याची भूमिका घेऊन कानांवर हात ठेविले. त्याबरोबर दोरोजीनें संतापून इंग्रजांचा माल जप्त करून फिलिफ गिफर्ड नांवाच्या एका अधिकाऱ्याला अटक केली. राजापूरच्या वखारींतून सुरतला लिहिलेल्या पत्रांतील पुढील परिच्छेद या घटनेवर उत्तम प्रकाश टाकतो. तो परिच्छेद पुढीलप्रमाणें —

" राजापूरला पांच सहाशें व जैतापूरला दोनशें अशीं शिवाजीचीं माणसें अफझलखानाचीं गलबतें ताब्यांत घेण्यास आलीं व त्या कामीं आमची मदत मागूं लागलीं. तें आम्ही नाकारलें. " आम्ही हिशेब पुरा करण्याकरितां आलों आहोंत ; तें काम झाल्यावर तुम्ही वाटेल तें करा " असें सांगितल्यामुळें शिवाजीचे लोकांना राग आला, पण सुभेदारांना (महमूद शरीफ) धीर वाटून त्यांनीं दोन तीन जहाजें आमचे ताब्यांत देण्याचें बोलणें लाविलें. परंतु आमच्या राहिलेल्या रकमेची फेड होईपर्यंत फक्त एकच आम्ही ताब्यांत घेतलें, व तें इंग्रजांचें आहे असा लेख शिवाजीच्या लोकांना दाखविण्याकरितां तयार केला. सुभेदाराच्या लोकांना इंग्रजांनीं वेंगुर्ल्याला पोंचवावें हें त्याचें मागणें इंग्रजांना कबूल करतां येईना. कारण शिवाजीला त्याचा जाब द्यावा लागला असता. राहिलेलीं दोन गलबतें घेऊन त्यांनी सुरत किंवा दुसऱ्या कोणत्या तरी मोंगली बंदरांत जावें ही आमची सूचना त्याला अमलांत आणतां येईना. कारण गलबतावरील लोकांनीं शिवाजीचे नांवानें बंड करून गलबत ताब्यांत ठेविलें. या आपत्तीमुळें एक भाड्याचें जहाज करून

रेव्हिंग्टनचें शिफारसपत्र घेऊन तो सुभेदार वेंगुर्ल्याला गेला आणि तेथें डचांच्या रक्षणाखालीं आहे.

"हेन्री रेव्हिंग्टन किनाऱ्यावर उतरला; आणि शिवाजीच्या माणसांना झालेल्या व्यवहाराची माहिती देऊन 'आपण व्यापारी असल्यामुळें कोणतीहि बाजू घेणें इष्ट नाही' वगैरे सांगून राजापूरला गेला. . . . .

गलबत परदेशांत व्यापाराकरितां पाठविण्यास आमचेजवळ पैसा नाहीं; इत्यादि विचार करून आम्हीं राजापूरला परत आलों. तों (शिवाजीच्या) सेनापतीला आमच्याशीं बोलणें करावयाचें आहे असें समजलें. सकाळीं रँडॉल्फ टेलर गेला. सुभेदाराबद्दल विचारणा झाली. तो निघून गेल्याचें नक्की सांगण्यांत आलें. मोंगली गलबतें ताब्यांत घेण्याचें आम्ही साफ नाकारलें. मग आमचे ताब्यांतील गलबत आणि माल त्यानें मागितला. मालाचे पैसे देण्याचें त्यानें वचन दिल्यावरून आम्ही फक्त माल देण्यास कबूल झालों. परतु त्या बाबतींत नक्की लिखाण व्हावयाचें राहिलें. पुढें दंडाराजापूरचा किल्ला, खजिना इत्यादि घेण्यांत शिवाजीला इंग्रजांनीं मदत करण्याबद्दल बोलणें निघालें. तेथून आम्हीं जैतापुरास गेलों, शिवाजीचे नांवानें बंड करणाऱ्या गलबतांच्या लोकांनाहि शिवाजीचे लोक आपल्या बायकापोरांची अब्रू घेतील अशी भीति वाटून, फिरून एकमत करून मराठ्यांच्या डोळ्यादेखत दोन्ही किनाऱ्यावरील मराठ्यांच्या बंदुकांच्या माऱ्याच्या पलीकडे जाऊन त्यांनीं नांगर टाकिला. मराठ्यांनीं चिडून जैतापूरांतील आमच्या दलालाला पकडलें. त्यांना सोडलें नाहीं तर तोफा डागण्याची आम्ही दहशत घालतांच दलालाला पुढें घालून ते एका टेकडीकडून पळाले. थोडा पाठलाग करून आम्ही गिफर्ड आणि एक कप्तान, दलालाला परत पाठवा म्हणून सांगण्यास पाठविला तों त्यांनीं गिफर्डलाहि गिरफदार करून कप्तानाचे हातीं 'पुढें येऊ नका' असा इशारा दिला. आणि रात्रीं २०० शिपाई घेऊन ते खारेपाटणाकडे गेले तेथून गिफर्डचें पत्र आलें आहे. गलबतें

आणि माल मराठ्यांचे हवालीं केल्याशिवाय ते कैदी सोडण्यास तयार नाहींत. याबद्दल तुम्हीं आपलें मत द्यावें . . आमचे लोक कैदी झाले तरी हरकत नाहीं. ते त्यांना फार तर किती दिवस ठेवतील? शिवाजीकडून आम्हीं सुटकेचें पत्र आणून लावीपर्यंत! शिवाजी इतका मोठा आणि उदार आहे कीं असल्या अन्यायाच्या सबबीवर हे कैदी ठेवणार नाहीं . . . . अन्यायानें मराठ्यांचें मागणें मान्य केलें तर आपल्या राष्ट्राचें नांव बद्दू होईल . . . . पत्र घेऊन जाणारे शिपायांना भितात . . . . हा धीटपणानें रस्ता काढील! महिन्याचे आत इकडील दंगल कमी होईल."

—(शिवकालीन पत्रसारसंग्रह भाग १ ला पृ. १७३–१८०)

पण हेन्री रेव्हिंग्टनचे सारे प्रयत्न व्यर्थ गेले. दोरोजीनें गिफर्डला मुळींच सोडलें नाहीं. त्याच्या दलालाला मात्र सोडून दिलें. खानाचीं गलबतें आणि माल यांच्याऐवजीं इंग्रजांचा लुटलेला माल व कैदी गिफर्ड यांना त्यानें खारेपाटणला पाठवून दिलें. शेवटीं हेन्री रेव्हिंग्टननें कोंकणांतील शिवाजी महाराजांचा सलणारा शत्रू जंजिऱ्याचा सिद्दी याच्याविरुद्धच्या युद्धांत महाराजांना साह्य करण्याचें गुप्त अभिवचन दोरोजीला दिलें. पण केवळ अभिवचनामुळें फसणारा दोरोजी नव्हता. त्यानें महाराजांना हें अभिवचन सांगून त्यांच्या आज्ञेनुसार माल व कैदी यांच्यासंबंधांत निर्णय घेण्यांत येईल असें रेव्हिंग्टनला कळविलें. कोंकणांतील विजापुरी सत्तेचा पाया उखडून व इंग्रजांसारख्या पाताळयंत्री सत्तेला नमवून दोरोजी महाराजांकडे परतला. यापूर्वींहि जंजिरेकर सिद्द्याच्या विरुद्ध साह्याची अभियाचना शिवाजी महाराजांनीं इंग्रजांजवळ केली होती. पण महाराजांच्या शत्रूंना साह्य करणाऱ्या इंग्रजांनीं त्यांना मात्र 'व्यापारी' व 'त्रयस्थ' असल्याचीं निमित्तें सांगून वाटाण्याच्या अक्षता लाविल्या होत्या. अशा स्थितींत दोरोजीनें महाराजांचें केवढें तरी मोठें राजकारण यशस्वी केलें. पण युद्धसाहित्य व आरमार यांच्या साहाय्याच्या निव्वळ अभिवचनावर शिवाजीमहाराज अलंबून राहणारे नव्हते. त्यांना

प्रत्यक्ष हेन्री रेव्हिंग्टनचें पत्र हवें होतें. त्यामुळें गिफर्डची सुटका झाली नाहीं. उलट त्याला खारेपाटणहून खेळण्याला पाठविण्यांत आलें. तेव्हां मात्र रेव्हिंग्टनला खरी आंच बसली. त्यानें तळमळून महाराजांना पुढील पत्र पाठविलें. "दंडाराजापूर प्रकरणीं आपल्याकरितां इंग्रजांनीं किती दोस्तीचें वचन दिलें आहे हें दोरोजी व इतर अधिकाऱ्यांनीं कळविलेंच असेल. तुमचे लोकांकडून आम्हांला किती त्रास झाला हें सांगतां पुरवत नाहीं. परंतु कृपा करून इतकेंच लक्षांत घ्यावें कीं (राजापुरच्या बंदरांत असलेलीं गलबतें मराठ्यांच्या ताब्यांत देऊन) आमचे मित्रांचें शत्रुत्व आम्ही पत्करलें नाहीं. एवढ्याकरितां एक दलाल आणि एक इंग्रज त्यांनीं २५ दिवसपर्यंत कैदेंत ठेविले! दलाल सोडून दिला. परंतु इंग्रजाला खारेपाटणांत अडकवून ठेविला आहे. आम्हांला यानें खेद होत असून इतर व्यापाऱ्यांना सर्वत्र दहशत बसून व्यापाराला धक्का बसला आहे. आपण हुकूम पाठवून आमचा माल व मनुष्य परत द्याल अशाबद्दल खात्री असल्यामुळें धीर धरून आहोंत."

—(शि. प. सा. सं. भा. १ पृ. १८१)

गुप्त अभिवचनावर या पत्राची मुद्रा बसल्यावरच शिवाजी महाराजांनीं गिफर्डची सुटका केली. इंग्रजांची लबाडी व त्यांचा धूर्तपणा ते ओळखून होते. याच प्रकरणांत त्यांनीं दि. १३ फेब्रुवारी १६६० ला महाराजांना हें पत्र पाठविलें त्याच दिवशीं अफझलखानाचा वडील मुलगा व शिवाजी महाराजांचा कट्टर वैरी फाजलखान याला याच्या नेमकें उलट पत्र पाठविलें. तें असें: "हें पत्र हातीं येण्यापूर्वीच दाभोळचा सुभेदार महमद शेरीफ यानें सर्व हकीकत कळविलीच असेल. त्यांतून हें पत्र तुमचे हातीं पडेल अशी खात्री नाहीं म्हणून थोडक्यांत लिहितो. हातीं पडेल तर कृपा करून विश्वास धरा कीं, आम्हीं तुमचे दोस्त आहोंत. आम्हीं असें ऐकिलें आहे कीं आमचा दोस्त रुस्तुमजमा व तुम्ही सैन्यें एकत्र करून शत्रूवर चालून गेला. म्हणून दाभोळचे सुभेदाराचे म्हणण्याप्रमाणें आम्हीं वागलों. शिवाय तुमच्यासारख्या दोस्ताशीं लढणें

आणि तुमचीं गलबतें शत्रूच्या हवालीं करणें हें आमच्या धर्माच्या विरुद्ध होतें. परंतु असें वागल्यामुळेंच शिवाजीच्या लोकांनीं आमचा एक माणूस दलालासह जुलमानें कैद करून नेला आहे." अशा स्वभावाच्या इंग्रजांनाहि त्यांच्या धूर्तपणावर मात करून शिवछत्रपतींनीं जंजिरेकर सिद्द्याविरुद्ध उपयोगांत आणावयाचें ठरविलें. दोरोजीनें आपलें काम कल्पनातीत यशस्वी केलें.

## नेताजीचे पराक्रम

दोरोजीप्रमाणेंच 'प्रतिशिवाजी' म्हणून विख्यात असलेला भीमपराक्रमी सेनापति नेताजी पालकर याला विजापूरच्या प्रदेशावर पाठविलें होतें. त्यानें विजापूरकरांचा प्रदेश अक्षरश: उद्ध्वस्त केला. मिरजच्या भुईकोट किल्ल्यासमोर मात्र त्याला हात टेकावे लागले. नेताजीला स्वैर सोडण्याच्या दृष्टीनें शिवाजी महाराजांनीं स्वत: मिरजेच्या वेढ्याचें काम आपल्याकडे घेऊन त्याला मोकळें केलें. त्यानें झंझावाती वेगानें कवठें, बोरगांव, मालगांव, कुंडल, धोगांव, सत्तीकीर, आड, मिरज, गोकाक, दोदवाड, मुरवाड, धारवाडची मोठी गडी, क्षुद्रवंद्यपुर, सांगांव, मामिल, पारगांव, सांगली, काणद, कुरुंदवाड, कागल,हेवाळ, हनुवल्ली, हूणबाड, रायबाब, हुकेरी, कांडगांव, हळदी, घुणिका, किणी, अरग, तेलसंग, केरूर, अंबुप, कमळापूर, अथणी, तिकोटे इत्यादि प्रदेश जिंकून तेथील विजापूरकरांचीं ठाणीं उखडून टाकिली.

## संकटाचे काळे ढग

याप्रमाणें अफझलखानाच्या वधाच्या मागोमाग शिवछत्रपतींनीं विजापूरच्या सत्तेवर जे घणाघाती आघात एकामागून एक घातले त्यामुळें ती सत्ता अगदीं जर्जर होऊन गेली, विजापूरच्या सुलतानानें शेवटीं दिल्लीच्या बादशहाकडे साहाय्याची अभियाचना केली दिल्लीच्या साम्राज्यसिंहासनावर त्या वेळीं बादशहा औरंगजेब स्थिरपद झालेला होता. विजापुरच्या सुलतानाचें साहाय्याच्या याचनेचें पत्र पाहून पाताळयंत्री औरंगजेबाच्या मन:चक्षूसमोर

शिवाजीची पराक्रमी मूर्ति उभी राहिली. जुन्नरला शिवाजी महाराजांनीं मोंगली सत्तेला लगाविलेले रट्टे औरंगजेब विसरला नव्हता. त्यानें या निमंत्रणाचा लाभ घेऊन शिवाजीचा तर पूर्ण नि.पात करण्याचें ठरविलेंच; पण त्याचबरोबर विजापूरचीहि शियापंथी राजवट नष्ट करून अप्रतिहतपणें दक्षिणेचें साम्राज्य उभारण्याचा विचार चालविला. त्याच्या योजनांना विलंब होऊं लागला व विजापूरच्या सुलतानाचें शिवाजीविषयींचें प्राणसंकट तर गळ्याशीं येऊन ठेपलें. अशा स्थितींत अलीआदिलशहानें सिद्धीजौहर नांवाच्या नव्या सेनापतीची शिवाजी महाराजांवर रवानगी केली. कवीन्द्र परमानंद म्हणतो ––

इति ध्वस्ते जनपदे स्रस्ते सैन्येऽपि भूयसि ।
पराधीनत्वमाप्तेषु प्रणालाद्रिषु चाद्रिषु ।। १०
चिरयत्सु च ताम्रेषु द्रुतमाकारितेष्वपि ।
विद्रूयमानोऽनुदिनं पतन्नत्याहिताम्बुधौ ।। ११
अल्ली कर्णपुराधीशं जोहरं नाम बर्बरम् ।
आहूय प्राहिणोत्तूर्णं निगृहीतुं शिवं नृपम् ।। १२

––(शिवभारत अ. २५)

ह्याप्रमाणें देश उद्ध्वस्त झाला, पुष्कळ सैन्य गळालें (पांगलें), पन्हाळादि गड शत्रूच्या ताब्यांत गेले, त्वरित बोलाविलें असतांहि मोंगलांनीं विलंब केला, त्यामुळें दिवसेंदिवस खिन्न होऊन संकटसागरांत बुडत असतां अल्ली आदिलशहानें कर्णूलचा अधिपति सिद्दी जोहर यास बोलावून शिवाजी राजास पकडण्यास त्वरित पाठविलें."

अफजलखानाप्रमाणेंच किंबहुना त्याहून अधिक भीषण असें हें संकट होतें. सेनापति या नात्यानें शिवछत्रपतींची योग्यता ठरवावयाचा त्यांच्या जीवनांतील हा दुसरा महान् निकष ठरला. त्याचें स्वरूप आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✧ ✦

प्रकरण पंधरावें

# आदिलशाहीवर मात

सिद्दीजोहराच्या स्वारीचें संकट हें शिवाजीमहाराज व स्वराज्य यांवरील दुसरें प्राणसंकट होय. महाराजांचें वाढतें बळ पाहून त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं स्वतः विजापूरचा सुलतानच या वेळीं स्वारीवर निघण्याच्या सिद्धतेंत होता. पण त्याच वेळीं सिद्दीजोहरनें प्रार्थनापत्र पाठविल्यामुळें त्याची या कामगिरीवर पाठवणी झाली.

## सिद्दीजोहर

जोहर हा हबशी अथवा सिद्दी जातीचा असून मूळचा 'गुलाम' होता. पण आपल्या अंगच्या पराक्रमानें तो एक प्रबळ सरदार झाला. तो तेलंगणांतील कर्नूलचा सुभेदार होता. याचा अर्थ त्याला तेथें कोणी नियुक्त केलें असें नव्हे. त्यानें विजापूरच्या सुलतानाची सत्ता उघडपणें झुगारून देऊन कर्नूलचा प्रदेश बळकाविला होता. विजापूरचा सुलतान या वेळीं या नव्या बंडखोराचेंहि पारिपत्य करण्याच्या विचारांत होता. अफझलखानाच्या वधामुळें विजापूरच्या सुलतानाची झालेली अवस्था व शिवाजीचें वाढतें बळ पाहून या संधीचा लाभ घेऊन सुलतानाला प्रसन्न करावें व कर्नूलची बळकाविलेली जहागीर उघडपणें सरदार म्हणून पदरांत पाडून घ्यावी असा सिद्दी जोहरनें विचार केला, व सुलतानाला आपण होऊन कळविलें कीं, " मी पूर्वीं अनेक अपराध केले आहेत. परंतु त्याबद्दल मला क्षमा करून व सरदारी देऊन पदरीं घेतल्यास शिवाजीचा निःपात करण्याची कामगिरी मी स्वीकारतों " आपण होऊन जोहरनें हें पत्र पाठवितांच सुलतानाला आनंद झाला. त्याच्या दृष्टीनें सिद्दी जोहर व शिवाजी हे दोघेही बंडखोरच होते. काट्यानें काटा काढावा त्याप्रमाणें त्यांनीं परस्पर लढणें त्याला

उपयुक्तच होतें. सुलतानानें सिद्दीजोहराचे सर्व अपराध क्षमा करून त्याला 'सलावतखान' अशी नवी पदवी दिली व शिवाजी वरील स्वारीचें सेनापतित्व त्याच्याकडे दिलें. त्याच्या सैन्यांत समाविष्ट होण्याची राजाज्ञा सर्व सरदारांना गेली. वेंगुर्ला येथील डच वाकनिसानें आपल्या गव्हर्नर जनरलला लिहिलें आहे, "विजापूरच्या राजानें पराकाष्ठेचे प्रयत्न करून १६ ते २० हजार घोडेस्वार व २५ ते ४० हजार पायदळ जमविलें व हें सैन्य सिद्दीजोहरच्या हाताखालीं देण्यांत आलें." रुस्तुमजमा, फाजलखान, सादतखान, बाजीराजे घोरपडे, पीऊ नाईक, भाईखान, सिद्दी मसूद इत्यादि अनेक सेनानी जोहराच्या नेतृत्वाखालीं एकत्रित आले होते. शिवछत्रपतींचा त्या वेळीं मिरजच्या किल्ल्याला वेढा पडला होता. त्यांच्या कानावर जोहरच्या स्वारीच्या वार्ता येऊन आदळल्या. डचांचा वाकनीस आपल्या गेव्हर्नर जनरलला लिहितो "हें जेव्हां शिवाजीला समजलें तेव्हां त्यानें वेढा उठवून पन्हाळयाच्या रोखानें चालण्यास सुरवात केली; व चोहोंकडे पांगलेलीं सैन्यें एकत्र जमविण्याचा उद्योग आरंभिला. त्या वेळीं त्याचें सैन्य विजापूरच्या सैन्याइतकें बलवान् आहे असा समज होता. . . . . शिवाजी हा पक्का लबाड असल्यामुळें तो वाटेल ते उपाय योजून सिद्दीजोहर व त्याच्याबरोबर आलेले नामांकित सरदार यांना पैसे देऊन अगर फायद्याचें अभिवचन देऊन वश करून घेईल असें आम्हांला निश्चितपणें वाटतें. कारण ही वेळ निभावली म्हणजे विजापूरचा बादशहा पुन्हां या उद्योगांत पडणार नाहीं हें शिवाजी जाणतो. शिवाजी हटत आश्रयार्थ ज्या किल्ल्यांत गेला होता त्या पन्हाळा किल्ल्यानजीक सिद्दीजोहर येऊन पोहोंचला."

चैत्र शुद्ध प्रतिपदेला (२ मार्च १६६०) शिवाजी महाराज पन्हाळयावर आले व जोहरनें आपल्या पधरा सहस्र सैन्यानिशीं पन्हाळयाला वेढा दिला. स्वराज्यावर सिद्दीजोहरच्या स्वारीचें हें एकच संकट नव्हतें. याहूनहि भीषण संकटाची कृष्णछाया पसरूं

लागली होती. तिची नुसती कल्पनाहि सामान्य माणसाच्या हृदयाचें स्पंदन बंद पाडणारी होती. ती कृष्णछाया म्हणजे औरंगजेब बादशहाचा मामा व दक्षिणचा मोंगली सुभेदार शाहिस्तेखान याचें एक लक्ष सैन्यासह स्वराज्य गिळंकृत करायला येऊं लागलेलें आक्रमण होय.

## शाहिस्तेखान

विजापूरच्या सुलतानानें दिल्लीचा बादशहा औरंगजेब याला साह्याची अभ्यर्चना केल्यावर त्यानें या संधीचा उपयोग करून घेण्याची पूर्ण सिद्धता केली. शिवाजीला चिरडून टाकणें हें तर औरंगजेबाचें उद्दिष्ट होतेंच, पण त्याचबरोबर विजापुरी सत्तेचा पायाहि उखडून टाकून मोंगलांचें दक्षिण साम्राज्य निष्कंटकपणें उभारण्याची त्याची महत्वाकांक्षा होती याचा उल्लेख मागें केलाच आहे. त्यासाठीं समर्थ व कर्तृत्वसंपन्न सेनानीची आवश्यकता होती. म्हणूनच त्यानें शाहिस्तेखानाची निवड केली. नात्यानें शाहिस्तेखान औरंगजेबाचा मामा होता. त्याच्या कर्तृत्वानें मोंगल बादशाहींतील प्रथम श्रेणीच्या सरदारांत त्याची गणना होत असून अमीर उल्-उमराव अशी त्याला पदवी होती. थोर मुत्सद्दी, अनुभवी शासक व कर्तृत्वसंपन्न सेनानी म्हणून तो विख्यात होता. या वेळीं शाहिस्तेखान दक्षिणेचा मोंगलांचा सुभेदार असून तो औरंगाबादला राहात असे. शिवछत्रपतींवरील या स्वारीचें नेतृत्व अशा खंद्या सेनानीकडे सोपवूनच औरंगजेब राहिला नाहीं तर त्यानें त्याच्याबरोबर सत्त्याहत्तर सहस्र अश्वदळ व तीस सहस्र पायदळ येवढें प्रचंड सैन्य दिलें. साऱ्या भारतांत व भारताबाहेरहि आपल्या पराक्रमानें विख्यात असलेले कझाकी, पठाणी, उझबेगी बख्सारी अरबी, मोंगली हे यवन व बुंदेले, राजपूत आणि महाराष्ट्रीय योद्धे आणि प्रथम श्रेणीचे सेनानी शाहिस्तेखानाच्या सैन्यांत होते. परमानंद कवीन्द्रानें या सेनानींची पुढीलप्रमाणें यादी दिली आहे : शमसखान पठाण, नामदार खान, गयासुदी खान, हसनखान, मुनीम, सुतान मिर्झा, मनचेहर, तुरुकताज, कूर कुबाहत, हौद खान उझबेग, इमाम

बिरुदीखान, लोदीखान पठाण, दिलावर मौलद, अबदुलबेग, प्रख्यात खोजा भंगड, जोहर, खोजा सुलतान, सिद्दीफते व फतेजंग, कारतलबखान, गाझीखान हे यवन सेनानी, भावसिंह, राणा किशोरसिंह व शामसिंह, राजागिरिधर मनोहर, प्रद्युम्न, अनिरुद्ध, पांचवा पुरुषोत्तम व सहावा गोवर्धन हे गौड वंशीय राजे, गौड विठ्ठलदासाचा सूर्याप्रमाणें तेजस्वी नातू, अर्जुनाचा पुत्र विजयीराजा राजसिंह, वीर वीरमदेव, रामसिंह व रायसिंह हे शिसोदेवंशीय राजपूत राजे, चंद्रवत वंशांतील राजा श्रीमान् अमरसिंह, चंद्रपूरच्या राजाचा सेनापति अरिंदम, सुरजी गायकवाड, महाबाहू येसाजी, (म्हणजे येसाजी कंक नव्हे.) राजा दिनकर काकडे, त्र्यंबकजी, दत्ताजी व अनंतजी खंडागळे, दत्ताजी व रुस्तुमजी जाधव, रंभाजी पवार, सर्जेराव घाटगे, कमळाजी गाढे, जसवंतराव व कमळाजी कोकाटे हे मराठे, इतकेंच नव्हे तर शिवछत्रपतींच्या प्रत्यक्ष रक्तसंबंधांतले द्वारकाजी, जिवाजी, परसोजी व बाळाजी भोंसले, फार काय पण शिवछत्रपतींचा प्रत्यक्ष चुलत बंधु त्र्यंबकजी भोंसले हे सेनानी शाहिस्तेखानाच्या नेतृत्वाखालीं स्वराज्याच्या नरडीला नख द्यायला निघाले होते. त्यांत पूर्वी जिचें वर्णन केलें आहे ती, स्त्रीरूपानें मूर्तिमंत प्रकट झालेली यवनांची दासता रायबागीणहि होती. कवीन्द्र परमानंद म्हणतो—

"जायामुदयरामस्य जगज्जीवनमातरम् ।
राजव्याघ्रीति यां प्राहुर्युधि व्याघ्रीमिवोद्धुराम् ॥ ५२
सा प्रतापेनमहता बताप्रतिहतायुधा ।
कृष्णराजप्रचंडाद्यैः सहिताऽऽत्मसनाभिभिः ॥ ५३

—(शिवभारत अ. २५)

"प्रतापामुळें अप्रतिहत गति समजण्यांत येणारी व संग्रामामध्ये वाघिणीप्रमाणें निर्भय अशी माहूरच्या उदयरामाची बायको व जगजीवनाची आई 'रायबागीण' आपल्या कृष्णराव, प्रचंडराव वगैरे लढवय्या बंधूंसह या सैन्यांत आली होती." एकलिंगजीची उपासना करणारे, कपाळीं हिंदुत्वाचा तिलक लावणारे व सूर्य चंद्र

वंशांचें नांव लावणारे हे राजपूत, हे मराठे, हे भोंसले व ही राज्य-ख्याति कोणता पराक्रम करावयास जात होते? तर स्वराष्ट्र, स्वधर्म व स्वदेश यांच्या संरक्षणास्तव आपल्या छातीची ढाल पुढें करून ताठपणें उभे असलेल्या एकाकी धर्मवीराला धुळीला मिळवावयास्तव! ज्यांच्या खड्गाच्या विक्रमावर यांची राजपूती, यांचे तिलक, यांच्या एकलिंगजीच्या आराधना, यांचें क्षत्रियत्व, यांचें महाराष्ट्रीयत्व व स्त्रीत्व जगणार होतें त्याचाच निःपात करावयास्तव हे निघाले होते. व तेंहि यांच्या स्त्रीत्वाची इभ्रत भर बाजारांत विकावयास निघालेल्या यांच्या धर्मशत्रूची, राष्ट्रशत्रूची देशशत्रूची अन्यायी सत्ता दृढमूल करावयास्तव बद्धपरिकर होऊन आमच्या सारखाच तूंहि दास कां होत नाहोंस हा त्यांचा जणूं शिवछत्रपतीला प्रश्न होता. राष्ट्रीय अस्मितेच्या प्रखर जाणिवेच्या अभावीं राष्ट्रांतील कर्तृत्व व पराक्रमाची शोचनीय दशा होते ती अशी.

या लाख दीड लाख मोंगली सैन्याचें ऐश्वर्य काय वर्णावें? सहा अफझलखान आपल्या सैन्यानिशीं व वैभवानिशीं बुडून जातील एवढा मोठा तो सैन्यसागर होता. शाहिस्तेखानानें औरंगाबादेला एका दुय्यम अधिकाऱ्याची नेमणूक करून दि. ११ फेब्रुवारी १६६० ला अहमदनगर गांठलें. शिवछत्रपति त्या वेळीं मिरजेच्या दुर्गाला वेढा देऊन बसलेले होते. अहमदनगरपर्यंत शाहिस्तेखान गगनाला गवसणी घालणाऱ्या प्रचंड सिद्धतेनिशीं येऊन धडकलेला व सिद्दी जौहर अगदींच जवळ आलेला अशा कात्रींत महाराज सांपडले होते. अफझलखानापेक्षां हें संकट किती तरी पटीनें अधिक भीषण होतें. पण शिवछत्रपतींची स्वतःच्या ईश्वरी कार्याविषयींची श्रद्धा व त्यांचें मनोधैर्य ही नगाधिराज हिमाचलाप्रमाणें अविकंपित होती. अंगावर आलेल्या सिद्दीजौहराचें संकट प्रथम टाळावें व नंतर शाहिस्तेखानाच्या संकटाचा विचार करावा असें ठरवूनच त्यांनीं पन्हाळा गांठला होता. पावसाळा सुरू होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. जौहरच्या संबंधांत त्याचा आपल्याला लाभ होईल अशी महाराजांची कल्पना होती. ते पन्हाळ्याला जौहरच्या वेढ्यांत अडकून पडले, व

शाहिस्तेखानानें स्वराज्यांत प्रवेश केला. त्यानें भीमा उल्लंघून स्वराज्याच्या भूमीवर पदप्रक्षेप करतांच मोंगलाईचे भीषण चमत्कार घडूं लागले. कवीन्द्र परमानद म्हणतो —

प्रोच्छिन्नदेवायतनं छिन्नभिन्नमठीमठम् ।
भज्यमानाध्यक्षगृह भग्नोद्यानमहीरुहम् ॥६०
प्रभूतविजनीभूतप्रतनग्रामपत्तनम् ।
पर्यटन्म्लेच्छकटकस्पष्टभ्रष्टसरित्तटम् ॥६१
ग्रस्तं विधुंतुदेनेव निखिलं विधुमण्डलम् ।
दर्शनीयेतरमभूत् तदा तन्मेदिनीतलम् ॥६२

—(शिवभारत, अ. २५)

"ज्यांतील देवळांचा विध्वंस केला, मठमठ्यांची मोडतोड केली, अधिकाऱ्यांचीं घरें भुईसपाट केलीं, उद्यानांतील झाडें मोडून त्यांची स्मशानभूमि करून टाकिली, पुष्कळ जुनीं गांवें व नगरें उजाड करण्यांत आलीं, सर्वत्र संचार करणाऱ्या मुसलमानी सैन्यानें नदी-तीरें भ्रष्टविलीं असा तो भूप्रदेश खग्रास ग्रहण लागलेल्या चंद्राप्रमाणें भेसूर दिसूं लागला." खानाच्या अवाढव्य सैन्याची हालचाल मंद गतीनें होत असली तरी बुभुक्षित मगरीप्रमाणें तो स्वराज्याचा एकेक घांस पचवीत चालला होता. कऱ्हे पठारांत घुसून त्यानें सुप्याची गढी घेतली. दि. ५ एप्रिल १६६० ला त्यानें बारामती व नंतर इंदापूर घेतलें. १६ एप्रिलला नीरा नदीच्या तीरावरील होळ नांवाचें गांव घेऊन त्या मागोमाग त्यानें शिरवळचा भुईकोटगड सुभान मंगळ जिंकला. तेथून राजगड अवघ्या दहा कोसांवर होता. त्याच्या आसपासचीं गांवें व प्रदेश खानानें पूर्ण उद्ध्वस्त करून टाकले. महाराज पन्हाळगडावर जौहरच्या वेढ्यांत अडकून पडलेले, स्वराज्याचा सेनापति नेताजी पालकर दूर प्रदेशांत कामगिरीवर गेलेला, व जवळ कोणी नांव घेण्यासारखा सेनानी नाहीं अशा स्थितींत राजगडासारख्या स्वराज्याच्या राजधानीवरच शाहिस्ते-खानाच्या संकटाची दाट छाया पडलेली होती. अशा स्थितींत या संकटाला तोंड देण्यासाठीं कोण पुढें आलें असेल?

खान तर सारखा पुढें येत होता. सुभानमंगळच्या मागोमाग शिवापूर, सासवड, राजेवाडी, पाटस, यवत, हडपसर या मार्गानें येऊन त्यानें पुण्यावर आक्रमण करून दि. ९ मे १६६० ला पुणें जिकलें. स्वतः खानानें महाराजांच्या 'लालमहालांत' निवास केला व त्याचें विकराल सैन्य सभोंवार पसरलें. जिच्या कुशींतून युगपुरुषानें जन्म घेतला त्या जिजामातेविना या भयानक संकटाशीं दुसरें कोण टक्कर घेणार? परमानंद कवीन्द्र म्हणतो —

"अथ त्रस्ते जनपदे विस्रस्ते च महाजने ।
लुंटिते साहसवटे शूर्पे चाप्यवकुंठिते ॥ १
निगृहीते पुण्यपुरे गृहीते चेंदिरापुरे ।
परचक्रचयग्रस्तप्रायचक्रावतीचये ॥ २
आत्मजे शिवराजे च प्रणालाचलवर्तिनि ।
क्रुद्धेऽपि जोहरेणोच्चैः क्रुद्धे तत्रैव युध्यति ॥ ३
सुता यादवराजस्य शाहपत्नी महाव्रता ।
अहो रणरसोत्साहादाहो पुरुषिकामधात् ॥ ४
जननी शिवराजस्य सा राजगिरिवर्तिनी ।
निजानां गिरिदुर्गाणामवनेऽवहिताभवत् ॥ ५

—(शिवभारत, अ. २६)

"लोक भीतिग्रस्त झाले, व्यापारी पळाले, सासवड लुटलें गेलें, सुप्यास वेढा पडला, पुण्यावर आक्रमण झालें, इंदापूर जिंकलें, चाकण चौऱ्यांशीचा प्रदेश शत्रुसेनासमूहाच्या बहुतेक घशांत गेला, पुत्र शिवराय अत्यंत क्रुद्ध होऊन पन्हाळगडावर जौहराशीं युद्ध करण्यांत गुंतला, अशा वेळीं जाधवरावांची मानिनी कन्या व राजे शहाजी यांची धर्मनिष्ठपत्नी जिजाबाई हिच्या ठिकाणीं वीररसाचा संचार होऊन ती युद्धासाठीं सिद्ध झाली. राजगडावर राहणारी ती शिवाजीची माता आपल्या गडांच्या संरक्षणाच्या कामीं दक्ष होऊन पुढें आली."

खानाच्या प्रचंड सैन्याच्या लोंढ्याशीं उघड टक्कर देणें शक्यच नव्हतें. जिजाबाईसाहेबांच्या आज्ञेनें मराठी सैन्याच्या टोळ्या खानाच्या सैन्यावर छापे घालून त्याला हैराण करूं लागल्या. शिवापूरहून गराड्याला जाणाऱ्या रस्त्यावर राव भाऊसिंगाच्या नेतृत्वाखालीं तीन सहस्र मराठा घोडेस्वारांनीं मोंगलांच्या पिछाडीला झोडपून काढलें. पण खानाचें सैन्य इतकें अवाढव्य व प्रचंड होतें कीं, असल्या भुरट्या आक्रमणांनीं त्याला कांहीं होणार नव्हतें. मोंगली सैन्यानें हे हल्ले परतवून लावले.

शाहिस्तेखानाचें आक्रमण व त्याचें पुण्यांतील वास्तव्य शिवछत्रपतींना दिसत होतें. पण त्यांचे सर्व मार्ग या वेळीं दैवगतीनें रोधलेले होते. सिद्दी जौहराचा पन्हाळ्याचा वेढा अतिशय दक्षतेनें चालविलेला होता. त्यांत यत्किंचित्सुद्धां अशी फट नव्हती कीं, जिचा उपयोग करून महाराजांना निसटून जातां येईल. अशा स्थितींत बाहेरून कोणी सिद्दी जौहरच्या सैन्यावर आक्रमण केलें तर त्याचें सैन्य त्यांत गुंतून पडेल व आपल्याला त्या संधीचा लाभ घेऊन सैन्याची फळी फोडून जातां येईल असा विचार महाराज करीत होते. तशी संधि आली, पण तिचा उपयोग दैवगतीनें होऊं शकला नाहीं.

## नेताजी पालकर

ही संधि म्हणजे नेताजी पालकरांचें जौहरावरील आक्रमण होय. अफझलखानाच्या वधानंतर नेताजी पालकर विजापूरच्या सत्तेचे प्रदेश उद्ध्वस्त करीत चालला असतांना त्याला जौहरच्या वेढ्यांत शिवाजी महाराज पन्हाळ्यावर अडकून पडले असल्याची वार्ता कळली. त्याबरोबर आपण विजापूरलाच धडक मारल्यास प्रत्यक्ष राजधानीवरील संकट पाहून पन्हाळ्याचा वेढा शिथिल होईल अशा कल्पनेनें नेताजी विजापूर जवळ करूं लागला. गदगला तो या वेळीं होता. गदगहून त्यानें विजापूरच्या जवळ असलेल्या शहापुरावर स्वारी करून तें जाळून फस्त केलें. विजापूरवरील हें भीषण संकट पाहून खवासखानाच्या नेतृत्वाखालीं सैन्यानें नेताजीशीं धडक दिली.

या सैन्याशीं आपल्या थकलेल्या सैन्यानिशीं अधिक वेळ झुंजणें आत्मनाशाचें होईल हें ओळखून नेताजीनें धोरणीपणानें माघार घेतली. डचांच्या पत्रव्यवहारांत या गोष्टीचा उल्लेख आहे. वेंगुर्ल्याहून डच गव्हर्नर जनरलला १७ जुलै १६६० ला लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे: "इकडे शिवाजीच्या कांहीं धावत्या सैन्यानें विजापुरापर्यंत धुम्मड केली; व सिद्दी जोहराला आपल्या सैन्यांतील कांहीं भाग दुसरीकडे पाठविण्याची आवश्यकता भासावी म्हणजे त्याच्या सैन्याची पांगापांग व्हावी याप्रीत्यर्थ देखील कांहीं प्रयत्न झाले; पण ते व्यर्थ गेले."

इतक्यांत पन्हाळ्याहून महाराजांचा स्वराज्यांत उपस्थित होण्याचा गुप्त संकेत त्याला मिळाला. पन्हाळ्यावर जाण्यापूर्वी राजगडावर तो राजमातेच्या दर्शनार्थ गेला. संकटाचे मेघ चोहोंकडून गोळा झालेले पाहून व पन्हाळ्याहून शिवाजी महाराजांची सुटका होण्याचें कोणतेंहि चिन्ह दिसत नाहीं हें पाहून जिजाबाईसाहेब त्या वेळीं अत्यंत चिंताक्रांत होत्या. त्या स्वतःच पन्हाळ्याला वेढा देऊन बसलेल्या सिद्दीजोहरच्या सैन्यावर चालून जाण्याची सिद्धता करीत होत्या. नेताजीला पाहतांच त्या किंचित् रोषानें त्याच्याशीं बोलूं लागल्या. परमानंद कवीन्द्र म्हणतो——

ततः स वत्सलां वत्सालोकने चिरमुत्सुकाम् ।
यातुं प्रणालमचलं स्वयमेव समुद्यताम् ॥८
रोषावेषवतीं स्वेन सैन्येन महतावृताम् ।
ददर्श शाहराजस्य राज्ञीं राजगिरिस्थिताम् ॥ ९
आगस्कर इवात्यर्थं भीतभीतः पदे पदे ।
स ननाम हिलालेन सहितस्तां महाव्रताम् ॥१०
प्रणमन्ताविमौ दृष्ट्वा बद्धांजलिपुटावुभौ ।
गां जगाद महाभागा मृदुगंभीरभाषिणी ॥११
बिभ्राणः समरोत्साहं मत्प्राणः स बहिश्चरः ।
रुद्धो विरुद्धैरभितः प्रणालाचलमूर्धनि ॥१२

तत्र तं स्वामिनं हित्वा त्रपां चातिमहीयसीम् ।
अहो युवां परभिया परावृत्तावुभावपि ।।
युध्यध्वमिह संभूय यूयमत्र परैः सह ।
स्वयं योत्स्यामि तेनाहं जोहरेण विरोधिना ।।१७

--(शिवभारत, अ. २६)

" नंतर प्रेमळ, पुत्रदर्शनासाठीं दीर्घ काळापासून अत्यंत उत्सुक, पन्हाळगडावर स्वतःच जाण्यास सिद्ध झालेली, क्रोधाविष्ट झालेली, स्वतःच्या मोठ्या सैन्यानें युक्त अशी जी त्या शहाजी राजाची राणी जिजाबाई तिला त्या नेताजीनें पाहिलें. जणू काय अपराध्याप्रमाणें पदोपदीं भीत भीत त्यानें सिद्दी हिलालासह त्या धर्मनिष्ठ राणीस प्रणाम केला. त्या दोघांस हात जोडून प्रणाम करतांना पाहून ती महाभागा मृदु गंभीर वाणीनें म्हणाली, " युद्धोत्साह धारण करणारा माझा प्राणप्रिय पुत्र पन्हाळगडावर शत्रूंनीं सर्व बाजूंनीं वेढल्यामुळें अडकून पडलेला आहे. आपल्या धन्याला तेथें त्या अवस्थेंत सोडून व सगळी लाज गुंडाळून ठेवून तुम्ही दोघेही शत्रूच्या भीतीनें इकडे परतलात हें महान् आश्चर्य आहे. आतां तु ही येथेंच राहून शत्रूंशीं झुंज घेण्याचा प्रयत्न करा. मी स्वतः सिद्दीजोहरवर चालून जातें." राजमातेचे ते निर्वाणीचे बोल ऐकून नेताजीनें त्यांचें समाधान केलें, व सिद्दी हिलालाला समवेत घेऊन तो ससैन्य पन्हाळगडाला वेढा देऊन बसलेल्या सिद्दी जोहराच्या सैन्यावर चालून गेला. महाराज वरून चिन्ताक्रान्त मुद्रेनें वेढा पहात होते. नेताजीनें बाहेरून केलेलें हें आक्रमण पाहून त्यांना अत्यंत आनंद झाला. सुटकेचा क्षण जवळ आला असें वाटलें. पण. .? 'दैवं चैवात्र पंचमम्'! !

सिद्दी जौहर हा अत्यंत कुशल सेनापति होता. त्यानें नेताजी पालकरच्या या आक्रमणाचा वास्तविक अर्थ ओळखला. वेढ्यांतील मोर्च्यांत कोणतीहि ढिलाई होऊं न देतां स्वतः तेथेंच राहून सैन्याची एक मोठी टोळी नेताजीला अडविण्यासाठीं त्यानें दूर अंतरावर पाठवून दिली. या टोळीशीं नेताजीचें चाललेलें युद्ध महाराज

वरून सूक्ष्मतेनें पहात होते. नेताजी या सैन्याचा पराभव करून विद्युत्प्रपातासारखा वेढ्यावर येऊन कोसळेल व त्या धुमश्चक्रीत वेढ्याच्या अव्यवस्थेचा लाभ घेतां येईल अशी त्यांची अपेक्षा होती. ते त्या सिद्धतेनें उभे होते. इतक्यांत नेताजीचा साहाय्यक सिद्दी-हिलाल याचा मुलगा वाहवाह याच्यावर वर्मी आघात होऊन तो किंकाळी फोडीत घोड्यावरून खालीं मूर्च्छित होऊन पडला. सिद्दी हिलालनें आपल्या मुलाजवळ जाण्याचे पुष्कळ प्रयत्न करूनहि जौहराच्या सैन्यानें त्याचा मोड करून वाहवाहला आपल्या शिबिरांत नेलें. त्यासरशीं हिलालचें सैन्य घाबरून पळत सुटलें. पळापळीचा हा रोग सैन्यासंबंधांत तरी सांथीच्या रोगासारखा पसरतो. हिलालचें सैन्य पळूं लागतांच नेताजीचें सैन्यहि पळूं लागलें. कितीहि आवरलें तरी तें आवरलें जाईना. शेवटीं नेताजीला परत फिरावें लागलें, व नेताजी येऊनहि महाराजांची समस्या अधिकच गंभीर झाली. याच समयास शाहिस्तेखानानें चाकणचा गड घेतल्याची वार्ता कळून त्यांच्या संकटांत अधिकच भर पडली.

## फिरंगोजी नरसाळा

चाकणच्या भुईकोट किल्ल्याचें नांव होतें संग्रामदुर्ग. या किल्ल्याचें अनेक दृष्टींनीं महत्त्व होतें. शाहिस्तेखान पुण्यास येत असल्याचें कळतांच स्वराज्याच्या सैनिकांनीं दाणा व गवत आदि जाळून पुणें अगदीं ओसाड करून टाकलें. पावसाळ्याचे दिवस येत असल्याचें दिसूं लागल्यावर या स्थितींत आपल्या सैन्याचें काय होईल हें शाहिस्तेखानाच्या ध्यानांत आलें. त्या दृष्टीनें अहमदनगरहून चाकणला दाणावैरण पोहोंचविणें मोंगली अधिकाऱ्यांना सोपें होतें. म्हणून चाकणचा गड आपल्या अधीन असणें खानाला आवश्यक वाटलें. चाकण अहमदनगरच्या वाटेवर असल्यामुळें मूळ सैन्याशीं त्यायोगें संबंध राहूं शकून ठिकठिकाणीं पसरलेल्या सैन्यावर त्यायोगें दृष्टि ठेवतां येत होती. तेथील गड स्वाधीन असल्यास पुणें ते नाशिकपर्यंतचा मार्ग निर्धास्त होणार होता. या सर्व गोष्टींचा

विचार करून खानानें चाकणच्या गडाला वेढा दिला. या वेळीं चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा हा चिवट पुरुष होता. पावसाळा जोरांत सुरू असतांनाच खानानें किल्ल्याला वेढा दिला, व मूठभर सैन्यानिशीं या सेनासमुद्राला वडवानलासारखें शोषावयाचा स्वामिनिष्ठ फिरंगोजीनेंहि निश्चय केला. कवीन्द्र परमानंद म्हणतो,

ततः क्षिप्रमुपेतेन क्षुभिताम्भोधिबंधुना।
तेन चक्रेण चकितं चक्रे चक्रावतीतलम् ॥ ६३

रुरुधुस्तां शोणमुखाः पुरीं चक्रावतीं रुषा।
शिवराजे महाराजे प्रणालाचलवर्तिनि ॥ ६४

तत्र संग्रामदुर्गान्तर्वर्तिभिः शिवपत्तिभिः।
युयुधुर्युद्धकुशलाः ते दिनानि बहून्यपि ॥ ६५
यावद्युध्यति जोहरेण बलिना क्रुद्धः प्रणालाचले।
राजा तावदमी वयं समुदिताश्चक्रावतीमण्डले ॥
योत्स्यामः प्रतियोधिभिः प्रतिपदं दुर्गस्थितानामिदम्।
विज्ञायाभिमतं तथा न विदधे शास्तापि शस्तं मनः ॥ ६६

—(शिवभारत अ. २५)

"नंतर खवळलेल्या समुद्रासारख्या त्या सेनेनें त्वरित येऊन चाकण प्रांत भयचकित केला. शिवाजी महाराज पन्हाळगडावर असतांना मोंगलांनीं त्या चाकणच्या गडास वेढा दिला. त्या संग्रामदुर्गांतील शिवाजीचे ते युद्धकुशल पदाति पुष्कळच दिवस झुंजले. 'जोंपर्यंत क्रुद्ध शिवाजी राजा पन्हाळगडावर बलाढ्य जोहराशीं लढत आहे, तोंपर्यंत आम्ही सगळे मिळून चाकण प्रांतांत शत्रूंशीं पदोपदीं लढूं' असा त्यांचा निर्धार कळून शाहिस्तेखान सुद्धां वरमला."

चाकणच्या वेढ्याच्या वार्ता येत होत्या. सहा महिने झाले तरी सिद्दी जोहराचा वेढा ढिला होण्याचें कोणतेंहि चिन्ह दिसत नव्हतें. पावसानें झोडपल्यावर तरी वेढा विस्कळीत होईल अशी महाराजांची कल्पना होती. पण तशीं कोणतींच चिन्हें दिसेनात.

कितीहि दिवस लागले तरी शिवाजी शरण येईपर्यंत वेढा चालूच ठेवावयाचा जोहरचा निर्धार होता. गडावरील धान्य-वैरण संपल्यावर नाक मुठींत धरून त्याला शरण तरी यावें लागेल किंवा शेवटची झुंज द्यावयास बाहेर पडावें लागेल हें जोहर जाणून होता. या विपत्तींत शिवाजी वांचण्याची शक्यता नाहीं या कल्पनेनें अनेक 'तटस्थ'हि जोहरला साह्य पोंचवीत होते. इंग्रजांचेंच उदाहरण या दृष्टीनें पहाण्यासारखें आहे. 'तटस्थ' म्हणून शिवाजी महाराजांच्या मागणीला 'हो'कार द्यावयास कांकूं करणारे इंग्रज सिद्दी जौहरची तोफांची व दारूगोळ्यांची मागणी येतांच ती पुरवावयास तत्परतेनें पुढें आले. इतकेंच नव्हें तर राजापूरचा इंग्रज अधिकारी हेन्री रेव्हिंग्टन स्वतः तोफा व दारूगोळा घेऊन पन्हाळ्यावर गेला व तेथें इंग्रज गोलंदाजाकडून पन्हाळ्यावर तोफ डागून जोहरला प्रसन्न करावयासहि त्यानें कमी केलें नाहीं. या दृष्टीनें इंग्रजांच्या तत्कालीन पत्रव्यवहारांतील पुढील उल्लेख पाहण्यासारखे आहेत. "सिद्दी जोहराकडून तोफ व दारूगोळा पुरविण्याबद्दल अनुकूल उत्तर आल्यावर हेन्री रेव्हिंग्टन २ एप्रिलला रायपाटण, अणस्कुरा मार्गानें पन्हाळ्याला निघाला होता. पन्हाळ्याच्या मार्गावरून तो लिहितो, 'माहालदार, सुभेदाराला सुलतानाचा हुकूम घेऊन आला आहे कीं, सिद्दी जोहराकडे तोफ व दारूगोळा (तो सांगेल त्या ठिकाणीं) सुरक्षित पोहोचविण्यासाठीं इंग्रजांना मदत करावी. पण त्याचा कांहीं उपयोग नाहीं. वहातुकीची तजवीज आपणच केली पाहिजे." ( दि. ५ एप्रिल १६६० )

"विजापूरचा सेनापति सिद्दी जोहर पन्हाळ्यासमोर १५००० सैन्यानिशीं (वेढा घालून) आहे. कंपनीचा दारूगोळा खपविण्याकरितां पत्रव्यवहार केल्यामुळें नमुना पाहण्याकरितां सिद्दीचीं माणसें येऊन गेली. १ तोफ व ५० गोळे घेऊन रेव्हिंग्टन, मिंघॅम गिफर्ड व वेलजी यांसह गेला. कोल्हापूरापासून पन्हाळ्याचा तळ ८।१० मैल असून तेथपर्यंत मोठ्या सन्मानानें रेव्हिंग्टनला नेण्यांत आलें. "माल पसंत पडल्यास आणखी मागणी येईल." (दि. १६ एप्रिल १६६०)

"तुमचें १३ चें पत्र काल मिळालें. विजापुरला गेलेला इसम दारूगोळा विकत घेण्याबद्दल हुकूम घेऊन आलाच असेल. .... तुम्ही स्फोटक शेल उडविला तो पाहून सेनापति खूष झाला." (दि. १७ एप्रिल १६६०)"

मुसळधार पाऊस कोसळत असतांना सिद्दी जोहरानें गवताचीं छपरें उभारून सैनिकांना त्रास न होईल अशी व्यवस्था केली. वेढा अधिक दृढ करण्याविषयीं, चाकणला शाहिस्ताखानानें वेढा दिल्याचें कळतांच, अली आदिलशहाचीं जोहराला वारंवार पत्रेंहि येऊं लागलीं. कारण आपण व शाहिस्तेखान यांच्या दामटींत शिवाजीचा पूर्ण निःपात होऊन आपला हृद्रोग सदाचा नष्ट होण्याचीं चिन्हें आदिलशहा पहात होता. परमानंद कवीन्द्र म्हणतो—

अल्लीशाहोऽपि दिल्लीपरिवृढपृतनां तत्र संग्रामदुर्गे ।
युध्यन्तीमाकलय्य प्रथितपृथुबलां किंचिदाश्वस्तचित्तः ॥
रोद्धव्योऽयं विरुद्धः प्रसभमवहितीभूय शैले प्रणाले ।
संरंभादित्थमुच्चैर्विजयपुरगतो जोहरायालिलेख ॥ ६७

—(शिवभारत अ. २५)

"दिल्लीच्या बादशहाचें मोठें व विख्यात सामर्थ्य असलेलें सैन्य त्या संग्रामदुर्गाशीं झुंजत आहे असें जाणून अल्ली शहाच्या चित्तास कांहींसा धीर आला व त्यानेंसुद्धां विजापुराहून जोहरास अत्यंत रागानें असें लिहिलें कीं, सावध राहून पऱ्हाळगडावर या शत्रूस पक्कें कोंडून ठेवावें."

या भयंकर वेढ्यांत शिवाजी महाराजांचा सर्वनाश होणार असें भाकित स्वकीय व परकीय सर्वच निरीक्षकांनीं केलेलें होतें. वेंगुर्ला येथून दि. १७ जुलै १६६० मध्यें डचांच्या गव्हर्नर जनरलला गेलेल्या पत्रांत म्हटलें आहे : "आम्ही मागलें पत्र रवाना केल्यानंतर विजापूरच्या सैन्यानें पाठलाग केल्यामुळें शिवाजी (८ हजार शिपाई व साठ घोडेस्वार घेऊन) पन्हाळ्याच्या बळकट किल्ल्यांत शिरला; आणि [illegible]

अनुक्रम २६५६३ दि: [illegible]

बंदोबस्तासाठीं ठिकठिकाणीं रवाना केलें. पावसाळा जवळ आल्यामुळें सिद्दी जोहराला वेढा फार दिवस चालवितां येणार नाहीं हा शिवाजीचा अंदाज चुकीचा ठरला; कारण सिद्दी जोहरानें बऱ्याच सैन्यानिशीं पावसाळ्यांत देखील वेढा चालू ठेवण्याचें ठरविलें व पावसाळी छपरेंहि बांधविलीं. किल्ल्यांत तंबाखू, मीठ वगैरे जिनसांचा तुटवडा असून पुष्कळ पैसा भरून अल्ली आदिलशहाकडून माफी मिळविण्याची शिवाजी खटपट करीत आहे अशी लोकवार्ता आहे. तथापि अशी माफी देण्याचें नाकारण्यांत आलें. ..... या सर्व गोष्टी लक्षांत घेतां या बंडखोराला विजापूरकरांच्या हस्तगत व्हावें लागेल असा समज आहे."

याप्रमाणें परिस्थितीची भीषणता वाढत चाललेली पाहून पन्हाळ्यांतून बाहेर पडण्याचा महाराजांनीं निर्णय घेतला. त्याशिवाय दुसरें गत्यंतरच नव्हतें. पावसाळ्यानंतर जोहरचा वेढा अधिक कडक झाला असता. पन्हाळा सोडून वीस कोसांवर असणाऱ्या विशाळगडावर जावयाचें त्यांनीं ठरविलें. तें जाणेंहि संकटमयच होतें. पालीचा जसवंतराव व शृंगारपूरचा सूर्यराव सुर्वे हे दोन सरदार सिद्दीजोहराच्या आज्ञेवरून विशाळगडाला वेढा देऊन बसले होते. तो वेढा फोडून जाणें महाराजांना क्रमप्राप्त होतें. पण त्यांना हें साहसच योग्य वाटलें. त्या वेळीं तेथें त्र्यंबक भास्कर नांवाचा किल्लेदार होता. त्याला व किल्ल्यांतील अन्य विचारवंतांना एकत्रित करून महाराजांनीं असें सांगितलें कीं, "येथें राहून चार महिन्यांवर काळ लोटलेला आहे. आतां श्रावण महिना सुरू झालेला आहे. पुणें व स्वराज्याच्या इतर प्रांतांवर शाहिस्तेखानासारख्या प्रबळ शत्रूनें धाड घातली असतां या सिद्दीजोहराशीं लढण्यांत व्यर्थ कालक्षेप करणें अंतीं विनाशकारक ठरेल. वस्तुतः माझ्या येथें राहण्यामुळेंच जोहराचा वेढा अधिकाधिक आवळला जात आहे. त्र्यंबक भास्करांवर गड पुढें लढविण्याचें दायित्व सोंपवून मी येथून निघून जाणार. माझ्या जाण्यानें वेढ्यांत आपोआपच शिथिलता उत्पन्न होऊन गड लढविणें सोपें जाईल." —(शिवभारत अ. २६)

सर्वांनाच महाराजांचा हा निर्धार योग्य वाटला. त्यांनीं सहाशे निवडक योद्धे आपल्या समवेत येण्यासाठीं निवडले. त्यांतच स्वराज्य-साधनाच्या इतिहासांत चिरंजीव झालेले बांदल देशमुखांच्या परिसरांतील हिरडस मावळचे देशपांडे बाजी प्रभू हे होते. वेढ्याच्या परिसरांतून निसटून जाण्यासाठीं योग्य असलेली एक अवघड जागा महाराजांच्या हेरांनीं शोधून काढली व वेढ्यांत शिथिलता उत्पन्न होण्यासाठीं महाराजांनीं संधीच्या बोलण्याचें नाटक उभारण्यास्तव गंगाधरपंत नांवाच्या आपल्या राजदूताला सिद्दी जोहराकडे पाठविलें. दि. ५ सप्टेंबर १६६० ला आपल्या गव्हर्नर जनरलला पाठविलेल्या पत्रांत वेंगुर्ल्याचा डचांचा वाकनीस लिहितो "गेल्या म्हणजे ऑगस्ट महिन्याच्या चौदाव्या तारखेस कृष्णावैया व्यापाऱ्याकडे पन्हाळ्या-खालील सैन्यांतून पत्र आलें आहे. त्यांत लिहिलें आहे कीं "बंडखोर शिवाजीनें आपला गंगाधर नांवाचा एक वकील विजापुरी सेनापति सलाबत (सिद्दी जोहर) याजकडे पाठविला असून मागणी केली आहे कीं, आपण केलेले सर्व मोठे गुन्हे जर माफ होतील व सलाबतखान कोणत्याहि संकटापासून वडीलपणें आपलें संरक्षण करील तर आपण जातीनें सलाबतखानास भेटूं व आपली सर्व मालमत्ता बादशहाच्या नांवानें त्याच्या स्वाधीन करूं." गंगाधरपंताच्या या दौत्यानें जोहारला इतक्या दिवसांच्या श्रमांचें सार्थक झाल्यासारखें वाटलें. त्यानें भेट घेण्याचें मान्य केलें, व वेढ्यांत शिथिलता उत्पन्न झाली. तिचा लाभ घेऊन शिवाजी महाराजांनीं जिवावरचें साहस पत्करून दि. १२ जुलै १६६० ला रात्रीच्या पहिल्या प्रहरीं सहाशे मावळ्यां-सह, हेरांनीं दाखविलेल्या अवघड वाटेनें पन्हाळ्याहून प्रस्थान केलें. कवीन्द्र परमानंदानें म्हटलें आहे —

" इत्युदीर्य स तं धीरं धरे तस्मिन् निधाय च ।
यामिन्याः प्रथमे यामे प्रस्थितः पृथिवीपतिः ॥६६
याप्ययानसमासीनं तमेनं स्वामिनं भुवः ।
तदा बतानुयान्ति स्म पदगानां शतानि षट् ॥६७

व्रजते भूभृतेऽमुष्मै चरदुष्टचरे पथि ।
स्थलीं निम्नोन्नतां सद्यः सौदामिन्योऽप्यदर्शयन् ॥६८

--(शिवभारत अ. २६)

"असें बोलून त्या धैर्यशाली त्र्यंबक भास्करास त्या गडावर ठेवून महाराज रात्रीच्या पहिल्या प्रहरीं निघाले. महाराज पालखींत होते व सहाशें धारकरी पायीं चालत होते. महाराज प्रवास करीत असतांना, त्यांस हेरांनीं पूर्वीं पाहून ठेवलेल्या मार्गावरील उंचसखल भूमि विजांनींहि तत्क्षणीं दाखविली.' वेढा पार करून महाराज निबिड व कंटकाकीर्ण मार्गानें विशाळगडाकडे जात होते. जी पायवाट चालून वीस कोसांवरचा विशाळगड, पदोपदीं मृत्यूची साद ऐकत त्यांना चालून जावयाची होती तिचें वर्णन करतांना कवीन्द्र परमानंद म्हणतो --

"ततोंतरांतरास्रम्तप्रस्तरप्रोन्नतानतम् ।
प्रपातपातनिनदन्नदीनदसुदुर्गमम् ॥७३
नीलशेवलसंश्लिष्टसक्थिदघ्ननिषद्वरम् ।
नैकधातुद्रवमिलन्मृदुमृन्मसृणोदरम् ॥७४
पल्लवप्रोल्लसद्वीरुत्परिरब्ध महीरुहम् ।
वर्षाकुलित शार्दूलकुलसंकुलकंदरम् ॥७५
वासलूरांतरोद्गच्छन् दंदशूकजिघांसया ।
कृतकोलाहलं कोपात् प्रचलद्भिः कलापिभिः ॥७६
अदुष्टजनसंचारं चरदुष्टचरं तदा ।
राजा राजगिरेरीशस्तमध्वानमलंघत ॥७७

--(शिवभारत, अ. २६)

"पुढें मधून मधून पडलेल्या शिळांच्या योगें उंचसखल असलेला, पर्वतांच्या तुटलेल्या कड्यांवरून पडतांना गर्जना करणाऱ्या नद्यांच्या व नदांच्या योगें अति दुर्गम झालेला, निळ्या शेवाळ्याच्या योगें घट्ट असा गुडघ्यापर्यंत फसावें इतका मधून मधून चिखल असलेला, पालवीच्या योगानें चकचकीत दिसणाऱ्या लतांनीं ज्याच्यावरील

वृक्ष वेष्टिलेले आहेत असा, पावसामुळें धांदल उडालेल्या वाघांची गर्दी ज्याच्यावरील गुहांमध्यें झालेली आहे असा, वारुळांतून बाहेर पडणाऱ्या सापास मारण्याच्या इच्छेनें त्वेषानें धांवून जाणाऱ्या मोरांच्या टाहोंनीं भरलेला, ज्याच्यावर मनुष्यांचा संचार दृष्टीस पडत नव्हता असा हेरांनीं आधींच पाहून ठेवलेला तो मार्ग शिवाजी महाराज आक्रमीत होते."

गडावरील वेढ्याचें स्वरूप व महाराजांचें साहस यांनीं भारावलेला कवीन्द्र जें वर्णन करतो त्यांत समकालीन पत्रव्यवहार पाहिला असतां मुळींच अत्युक्ति नाहीं.

> अज्ञाता नैव निर्याति न चायाति पिपीलिका ।
> तथोपविविशुस्तत्र ततो जोहरसैनिकाः ॥ ११
> अंधीकृत्येव तांस्तत्र निविष्टान् प्रतियोधिनः ।
> शिवः स्वीयेन शौर्येण परिधिं तमलंघयत् ॥ १२
> अथोदन्तविदश्चाराः शाहराजात्मजं नृपम् ।
> विनिर्गतं प्रणालाद्रेर्जोहराय न्यवेदयन् ॥ १४

--(शिवभारत अ. २७)

"मुंगीसुद्धां न कळतां बाहेर जाणार नाहीं किंवा आंत येणार नाहीं अशा रीतीनें जोहराच्या सैनिकांनीं तो वेढा चालविलेला होता. पण त्या सर्व योद्धयांना जणूं कीं काय अंधळे करून शिवछत्रपतींनीं आपल्या अपूर्व साहसानें त्यांच्यावर मात केली. ती वार्ता हेरांनीं सिद्दीजोहराला येऊन कळविली." महाराज वेढा पार करून गेले तरी वाटेंत ते जोहराच्या गुप्तचरांच्या दृष्टीस पडले असले पाहिजेत. ज्याच्यासाठीं एवढा आटापिटा चालविला होता तो शिवाजी आपल्या गोटांत चालत येऊन आपल्या पायीं नम्र होणार या सुवर्णस्वप्नांत दंग असणारा सेनापति सिद्दीजोहर या वार्तेनें केवढा पिसाळला असेल याची कल्पनाच केलेली बरी. त्याला आकाश फाटल्यासारखेंच झालें. आदिलशहा आतां आपल्याला फाडून खाल्ल्याशिवाय रहाणार नाहीं हें त्याला उघड दिसूं

लागलें. शाहिस्तेखानाच्या दृष्टींत आपण केवढे उपहासास्पद ठरूं याची त्याला कल्पना आली. जन्मभर गाजविलेल्या शौर्यावर या घटनेनें आलेला कलंक, दुष्कीर्ति व विनाश पिशाच्चाप्रमाणें त्याच्या समोर थयथया नाचूं लागला. त्यानें आपला जांवई मसूदखान याला तत्काळ सैन्याच्या एका मोठ्या टोळीचें आधिपत्य देऊन, वरून धों धों पाऊस कोसळत असतांहि, विशाळगडाच्या वाटेवर महाराजांना पकडावयास पाठविलें. ते सहस्रावधि सैनिक अंधारांत ठेंचाळत वेगानें पुढें धांवले. पण त्यांची चांगलीच फटफजिती झाली. महाराजांना जोहरच्या हेरांनीं आपल्याला पाहिलें याची कल्पना आली असली पाहिजे. दि. ५ सप्टेंबर १६६० ला वेंगुर्ल्याच्या डच वाकनिसानें आपल्या गव्हर्नर जनरलला लिहिलेल्या पत्रांत पुढील गमतीचें वृत्त लिहिलेलें आहे. तो लिहितो, "या वेळीं शिवाजीनें आपल्या सैन्याचे दोन भाग केले व स्वतःच्या बचावाकरितां एका पालखींत शिवाजी नांवाच्या आपल्या एका न्हाव्यास बसवून ती पालखी नेहमींच्या लवाजम्यासुद्धां नेहमींच्या रस्त्यानें पाठविली. व स्वतः दुसऱ्या पालखींत बसून दुसऱ्या जास्त अवघड रस्त्यानें निघाला. शत्रूनें पहिली पालखी चांदण्यांत सहज पकडली व गोटांत आणिली. यामुळें सर्व राज्यांत शिवाजीस सलाबतानें कैद केल्याची बातमी पसरली व बादशहाच्या बाजूकडील लोकांस अत्यानंद झाला. पण ज्या वेळीं शिवाजीचा कावा लक्षांत आला त्यावेळीं सर्वांचा आनंद नाहींसा झाला."

— (शिवकालीन पत्रसारसंग्रह भा. १ ला पृ. १९४)

ही गोष्ट खरी कीं खोटी हें सांगतां येणें कठीण आहे. कारण शिवभारतांत तिचा मागमूसहि नाहीं. काव्यात्म प्रवृत्तीच्या कवीन्द्र परमानंदानें, अशी कांहीं गोष्ट प्रत्यक्षांत घडली असती तर तिचा उपयोग अवश्य केला असता. शिवाय महाराज गेले ती रात्र चांदणी नव्हती. पत्रांत तर चांदणी रात्र म्हणून उल्लेख आहे. महाराजांचें हें साहस इतकें अपूर्व व सगळ्यांना धक्का देणारें होतें कीं त्याच्या आधारें अनेक चमत्कृतिजनक दंतकथांचें पीक पिकावें. त्यांतील

ही असावी व ती कर्णोपकर्णी वेंगुर्ल्याच्या डच वाकनिसापर्यंत पोहोंचली असावी असें वाटतें. पण अशा प्रकारचें साहस करणारीं माणसें महाराजांच्या जवळ होतीं, व विशाळगडावर पोहोंचण्याच्या दृष्टीनें हें कालहरण आवश्यकहि होतें. त्यामुळें ही गोष्ट घडली असण्याचाहि संभव आहे.

ताज्या दमाचें तीन सहस्र सैनिक घेऊन मसूदखान महाराजांचा पाठलाग करीत होता. व सात प्रहरपर्यंत महाराजांची पालखी घेऊन बाजी प्रभू देशपांडे व महाराजांचे निष्ठावंत मावळे खेळण्याच्या (विशाळगड) रोखानें पुढें पळत होते. दि. १३ जुलै १६६० आषाढ वद्य प्रतिपदेचा तो दिवस होता. महाराज गजापूरच्या घोडखिडींत आले. तेथून पुढें जसवंतराव सूर्यराव यांचा वेढा फोडून विशाळगड चढावयाचा होता. मसूदखानाची तीन सहस्र सेना गर्जत येत होती. पाठीवर मसूद व समोर हे यवनांचे दास हिंदु सरदार अशा दोघांच्या सैन्याशीं केवळ सहाशें मावळ्यांच्या व तेहि अतिपरिश्रमानें दमलेल्या मावळ्यांच्या भरवंशावर लढण्याची शक्यता नव्हती.

## महाराष्ट्राचा लिओनिडास

विशाळगड अजून दूर होता. पाठीमागून सुडाच्या भावनेनें गर्जत येणाऱ्या मसूदखानाच्या सैन्याच्या लोंढ्याला गजापूरच्या खिडींतच अडवून धरून महाराजांना त्वरेनें पुढें जाऊं देणें आवश्यक होतें. अशा वेळीं आपल्या रक्ताचें सिंचन करून स्वराज्याची वेल टवटवीत राखावयास एक कडवा वीरश्रेष्ठ पुढें आला. त्याचें नांव बाजी प्रभू देशपांडे. हे हिरडस मावळचे पिढीजात देश कुळकर्णी म्हणजेच देशपांडे होते. हिरडस मावळ भोर तालुक्यांत आहे. बांदल देशमुखांच्या हाताखालील हिरडस मावळांत ते कारभार पाहात. महाराजांच्या पन्हाळ्यावरील स्वारीपासून ते महाराजांबरोबर होते. त्यांनीं महाराजांना प्रार्थना केली कीं ३०० मावळे बरोबर घेऊन आपण गजापूरची ही घोडखिड प्राणपणानें लढवितों. महाराजांनीं ३०० मावळे बरोबर घेऊन ताबडतोब विशाळगड गाठावा.

विशाळगडावर पोहोंचल्याची खूण म्हणून महाराजांनीं गडावरून तोफांचे आवाज करावे. तोफांचे आवाज होईपर्यंत आपण मसूद-खानाच्या सैन्याला खिडींत पाऊल ठेवूं देत नाहीं. ९१ कलमी बखरींत म्हटलें आहे, "त्या उपर विशाळगडच्या मार्गें पायीं चालतां चार कोस गड उरला. तों प्रातःकाळ झाली. ते समयीं बाजी प्रभू, देश कुळकर्णी, हिरडस मावळकर, धारकरी, राजे यास म्हणों लागले जे 'तुम्ही निमे लोक घेऊन गडावर जाणें व तोफेचा आवाज करणें, तो पावेतों या खिडीमध्यें आपण निमे मावळे घेऊन दोन प्रहर पावेतों पाठीवर फौज येऊं देत नाहीं. साहेबीं निघोन जाणें." ही वेळ अधिक बोलण्याची अथवा अंत:करणांतील कोमल भावना व्यक्त करण्याची नव्हतीच. महाराजांनीं सद्‌गदित अंत:करणानें बाजी प्रभूचा व त्या तीनशें रणधीरांचा निरोप घेतला व ते विशाळगडाकडे धावूं लागले. पायथ्याशीं असलेल्या जसवंतराव व व सूर्यरावांच्या सैन्याशीं स्वत: महाराजांना आपल्या तीनशें मावळ्यांनिशीं प्रखर युद्धांत गुंतावें लागलें व तिकडे गजापूरच्या खिडीवर आदळणाऱ्या मसूदखानाच्या प्रचंड सेनेशीं तीनशें मावळ्यां-निशीं बाजी प्रभू अर्जुनासारखें भीषण समर करीत होते. विशाळ गडावरील शत्रूचा वेढा फोडावयास व गडावर पाऊल ठेवावयास महाराजांना दोन प्रहर लागले. शिवभारतकार म्हणतात --

> पल्लीवनपतिर्वीरो जसवंतो नराधिपः ।
> प्रतापी सूर्यराजश्च शृङगारपुरपार्थिवः ॥ २६
> अपरेऽपि च सामन्ताः शैलस्यास्य निरोधने ।
> नियोजितचरास्तेन जोहरेण दुरात्मना ॥ २७
> युध्यमाना अपि मुहुः शिवं शैलाधिरोहिणम् ।
> निषेद्धुं न क्षमन्ते स्म पराभूताः पदे पदे ॥ २८

—(शिवभारत, अ. २७)

"पल्लीवनाचा (पालीचा) राजवीर जसवंतराव, शृंगारपूरचा राजा प्रतापी सूर्याजीराव आणि दुसरेहि सामंत त्या गडास

वेढण्याच्या कामीं त्या दुरात्म्या दुष्ट जोहरानें पूर्वींच नेमले होते; ते वारंवार लढत असतांहि पदोपदीं पराभूत झाल्यामुळें गडावर चढणाऱ्या शिवाजी महाराजांना अडवूं शकले नाहींत." गडावर पोहोंचतांच महाराजांच्या मनश्चक्षूंसमोर बाजीप्रभूंची खिंड अडवून धरलेली भव्योदात्त मूर्ति उभी राहिली त्यांनीं तोफांचे आवाज केले. बाजीप्रभूनें ते आवाज ऐकले. पण त्या वेळीं ते विशाळगडा-ऐवजीं स्वर्गसोपानाच्या वाटेवर होते. सहा तासपर्यंत मसूदखानाच्या प्रलयंकर वेगानें आदळणाऱ्या सैन्याशीं घनघोर युद्ध करून त्यांनीं त्याला खिंडीच्या तोंडावर केवळ तीनशे मावळ्यांनिशीं अडवून धरलेलें होतें. पण त्या युद्धांत त्यांच्या शरीराची जखमांनीं अक्षरशः चाळण उडालेली होती. शेवटीं ते धरणीवर कोसळले. तोफांच्या आवाजांची थरथरत्या हृदयानें प्रतीक्षा करीत होते. प्राण घुटमळत होता. शेवटीं तोफांचे आवाज त्यांनीं ऐकले. कृतकृत्य झाल्याच्या भावनेनें त्यांनीं आपली आत्मज्योत अनंताच्या महाज्योतींत विलीन करून टाकिली. सूर्यमंडलाचा भेद करून ते गेले. ९१ कलमी बखरींत म्हटलें आहे :— "कुल सरदार येऊन खिंडीसन्निध भांडो लागले. बहुत युद्ध केलें. प्रहर दीड प्रहर पावेतों फौजेस खिंड चढों दिधली नाहीं. तों राजे गडावर जाऊन तोफ मोठी सोडून आवाज दोनतीन करितां बाजीप्रभु म्हणो लागले जे या उपर जीव गेला तरी कांहीं धोका नाहीं." महाराज प्रतीक्षा करीत होते जिवंत बाजीप्रभूची! पण त्यांच्या दर्शनार्थ मावळ्यांनीं, शस्त्राघातांनीं अक्षरशः चाळणी झालेलें बाजीप्रभूचें प्रेतच आणलें. धन्य बाजी! शिवछत्रपतींच्या प्रेमाश्रूंची माळ शेवटीं तुझ्या कंठांत पडली. स्वराज्याचें सिंहासन असेंच रक्तगंगेतून निर्माण व्हावें हा ईश्वरी संकेत आहे.

संध्याकाळनंतर मसूदखान आपल्या दमलेल्या सैन्यासह गजापूरची खिंड तुडवून पुढें निघाला. वाटेंत त्याला सूर्यराव व जसवंतराव पराभूत अवस्थेंत भेटले. त्यांच्या तोंडून महाराज गडावर पोहोंचल्याची वार्ता कळतांच निराशेचा काळा पडदा त्याच्या डोळ्यांवर आला. त्यानें दांत ओठ चावून गडाला वेढा दिला. पण

गडावरील ताज्या दमाच्या मावळ्यांनीं त्याला व त्याच्या सैन्याला देमाय धरणीठाय करून सोडलें. पराभवानें काळें ठिक्कर पडलेलें तोंड घेऊन मसूदखान परत पन्हाळ्यावर आला. सेनापति जौहरावर या पद्धतीची मात यापूर्वी कोणीहि केली नसेल. मसूदखान जिवंत परत आला हेंच आपलें मोठें भाग्य होय असें त्याला वाटल्याविना राहिलें नाहीं. महाराजांनीं यानंतर प्रथम राजगडावर जाऊन आपल्या वंद्य मातोश्रींचें दर्शन घेतलें. त्या अपूर्व साहसी व जयशाली पुत्राचा पराक्रम त्याच्याच तोंडून ऐकतांना त्या मातेच्या हृदयाला काय वाटलें असेल! परमानंद कवीन्द्र म्हणतो —

उषित्वा वसतीस्तास्ता: सोत्सवे पथि पंचषा: ।
सद्यो राजगिरिं गत्वा राजा राजगिरीश्वर: ।। ४५
चंचन्मरीचिनिचयस्फुरद्रत्नासनस्थिताम् ।
कुलस्त्रीभि: परिवृतां कुलस्त्रीकुलदेवताम् ।। ४६
तत्तद्व्रतवतीं नक्तंदिवमंचितदैवताम् ।
ददतीमाशिषस्तास्ता: सत्यगंभीरभाषिताम् ।। ४७
प्रमोदबाष्पप्रचयस्तिमितायतलोचनाम् ।
समुच्चलितवात्सल्यरसां सदर्शनोत्सुकाम् ।। ४८
संप्रस्नुतस्तनस्तन्यधाराभिरमृतात्मभि: ।
स्नपयन्तीं महाबाहुर्जननीं स्वामवन्दत ।। ४९
ततस्तदंतिके तत्तद् वृत्तमावेदयन्नयम् ।
अनयत्तद्दिनं सर्वं विजयी शाहनंदन: ।। ५०

—(शिवभारत, अ. २७)

"आनंददायक मार्गांत निरनिराळ्या पांचसहा वस्ती करून राजगडच्या शिवराजानें लगेच राजगडास जाऊन, चमकणाऱ्या किरणसमूहाच्या योगें लखलखणाऱ्या रत्नजडित आसनावर बसलेल्या, कुलीन स्त्रियांनीं परिवेष्टित असलेल्या, कुलीन स्त्रियांचें कुलदैवत झालेल्या, नाना प्रकारचीं व्रतें करणाऱ्या, रात्रंदिवस देवदेवतांची आराधना करणाऱ्या, निरनिराळे आशीर्वाद देणाऱ्या,

सत्य व गंभीर भाषण करणाऱ्या, आनंदाश्रुपुरानें दीर्घनेत्र स्तिमित झालेल्या, अंतःकरणांत पुत्रप्रेम उचंबळलेल्या, दर्शनोत्सुक झालेल्या; स्तनांतून वाहणाऱ्या अमृतमय दुग्धधारांनीं न्हाऊं घालणाऱ्या आपल्या जननीस वंदन केलें. नंतर निरनिराळ्या प्रकारचा सर्व वृत्तांत सांगण्यांत त्या विजयी शिवाजीनें तो सर्व दिवस तिच्या सन्निध घालविला."

एका बाजूला सिद्दी जौहर व दुसऱ्या बाजूला शाहिस्तेखान असा लढा सतत चालू ठेवणें कोणत्याहि दृष्टीनें आत्मनाशाचें होतें. त्यामुळें अजून पन्हाळ्याला वेढा घालून बसलेल्या सिद्दीजोहरच्या स्वाधीन पन्हाळ्याचा दुर्ग सामोपचारानेंच करून, मोंगल छातीशीं येऊन भिडला असतां विजापुरकरांशीं चाललेलें युद्ध संपविणेंच श्रेयस्कर असा महाराजांनीं निर्णय घेतला. त्यांनीं पन्हाळ्याचा गडकरी त्र्यंबक भास्कर याला सांगून पाठविलें कीं, "पन्हाळा दुर्ग सिद्दीजौहराच्या स्वाधीन करून तत्काळ येथें उपस्थित व्हावें." त्यानें आज्ञेप्रमाणें जौहराला शरण गेल्याचा देखावा उत्पन्न करून पन्हाळा त्याच्या स्वाधीन केला. या सगळ्या प्रकरणांतून विजापूरच्या सुलतानाचा आपल्यावर भयंकर क्रोध होईल याची सिद्दीजौहर अथवा सलाबतखान याला पूर्ण जाणीव होती. त्यानें या भावी संकटांत शिवाजीसारखा साहसी, चतुर व सामर्थ्यसंपन्न मित्र आपल्या पाठीशीं असावा म्हणून त्र्यंबक भास्कराचें उलट स्वागत करून महाराजांचें मित्रत्व जोडण्याचा प्रयत्न केला.

## सिद्दीजोहराचा अंत

पन्हाळ्याच्या भयंकर वेढ्यांतून शिवछत्रपति जरी केवळ आपल्या अपूर्व साहसानें व बुद्धिचातुर्यानें निसटून गेले तथापि अली आदिलशहानें स्वतःची अशी मूर्खपणाची समजूत करून घेतली कीं, सिद्दीजोहरानें शिवाजीकडून लांच घेऊन त्याला वेढ्यांतून जाऊं दिलें असलें पाहिजे. पडत्या राजवटींत मनुष्यपरीक्षेचा अभाव निर्माण होतो तो असा. "शिवाजीनें दिलेले पैसे काढ म्हणून तो

जोहराच्या मागें लागला. पण जोहरानें पसे घेतलेच नव्हते तर तो सुलतानाला पैसे देणार कोठून? शेवटीं जोहरानें सुलतानाविरुद्ध उघड बंड उभारलें व तो कर्णालच्या दुर्गम गडांत जाऊन बसला. सरळपणें त्याला जिंकणें शक्य नव्हतें. म्हणून त्या मूर्ख सुलतानानें त्याला विषप्रयोग करून ठार मारलें. कवीन्द्र परमानंद म्हणतो —

"अल्लीशाहोऽतिमंदात्मा मन्यमानोऽन्यथात्मनि ।
चिराय जोहरायैव चुकोप किल कोपनः ।। १५
भवता प्रतिरुद्धस्य भवतोऽनुमतिं विना ।
दुर्गमो निर्गमस्तस्य नृपतेरिति मे मनः ।। १७
तस्मादेहि धनं देहि यद्दत्तं तेन भूभृता ।
मद्धस्तेनैव भवतो भवेन्निधनमन्यथा ।। १८
वर्णदूतमिमं तस्मै प्रेषयामास येदिलः ।
तथापि न विभायास्माद् बर्बरो बलिनां वरः ।। १९
न यदा येदिलेनैष संपरायमपारयत् ।
तदा कर्णपुरं सद्यः शिश्रिये दुर्गदुर्गमम् ।। २०
अथ केनापि यत्नेन जोहराय स येदिलः ।
हालया साकमज्ञातं हालाहलमदापयत् ।। २१
अहो येदिलशाहस्य महती मतिमंदता ।
उपकारपरे येन जोहरेऽपनयः कृतः ।। २२
मन्यामहे वयं तर्हि नापराधी स जोहरः ।। २४

—(शिवभारत, अ. २८)

"महामूर्ख व रागीट अल्लीशहाच्या मनांत भलतेंच येऊन तो पुष्कळ काळपर्यंत जोहरावरच रागावला. 'हे दुष्टबुद्धे, तूं धनलोभानें स्वामिद्रोह करून त्या शिवाजीपासून पुष्कळच धन घेतलेंस व वेढ्यांतून तो जात असतां त्याच्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष केलें आहेस. ज्या पद्धतीनें तूं वेढा चालविला होता तिचा विचार केला तर शिवाजीनें त्या वेढ्यांतून निघून जाणें तुझ्या अनुमतीविना

केवळ अशक्य होतें. शिवाजीकडून घेतलेलें तें धन मुकाटपणें माझ्या स्वाधीन कर; नाहीं तर मी तुला ठार केल्याविना राहणार नाहीं" असें आदिलशहानें त्याला पत्र पाठविलें. पण तो बलिश्रेष्ठ सिद्दी त्याला मुळींच भ्याला नाहीं. सुलतानाशीं लढणें कठीण जाईल असें वाटतांच त्यानें कर्णूलच्या दुर्गांत प्रयाण केलें. तेव्हां अलीआदिलशहानें युक्तीनें मद्यांतून विषप्रयोग करवून जोहराचा प्राण घेतला. उपकार करणाऱ्या जोहराचा ज्यानें अशा रीतीनें बळी घेतला त्या आदिलशाहाच्या मूर्खपणास काय म्हणावें? एकंदर घटनेचा विचार केला तर या प्रकरणांत जोहराचा कांहीं एक अपराध नाहीं असें आम्हांस वाटतें."

## मोंगलांचा अदूरदर्शीपणा

पन्हाळ्याच्या या भीषण संकटांतून महाराज सुखरूपपणें पार पडले याचें श्रेय सर्वस्वी त्यांच्या अलौकिक साहसाला व दीर्घदर्शी राजकीय प्रतिभेला तर आहेच; पण त्याचबरोबर बादशहा औरंगजेबाच्या अदूरदर्शी राजकारणालाहि तें अंशतः आहे. वस्तुतः शिवाजी महाराजांविरुद्ध विजापूरच्या सुलतानानें आपण होऊन मोंगलांचें साहाय्य मागितलें होतें; व या निमंत्रणामुळेंच औरंगजेबानें लाख दीड लाख नामवंत योद्धयांचें सैन्य देऊन शाहिस्तेखानाची पाठवणी केली होती. या सैन्यानें विजापूरकरांना मिळूनच आपलें कार्य करणें योग्य होतें. पण औरंगजेबाला केवळ शिवाजी महाराजांवरच सूड उगवावयाचा नसून जमल्यास आदिलशाहीचाहि घास गिळंकृत करावयाचा होता. त्यासाठीं आपले हात आधीपासूनच मोकळे असावे म्हणून त्यानें शाहिस्तेखानाला अशी आज्ञा दिली होती कीं त्यानें कोणत्याहि परिस्थितींत आदिलशहाशीं हातमिळवणी न करतां स्वतंत्रपणेंच मोहीम चालवावी. त्याचा परिणाम असा झाला कीं, सिद्दी जोहरच्या वेढ्याला शाहिस्तेखानाजवळ एवढें अगणित सैन्य असूनहि आदिलशहाला त्याचा कांहीं एक उपयोग होऊं शकला नाहीं. जर जोहराच्या साहाय्याला या

वेढ्यांत शाहिस्तेखान साह्य करावयास असता, अथवा विजापूरकर व मोंगल मिळून युद्ध चालविते तर स्वराज्यप्रयत्नांच्या या इतिहासाचें पर्यवसान फारच दुर्दैवी ठरलें असतें. शत्रूच्या अदूरदर्शी धोरणापासूनहि कधीं कधीं चिरपरिणामी लाभ होतो तो असा. शाहिस्तेखानाची मोहीम शेवटपर्यंत स्वतंत्रच राहिली. इतकेंच नव्हे तर साहाय्यासाठीं ज्यांनीं बोलाविलें त्या विजापूरकरांचेहि मधून मधून लचके तोडावयास मोंगलांनीं कमी केलें नाहीं.

## चाकणचा संग्रामदुर्ग

श्रीशिवछत्रपतींनीं पन्हाळ्याहून ज्या वेळीं प्रयाण केलें त्या वेळीं शाहिस्तेखान चाकणच्या संग्रामदुर्गाला वेढा घालून बसला होता. महाराज राजगडावर ज्या वेळीं मातुःश्री जिजाबाई साहेबांच्या दर्शनास आले, त्या समयास म्हणजे पन्हाळ्याच्या घटनेनंतर जवळ जवळ एक महिन्यानें दि. १५ ऑगस्ट १६६० ला हा गड मोंगलांच्या अधीन झाला. महाराजांच्या स्वराज्यांतील एक सामान्य गड घ्यावयास शाहिस्तेखानाला ५४ दिवसपर्यंत युद्ध करावें लागलें. तेथील गडकरी फिरंगोजी नरसाळा यानें या संग्रामांत शाहिस्तेखानाला सदैव आठवण राहील असें आपल्या खड्गाचें पाणी पाजलें. खानाच्या मोंगली सैन्याचा या वेढ्यांत अतिशय नाश झाला. महाराज विजापूरकरांच्या वेढ्यांत पन्हाळ्याला अडकले असतांनाच संग्रामदुर्गाला वेढा पडलेला होता. गडकरी फिरंगोजी नरसाळा याला त्यांनीं "शक्य तोंवर गड लढवावा व अगदीं निरुपायच झाला तर सोडावा" असा गुप्त संदेश पाठविला होता. फिरंगोजीनें व त्याच्या सैनिकांनीं अक्षरशः तसूतसूभर भूमीसाठीं रक्ताचे पाट वाहविले. निरुपाय झाला म्हणूनच त्यानें गड सोडला. या चौपन्न दिवसांत दिसलेल्या फिरंगोजीच्या अपूर्व शौर्यदीप्तीनें शाहिस्तेखान दिपून गेला. त्यानें त्याला अटक केल्यावर त्याच्या शौर्याची अतिशय प्रशंसा केली व अतिशय धनलोभ दाखवून त्याला आपल्या पदरीं येण्याचा आग्रह केला.

पण त्या स्वामिभक्तानें आपल्या धन्याचा पक्ष सोडण्याचें नाकारलें. खानानें त्याला त्याच्या लोकांसह महाराजांकडे जाऊं दिलें. चाकण जिंकल्यावर शाहिस्तेखानानें सारा पावसाळा पुण्यांत मोंगली आळसांत घालविला. चाकण जिंकण्यांत त्याचीं नऊशें माणसें ठार झालीं होतीं. त्यानें त्याच्या मनावर इतका परिणाम झाला कीं, पुन्हां दुसरे कोणते गड घेण्याचा त्यानें निर्णय घेतला नाहीं. शिवाजी-ऐवजीं या पुण्याच्या विश्रांतींत त्यानें विजापूरकरांचा परिंडा गड मात्र भक्कम लांच देऊन दि. २० नोव्हेंबर १६६० ला घेतला. औरंगजेबाच्या नीतिमत्तेचें हें तिरस्करणीय स्वरूप होतें.

चाकण व पन्हाळा हे दोन्ही गड हातचे जाऊन गेल्या सहा महिन्यांतील, या उभयविध आक्रमणांच्यामुळें जी कल्पनातीत हानि झाली होती ती भरून कशी काढतां येईल याचा गंभीरपणें विचार करण्यांत या वेळीं महाराजांनीं राजगडावर पुष्कळ दिवसपर्यंत वास्तव्य केलें होतें. स्वराज्याचे आधारस्तंभ असणारे सारे मुरब्बी मुत्सद्दी मंडळ त्या वेळीं महाराजांभोंवतीं जमलेलें होतें. पुढील धोरणासंबंधीं त्यांच्याजवळ शिवछत्रपतींनीं जें आपलें मनोगत व्यक्त केलें तें कवीन्द्र परमानंदानें अत्यंत सारगर्भ पद्धतीनें सांगितलें आहे. कवीन्द्र म्हणतो ---

तमुदन्तं शिवनृपो निशम्य शिवपत्तने ।
सर्वनीतिविदां वर्यः सचिवानिदमब्रवीत् ।। २९
सहायपरिहीनेन नरेणेह न केनचित् ।
परिभावयितुं शक्या प्रतीपानामनीकिनी ।। ३३
तस्माद्यत्नेन महता नरेन्द्रेण विपश्चिता ।
संग्राह्यानीकिनी शश्वत् परनिग्रहकारिणी ।। ३४
बहुनार्थेन रहितो महानपि महीपतिः ।
न तद्विधानां सेनानां संग्रहं कर्तुमर्हति ।। ३५
यस्यार्थास्तस्य सुहृदो यस्यार्थास्तस्य पौरुषम् ।
यस्यार्थाः तस्य सर्वेऽपि सहायाः संभवन्ति हि ।। ३९

तद्दुग्ध्वा स्म प्रभावेण पृथुवत् पृथिवीमिमाम् ।
तदर्थमाहरिष्यामि यदधीनमिदं जगत् ॥ ४०
तदनंतरमेवोच्चैः तत्र दिल्लीन्द्रमातुले ।
करिष्यामि प्रतीकारमगस्त्य इव सागरे ॥ ४१

--(शिवभारत अ. २८)

"चाकण शत्रूनें जिंकल्याची वार्ता राजगडावर कळल्यानंतर, सर्व राजनीतिवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असा तो शिवाजी राजा आपल्या मंत्र्यांना म्हणाला कीं, "ज्याला साह्यकर्ता नाहीं अशा कोणत्याहि मनुष्याच्या हातून या जगांत शत्रुसेनेचा पराभव केवळ अशक्य आहे. म्हणून दीर्घदर्शी व शहाण्या राजानें शत्रूंचा विनाश करूं शकणारें सैन्य प्रचंड प्रमाणावर, मोठ्या प्रयत्नानें सतत बाळगलें पाहिजे. पण ज्याच्याजवळ द्रव्याचा विपुल सांठा नाहीं अशा मोठ्या राजालासुद्धां अशा प्रकारचें खडें सैन्य बाळगतां येण्याची शक्यता नाहीं. राजकारणांत ज्याच्याजवळ विपुल पैसा असतो त्यालाच मित्र लाभतात; ज्याच्याजवळ पैसा असतो त्यालाच विजयांत परिणत होणारा पराक्रम करून दाखविण्याची शक्यता असते, व ज्याच्या जवळ पैसा असतो त्यालाच सर्वांचें साह्य लाभतें. म्हणून प्राचीन पृथु राजाप्रमाणें आपल्या सामर्थ्यानें ह्या पृथ्वीचें दूध काढून (म्हणजे निरनिराळ्या प्रांतांवर स्वाऱ्या करून व शत्रु प्रदेशांतून लूट आणून) ज्याच्यावर राजकारणासारखे जगाचे व्यवहार अवलंबून असतात तो पैसा उभारावा असें मला वाटतें. त्यानंतरच, अगस्ति ऋषीनें जसा समुद्र आटविला तसा आपल्याला बादशहा औरंगजेबाचा हा मामा जो शाहिस्तेखान त्याचा योग्य प्रतिकार करतां येईल, एरवी नाहीं."

महाराजांची ही योजना इतकी सुपूर्त होती कीं ती सर्वांनाच संमत झाली. पण कोणत्या प्रांतावर मोहीम प्रारंभ करावी हा प्रश्न होता. या दृष्टीनें कोंकण प्रांत महाराजांना सोयीचा दिसला. या वेळीं कोंकणांतील विजापुरी सत्ता अत्यंत क्षीणबल झालेली

होती. कोणीहि समर्थ नेता तेथें नसून लहान सहान सरदार जहागीरदारांचेंच प्राबल्य माजलें होतें. महाराजांनीं मोहिमेसाठीं तिकडे आपली दृष्टि वळविली. तोंच या मोहिमेवर येणाऱ्या एका मोठ्या संकटाकडे शिवछत्रपतींच्या गुप्तचरांनीं महाराजांचें लक्ष वेधलें.

## कारतलबखान

शाहिस्तेखानाच्या मनांत या वेळीं कोंकणवर चाल करून तेथील शिवछत्रपतींची सत्ता निर्मूलन करण्याचें होतें त्या साठीं योजना आंखली जात होती. त्या दृष्टीनें सन १६६०च्या एप्रिलपासून इस्माइलखानाच्या नेतृत्वाखालीं तीन सहस्र मोंगली सेनेनें कल्याणला वेढा दिला होता. परंतु त्याला कोणतेंहि यश आलेलें नव्हतें. त्यामुळें एखाद्या खंद्या सेनापतीवर हें कार्य सोंपवावें म्हणून त्यानें कारतलबखानाची यासाठीं निवड केली. हा कारतलबखान सन १६५७ मध्यें दाराच्या वतीनें चालून आलेल्या राणा जसवंतसिंगाशीं औरंगजेबाचें जें युद्ध झालें त्यांत आपल्या पराक्रमानें तळपला होता. औरंगजेबानें त्याला 'चार हजारी' सरदार केलें होतें. शाहिस्तेखानानें हा उजबेग वंशांतील सरदार निवडून त्याच्या हाताखालीं कछप व चव्हाणांचें राजपुती सैन्य, मोंगली सेनेची एक मोठी तुकडी, अमरसिंह, मित्रसेन, सर्जेराव गाढे, जसवंतराव कोकाटे, जाधवराव व रायबागीण हे योद्धे दिले. चौल, कल्याण, भिवंडी, पनवेल, नागोठाणें हे प्रदेश प्रथम हस्तगत करून कोंकणांतून शिवाजीची सत्ता निर्मूल करण्याचा त्याला स्पष्ट आदेश होता, व योग्य वेळीं मुख्य सेनापति शाहिस्तेखान त्याची पाठराखण करणार होता. कारतलबखानाबरोबर तोफा वगैरे अवजड सामानहि पुष्कळ होतें. पुण्याहून लोहगडच्या मार्गानें बोरघाटाच्या दक्षिणेकडून कारतलबखान कोंकणांत उतरत होता. महाराजांच्या मोहिमेवर हें मोठेंच संकट होतें गुप्तचरांच्या या वार्तेनें प्रथम कारतलबखानाची व्यवस्था लावणें हें महत्त्वाचें ठरलें. महाराज

राजगडावर असल्यामुळें त्यांना गांठण्यासाठीं मोंगली सैन्य राजगडावर चालून येण्याचाहि संभव होता. त्यामुळें सह्याद्रीवरून हें मोंगली सैन्य खालीं उतरत असतां त्याचा समूळ फडशा पाडणेंच आवश्यक होतें. महाराजांच्या संकेतानुरूप कारतलबखानाच्या मार्गावरील घनदाट अरण्यांत स्वराज्याचे सैनिक गुप्तपणें राहिले. अवजड सामानासह दाट झाडींतून प्रवास करतांना कारतलबखानाचे चांगलेच हाल झाले. पण अहंकारानें तो पुढें जात होता. या दाट अरण्यांतून जातांना शिवाजीच्या प्रदेशांत आपण शिरत आहोंत; जावळीच्या अरण्यांत अफझलखानाच्या सैन्याची जी दुर्दशा झाली ती आपलीहि मराठ्यांच्या हातून होण्याचा संभव आहे अशी भीतिहि त्याच्या मनांत डोकावत होती. पर्वतावरून खालीं उतरून या सैन्यानें निबिड अरण्यांतील पाऊलवाट धरली. तें उंबरखिंडीजवळ येतांच एकदम रणभेरी वाजल्या व महाराजांचे सैनिक या सैन्यावर तुटून पडले. मध्यान्हापर्यंत कसाबसा यावनी सेनेनें धीर धरला पण मग ती पळ काढूं लागली. पण महाराजांच्या सैनिकांनीं साऱ्या वाटा रोखलेल्या असल्यामुळें मृत्यूच्या भीषण गुहेवांचून दुसरें आश्रयस्थान या सैन्याला उरलें नाहीं. तेव्हां मात्र प्रसंग ओळखून रायबागिणीनें कारतलबखान व शाहिस्तेखान यांना या प्रदेशांत शिरण्याचें मूर्खपणाचें धोरण आंखण्याविषयीं नानाप्रकारें दूषणें देऊन शिवाजी महाराजांना शरण जाऊन स्वतःचे व इतरांचे प्राण वांचविण्याविषयीं सांगितलें. राजव्याघ्रीची मृत्युभयानें शेळी झाली. कारतलबखानहि घाबरला व त्यानें नाक मुठींत धरून महाराजांच्याकडे संपूर्ण शरणागति पत्करून दूत पाठविला. या दूतानें कारतलबखानाची जी प्रार्थना महाराजांच्या चरणीं निवेदन केली तिच्यावरून सर्वनाशाच्या भयानें त्याची काय अवस्था झाली होती याची कल्पना येते. कवीन्द्र परमानंद म्हणतो:

यं कारतलबं नाम लंकापतिमिवापरम् ।
अजय्यं जानते लोकाः स त्वां विज्ञापयत्यदः ।। २८

शास्ताखाननियोगेन योगेन समयस्य च।
बताऽवलोकितोऽस्माभिः स एष विषयस्तव ॥ २९
हंत द्वित्रीण्यहान्यत्र मया लब्धं न जीवनम् ॥
तस्मादभयदानेन देहि मे मम जीवनम् ॥ ३१
जनकः शाहराजस्ते महाराजो महामतिः।
यवनेऽप्यन्वहं स्नेहमपारमकरोन्मयि ॥ ३४
तत् सर्वमपि विस्मृत्य परप्रेष्यतया मया।
अग्नेरिव तवावज्ञा विज्ञायापि विनिर्मिता ॥ ३५
तद्वितीयं स्वसर्वस्वमात्मानमनवस्करम्।
चिकीर्षामि महाबाहो जीवन् जिगमिषामि च ॥ ३६
अनुमन्यस्व मां तस्मात् त्वमस्मिन् विषये नृप।
प्रपन्नपालनपरो भवानिह भवानिह ॥ ३७

—(शिवभारत, अ. २९)

"ज्या कारतलबखानास लोक रावणाप्रमाणें अजिंक्य असें समजतात तो दातीं तृण धरून आपणांस अशी प्रार्थना करतो कीं, शाहिस्तेखानाच्या आज्ञेमुळें व माझ्या दुर्भाग्यामुळें मी आपल्या या प्रदेशांत प्रवेश केला. काय सांगावें? येथें गेल्या दोनतीन दिवसांत मला पाणीसुद्धां प्यावयास मिळालेलें नाहीं. आपल्याला मी शरण आहे. मला कृपा करून अभयदान द्यावें मी यवन असूनहि आपले वडील महाराज शहाजीराजे यांचा माझ्यावर अतिशय लोभ होता. पण मी ते पूर्वीचे संबंध विसरून, दुसऱ्याचा सेवक व पराधीन जिणें असल्यामुळें, अग्नीसारख्या प्रखर असलेल्या आपली मी ही बुद्धिपुरस्सर अवज्ञा केली हें मी मान्य करतों. आतां मी आपणांस आपलें सर्वस्व समर्पण करून माझ्या अपराधांचें प्रायश्चित्त भोगावयास सिद्ध आहे. आपण मला जीवदान द्यावें. या संकटमय प्रदेशांतून बाहेर जाण्याची आपण मला कृपापूर्वक अनुज्ञा द्यावी. शरणागताचें संरक्षण करणारें आपल्यासारखें दुसरें कोण आहे?"

श्री शिवछत्रपतींनाहि केवळ संहार अभिप्रेत नव्हताच. त्यांनीं कारतलबखानाची ही विनवणी मान्य केली व स्वत: तो आणि त्याच्या हाताखालचे सेनानी यांना ससैन्य जीवदान दिलें. महाराजांच्या अभयदानाची ही द्वाही त्यांच्या सैनिकांत फिरेपर्यंत मराठ्यांनीं शत्रुसंहार व लुटीचें ताण्डव चालू ठेवलेंच होतें. जीवदान मिळतांच आपल्याजवळचें सारें मौल्यवान् सामान टाकून देऊन हे वीरपुंगव आल्या दिशेनें पळत सुटले. शाहिस्तेखानाला चाकणपेक्षांहि ही चपराक चांगलीच जाणवली. निर्विवादपणें शाहिस्तेखानावर महाराजांनीं मिळवलेला हा पहिला विजय होय. शिवाजीच्या प्रदेशांत पाऊल टाकणें म्हणजे नागराजाच्या बिळांत हात घालणें होय हें त्या अमीरुल् उमरावाला चांगलेंच कळलें. महाराजांना या युद्धांत मोहोरांनीं भरलेल्या असंख्य पेट्या, हत्ती, घोडे सोन्याचांदीचीं अगणित लहानमोठीं भांडीं व तोफादि युद्धसाधनांचा लाभ होऊन त्यांच्या कोशसंग्रहयोजनेचें टिपरूं डंक्यावर पडलें. सैनिक गर्जना करीत होते. नेताजीसारख्या सेनानीचे बाहू या पहिल्याच विजयानें नव्या पराक्रमासाठीं स्फुरण पावत होते; व महाराजांची प्रतिभा त्यांना पराक्रमी भार्गवरामानें निर्माण केलेल्या प्रांताकडे पदन्यास करावयास प्रेरणा देत होती.

* * *

प्रकरण सोळावें

# शाहिस्तेखानाचा पाडाव

कारतलबखानाचा पराभव झाला असला तरी तेवढ्यानें मोंगलांचें भय कमी झालें अथवा शाहिस्तेखानाच्या आक्रमणाची गति मंद झाली असें शिवछत्रपति मुळीच समजत नव्हते. कोंकणांत जाण्यापूर्वी मोंगलांना युद्धांत गुंतविणें आवश्यक होतें. त्यासाठीं त्यांनीं नेताजी पालकराची योजना केली. कवींद्र परमानंद म्हणतो—

चंडेन भुजदंडेन दंडितारातिमण्डलः ।
शिवः समीक्ष्य नेतारं सेनापतिमवोचत ॥ ६०
याम्यहं येदिलायत्तराष्ट्राक्रमणकर्मणे ।
इहैव तु त्वया स्थेयं ताम्राननिबर्हणे ॥ ६१
परावृत्ता एव परे न परावृत्तिकारिणः ।
इति त्वया न मन्तव्यं ताम्रास्ते ह्यभिमानिनः ॥ ६२

—(शिवभारत, अ. २९)

"आपल्या पौरुषानें कारतलबखानादि शत्रूंचा मोड केल्यावर शिवछत्रपति सेनापति नेताजीला म्हणाले, 'आदिलशहाचे प्रांत (कोंकण) पादाक्रांत करण्यासाठीं मी स्वतः जाणार आहें. तूं मात्र मोंगलांच्या तोंडावर येथेंच (महाराष्ट्रांत) रहा. मोंगलजात अभिमानी आहे. एका पराभवानें ते मागें हटतील असें समजण्याचें कारण नाहीं." गनिमीकाव्याच्या पद्धतीनें शत्रूला हैराण करण्याच्या स्पष्ट सूचना नेताजी पालकराला होत्या. सप्त प्रकरणात्मक शिवचरित्रांत म्हटलें आहे "मोंगली फौज; बाहेर कही कबाड, सामान, रसद, जबाब धरून (तिची) बंदी करावी. आधींच पुढें तोंड देऊन लढाई कशास करावी? बंदी करून घाबरा पाडावा. एकादे आडसंबीस मारून काढावा किंवा एकादे किलियास येऊन मोर्चे देऊन बसूं द्यावा, तेथें मारावें." —(स. प्र. शि. पृ. २१०)

आपल्या सैन्याचे दोन भाग करून महाराजांनीं एक भाग नेताजीच्या स्वाधीन केला व दुसऱ्या भागाचें आधिपत्य स्वतः घेऊन ते कोंकणांत उतरले. केवळ लूटच नव्हे तर महाराजांच्या या कोंकणावरील स्वारीची आणखी दोन कारणें होतीं. वरून मैत्री करणाऱ्या व आंतून मात्र संकटाच्या प्रसंगीं तोफा, गोळे व गोलंदाजहि पुरवून सिद्दी जोहरासारख्या भयानक शत्रूशीं हात मिळवणाऱ्या राजापूरच्या वंचक इंग्रज वखारवाल्यांना धडा शिकवणें हें एक कारण होतें. दुसऱ्या कारणाचें स्वरूप सांगतांना कै. दत्तोपंत आपटे शिवभारताच्या प्रस्तावनेंत लिहितात " महत्त्वाचें असें एक कारण उपस्थित झालें होतें तें कोंकणांतील किरकोळ सरदारांच्या वर्तनासंबंधीचें होतें. उदाहरणार्थ, पालीचा राजा जसवंत व शृंगारपूरचा सूर्यराव हे मराठी राज्याविषयीं आपल्या मनांत आस्था आहे असें भासवीत. आणि मी तुमचा " क्रीतपुत्र " आहे असा निरोपहि सूर्यरावानें जावळी प्रसंगानंतर महाराजांकडे पाठविला होता. पण विजापूरकरांचा जोर दिसतांच मराठ्यांशीं लढण्यासहि ते दोघे कमी करीत नसत. या सरदारांच्या जहागिरी कोंकणांत होत्या, व कोंकण आदिलशहाच्या ताब्यांत होतें. त्या अर्थीं त्यांनीं महाराजांच्या सैन्याशीं प्रसंगोपात्त लढण्याचा डौल घातला तर तो त्यांचा गुन्हा आहे असें महाराज केव्हांहि समजले नाहींत; कारण ते दोघेहि पराधीन होते. पण यापलीकडे जाऊन मनापासून मराठ्यांचा पाडाव करण्यासाठीं ते झटतात कीं काय याची परीक्षा त्यांस पहावयाची होती; आणि या कसोटीनें तें शत्रु आहेत किंवा मित्र आहेत हें ठरवावयाचें होतें."

—(शिवभारत प्रस्तावना. पृ. १८७

कोंकणांत उतरतांच महाराज प्रथम दाभोळवर चालून गेले. ते दाभोळला येतांच पालीचा राजा जसवंतराव हा घाबरून शृंगारपूरचा राजा सूर्यराव याच्या आश्रयासाठीं गेला. त्यानेंहि त्याला आश्रय दिला, सिद्दी जोहराला साह्य केल्याच्या पातकाचे दोघेही सारखेच धनी होते. पण महाराजांनीं त्या दोघांच्याहीकडे पूर्ण

दुर्लक्ष केलें. दाभोळच्या रक्षणासाठीं दोन सहस्र सैन्य ठेवून व योग्य अधिकाऱ्याची नियुक्ति करून श्रीपरशुरामाच्या दर्शनार्थ ते चिपळूणला गेले. त्या ठिकाणीं धार्मिक प्रवृत्तीच्या शिवछत्रपतींनीं तीर्थविधि करून मोठा दानधर्म केला. त्यानंतर संगमेश्वर व देवरूख येथील आदिलशाही ठाणीं उखडून टाकून त्यांनीं तानाजी मालुसरे व पिलाजी नीलकंठ यांना त्या प्रदेशाच्या रक्षणासाठीं ससैन्य संगमेश्वराला ठेवून राजापूरकडे प्रस्थान केलें. जाण्यापूर्वी 'मी तुमचा क्रीतपुत्र आहे' म्हणणाऱ्या शृंगारपूरच्या राजाची परीक्षा घ्यावी म्हणून त्यांनीं त्याच्याकडे निरोप पाठविला. परमानंद कवींद्र म्हणतो---

"गुप्त्यर्थमस्य देशस्य तिष्ठंती संगमेश्वरे ।
अनीकिनी मामकीना शृंगारपुरवर्तिना ॥ ८३
कामं त्वयावेक्षणीया यावदागमनं मम ।
वैमत्यं परिहर्तव्यं कर्तव्यं मदुदीरितम् ॥ ८४
इत्थं संदेशमाप्तेन दूतेन स नृपस्तदा ।
प्रभावलीभृते भूमिपालाय समदेशयत् ॥ ८५

—(शिवभारत, अ. २९)

"ह्या प्रदेशाच्या संरक्षणासाठीं संगमेश्वर येथें राहणाऱ्या माझ्या सेनेवर शृंगारपुराहून आपण मी येईपर्यंत देखरेख ठेवावी; वैर मनांत ठेवूं नये, व माझ्या सांगण्याप्रमाणें करावें असा निरोप विश्वासू दूतांकरवी प्रभावलीच्या राजास शिवछत्रपतींनीं पाठविला." त्याचा परिणाम काय झाला त्याचें पुढें वर्णन येईलच.

## राजापूर

संगमेश्वराहून महाराजांनीं राजापूरवर चाल केली व तें नगर पूर्णपणें लुटलें. राजापूर हें मोठें श्रीमंत बंदर होतें. तेथें पोर्तुगीज, इंग्रज, डच इत्यादि परकीयांच्या मोठ्या वखारी होत्या. त्या सर्वांनाच महाराजांच्या आघाताचा फटका बसला. पण तो वंचक इंग्रजांना अगदीं जाणवण्यासारखा बसला. डाग रजिस्टरमधील

१ जुलै १६६१ च्या वेंगुर्ल्याच्या रेसिडेंटच्या पत्रांत लिहिलें आहे, " शिवाजीनें पुन्हां डोकें वर काढलें. शिवाजीचें बंड मोडण्याकरितां विजापूरच्या सुलतानाला (त्यांनीं) युद्धोपयोगी दारूगोळा पुरविला. त्याची किंमत अजून त्यांना मिळाली नाहीं. मात्र त्या कृत्याबद्दल शिवाजीकडून त्यांना फार त्रास सहन करावा लागला. इंग्रजांनीं केलेल्या नुकसानीचें उट्टें काढण्याकरितां मार्चच्या मध्याचे सुमारास (श. १५८२ फाल्गुन वद्य पक्ष) राजापुरावर १००० घोडदळ व ३०००पायदळ त्यानें पाठविलें. ह्या सैन्यानें शहराजवळ आल्यावर, तेथील रिवाजाप्रमाणें शहरांतील प्रमुख मंडळींना बोलावून आणून शहरांत प्रवेश केला व तेथील नागरिकांना तोशीस न देण्याचें वचन दिलें. ते भोळे लोक मनांत संशय न आणतां भेटीला आले. आपणहि या स्वागतांत सामील व्हावें म्हणून रेसि. रेव्हिंग्टन व दोनतीन इंग्रज त्यांच्या बरोबर गेले. लगेच त्या सर्वांना पकडून त्यांचा छळ करून जिंदगी जप्त करण्यांत आली. रेव्हिंग्टन व त्याच्या बरोबरच्या लोकांना शिवाजीच्या एका किल्ल्यावर (सोनगड कुलाबा) ठेविलें. राजापुरांतील इंग्रजांनाहि कैद झाली. त्यांतील एक छळानें मृत्यु पावला. त्यांच्या वखारीची सर्वस्वी नागवणूक करून पुरून ठेवलेला खजिना पहाण्याकरितां सर्व ठिकाणीं जमीनहि कुदळीनें खणून टाकिली. इराण व मस्कतचे व्यापारी आपला माल घेऊन दरसाल राजापूरला विक्री करण्याकरतां येतात व काम होतांच परत जातात, त्यांचीहि लूट झाली. कोणा एका राजानें व कांहीं लोकांनीं विरोध करण्याची तयारी केली होती. परंतु झाल्या लुटीनें तृप्त झालेले शिवाजीचे लोक त्याच्या आधींच निघून गेले."

—(शिवकालीन पत्रसारसंग्रह, प्रथमखंड, पृ. २०३)

हेन्री रेव्हिंग्टनला शिवछत्रपतींची पन्हाळ्यासंबंधांत आगळीक केल्याचें चांगलेंच प्रायश्चित्त मिळालें. पुढें ८ महिने त्याला शिवछत्रपतींच्या अटकेंत खितपत पडावें लागलें. त्यानें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्या सुटकेचे प्रयत्न करण्याविषयीं पुष्कळ सांगितलें. पण त्याचा उपयोग तर झालाच नाहीं. उलट या कैद्यांच्या

वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांच्या पूर्वीच्या मूर्खपणाबद्दल त्यांनाच ठपका दिला, व रेव्हिंग्टनला शेवटीं या सगळ्या प्रकरणांत मृत्युमुखीं पडावें लागलें डच रेकॉर्डमधील पुढील महत्त्वाचें पत्र या सगळ्या प्रकरणावर उत्कृष्ट प्रकाश टाकणारें असल्यामुळें तें आम्ही येथें समग्र उद्धृत करतो तें पत्र असें --

Surat to the Lords Seventeen, 17 December 1661.

The aforesaid English have had to suffer not less affront and violence, but much greater damage, in as much as last season the rebellious Shivajie with his assembled gang surrounded the aforesaid town, carried away and appropriated from the same all the riches of all the inhabitants in the form of plunder. He took into custody the English chief resident Mr. Henry Revington with six of his subordinates. Besides, he had the factory (or 'Lodge') robbed of all cash, merchandise and whatever else was found there, and caused the floors to be dug in order to see if any thing was concealed underneath. The release of the said persons was only to be obtained from the covetous Siwajie by paying a considerable sum of money. But, being destitute of the company's cash as well as their own, and unable to collect anything for their deliverance, they were carried away like sheep by those brutish men to one of Siwaji's fortresses, where they remained together for some months, subsisting for their maintenance on nothing but ratted rice and stinking water. So that, in consequence of this unreasonable treatment and other hardships, the said Revington became indisposed. Upon which, after a lengthy negotiation, Siwajie released him with a surgeon and a sailor, but on the condition that after his recovery he, Revington with

two said persons, should return, or in default should pay a ransome of five thousand Pagodas, for their release as well as for that of the other prisoners. For the fulfilment of this agreement the other four English prisoners became surety and remained in the fortress of Songher (Songad), while the three released persons arrived here by way of Chaul in a Portuguse 'almadie, or rowing boat on the 27th of October."

## Death of Revington

Surat to the Lords Seventeen 14th January 1662

Then the former English chief of Rajiapour Mr. Henry Revington, died on 21st December in consequence of the complaints he had contracted in Siwagie's prison. Time will reveal whether the English Lord President will now pay to Siwagie the five thousand pagodas agreed upon for the release of the others prisoners."

—(Shivaji the Great Vol. I–part 2. by Dr. Balkrisna p. 488 and 489)

" राजापूरच्या इंग्रजांना चांगलेंच कष्ट व हानि सहन करावी लागली आहे बंडखोर शिवाजीनें राजापूरला वेढा दिला. सारें राजापूर त्यानें लुटून फस्त केलें. त्यानें इंग्रजांच्या वखारीचा मुख्य हेन्री रेव्हिंग्टन याला त्याच्या हाताखालील सहा इंग्रज अधिकाऱ्यांसहित पकडलें. वखार लुटून तेथील सारी रोकड, माल व सर्व कांहीं त्यानें जप्त केलें. इतकेंच नव्हे, तर तेथील भूमींत द्रव्य पुरून ठेवलें असेल अशा कल्पनेनें त्यानें सारी भूमि खणून काढली. या पकडलेल्या इंग्रजांच्या सुटकेसाठीं शिवाजीनें मोठ्या रकमेची मागणी केली. पण त्यांनी स्वतःची व कंपनीची रक्कम एकत्रित करूनहि येवढ्या

मोठ्या रकमेचा भरणा होऊं शकत नव्हता. पैसे देणें अशक्य ठरल्यामुळें गरीब शेळयाप्रमाणें या राकट लोकांनीं त्यांना पकडून नेऊन शिवाजीच्या एका किल्ल्यावर अटकेंत ठेवलें. तेथें ते कांहीं महिनेपर्यंत होते. त्यांना वाईट तांदूळ व पाणी यांशिवाय कांहीं मिळत नव्हतें. या वाईट वागणुकीमुळें व अन्य प्रकारच्या जाचामुळें रेव्हिंग्टन आजारी पडला. पुष्कळ दिवस चाललेल्या वाटाघाटीनंतर शिवाजीनें सर्जन व सेलर यांसह रेव्हिंग्टनला मुक्त केलें. पण त्याला मोकळें करतांना शिवाजीनें अशा अटी टाकल्या कीं, एक तर रेव्हिंग्टननें बरें होतांच आपल्या दोन साथीदारांसह परत शिवाजीकडे यावें, किंवा पांच सहस्र पागोडे दंड भरावा. म्हणजे त्याची व अन्य राजबंदींची सुटका होईल. या अटींच्या पूर्ततेसाठीं चार इंग्रज कैदी रेव्हिंग्टनकडून शिवाजीला ओलीस राहिले. ते सोनगडावर अटकेंत राहिले व हे तीन कैदी पोर्तुगीज नौकेंत बसून चौलच्या मार्गानें २७ ऑक्टोबरला परत आले."

## रेव्हिंग्टनचा मृत्यु

राजापूरच्या इंग्रज वखारीचा मुख्य हेन्री रेव्हिंग्टन दि. २१ डिसेंबर (१६६१) ला निधन पावला. शिवाजीच्या तुरुंगांतील जाचाचाच हा परिणाम होय. इंग्रज कंपनीचा अध्यक्ष आतां दुसऱ्या कैद्यांच्या सुटकेसाठीं शिवाजीला द्यावयाचे पांच सहस्र पागोडे देतो कीं काय हे समीपवर्ती भविष्यकाळ सांगेलच."

पण अध्यक्षानें भविष्यकाळांत भलतेंच सांगितलें. अध्यक्ष अँड्र्यूज यानें दि. १० मार्च १६६२ ला या कैद्यांना पाठविलेल्या पत्रांत म्हटलें आहे, "तुमची २८ डिसेंबर, १६ जानेवारी आणि ३ मार्च (?) ची (सुटकेबद्दल उत्सुकता दाखविणारीं) पत्रें पोहोंचलीं.... लबाड शिवाजीला पत्रें पाठविल्यास (तो उत्तरच देत नाहीं!) आम्हांला वेळ नाहीं.... तुम्हीं काढलेली हुंडी तावडतोब भरली आहे...... आपल्याला कैद कां प्राप्त झाली हें तुम्ही चांगलें जाणतां. कंपनीच्या मालाचें रक्षण केलें म्हणून ही कैद प्राप्त झाली

नसून पन्हाळ्याच्या वेढ्यांत जाऊन इंग्रजांचा बावटा फडकावून गोळे उडविल्याबद्दलचें हें प्रायश्चित्त आहे. शिवाजी नसता आणि दुसरा कोणी असता तरी ज्याला म्हणून असल्या अत्याचारांबद्दल सूड उगवण्याचें सामर्थ्य आहे तो तसाच वागला असता. व्यापाऱ्यांनीं दारूगोळ्यासारखा माल विकावयाचा नसतो. किंवा शत्रुसैन्यावर उडवावयाचा नसतो. परदेशांत असे उपद्व्याप केल्यास मग त्याचें फळ भोगावें लागतें. तुमच्या कैदेचें हेंच खरें कारण आहे. रेव्हिंग्टनला स्वतःला शिवाजीची दारूगोळा न विकण्याबद्दलची आज्ञा माहीत होतीच. ... "

वंचना, कपट व दुष्टतेला श्रीशिवछत्रपतींच्या जवळ इतकें चोख व कडवें उत्तर होतें म्हणूनच ते या पाताळयंत्री शत्रूंवर मात करूं शकले.

असो. एकट्या राजापूरच्या लुटीनेंच शिवाजी महाराजांची सारी लूट भरून निघून त्यांचें ईप्सित पूर्ण झालें. कवीन्द्र परमानंद राजापूरच्या या विजयाचें वर्णन करताना म्हणतो --

अथाग्नियंत्रसंधानविशेषोदग्रविक्रमान् ।
प्राकारयुद्धकुशलान् ऋद्ध्या जितधनेश्वरान् ।। १
मयमायाधरानब्धिमध्यसंचारदुर्धरान् ।
उन्मार्गवर्तिनस्तांस्तान् फैरंगान् यवनावरान् ।। २
तथा नौसाधनपरान् मल्लवारानिनावरान् ।
सांयात्रिकाननेकांश्च कृतद्वीपान्तराश्रयान् ।। ३
असंमतांश्च सामंतान् मत्तानिव महाद्विपान् ।
बलैरानाय्य स बली तत्तदानाययद्धनम् ।। ४
स बद्धमुष्टिभिस्तैस्तैरविद्धैश्चिरपालिताम् ।
स्वहस्तमनयत् सद्यः श्रियं राजपुरस्थिताम् ।। ५
निक्षेपस्वर्णसंपूर्णकटाहजठरां धराम् ।
खलांतकः स खनकैरनेकैः समखानयत् ।।६

न यद्यपि नरेन्द्रस्य तत्र सिद्धांजनांचिते ।
तदप्यद्धा निधानानि पश्यतः स्म विलोचने ॥ ७
न्ययोजयदयं राजा यत्र यत्र निजे दृशौ ।
तत्र तत्राभवन् मेरुसदृशाः स्वर्णराशयः ॥ ८
महाजनेनोपहृतैरनेकै रत्नराशिभिः ।
तत्र तस्मै विदूराद्रिरविदूर इवाभवत् ॥ ९
चिरस्थयवनस्पर्शवशादशुचितां गतां ।
सनिक्षेपां स तत्र क्ष्मां खनकैः किमशोधयत् ॥ १०
जातरूपं तथारूप्यमारकूटं च सीसकम् ।
ताम्रं लोहं च वंगं च काचं च स्वर्णमाक्षिकम् ॥ ११
मुक्तां मरकतं पद्मरागं वज्रं च विद्रुमम् ।
खड्गशृंगं चामरं च रदं स्तांबेरमं तथा ॥ १२
कस्तूरिकां च काश्मीरं पाटीरं हिमवालुकाम् ।
कालागुरुं च कर्चूरं कंकोलं रक्तचंदनम् ॥ १३
एलां च देवकुसुमं त्वक्पत्रं चीनदारु च ।
कतकं नक्रनखरं नलदं नागकेसरम् ॥ १४
जातीफलं मातुलानीमहिफेनं च पत्रकम् ।
राजादनं कंदरालं द्राक्षां खर्जूरकं तथा ॥ १५
खर्बूरं मरिचं पूगं देवदारु च नागरम् ।
ग्रंथिकं च पलां चव्यं कांचनीमथ सैंधवम् ॥ १६
सौवर्चलं यवक्षारं सर्जिकां च हरीतकीम् ।
वृकधूपं सर्जरसं सिलाजतु च सिक्थकम् ॥ १७
तार्क्ष्यशैलं शिखिग्रीवं चक्षुष्यां यामुनं पुनः ।
अजमोदां च बाह्लीकं जीरकं लोध्रकं तथा ॥ १८
गुग्गुलं पावकशिखं मंजिष्ठां नागसंभवम् ।
पारदं हरितालं च गंधाश्मानं मनःशिलाम् ॥ १९
लाक्षां गंधरसं चापि गोरोचनमथाभ्रकम् ।
तांस्तान् विषविशेषांश्च तत्तन्निर्हरणानि च ॥ २०

कौशेयान्यथ तार्णानि क्षौमाणि फलजानि च ।
रांकवाणि तथौर्णानि वासांस्यभिनवानि च ॥ २१

एतान्यन्यानि च तदा वस्तूनि बहुशो नृपः ।
महाभारसहैर्वाहैः वामीभिर्वृषभैस्तथा ॥ २२

भारयष्टिधरैस्तत्रापि पुरुषैर्विष्टिकारिभिः ।
वाहयित्वात्मदुर्गेषु तेषु तेषु न्यधापयत् ॥ २३

—(शिवभारत, अ. ३०)

"नंतर तोफांच्या गोलंदाजींत असामान्य पराक्रमी, प्राकारयुद्धांत (तटावरून लढण्यांत) कुशल, संपत्तींत कुबेरावर ताण करणारे, मयासुराप्रमाणें शिल्पकलानिष्णात, समुद्रसंचाराच्या योगानें अजिंक्य, दुर्मार्गगामी, यवनांहूनहि नीच अशा निरनिराळ्या फिरंग्यांस (पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच इत्यादि) तसेंच आरमार बाळगणाऱ्या उवडचा बोडक्या मलबाऱ्यांस, अन्य द्वीपनिवासी अशा समुद्रावरील अनेक व्यापाऱ्यांस, मत्तमहागजासारख्या वैरी मांडलिकांस त्या बलवान् शिवाजीनें सैन्याकरवीं आणवून त्यांच्या कडून निरनिराळी खंडणी द्यावयास लाविली. त्या त्या लोभी अविधांनीं दीर्घकाळ सांठविलेली राजापुरांतील संपत्ति त्यानें तत्काळ हस्तगत केली. सोन्याच्या ठेवींनीं भरलेल्या कढया जीमध्यें पुरून ठेवलेल्या होत्या अशी ती भूमि त्या दुष्टांच्या कर्दनकाळानें अनेक खनकांकडून (भूमिगत धन ओळखणाऱ्यांकडून) खणविली. तेथें त्या राजाच्या नेत्रांत जरी सिद्धांजन घातलेलें नव्हतें, तरी त्यास ते पुरलेले सांठे प्रत्यक्ष दिसले! त्या राजानें जेथें जेथें आपली दृष्टि फेकली, तेथें तेथें मेरु पर्वताप्रमाणें सोन्याच्या राशी उत्पन्न झाल्या (दिसल्या). तेथें व्यापाऱ्यांनीं अर्पिलेल्या अनेक रत्नराशींच्या योगानें त्यास वैदूर्य रत्नांचा डोंगरच जणूं कीं काय उपलब्ध झाला. दीर्घकाळ राहिलेल्या यवनांच्या संपर्कानें अशुद्ध झालेली व पुरलेले सांठे असलेली भूमि त्यानें तेथें जणूं शुद्ध केली! सोनें, रुपें, पितळ, शिसें, तांबें, लोखंड, कथील, कांच, सुवर्णमाक्षिक, मोतीं, पाच,

माणिक, हिरे, पोवळे, गेंड्याचें शिंग, चामर, हस्तिदंत, कस्तुरी, केशर, चंदन, कापूर, कृष्णागरु, कापूरकाचरी, कंकोळ, रक्तचंदन, वेलदोडा, लवंग, दालचिनी, चीनदारू, निवळी, नकनख, वाळा, नागकेशर, जायफळ, भांग, अफू, तमालपत्र, चारोळी, आक्रोड, मनुका, खजूर, खर्बूर, मिरीं, सुपारी, देवदार, सुंठ, गांठी पिंपळमूळ, जटामांशी, चवक, हळद, सैंधव, पादेलोण, जवखार, सज्जीखार, हिरडा, दशांगधूप, राळ, शिलाजित, मेण, रसांजन, मोरचूद, निळा सुरमा, काळा सुरमा, ओवा, हिंग, जिरें, लोध्र, गुग्गुळ, पावक शिख, मंजिष्ठ, शेंदूर, पारा, हरताळ, गंधक, मनशीळ, लाख, रक्त्याबोळ, गोरोचन, अभ्रक, निरनिराळ्या प्रकारचीं विषें व तीं विषें उतरविण्याचीं द्रव्यें, रेशमी, गवती, तागी, फळांचीं, 'रंकू' हरिणाच्या लोकरीची व लोकरी अशीं नवीं वस्त्रें हे आणि दुसरे पुष्कळ पदार्थ त्या राजानें त्या वेळीं मोठीं ओझीं वाहणारे घोडे, घोड्या, बैल, कावडे, वेठ्ये यांच्याकडून वाहून नेऊन आपल्या निरनिराळ्या गडांवर ठेवविलें."

राजापूरनंतर महाराजांनीं शेठवली, सौंदळ, हरचेरी, नेवरें, नाधवडें, कोतवडें, केळवली, कशेळी, पांवस, धामणसे, बेलवडें, खारेपाटणपर्यंत धांव घेऊन सारे आदिलशाही प्रदेश धुवून काढले

## सूर्यरावाचा विश्वासघात

याप्रमाणें दंडराजपुरी ते खारेपाटणपर्यंतचा प्रदेश जिंकून महाराजांनीं गोव्यापर्यंत आपला वचक बसविला. विजापूरकरांचें कोणतेंहि संरक्षण मिळण्याची शक्यता नाहीं हें ओळखून कोंकणांतील जहागीरदारांनीं दूरदर्शीपणानें महाराजांना खंडणी देऊन व बहुतेक ठिकाणीं चौथाई देण्याचें मान्य करून आपलें संरक्षण करून घेतलें. याप्रमाणें ते विजयांमागून विजय संपादन करीत चालेले असतां 'मी तुमचा क्रीतपुत्र आहे' या शब्दांनीं अवघड जागीं दुखणें होऊन बसलेल्या शृंगारपूरच्या सूर्यरावाला त्याच्या दुर्वर्तनाविषयीं धडा शिकविण्याचा प्रसंग त्यांना लवकरच उपलब्ध झाला.

कोंकणांतील आपले सारे प्रदेश शिवाजी राजे हस्तगत करीत असलेले पाहून चवताळलेल्या अल्ली आदिलशहानें शृंगारपूरच्या सूर्यरावाला शिवाजी महाराजांच्यावर आक्रमण करावयास राजाज्ञा पाठविली वस्तुतः रुस्तुमजमा या प्रदेशाचा अधिकारी होता. शिवछत्रपतींना थोपविणें हें त्याचेंच काम होतें. पण एक तर तो शिवाजीमहाराजांना अंतःस्थ रीतीनें मिळालेला आहे असा संशय होता व दुसरें म्हणजे पन्हाळ्याच्या युद्धांत शिवछत्रपतींनीं त्याला पराजयाची इतकी सणसणीत चपराक लगावली होती कीं त्यांच्याकडे डोळा उचलून बघण्याचें त्याच्यांत धैर्य नव्हतें. त्यामुळें आदिलशहानें हें काम कोंकणांतील डोंगराळ प्रदेशाची उत्कृष्ट माहिती असलेल्या व पदरीं उत्तम पायदळ सैन्य असलेल्या सूर्यरावालाच ही कामगिरी सांगितली. ही कामगिरी पत्करण्यांत आपण शिवाजी महाराजांशीं विश्वासघात करीत आहोंत हें त्यानें ओळखणें आवश्यक होतें. संगमेश्वराच्या सैन्यावर देखरेख ठेवण्याचें काम महाराजांनीं या आपल्या क्रीतपुत्रावर विश्वासानें सोंपविलें होतें. पण कित्येक पिढ्यांपासून यवनांचें दास्य करणाऱ्या त्या जातिवंत दासाला शिवाजी महाराजांच्या भयापेक्षांहि विजापूरच्या सुलतानाचें भय अधिक वाटलें व ज्याच्यावर देखरेख ठेवण्याचें काम त्याच्यावर सोंपविण्यांत आलें होतें त्या संगमेश्वरच्या महाराजांच्या सैन्यावर त्यानें रात्रीच्या वेळीं अचानकपणें आक्रमण केलें. तेथें विख्यात तानाजी मालुसरे व पिलाजी नीलकंठ हे महाराजांचे सेनानी होते. या अकस्मात झालेल्या आक्रमणानें पिलाजी नीलकंठ घाबरून पळ काढीत होता. संतापून तानाजी मालुसरे यांनीं त्यावर चांगलाच तोडगा काढला. कवीन्द्र परमानंद म्हणतो —

तदातिभीतः किल नीलकंठराजात्मजो दैवहतः पिलाजी ।
प्रभावलीशाय यशांसि दातुं अमंस्त युद्धादपयानमेव ।। ८१

संजातवेपथुममुं भृशमुच्छ्वसंतं ।
विन्यस्तपाणिगकृपाणमपद्रवंतम् ।।

सद्यः स्त्रय कतिपयानि पदानि गत्वा ।
धृत्वा करे त्यगकरोत् किल मल्लसूरः ।। ४२
प्रदाय माहात्म्यमभीष्टदेन ।
य: पालितोऽभूः शिवभूमिपेन ।।
सेनापतिः सोऽद्य विमुक्तसेनः ।
पलायसे हन्त विलज्जसे न ।। ४३
इत्युक्त्वा दृषदि निबध्य रज्जुखंडैः ।
तं त्रस्तं निजसविधे स्थिरं विधाय ।।
आत्मीयां सपदि स तत्र शौर्यशक्तिम् ।
शूरेभ्यः पदि पदि दर्शयन् ननर्त ।। ४५

— (शिवभारत अ. ३०)

"तेव्हां नीलकंठ राजाचा पुत्र जो हतभागी पिलाजी त्यानें प्रभावलीच्या राजास जगूं काय यश देण्यासाठींच लढण्यापेक्षां पळणेंच अधिक श्रेयस्कर ठरविलें! कांपरें भरलेल्या, अतिशय धापा टाकणाऱ्या, हातांतील तरवार खालीं टाकून पळत सुटलेल्या त्या पिलाजीस तत्काळ कित्येक पावलें जाऊन तानाजी मालुसऱ्यांनीं स्वतः हातांत धरलें व त्याचा उघड धिक्कार केला व म्हटलें, 'अभीष्ट पूर्ण करणाऱ्या शिवछत्रपतींनीं मोठेपणा देऊन तुला येथें सेनापति नेमलें. आपलें सैन्य या महत्त्वाच्या प्रसंगीं येथें संकटांत लोटून पळून जातांना तुला लाज वाटत नाहीं.' इतकें बोलून तानाजी राहिला नाहीं, तर त्यानें त्या घाबरलेल्या पिलाजीला एका मोठ्या दगडाशीं दोरखंडानें पक्कें बांधून टाकलें व आपण शौर्यानें सूर्यरावाच्या सैन्यावर तुटून पडला." रात्रभर युद्ध करून तानाजीनें सूर्यरावाचा झणझणीत पराभव केला. महाराज राजापूरहून परत आल्यावर तानाजीनें दाखविलेल्या समयोचित शौर्याविषयीं महाराजांनीं त्याचा मुक्तकंठानें गौरव केला. विश्वासघातकी सूर्यरावाची खोडकी जिरवावी असा त्यांनीं विचार केला. पण आपला राग आवरून आणखी एकदां त्याला संधि द्यावयाची असें त्यांनीं ठरविलें.

## सूर्यरावाचें उच्चाटन

त्यांनीं सूर्यरावाकडे आपला दूत पाठविला व त्याला असें कळविलें कीं "तुम्ही आपलीं वचनें व शब्द विसरून आमचा विश्वासघात केलेला आहे. ज्यांवर देखरेख करावयास तुम्हांला सांगितलें होतें त्या संगमेश्वरच्या सैन्यावर अकस्मात् आक्रमण करून तुम्ही भलतेंच साहस केलें आहे. तरी पण आम्ही तुम्हाला एकवार क्षमा करतों. आतां आम्ही उन्मत्तपणानें आमचे शत्रुत्व करणारा व सध्यां तुमच्या आश्रयाला असणारा पालीचा राजा जसवंतराव याच्या पालीवर स्वारी करावयास निघत आहोंत. तुम्ही आम्हांला पालीला येऊन भेटावें. तेथें आम्ही तुम्हांला अभय देऊं. पण घमेंडीनें जर आज्ञेप्रमाणें तुम्ही पालीला आला नाहीं तर तुमचा समूळ निःपात झाल्याविना राहणार नाहीं. आमच्या क्रोधापासून आजतरी तुमचें संरक्षण करणारा कोणी नाहीं हें ओळखून शहाणपणानें वर्तणूक करावी. —(शिवभारत)

सूर्यरावानें 'पालीला येऊन भेटतों' असा उलट निरोप पाठवून महाराजांच्या दूताला लावून दिलें. महाराजांनीं पालीवर स्वारी करून ती जिंकली व स्वराज्यांत समाविष्ट केली. तेथें 'चिरदुर्ग' नांवाचा एक उत्कृष्ट दुर्ग होता. त्याच्या भोंवतीं नवा तट उभारून त्यांनीं त्याला मंडनगड असें नांव दिलें. कांहीं दिवस महाराज पालीला होते. संदेशाप्रमाणें सूर्यराव आला नाहीं व महाराज वचनांतून मोकळे झाले. या विश्वासघातकी 'क्रीतपुत्राला' उग्र शासन द्यावयाचा त्यांनीं निश्चय केला. त्यांनीं अकस्मात् विजेच्या तडफेनें पंधरा सहस्र पायदळ सैन्य बरोबर घेऊन प्रभानवल्लीवर स्वारी केली. त्या वेळीं सूर्यराव अगदींच असावध व असहाय होता. महाराज संगमेश्वर हून पालीला गेल्याचें पाहून त्या मूर्खानें आतां आपल्याला कसलेंहि भय उरलें नाहीं अशा कल्पनेनें आपल्या सर्व सैन्याला रजा दिली होती. वेळेवर सैन्य जमविण्याची मुळींच शक्यता नव्हती. तो भिऊन पळून गेला व महाराज ससैन्य शृंगारपुरांत शिरले. थोड्याच अवधींत त्यांनीं संपूर्ण प्रभानवल्ली प्रदेश

जिंकून स्वराज्यांत समाविष्ट केला. विश्वासघातकी सूर्यरावाच्या वर्तनानें ते किती चिडले होते याचें वर्णन करतांना कवीन्द्र परमानंद म्हणतो —

अजय्यमन्यैरिति विश्रुतं यत् ।
स भूपतिर्वैरिनृपासनं तत् ॥
स्पृशन् भृशं स्वेन पदा तदानीं ।
अमानि लोकेन महाभिमानी ॥७१

—(शिवभारत अ ३१)

"अजिंक्य म्हणून प्रसिद्ध असलेलें शृंगारपुरांतील सूर्यरावाचें तें सिंहासन पाहतांच क्रुद्ध महाराजांनीं त्याला लाथेनें तुडविलें. तेव्हां शिवाजी महाराजांचा स्वाभिमान किती प्रखर आहे याची लोकांना कल्पना आली."

या राजधानीजवळ असलेल्या गडाची सुधारणा करून त्यांनीं त्याला 'प्रतीतगड' असें नवें नांव दिलें व या प्रांतावर पन्हाळ्याचा पूर्वीचा गडकरी त्र्यंबक भास्कर याची नेमणूक केली.

## लेखकांचा गोंधळ

शृंगारपूर शके १५८३ च्या वैशाखांत म्हणजे एप्रिल महिन्यांत महाराजांनीं जिंकलें व ज्येष्ठापासून त्र्यंबक भास्कराचा कारभार तेथें सुरू झाला. सूर्यरावाच्या प्रकरणांत इतिहासलेखकांचा केवढा गोंधळ उडालेला आहे याचें वर्णन करतांना शिवभारताच्या प्रस्तावनेंत कै. दत्तोपंत आपटे लिहितात "त्र्यंबक भास्कराचें नांव सभासदास माहीत आहे. त्यानें तें अफजल प्रसंगांत सांगितलें आहे. पण पन्हाळ्याचा वेढा व शृंगारपुरावरील स्वारी यांत त्यानें जी महत्वाची कामगिरी केली त्याचा नामनिर्देशहि सभासदास करतां आला नाहीं. याचें कारण अफजल प्रसंगानंतर शास्ताखान आला व तो आल्यानंतर तीन वर्षांनीं त्याचीं बोटें तुटलीं ही कल्पना सभासदाला नाहीं. शास्ताखान दक्षिणेंत आल्यावर लौकरच त्याचें शासन महाराजांनीं केलें अशी सभासदाची

समजूत असल्यामुळें मधल्या तीन वर्षांतील गोष्टी दुसरीकडे कोठें तरी सांगणें त्याला भाग पडलें. शृंगारपूरची हकीकत त्यानें जावळीच्या हकीकतीस जोडून दिली आहे. त्यामुळें आधुनिक इतिहासकारांनाहि त्याचेंच अनुकरण करण्याचा मोह पडला आणि त्यांनीं दिलेली शृंगारपूरच्या विजयाची मिति पांच वर्षांनीं चुकली."

असो. याप्रमाणें कोंकण प्रांतांतील आदिलशाही सत्ता उखडवून लावून व गेल्या वर्षांत झालेली स्वराज्याची हानि सव्याज भरून काढून महाराज कोंकणांतून विजयाचे पडघम वाजवीत सन १६६१ च्या मे महिन्यांत परतले तोंच त्यांना दोन दुर्वार्ता कळल्या. एक म्हणजे कल्याण शाहिस्तेखानाच्या सैन्यानें जिंकलें व दुसरें म्हणजे अफझलखानाच्या वधाच्या प्रसंगीं त्यांचा अंगरक्षक असणारा त्यांचा विश्वासू मित्र संभाजी कावजी हा विश्वासघात करून मोंगलांना जाऊन मिळाला.

## फितुऱ्यांना उग्र शासन

संभाजी कावजी हा शरीरसामर्थ्यानें मोठा दांडगा असे. शाहिस्तेखानालाच त्यानें आपल्या शरीरसामर्थ्याचें प्रात्यक्षिक दाखविलें होतें. "घोडा चहूं पायीं धरून तो उचलीत असे. त्यावरून खानानें त्याला मौजे मलकार येथें ठाणेदार नेमिलें व मनसबहि दिली." कल्याणच्या वेढ्यांतहि संभाजी कावजी मोंगलांच्या बाजूनें होता असें दिसतें. शाहिस्तेखानाच्या अवाढव्य सैन्याचा वचक केवढा पसरला होता व या संघर्षांत शेवटीं शिवाजीचाच पराभव होणार याची सगळ्यांनाच कशी निश्चिति वाटत होती याचें हें एक गमकच म्हटलें पाहिजे. राजापूरच्या इंग्रजांनीहि "आम्ही शाहिस्तेखानाला दक्षिणेंत आणूं असा शिवछत्रपतींच्या अधिकाऱ्यांना धाक घालण्याचा प्रयत्न केला होता असें इंग्रजांच्या पत्रव्यवहारावरून दिसतें. देशद्रोह, फितुरी यांची कीड मोठी विलक्षण असते. एकदां या अपराध्यांना क्षमादान व सौहार्दपूर्ण वागणूक मिळाली की, त्याचे परिणाम सारें राष्ट्र रसातळाला जाण्यांत होत असतात. कारण

हा रोग या पद्धतीनें फार लवकर प्रसार पावतो. महाराज या संबंधांत अत्यंत उग्र होते. अफजलखानाच्या प्रकरणांत खंडोजी खोपडे देशमुख खानाला मिळाला. तो सांपडतांच कान्होजी जेध्यांच्या रदवदलीचाहि उपयोग न होतां त्यांनीं त्याचे हातपाय तोडले. राष्ट्राच्या नेत्याला, जिचें पर्यवसान शेवटीं राष्ट्रविनाशांत होईल अशा कोणत्याहि कोमल भावनेचा अंगीकार करतांच येत नाहीं. नाहीं तर त्यावरच शेवटीं राष्ट्रविनाशाचें दायित्व आल्याविना रहात नाहीं. म्हणूनच कौटिल्यानें फितुरी व देशद्रोहाच्या अपराधाला कठोरांतल्या कठोर शिक्षा सांगितलेल्या आहेत. महाराजांनीं संभाजी कावजीला जडलेला हा रोग अधिक प्रसृत होऊं नये म्हणून दि. १३ मे १६६१ ला प्रतापराव गुजराकडून त्याच्यावर छापा घालून त्याला यमसदनास पाठविलें.

महाड येथें सैन्याची जुळवाजुळव करून महाराजांनी कल्याण जिंकण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. शाहिस्तेखानाचें आक्रमण हळूहळू उग्र स्वरूप धारण करीत होतें व महाराजहि त्याला कडवें उत्तर देण्याचा प्रयत्न करीत होते. जून महिन्यामध्यें महाराज वर्धन गडावर असतांना पेण तालुक्यांतील देइरीगडाला मुसलमान सेनापति बुलाखी यानें वेढा दिला. दोन महिने हा वेढा चालू होता. महाराजांचा सेनापति कावजी कोंढाळकर यानें २१ ऑगस्ट १६६१ मध्यें त्याच्यावर चढाई करून त्याच्या चारशें लोकांना ठार केलें व त्याला पळ काढावयास भाग पाडलें.

महाराजांच्या सेनापतींनीं गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीनें शाहिस्तेखानाला सन १६६२ ते सन १६६३ च्या मार्च महिन्यापर्यंत हैराण करण्याचा प्रयत्न केला. सेनापति नेताजीनें आपलें सगळें कौशल्य पणाला लावलें होतें. हें वर्ष सव्वावर्ष नामदारखानाच्या नेतृत्वाखालीं मोंगली सैन्यानें मराठ्यांना थोपवून धरण्याचाहि यशस्वी प्रयत्न केला. ६२ च्या प्रारंभीं स्वतः शिवछत्रपतींनीं नामदार खानावर मिऱ्या डोंगरांत पहिली चढाई केली. पण त्यांना विशेष

यश आलें नाहीं. चौल, रहमतपूर व कल्याण यांच्याभोंवतीं मराठ्यांनीं घिरट्या घालण्यास सुरवात केलेली पाहून तेथें मोंगलांनीं अधिक संख्येचें सैन्य ठेवून आपली पक्कड घट्ट केली.

### नेताजीचें धूकयुद्ध

शाहिस्तेखानाचे सेनापति मैदानी युद्धाच्या कलेंत केवढेहि निष्णात असले व त्यांची सैन्यसंख्या केवढीहि मोठी असली तरी शिवछत्रपतींच्या चपळ मराठी सैन्याच्या गनिमी काव्याच्या पद्धतीसमोर त्यांना हातच टेकावे लागत. तीन वर्षे शाहिस्तेखानास रखा विख्यात रणपंडित दीड लक्ष सैन्य घेऊन महाराष्ट्रांत ठाण मांडून राहिला पण त्याला शिवाजी महाराजांवर म्हणण्यासारखा कोणताहि विजय मिळवितां आला नाहीं कीं स्वराज्याचा लचका तोडतां आला नाहीं. सेनापति नेताजीनें त्याच्या सैन्याभोंवतीं घिरट्या घालून त्या सैन्याची व त्याच्या सेनापतींची जी ससेहोलपट उडविली होती, तिचें वर्णन कास्मोडा गार्डानें (Casmoda Gaurda) फारच वेधकपणें केलेलें आहे. तो म्हणतो–

But in spite of all these precautions, he said or planned nothing that Sevagy did not immediately learn. Sevagy, knew how to make new friends with money and, his friends were innumerable and they sent him information every hour. He was at great Punadar, but Sextaghan had not marched one league when he saw ten thousand horses of Sevagy, arrayed in four divisions assault his army on all sides. The Mogal army also marched in separate detachments to make room for the numerous baggage, women and beasts, of which the camp was composed. For this reason none left their place, for each company guarded what belonged to it. The Mogals were in this suspense and difficulty when the Troops of Sevagy inflicted a heavy

toss upon them with dexterous expedition. They assaulted one division and retired, but in the same manoeuvre fell upon another. The Mogals could not divine wherefrom they came, for it appeared as if Sevagy were everywhere. The confusion in the army became in this manner very great. By these onslaughts Sevagy used to take plenty of spoils besides killing many men, and as his appearance and disappearance were affected in an instant, every foot of the thicket made Sextaghan halt, for each presented an unusual aspect, without examining which he would not move.

At the place where the Mogal army was to encamp (as we have said, this is decided by the place having a good water supply) appeared eight thousand horse commanded by Neotagy, besides the eight thousand on two sides of the road which the Mogal army had to take, but they were placed in such thick forests that this reserve caused no suspicion.

When the Mogal army saw these eight thousand horse in the place where it was found necessary to encamp, the vanguard halted, and hardly had word passed as to what should be done, when they (the Sevagies) charged with passionate fury in order to sweep the Mogal under their horses, and the field was filled with shouts and soldiers were so confused that they fell upon one another with tumul and fury. When the Mogals imagined that they had caught them, the Sevagies divided themselves into four parties and fled each in a particular direction. In such a manner could they steal the manoeuvre that the Mogals were stupified

and stumbling upon one another, they could not reach those sought. After a few manoeuvres at a great distance the Sevagies turned to unite, in order that the Mogals should pursue them under the impression that they constituted the whole force (of Shivaji); for once afar, they would be able to succour the baggage for which the two thousand hidden horse had been destined. This plan was nicely executed; for Sextaghan pursed them, thinking that was the whole army of Sevagy, which he wanted to destroy that very day. And when it seemed that the proper time had arrived, out came the two thousand and assaulted the immense baggage, which was immediately invested to the great confusion of all.

The circumstances that largely contributed to this confusion were that the baggage was invested on both sides and that the sun had already gone down. The loss was very great. They ( the Marathas ) took thousands of loaded camels, many elephants, innumerable horses and everything that they could, killing all whom they met while the other thousand removed the spoils. What they could not take was left on the ground, but they removed the beasts of burden. And in these, more than in any thing else, the army suffered the greatest loss. The frustrated army then retired, as Neotagy had conveniently vanished in a moment. But when they arrived at the former place and saw the destruction the Marathas had wrought they could not hold their surprise and sorrow. That night they went without food in the inclement weather, for the servants did not appear and most of the

tents had now passed into Sevagy's possession. Moreover they passed (the night) with arms in hand for the very leaves that moved seemed to them to be Sevagy's men. Their conversation consisted of nothing but the bad omens of such a bad beginning. They did not know how to speak too highly of the tricks of Sevagy, for this mode of pillage, said they, was unknown to them, and they concluded by saying that Sextaghan will put an end to this method. Soon the most pitiable sight presented itself; the camel-drivers and other servants who had fled or escaped began to arrive, and all in the army uttered shouts of surprise, for some of them came without their arms, others crippled, others with head uncovered and all without their charge, which was the most important thing. That night, Sextaghan slept in a very small tent for he had to go without his accustomed pomp; with the usual arrogance of a Mogal, he blasphemed and swore that Sevagy would have to pay for all these with interest but in spite of so much arrogance he had to experience to his cost Sevagy's stratagem and cunning now and afterwards".

—( Foreign Biographies – Shivaji p. 56-59 )

"शाहिस्तेखानानें कितीहि दक्षता घेतली असली तरी तो जें कांहीं बोले अथवा ज्या कांहीं गुप्त योजना करी त्यांत असें कांहींच रहात नसे कीं जें शिवाजीला आधींच कळत नसे. आपल्या पैशाच्या बळावर नवे मित्र कसे जोडावे हें शिवाजीला उत्तम प्रकारें कळत होतें, व संपत्तीप्रमाणेंच त्याचे मित्रही विपुल होते व ते मित्र त्याला प्रत्येक तासाला बातमी पुरवीत असत. तो पुरंदरच्या बळकट किल्ल्यावर होता. पण शाहिस्तेखानानें एक पाऊलहि पुढें टाकलें

नाहीं तोंच शिवाजीच्या दहा सहस्रांच्या अश्वदलानें चार तुकड्यांत येऊन आपल्या सैन्याचा सर्व बाजूंनीं कोंडमारा केल्याचे त्याच्या ध्यानांत आलें. मोंगल सैन्यहि वेगवेगळ्या तुकड्या करूनच चाल करीत होतें. कारण त्यांना आपलें अवजड सामान, स्त्रिया व माल-वाहू पशु यांना सुरक्षितपणें हलवावयाचें होतें. त्यांच्या शिबिरांत हें सर्व असावयाचेंच. या कारणास्तव कोणीच आपापली जागा सोडली नाहीं. कारण प्रत्येक तुकडी आपल्या वस्तूंचें संरक्षण करीत होती. ज्या वेळीं शिवाजीच्या तुकडीनें त्यांच्यावर हल्ला करून त्यांची दाणादाण उडविली तेव्हां ते विलक्षण गोंधळांत व विपत्तींत सांपडले. मराठे एका सैन्याच्या तुकडीवर चढाई करीत व परतं-तांना दिसत पण पुन्हां त्याच पद्धतीनें दुसऱ्या तुकडीवर पुन्हां तशीच जीवघेऊ चढाई करीत. ते कोणीकडून व कसे येत हें मोंगली सैन्याला मुळींच कळत नसे. त्यांना सगळीकडे जणूं काय शिवाजी आहेच असें वाटे. या पद्धतीनें मोंगली सैन्यांत अतिशय गोंधळ माजून राहिला. या गनिमी काव्याच्या पद्धतीनें शिवाजी पुष्कळ लोकांचा संहार करून पुष्कळ लूट घेऊन जाऊं शकत असे. शिवाजी लोकांच्या या एकदम प्रकट होण्यानें व गुप्त होण्यानें पुष्कळ परिणाम केला. प्रत्येक पावलाला शाहिस्तेखानाला थांबावें लागे. कारण प्रत्येक ठिकाणीं कांहीं तरी आजवर न अनुभविलेलें प्रत्ययास येई, व त्याची पूर्ण परीक्षा केल्याविना शाहिस्तेखानाला पुढचें पाऊल उचलणें अशक्यच होतें.

मोंगल सैन्य जेथें रहाणार होतें (ज्या जागीं पाण्याची भरपूर सोय असते तेथेंच हें सैन्य थांबत असे याचा उल्लेख आम्ही मागें केलाच आहे.) तेथें आठ सहस्र अश्वदळ घेऊन सेनापति नेताजी पालकर उपस्थित झाला. आणखी आठ सहस्र लोक रस्त्याच्या दोन्ही कडेला होते. या जागा घेण्याची मोंगलांची योजना होती. हें सैन्य अशा निबिड झाडींत होतें कीं त्याच्या अस्तित्वाचा नुसता संशय सुद्धां येऊं शकला नाहीं.

आपण मुक्कामाला सोयीच्या म्हणून निश्चित ठरविलेल्या ठिकाणीं हें नेताजीचे आठ सहस्र घोडेस्वार मोगल सैन्यानें पाहिलें

मात्र, बिनीवरचे लोक एकदम थांबले. पुढल्या सूचनांचा एखादा शब्द निघाला न निघाला तोंच त्यावर शिवाजीचें सैन्य विद्युद्वेगानें तुटून पडलें. जणूं तें आपल्या घोड्यांच्या टापाखालीं मोंगली सैन्याला तुडवून टाकीत होते. गर्जना व आक्रंदनें यांनीं सारें वातावरण धुंद होऊन गेलें. मोंगल सैनिक या अकस्मात् झालेल्या चढाईनें इतके गोंधळून गेले कीं ते एकमेकांवरच दांत ओठ खात तुटून पडले. मोंगल सैन्य सावध होऊन या मराठी सैन्याशीं येऊन भिडणार तोंच शिवाजीचें सैन्य चार भागांत एकदम विभाजित होऊन विवक्षित दिशांनीं अंतर्धान पावे, व या पद्धतीनें तें मोंगल सैन्याची हवी तितकी लूट करी. मोंगल सेनानी एकमेकांविरुद्ध लढण्यांत गुंतले असल्यामुळें ते या वादस्थळापर्यंत जाऊन पोहोचूंच शकत नसत. थोडेसें दूर गेल्यावर शिवाजी महाराजांचें हें सैन्य पुन्हां एकत्रित होई. शिवाजीचें सैन्य केवळ येवढेंच आहे असा भ्रम करून घेऊन मोंगलांनीं आपल्याशींच लढण्यांत सर्वस्वी गुंतून पडावें व झाडींतून गुप्तपणें ठेवलेल्या दोन सहस्र घोडेस्वारांनी त्या अवकाशांत मोंगलांचें सारें साहित्य यथेच्छ लुटावें अशासाठीं ही योजना होती. ही योजना पूर्णपणें फलद्रूप झाली. शाहिस्तेखानाला असें वाटलें कीं, हें दिसतें येवढेंच शिवाजीचें सैन्य आहे. त्याचा त्याच दिवशीं पूर्ण फडशा पाडण्याचा त्यानें निश्चय केला. दोन सैन्यांत युद्ध सुरू झालें न झालें तोंच ठरलेला क्षण उगवला. त्याबरोबर झाडींत पूर्वीच लपलेल्या दोन सहस्र स्वारांनीं बाहेर येऊन सारें सामान पळविलें. त्यासरशीं साऱ्या मोंगली सैन्यांत विलक्षण गोंधळ माजला. सामान दोन्ही बाजूंच्या सैन्यानें वेगवेगळ्या दिशेनें पळविलें व त्या वेळीं सूर्यास्त होऊन अंधाराचेंहि साम्राज्य माजलें. त्यामुळें तर हा गोंधळ अधिकच वाढला. या प्रकारांत मोंगलांची अपरिमित हानि झाली. सहस्त्रावधि सामानानें लदबदलेले उंट, पुष्कळ हत्ती, अगणित घोडे व अन्य साहित्य मराठ्यांनीं लुटून नेलें. जो आडवा येईल त्याला कापून काढण्याचा सपाटा त्यांनीं लाविला. उरलेल्यांनीं तंबू पळविले. जें त्यांना नेणें अशक्य होतें तें

त्यांनीं तेथेंच अस्ताव्यस्तपणें टाकून दिलें. पण त्यांनीं वाहतुकीचे पशु मात्र एकूण एक नेले. आणि यामुळें सैन्याची सर्वांत मोठी हानि झाली. या प्रकारानंतर नेताजी आपल्या सैन्यासह एकदम आला तसाच एकदम निघून गेला. थकलेलें व निराशेचा मनांत उदय झालेलें मोंगली सैन्य पराङमुख झालें. समोरचे मराठे निघून जातांच हें मोंगली सैन्य आपल्या जागेवर आलें. येतांच मराठ्यांनीं केलेला विध्वंस त्यांच्या दृष्टीस पडला. त्यांना वाटलेलें आश्चर्य व झालेलें दुःख सीमातीत होतें. त्या रात्रीं त्यांना थंडींत उपाशी रहावें लागलें व तेंहि उघड्यावर. कारण कीं एकाहि नोकरानें तोंड दाखविलें नाहीं व बरेचसे तंबू शिवाजी महाराजांच्या अधीन झालेले होते. सारी रात्र त्यांनीं शस्त्रसन्नद्ध अवस्थेंतच काढली. कारण झाडाचें एखादें पान जरी हललें तरी शिवाजीचीं माणसेंच तेथें दबा धरून बसलीं आहेत कीं काय असा संशय त्यांना भयभीत करीत असे. त्यांचें आपसांतील संभाषण सुद्धां या वाईट प्रकरणाचा प्रारंभ जसा वाईट झाला तसाच शेवटहि होईल कीं काय या विषयावरच असे. शिवाजी महाराजांच्या या 'नाना कळांचें' मुक्त-कंठ वर्णन कसें करावें हेंहि त्यांना समजेना. युद्धाची ही पद्धति त्यांना सर्वस्वी अज्ञात होती. ते शेवटीं म्हणत, 'नवाब शाहिस्ते-खान या पद्धतीला खणून काढल्याविना रहाणार नाहीं. लवकरच सर्वांत दयनीय परिस्थिति निर्माण झाली. उंटवाहक व अन्य नोकर वर्ग, जो पळून गेला होता अथवा ज्यानें लपून स्वतःला वांचवि-ण्याचा प्रयत्न केला होता, तो परत यावयास लागला, व साऱ्या सैन्यांतून आश्चर्याचा कल्लोळ उठला. त्यांपैकीं कांहीं स्वतःच्या अस्त्राविना आलेले होते. कांहीं चांगलेच धडा शिकून आलेलें आढळले. कांहीं बोडके होते व सर्वच जवळ कांहींच नसलेले होते. त्या रात्रीं शाहिस्तेखानाला एका अतिशय लहान तंबूंत झोंपून रात्र काढावी लागली. त्याचा नेहमीचा कोणताहि सरंजाम त्याच्या जवळ उरला नव्हता. त्याशिवायच त्याला जाणें क्रमप्राप्त होतें. नेहमींच्या मोंगली 'मुजोरी'पणानें तो शपथपूर्वक किंचाळत होता

कीं, शिवाजीला या गोष्टीची सव्याज भरपाई द्यावयास लावीन. पण ही 'मुजोरी' केवढीहि दाखविली तरी शिवाजीच्या धूर्ततेचे व युक्तिपूर्णतेचे धडे त्याला स्वतःला बोचतील अशा पद्धतीनें या वेळीं व पुढेंहि अनुभवानेंच शिकावे लागणार होते."

सन १६६० मध्यें शाहिस्तेखान स्वराज्य बुडविण्यासाठीं आला. अगणित सैन्यासह तीन वर्षें तो येथें राहिला. शिवछत्रपति पन्हाळयाला सिद्दी जोहराच्या वेढ्यांत असतांना त्यानें थोडेफार विजय मिळविले. पण उंबरखिडींत कारतलबखानाशीं महाराजांच्या झालेल्या युद्धापासून त्याला शिवशाहीच्या आघातांचा परिचय होऊं लागला. शेवटीं शेवटीं तर नेताजीच्या वृक युद्धपद्धतीनें त्याला कसें हैराण केलें याचें वर्णन वरील उताऱ्यांत आलेंच आहे. सन १६६३ च्या मार्चमध्यें नेताजी पालकरावर सात सहस्र मोंगली सैन्य पाठविण्यांत आलें. या सैन्यानें नेताजीचा पाठलाग मोठ्या ईर्ष्येनें प्रारंभ केला. परंतु एका दिवसांत पन्नास मैलांचें अंतर तोडणाऱ्या शिवछत्रपतींच्या अश्व सैनिकांचा पाठलाग करणें सोपें नाहीं ही गोष्ट मोंगली योद्ध्यांच्या लवकरच लक्षांत आली. विजापूरपर्यंत नेताजी पुढें व मोंगली सैन्य त्याच्या पाठीवर अशी स्थिति होती. अडचणीच्या जागीं या सैन्याला नेऊन तेथें एकदम उलटून त्याचा फडशा पाडावा असा नेताजीचा डाव होता. मोंगलांच्या सेनाधिकाऱ्यांच्या लक्षांत हें आलें नसलें तरी विजापूरचा सरदार रुस्तुमजमा अनुभवानेंच शहाणा झाला होता. त्याला या पाठलाग करणाऱ्या मोंगली सेनेचें भविष्य उघड दिसूं लागलें, व त्यानें आपण होऊन मोंगली सेनाधिकाऱ्यांना भेटून या पुढच्या बिकट रस्त्यांची त्यांना माहिती देऊन त्यांच्यावरील भीषण संकटाची त्यांना कल्पना दिली. त्यामुळें नेताजीचा पाठलाग सोडून मोंगलांचें सैन्य परत गेलें. मोंगलांच्या बरोबरीच्या या धावपळींत नेताजीचे तीनशे सैनिक ठार झाले व तो स्वतःहि घायाळ झाला होता.

## भव्य भीषण साहस

तीन वर्षें स्वराज्यांत ठाण मांडून उपद्रव होऊन बसलेल्या या मोंगलांच्या विख्यात सेनापतीला त्याच्या अमर्याद संख्याबलामुळें

उघडयावर गांठण्याची सोय नव्हती. गनिमी काव्यानें त्याच्या सैन्याचे कितीहि लचके तोडले तरी गजेन्द्राला खाऊन फस्त करण्या-सारखेंच तें अवघड होतें. महाराजांनीं त्याचें शक्य तितक्या लवकर उच्चाटन करण्याचा निश्चय केला. त्यासाठीं त्यांनीं आपले प्राण संक-टांत घालून जें अश्रुतपूर्व व अत्यद्भुत साहस केलें त्याला इतिहासांत तुलना नाहीं. शिवछत्रपतींनीं त्यांच्या साहसांत एकदां वापरलेल्या युक्तीचा पुन्हां अवलंब केलेला नाहीं. अफझलखानाप्रमाणें शाहिस्ते-खानाला भेटीला बोलावण्याची मुळींच शक्यता नव्हती. तो तशा भेटीला मुळींच उत्सुक नव्हता. महाराजांनींच त्याची एकांतांत भेट घेण्याचें व त्याला संपविण्याचें ठरविलें. हें साहस त्या वेळीं साऱ्या जगाला स्तंभित करणारें ठरलें. आजहि त्याचा जों जों विचार करूं लागावें तों तों विचारक स्तिमित होतो. कै. जदुनाथ सरकार लिहितात "नेताजीच्या दिखाऊ पराजयाचें सुद्धां उसनें बरोबर एकाच महिन्यानें शिवाजीनें मोंगलांच्या प्रसिद्ध सेनापतीला इतक्या जोराचा चपेटा लगावून फेडलें कीं, त्यायोगें सगळेच स्तंभित होऊन गेले. मोंगलांचा दक्षिणचा महापराक्रमी सुभेदार शाइस्ताखान याला त्याच्याच छावणींत मध्यभागीं शयनागारांत वीस सहस्र सैन्याच्या कडयांत शेकडो देहसंरक्षकांसमोर शिवाजीनें जखमी केलें या वार्तेनें कोण आश्चर्यचकित होऊन जाणार नाहीं ! हा विल-क्षण बेत रचण्याचें चातुर्य, तो कृतींत उतरविण्याची कुशलता, व सिद्धीस नेण्याची कार्यक्षमता या योगें मोंगल दरबारांत शिवाजीच्या अद्भुत सामर्थ्याविषयीं विलक्षण दरारा उत्पन्न झाला. अफझल-खानाच्या पारिपत्यानें विजापुरी दरबारास जसा धाक बसला तसाच धाक शाइस्ताखानास लगावलेल्या चपेटयामुळें मोंगल दरबारासहि बसला." —(शिवाजी व शिवकाल पृ. ६७)

## पुण्याचा लालमहाल

शाइस्तेखान पुण्याला शिवाजी महाराजांच्या लाल महालांतच येऊन राहिलेला होता याचा उल्लेख मागें केलाच आहे. खानाचें

स्थान केवळ कुशल सेनापति म्हणूनच नव्हे तर अनेक दृष्टींनीं मोठें होतें. खानाचें खरें नांव अबूतालिब किंवा मिर्झामुराद हें होतें. बादशहा जहांगीर व शहाजहान यांचा मुख्य 'वजीर' आसफखान याचा तो मुलगा, व जहांगीरची विख्यात राणी नूरजहान हिचा पिता इतिमादुद्दौलाचा शाहिस्तेखान हा नातू होय. या नात्यानें तो बादशहा औरंगजेबाचा मामा असून मोंगल साम्राज्यांतील तो अत्यंत श्रीमंत नबाब समजला जात असे. सन १६४१ मध्यें तो शहाजहान बादशहाचा वजीर होता. १६५९ मध्यें औरंगजेबानें दक्षिणच्या सुभेदारीवर त्याची नेमणूक केली. आधींच मोंगलांच्या अतिसामान्य सैनिकाचा सुद्धां थाट केवढा असे याचें वर्णन मागें एका ठिकाणीं केलेंच आहे. मग शाहिस्तेखानाचें वैभव केवढें असेल! कॉस्मेडा गार्डानें शाहिस्तेखानाच्या वैभवाचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे --

"The grandeur with which Sextaghan marched will be discredited in Europe but it is necessary that we should speak about it, though most people refuse to believe every thing outside their country and out of their sight. This proud Umrao had with him two field tents, each carried by three hundred elephants. When he set out from the first the other was fitted in the place where he would stop that day. Each tent contained houses for him; the tent in which he used to give audience was sixty feet in length and thirty in breadth and its covering was supported on strings of iron fifteen feet in height. This was followed by bed chamber, private rooms, gardens full of flowers conveyed in millions of vases and so delicious that one who saw them would doubt whether they were natural. All the houses were so neat, and furnished with such beautiful and rich furniture that even the court had

nothing better. Immediately behind were houses for the ladies, for maid servants, for many cunuchs and innumerable servants; there were other houses for pantry, for plates ane different kitchens. Outside there were other houses for the revenue office for the criminal and civil courts and many other departments. In the front of the tent there was a courtyard so big and capacious that the military exercises with all their combats and defences were performed here. All this was surrounded by a wall made of thick doubled cloth, twenty feet in height supported by several iron cylinders with spurs fixed in the ground."

" अशा वैभवासहित शाहिस्तेखानाचा पुण्यास निवास होता. खानाच्या वैभवाच्या दृष्टीनें शिवछत्रपतींचा लाल महाल त्याला रहावयास अगदींच अपुरा होता. त्यामुळें तो प्रत्यक्ष लालमहालांत होता कीं त्याचा स्वतःचा निवास महालालगत शामियाना उभारून तेथें होता यासंबंधीं मतभेद आहेत. पण तो कांहीं महत्त्वाचा मुद्दा नाहीं. लालमहाल व त्याच्या सभोंवारचा मोठा परिसर खान व त्याच्या शेंकडों अंगरक्षकांनीं, नोकरांनीं, जनानखान्यानें व संरक्षणार्थ असलेल्या सैन्यानें व्यापला व पुण्याचा परिसर त्याच्या सैन्यानें व्यापला. खानाच्या शेजारींच दहा सहस्र अश्वदळासहित सिंहगडाच्या पायथ्याशीं विख्यात राजपूत योद्धा महाराजा जसवंतसिंग याचें जागतें शिबिर होतें. श्री शिवछत्रपतींनीं आपल्या कूटयुद्धपद्धतीनें खानाच्या सैन्याला टेकीस आणलें होतें हें आपण पाहिलेंच आहे. तिचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून प्रत्यक्ष खानालाच त्याच्या निवासस्थानीं शिरून घाबरा करून हांकून लावण्याची अथवा शक्य तर ठार करून निर्नायक अवस्थेंत मोंगली सैन्य स्वराज्याच्या सीमापार करण्याची योजना शिवछत्रपतींनीं आखली. पण ती गोष्ट सोपी नव्हती. सहस्रावधि सैन्याच्या गराड्यांत शिरणें व परत येणें कल्पनेलाहि कांपरें भरविणारेंच होतें. सर्वांत प्रथम जसवंतसिंगाच्या सिंहगडाच्या पायथ्याशीं असलेल्या जागत्या

सैन्याचा प्रश्न होता. कारण त्याच्या अंगावरूनच जावयाचें व परतावयाचें होतें. महाराजांनीं जसवंतसिगाला चांचपलें. तो कांहीं शाहिस्तेखानावर फारसा प्रसन्न नव्हता. जसवंतसिगाकडे रत्नामाणकांच्या व सुवर्णाच्या पेट्या हळूंहळूं जाऊं लागल्या. त्याचा व्हावयाचा तोच परिणाम होऊन त्याच्या अंत:करणांतला परमेश्वर जागा झाला, व डोळे असूनहि जसवंतसिगाला या सुवर्णमात्रेनें कांहींएक दिसेनासें झालें. हें योजनेंतील पहिलें महत्त्वाचें काम साधल्यावर हें साहस महाराजांनीं स्वत:च करावयाचें निश्चित केलें. प्रत्येक महत्त्वाच्या धाडसांत स्वत:चाच पहिला पदन्यास असणें हा त्यांच्या सेनापतित्वाचा अत्यंत महनीय विशेष होता हें अफझल-प्रसंगांतहि सिद्ध झालेंच आहे. नंतर या धाडसांतील सहकारी म्हणून योग्य माणसें निवडून काढिलीं. सभासद म्हणतो--" राजियांनीं . . . . आपले लष्करांत व मावळे हुजूर लोकांत निवड करून, चखोट धारकरी माणूस निवडिले. निवडक हजार माणूस काढिलें. वरकड लष्करामध्यें हजार दोन हजार सडे सडे राऊत फौजेंत निवडिले. शास्ताखान पुण्यास आला ही खबर तहकीक आणविली. आणि राजे राजगडावरून (सिंहगडावरून) सडे होऊन, खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देश कुळकर्णी तर्फ खेड हे दोघे बहुत शहाणे व शूर राजियांचे प्रीतिपात्र, हे दोघे बंधू बरोबरी घेतले. राजियांनीं नेताजी पालकर पागा देखील एक फौज केली. शिलेदार व हशम मावळे मिळोन एक फौज पेशवे (यांची) अशा दोन फौजा शास्ताखानाच्या गोटाबाहेर अर्धकोशावर दोन तर्फा उभ्या केल्या. (आणि खासा राजे) नबाबाचे गोटांत चालिले." सिंहगडावरून निघून रात्र पडण्याच्या वेळीं महाराज पुण्याला आले. या साहसांत स्वत:बरोबर त्यांनीं निवडक चारशें माणसें घेतलीं होतीं, तो दिवस दि. ५ एप्रिल १६६३ म्हणजे चैत्र शुद्ध अष्टमीचा होता. बुद्धया हा दिवस निवडण्याचें कारण त्या दिवशीं मुसलमानी कालगणनेप्रमाणें रमजानची सहावी तारीख होती. हा रोज्यांचा म्हणजे उपवासाचा महिना असल्यामुळें,

आक्रमणाची कल्पनासुद्धां नसलेले हे विलासी लोक दिवसभर उपवास करून व रात्रीं यथेच्छ सुग्रास भोजनावर ताव मारून असावध झोंपलेले असणार हें ओळखून हा दिवस निवडलेला होता. त्यांतहि या उपवासाच्या दिवसांतली अन्य कोणतीहि मिति न निवडतां रमजानची ६ वीच मिति निवडण्याचें आणखी एक कारण होतें. हा दिवस औरंगजेबाच्या राज्यारोहणसमारंभाच्या आठवड्या-पैकीं एक असल्यामुळें त्या निमित्तानें उत्सव चालू होता. या महोत्सवांत प्रतिदिनीं रात्रीं दिवसा दहावीस वेळां मोठमोठ्यानें वाद्यें वाजविण्याची मोंगली शिबिरांतील प्रथा महाराजांना माहीत होती. आपल्या सेनापतीच्या निवेशांतील प्रवेशानंतर व संहारसत्राच्या प्रारंभानंतर होणारी गडबड बाहेरच्या सेनेस ऐकूं न यावी म्हणून प्रथम वाद्यें घेऊन आपणच तीं जोरजोरानें वाजविण्याची सोय या दिवशींच होणारी होती. म्हणून या दिवसाची बुद्ध्या निवड करण्यांत आली.

असो. सभासद म्हणतो— "बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी खेडकर पुढें चालिले. त्यांचे पाठीवर कुललोक व राजे चालिले. तांब्रांचें दळ थोर. जागांजागां लष्करांत राजियासी 'कोणाचे लोक? कोण? कोठे गेले होते? म्हणून पुसतात. 'कटकांतील लोक, चौकी पाहऱ्यास गेलो होतो' असें भाषण बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी बोलत चालिले." पण महाल गांठला तरी रात्रीं त्याच्या आंत प्रवेश कसा करावा हा प्रश्न होताच; पण तो फार वेगळ्या युक्तीनें सोडविलेला होता. ९१ कलमी बखरींत म्हटलें आहे "माळी पुणेंकर तो नित्य फुलें शास्ताखानास देत होता. त्याचा मेहुणा राजे यापासी होता. त्याच्या हातें भेद केला. पाचसे होन देऊं केले. लालमहाल तेथें खिडकी बागेमध्यें जावयाची होती. त्या स्थळीं घर माळ्याचें होतें. (राजे यांनीं) रात्रीं येऊन अंबिलओहोळ तेथें स्वार घोडीं ठेऊन अंब्रराईतून पायीं मावले जागां जागां ठेऊन माळी समागमें घेऊन खिडकीसमीप खुद्द राजे आले . . . खिडकी उघडून लालमहालांत गेले."

महाराजांनीं वाड्यांत प्रवेश केला तेव्हां मध्य रात्र उलटून गेलेली होती. मुसलमानांच्या उपवासाच्या पद्धतीप्रमाणें पहांटेच्या खाण्याची सिद्धता करण्यासाठीं अनेक मुसलमान स्वयंपाकी आपापल्या उद्योगाला लागलेले होते. मराठ्यांनीं त्यांना तत्काळ यमसदनास पाठविलें. खानाच्या कानांवर हा प्रकार घालण्याचा प्रयत्न झाला. पण विलासी आलिंगनांत निद्रासमाधींत असलेल्या अमीरुल उमरावानें तिकडे लक्ष सुद्धां दिलें नाहीं. सभासद म्हणतो "दोनशें माणूस त्यामध्यें निवडून खासा रजियानें आंगेंच चिमणाजी बापूजीस सांगोन बाड कटारीनें चिरून आंत शिरले. तों डेरियांत डेरे, सात ब्राडाचे डेरे, तितकेहि फाडून चिरून आंत गेले." जनान्याच्या जागीं शिवछत्रपतींच्या रूपानें प्रत्यक्ष मृत्युदेवता आपल्या समोर उभी ठाकलेली पाहून त्या सेनापति शाहिस्तेखानाची काय अवस्था झाली असेल! आतां जसवंतसिंग दूर होता. शाही सैन्याचा उपयोग नव्हता व जनानखान्याशिवाय कोणी अंगरक्षक नव्हता. खानाच्या बायकांनीं भीतीनें एकच आकांत मांडला. तेथें असलेलें दिवे त्या गडबडींत मालवले. शिवछत्रपतींबरोबरच्या लोकांनीं अंधारांत खड्ग चालविलें. कांहीं बायकाहि त्यांत कापल्या गेल्या. ही आरडाओरड ऐकतांच शाहिस्तेखानाचा वडील मुलगा फातखान तेथें धावत आला. घाबरून पळण्याचा रस्ता शोधीत असलेल्या आपल्या बापावरील प्रसंग ओळखून तो शहाणपणानें मोठ्यानें उद्देशून म्हणाला "अरे शिपाया! आपला जीव वांचविण्याचें सोडून तूं तो धोक्यांत कां घालीत आहेस? हे लोक शोधीत आहेत तें तुला मारण्याकरितां नसून शाहिस्तेखानालाच पहात आहेत." या बोलण्यामुळें त्यालाच शाहिस्तेखान समजून मराठ्यांनीं त्याला कापून काढिलें. आणखी एक सेनापति धांवत तेथें आला तों तोहि तलवारीच्या एका फटक्यासरशीं ठार झाला. "असें दोन घटका होतें इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासी गेला. ती नदर राजियानें धरून वार केला. खानाचीं तीन बोटें उडालीं. तेव्हां गलबा थोर

जाहला." (सभासद) प्राणांवरचें बोटावर निभून खान खिडकीवाटें पसार झाला. या संधींत कांहीं मराठ्यांनीं ठरल्याप्रमाणें नगारखान्यावरील सैनिकांना ठार करून तेथें प्रवेश केला. व तेथील वाद्यें जोरजोरानें वाजवावयास प्रारंभ केला. त्यामुळें आंतील गोंधळ व आरडाओरडा बाहेर कोणालाच ऐकूं गेला नाहीं. झालेल्या सौप्तिक पर्वामुळें आंतील गोंधळ व आरडाओरडा वाढूं लागला व त्याची चाहूल बाहेरच्या सैन्यास लागली त्यासरशीं तेथें थांबणें उचित नाहीं हें ओळखून महाराज परत फिरले. ते आल्या वाटेनें जसवंतसिंग पहात असतांनाच सिंहगडावर निघून गेले. परततांना त्यांच्या सैनिकांपैकीं दोघे चुकून पाण्याच्या हौदांत पडून मृत्यु पावले. महाराज आले कसे व गेले कोठून याचा कोणालाच थांग लागला नाहीं. सारें पुणें या जागृत (?) सैन्यानें शोधून काढलें. पण ते पुण्यांत नव्हतेच तर सांपडणार कसे? या सौप्तिक पर्वांत शाहिस्तेखानाचीं बोटें तुटलीं, वडील मुलगा फातखान व एक सेनापति ठार झाला. धाकटे दोन पुत्र घायाळ झाले. सहा स्त्रिया ठार झाल्या व आठ घायाळ झाल्या व चाळीस सैनिक ठार झाले. महाराजांचे सहा सैनिक ठार झाले व चाळीस लोकांना किरकोळ शस्त्राघात झाले.

शिवसमकालीन पत्रव्यवहारांत या प्रसंगाचें वर्णन केलेलें वृत्त पाहण्यासारखें आहे.

## समकालीन पत्रव्यवहार

दि. २५ मे १६६३ चें सुरतेहून मद्रासला गेलेलें पुढील इंग्रज वखारीचें पत्र पहा : "शाहिस्तेखानाच्या सैन्याचा तळ पडला असतां शिवाजी स्वत: ४०० लोकांनिशीं खानाच्या तंबूंत शिरला व तेथें त्यानें ५० मानकरी ठार केले. खानाला जखमी केलें; १२ नायका मारल्या आणि ६ जखमी झाल्या. वडील मुलगा आणि जांवई यांना ठार करून आणखी दोन मुलगे जखमी केले; खानाची मुलगी नेली आणि पुष्कळ खजिनाहि त्यांच्या हातीं आला. शिवाजीचे

माणसांपैकीं फक्त सहा मृत्यु पावले, आणि ४० जखमी झाले. जसवंतसिगाचे १० हजार घोडेस्वार कांहींहि विरोध न करितां फक्त पहात उभे राहिले. शाहिस्तेखानाचा कांटा आपल्या मार्गांतून काढला जावा असें जसवंतसिगाच्या मनांत होतें असें म्हणतात. आणि प्रसंगीं तें सिद्धीसहि गेलें असतें, परंतु खानावरील संकटाची कल्पना आल्यामुळें खानाच्या मुलानें एखाद्या सामान्य शिपायाप्रमाणें खानाला उद्देशून म्हटलें, "हे शिपाया, आपला जीव बचावण्याचें सोडून तूं तो धोक्यांत कां घालीत आहेस? हे लोक शोधीत आहेत ते तुला मारण्याकरितां शोधीत नसून शाहिस्तेखानालाच पहात आहेत." या शब्दांमुळें बोलणारा इसम खान आहे असें समजून खऱ्या खानाला सोडून ते त्याच्या मुलावर तुटून पडले आणि खान निसटला."

— (शिवकालीन पत्रसारसंग्रह पृष्ठ २२८–२२९)

दि. २४ मे १६६३ ला रॉबर्ट फेरंड व गिफर्ड यांनीं कोल्हापूरहून सुरतला पाठविलेल्या पत्रांत म्हटलें आहे, "शाहिस्तेखान मेलेला नसून घायाळ झालेला आहे. त्याचा एक मुलगा मेला, दोन घायाळ झाले, सहा स्त्रिया मेल्या व आठ घायाळ झाल्या. त्याचे ४० अंगरक्षक जागच्या जागीं ठार झाले. या घटनेंत स्वत: शिवाजीनेंच मुख्य भूमिका वठविली. तो शाहिस्तेखानाच्या शिबिरांत जातांना व तेथून परततांना (परततांना त्यानें जितक्या माणसांना कापून काढतां येणें शक्य होतें तितक्या माणसांना कापून काढलें.) आपल्या दहा सहस्र अश्वदळासहित जसवंतसिंग पहात होता. त्यानें जातांना व परततांना शिवाजीला मुळींच अडविलें नाहीं. त्यामुळें सर्वांना असें निश्चितपणें वाटतें कीं संरक्षणाची हमी देऊन त्यानेंच त्याला हा सल्ला दिला."

डचांच्या सुरत येथील डायरेक्टरनें आपल्या गव्हर्नर जनरलला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे —

"मोंगलांचा 'बडा' सरदार शाहिस्तेखान याच्यावर बंडखोर शिवाजीनें रात्रीं आपल्या एक सहस्र सैनिकांसह अकस्मात् छापा

घातला. त्याच्या अंगरक्षकांची एक सबंध तुकडी कापून काढून त्यानें त्याच्या वडील मुलाला ठार मारलें. त्याच्या स्त्रियांना पळवून नेलें व परततांना चांदी, सोनें व रत्नांची चांगली लूट घेऊन तो गेला. शाहिस्तेखानाला शस्त्रांचे घाव लागले; पण तो वांचला. राजा जसवंतसिंग या घटनेच्या वेळीं अवघ्या दोन तीन कोसांवर होता, व त्यानें या घटनेकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें. त्यामुळें तो व शिवाजी यांच्यांत कांहीं गुप्त संकेत आधींच ठरलेला होता अशी वार्ता आहे."

जसवंतसिंगावर शिवछत्रपतींनीं दाननीतीचा वापर करून भेदप्रयोग केल्याचा स्पष्ट उल्लेख कास्मेडा गार्डाच्या वर्णनांत आहे. तो लिहितो —

Jassomptishinga was Gentio. Sevagy took advantage of this (fact), for he was a Hindu and sent him one night a rich present of precious stones, a large quantity of gold and silver with many rich and precious jewels. With these marvellous cannons, Sevaji bought and reduced that fortress." —(F. B. S. P. 64-66)

"जसवंतसिंग हा हिंदू आहे. शिवाजीहि हिंदू असल्यामुळें त्यानें या गोष्टीचा उपयोग करून घ्यावयाचें ठरविलें. त्यानें एका रात्रीं हिरे, सोनें, चांदी व रत्नें यांची फार मोठी भेट जसवंतसिंगाला पाठविली. या अत्यंत उत्कृष्ट तोफांनीं त्यानें जसवंतसिंगाचा सुदृढ दुर्ग ढांसळविला."

## शिवछत्रपतींचें पत्र

शाहिस्तेखानावरील आक्रमणाच्या स्वरूपाचें स्पष्टीकरण करणारें स्वतः शिवछत्रपतींचेंच पत्र इंग्रजी पत्रव्यवहांत उल्लेखिलेलें आहे. दि. १२ एप्रिल १६६३ ला फिलिफ गिफर्डनें राजापूरहून सुरतला पाठविलेल्या पत्रांत राजापूर येथील महाराजांचा सेनानी

रावजी पंडित याला स्वतः महाराजांनीं लिहिलेल्या पत्रांतीलच वर्णन उद्धृत केलें आहे. तें पत्र असें. " रावजी पंडित परत आला आहे. आल्याबरोबर मला बोलावून 'तहाचीं कलमें ठरविण्या-करितां कोणातरी इसमाला त्वरित पाठवून द्या' म्हणून मी तुम्हांला लिहावें असें त्यानें मला सांगितलें. काल राजानें रावजीला स्वतः लिहिलेलें पत्र आलें. ( A letter from the Rajah, written by himself to Raoji ) त्यांत शिवाजी ४०० निवडक लोकांसह जातीनें शाहिस्तेखानाच्या तंबूत गेला, आणि लगेच पाहरा साफ मारून शाहिस्तेखानाचा वडील मुलगा, त्याचा जांवई, त्याच्या बारा बिव्या, ४० मोठे दरकदार, मोंगलांचा सेनापति इतरयांचे प्राण हरण करून खुद्द शाहिस्तेखानाला आपल्या स्वतःच्या हातांनीं जखम करून (त्याला तो मेला असें वाटलें होतें; परंतु नंतर तो जिवंत आहे असें त्यानें ऐकलें), त्याच्या आणखी सहा बायका, आणि दोन मुलगे शिवाजीनें ठार केले. या सगळ्या भानगडींत त्याचे फक्त सहा सैनिक मेले आणि ४० जखमी झाले. दहा हजार घोडेस्वारांचा अधिपति राजा जसवंतसिंग समीप असून पाठलाग न करितां स्तब्ध राहिला. यावरून त्याचें यांत अंग होतें असें सगळ्यांना वाटतें. शिवाजी मात्र "आपल्याला परमेश्वरानें हें कृत्य करण्याचा संदेश दिला" असें आपल्या लोकांना सांगतो.

## तंबू कीं लालमहाल

ही घटना झाली त्या वेळीं शाहिस्तेखान लालमहालांत होता कीं शामियान्यांत या संबंधांत पुढीलप्रमाणें वेगवेगळे उल्लेख आढळतात.

(१) सभासदाच्या मागें उद्धृत केलेल्या उताऱ्यांत डेऱ्याचा व पडदे फाडून आंत गेल्याचा स्पष्ट उल्लेख आहेच. सभासदानें तर शाहिस्तेखानाच्या तोंडीं असे शब्द घातले आहेत कीं "शिवाजी लबाडींत फारच निष्णात आहे. ज्या वेळीं तो माझ्या शिबिरांत शिरला त्या वेळीं जमिनीपासून चाळीस हात उंच उडी घेऊन तो माझ्या शिबिरांत शिरला."

(२) चिटणिसांच्या बखरींत तंबूचा उल्लेख अनेक वेळां आलेला आहे.

(३) एस्कालियट्, थेवेनॉट व फ्रेयर हे तंबूचाच निर्देश करतात.

(४) ऑर्म म्हणतो, "ते मध्यरात्रीनंतर शाहिस्तेखानाच्या तंबूंत शिरले. हाताला भयानक घाव होऊन शाहिस्तेखान मात्र वांचला.

(५) कॅरे म्हणतो, " मोंगल सेनापति (शाहिस्तेखान) आपल्या सैन्यापासून दूर अशा तंबूंत आपल्या रंगेल वासनांची तृप्ति करीत राहात होता."

याच्या उलट महालाचे उल्लेख पुढीलप्रमाणें आहेत —

(१) शिवदिग्विजयांत शिवछत्रपतींचा राहण्याचा वाडा हेंच शाहिस्तेखानाचें निवासस्थान होतें असें म्हटलें आहे.

(२) शिवाजी प्रतापांत वाड्याचाच निर्देश आहे.

(३) गार्डानें हाच उल्लेख केला आहे. या उल्लेखांवरून ग्रँट डफ व सर जदुनाथ सरकार शाहिस्तेखानाचा निवास महाराजांच्या प्रत्यक्ष लाल महालांतच होता असें मानतात; तर याच्या उलट डॉ. बाळकृष्ण असें म्हणतात कीं, —

We cannot ignore the evidence of the authentic contemporary letters. There could be no mistake in reporting on such a simple point. It appears to me that Shaistakhan and his personal retinue stayed in tents pitched in the compound of the Lal Mahal. The " unpretentious house" of Shivaji would have been too small for a rich grandee and general of the rank of Shaista-Khan. Some persons might be occupying the house itself; but the greater portion would have put up in tents. The surprise attack might have been led by Shivaji by jumping over the compound wall. The incident must have happened in a pavilion."

— (Shivaji the Great Vol. 1. Part 2, P. 84)

"आपण समकालीन पत्रव्यवहारांच्या विश्वसनीय पुराव्याकडे दुर्लक्ष करूं शकत नाहीं. इतक्या साध्या गोष्टीच्या माहितीसंबंधांत त्यांची चूक असण्याची शक्यता नाहीं. मला असें वाटतें कीं, शाहिस्तेखान व त्याचा वैयक्तिक परिवार लाल महालाच्या आवारांत उभारलेल्या तंबूतून रहात असावेत. शाहिस्तेखाना-सारखा श्रीमंत सरदार व अग्रगण्य सेनानी याच्या राहण्याच्या दृष्टीनें शिवाजीचा महाल अगदींच तोकडा पडावयाचा. त्याच्या परिवारांतील कांहीं लोक त्या महालांत राहात असतील. पण त्यांतील मोठा भाग तंबूंतूनच राहात असावा. शिवाजीमहाराजांनीं अकस्मात् आक्रमण आवाराची भिंत चढून अथवा तिच्यावरून उडी घेऊन केलें असावें. घटना शामियान्यांतच झाली असली पाहिजे."

असो. शिवछत्रपतींच्या या असीम साहसानें त्यांची कीर्ति दूरवर पसरली, किंबहुना ते ईश्वराचे अवतार आहेत, त्यांना पंख असून त्यांचें शरीर हवामय आहे, वाटेल त्या वेळीं वाटेल त्या ठिकाणीं प्रवेश करणें त्यांना सहज शक्य आहे व त्यामुळें त्यांच्या शत्रूला कोठलीहि जागा सुरक्षित नाहीं अशी सर्वसाधारण जनतेची धारणा झाली. शाहिस्तेखान या त्याच्या विटंबनेमुळें पूर्णपणें खचला. मोंगल दरबारांतून तर त्याच्या प्रतिष्ठेचें उच्चाटन झालेंच; पण शाही कुटुंबांतमुद्धां त्याची काडीइतकीहि प्रतिष्ठा उरली नाहीं.

दि. ५ एप्रिल १६६३ ला मध्यरात्रीं हा प्रकार झाल्यावर दि. ६ ला म्हणजे दुसऱ्या दिवशीं खानाच्या समाधानासाठीं भरलेल्या दरबारांत महाराजा जसवंतसिंगाला पाहून आंतल्या आंत संतापानें जळत उपरोधिकपणें शाहिस्तेखान त्याला म्हणाला, "काय, आज महाराजा जसवंतसिंगाला मी येथें जिवंत पहात आहें? काल रात्रीं शिवाजीला माझ्या शामियान्यांत पाहतांच मला असें वाटलें कीं, महाराजा जसवंतसिंगाला त्याच्या सर्व लढाऊ सेनेसह ठार मारून हा मराठा येथें आलेला आहे. कारण जसवंतसिंग जिवंत असेपर्यंत सिंहगडाकडून शिवाजीचें येणें शक्यच नव्हतें. पण महाराजा तर

येथें आज माझ्याच समाधानाला आला आहे!" शाहिस्तेखान बरळत होता. जणूं काय या मुख्य मोंगल सेनापतीनें युद्धभूमीवर शृंगारचेष्टा करीत बसावें व जसवंतसिंगानें त्याचें रक्षण करावें अशीच बादशहा औरंगजेबानें वाटणी केली होती!

महाराजांच्या या धाडसामुळें प्रेतासारखा थिजलेला शाहिस्तेखान पुणें सोडून औरंगाबादेला सुरक्षिततेसाठीं जाऊन राहिला. बादशहा औरंगजेबाला ही वार्ता मे महिन्यांत कळली. त्या वेळीं औरंगजेब काश्मीरच्या सहलीसाठीं निघाला होता. ही वार्ता कळतांच दयेऐवजीं त्याला शाहिस्तेखानाचा इतका राग आला कीं त्यानें त्याला शिक्षा म्हणून दक्षिणऐवजीं बंगालचा सुभेदार नेमलें व त्याच्या जागीं आपला मुलगा शहाजादा मुअज्जम याला दक्षिणेचा सुभेदार म्हणून पाठविलें. औरंगजेब इतका रागावला होता कीं, सन १६६४ च्या जानेवारींत शाहिस्तेखान बंगालमध्यें जावयास निघाला असतांना त्याची साधी भेट घेण्याचें सुद्धां बादशहानें नाकारलें. बिचारा शाहिस्तेखान इतका थिजला होता कीं, बंगालमध्यें जातांना वाटेंतील मोंगल अधिकाऱ्यांनीं त्याला दिलेलीं मेजवानीचीं व सत्काराचीं निमंत्रणेंहि त्यानें नाकारलीं. शिवछत्रपतींच्या जीवनांतील हा देदीप्यमान विजय म्हणजेच त्यांच्या विभूतिमत्त्वांतील सेनापतित्वाच्या विशेषांचा सर्वांत देदीप्यमान पैलू होय.

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

अनुक्रम ............... वि: ....................

क्रमांक ....... नों. दि: ...................

प्रकरण सतरावें

# उपसंहार

पुण्यश्लोक छत्रपति श्री शिवाजी महाराजांच्या राजकीय जीवनपटांतील तीन कालखंडांचें आतांपर्यंत जें समालोचन करण्यांत आलेलें आहे, त्यांतून त्यांचें शौर्य, तेज, धृति, दक्षता, साहस, तडफ, चापल्य, युद्धकलाप्रवीणता व समयज्ञता हे योद्धा या नात्यानें असणारे व्यक्तिगुण जसे प्रकट झाले आहेत त्याचप्रमाणें सेनापति या नात्यानें त्यांची असणारी असामान्य योग्यताहि प्रकट झालेली आहे. शाहिस्तेखानाच्या पराभवापर्यंत म्हणजे त्यांच्या ३५ वर्षांच्या राजकीय जीवनांतील सन १६४५ ते १६६३ या कालखंडापर्यंतच्या अठरा वर्षांत असा एकहि विजापुरी अथवा मोंगल सेनापति नाहीं कीं ज्याला शेवटीं शिवछत्रपतींच्या हातून आजीवन स्मरणांत राहण्यासारखा लज्जास्पद पराभव सहन करावा लागलेला नाहीं. पुढें १६८० पर्यंतच्या कालखंडांतहि सेनापति शिवरायांचें हेंच कर्तृत्व दृष्टोत्पत्तीस येतें. इस्लामी राजवंशांचें रक्त अंगांत सळसळत असणारे युवराज व राजपुत्र, उजबेग, पठाणी, मोंगली रक्ताचे कडवे योद्ध व सेनानी, स्वतःलाच चंद्रसूर्यवंशांचे म्हणविणारे हटेल राजपूत रणपंडित हे सर्व सेनापति शिवरायांची गांठ पडतांच कांपरें भरून पळत सुटलेले दृष्टोत्पत्तीस येतात. ज्यांच्या सेनासमुद्रांत ससैन्य शिवछत्रपति बुडाले तर त्यांचा पत्ता सुद्धां लागूं नये, त्यांचे सेनासमुद्र या अगस्तीनें ‘ एका आचमनीं ’ पिऊन टाकले आहेत, भार्गवरामाच्या या नव्या अवतारानें मागें हटविले आहेत. योद्धा, संघटक व सेनानी या तिन्ही विशेषांच्या दृष्टीनें त्यांचें व्यक्तिमत्त्व केवळ अद्वितीय आहे. दुर्दान्त धैर्य, दीर्घदर्शी सावधानता, नि जागरूकता, आणि तोटक्या साधनसंपत्तीचा अचूक आणि यशस्वी प्रयोग करण्याची कुशलता त्यांच्या सेनापतित्वांतून प्रकट झालेली आहे. अफझलखानाच्या वधासारख्या प्रसंगांतून त्यांची

विजयाचा पूर्ण लाभ घेण्यासंबंधांतील दक्षता व अनपेक्षितपणें विजयामागोमाग शत्रूवर भयानक परिणामकारक आघात करण्याची पात्रता प्रकट झालेली आहे. शत्रूच्या गोंधळलेल्या परिस्थितीचा पूर्ण लाभ पदरांत पाडून घेण्यांत व त्याची सिद्धता होण्याच्या आंतच त्याच्यावर तुटून पडून त्याचा पूर्ण धुव्वा उडविण्यांत ते अतुलनीय होते. त्यांच्या वेळचा एकहि सेनापति त्यांच्याशीं तुलना करण्याच्या योग्यतेचा आढळत नाहीं.

प्रत्येक प्राणसंकटांत त्यांनीं स्वत: सर्वांच्या पुढें राहून आपल्या असीम साहसीपणाचा परिचय कसा दिलेला आहे हें अफझलखानाचा वध, पन्हाळ्याचा वेढा फोडून जाणें व शाहिस्तेखानाच्या सेनानिवेशांत घुसून, खड्ग चालविणें या तिन्ही प्रसंगांतून उत्कृष्ट रीतीनें व्यक्त झालेलें आहे. यांपैकीं प्रत्येक साहसांतील त्यांची योजना म्हणजे प्रत्यक्ष मृत्युनदीच्या कांठावरील प्रवास आहे. यांपैकीं कोणत्याहि प्रसंगांत त्यांचें थोडेंहि चुकलें असतें तरी ते मृत्युमुखीं पडले असते. आणि याची जाणीव असूनहि, व त्यांनीं आपला जीव इतक्या भीषण संकटांत न घालतां आपल्यापैकीं कुणाला तरी या प्रसंगीं योजावें अशी जिवाला जीव देणारे निष्ठावंत अनुचर प्रार्थना करीत असूनहि त्यांनीं स्वत:च तें तें साहस केलें याहून वेगळा असा त्यांच्या अविकंप धैर्याचा कोणता पुरावा हवा? एका संस्कृत सुभाषितकारानें म्हटलेंच आहे —–

चलन्तु गिरय: कामं युगान्तपवनाहता: ।
कृच्छ्रेऽपि न चलत्येव धीराणां निश्चलं मन: ॥

"युगान्तकालीन सोसाट्याच्या वाऱ्यांनीं पर्वतहि डळमळीत होतात. पण तशाच संकटाच्या सोसाट्याच्या वाऱ्यांनींहि धीर पुरुषांचें अंत:करण अविकंपित व निश्चलच राहतें." शिवछत्रपति अशा पुरुषांच्या मूर्धस्थानीं आहेत.

समकालीन इंग्रज लेखक शिवछत्रपतींची तुलना अलेक्झांडर दि ग्रेट, हॅनिबॉल, सीझर या विश्वविख्यात सेनानायकांशीं करतात.

पोर्तुगीज लेखकहि असेंच प्रतिपादन करतात. समकालीन हिंदू लेखक परशुराम, राम, श्रीकृष्ण, भीम, बलराम या पौराणिक विश्वविजयी योद्धयांशीं त्यांची तुलना करतात. ऐतिहासिक कालखंडांतील अलेक्झांडर, फ्रेडरिक इत्यादि पुरुषांशीं तशी तुलनाच केली तर तिच्यांत शिवछत्रपति सेनानी म्हणूनहि या योद्धयांपेक्षां अधिक श्रेष्ठ ठरतात हें कोणत्याहि निःपक्षपाती निरीक्षकाला मान्यच करावें लागेल. अलेक्झांडर व फ्रेडरिक यांना आपापल्या वडिलांच्या हाताखालीं सर्व तऱ्हेनें शिक्षण मिळून कसलेलें आयतें सैन्य मिळालें होतें. त्यांचे धुरंधर सेनानी त्यांच्या पूर्वींच सैनिकी जीवनाचा पुरेपूर अनुभव घेऊन आपल्या अनुभवी व विचक्षण अवस्थेंत त्यांना लाभले होते. शिवछत्रपतींना यांपैकीं कोणताहि लाभ मिळालेला नव्हता. एका महान् क्रांतीच्या या अग्रदूताला शून्यांतून ब्रह्मांड निर्माण करावें लागलें. शिवछत्रपतींनीं अक्षरशः शून्यांतून ब्रह्मांड निर्माण करावें त्याप्रमाणें आपलें सैन्य स्वतःच निर्माण केलें. इतकेंच नव्हे, तर तत्कालीन सर्वांत बलाढ्य व समर्थ अशा साम्राज्याला गदगदां हलवून पालथे पाडणारे आपले सेनापतीहि त्यांनींच आपल्या प्रतिभेनें निर्माण केले आहेत. त्यांचें सैन्य तरी विशिष्ट लढवय्या जमातींतून निर्माण झालेलें आहे असेंही म्हणतां येणार नाहीं. ब्राह्मण, पंडित, कारकून, शेतकरी, खालच्या श्रेणीतील जमाती, इतकेंच नव्हे तर खांद्यावर घोंगडी व डोक्याला मुंडासें घालणाऱ्या भटक्या लोकांतूनहि त्यांनीं आपलें अठरापगड जमातीचें सैन्य निर्माण केलें. सेनाशास्त्रज्ञ व युद्धशास्त्रज्ञ असें म्हणतात कीं सैन्य नेहमीं लढाऊ जमातींतूनच निर्माण केलें पाहिजे. हवी तशी जमातींची सरमिसळ विजेतें सैन्य निर्माण करण्याच्या दृष्टीनें नेहमींच अपात्र ठरतें," पण नियमांची चाकोरी केवळ सामान्य जीवांसाठीं असते; अलौकिक द्रष्टा पुरुष नियमांच्या चाकोरींत बसत नसून त्याच्या वागणुकीवरून व व्यवहारावरून नियमांचें शास्त्र बनत जातें. ही गोष्ट शिवछत्रपतींनीं अक्षरशः खरी करून दाखविलेली आहे. समाजांतील सर्व थरांच्या व श्रेणींच्या लोकांचा भरणा असलेल्या त्यांच्या

सैन्यानें दक्षिणेंतील यवनसत्तांचें कसलेलें सैन्य, मोंगलांचें धुरंधर सैन्य व रजपुतांचें नांवाजलेलें सैन्य नि सेनापति यांचा संपूर्णपणें, जवळजवळ प्रत्येक युद्धांत धुव्वा उडवून आपलें अद्वितीयत्व सिद्धच करुन दाखविलेलें आहे. परिसानें आपल्या स्पर्शानें हव्या त्या अवस्थेंतील लोखंडाचें सोनें करावें त्याप्रमाणें शिवछत्रपतींनीं सामान्य जनतेंतून, स्वतः शिक्षण देऊन शतावधि यशस्वी सेनानायक निर्माण केले, इतकेंच नव्हे, तर आपल्या सामर्थ्यानें सर्वसामान्य जनतेंत हटेल व रगेल सैनिकी बाणा निर्माण केला. त्यांच्या निधनानंतरच्या भीषणतम व निर्नायिक परिस्थितींत, तत्कालीन जगांतील सर्वांत श्रेष्ठ साम्राज्यशक्तीबरोबर महाराष्ट्रानें वर्षानुवर्षे जो संग्राम चालवून विजय प्राप्त करून घेतला तोच महाराजांच्या एतद्विषयक कार्याचा सर्वांत मोठा व महत्त्वाचा पुरावा होय या महान् नेत्याचे धर्मनिष्ठा, धैर्य, राष्ट्रभक्ति, शिस्त, आत्मविश्वास व विजयाविषयींची दृढ श्रद्धा हे गुणविशेप त्या कालखंडांत जनतेंत वारसा म्हणून संक्रमित झालेले दिसून येतात. या दृष्टीनें विचार केला तर सेनापति अलेक्झांडर, व सेनापति फ्रेडरिक हे सेनापति शिवाजीच्या तुलनेंत बसूं शकतात काय? विख्यात इतिहासज्ञ ऑर्मे (orme) शिवछत्रपतींच्या विषयीं लिहितो --

Shivaji possessed all the qualities of a commander. He spared no cost to obtain intelligence cf all motions and intentions of his enemies and even of their minuter imports. In personal activities he exceeded all the generals of whom there is record. No general ever traversed as much ground as he, at the head of armies. He met every emergency of peril howsoever sudden and extreme, with instant discernment and unshaken fortitude The ablest of his officers acquiesced to the imminent superiority of his genius, and the boast of the soldier was to have been Shivaji cha ging sword in hand."

–(Historical Fragments P. P. 93--94)

"सेनापतीच्या अंगीं लागणारे सर्व गुण शिवाजीच्यामध्यें होते. आपल्या शत्रूंच्या हालचालींची बातमी, त्यांचे बेत व त्यांचे बारीक सारीक डावपेच माहीत करून घेण्यासाठीं तो लागेल ती किंमत खर्च करण्यास तयार असे. वयक्तिक हालचाल व साहस या बाबतींत तर इतिहासाला ज्ञात असलेल्या कोणत्याहि सेनानीपेक्षां तो वरचढ होता. त्यानें आपल्या सैन्याच्या हालचालींनीं जेवढा प्रदेश व्यापला होता तेवढा आजपर्यंत कोणत्याहि सेनानीनें व्यापलेला नाहीं. संकट केवढेंहि मोठें व कितीहि आकस्मिक असो, त्याचें स्वरूप त्याची तीक्ष्ण बुद्धि तत्काळ ओळखी, व त्यास तो अविकंपित धैर्यानें तोंड देत असे. त्याचे धुरंधर सेनापति देखील त्याच्या असामान्य बुद्धिप्रभावानें दिपून जात; आणि त्याच्या सैनिकांची सर्वांत मोठी महत्त्वाकांक्षा, शिवाजीसारखा पराक्रम मी कसा करून दाखवीन हीच असे."

सेनापतीच्या कार्याचें स्वरूप विशद करतांना महाराजांची सेना कोणत्या स्वरूपाची होती, ती त्यांनीं कशी निर्माण केली, तिला कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळण्याची व्यवस्था होती, तिची रचना कोणत्या पद्धतीची होती, तिचे प्रकार किती होते, तिच्यावरील अधिकारी कोणकोण असत व त्यांची नियुक्ति कोणत्या तत्त्वानुसार होत असे या गोष्टींचें समालोचन करणें अत्यंत आवश्यक आहे. शिवछत्रपतींच्यावर त्यांच्या सेनेचें कसें अतोनात प्रेम असे व त्यांचे सैनिक त्यांच्यासाठीं कसे प्राण द्यावयास सिद्ध असत हें अफझलखान, पन्हाळा व शाहिस्तेखान या तिन्ही प्रसंगांत दृष्टोत्पत्तीस आलें आहे. ही विलक्षण निष्ठा सैनिकांच्या अंतःकरणांत या आपल्या नेत्याविषयीं कशी निर्माण झाली असेल? या गोष्टीचीहि मीमांसा सेनापति या दृष्टीनें महाराजांच्या योग्यतेचें मूल्यमापन करतांना अत्यंत आवश्यक आहे.

प्रचंड यावनी व धुरंधर राजपुती सेनेवर आपल्या अल्पसंख्य सेनेच्या साहाय्यानें विजयामागून विजय मिळवितांना महाराज दिसतात. याची कारणमीमांसा करतांना विचक्षण विचारक शेवटीं या

सिद्धान्तावर येऊन पोहोंचतो कीं, महाराजांच्या सेनापद्धतीच्या प्रक्रियेंत, व यावनी व तत्कालीन त्यांच्या शत्रुपक्षीय अन्य राजांच्या सेनापद्धतीच्या प्रक्रियेंत कांहीं तरी मूलभूतच भेद असला पाहिजे. महाराजांनीं या आपल्या विपक्षीयांच्या सेनापद्धतीचा सूक्ष्म अभ्यास करूनच आपली सेनापद्धति उभारली असली पाहिजे. या दोन सेनापद्धतींचें स्वरूप व भेद पाहणें अत्यंत आवश्यक आहे.

अफझलखानाचें प्रकरण, पन्हाळ्याचा संग्राम व शाहिस्तेखानाचा पराभव या तिन्ही घटनांत 'दुर्ग' अथवा 'गड' या राज्यांगाचा महाराजांना खरा उपयोग झालेला आहे असें दिसून येतें. या राज्यांगाचें महत्त्व पूर्वीं एकदोन ठिकाणीं सांगितलेलेंच आहे. स्वतः शिवछत्रपतींना या राज्यांगाचें केवढें महत्त्व असे याचें वर्णन त्यांच्या प्राचीन चरित्रकारांनीं वेधक पद्धतीनें केलेलें आहे. केवळ रायगड या राजधानीच्या गडाच्या बांधणीसाठीं महाराजांनीं पन्नास सहस्र होन खर्च केले. त्यांच्या इतर दुर्गांसाठीं झालेल्या खर्चाचे आंकडे एकत्रित केले तर या राज्यांगासाठीं त्यांना केवढें अपार द्रव्य खर्च करावें लागलें असेल याची कल्पना येईल. पण हा खर्च त्यांच्या मतें अत्यावश्यक होता. शिवदिग्विजयांतील निम्नलिखित परिच्छेद या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे. "असें असतां, किल्ल्याचे व इमारतीचे हिशेब आले ते मोरोपंत पेशवे व निराजीपंत मुजुमदार यांनीं पाहून, महाराजांस विनंति करते जाले कीं, किल्ल्याचे इमारतीस पैका फार लागतो, व लोकांचाहि खर्च फार वाढतो, याकरितां विचारें जें करणें असेल ती आज्ञा असावी म्हणजे ठीक पडेल." हें ऐकून "दौलत आहे, जें करवणें तें समजोनच करवीत आहों. आपणास धर्मस्थापना करणें व राज्य संपादणें, सर्वांस अन्न लावून, शत्रुप्रवेश न होय, तें किल्ल्यामुळें होते. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लीन्द्रासारखा शत्रू उरावर आहे; तो आला तरी जुने नवे तीनशे साठ किल्ले हजरीस आहेत एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी, तीनशे साठ वर्षं पाहिजेत. मसलत पडेल तेथें कुमक करून शत्रूस पाहजा दुसरा लाविला असतां शेकडो वर्षांनीं राज्य

जाणार नाहीं. दोन रुपये कमजास्त खर्च हा प्रपंच नव्हे, आदा पाहून करावा. हें राज्यभाराचे विचार आप्तकार्याकरितां, कोटद्या-वधि खर्च करून हजारो माणसें उत्तम प्रकारची मारवावी आणि केली योजिली गोष्ट सिद्धीस न्यावी, राज्यांत सावकार हेच जामदारखाना. वख्तशीर घेऊन फेड करावी, असें आहे. तुम्हास किती सांगावें?" असें सांगोन पुढें इमारत चालती करण्याची पर-वानगी देऊन चालविते जाले." महाराजांनीं हें इतकें महत्त्वाचें मानलेलें राज्यांग कसें वाढविलें, दुर्गांची संख्या किती होती, त्यां-वरील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचें स्वरूप व सैन्य किती होतें हें पाहणेंहि अत्यवश्य होतें.

महाराजांनीं जें नौदल निर्माण केलें, जे सिंधुदुर्ग निर्माण केले व त्यांच्या साहाय्यानें पोर्तुगीज, इंग्रज, डच इत्यादि उपद्रवी पर-राष्ट्रिकांवरहि जो वचक बसविला त्याचेंहि निरीक्षण करणें आवश्यक आहे.

सेनापति शिवाजीचें यथायोग्य स्वरूप या विषयांच्या परा-मर्शानें स्पष्ट होईल.

या व्यतिरिक्त शिवछत्रपतींच्या विभूतिमत्त्वाचा परिचय करून घ्यावयाचा म्हणणें शिवछत्रपतींच्या राज्यव्यवस्थेचें समालोचन आवश्यक आहे. महाराजांच्या स्वराज्याचा विस्तार, राज्यव्यव-स्थेच्या दृष्टीनें स्वराज्याच्या प्रदेशाचे असणारे विभाग व त्यांवरील अधिकारी, त्यांचें शासक मंडळ, अमात्य, त्यांचीं अधिकारक्षेत्रें व वेतनश्रेणी, अन्य शासकीय विभाग व शासनसूत्र आणि त्यांच्या-वेळीं प्रचलित असणाऱ्या शासनसंस्थेंत त्यांनीं केलेल्या सुधारणा या गोष्टींचें समालोचन या राज्यव्यवस्थेच्या समालोचनांत येतें.

प्रचंड सैन्यें व अजिंक्य दुर्ग यांची निर्मिति करतांना व जीवन-व्यापी संग्राम चालवितांना शिवछत्रपतींना अपार द्रव्यसंग्रह करावा लागलेला आहे. हा द्रव्यसंग्रह करण्याचे त्यांचे मार्ग कोणते होते हें पाहणेंहि आवश्यक आहे. जर असीम कोशसंग्रह नसता तर

महाराजांना स्वराज्यमंदिराची उभारणी करतां येणें केवळ अशक्य होतें हें स्पष्टच आहे.

कोणत्याहि राज्ययंत्रणेच्या उत्कृष्टत्वाचा पाया तिच्या अर्थव्यवस्थेंत असतो, उत्कृष्ट राज्यव्यवस्थेचा निर्माता म्हणून शिवछत्रपतींची ख्याति आहे. या दृष्टीनें त्यांनीं निर्माण केलेल्या स्वराज्याच्या अर्थव्यवस्थेची तपासणी आवश्यक आहे. अर्थव्यवस्था तपासावयाची म्हणजे भूमीच्या मोजमापाची पद्धति, भूमीची वर्गवारी, वतनें, रयतवारी पद्धति, जुन्या यावनी अर्थपद्धतींत शिवछत्रपतींनीं केलेल्या सुधारणा, शेतसाऱ्याची आकारणी, वेतनश्रेणी, राज्याच्या उत्पन्नाच्या विविध बाबी, भेटी, देणग्या, साहाय्यदान, युद्धांतील लूट व तिचें वाटप, व्यापार, समुद्रावरील उत्पन्न, चौथाईची उत्पत्ति, पद्धति व स्वरूप इत्यादि गोष्टींचें समालोचन अत्यावश्यक ठरतें.

उत्कृष्ट न्यायदान पद्धति हें उत्कृष्ट राज्यपद्धतीचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. शिवछत्रपतींच्या स्वराज्यांतील न्यायदान पद्धतीचें स्वरूप काय असेल? प्राचीन भारतीयांच्या न्यायदानपद्धतीचें पुनरुजीवन करण्याकडे शिवाजी महाराजांचें लक्ष होतें. त्या दृष्टीनें त्यांच्या वेळीं प्रचलित असणाऱ्या यावनी न्यायपद्धतींत त्यांनीं कोणकोणत्या सुधारणा केल्या, न्यायाधीश व पंडितराव या खात्यांचे संबंध कसे परस्परपूरक होते या दृष्टीनें स्वराज्याचें समालोचन करणें अत्यवश्यक आहे.

शिवछत्रपतींनीं राष्ट्रजीवनाच्या स्वभाषा, स्वधर्म, राज्यव्यवस्था इत्यादि महत्त्वाच्या क्षेत्रांत आपल्या द्रष्टेपणानें ज्या आवश्यक सुधारणा केल्या त्या पहाणेंहि अत्यवश्यक आहे.

या सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार करावयाचा म्हणजे सन १६६= ते १६८० पर्यंतच्या त्यांच्या राजकीय जीवनाचा पट निरीक्षण करणें आवश्यक आहे. या कालखंडांत शाहिस्तेखानाच्या आक्रमणापेक्षांहि अधिक भयानक संकटें शिवछत्रपतींच्यावर आलीं.

त्यांतील पहिलें संकट मिर्झाराजा जयसिंगाच्या आक्रमणाचें होतें. या आक्रमणाच्या वेळीं त्यांना आजवर रक्ताचें पाणी करून संपादिलेल्या स्वराज्यमंदिरावर तुळशीपत्र ठेवण्याचाच प्रसंग आला होता. यानंतरचें दुसरें व त्यांच्यावरील सर्वांत भीषणतम संकट म्हणज बादशहा औरंगजेबाच्या आग्रा येथील राजसभेंत उपस्थित राहण्याचा व पुढें त्याच्या अटकेंत राहण्याचा त्यांच्यावर आलेला प्रसंग होय. आपल्या प्रतिभेच्या प्रखर दीप्तीनें त्यांनीं या संकटाच्या अमावस्येचा काळा अंधार नाहींसा करण्यांत विश्वविख्यात राजनीतिपटूंच्या मालिकेंतील आपलें मेरुमण्याचें स्थान निर्विवादपणें सिद्ध केलेलें आहे. त्यांच्या जीवनांतील या रोमहर्षक प्रसंगांच्या विवेचनापासूनच या ग्रंथाच्या तृतीय भागाचा प्रारंभ करण्याचा संकल्प प्रकट करून 'पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी' या आमच्या संकल्पित ग्रंथाचा हा दुसरा भाग आम्ही येथें संपवितों.

१०३९६
दा.

# आधारग्रंथांची यादी

१. ऋग्वेद
२. ऋग्वेद सायणभाष्य
३. श्रीमद्‌भगवद्‌गीता
४. सावरकरांची कविता
५. रामदासांची कविता
६. पेशव्यांची बखर
७. समर्थ संजीवनी
८. शिवबावनी कविभूषण (ग्रंथकर्ता)
९. Rise of Maratha Power, by Justice Mahadeo Govind Ranade.
१०. The decline and fall of Roman Empire by Gibbon.
११. मध्ययुगीन भारत लेखक—चिंतामणराव वैद्य
१२. The Oxford History of India, by Vincent Smith.
१३. History of Aurangzeb, by Sir Jadunath Sarkar
१४. Thoughts on Pakistan by Dr. B. R. Ambedkar
१५. महिकावतीची बखर
१६. शिवाजीची राजनीति लेखक—भास्कर वामन भट
१७. मराठी रिसायत लेखक–श्री. नानासाहेब सरदेसाई
१८. सुफी व त्यांचा संप्रदाय लेखक — सेतुमाधवराव पगडी
१९. दासायन खंड १ ते ३ लेखक—अनंतदास रामदासी
२०. कुराण
२१. हिंदुधर्मप्रदीप लेखक—महादेवशास्त्री दिवेकर
२२. श्रीमन्महाभारत
२३. संस्कृतीके चार अध्याय लेखक—रामधारीसिंह दिनकर
२४. राजव्यवहारकोश लेखक—रघुनाथ पंडित
२५. विजयनगर स्मारक ग्रंथ (भारत इतिहास संशोधक मंडळ प्रकाशन)
२६. विजयनगर स्मारकग्रंथ. प्रस्तावना लेखक–श्री शेजवलकर

२७. आज्ञापत्र लेखक—रामचंद्रपंत अमात्य
२८. सभासदाची बखर
२९. मनुस्मृति
३०. पराशर माधव
३१. अनुभूति प्रकाश
३२. जीवन्मुक्तिविवेक
३३. जैमिनीय न्यायमालाविस्तर
३४. पुण्यश्लोक मंजिरी
३५. पंचदशी
३६. कालमाधव
३७. कालज्ञान
(३० ते ३७) लेखक—माधवाचार्य विद्यारण्य
३८. मदुराविजयम् लेखिका—गंगदेवी
३९. सम्राट कृष्णदेवराय लेखक—ग. ह. खरे
४०. सायणाचार्यांचें चरित्र लेखक—कोलंगडे
४१. राधामाधवविलासचंपू कवि—जयरामदास पिंडे
४२. राधामाधवविलासचंपू प्रस्तावना लेखक—वि. का. राजवाडे
४३. शिवभारत लेखक—कवींद्र परमानंद.
४४. शिवभारत प्रस्तावना लेखक—दत्तोपंत आपटे
४५. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ४ था संपादक—वि. का. राजवाडे
४६. श्री समर्थ रामदास आणि रामदासी संप्रदाय यांचें अभिनव दर्शन. लेखक—भास्कर वामन भट
४७. संतवाणीचा अमृतकलश लेखक—भा. पं. बहिरट
४८. न्यायमूर्ति रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें
४९. ज्ञानेश्वरी संपादक—सोनोपंत दांडेकर
५०. एकनाथांची गाथा
५१ एकनाथी भागवत
५२. श्री एकनाथांचें भावार्थ रामायण
५३. श्री एकनाथांचें चरित्र लेखक—ल. रा. पांगारकर
५४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ व २, लेखक—ल. रा. पांगारकर
५५. श्रीगुरुचरित्र लेखक—सरस्वती गंगाधर

५६. महाराष्ट्र सारस्वत लेखक - वि. ल. भावे
५७. श्री नामदेवाची गाथा
५८. श्री तुकारामाची गाथा
५९. श्री तुकाराम वचनामृत संपादक - आर्. डी. रानडे
६०. बहिणाबाईची गाथा
६१. अमरौघ शासनम् लेखक—श्री गोरक्षनाथ
६२. श्री दक्षिणामूर्ति स्तोत्रम्
६३. षट्पदी
६४. गीताभाष्य
(६२–६४) श्रीमदाद्य शंकराचार्यप्रणीत
६५. कुलार्णवतंत्र
६६. श्रीगुरुदत्तयोग लेखक - श्री. शं. खानोलकर
६७. श्रीमद्भगवद्गीतारहस्य लेखक—लोकमान्य वा. गं. टिळक
६८. ज्ञानेश्वर-वाङ्मय आणि कार्य लेखक - प्रा. न. र. फाटक
६९. एकनाथ-वाङ्मय आणि कार्य लेखक - प्रा. न. र फाटक
७०. रामदास-वाङ्मय आणि कार्य लेखक - प्रा. न. र. फाटक
७१. छांदोग्योपनिषद्
७२. श्रीसमर्थचरित्र. लेखक—शंकर श्रीकृष्ण देव
७३. समर्थहृदय लेखक - शंकर श्रीकृष्ण देव
७४. समर्थ संप्रदाय लेखक - शंकर श्रीकृष्ण देव
७५. रघुवंश कवि - कालीदास
७६. शुक्रनीति
७७. आपस्तंब गृह्यसूत्र
७८. बार्हस्पत्य अर्थशास्त्र
७९. कौटिलीय अर्थशास्त्र
८० शिवदिग्विजय
८१. बुसातिने सलातिन्
८२. शिवचरित्र (मल्हार रामराव चिटणीसकृत)
८३. युगप्रवर्तक छत्रपति शिवाजी महाराज लेखक—भावे
८४. शिवराज्य व शिवकाल लेखक—श्री. भावे
८५. बुधभूषण लेखक छत्रपति संभाजी

८६. शिवराजभूषण कवि – भूषण
८७. A forgotten Empire, by Robert Seewell
८८. The History of Medieval India, by Ishwari Prasad
८९. The Annals and Antiquities of Rajastan, by Tod
९०. History of India, by Wheeler
९१. Memoirs of the Emperor Jahangir. by Major David.
९२. Gliot and Diason.
९३. India Historical Records Commission. (Proceedings of the meetings)
९४. Life of Mahammad by Moor.
९५. Social and Political Life in Vijayanagar Empire by B. A. Saletore.
९६. Never to be forgotton Empire, by B. Surya Narayan rao.
९७. Discovery of India, by P. Jawaharlal Nehru
९८. Shivaji and his Times, by Sir Jadunath Sarkar
९९. The Living World of Philosophy by Sir Henry Thomas.
१००. Gorakhnath and Medieval Hindu Mysticism by Dr. Mahansingh)
१०१ Life of Ramakrisha
१०२ Mysticism in Maharashtra, by R. D. Ranade
१०३. History of Political Theories, by Subine
१०४. War in Ancient India, by Ramchandra Dixitar.
१०५. Foreign Biographies of Shivaji
१०६. English Records on Shivaji
१०७. Nayaks of Madura
१०८. Shivaji the great part 1 to 4, by Dr. Balkrishna
१०९ राजा श्री शिवछत्रपति भाग १ ते १० लेखक—बा. मो. पुरंदरे

✦ ✦ ✦

# सूची


अफझलखान २०९, २३३, २४०, २५४–२८४, ३०५
अब्दुल सैय्यद २७४
आत्मगुण ८७
आदिलशाही २५
आबाजी सोनदेव ११२
अमात्यांची राजनीति १४०
आवळसकर २२
ऑक्झिडेन १६४
ईस्ट इंडिया कंपनी १६६
इंग्रज ७८, ३८२
एस्कॉलियट १६३
औरंगजेब ७२, १५६, २२०, ३१६, ३८८
करणसिंग १०
कल्याण ११२, २२२
कलमी बखर २९०, २९४
कस्तूरीरंग ३०५
काफीखान ११०
कान्होजी जेधे ५३
कामन्दकीय नीतिशास्त्र ९२
कारतलबखान २२५, ३४७
कास्मोडा गार्डा १११, १६३, ३६८, ३७७
कुतुबशाही २२०
कूटयुद्ध ८१
कृष्णज्योतिषी ४४
कृष्णराव मोरे २१५
कृष्णाजी नाईक बांदल देशमुख ५४
कृष्णाजी भास्कर कुलकर्णी २५५, २७४, २७५, २८१
कृष्णाजी भास्कर पंडित २२७
कोंडाणा ६६, १८०
कौटिल्य ९३, १०२
कॅरेरी ७२
खवासखान २३१
खाफीखान २९७
खोपडे देशमुख ५३
गिफर्ड ३१३
गुणसमुच्चय (शिवाजीचे) १६४
गोपीनाथपंत २६६
गोवें ७६
गौतमधर्मसूत्र ८७
घोरपडे ६
चाणक्य ९३
चिटणीस—मल्हार रामराव १४८, १४९, २९०, २९४
चंद्रराव मोरे २०८, २१५
छत्रपतींचा सावत्र मामा २१८
जयराम पिंड्ये ५
जयसिंग ७३
जयंती ३०
जसवंत ३५२
जसवंतसिंग ३८४
जहांगीर १, २६
जावळी २०४
जिजाबाई—जिजामाता २८, ३०, ३५, ३८, ४७, २८४, ३२४
जिझिया १५६
जिवा महाली २८१
जेधे करीना १८१, २८९, ३१६
जेधे देशमुख ५३

जेधे शकावलि १८३, २८९, २९६
जैतापूर ३१२
डच, डच वाकनीस ३१९, ३३३, ३८३
डेलॉन १६९
तारीख ई शिवाजी २९०, २९४
त्रिमलनायक १८८
त्र्यंबकजी भोसले ३२१
त्र्यंबकराज १९०
थेवेनॉट १६३
दत्तोपंत आपटे ३३, १०५
दर्याखान ३०
दादाजी नरसी प्रभू देशपांडे ६०, ६१
दादोजी कोंडदेव ३८, ४७, ५१, ६०, ६२
दिलीपसिंह ८
देवीचा साक्षात्कार २५२
दोरोजी ३११, ३१६
नानाजी प्रभू मुसेखोरेकर २५६
नेताजी पालकर २३१, २८३, ३१६, ३२५
पत्रसारसंग्रह २२८
परमानंद कवीन्द्र २७, २११, २८९, ३२६, ३३३
पहिलवानखान २७४
पिलाजी मोहिते २७४
पोर्तुगीज ७५, ७६
पंताजी गोपीनाथ बोकील २५९, २६० २६१
प्रोएन्झा १८६
फाझलखान ३०९, ३१०
फातखान ३८१
फिरंगोजी नरसाळा ३२८, ३२९
फिलिफ गायफर्ड ४५
फ्रेअर १७४
बजाजी निंबाळकर १५२, २४८
बडे साहेबीण २२०, २३१, २४१, २९८, ३०५
बहलोलखान १४४
बाजी पासलकर ५३
बाजी प्रभू देशपांडे २१९, ३३३, ३३७, ३३८
बाजीराव घोरपडे २१५, २४०
बार्हस्पत्य अर्थशास्त्र ९८
बाळकृष्ण – डॉ. बाळकृष्ण ६, ५०, १२०, १६१, ३००
बुधभूषण १३४
बुसातिने सलातीन १०६, १८३, २२७
भावे ११४
भीमसिंग ११
भूषण कवि ५, ८४, १४५, १६५
मनुस्मृति ९१, १२८, १२९
मनूची २९१
मसूदखान ३३८
महमदनामा १९४
महमूद आदिलशहा २२०
महादाजी निळकंठराव सरनाईक २०४
महंमद बिन कासीम ३०७
महंमद शेरीफ ३१५
माधवरावजी गोळवलकर २
मीरजुमला १८७
मुरारजगदेव १९१
मुसेखान १९३, ३०९
मुस्ताफाखान १०८, १९४, २४०
मूर्तिजा निजामशहा २५
मंबाजी भोसले १९०
यशवंतराव मोरे २०८
युवराज १३२
रणनीति ८१
रहमान (प्रो. रहमान) २९९

रहीमखान २७४
राजनीति ८०
राजापूर ११२
राजे पाढरे २४८
राज्ययंत्राचा नेता अथवा राजा १२५
राज्याचा आत्मा—धर्म १४७
रामचंद्रपंत अमात्य २२, ७०, १३०
रामदास श्रीसमर्थ ४४, ४७, १४६, २८७
रायबागीण ११४, ११५
रायरी बखर २९१
रायरेश्वराचें प्राचीन मंदिर ५९
रावजी पंडित ३८५
रुस्तुमेजमान ३१०
रेव्हिंग्टन २९१, ३१२, ३५४, ३५७
लखूजी जाधवराव २४
लाल महाल ३७६
वासिष्ठ धर्मसूत्र ८८
विजयराज ३०
विशाळगड ३३२
व्यंकटनायक १८७
व्यंकोजी ७४
व्हिन्सेन्ट स्मिथ ६८
शहाजहान २६
शहाजी २५, २६, ३०, ३५, ३६, ४१ ४७, १८३, १८५, १९३, १९४
शाहिस्तेखान ३२०, ३८१
शाहीर अज्ञानदास २९७
शिवचरित्र (सप्त प्रकरणात्मक) १०९, १८३
शिवदिग्विजय ११५, २९०, २९४
शिवनेरी २३, २६, २८
शिवभारत – शिवभारतकार ४, १९, २७, ३३, ३६, ३९, ४०, १०५, १८३, २८९, २९४, २९६
शिवराजभूषण ५
शिवराज्य व शिवकाल ११४
शिवाजी - छत्रपति - नेताजी ८०, ८१, ११६, १५२, २११, २८९, ३२६, ३३३, ३५०, ३६८
शिवार्कोदय ४४
शिसोदे ४
शुक्रनीति-शुक्राचार्य ९५, १२५, १२६, १२७, १२९, १३५, १४९
शुभकृष्ण १०
शृंगारपूर ३६५
श्यामराव नीळकंठ पेशवे ६३
श्रीरंगराज १८७
सईबाई २५४
सभासद बखर ५, २८९, २९६, ३००
सय्यद बंडा २७४, २७८, २८१
सरकार (कै. सर जदुनाथ सरकार) १७, ३१, ३७, ५९, ७४, १६२, २२९
साक्षात्कार—देवीचा साक्षात्कार २५२
सिद्दी ७४
सिद्दीजोहार ३१८, ३२७, ३३१, ३४३
सीली—सर जॉन सीली ६८
सूर्यराव सुर्वे ३३२, ३५२, ३६१
संभाजी ३०, ४१, १३४
संभाजी कावजी २९३, ३६६
सोनाजी विश्वनाथ डबीर ६३, १९६
हेन्री रेव्हिंग्टन ३१८, ३१३, ३१४, ३३०
हैवतराव शिळमकर देशमुख २११

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८५८३ दि: [illegible]

REFBK-0010316